# ‘‘अहमदनगर जिल्ह्यातील पारधी समाजातील महिलांचा सर्वांगीन अभ्यास’’
## (इ. स. १९४७ ते इ. स. २०१०)

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**
**इतिहास विभाग,**
**सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील**
**विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरीता सादर केलेला शोधप्रबंध**

**संशोधक**
**पवार सुप्रिया संग्राम**

**मार्गदर्शक**
**डॉ. डी. एस. गायकवाड**
एम.ए.,एम.फिल.,पीएच.डी.(JNU नवी दिल्ली)
(सेवानिवृत्त) इतिहास विभाग प्रमुख,
पुणे विद्यापीठ, पुणे.

**संशोधन केंद्र**
इतिहास विभाग,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,
गुलटेकडी, पुणे–३७.

२०१८

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी **पवार सुप्रिया संग्राम** यांनी, **''अहमदनगर जिल्ह्यातील पारधी समाजातील महिलांचा सर्वांगीन अभ्यास'' (इ. स. १९४७ ते इ. स. २०१०)** या विषयातील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती कोणत्याही पदवीकरीता त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) २००९ च्या नविन नियमाला अनुसरून सदर शोध प्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ : पुणे
दिनांक : / /२०१८

**डॉ. डी. एस. गायकवाड**
संशोधन मार्गदर्शक

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करते की, **''अहमदनगर जिल्ह्यातील पारधी समाजातील महिलांचा सर्वांगीन अभ्यास'' (इ. स. १९४७ ते इ. स. २०१०)** हा प्रबंध मी **डॉ. डी. एस. गायकवाड** यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेला आहे. या लिखाणासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन साधनांचा योग्य श्रेयनिर्देश प्रबंधात केलेला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच. डी. (इतिहास) पदवीकरिता प्रस्तुत प्रबंध विद्यापीठास सादर करण्यात येत आहे. हा शोध–प्रबंध इतर कोणत्याही पदवी किंवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : पुणे **सुप्रिया संग्राम पवार**

दिनांक : / /२०१८ संशोधक

# भूमिका

''अहमदनगर जिल्ह्यातील पारधी महिलांचा सर्वांगीन अभ्यास (इ.स. १९४७ ते २०१०)'' या संशोधन प्रबंधासाठी मला माझ्या आयुष्यात आलेल्या प्रसंगाची, विचारांची, आणि प्रेरणेची अभिव्यक्ती आहे असे वाटते.

इ.स. २०१० च्या दरम्यान मला माझ्या महाविद्यालयाकडून एक महिन्याच्या उद्‌बोधन वर्गा (Orientation Course) साठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे पाठविण्यात आले होते. या वर्गामध्ये रोज वेगवेगळ्या सामाजिक विषयावर मार्गदर्शन करण्यात येत होते. यामध्ये अण्णाभाऊ साठे अध्यासनाचे प्रमुख डॉ. रामनाथ चव्हाण यांनी मार्गदर्शन केले होते. डॉ. चव्हाण यांनी भटके विमुक्त म्हणजे काय आणि भटक्या विमुक्तांची स्थिती सांगितली त्यावेळी ज्या समाजात आपण राहतो त्या समाजातील भटके विमुक्त या घटकाचा विचार ही कधी मनात आला नव्हता, त्यांच्या मार्गदर्शनामुळे एक करूणामय भावना मनात निर्माण झाली आणि त्यांच्या परिपेक्षेतून अभ्यासाचा एक वेगळा आयाम तयार झाला.

अहमदनगर जिल्ह्यात सातत्याने येणे–जाणे असल्याने माझ्या घरासमोर एक पारधी कुटुंबाची भांडणे चालली होती. याआधीही अशी भांडणे खूप वेळा होत असायची पण हे पारधी अशीच भांडणे करतात त्यांचा असाच गोंधळ असतो, अस इतरांप्रमाणे मी सुद्धा दुर्लक्षित करत होते, पण त्या दिवशीची भांडणे माझ्या आतल्या विचारांमुळे मी दुर्लक्षित करू शकले नाही ती भांडणे काय आहेत ते मी विचारायला पुढे गेले, मला थोडा राजकीय वर्तुळाचा वारसा असल्याने ती भांडणे मला सांगण्यातही त्या लोकांना फारसा संकोच वाटला नाही. त्यांनी मला सांगितले की या मुलीला तिचे सासरचे लोक नांदवणार नाहीत. कारण तीला मुल होत नाही, यामुळे ते मुलीला मुलीच्या माहेरी सोडून चालले होते. अशा वेळी त्यांची भांडणे इतकी वाढली होती की, कुणीच कुणाचे ऐकूण घेण्यास तयार नव्हते. सरते शेवटी तीचे सासरचे लोक तीला मूल होत नाही म्हणून तिला सोडून गेले. मुलीचे वय जेमतेम २१ ते २२ वर्ष असावे आणि मूल होत नाही याचा कोणताही सखोल अभ्यास वैद्यकीय चाचण्या न करता एवढा मोठा निर्णय घेवून त्या मुलीचे आयुष्य संपवले. यावर तिचे व तिच्या आई–वडीलांचे विचार मला चक्रावून

सोडण्यासारखे वाटले. भौतिक गुलामगिरीपेक्षा मानसिक गुलामगिरी घातक असते, याची मला जाणीव झाली. त्यामुळे पारधी समाजातील महिलांचा अभ्यास करण्याचा निश्चय केला.

इ.स. २०१४ मध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत पीएच.डी. पदवीकरीता माझी निवड झाली. संशोधनासाठी विषय ठामपणे मनात होताच, त्या अगोदर पारधी समाजाबाबत वाचन झाले होते, माहितीही झाली होती, डॉ. रामनाथ चव्हाण यांच्याकडे ही पारधी महिलांचा अभ्यास करणार असल्यासंबंधी विचार विनिमय झाला, त्यांनाही खूप आनंद वाटला. समाजव्यवस्थेने ज्यांच्या कपाळावर चोरीचा ठपका ठेवला व सातत्याने त्यांच्या पुरुषवर्गाचा सततचा तुरुंगवास आणि यामध्ये एकूणच सर्व परिवाराचे होणारे अतोनात हाल व महिलांची स्थिती एक चिंतनाचा विषय वाटत होता. आधीच भारतीय समाजात स्त्री वर्ग हा उपेक्षित म्हणून गणला गेला आहे, त्यातही पारधी स्त्री वर्ग हा आणखीनच उपेक्षित असल्याचे निदर्शनास आल्यामुळे पारधी महिलांच्या सर्वांगीन समस्यांचा अभ्यास करायचे ठरवले.

पारधी महिलांची सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक व त्यांचे आरोग्य या दृष्टीकोणातून ऐतिहासिक स्थिती व सद्यस्थिती अभ्यासली आहे व महिला संघटना, संघटना प्रमुख यांच्या अडचणी याचाही परमार्श या संशोधन प्रबंधातून घेतला आहे. संशोधन करीत असताना येणाऱ्या सर्व निरीक्षणांचा, अडचणींचा अभ्यास करून संशोधन प्रबंध पूर्ण केला आहे.

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथील इतिहास विद्याशाखांतर्गत पीएच.डी. पदवीसाठी शोध प्रबंध सादर करीत असताना मनस्वी समाधान व आनंद होत आहे.

सदर शोध प्रबंध ''अहमदनगर जिल्ह्यातील पारधी समाजातील महिलांचा सर्वांगीन अभ्यास'' (इ. स. १९४७ ते इ. स. २०१०) या विषयावर केला आहे. एखादे संशोधन केवळ बुद्धी प्रतिभा आणि कष्ट करण्याची चिकाटी एवढ्यातूनच पूर्ण होवू शकत नाही. संशोधकाला गरज असते ती नेमक्या, अचूक आणि योग्य मार्गदर्शनाची, माझे मार्गदर्शन अत्यंत, उत्साही, व्यासंगी, अभ्यासू व्यक्तिमत्व असणारे आदरणीय डॉ. दिपक गायकवाड माजी विभाग प्रमुख, इतिहास विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांनी मला योग्य वेळी समायोचित मार्गदर्शन केले. त्यांनी आपला अमूल्य वेळ मला दिला व त्यांनी दिलेल्या अत्यंत आस्थापूर्वक समर्पक दिलेल्या सूचना यामुळेच प्रबंधाचे कार्य अपेक्षित रित्या पूर्ण करता येणे शक्य झाले. त्याबद्दल मी सदैव त्यांच्या ऋणात रहाणे पसंत करते.

याचप्रमाणे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने मला ही संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल विद्यापीठाचे व विद्यापीठातील सौ नलिनी वाघमारे, यांनी सतत सहकार्य दिले या बद्दल मी त्यांचे आभार मानते.

प्रस्तुत विषयातील माहीती व प्रेरणा देणारे आदरणीय डॉ. श्री. रामनाथ चव्हाण, डॉ. राजा दीक्षित, श्री. हरी नरके, डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. अनुपमा जगताप, प्राचार्य नंदकुमार निकम यांची मी सदैव ऋणी आहे. तसेच पारधी समाजातील महिलांची मुलाखत घेणे माहिती घेणे, अत्यंत कठीण व जिकरीचे काम होते. या कामात मला मदत करणारे श्री. राजेंद्र काळे, ॲड. श्री. अरुण जाधव, श्री अजित भोसले, श्री. आसाराम काळे यांचेही मी आभार मानते.

सदर प्रबंधाकरीता सखोल माहिती व सहकार्य करणाऱ्या आमच्या अहमदनगर जिल्ह्यातील पारधी समाजातील सर्व महिला भगिनी व मैत्रीणी यांचे व विशेष करुन सौ. पिंपळे, सौ. सपना भोसले यांचे मी आभार मानते.

संशोधनातील विषयासंदर्भात विशेष सहाय्य करणारे आमच्या महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मंजूश्री बोबडे व आमच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू भगिनी यांचे मी आभार मानते.

संशोधन विषयासंदर्भात विशेष प्रेरणा देणारे, सदैव उत्साह वाढवणारे आमचे सहकारी प्रा. डॉ. स्वाती काळभोर (सी. के. गोयल कॉलेज दापोडी, पुणे) प्रा. सौ. विद्या गायकवाड (भिगवण कॉलेज), डॉ. हरीदास जाधव (सी. टी. बोरा कॉलेज, शिरुर), डॉ. मंजूळकर अंबादास (विवेकानंद शिक्षणसंस्था लोणी काळभोर), प्रा. जालींदर भोसले (आबासाहेब गरवारे कॉलेज, पुणे), प्रा. शिवाजी सोणावळे अण्णा, प्रा. तुकाराम दरेकर (माजी इतिहास विभाग प्रमुख श्रीगोंदा) यांचे मी मनःपूर्वक आभार मानते.

नमूद शोध प्रबंध पूर्ण करताना माझ्या पाठीशी सतत खंबीरपणे उभे राहून मला सातत्याने प्रेरणा देणारे, साथ देणारे व वेळोवेळी मला समजावून घेवून मला मदत करणारे माझे पती श्री. संग्राम पवार व माझे वडील श्रीमंत ओहोळ आई शोभा ओहोळ यांच्या ऋणात रहाणेच मी पसंत करते. याच बरोबर माझे कुटूंबीय माझा भाऊ कुणाल ओहोळ बहीण पनिका ओहोळ, माझा मुलगा सम्यक पवार व सासूबाई मालन पवार यांचे मी विशेष आभार व्यक्त करते.

सदर प्रबंधासाठी आकर्षक संगणकीय मुद्रण छपाई करुन देणाऱ्या सौ. पुष्पा बुळे, वनिता ग्राफिक्स, पुणे यांचे मी मनापासून आभार मानते.

**सुप्रिया संग्राम पवार**

# अनुक्रमणिका


| प्रकरण पहिले : संशोधन विषयाची पार्श्वभूमी व ओळख | | १–१७६ |
| --- | --- | --- |
| १.१ | प्रस्तावना | |
| १.२ | आदिवासी समाजाची ओळख | |
| १.३ | भारतीय आदिवासी : ऐतिहासिक पार्श्वभूमी | |
| १.४ | पारधी समाजाची ओळख | |
| १.५ | भौगोलिक स्थानांतरण व स्थान | |
| १.६ | पारधी जमातींची लोकसंख्या | |
| १.७ | शासनाने निर्माण केलेले संवर्ग (घटक–उपघटक) | |
| १.८ | पारधी समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी | |
| १.९ | पारधी महिलांची सामाजिक जडण–घडण | |
| १.१० | पारधी महिलांची सांस्कृतिक जडण–घडण | |
| १.११ | पारधी महिलांची सामाजिक सद्यस्थिती | |
| १.१२ | पारधी महिलांची राजकीय सद्यस्थिती | |
| १.१३ | पारधी महिलांच्या शिक्षणाची वाटचाल | |
| १.१४ | पारधी स्त्री जीवन विषयक सुधारणा | |
| १.१५ | पारधी महिलांकरीता संघटनांचे योगदान | |
| १.१६ | स्त्रीवादी चळवळींची उगमस्थाने | |
| १.१७ | पारधी महिलांचा स्त्रीवादी चळवळीमध्ये सहभाग | |
| १.१८ | खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणामध्ये पारधी महिलांची आर्थिकस्थिती | |
| १.१९ | कौटुंबिक आर्थिक विकासात पारधी महिलांचे स्थान | |
| १.२० | आर्थिक व्यवहार (अंतर्गत व बाह्य) | |
| १.२१ | अनुसूचित जमातींसाठी (पारधी) भारतीय राज्यघटनेतील महत्त्वाच्या तरतूदी | |

| | | | |
|---|---|---|---|
| १.२२ | पंचवार्षिक योजनांमध्ये आदिवासींकरीता (पारधी) करण्यात आलेल्या शिफारशी | | |
| १.२३ | अनुसूचित जाती व जमाती आयोगामार्फत करण्यात आलेल्या शिफारशी | | |
| १.२४ | शासकीय आर्थिक विकासाच्या योजना | | |
| १.२५ | शासकीय योजनांची फलश्रृती | | |
| १.२६ | शासनाची भूमिका | | |
| | समारोप | | |
| **प्रकरण दुसरे : संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा** | | | **१७७–२१८** |
| २.१ | प्रस्तावना | | |
| २.२ | साहित्याचे सिंहावलोकन | | |
| | २.२.१ | पूर्वीच्या संशोधनाशी संबंधीत साहित्याचा आढावा (ग्रंथ) | |
| | २.२.२ | संशोधन प्रबंध आढावा | |
| | २.२.३ | एम.फिल. अहवाल | |
| | २.२.४ | नियतकालिके, लेख व मासिके | |
| | २.२.५ | शासकीय अहवाल | |
| | २.२.६ | भटक्या–विमुक्त जमातींवरील साहित्य | |
| | समारोप | | |
| **प्रकरण तिसरे : संशोधन पद्धती** | | | **२१९–२३५** |
| ३.१ | प्रस्तावना | | |
| ३.२ | इतिहास लेखन शास्त्र | | |
| ३.३ | इतिहासाची व्याप्ती | | |
| ३.४ | संशोधन विषयाची व्याप्ती/गरज | | |
| ३.५ | संशोधन प्रश्न | | |
| ३.६ | संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये | | |
| ३.७ | संशोधन पद्धती | | |
| | ३.७.१ नमुना निवड | | |

| | | |
|---|---|---|
| | ३.७.२ प्राथमिक तथ्य संकलन | |
| | ३.७.२ दुय्यम तथ्य संकलन | |
| ३.८ | संशोधन अभ्यासाच्या मर्यादा | |
| ३.९ | संशोधन अभ्यासाची नैतिकता | |
| ३.१० | प्रकरणांची रचना | |
| | सारांश | |
| **प्रकरण चौथे : माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन** | | **२३६–३३८** |
| ४.१ | तथ्य संकलन | |
| ४.२ | तथ्य विश्लेषण आणि अर्थनिर्वचन | |
| ४.३ | व्यष्ठी अध्ययन करतांना उत्तरदात्यांनी सुचविलेल्या सूचना/समस्या | |
| **प्रकरण पाचवे : संशोधनाचा सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी** | | **३३९–३५१** |
| ५.१ | संशोधनाचा सारांश | |
| ५.२ | निष्कर्ष | |
| ५.३ | शिफारशी | |
| | **संदर्भ ग्रंथ सूची** | **३५२–३६२** |
| | **परिशिष्ठ्ये** | **३६३–३७१** |
| | मुलाखत मार्गदर्शिका | |
| | छायाचित्रे | |

# तक्ता सूची


| तक्ता क्र. | तक्त्याचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| १.१ | राष्ट्रीय पातळीवरील पारधी जमातींची यादी | १९ |
| १.२ | भारतातील पारधी जमातीची राज्य निहाय, शहरी, ग्रामीण व स्त्री–पुरुष निहाय सांख्यिकी माहिती | २३ |
| १.३ | महाराष्ट्रातील पारधी जमातीची जिल्हा निहाय, शहरी, ग्रामीण व स्त्री–पुरुष निहाय सांख्यिकी माहिती | २३ |
| १.४ | अहमदनगर जिल्ह्यातील साक्षरता | २६ |
| १.५ | आदिवासी शेतकऱ्यांना वाटप झालेल्या वीजपंप व तेलपंप इंजिनांची वर्षवार माहित | १६८ |
| १.६ | महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तरतूद व खर्च | १७२ |
| ४.१ | उत्तरदात्यांची सारणी | ३१४ |

# प्रकरण पहिले
# संशोधन विषयाची पार्श्वभूमी व ओळख


१.१ प्रस्तावना

१.२ आदिवासी समाजाची ओळख

१.३ भारतीय आदिवासी : ऐतिहासिक पार्श्वभूमी

१.४ पारधी समाजाची ओळख

१.५ भौगोलिक स्थानांतरण व स्थान

१.६ पारधी जमातींची लोकसंख्या

१.७ शासनाने निर्माण केलेले संवर्ग (घटक–उपघटक)

१.८ पारधी समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

१.९ पारधी महिलांची सामाजिक जडण–घडण

१.१० पारधी महिलांची सांस्कृतिक जडण–घडण

१.११ पारधी महिलांची सामाजिक सद्यस्थिती

१.१२ पारधी महिलांची राजकीय सद्यस्थिती

१.१३ पारधी महिलांच्या शिक्षणाची वाटचाल

१.१४ पारधी स्त्री जीवन विषयक सुधारणा

१.१५ पारधी महिलांकरीता संघटनांचे योगदान

१.१६ स्त्रीवादी चळवळींची उगमस्थाने

१.१७ पारधी महिलांचा स्त्रीवादी चळवळीमध्ये सहभाग

१.१८ खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणामध्ये पारधी महिलांची आर्थिकस्थिती

१.१९ कौटुंबिक आर्थिक विकासात पारधी महिलांचे स्थान

१.२० आर्थिक व्यवहार (अंतर्गत व बाह्य)

१.२१ अनुसूचित जमातींसाठी (पारधी) भारतीय राज्यघटनेतील महत्त्वाच्या तरतूदी

१.२२ पंचवार्षिक योजनांमध्ये आदिवासींकरीता (पारधी) करण्यात आलेल्या शिफारशी

१.२३ अनुसूचित जाती व जमाती आयोगामार्फत करण्यात आलेल्या शिफारशी

१.२४ शासकीय आर्थिक विकासाच्या योजना

१.२५ शासकीय योजनांची फलश्रृती

१.२६ शासनाची भूमिका

सारांश

# प्रकरण पहिले
# संशोधन विषयाची पार्श्वभूमी व ओळख

## १.१ प्रस्तावना

जंगलातील प्राण्यांची व पक्ष्यांची शिकार करून त्यावर उपजीविका करणारी पारधी ही भटकी जमात आहे. मराठी भाषेमधील 'पारध' या शब्दावरून 'पारधी' हा शब्द तयार झालेला दिसतो. पारध म्हणजे शिकार, म्हणून पारधी म्हणजे शिकार करणारा असा अर्थ पारधी या शब्दास प्राप्त झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये पारधी ही जमात प्रामुख्याने खानदेश, नाशिक, सोलापूर, कोल्हापूर, बीड, पुणे तसेच विदर्भ विभागात बहुसंख्येने आढळते. तसेच ब्रिटिशांनी १८७१ च्या कायद्याने या जमातीस गुन्हेगार ठरविल्यामुळे महाराष्ट्रात व कर्नाटकात ज्या ठिकाणी ब्रिटिशांनी गुन्हेगार जमातींच्या वसाहती निर्माण केल्या त्याच ठिकाणी आज बहुसंख्य पारधी स्थिर झाल्याचे दिसून येते. पारध्यांमध्ये अनेक पोटप्रकार आहेत. त्यामध्ये गायपारधी, चित्तापारधी, फासेपारधी, हरणपारधी किंवा हरणशिकारी, पालपारधी, टाकणकार, आदिवासी पारधी, राजपारधी इत्यादी पोटप्रकार प्रामुख्याने दिसून येतात.[१] गायीच्या मदतीने शिकार करतात, गाई पाळतात. गायीवरून या गावावरून दुसऱ्या गावी जातात म्हणून त्यांना गायपारधी म्हणतात. काही जण चित्त्याच्या साहाय्याने शिकार करतात म्हणून ते चित्तेपारधी. फासे टाकून पक्ष्यांची शिकार करणाऱ्यांना फासेपारधी, हरणांची शिकार करणाऱ्यांना हरणपारधी म्हटले जाते. अलीकडे काही पारधी स्वतःला धनगरपारधी म्हणवून घेतात. तर काही पारधी भिल्लपारधी म्हणून ओळखले जातात. पारध्यांचे हे पोटप्रकार आहेत. पारध्यांचे पोटप्रकार निरनिराळ्या विभागात वेगवेगळे सांगितले जातात. काही पारधी फक्त लंगोटी नेसतात म्हणून त्यांना लंगोटीपारधी म्हणून ओळखले जाते. टाकणकार हा बिदरकडे पारध्यांचा आणखीन एक पोटप्रकार दिसून येतो. ते घरातील जात्यांना टाकी घालण्याचे काम करतात. प्रत्येक पोटप्रकारातील पारधी स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजतात. चित्तापारधी लहान चित्त्यांना पकडून राजाला भेट देत आणि राजाशी संबंध येई म्हणून स्वतःला राजपारधीही म्हणवून घेत. राजपारधी

---

[१] लक्ष्मण माने (१९९७), विमुक्तायन, महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : एक चिकित्सक अभ्यास, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, प्र.आ., पृ.७६

हे राजाशी संबंधित असल्यामुळे त्यांना कधीही कोणीही अडवत नाही, असे राजपारधी अभिमानाने सांगताना दिसतात.[२]

पारधी स्वतःला राजपूत वंशातील समजतात. त्यांच्यामध्ये काळे, पवार, शिंदे, चव्हाण, भोसले ही प्रमुख कुलनामे दिसून येतात. पारधी जमातीची बोलीभाषा ही गुजराती बोली भाषेसारखी आहे. महाराष्ट्रातील कंजारभाट, घिसाडी यांच्या भाषेशी जुळणारी अशीच पारध्यांची बोलीभाषा आहे. ही भाषा सहसा दुसऱ्या जमातीमधील लोकांना लगेच समजू शकत नाही. गुजराथी, राजस्थानी आणि हिंदुस्थानी बोलीभाषेमधील अनेक शब्द पारध्यांच्या भाषेत सापडतात व बरीच वर्षे महाराष्ट्रात असल्यामुळे त्यांच्या भाषेवर मराठी भाषेचाही प्रभाव आहे. पारधी जमात ही फार पूर्वीपासून जंगलांमधून उपजीविकेची साधने गोळा करणारी व प्रामुख्याने शिकारीवरच उदरनिर्वाह करणारी प्राचीनतम भटकी जमात आहे, हे अनेक उदाहरणांवरून सिद्ध करता येते.[३] महाराष्ट्रामध्ये ही जमात खानदेशाच्या बाजूला मोठ्या प्रमाणात दिसून येते. पश्चिम महाराष्ट्रात यांची संख्या फारशी दिसून येत नाही. शिकार करणे हाच व्यवसाय असल्यामुळे रानावनांत शिकारीसाठी फिरणे, हरणे पकडणे, जंगलामधील पक्षी पकडणे व गावगाड्यातील लोकांना हे शिकार केलेले प्राणी विकणे आणि पारध्यांच्या बायकांनी गावात भीक मागणे, असे करून पारधी जगत असत. इंग्रजांच्या राजवटीत जंगलांवर निर्बंध आले. जंगली प्राणी मारणे हा गुन्हा ठरविण्यात आला. राजेशाही नष्ट झाल्यामुळे पारध्यांना असलेला राजाश्रयही गेला. याचा परिणाम असा झाला की, पारधी जमातीला उपजीविकेचे कोणतेच साधन उरले नाही. शेतातील कष्टांची सवय नव्हती व त्यामुळे जगण्यासाठी शेतातील कणसे चोरणे, धान्य चोरणे याचबरोबर लहानमोठ्या चोऱ्या करणे असे धंदे या जमातीस करावे लागले. यामुळे ब्रिटिश सरकारने १८७१ च्या गुन्हेगारी कायद्यान्वये पारधी जमात गुन्हेगार ठरविली व या जमातीच्या सर्वच लोकांना सेटलमेंटमध्ये डांबण्यात आले. आता पारधी चोरीचा व्यवसाय सोडून ते काबाडकष्ट करून जगत आहेत. परंतु कुठे चोरी झाली, दरोडा पडला तर पोलीस प्रथम चोरी करणाऱ्या पारध्यांनाच धरून

[२] लक्ष्मण माने (१९९७), विमुक्तायन, पृ.७६

[३] लक्ष्मण माने (१९९७), विमुक्तायन, महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : एक चिकित्सक अभ्यास, यशवंतराव प्रतिष्ठान, मुंबई, पृ.७७

आणतात व त्यांच्यावर गुन्हा दाखल करतात. त्यामुळे आजही पारध्यांना चोरी करणारी जमात म्हणूनच ओळखले जाते.[४]

मानवी समूहांना उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक परिस्थितीवर त्यांची अवस्था अवलंबून असते. ज्या विभागामध्ये मोठ्या प्रमाणावर दाट सदाहरित जंगले असतात त्या विभागातील मानवी समूह दीर्घ काळापर्यंत अन्न शोधतच राहतात कारण त्यांना उपजिविकेसाठी हवे असणारे अन्न शिकार किंवा शेती न करता मिळू शकते. जो भाग डोंगराळ, कुरणांचा असतो त्या भागात फळे, कंदमुळे व प्राणी यांची उपलब्धता वर्षभर नसते. त्यामुळे अन्नाचे हुकमी साधन म्हणून त्यांना पशूपालनावर अवलंबून राहावे लागते व शेतीसाठी जमीन फारशी उपलब्ध नसल्याने या पशुपालक समूहांचे रूपांतर शेतकरी समूहांत होत नाही. हे पशुपालकासमूह पावसापासून बचाव करीत कुरणांच्या शोधात वर्षभर भटकत राहतात. ज्या विभागामध्ये जंगली प्राण्यांचे वैपुल्य असते अशा विभागात संरक्षण व उपजिविका या दोहोंसाठी शिकार करण्यावर भर द्यावा लागतो, त्यामुळे अशा ठिकाणचे समूह हे शिकारी समूह म्हणून ओळखले जातात.[५] नद्यांची खोरी, सुपीक सखल प्रदेश या ठिकाणी जंगली प्राण्यांपासून अभय, थोड्या श्रमामध्ये मिळणारे विपुल शेतीचे उत्पन्न यामुळे अशा विभागात राहणारे मानवी समूह लवकरच स्थिर मानवी जीवन जगू लागतात व त्यांच्यामध्ये कला, कौशल्य व तंत्र यांचा विकास होतो आणि त्यांची वाटचाल नागरी संस्कृतीकडे होऊ लागते. नागरी संस्कृतीला लाभलेल्या सुखी व स्थिर जीवनामुळे त्यांची लोकसंख्या वाढत राहते व आजूबाजूच्या जंगलावर आक्रमण करून येथील पशुपालक शिकारी व अन्नशोधक समूहांना विस्थापित करून त्यांना आपली शहरे वसवावी लागतात. विस्थापित झालेले अविकसित मानवसमूह दोन भागांमध्ये विभागले जातात. त्यांतील एक भाग आपल्या आदिम कौशल्यांचा वापर करून व भीक मागून नागरी जीवनाच्या आश्रयाने राहू लागतो, तर दुसरा भाग जंगलांच्या शोधात भटकत राहतो. आज आपणांस भारतामध्ये ज्या भटक्या जमाती दिसतात त्यांमध्ये अन्नशोधक, पशुपालक आणि शिकारी या तिन्ही प्रकारचे समूह आढळून

[४] लक्ष्मण माने (१९९७), विमुक्तायन, पृ.७७

[५] जारे रमेश (२००६), पारधी समाजाच्या पुनर्वसनाचा अभ्यास, महाराष्ट्र शासन अहवाल, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, ग्रामीण सुधारणा केंद्र, तुळजापूर, पृ.१३

येतात.[६] भटक्या जमातींची जीवनप्रणाली ही आदिवासी आणि आदिम जमातींच्या जीवनपद्धतीशी सदृश्य असल्याने अशा भटक्या जमातींचा समावेश आदिवासी जमातींमध्ये करण्यात आलेला असल्याने भटक्या जमातींच्या विस्तृत माहितीपूर्वी आदिवासींबाबत स्पष्टीकरण अधिक महत्त्वाचे आहे. जाती–जमातींचा उगम त्यामध्ये प्रकर्षाने पारधी जमातींचा उगम, त्यांचे भौगोलिक स्थान व स्थानंतरणाचा इतिहास, इतिहास काळापासून सध्या परिस्थितीपर्यंतची लोकसंख्येचा आढावा, मुख्यतः जेव्हापासून जनगणना सुरू करण्यात आले तेव्हापासून शासनाने निर्माण केलेले संवर्ग (घटक–उपघटक) त्यामध्ये पारधी समाजचे स्थान, जन्मदर, मृत्युदर, लिंग गुणोत्तर, कुटुंबव्यवस्थेच्या निर्मितीचा इतिहास, जीवनप्रणालीचा इतिहास, पारधी जमातीचे समाजातील भिन्न घटकांशी असलेले परस्परसंबंध, पारधी जमातीची सामाजिक जडण–घडणीचे विवेचन करण्यात आले आहे.

इंग्रज राजवटीमध्ये छोट्या–मोठ्या चोऱ्या करणाऱ्या आणि इंग्रजी सत्ता गुप्तपणे उलथवून टाकणाऱ्या ज्या जमाती होत्या त्यांना इंग्रज सरकारने बंदिस्त केले. त्यांचा बदोबस्त करण्यासाठी इ.स.१८७१ साली गुन्हेगारी कायदा निर्माण झाला. कायदा ८१ वर्षे अस्तित्वात होता. या कायद्यान्वये १९८ जमाती गुन्हेगार जमाती म्हणून घोषित केल्या होत्या. स्वातंत्र्यानंतर इ.स १९५२ साली भारत सरकारने गुन्हेगारी कायदा रद्द केला आणि तीन तारेच्या कुंपणात बंदिस्त केलेल्या १९८ जमाती मुक्त करण्यात आल्या. त्या जमातींनाच स्वातंत्र्योत्तर काळात 'विमुक्त जमाती' या नावाने ओळखले जाते. सध्या ५२ भटक्या विमुक्त जमाती अस्तित्वात आहेत. हा समाज एकसंध नसून तो वेगवेगळ्या पोटभेदांनी विभागलेला दिसतो. भटक्या–विमुक्त जमाती म्हणजे चोरी–चपाटी, लांड्यालबाडी करणारा वर्ग आहे असे काहीसे समीकरण इथल्या समाजव्यवस्थेने रूढ केले आणि ते काही अंशी आजही आहे. निखळ दृष्टीने या समाजाच्या व्यवहाराकडे लोक पाहत नाहीत किंबहुना त्यांना त्याची गरजही भासत नाही. तसेच भटके–विमुक्त म्हणजे निरोपयोगी, निरुद्योगी, मागतकरी आहेत आणि संपूर्ण समाजाला ते घातक आहेत असा काहीसा दृष्टिकोण लोकांच्यात रूढ होता.

---

[६] लक्ष्मण माने (१९९७), विमुक्तायन, पृ.२

## १.२ आदिवासी समाजाची ओळख :–

पारधी समुदायातील उप–गट (जमाती) ह्या त्यांच्या व्यवसायावरून निर्माण झाल्या आहेत. 'फासे–पारधी' हे नाव शेजारील समुदायतील गटांनी दिलेले आहे. 'फासे–पारधी' म्हणजे 'फासे–जाळे' व पारधी म्हणजे 'शिकारी'. 'जाळे' आणि 'फांदे'–'हुक' लावून जाळ्यात अडकावून शिकार करणारा तो 'फासे–पारधी' होय. जगातील अनेक देशात आदिवासी जमाती आढळून येतात. प्रत्येक जमातींची वांशिक तत्वे त्या–त्या जमातींच्या भूतकालीन घटनांशी संलग्न आहेत. त्यातूनच त्यांच्यात एक विशिष्ट प्रतिमा आणि अस्मिता आकाराला आलेली आहे. विकसित, विकसनाशील व अल्पविकसित अशा सर्वच देशात आदिवासी जमाती आहेत. देशांतील आदिवासी जमातींचा विकासाच्यादृष्टीने विचार करता त्या कमी–अधिक फरकाने मागासलेल्याच आहेत. आशिया, आफ्रिका आणि अमेरिका खंडामधील देशांमध्ये आजही आदिवासी मोठ्या संख्येने आढळतात. युरोपमधील आदिवासींचे आधुनिकीकरण झपाट्याने झाल्याने आज युरोपमध्ये आदिवासी जमात ओळखणे कठीण झाले आहे. भारतात आदिवासी जमाती मोठ्या संख्येने असून त्या संपूर्ण भारतभर पसरलेल्या आहेत, त्यांच्या प्रकाराची संख्या एकूण ४१४ आहे.[७] आदिवासींची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय प्रगती झालेली नाही. ते प्रगत नागरी समाजापासून दूर राहिलेले आहेत. तसेच त्यांना प्रगत समाजानेही दूर ठेवलेले आहे. त्यामुळे त्यांचा विकास झालेला नाही. आदिवासी हे दूर जंगलात, दऱ्याखोऱ्यात, कडे–कपारीत, नदी–नाल्यांत व गिरी–कंदरांत राहत असल्याने त्यांच्या विकासात अडचणी आहेत. जगात २६० दशलक्षांपेक्षा जास्त मूळ रहिवासी किंवा आदिवासी जमातींचे लोक राहतात. १९९८ मधील आकडेवारीनुसार जगातील ७० देशांत मिळून जागतिक लोकसंख्येच्या ४ टक्के इतकी आदिवासी जमातींची लोकसंख्या आहे. या देशांपैकी बऱ्याच देशात हे आदिवासी किंवा आदिम जमाती ह्या अल्पसंख्यांक ठरल्या आहेत. ब्राझील, स्वीडन सारख्या देशात आदिवासींचे प्रमाण ०.१ टक्का, भारतात ८.२० टक्के (जनगणना इ.स.२००१), ग्रीनलंडमध्ये ९० टक्के, पेरूमध्ये ४० टक्के व बोलिव्हियात ६६ टक्के आहे. आदिवासींची सर्वात जास्त संख्या आशिया खंडात आढळते. आदिवासी जमातींची लोकसंख्या

---

[७] देवगांवकर एस.जी. (२००१) आदिवासी विकास प्रशासन', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, पृ.१

भारतात ८.५ कोटी आहे. सध्या जगातील इतर कोणत्याही देशांपेक्षा भारतात आदिवासींची संख्या जास्त आहे.[८]

आदिवासी समाजाच्या अभ्यासासाठी अनेक अभ्यासकांनी, प्रशासकांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठे योगदान दिले आहे. त्यात पाश्चिमात्य विचारवंत सेडविक रिसने, ए. व्ही. ठक्कर, शुबर्न, मॉर्टीन ग्रीससन, एल्वीन इत्यादी संशोधकांनी संशोधन करून आदिवासी जीवन व त्यांचे अंतरंग यांचा सखोल अभ्यास केला आहे. हंटन या विचारवंताने या जंगली टोळ्यांना आदिम अगर आदिवासी हे नाव दिले आहे. तर भारतीय सामाजिक विचारवंत डॉ. घुर्ये यांनी तथाकथीत मूळचे रहिवासी व मागासलेले हिंदू असे म्हटले आहे. भारतीय संविधानात या जंगली टोळ्यांना अनुसूचित जमाती (Scheduled Tribes) असे संबोधले आहे. तसेच आदिवासींना वनवासी व गिरीजन हा शब्द प्रयोग केला आहे. परंतु आदिवासी हे या देशातील मुळचे रहिवाशी आहेत म्हणून त्यांना वनवासी किंवा गिरीजन म्हणणे योग्य नाही ते या देशातील मूळ निवासी आहेत.[९] भारतीय संविधानात आदिवासींना अनुसूचित जमाती असे संबोधले आहे. भारतीय संविधानातील कलम ३४२ (१) नुसार राष्ट्रपतींना कोणत्याही राज्याच्या संघ क्षेत्राच्या बाबतीत आणि ते राज्य असेल तर त्यांच्या राज्यपालांना विचार घेतल्यानंतर जाहीर अधिसुचनेद्वारे त्या राज्यात किंवा जनजातीय समाज यांचे भाग किंवा गट निर्देशित करता येतील.[१०] भारतातील लोकांमध्ये आदिवासी जमातींबद्दल भयंकर स्वरूपाचे अज्ञान आहे. भारतात भौगोलिकदृष्ट्या, भाषिकदृष्ट्या व सांस्कृतिकदृष्ट्या आदिवासी जमाती अत्यंत मागासलेल्या व विखुरलेल्या आहेत. आदिवासी हे प्रादेशिक तसेच सांस्कृतिकदृष्ट्या अलिप्त आहेत. ही अलिप्तता त्यांनी स्वत:हून पाळली आहे किंवा ऐतिहासिक काळात त्यांच्यावर लादली गेली आहे. आज राष्ट्रीय एकता व सामाजिक–सांस्कृतिक अभिसरणाच्यादृष्टीने आदिवासींना सदैव अलिप्त ठेवणे योग्य नाही. आदिवासींच्या आर्थिक विकासासाठी त्यांचा बाह्य जगाशी संबंध येणे आवश्यक आणि

[८] http://academy.gktoday.in

[९] गारे गोविंद (२००२), महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे, द्वितीय आवृत्ती, पृ.१

[१०] भारताचे संविधान, प्रकाशन महाराष्ट्र राज्य भाषा संचालनाद्वारे अनुदानीत चौथी आवृत्ती, १९९२, पृ.१०७

अपरिहार्यही आहे. भाषा, संस्कृती, अर्थकारण, राजकारण यांच्या संदर्भात आदिवासींना भारतीय जन-जीवनापासून अलिप्त ठेवणे योग्य नाही. आदिवासींना भारतीय जन-जीवनाशी समरस होण्यास सुलभ व्यवस्था करून देणे राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने आवश्यक आहे.

इ.स.१८८१ च्या लोकसंख्या अहवालात आदिवासींचे धार्मिक व सांस्कृतिक जीवन हिंदूपेक्षा वेगळे आहे असा उल्लेख करण्यात आला आहे. जे. एच. हंटन यांनी आदिवासी जातींना परंपरागत व्यवसायावर आधारित वर्गीकृत केले. कृषक व पशुपालक व जातीच्या श्रेणीअंतर्गत त्यांनी वन्य जमाती या नावांनी वेगळ्या उपशिर्षकाखाली जमातींच्या नोंदी घेतल्या आहेत. रिस्ले सर हर्बर्ट यांनी इ.स. १९०१ च्या जनगणनामधील अहवालात प्रकृतीवादी किंवा जमाती धर्माला मानणारे लोक असा उल्लेख केला आहे. इ.स. १९२१ च्या जनगणना अहवालात पहाडी व वन्य जमाती नावाने त्यांची जनगणना केली. इ.स. १९३१ च्या जनगणना अहवालात जे. एच. हंटन यांनी आदिम वा आदिवासी जमाती असे म्हटलेले आहे. भारत सरकार अधिनियम १९३५ मध्ये त्यांना मागासलेल्या जमाती असे नाव दिले गेले. ब्रिटिश जनगणना अधिकाऱ्यांनी त्यांची जनगणना प्राणीजनक म्हणून केली. त्यांना प्राचीन किंवा अगदी मुळचे रहिवासी (Aboriginal) म्हणून संबोधले आहे. पुढे कालांतराने हिंदू समुदाय आणि आदिवासी यांचे सामाजिक व सांस्कृतिक आदान-प्रदान वाढले यातून त्याचे हिंदूकरण होऊ लागले. हिंदू व आदिवासी यांच्यातील पूर्वीचे असलेले सामाजिकीकरण कमी होऊन त्यांना हिंदू धर्माचे आचरण करणाऱ्या अन्य जमाती असा उल्लेख होऊ लागला. इ.स. १९४१ च्या जनगणना अहवालात त्यांना केवळ जमाती म्हटले गेले. पश्चिमात्य अभ्यासकांच्या मते जमात या शब्दाचा अर्थ सामान्यतः भौगोलिकदृष्टीने अलग किंवा अंशतः अलग एक वांशिक समूह आहे. ज्यांना एका निश्चित सिमा क्षेत्रात असलेले म्हणून ओळखता येते. तसेच त्यांच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परंपरा, प्रथा भिन्न आहेत.[११]

जगातील ७० देशांमध्ये विविध प्रकारचे आदिवासी राहतात. त्यापैकी प्रमुख आदिवासी जमाती आणि त्यांचे वास्तव्याचे प्रदेश याची माहिती खाली नमूद केली आहे.

[११] वर्मा रूपचंद (१९९७), भारतीय जनजाती या अतीत के झरोखे से, नई दिल्ली, प्रकाशन विभाग, सुचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, पृ.७-८

**अंटार्टिका आणि उत्तर अमेरिका**

१) अलास्का, कॅनडा, ग्रीनलंड, रशिया – एस्किमो

२) नॉर्वे, स्वीडन, फिनलंड, रशिया – सामी

**कॅनडा आणि उत्तर अमेरिका**

३) पॅसिफिक किनारा – हैडा, टिंगीट, बेल्ला, कूला.

४) मध्य कॅनडा – की, मेटी, ब्लॅकफूट, डेने.

५) पूर्व कॅनडा – रइ, क्री.

६) कॅनडा, यू. एस. ए. सीमा – मिकमॅक.

७) वायव्य यू. एस. ए. – मेझ, पर्सी.

८) नैऋत्य यू. एस. ए. – नावाजो, प्यूढलो, होपी, केरेस, डाईन.

९) मैदाने – क्रो, आरापाहो, पावनी, कोमाचे.

**मध्य अमेरिका**

१०) मेक्सिको – लॅकाँडॉन, युकॅटिक.

११) ग्वांटेमाला – माया, चोलू, चून.

१२) पनामा – कुना, ग्वायमी.

**दक्षिण अमेरिका**

१३) पेरूचे पठार – केचुमा, अेमारा.

१४) अर्जेटिना, चिली – मापूचे.

१५) ॲमेझान खोरे (ब्राझील) – टुकानो, क्रीम, माळुक्सी, अगोरी, पानरी, सनेमा, अक्रोटे, कथापी, सिकोया, आचे, टोबा, मस्कोय, अरावाक, लकानो इ.

**आफ्रिका**

१६) सहारा – तुरेग, फुलानी.

१७) दक्षिण सुदान – डिंका, नुएर, शिलूक.

१८) अंगोला, बोत्स्वाना, निमिबीया – सॅन (बुामेन).

१९) केनिया, टांझानिया – मसाई.

२०) एथिओपिया – ओरोमो, सोमाली, टिग्रायन, एरिट्रियन.

२१) सैरे, कॅमेरून कांगो – मबुटी, एफिलेसे.

**दक्षिण आशिया**

२२) भारत – भिल्ल, कोल, संथाळ, नागा, मिझो. इ.

२३) अफगाणिस्तान, पाकिस्तान – पठाण, पख्तून.

२४) श्रीलंका – वेद्दा.

२५) बांग्लादेश (चितगाँव टेकडा) – चकमा, मर्मा.

**आग्नेय आशिया**

२६) ब्रम्हदेश – केरेन, कचीन, चीन.

२७) थायलंड – केरेन, हमोंग, लिसू.

२८) मलेशिया – पेनन, कयांग, इबांन.

२९) फिलिपाईन्स – कलींगा, फुगाओ, हनूनू.

३०) इंडोनेशिया – कालीमंतन, दयाक, केडांग, अस्मत, दानी.

३१) पापुआ, न्युगिनी – दानी, सेबांग.

३२) चीन – तिबेटी, हिगूट.

३३) मंगोलिया – मंगोलियन.

३४) जपान – येनू.

३५) रशिया – चुकची, याकूत.

**महासागरी**

३६) ऑस्ट्रेलिया – ॲबॉर्जिनीज.

३७) न्युझीलंड – मावरी.

३८) पॅसिफिक बेटे – कनाक.[१२]

## १.३ भारतीय आदिवासी : ऐतिहासिक पार्श्वभूमी :–

आर्यांचे भारतात आगमन होण्यापूर्वी आदिवासी हे या देशाचे मूळ रहिवासी होते. त्या काळी आदिवासी टोळया–टोळ्यांनी राहत होते. प्राचीन वन्य टोळयांची धार्मिकता आर्यांपेक्षा भिन्न होती. त्यांच्या देवदेवतांच्या कल्पना, भुताखेतांच्या कल्पना, मृत्युनंतर मानवी जीवनाच्या कल्पना भिन्न होत्या. ते निसर्गाची पूजा करीत. निसर्गात आढळणाऱ्या व बुद्धीला न उमगणाऱ्या वस्तूला, वृक्षाला, पक्षाला ते देव मानीत. पूज्य मानलेल्या प्राण्यांची ते शिकार करीत नसत. त्यांची ते पूजा करीत. आनंदाच्या वेळी ते त्यांच्यासमोर नाचगाण्याचे कार्यक्रम करीत. त्याकाळी सर्वच आदिवासी टोळया निसर्ग आणि प्राणी पूजक होत्या. नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त

[१२] http://academy.gktoday.in

राहिलेले संबंधित प्रदेशातील मूळचे राहिवासी म्हणजे आदिवासी असे सामान्यपणे म्हटले जाते.[१३] सर्वसाधारणपणे जंगलात, दुर्गम दऱ्या-खोऱ्यांत व सुसंस्कृत समाजापासून तुटक असलेल्या प्रदेशांत ते तुरळक वस्ती करून राहतात. नागर संस्कृतीचा त्याचप्रमाणे वर्गश्रेणीबध्द समाजाचा संपर्क न झालेल्या वैशिष्टपूर्ण चालीरिती किंवा 'संस्कृती' आदिवासींमध्ये आढळतात. अनेक नागरी संस्कृती उदयास येऊन संपुष्टात आल्या. आदिवासींचा त्यांच्याशी संपर्क न आल्यामुळे आदिवासी जमाती जशा होत्या तशाच राहिल्या आहेत. त्यांच्यात हजारो वर्ष परिवर्तन झालेले नाही. भारतीय स्मृतीग्रंथांत आदिवासी जमातींचा उल्लेख सापडतो. स्मृतीकारांनी त्या अनुलोम-प्रतिलोम संस्कारातून निर्माण झाल्या आहेत असे म्हटले आहे. स्मृतीग्रंथांत उल्लेख केलेले, शबर, रक्श, निषाद, किरात यांसारखे पुष्कळसे गट आदिवासी होते, त्यामुळे त्यांना हीन दर्जा प्राप्त झाला. रामायणात किरात, निषाद, शबर इत्यादी आदिवासी जमातींचा उल्लेख आहे. निषाद हे जंगलात राहणारे लोक असा उल्लेख सापडतो. बेटांवर राहणारे, कच्चे मांस खाणारे असा उल्लेख आहे. महाभारतात पुलींद व किरात हे हिमालयात राहणारे आदिवासी असा उल्लेख आहे. महाभारतातील एकलव्य हा आदिवासी (भिल्ल) होता. हिंदूंच्या चार वेदांपैकी अथर्ववेद हा आर्य आणि आदिवासी यांच्या संपर्कातून उद्भवलेला वेद आहे असे म्हटले जाते. इतिहासात अनेक आदिवासी जमाती स्थानिक राजांच्या वतीने लढल्याची उदाहरणे आहेत. शिवाजी महाराजांना रामोशी व महादेव कोळी या जमातींनी युध्दात बरेच सहाय्य केले होते. आदिवासींची पिळवणूक करणाऱ्यांविरूध्द बरीच बंडे झाली.[१४] इ.स.१७७८ ते १९४७ च्या दरम्यान आसाम, बिहार, मध्यप्रदेश व आंध्रप्रदेशात सुमारे ७५ बंडे झाली. बहुतेक बंडे ही ब्रिटीशांविरूध्द होती. महाराष्ट्रातील भिल्लांनी ब्रिटीशांविरूध्द उठाव केला होता. इ.स.१९५६ ते ५८ च्या दरम्यान ठाणे जिल्ह्यातील 'वारली' जमातीच्या लोकांनी जमीनदारांच्या विरूद्ध बंड पुकारले होते.[१५]

आदिवासींची वस्ती प्रामुख्याने जंगलात, दऱ्या-खोऱ्यांत आणि पर्वतांनी व्यापलेल्या प्रदेशांत आढळते. त्यामुळे त्यांना गिरीजन असे म्हणतात. ते मुळचे याच भूमीवरचे असल्याने

[१३] गारे गोविंद (२००२), महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, पृ.२३

[१४] गारे गोविंद (२००२), महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, पृ.२३

[१५] गारे गोविंद (२००३), सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी, आदिम साहित्य, श्रीधरनगर, धनकवडी, पुणे, द्वितीय आवृत्ती (सुधारित), पृ.१२-१३

त्यांना भूमीजन किंवा भूमीज असेही म्हणतात. नेहमी अरण्यात राहणारे म्हणून अरण्यक असेही संबोधले जाते. भारतीय संविधानाने त्यांना आदिम जनजाती, अनुसूचित जमाती, वन्यजाती असे संबोधले आहे. परंतु आदिवासी हे नाव राष्ट्रीय परिभाषेत प्रचलित आहे.

- **आदिवासी समाजाच्या व्याख्या :-**

मानवशंशास्त्रज्ञांनी वैज्ञानिक पद्धतीने आदिवासी समाजाच्या व्याख्या करून आदिम समाजाविषयी असणारी मते किंवा ग्रह दूर केले आहेत. मानववंशास्त्राज्ञांनी पुढील व्याख्या सांगितलेल्या आहेत.

- **डॉ. गोविंद गारे :-**

''भौगोलिकदृष्ट्या इतरांपासून नेहमीच दूर म्हणजे गिरीकंदरात राहिल्यामुळे जंगलात राहणारा. निसर्गाच्या सानिध्यात वाढलेला म्हणजे आदिवासी.''[१६]

- **प्रा. डॉ. गुरुनाथ नाडगोंडे :-**

''समान नाव, एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह व्यवसाय इत्यादीबाबतीत समान विधिनिषेगांचा पालन करणारा व परस्पर उत्तर दायित्व निर्माण करण्याच्या दृष्टिने एक पद्धतशीर व्यवस्था स्विकारणारा अशा कुटुंबाचे किंवा कुटुंब समुहाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी होय.''[१७]

- **डब्ल्यू. जे. पेरी :-**

'समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एकाच समान भू-प्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समूहाला आदिम समाज म्हणतात.'[१८]

- **डॉ. रिव्हर्स :-**

'ज्या समूहातील सदस्य एक समान बोलीभाषा बोलतात, युध्द वगैरेसारख्या उद्दिष्टपूर्तीकरिता एक होऊन झटतात आशा सरळ व साध्या सामाजिक समूहाला, 'आदिवासी

---

[१६] गारे गोविंद (१९७५), आदिवासी समस्याचा विकास व विश्लेषण, आदिम प्रकाशन, पुणे, प्र.आ., पृ.२२९

[१७] नाडगोंडे गुरुनाथ (१९७९), भारतीय आदिवासी, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ.१५५

[१८] गारे गोविंद (२००२), महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, पृ.१३

समाज' असे म्हणतात.'[१९] इ.स. १९६२ साली शिलाँगमध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने आदिवासींची व्याख्या केली आहे ती पुढील प्रमाणे:

'एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एका विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्राशाखीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेल्या, अक्षर ओळख नसलेल्या व रक्त संबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रीतिरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनशी गटाला 'आदिवासी समाज' म्हणतात.'[२०]

- **गिलीन व गिलीन :-**

'एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणाऱ्या, समान बोलीभाषा बोलणाऱ्या व समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समूहाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात.'[२१] इंपिरिअल गॅझेटमध्ये आदिवासींची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे.

'समान बोलीभाषा बोलणाऱ्या, एकाच भूभागात राहणाऱ्या, सुरूवातीला अंतर्विवाही असण्याची शक्यता असलेल्या पण सर्वसाधारणपणे अंतर्विवाही नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या कुटुंबांच्या समुच्चयाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात.'[२२]

- **मदन व मजुमदार :-**

'समान भाषा व समान संस्कृती असणाऱ्या व आर्थिक दृष्टीने परस्पर संबंधित असणाऱ्या ग्रामीण समुदायाच्या समुच्चयाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात.'[२३]

- **बोगार्डस :-**

'सुरक्षिततेची जरूरी, रक्तसंबंधाचे बंध, समान धर्म यावर आदिवासी समूह आधारलेला होता.' डी. एन. मुजुमदार यांनी आदिवासींची सर्व लक्षणे विचारात घेऊन त्यांची विस्तृत व्याख्या

[१९] कित्ता, पृ.१३
[२०] कित्ता, पृ.१३-१४
[२१] कित्ता, पृ.१४
[२२] कित्ता, पृ.१४
[२३] लोंढे राज, आदिवास समाजाचे समाजशास्त्र, पिंपळपुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती, पृ.२३

केली आहे. 'समान नाव असणारा, एकाच भू–प्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा, विवाह, व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पध्दतशीर व्यवस्था स्विकारणाऱ्या कुटुंबांचे किंवा कुटुंब समूहांचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय.'[२४]

**१.४ पारधी समाजाची ओळख :–**

युरोपियन देशांमध्ये दाट जंगलाच्या अभावामुळे व कुरणांच्या उपलब्धतेमुळे तेथील मानवी समूह दीर्घकाळ पशुपालक अवस्थेमध्ये होते. परंतु भारतामध्ये मात्र पशुपालक, शिकारी व अन्नशोधक या तिन्ही प्रकारचे समूह मानवी संस्कृतीच्या सर्व टप्प्यांत दिसून येतात. भारतातील आदिम व भटक्या जमातीच्या उत्पत्तीविषयी फारसे संशोधन झालेले नाही. भारत हा नैसर्गिक विविधतेने नटलेला देश आहे. या देशातील शेतीला तीन वेगवेगळे ऋतू प्राप्त आहेत. संपत्तीच्या आशेने, अन्नाच्या आशेने या देशावर अनेक मानववंशांनी आक्रमणे केली व हे मानववंश येथेच स्थायिक होऊन येथील जनजीवनामध्ये मिसळून गेले. रिस्ले, मुजुमदार, इरावती कर्वे यांसारख्या मानववंशशास्त्रज्ञांनी याबाबत परस्परविरोधी अनुमाने काढलेली आहेत. कपोलदर्शकांक व नासिकादर्शकांक या वांशिक निश्चितीसाठी इतर देशांत यशस्वी ठरलेल्या कसोट्या या देशातील शास्त्रज्ञांना मात्र गोंधळात टाकतात. रिस्ले यांच्या मते देशस्थ ब्राह्मण, चित्पावन, आणि महार यांच्यात वांशिक साम्य दिसून येते. परंतु या तिन्ही जमातींचा सामाजिक दर्जा मात्र अतिशय भिन्न भिन्न दिसून येतो. भारतातील वर्णाश्रमपद्धती, अस्पृश्यता, अन्य जातिव्यवस्था यामुळेही भारतातील जातीजमातींच्या संशोधनामध्ये पाश्चात्य शास्त्रज्ञांच्या गृहीतकांचा आधार घेणे धोक्याचे ठरते. अर्वाचीन मानववंशशास्त्रज्ञांनीही बव्हंशी पाश्चात्य गृहीतकांचा आधार घेतल्याने भारतीय इतिहास व समाजशास्त्र यांच्यामधील सत्यशोधनात अनेक प्रश्नचिन्हे आजही कायम आहेत. भारतातील फार मोठ्या मानवसमूहांना येथील ब्राह्मणी संस्कृतीचे मानवी दर्जाच नाकारल्याने त्यांच्या इतिहासाबद्दल, संस्कृतीबद्दल, अन्यायाबद्दल, श्रमांबद्दल येथील लिखित वाङ्मयात अवाक्षरही काढलेले दिसत नाही. स्वातंत्र्यानंतरही ही परिस्थिती फारशी बदललेली नाही. त्यामुळे आजही संशोधकांना केनेडी, ॲन्थोवेन, रिस्ले,

[२४] नाडगोंडे गुरुनाथ (१९७९), भारतीय आदिवासी, पृ.१५१

थ्रस्टन, हायमेन डॉर्फ, रसेल यांसारख्या परकीय संशोधकांनी जमा केलेल्या तुटपुंज्या सामग्रीवर अवलंबून राहावे लागते. या देशातील आदिम व भटक्या जमाती ऐतद्देशीय व परकीय संस्कृतीच्या असंख्य आक्रमणांमुळे भीतीग्रस्त, एकलकोंड्या व अंतर्मुख बनलेल्या आहेत.

'भटका' हा शब्द ग्रीक भाषेतील (Nomo) या शब्दापासून आला असून त्या शब्दाचा अर्थ To Pasture (चारणे) असा होतो. यावरुन असे वाटते की, गवताळ प्रदेशात गुरे–ढोरे पाळणारे व प्राण्यांचे कळप घेऊन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सतत भटकंती करीत फिरणाऱ्या लोकांना किंवा त्यांच्या समूहांना भटक्या (Nomad) असे कालांतराने संबोधण्यात आले. भटके म्हणजे कोण? या संदर्भात नागनाथ कदम विवेचन करतात. ''नाव सांगायला स्वतःचे गाव नाही. राहायला घर नाही. जमिनीसारखे कायम स्वरूपाचे उत्पन्नाचे साधन नाही. अपेक्षित जगणे नशिबी आल्यामुळे पोट भरण्यासाठी कामाच्या निमित्ताने, सतत गावोगाव भटकत असलेला आणि भिक्षेवर जगणारा अथवा परंपरंने चालत आलेल्या कलेच्या आधाराने स्वतःची उपजीविका करणारा लोकसमूह, अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात वेगवेगळ्या जातीजमातींच्या नावाने जीवन जगताना आढळतो. अशा या लोकसमूहाला भटके असे म्हणतात.''[२५] भटक्या विमुक्त जमाती म्हणजे काय? हे स्पष्ट करताना दादासाहेब मोरे भटक्या जमाती व विमुक्त जमाती यांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात.

पारध्याचं जीवन एक भाकरीच्या शोधातच मसनवट्यात निघून गेलं. आयुष्यभर एक भाकर नावाची गोष्ट त्याला सतत छळत असते. आज देशात ९५ टक्के दलित, आदिवासी, भटक्या विमुक्त माणसाला एक वेळच्या भाकरीचा प्रश्न पडला आहे. भारत हा दरिद्री, आळशी, कामचोर विषमतावादाने जातीयवादाने भरलेला देश आहे. कधी काळी या देशात सोन्याचा धूर निघत होता असे म्हणतात. सोने की चिडीया असणाऱ्या देशात एवढी गरीबी बेकारी का वाढली या प्रश्नाचे सरळ सोपे उत्तर या देशाच्या राजकारणांकडे असते. देशाची लोकसंख्या भरमसाठ वाढल्यामुळे गरीबी वाढली आहे. पण दरवर्षी सरकारी धान्याच्या कोठारात लाखो करोडे क्विंटल धान्य सडवलं जातं. ते धान्य कोठारात सडवून ठेवण्यापेक्षा भारतातील दलित,

[२५] नागनाथ कदम (२०१३), 'महाराष्ट्रातील भटका समाज : संस्कृती व साहित्य', पुनर्मुद्रण, पुणे, पृ.८–९.

आदिवासी, भटक्या विमुक्त माणसाच्या वाटल्या मात्र येत नाही. दर पाच वर्षाला भुलथापा देऊन निवडून जाणारे लोकप्रतिनीधी विधान भवनात किंवा संसदेत जाताना रिकाम्या हाताने आणि रिकाम्या खिश्याने जातात पण पाच वर्षे आपल्या मतदार संघातील लोकांना थांगपत्ता लागू न देता रोडपतीचे करोडपती अरबपती बनतात. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आतापर्यंत देशातील राजकारण हे गटारीतल्या किड्यासारखे किळसवाणे बनले आहे. संसदेत किंवा विधानमंडळात निवडून जाणाऱ्या एकाही लोकप्रतिनिधीत थोडीशीसुद्धा माणुसकी नसते. माणसाची माणुसकी काय असते ते गरीबांच्या झोपडीत/पालात दिसते. गेल्या साठ वर्षात वाढलेली गरीबी, दारिद्र्य आणि बेकारी ही दर पाच वर्षांनी निवडून जाणाऱ्या लोकप्रतिनिधींची नाजायत औलाद आहे. एखादी वेश्या आपलं पाप झाकण्यासाठी पोटच्या गोळ्याला कचऱ्याच्या पेटीत किंवा गटारात फेकून देते. तसेच राजकीय नेते या देशातील गरीबांना दुर्लक्षित करतात.[२६]

इतिहास समाजाच्या मतांचे नुतनीकरण सतत करत असतो. तरी देखील अपेक्षित लोकशाही राजवट स्वप्नवत वाटत आहे. असंख्य जाती, जमाती, उप जमातींचे गट लोकशाही स्वातंत्र्याचा आनंद, सुखाचे वाटेकरी होऊ पाहत आहेत. परंतू प्रत्यक्षात आणि अप्रत्यक्षात स्वातंत्र्याचे सुख उपभोगण्याचे स्वप्न पूर्ण होताना दिसत नाही. अशाच असंख्य जाती/जमाती/उपजातीच्या गटापैकी, खुपच दुर्लक्षित पण त्यांच्यावर लागलेली दुश्णे प्रसिद्ध असलेल्या जमातींपैकी एक म्हणजे 'पारधी जमात' होय.

समाजामध्ये पारधी समाजाला व त्यांच्या जीवनमानाच्या शैलीमुळे सवर्ण समाजाकडून त्यांना अस्पृश्य मानले जाते. हिंदू धर्म व अस्पृश्यता स्पष्ट करतांना रंगून येथे जाहीर सभेत भाषण करताना महात्मा गांधी म्हणाले ''सांप्रत जगांतील वेगवेगळ्या धर्मामध्ये स्वतःचा जीव जगविण्यासाठी जी शर्यंत लागलेली आहे.'' In the Vale of life in which all the religions of the world are today engaged. I think eighter Hinduism got to perish of untochability has to routed out covepletely so that the so that the fandamental fact of advantages Hinduism may be realised in practical life. त्यांनी

---

[२६] संतोष पवार (२०१०), पारधी पुढे पोलीस मागे...!, भीमराज प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, पृ. ७०–७१

अस्पृश्यतेचा निषेध केला आहे. महात्माजीच्या सांगण्यावरुन आता स्वाभिमान व समतेची नाश करणारी व समाजाला काळिमा लागणारी कृत्ये करु नयेत. स्वाभिमान व समतेचा ज्यावेळी नाश होतो की ज्यामुळे समाजाला काळिमा लागतो अशी कोणतीही कृत्ये कोणीही करु नयेत.[२७]

अस्पृश्यांच्या स्थितीबाबत हिंदू समाजाने आपल्याच धर्मातला जो एक मोठा वर्ग अस्पृश्य मानलेला आहे त्या वर्गाचा प्रतिनिधी सध्यांची व्यवस्था चालू असेपर्यंत तरी मुंबईच्या वार्डात राहणाऱ्या लोकांची सर्वात दरिद्री स्थिती आहे. हिंदू समाजात बहिष्कृत वर्गाला समतेचे हक्क नाहीत, इतकेच नव्हे तर इतर धर्मातील लोकांपेक्षाही अस्पृश्यांना हिंदू समाज तुच्छ लेखित असतो. देवळाच्या आवारात मुसलमान जाऊ शकतात परंतु अस्पृश्यांना प्रवेश नसतो. मग देवदर्शनाची गोष्ट बाजूलाच राहिली. अस्पृश्यानी आणीबाणीच्या वेळी हिंदूसमाजाच्या बाजूने बहुमोल कामगिरी बजावली, त्याबद्दल हिंदू संघटनवाल्यांनीही त्याची स्तुती केली आहे, परंतु एरव्ही त्यांना हिंदूधर्मातून बाहेर ठेवले जाते.[२८]

दलित पद–दलित समाजविषयी नेहरु समितीच्या वृत्तांतात म्हटले होते की राज्यघटनेविषयी आम्ही ज्या सुचना केल्या आहेत. त्यात दलित वर्गांच्या विधीमंडळातील प्रतिनिधित्वाविषयी विशिष्ट अशी तरतूद केलेली नाही. हे कार्य स्वतंत्र मतदार संघ निर्माण करुन किंवा सदस्यांची नियुक्ती करुन साधता येण्यासारखे आहे. तथापि हे दोन्ही मार्ग अपायकारक नि सदोष असल्याने त्या पैकी एकही मार्ग स्वीकारावयास योग्य वाटला नाही असे नेहरु समितीचे मत पडले. तिच्या मते मूलभूत हक्कांचा जाहिरनामा हाच दलितांच्या सर्व दुःखावर रामबाण उपाय होता.[२९] सर्वात अल्पसंख्याक लोक असतील तर ते अस्पृश्य लोक होत. अज्ञानामुळे संरक्षण करण्यात असमर्थ असलेले लोक म्हणजे अस्पृश्य लोक होत. अस्पृश्यतेच्या कलंकामुळे राजकीय हक्कांना पारखा झालेला अस्पृश्य वर्गाशिवाय दुसरा वर्ग नाही.

ज्याच्या उन्नतीला हातभार लावण्याची समाजाने कधी काळजी घेतली नाही व ज्याच्या अवनतीला धर्माची सबब पुढे करुन हिंदू समाज कारणीभूत होतो. त्या अस्पृश्य समाजाला

[२७] हटकर भीमराव (२०१३) अनुसूचित जाती, मूळच्या बौद्ध : एक इतिहासिक सत्य, अन्वीक्षण, पृष्ठ क्र.८१

[२८] खैरमोडे चा. भ. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर– खंड ३ (१९६४), पृष्ठ क्र.१८५–१८७

[२९] कित्ता, पृ. २१४–२१५

मुसलमानांच्या सहस्त्र पटीने राजकीय सरंक्षणाची आवश्यकता आहे. केवळ बुडत्याला हात द्यावयाच्या या तत्वानुसार मुसलमानाच्या आधी अस्पृश्यांची तरतूद करणे आवश्यक होते. अस्पृश्यांना काही सवलती नकोत. त्याचा प्रश्न सामाजिक स्वरुपाचा आहे. शिक्षणाने सुटण्यासारखा आहे असा अभिप्राय नेहरु कमिटीने दिला.[३०]

अस्पृश्य की पूर्वास्पृश्य ही संकल्पना स्पष्ट करतांना कोकण प्रांतिक बहिष्कृत शिक्षण परिषदेमध्ये काढण्यात आलेल्या जाहिर पत्रकानुसार बहिष्कृत अगर अस्पृश्य शब्द न वापरता पूर्वास्पृश्य हा शब्द वापरला गेला. अस्पृश्य वर्गाला कायम गुलामगिरीत ठेवू इच्छिणाऱ्या अस्पृश्य हिंदूनी ही गोडबोली टूम काढली. अस्पृश्यवर्गाने या बाबतीत जाणले पाहिजे ते ही की, आपली अस्पृश्यता ही अद्याप भूतकालिन बाब झाली नाही. आपण अद्याप अस्पृश्यच आहोत व या अस्पृश्येविरुद्ध आपल्याला झगड्याचे आहे व ते स्पृश्यवर्गाशी झगडायचे आहे. तुम्ही हल्ली अस्पृश्य नाहीत असे सांगतील अगर तुम्हांला अस्पृश्य म्हणणे आमच्या जीवावर येते. म्हणून आम्ही तुम्हाला पूर्वास्पृश्य म्हणतो असाही बहाणा करतील.[३१] आदिवासी विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी भारतातील राज्यनिहाय आदिवासी जमातींची यादी घोषित केलेली आहे. राज्य निहाय पारधी जमाती व यादीतील अनुक्रमाक दर्शविणारा तपशिल खालील प्रमाणे–

**तक्ता–१.१ राष्ट्रीय पातळीवरील पारधी जमातींची यादी**

| क्र. | राज्य | यादीतील अनुक्रमाक | जमाती[३२] |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र | ३८ | पारधी, फासे पारधी, फासे पारधी, लंगोली पारधी, बहेलिया, चित्ता पारधी, शिकारी, टाकणकर, टाकीया |
| २. | छत्तीसगड | ३६ | पारधी, बहेलिया, बाहेलिया, चिता पारधी, लंगोली पारधी, फास पारधी, शिकारी, टाकणकर, टाकीया |
| ३. | गुजरात | २१ | पारधी, अडविचिंचर, फासे पारधी |
| ४. | कर्नाटक | ४१ | पारधी, अडविचिंचर, फासे पारधी, हरणशिकारी |
| ५. | मध्यप्रदेश | ४० | पारधी, बहेलिया, बाहेलिया, चिता पारधी, लंगोली पारधी, फास पारधी, शिकारी, टाकणकर, टाकीया |

[३०] खैरमोडे चा. भ. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर– खंड ६ (१९८५), पृ. ६०–६२

[३१] बहिष्कृत भारत. ता. ४ जानेवारी १९४२ परिशिष्ट, क्र.२

[३२] http://tribal.nic.in/content/list of Scheduled Tribes in India

पारंपारिक शिकारी (शिकार करणारा) समुदाय म्हणजे पारधी होय. पूर्वी हा गट भटका होता. भटक्या स्वरूपात कधी काळी फिरत असे. परंतू ते आता काही ठिकाणी स्थायिक झालेले दिसून येतात. जसे कि कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर अशा काही महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्यांमध्ये रूसेल (Russell) आणि हिरालाल (Hiralal) यांच्या मते 'पारधी' हा शब्द मराठी शब्द 'पारध' ह्या शब्दातून उत्पन्न झालेला आहे. त्याचा अर्थ 'शिकार' सदर समुदाय स्वतःस 'बुरी' (Buri) म्हणवून ओळखण्यास/बोलावण्यास प्राधान्य देतात. ते म्हणतात ते गुजरात राज्यातून स्थलांतरीत करून आलेले आहेत. तर महाराष्ट्रातील काही ठिकाणी ते स्थायिक झालेले दिसतात. ते समुदायात अंतर्गत 'गुजराती' भाषेत बोलतात, 'मराठी', 'हिंदी' भाषा त्यांना ज्ञात आहेत. पत्रव्यवहार करण्यासाठी ते देवनागरी व मराठी लिपीचा उपयोग करतात. त्यांच्या पेहरावावरून त्यांना सहज ओळखले जाऊ शकते. पुरुष प्रामुख्याने डोक्यावर 'पगडी' असलेले दिसतात, तर स्त्रिया ह्या 'घागरा' घालतात. त्यांना महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित जमातीमध्ये गणले जाते.[३३]

## १.५ भौगोलिक स्थानांतरण व स्थान : –

अहमदनगर जिल्हा अभ्यास क्षेत्राचे भौगोलिक स्थान महाराष्ट्राच्या उत्तर अक्षांक्ष १६.४० ते २२.०१ अंश यावर वसलेले आहे तर पूर्व रेखांश ७२.६ ते ८०.९ अंशावर वसलेले आहे. अहमदनगर जिल्ह्याचे उत्तर अक्षांक्ष १८.०२ ते १९.९ अंश आहे तर पूर्व रेखांश ७३.९ ते ७५.५ अंश इतके आहे. या जिल्ह्याचे क्षेत्रफळ १७ हजार चौ.कि.मी. आहे. जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर नाशिक इशान्येस औरंगाबाद पूर्वेस बीड व उस्मानाबाद हे जिल्हे असून दक्षिण सीमेवर सोलापूर, पश्चिम सिमेवर ठाणे व पुणे जिल्हे लागून आहेत. अहमदनगर जिल्हा पश्चिम महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने प्रथम क्रमांकाचा जिल्हा आहे.[३४]

- **पारधी जमातींचे स्थानांतर :–**

सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी भारतामध्ये आर्याच्या टोळ्यांनी आक्रमणे करण्यास सुरुवात

[३३] Peoples of India (Maharashtra) Vol.XXX, Antropoligical Survey of India, Mumbai, p.1650-54

[३४] जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१४ पृ.१

केली. हा प्रकार सर्वसाधारणपणे आठशे ते नऊशे वर्षे चालला असावा. आक्रमणाच्या लाटा सिंधुतीरावर येऊन थडकत होत्या आणि येथील अनार्यांशी संघर्ष करून प्रसंगी समेट करून आर्यांनी आपल्या वस्त्या गंगेपर्यंत वाढवीत नेल्या. आपल्या मनुष्यबळाच्या अपुरेपणामुळे त्यांनी जित अनार्यांच्या स्त्रिया व मुले पळविण्यास सुरुवात केली होती. त्यामुळेच ऋग्वेदात स्त्रिया मिळविण्यासाठीचे यज्ञ, मुले आणि नातू मिळविण्याचे यज्ञ, अशा यज्ञांची आणि युद्धांची वर्णने आहेत. याशिवाय सिंधू आणि गंगा खोऱ्यातील सुपीक प्रदेशामुळे येथे राहाणारे मूळ अनार्य लोक–ज्यांना दास, दस्यू, अही, पणी, नाग, राक्षस, असूर, कालकेय, किरात अशा अनेक नावांनी ओळखले जात होते ते मूलतः सुसंस्कृत, शांतताप्रिय, कालवे काढून शेती करणारे.[३५] पा. वा. काणे यांनी प्रतिपादन केलेल्या जातीच्या सहा लक्षणांना अनुसरुन प्राच्य विद्यापंडित कॉ. शरद् पाटील यांनी जात व वर्ग यांची तुलनात्मक लक्षणे मांडली आहेत.

| | **जात** | | **वर्ग** |
|---|---|---|---|
| १. | जात जन्मसिद्ध असते | १. | वर्ग जन्मसिद्ध नसतो |
| २. | व्यवसाय जन्मसिद्ध असतो | २. | व्यवसाय जन्मसिद्ध नसतो |
| ३. | रोटी–व्यवहार जातीतच होतात | ३. | रोटी–व्यवहार जातीत होत नाहीत |
| ४. | बेटी–व्यवहार जातीतच | ४. | बेटी–व्यवहार वर्गातच नाही |
| ५. | अलग व बहिष्कृत जातवार वस्त्या | ५. | अलग व वर्गवार वस्त्या नाहीत |
| ६. | जातीचे नियमन दंडन जात पंचायत मार्फत | ६. | वर्ग पंचायत नाही[३६] |

किमान चौदाशे–पंधराशे वर्षापासून जातिव्यवस्थेची ही वरील लक्षणे जख्खडपणे आजही अभेदय आहेत. थोडक्यात जातीच्या विविध व्याख्या, अर्थ व वैशिष्ट्ये यावरुन सर्वांना लागू पडणारे लक्षण म्हणजे ज्या विशिष्ट गटामध्ये प्रवेश हा जन्माने होतो, दुसऱ्या कोणत्याही कारणाने होत नाही व ज्या गटातील व्यक्तीना त्याच गटातील व्यक्तीबरोबर लग्न करता येते त्याला जाती म्हणावे. भारतीय आदिम व विमुक्त जमातींच्या मूळ उगमांचा शोध घेता त्यांचे तीन प्रमुख गटात विभागणी करता येईल.

---

[३५] लक्ष्मण माने (१९९७), विमुक्तायन, पृ.५

[३६] पाटील शरद (१९९६), जातिव्यवस्थापक सामंती सेवकत्व खंड–२ रा, पृ.११२)

(१) ज्या जमाती हजारो वर्षापासून मानवी संस्कृतीपासून अलग पडलेल्या असून अत्यंत दाट जंगलात राहतात. उदा. संथाल, भिल्ल, कोरकू, कोळाम, गोंड, इत्यादी.

(२) आपले वसतीस्थान उद्धवस्त झाल्याने नागर संस्कृतीच्या आसपास राहणाऱ्या परंतु भीक मागणे किंवा आदिम कौशल्याचा वापर करून उपजीविका करणाऱ्या जमाती उदा. कैकाडी, माकडवाले, गारूडी, गोपाळ, चित्रकथी, जोशी, पारधी, कंजारभाट इ.

(३) जातीव्यवस्थेच्या आधाराने पण गावाबाहेर राहणाऱ्या जमाती उदा. रामोशी, बेरड, वडार, घिसाडी, गोंधळी इ.[३७]

वरील विमुक्त जमातींमध्ये दोन भाग पडतात. एक म्हणजे उत्तरेकडून स्थलांतरित होऊन आलेल्या जमाती– उदा. पारधी, कंजारभाट, रजपूत भामटा, छप्परबंद, वाघरी, बंजारा इत्यादी आणि दुसऱ्या दक्षिणेकडून स्थलांतरित झालेल्या जमाती– उदा. वडार, कैकाडी, बेस्तर, टकारी, कटबू, मांगगारुडी, रामोशी, बेरड, उत्तरेकडील जमाती कातडीचा रंग, बोलीभाषा या दोन गोष्टींवरून ओळखू येतात. हिंदी, गुजराथी, मारवाडी, राजस्थानी यांच्यात मिश्रण असलेल्या बोली हे उत्तरेकडून आलेल्या जमातींचे वैशिष्ट्य आहे.[३८]

- **पारधी जमातींचे स्थान :–**

पारधी जमात प्रामुख्याने भारतामध्ये विस्कळीत स्वरूपात आढळून येते. ऐतिहासिक संदर्भानुसार पारध्याचे मूळ हे राजस्थान व गुजरात या भौगोलिक भागांमध्ये तसेच महाराष्ट्र, छत्तीसगड, गुजरात, राजस्थान, कर्नाटक व मध्यप्रदेशातील जबलपूर, सतना, भागलखंड आणि मालवा विभागामध्ये प्रमुख अधिवास आढळून येतो. गुजरात व आंध्रप्रदेशामध्ये देखील पारधी जमातीचा अधिवास आढळून येतो. तर संशोधन क्षेत्राचा विचार करता महाराष्ट्रामध्ये अमरावती, अकोला, जळगाव, बुलढाणा, उस्मानाबाद, सोलापूर, धुळे, यवतमाळ, पुणे, अहमदनगर व नाशिक इ. जिल्ह्यांमध्ये अधिवास आढळून येतो. १९०१ च्या जनगणनेनुसार पारधी जमात ही प्रामुख्याने खानदेश या भौगोलिक प्रदेशामध्ये प्रामुख्याने कच्छ राज्यातील नाशिक, सोलापूर व बिजापूर या जिल्ह्यात वास्तव्य करत होते. त्यांची बोलीभाषा ही गुजराती असल्याची नोंद

---

[३७] लक्ष्मण माने (१९९७), विमुक्तायन, पृ.३

[३८] लक्ष्मण माने (१९९७), विमुक्तायन, पृ.४

आढळून येते. सध्यस्थितीत महाराष्ट्रातील खानदेश, कोल्हापूर, उस्मानाबाद, अहमदनगर, बुलढाणा, सातारा, अमरावती, चंद्रपूर आणि मुंबई या जिल्ह्यांमध्ये आढळून येतात.

आदिवासी हे अधिविचंचर या नावाने देखील ओळखले जातात. अधिविचंचर या संस्कृत शब्दाचा अर्थ 'अटवी' म्हणजे जंगल व 'संचार' म्हणजे भटकणे होय.[३९]

### १.६ पारधी जमातींची लोकसंख्या :–

**भारतातील पारधी जमातीची राज्य निहाय, शहरी, ग्रामीण व स्त्री–पुरुष निहाय सांख्यिकी माहिती तक्ता–१.२**

| अ.क्र | राज्य | एकूण | ग्रामीण | शहरी | स्त्री | पुरुष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र | १५९८७५ | १२६२०६ | ६४४९६ | ८१६८२ | ७८१९९ |
| २. | छत्तीसगड | १०७५७ | ९६६४ | १०९३ | ५३८६ | ५३७१ |
| ३. | गुजरात | ७१८९ | ५४०० | १७८९ | ३७१५ | ३४७४ |
| ४. | कर्नाटक | ५४०३ | २७५२ | २६५१ | २७३३ | २६७० |
| ५. | मध्य प्रदेश | २११४ | २०२४ | ९० | १०७८ | १०३६ |

**महाराष्ट्रातील पारधी जमातीची जिल्हा निहाय, शहरी, ग्रामीण व स्त्री–पुरुष निहाय सांख्यिकी[४०] माहिती तक्ता–१.३**

| अ.क्र | जिल्हे | एकूण | ग्रामीण | शहरी | स्त्री | पुरुष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अमरावती | २०५६८ | १८०२९ | २५३९ | १०४५७ | १०१११ |
| २. | अकोला | १७५७६ | १५५०९ | १९६९ | ९०२० | ८५५८ |
| ३. | जळगाव | १६८४९ | ११४२९ | ५४२० | ८६४८ | ८२०१ |
| ४. | बुलढाणा | १६४२८ | १४८२० | १५०८ | ८४२० | ८००८ |
| ५. | उस्मानाबाद | ९९५९ | ८५१६ | १४४३ | ५१६७ | ४७९२ |
| ६. | सोलापूर | ९५१९ | ८१६७ | १३५२ | ४९६४ | ४५५५ |
| ७. | धुळे | ९२३६ | ७६५७ | १५७९ | ४७०९ | ४५२७ |
| ८. | यवतमाळ | ८१२९ | ७६७८ | ४५१ | ४१४७ | ३९८२ |
| ९. | पुणे | ७२३० | ४३८० | २८५० | ३६९१ | ३५३९ |
| १०. | अहमदनगर | ६२९३ | ५०८१ | १२१२ | १३४० | ३१५३ |
| ११. | नाशिक | ३५६६ | २१८९ | १३७७ | १८३८ | १७२८ |
| १२. | बीड | ३४४९ | ३२८७ | १६२ | १७४४ | १७०५ |

---

[३९] घारे आणि अफाळे, १९८२, पृ.५२ inflibnet.ac.in/jspui/bitstream/10603/183444/15/.pdf

[४०] भारतातील आदिवासी जमाती– सांख्यिकीय अहवाल, जिल्हा आणि राज्य निहाय व जिल्हा निहाय, २००१

| अ.क्र | जिल्हे | एकूण | ग्रामीण | शहरी | स्त्री | पुरुष |
|---|---|---|---|---|---|---|
| १३. | ठाणे | २९११ | ५६५ | २३४६ | १४७१ | १४४० |
| १४. | नांदेड | २७१३ | १९३८ | ७७५ | १३६७ | १३४६ |
| १५. | वाशिम | २६४४ | २५४५ | २९९ | १४४० | १४०४ |
| १६. | वर्धा | २६१९ | २४७५ | १४४ | १३३५ | १२८४ |
| १७. | परभणी | २२४१ | १५२० | ७१५ | ११२९ | १११२ |
| १८. | नागपुर | २१७९ | १७४३ | ४३६ | १०९४ | १०८५ |
| १९. | मुंबई उपनगर | २०८३ | २०८९ | ० | १०४१ | १०४२ |
| २०. | मुंबई शहर | १६३० | १६३० | ० | ८४१ | ७८९ |
| २१. | चंद्रपूर | १६०४ | १३५८ | २४८ | ८१६ | ७८८ |
| २२. | औरंगाबाद | १६०३ | १२८६ | ३१७ | ८०७ | ७९६ |
| २३. | सातारा | १४४२ | १३१३ | १२९ | ७०३ | ७३९ |
| २४. | हिंगोली | १४०५ | ९९३ | ४१२ | ७१४ | ६९१ |
| २५. | जालना | १२३९ | ६५१ | ५८८ | ६१७ | ६२२ |
| २६. | सांगली | ११२५ | ९७९ | १४६ | ५७६ | ५४९ |
| २७. | नंदुरबार | १०४३ | ७६४ | २७९ | ५३६ | ५०७ |
| २८. | कोल्हापूर | १०१७ | १४४ | ८७३ | ५१४ | ५०९ |
| २९. | लातूर | ५४३ | ५०५ | ३८ | २९६ | २४७ |
| ३०. | रायगड | ३६४ | १६६ | १९८ | २०५ | १५९ |
| ३१. | गडचिरोली | १५३ | १५३ | ० | ७५ | ७८ |
| ३२. | भंडारा | १२१ | ११३ | ८ | ५५ | ६६ |
| ३३. | रत्नागिरी | ८९ | ६८ | २१ | ५१ | ३८ |
| ३४. | सिंधुदुर्ग | ५६ | ९२ | २४ | ३१ | २५ |
| ३५. | गोंदिया | ४७ | ४७ | ० | २३ | २४ |
| | एकूण | १५९६७३ | १२९८७९ | २९८५८ | ७९८८२ | ७८१९९ |

लोकसंख्येच्यादृष्टीने पारधी समुदाय महाराष्ट्रात संपूर्ण जिल्ह्यामध्ये पसरलेला आहे. मुख्यत्त्वे खानदेशात धुळे व जळगाव, पुणे जिल्ह्यात इंदापूर, बारामती, दौंड ह्या तालुक्यामध्ये, सोलापूर जिल्ह्यात करमाळा तालुका, परभणी जिल्ह्यात सेलू, गानगापूर, मानवत या तालुक्यात, बीड जिल्ह्यात वाळूंज, पिंपाला, चिखली, आष्टी या ठिकाणी तर अहमदनगर जिल्ह्यात श्रीगोंदा व पारनेर तालुक्यामध्ये पारधी वस्ती आढळून येते.

- **जन्मदर :–**

२०११ च्या जनगणनेनुसार अहमदनगर जिल्ह्याची लोकसंख्या ४५,४३,०८३ (महाराष्ट्राच्या तुलनेत ४.०४ टक्के) इतकी होती. त्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण २१,९४,२८१ तर पुरुषांचे प्रमाण २३,४८,८०२ इतके होते. जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर प्रमाण ९३४ स्त्रिया दर हजारी पुरुषांमागे नोंदविण्यात आले आहे. जन्मदर संख्या एकूण जन्म ९८,५२६ त्यामध्ये मुलांची संख्या ५२,३१५ तर मुलींची संख्या ४६,२११ इतकी नोंदविण्यात आली आहे. अहमदनगर जिल्ह्याची लोकसंख्या आणि दशवार्षिक वृद्धी दर सर्वसाधारण १२.४४ टक्के असून अनुसूचित जातीचा १८.३७ टक्के तर अनुसूचित जमातींचा २४.७२ टक्के इतका नोंदविण्यात आला आहे.[४१]

- **मृत्युदर :–**

अहमदनगर जिल्ह्याची मृत्युदर संख्या एकूण मृत्यु २६,०७७ त्यामध्ये पुरुषांची संख्या १५,०३६ तर स्त्रियांची संख्या ११,०४१ इतकी नोंदविण्यात आली आहे.[४२]

- **लिंग गुणोत्तर :–**

राज्यातील बाल लिंग गुणात्तर प्रमाण २००१ नुसार ९१३ वरुन १९ अंकांनी कमी होऊन २०११ मध्ये ८९४ झाले आहे. बीड जिल्ह्यामध्ये इ.स.२०११ मध्ये हे प्रमाण सवार्त कमी (८०७) असून वर्ष २००१–२०११ या कालावधीमध्ये ८६ अंकांची मोठी घट नोंदविली गेली आहे. सन २००१ ते २०११ या कालावधीत कोल्हापूर (८६३), सातारा (८९५), सांगली (८६७) आणि चंद्रपूर (९५३) जिल्ह्यांमध्ये बाल लिंग गुणोत्तर प्रमाणामध्ये किंचित सुधारणा झाली आहे. २०११ जनगणनेनुसार अहमदनगर जिल्ह्याचे दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९४२ इतके आहे. श्रीरामपुर तालुक्यात ते सर्वाधिक म्हणजे ९९१ इतके आहे. तर सर्वात कमी

[४१] अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१४, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, पृ.२१०

[४२] कित्ता, पृ.१४९–१५०)

प्रमाण पाथर्डी तालुक्यामध्ये ९१० इतके आहे. याचाच अर्थ तालुक्यातून निवडक बहिर्गत स्थलांतर उपजिवीकेसाठी झालेले आहे व होत आहे.[४३]

- **साक्षरता :–**

राज्यातील साक्षरतेचे प्रमाण इ.स.२००१ मधील ७६.९ टक्क्यांपासून इ.स.२०११ मध्ये ८२.३ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. या कालावधीकरीता स्त्री साक्षरता दरामधील वाढ (८.९ टक्के अंक) ही पुरुष साक्षरता दरातील वाढीपेक्षा (२.४ टक्के अंक) अधिक आहे. स्त्री–पुरुष साक्षरता दरामधील तफावत इ.स.२००१ मधील १८.९ टक्के अंकांवरुन इ.स.२०११ मध्ये १२.५ टक्के अंकांपर्यंत कमी झाली आहे. राज्यातील ग्रामीण व नागरी भागातील साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ७७ टक्के व ८८.७ टक्के आहे. साक्षरता दरातील ग्रामीण–नागरी तफावतदेखील इ.स.२००१ मधील १५.१ टक्के अंकांवरुन इ.स.२०११ मध्ये ११.७ टक्के अंकांपर्यंत कमी झाली आहे. इ.स.२००१ च्या जनगणनेनुसार अहमदनगर जिल्ह्यातील एकूण साक्षर व्यक्तींची संख्या ३२१३३३० असून त्यांचे एकूण साक्षरतेचे प्रमाण ७९.०५ टक्के आहे. जिल्ह्यातील एकूण पुरुष लोकसंख्येपैकी १८२६४१२ पुरुष (८६.८२ टक्के) साक्षर आहेत. तर एकूण स्त्री लोकसंख्येपैकी १३८६९१८ (७०.८९ टक्के) स्त्रिया साक्षर आहेत. एकूण लोकसंख्येतून ० ते ६ वर्ष वयोगटाची लोकसंख्या वजा करून साक्षरता प्रमाण काढले आहे.[४४]

**तक्ता–१.४**
**अहमदनगर जिल्ह्यातील साक्षरता–**

| जनगणना वर्ष | साक्षरता प्रमाण | साक्षरता प्रमाण टक्केवारी | |
|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया |
| १९६१ | २६.४५ | ३९.३६ | १३.०३ |
| १९७१ | ३६.२३ | ४८.९७ | २२.९१ |
| १९८१ | ४३.१६ | ५६.५१ | २९.२४ |
| १९९१ | ६१.०३ | ७५.३० | ४५.९९ |
| २००१ | ६४.३१ | ७२.८३ | ५५.२५ |
| २०११ | ७९.०५ | ८६.८२ | ७०.८९ |

[४३] अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१४, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, पृ.१२
[४४] कित्ता, पृ.५

वरील तक्त्या क्र.१.४ वरून असे दिसून येते की, इ.स.१९६१ नंतर जिल्ह्याच्या साक्षरतेत सातत्याने लक्षणीय वाढ झालेली आहे. सर्वात जास्त साक्षरता नगर तालुक्यात ८६.३५ तर सर्वात कमी साक्षरता जामखेड तालुक्यात ७२.६२ इतकी आहे.

**१.७ शासनाने निर्माण केलेले संवर्ग (घटक–उपघटक)**

पारधी समाजातील काही जातींना अनुसूचित जातींमध्ये/जमातींमध्ये समाविष्ट केले आहे. भटक्या व विमुक्त जाती–जमातींच्या शासकीय यादीमध्ये क्रमांक ८ वर वगळले असे म्हणून पालपारधी अशी तत्सम जात दर्शवली आहे. त्याचप्रमाणे क्रमांक ९ वर वगळले असे म्हणून पारधी ही जमात दाखविली असून त्याच्या नामपर्यायामध्ये क्रमांक ९ (अ) वगळले (ब) गावपारधी (क) हरण शिकारी (ड) वगळले अशी नोंद आहे. पारधी जमात व त्याचे अनेक नामपर्याय यांची अनुसूचित जातीमध्ये नोंद केलेली आहे. परंतु क्रमांक ८ व ९ वर विमुक्त जातींमध्ये दर्शविलेल्या जाती व त्यांचे नामपर्याय हे सर्व मानववंशशास्त्र दृष्ट्या तसेच प्रत्यक्ष व्यवहारात सुद्धा एकच आहेत त्यामुळे विमुक्त जातींमधील ८ व ९ वरील जातींचा समावेश अनुसूचित जाती–जमातींमध्ये पारधी या जमातीच्या नामपर्यायामध्ये करावा, अशी शिफारस महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागाने गठित केलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमाती अभ्यास व संशोधन समितीमार्फत करण्यात आली आहे.[४५]

दिनांक २१ मार्च १९७९ च्या शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक सीबीसी–१०७७/५०८७६/का–५, व शुद्धीपत्रक दिनांक २४ मे १९८४ अन्वये महाराष्ट्रातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती तथा इतर मागासवर्गीय यांना जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती निर्धारित करण्यात आलेली आहे. ही कार्यपद्धती केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना/आदेशावर आधारित आहे. या पद्धतीनुसार दिनांक २९ ऑक्टोबर १९७७ च्या केंद्र शासनाच्या पत्र क्र.३६०१२/६/७६/इएसटी (एससीटी) अन्वये निर्धारित करण्यात आलेल्या नमुन्यात जातीची प्रमाणपत्रे फक्त महाराष्ट्रातील

[४५] विमुक्त जाती व भटक्या जमाती अभ्यास व संशोधन समिती, अहवाल खंड–१, १९९९, पृ.१२

मागासवर्गीय (अनुसूचित जती, विमुक्त जाती व भटक्या जमाती तथाा इतर मागासवर्गीय) व्यक्तींना देण्यासाठी कार्यपद्धती निर्माण करण्यात आली.

महाराष्ट्र शासन, शिक्षण व समाजकल्याण विभाग, यांचा शासन निर्णय क्रमांक सीबीसी–१४६७–म, दिनांक १३ ऑक्टोबर १९६७ नुसार राज्यामध्ये मागासवर्गीय जाती, जमातीची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीमध्ये अनुक्रमांक–१८९ वर पोवार किंवा पवार उल्लेख केलेला आहे. महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग यांचा शासन निर्णय क्रमाक सीबीसी–१४७०/१३३९/डेस्क–५ दिनांक २६ जुलै १९७६ नुसार राज्यातील मागासवर्गाच्या यादीतील अनुक्रमांक–१८९ पोवार किंवा पवार यांना मागासवर्गाच्या यादीत समाविष्ट न करता जमातींच्या यादीमध्ये समाविष्ट करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. मंडल आयोगाने विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या यादीमध्ये सुधारणा करण्यासाठी शिफारशी केलेल्या ह्या शिफारशी महाराष्ट्र शासनाने समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक सीबीसी–१०९३/७४९२/प्र.क्र./मावक–५ दिनांक ९ ऑगस्ट १९९५ नुसार स्विकारण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्याच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीय जाती–जमातींच्या यादीमध्ये नमूद नसलेल्या परंतू मंडल आयोगाच्या अहवालातील इतर मागासवर्गीय यादीमध्ये नमूद केलेल्या जातींचा इतर मागासवर्गीयांच्या यादीमध्ये समावेश करणे, महाराष्ट्र राज्याच्या इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या यादीमध्ये असलेल्या परंतु मंडल आयोगाच्या यादीमध्ये नसलेल्या जातींना राज्यामध्ये पूर्वीप्रमाणेच त्या–त्या संवर्गाचे लाभ देण्याचे धोरण राज्याने स्विकारले.

- **उप जमाती :–**

पारधी जमाती या भटक्या जमाती आहेत. या जमातीमध्ये अनेक उप–जमाती आहेत. त्यामध्ये गायपारधी, चित्तापारधी, हरणपारधी, पाल पारधी, टाकणकर इत्यादी पोटप्रकार

प्रामुख्याने दिसून येतात. तर धनगर पारधी, भिल्ल पारधी, राज पारधी, आदिवासी पारधी म्हणून देखील पोटप्रकार आहेत.[४६]

## १.८ पारधी समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

महाराष्ट्रामध्ये पारधी आणि फासे पारधी धुळे व जळगाव जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर स्थिरावलेला दिसतो. पारधी त्यांचे मुळ, वशंज हे राजपुत असल्याचे सांगतात. तेथे ते रखवालदार म्हणून नेमलेले किंवा राजपुत राजवटीमध्ये कार्यरत असत. त्यांची मातृभाषा ही गुजराती असल्याचे सांगतात व मराठी भाषा आंतर–गट संवादाकरीता उपयोगात आणतात. देवनागरी लिपीचा ते वापर करतात.

भारतीय समाजरचनेचा विचार करीत असताना वर्णव्यवस्थेबद्दलचा विचार करावा लागतो. कारण भारतीय समाज इतिहासात समाजाचे १) ब्राह्मण (उपाध्ये) २) क्षत्रिय (लढाऊ लोक) ३) वैश्य (व्यापारी) ४) शूद्र (सेवक) या वर्णांमध्ये विभाजन वेद काळात करण्यात आले होते. या चातुर्वर्ण्य समाजरचनेमुळे आणि कर्मविपाकाच्या सिद्धांतामुळे भारतीय समाजाचे विघटन झालेले आहे. विसंगत आणि जाती–धर्माचे कप्पेबंद जगणे भारतीयांच्या वाट्याला आले आहे. त्या वर्णजातिव्यवस्थेला या देशातील परंपरावादी आणि सनातनी मंडळी आजही पूर्णपणे नाकारत नाहीत. त्यामुळे भारतीय समाजात पराकोटीची सामाजिक विषमता आणि एकमेकांच्या जाती–धर्माविषयी, किंबहुना माणसांच्या विषयीची तुच्छता आजही मोठ्या प्रमाणात टिकून आहे. ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर या वर्णजातीव्यवस्थेला बिनशिडीच्या इमारतीची (मनोऱ्याची) उपमा देतात. ज्या इमारतीला तळमजल्यातून वरच्या किंवा वरच्या मजल्यातून तळमजल्यात जाण्या–येण्यासाठी शिडी नाही, पण एकावर एक मजले मात्र चार आहेत, अशी ही चातुर्वर्ण्य समाजव्यवस्था आहे. त्यात वर्णजातीच्या प्रतिष्ठेनुसार त्यांची जागा निश्चित करण्यात आलेली आहे. सर्वात वरच्या (पहिल्या) मजल्यात ब्राह्मण, दुसऱ्या मजल्यात क्षत्रिय, तिसऱ्यात वैश्य आणि सर्वात शेवटी शूद्र अशी ही उतरंडीची समाजरचना निर्माण केली. त्यामुळे वर्णजातीबरोबरच माणसांचीही विभागणी झाली आणि त्यांचे जगणेही विभागले गेले.

[४६] लक्ष्मण माने (१९९७), विमुक्तायन, पृ.७६

ब्राह्मणास या समाजरचनेत सर्वश्रेष्ठ असे स्थान दिले गेले. त्याखालोखाल इतरांचा दर्जा ठरविण्यात आला आणि श्रेष्ठ कनिष्ठ, उच्च–नीच अशी माणसाची जातवार विभागणी झाली. बाबासाहेब म्हणतात, 'एकाने दुसऱ्याशी कसे वागावे याची शिकवण या व्यवस्थेत नाही. मात्र एका वर्गाने (वर्णाने किंवा जातीने) दुसऱ्या वर्गाशी कसे वागावे याची बंधने या व्यवस्थेत आहेत.' या बंधनामुळेच या देशातील असंख्य जाती–पोटजातींचे समूह हजारो वर्षे वेगळेपणाची भावना जपत राहिले. उच्च–नीचतेच्या दुष्टचक्रात पिढ्यान्‌पिढ्या गुरफटले. आपापल्या जातींच्या कुंपणातच जगत राहिले आणि वर्ण, जाती किंवा धर्मापेक्षा देश मोठा असतो हेच विसरुन गेले.''[४७] देशातील ही समाजरचना केवळ वर्णजातीच्या उतरंडीपुरतीच मर्यादित राहिली नाही, तर ती वर्णजातीच्या तथाकथित प्रतिष्ठेवर माणसांची प्रतिष्ठा आणि दर्जा मानणारी ठरली. पुढे ती जन्मावर आधारित कायम झाली. ज्या जातीत त्याचा जन्म झाला ती जात त्याच्या मरणानंतरही त्याला चिकटून राहिली. जातींच्या खोट्या प्रतिष्ठेलाच त्याच्या कर्तृत्वापेक्षा जास्त महत्त्व येऊ लागले. तात्पर्य, वरच्या मानल्या गेलेल्या वर्णातील (जातीतील) मनुष्य कितीही कर्तृत्वहीन असला तरी तो या समाजव्यवस्थेत श्रेष्ठ मानला गेला आणि सर्वात शेवटच्या (शूद्रातिशूद्र) वर्णातील शूद्र व्यक्ती कितीही कर्तृत्ववान असली, तरी ती नीच किंवा कनिष्ठ, कारण त्याचा वर्ग–वर्ण कनिष्ठ असे मानले गेले. त्यामुळे या माणसांची ओळख देशावरुन (उदा. भारतीय) होण्याऐवजी ती त्याच्या वर्णजातीवरुनच होऊ लागली. ही व्यवस्था आजही पूर्णपणे बदललेली नाही.

### १.८.१ ऐतिहासिक व पौराणिक पार्श्वभूमी

भारतामध्ये जोपर्यंत जंगलाचे वैपुल्य होते तोपर्यंत नागरभागामध्ये एक संस्कृतिसंकर चालू होता तर दुसऱ्या बाजूला जंगलामध्ये आदिम टोळ्यांनी बदल नाकारणारी, थिजलेली संस्कृती गुण्यागोविंदाने नांदत होती. वाढत्या लोकसंख्येने जेव्हा नगरे अपुरी पडू लागली, शेतीसाठी व नगरे निर्माण करण्यासाठी नव्या भूभागाची गरज पडू लागली तेव्हा मोठ्या प्रमाणात जंगले जाळण्यास व तोडावयास सुरुवात झाली. खांडववन जाळून निर्माण केलेले इंद्रप्रस्थ हे

---

[४७] रामनाथ चव्हाण (२००२), 'भटक्या–विमुक्तांची जातपंचायत–खंड १', प्र.आ., पुणे, पृ.१४.

अशा प्रकारचे एक उदाहरण आहे. जंगलाचे नैसर्गिक छत्र हरवल्यानंतर अन्नाच्या अभावामुळे त्रस्त झालेल्या या टोळ्या, कधी जंगलाचा माल घेऊन, कधी प्राण्यांची कातडी घेऊन, शिकवलेले पक्षी व प्राणी घेऊन एकट्या दुकट्याने किंवा कारागिराच्या स्वरूपात नागरभागात प्रवेश करू लागल्या. राजासाठी शिकार करून पुरविणे, शिकवलेले बहिरी ससाणे व चित्ते पुरविणे व त्या बदल्यात अन्न मिळविणे या स्वरूपाचे संबंध या टोळ्या व नागरी समाज यांच्यामध्ये राहिले. त्यांच्या आदिम संस्कृतीमुळे त्यांच्यामध्ये 'साठा' करण्याची प्रवृत्ती नसते म्हणून त्यांना मिळणाऱ्या मोबदल्याचे स्वरूप एखाद्या दुसऱ्या वेळचे अन्न किंवा भीक असेच असे. जमिनीवर, झाडावर किंवा अन्नावर कोणाची व्यक्तिगत मालकी असू शकते ही कल्पनाच आदिम कायद्यामध्ये नसल्याने जेव्हा अन्न मिळणार नाही तेव्हा सापडलेली तेथील कंदमुळे, अन्नधान्य, लाकूडफाटा निसर्गाची देणगी म्हणून या जमाती घेऊन जातात. ब्रिटिश कायद्याप्रमाणे जंगले, नद्या, शेती, जमिनी यांच्या मालकी हक्कासंबंधात कायदे तयार झाले. या कायद्यांची या जमातींना माहिती असणे शक्य नव्हते. किंबहुना निसर्ग ही कोणा एकाची खाजगी मालकीची गोष्ट असू शकते ही कल्पनाही त्यांना माहिती नव्हती. त्यामुळे त्यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झाला व त्याचीच परिणती म्हणून हे निसर्गाचे पुत्र नागरसमाजात चोर व गुन्हेगार ठरले व त्यांच्या वाट्याला दीर्घकाळ तुरुंगवास आला. या सर्व जमाती गुन्हेगार जमाती म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. या जमातींचा सखोल अभ्यास हा या प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे व कैकाडी, बेस्तर, कंजारभाट, रामोशी, बेरड, पारधी, टकारी, कटबु, रजपूत भामटा, छप्परबंद व बंजारा या महाराष्ट्र राज्यामध्ये आढळणाऱ्या गुन्हेगार जमाती आहेत. 'पारधी' समाजाच्या गटास जात म्हणावे येथूनच सुरूवात होते. पारधी समुदाय 'फासे पारधी'/'बुरी' म्हणून संबोधतात, त्यांच्यामध्ये विविध गट आहेत. १. राज पारधी, २. गाय–पारधी, ३. पान–पारधी. परंतु त्यापूर्वी त्यांच्या समाजाची पार्श्वभूमीचे अवलोकन करणे संयुक्तीक होईल. पार्श्वभूमी पाहत असताना तीन वेगवेगळ्या पातळ्यांवर ती तपासणी योग्य होईल. १. ऐतिहासिक पार्श्वभूमी, २. स्वातंत्र्यापूर्वीची (इंग्रजी राजवटी पर्यंतची) पार्श्वभूमी ३. सध्याचे अस्तित्वातील पार्श्वभूमी–स्वातंत्र्यानंतरची पार्श्वभूमी.

शाक्यमूनी तथागत बुद्धांनी सांगितलेल्या वचनाप्रमाणे उत्तर भारतात राहणारा हा आदिवासी नागवंशीय शिकारी समाज चोरी करीत नव्हता. व्याभिचार करित नव्हता. खोटे बोलत नव्हता, दारू पित नव्हता, हिंसा करीत नव्हता, वस्ती करून एक जागेवरच राहायचा. प्राचीन काळी पारधी शिकारी समाज फार सुखी आणि समाधानी होता. पण भारतात ब्राम्हणांनी विषमता पेरताच तथागत बुद्ध आणि सम्राट अशोक यांच्या मानवतावादी विचाराविरूद्ध भारतीय सर्वसामान्य माणूस वागू लागला. जंबू द्विप देशातील जे चक्रवर्ती सम्राट होते. त्या सम्राटाना कपटकारस्थान करून ब्राम्हणांनी हरवले. त्यात निषादराज व्याध, हिरण्यधून, हिरण्यकश्यपू, एकलव्य अशा शिकारी समाजातल्या सम्राटांना ब्राम्हणांनी कपटकारस्थान करून नेस्तनाबुत केले. कट रचने, देशद्रोही कारवाया करणे, दुसऱ्यांची बायको, मुलगी, संपत्ती, सत्ता हिसकावून घेणे देवाधर्माच्या नांदाला लावून देशातील सर्वसामान्य बहुजन समाजाची आर्थिक लुट करणे हा ब्राम्हणांच्या रक्तातील सर्वात पहिला आणि सर्वात वाईट गुन्हा आहे.[४८]

### १.८.२ जाती–जमातींचा स्थान

भटक्या विमुक्त जमातींचा गावगाड्याशी केवळ जगण्यासाठी निमित्त मात्र संबंध आला, तो नैमित्तिक मात्र राहिला नाही. काही भटक्या जमातींना स्वतःचे असे पारंपरिक व्यवसाय होते. उदा. कैकाडी, बुरूड, घिसाडी, लोहार, वैदू, कुडमुडे जोशी, बेलदार, वडार, इ. जमातींचा व्यवसायाच्या निमित्ताने गावगाड्याशी संपर्क होत राहिला. या जमाती गावाच्या आधाराने जगत राहिल्या. भटक्या व विमुक्त जमातींची त्यांच्या व्यवसायाप्रमाणे पुढीलप्रमाणे वर्गवारी करता येईल.

१. ‘‘देवीच्या नावाने जगणारे–गोंधळी, वाघ्यामुरळी, रावळ, आराधी, जोगती–जोगतिणी, मरिआईवाले, भोपे, गोसावी, बैरागी.
२. पशुपालन जमाती– गोपाळ, दांगट, मैराळ, गोल्ला, उवरी गोसावी.
३. कलावंत जमाती– डोंबारी, कोल्हाटी, मदारी, गारुडी, नंदी बैलवाला, दरवेशी, रायरंद, बहुरुपी, कठपुतळीवाला, माकडवाला, मारवाडी भाटी.

---

[४८] संतोष पवार (२०१०), पारधी पुढे पोलीस मागे...!, भीमराज प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, पृ. ९०–९१

४. भविष्य सांगणाऱ्या– मेढंगी, तिरमाळी, कुडमुडे जोशी, ठोकेजोशी, वासुदेव, मनकवडे, पिंगळा जोशी, उमरुवाले, जोशी, सरोदे.
५. शिकार करणाऱ्या जमाती– पारधी, भिल्ल, फासेपारधी, चित्तरपारधी, हरणपारधी, वैदू.
६. व्यवसाय करणाऱ्या जमाती– छप्परबंद, शिकलगार, कैकाडी, वडारी, कुंचीकोरवा, घ्यारे कंजर, वाघरी, बेलदार, घिसाडी, काशीकापडी, ओतारी, गाडीलोहार, रमय्या, वैदू, राजगोंड (आदिवासी), स्मशानजोगी.
७. जातींच्या मागण्या जमाती–डक्कलवार (मातंगांचे मागते), रायरंद (महारांचे मागते).
८. शारीरिक कष्टाची कामे करणारे– वडार, लमाण, बेलदार, गाडीवडार, मातीवडार.
९. अन्यमार्गाने उपजीविका करणारे– कंजारभाट, पारधी, रजपूत भामटा.''[४१]

### १.८.३ लोकवस्ती

भटकेपणा किंवा फिरस्तेगिरी ही सुद्धा एक वृत्तीच आहे. वृत्ती म्हणजे उपजीविका किंवा अर्थार्जन करण्याचा मार्ग. भटकंती काही जणांसाठी पंचक्रोशीपुरती मर्यादित असते तर काहींना दूरचा पल्ला गाठावा लागतो. महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थिती व दळणवळणाच्या सोयी लक्षात घेता पावसाळ्यामध्ये भटकंती करण्याला मर्यादा येतात. त्यामुळे या काळामध्ये अनेक कुटुंबाची पाले वस्त्याकरून गावाबाहेर वास्तव्य करतात. घोडे, कुत्रे, गायी, बैल अशी जनावरे ही पारध्यांच्या जीवनपद्धतीतील अविभाज्य भाग आहे. उदरनिर्वाह व उपजिवेसाठी भटक्या जमाती गावोगाव भटंकती करत असल्यामुळे या एका जागेवर लोकवस्ती वास्तव्यास नसते. पाल, झोपड्या, तांडे या पद्धतीची घरे असतात. मोल मजूरी करणे, भीक्षा मागणे, गुरे राखणे, राखण करणे या उदरनिर्वाहाच्या साधनांमुळे त्यांना गावाबाहेर वास्तव्य करावे लागते. पारध्यांची लोकवस्ती गावगाड्यावर अवलंबून असली तरी या जमातींना त्यांचे स्वतःचे अस्तित्व आहे. 'गावगाडा' म्हणजे प्रत्येक गावातील ग्रामव्यवस्था किंवा गावात कायम वस्ती करून राहणाऱ्या अठरा पगड जातींच्या (बारा बलुतेदार जाती आणि अठरा आलुतेदार जाती) लोकांचा जातवार विभागला गेलेला समूह. गावातील या अठरा पगड जातींनी गावासाठी कोणकोणती काम करावयाची हे परंपरेने ठरलेले. त्यामुळे प्रत्येक जातीचा जात–व्यवसाय पिढ्यान्‌पिढ्या जन्मावर

[४१] रामनाथ चव्हाण (२००२), 'भटक्या–विमुक्तांची जातपंचायत–खंड १', प्र.आ., पुणे, पृ.१४.

ठरलेला. शिवाय त्या जातव्यवसायाच्या उत्पादनावर आधारित त्या जातीतील माणसांचा दर्जा ठरलेला असतो. त्यामुळे ज्या त्या जातींचा व्यवसाय त्या त्याच जातीने करावा हे पिढ्यान्‌पिढ्या प्रत्येकाच्याच अंगवळणी पडलेले. म्हणजेच जन्मावरून जात, जातीवरून व्यवसायाचे मूल्य आणि त्यावरून त्या जातीतील माणसांची प्रतिष्ठा गावगाड्यात निश्चित केली गेलेली आहे.

### १.८.४ सामाजिक उतरंडी व त्यांचे स्थान

**भटक्या जमाती–** ''उदरनिर्वाहाकरिता निवडलेल्या अगर वाट्यास आलेल्या व्यवसाया–निमित्त अगर उदरनिर्वाहाच्या साधनांच्या शोधार्थ भटकत राहणाऱ्या समाजगटांना 'भटक्या जमाती' असे म्हणता येईल.''[५०]

**विमुक्त जमाती–** ''परिस्थितीच्या दबावामुळे किंवा आर्थिक विपन्नावस्थेमुळे काही भटक्या जमाती गुन्हेगारीकडे वळल्या. त्यांना गुन्हेगार जमाती म्हणून ओळखले जाते. ब्रिटिशांनी १८७१ साली 'क्रिमिनल ट्राईब्ज ॲक्ट' केला. या कायद्यान्वये गुन्हेगार पूर्वजांचे वंशजही गुन्हेगार ठरवून जन्मतः गुन्हेगारीचा शिक्का मारण्यात आला. ब्रिटीश सरकारने १९२४ साली गुन्हेगार जमाती वसाहतीकरण कायदा करून, या गुन्हेगार जमातींवर कडक निर्बंध लादले. तारेच्या कुंपणात व पोलिसांच्या पहाऱ्यात त्यांना डांबून ठेवले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर वरील दोन्ही कायदे ३१ ऑगस्ट, १९५२ रोजी सरकारने रद्द केले. या जमातींना विशेष मुक्त म्हणून सोडून देण्यात आले. त्यामुळे या गुन्हेगार जमातींना 'विमुक्त' असे संबोधले जाऊ लागले.''[५१]

महाराष्ट्रात भटक्या आणि विमुक्त जमातींची एकूण संख्या बेचाळीस इतकी मानली गेली आहे. त्यापैकी १४ जमाती या 'विमुक्त' (ब्रिटिशांच्या काळात गुन्हेगार जमाती म्हणून जाहीर केलेल्या) व १८ जमाती या 'भटक्या' म्हणून ओळखल्या जातात. या बेचाळीस जमातींच्या पोटजातींची संख्या सुमारे दोनशेपेक्षा अधिक आहे. या सर्व जमाती स्वतःला स्वतंत्र आणि इतर जमातींपेक्षा वेगळ्या मानतात.

---

[५०] संपा. शरणकुमार लिंबाळे (२००७), 'साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह', प्र. आ., पुणे, पृ.३२२–३२३.

[५१] कित्ता, पृ.३२३.

**विमुक्त जमाती–** "१) बेरड २) बेस्तर ३) कैकाडी ४) कंजारभाट ६) कटाबु ७) बंजारा ८) वगळले ९) राजपारधी १०) राजपूत भामटा ११) रामोशी १२) वडार १३) वाघरी १४) छपरबंद"[५२]

**भटक्या जमाती–** "१) गोसावी २) बेलदार ३) भराडी ४) भुते ५) वगळले ६) चित्रकथी ७) गारूडी ८) घिसाडी ९) गोल्ला १०) गोंधळी ११) गोपाळ १२) हेळबे १३) जोशी १४) काशीकापडी १५) कोल्हाटी १६) मैराळ १७) मसणजोगी १८) नंदीवाले १९) पांगूळ २०) रावळ २१) सिक्कलगार २२) ठाकर २३) वैदू २४) वासुदेव २५) भोई २६) बहुरुपी २७) ठेलारी २८) ओतारी"[५३]

आजच्या भटक्या–विमुक्त जमाती या भारत देशाच्या मूळ जमाती आहेत. ते या देशाचे खरे भूमिपूत्र आहेत. येथील धर्म व समाज–संस्कृती त्यांच्या भटकंतीला कारणीभूत आहे. या देशातील जे प्रस्थापित समाज अस्मितेवर आपला अधिकार सांगतात ती अस्मिता दलित–भटके यांच्या घामातून व अश्रूतून निर्माण झाली आहे. म्हणूनच या देशाचा इतिहास लिहिताना दलित, भटके व शोषित यांना विसरुन चालणार नाही. इतिहास हे गतकालीन घटनांचे यथार्थ चित्रण होय. भूतकालीन क्रांत्या, उत्क्रांत्या यांचा चलचित्रपट पाहताना त्यात भटक्यांच्या क्रांत्या, उत्क्रांत्या, त्यांचे अंतरंग, कलाकौशल्य, वेशभूषा लोककला इत्यादी बाबींचे दर्शन भारतीय इतिहासातील कोणत्याही पृष्ठावर होत नाही. उलट गतकाळात भटक्यांच्या शुल्लक चुकांमुळे त्यांना समाजाबाहेर टाकून त्यांना इतिहासकारांनी गुन्हेगार म्हणून संबोधले देशाचा खरा इतिहास लिहिला नाही. या देशात भटके व दलितांनी देशाच्या मातीशी इमान राखून जो इतिहास घडविला त्याचे चित्रण खऱ्या अर्थाने प्रस्थापितांनी लिहिलेल्या इतिहासात सापडत नाही. या देशाचा खरा इतिहास भटके व दलित यांच्या घामातून जो इतिहास घडला तो खरा भारतीय इतिहास होय. या देशाचा गत इतिहास दलितांनी व शोषितांनी घडविला पण या शूरवीरांच्या गाथा आणि या देशासाठी विविध क्षेत्रात त्यांनी केलेले समर्पण यांचे यथार्थचित्रण केले नाही.

---

[५२] महाराष्ट्र शासन समाजकल्याण, सांस्कृतिक क्रिडा व पर्यटन विभाग परिपत्रक क्र.सी.बी.सी. १८६४ जी.पी. ५९२–१९९९ बी. सी. डब्लु. ५, मंत्रालय, मुंबई, १९ फेब्रुवारी १९८६

[५३] कित्ता

### १.८.५ दंतकथा

पारधी समाजाच्या दंतकथा कथा, कादंबरी आणि साहित्यामध्ये खूप कमी प्रमाणात आढळून येते. या दंतकथा समाजापुढे येण्यासाठी यापूर्वीच्या संशोधकांनी प्रयत्न केलेला नसल्याचे दिसून येते. नमूद दंतकथा संशोधनाच्या माध्यमातून मांडण्यासाठी व्यष्ठी अध्ययन या साधनाचा वापर करण्यात आलेला आहे. श्री आसाराम काळे, श्री लयलंग भोसले व श्रीमती ज्योती भोसले यांनी व्यक्त केलेली दंतकथा पुढीलप्रमाणे–

१) येड काही लोड शान खाई पेड, दुष्काळ का पडला होत.

दुष्काळामधून दादू सारी काळे, चव्हाण, पवार दादू हा चांदबीबीची ओळख माहिती होती. तो सगळ्यांना दहा दहा वीस वीस रूपये ते कसले चांदीचे रूपये असत्यात ते आणून द्यायचा नंतर पाऊस पाणी झाल्यावर तो उठीन गेला पैसे फिटत नाही म्हणून त्याला चांदबीबीच्या महालात तडीपार केला तो पुण्याला गेला. तो पुण्याच्या राजा कड जाऊन राहीला नंतर त्या राजान दादुला साथ दिली. ती लोक चव्हाण, पवार, काळे पैसे घेवून पळून गेले पण हीत त्या दादुलाच धरून तो पुण्याच्या राजासाठी शिकार करायचा. हरण ते धरूण आणायचा आणि तोतिथच रहायचा. त्याच्या स्वप्नात देवी यायची चल तुला मी तुझा मुलगा माघारी द्यायला लावते. गुरवळ घालून अस करत करत रोज देवी त्याच्या स्वप्नात यायची त्याला झोपच लागू देत नसत. मग तो पुन्हा गेला ती नदी दौड सिना नदी पहिला पुल नव्हता त्यावेळी त्याला यायची अडचण व्हायची येता येता त्याला हरणाच छोट पिल्लू दिसल पहिल्या तिथं हुड्या (नाव) असायच्या तिथ त्यांनी त्यांना पिल्लू दिल ते म्हणाले जा दादु आम्ही तुला कधी बी साथ देवू मग तो गेला मागून आणल आणि नगरच्या जवळ असलेल एक गाव गावाच नाव होत भिंगार येथे एक धोबी होती. धोबी म्हणजे कपडे धुवणारी ह्या बाईला चांदबीबी राणीची कपडे धुवायला लागायची ती तिथं काम करायची. ती सर्व बघायची दादु तिच्याकडे जावून रडला. मग ती म्हणाली दादु मी तुला साथ करीन. त्याचा मुलगा मोठा झाला तो तिथ चांदबिबीच्या महालात होता. हा दादू मुलाला सोडून गेला व्हता. मग त्या धोबीनीन त्या मुलाकडे जावून त्याच्याशी गोड बोलून काढून घेतल. पणं पोरगा म्हणाला मला बापच नाही तर काय? नंतर तिन त्या दादुची व पोराची भेट घडू आणली तिन पोराला विचारलं तु बापकड जाशील का? पोरगा जाईन म्हणतो,

त्याची मुलाखत जाईन. त्या पोराच नाव कावरा मग तो घरी गेला आणि म्हणाला तुम्ही मला इथ कोंडून ठेवलय मला हवा बघायची गावची नगरी बघायची अस म्हटला तो चांदबिबीला त्याच शिक्षण चालू व्हत. तलवार कशी चालवायची, भाले कसे चालवायचे हे शिक्षण चालू असताना त्याने ठराविक लोक होते शिपाई प्रधान ते चांदबिबीने पाठवले होते. त्याने आसाडाव केला त्यान बुटात पैसे भरले चांदोडीत सोन्याच्या मोहरा खिशात भरल्या आणि भिंगारहून नगरकडे निघाला. नगरमध्ये पूर्वी दोनच गल्या होत्या म्हण. तिथ हाटेल फिटेल होती. त्यानं सोबतच्या लोकांना तिथल्या हाटेलात जेवण घातलं. आणि ते जेवत आसतानाच त्यान एक घोड बघितल आणि टांग मारली. सुटला आणि ठरलेला जो ठेया होता तीथं येवून थांबला तीथ बाप लपून बसला होता पौळ होती तिथ एक घर होत. त्या पवळी खाली तो लपत लपत आला आणि म्हणाला त्या धोबीनीन मला सर्व सांगितलय. तुम्ही माझे वडील आहेत म्हणून वगैरे यला आपण पळून जाऊ म्हणाला मगं त्यांनी तिथून जी घोडा दाबला ते थेट इथ कोळगावला महादेवाच मंदिर आहे. अजुन पण आहे तिथं. त्यांनी वाळकी सोडली आणि तिथून घोड सोडून दिलं इकडं लोकांना वाटलं आपल्याला जेवायला बसवून हा गेला कुठ? चौकड शोधल त्यांनी लय धिंगाना केला चांदबिबीला सांगितलं आणि तिन चौकड पोलिस पहारा द्यायला सांगितला तीला माहिती व्हत नदीच्या पलीकड तो जाणार नाय पण तेवढ्यात देवानी कला केली. एक ढग आला आकाशात त्यान देवीची आराधना केली आणि त्या ढगातून पाऊस व वारा आला. त्यामुळे ते कोणालाच दिसले नाय त्यांनी लय शोधल पण ही दोघ त्या महादेवाच्या मंदिरात लपून बसले. निम्मीरात्र झाली त्यांनी विचार केला आपण आता कुठवर लपुन बसायच साईटानी निघून जाऊ शेवटी तो दुसऱ्या धुण्याच्या हद्दीकड जायला निघाला कारण दुसऱ्या हाद्दीकडं दुसरं सैन्य होत पुण्याची नदी क्रॉस केल्यावर पुण्याच्या राजानंरत त्याला साथ केलीच होती तो राजा म्हणाला तु घाबरू नकोस नगरच सैन्य लढायला आल तर येवू दे मी बघतो तु खुशाल रहा. तिथं एक धनगर जातीची मुलगी होती. नंतर त्या कावराने, त्या कावराला आमच्यात घेत नव्हते. म्हणायचे कि तु बाटला. म्हणून राजानी विचारलं तुमच्यात किती लोक आहेत सांग मग त्यांने सांगितले आमच्यात काळे, चव्हाण, भोसले, पवार आहेत. त्यांना सर्वांना राजाने माझ लग्न आहे अस सांग म्हणाला पूर्वी लग्न म्हटल की दोन दोन दिवस लोक जेवायला जावून बसायची मग खोटच राजाच लग्न

सांगितलं मग समदी तिथ गोळा झाली लगेच राजान गेट लावल पूर्वी आमचे पारधी एकमेकांच्या लग्नात जेवत नव्हते. आणि आता कावऱ्याचं लग्न धनगर मुली बरोबर होणार होत. आमचे पारधी अजूनही एकमेकांच्या लग्नात जेवत नाही. तिकडं राजानं मांडवफिंडव दिला यामुळ लग्न कुणाचय ते कळत नव्हत. त्यामुळे लग्न झाल झाल्यावर जेवण वाढायला कावऱ्याला सोडल लोकांनी विचार केला ह्यो कसा वाढीतो. कुणी रडायच, कुणी वकायची राजा म्हणाला तुम्ही नाव ठेवता म्हणून तुम्हाला शिक्षा दिली. तुम्ही त्याच्या बरोबर अस का वागले. तुम्हीस पैसे काढले, खाऊ लागले, आणि दादुला आणि कावऱ्याला वाळीत बी तुमीच टाकले तुम्ही अस का केल? समद्यांनी जेवण खाल्लं. अजून पर्यंत जवळची लोक जेवतात बाकी जेवत नाहीत कशी ही कथा आहे.

या कथेचा मतितार्थ सांगताना ते असे म्हणाले– आमच्यात लोकांनी न खाण्या माग बायांनी शिवताशिवत केली असल हे समजून दुसऱ्या गावातून आणून खात्यात पैसे आपण द्यायचे. लग्नाला केलेल्या स्वयंपाकाच जेवण त्यांना चालत नाही. वेगळच आणावं लागत. पुरुषाची किती बी लग्न होऊ द्या. पर बायांच लग्न एकच झाल पाहिजे असा जणू नियमच आहे. तीच्या नंतर लग्न नाय. म्होतुर केला जातो. म्होतुरात फक्त हात पिवळा करत्यात. पुरुषांच किती बी वेळा लग्न करतात. त्याला हाळद लावतात. सर्व असत पण बाई माणसाचं लग्न एकदाच. म्होतूर किती बी वेळा.

आमच्या पोरांना आमच हाल पाहुण टेन्शन येत. त्यांना सर्व कळत, रडत्यात ते आमच्या मुली पैसे नसल तर विकल्यापण जातात. लवकरच सुपारी फोडायची किंवा कधी काम नाही झाली पैशाची पैसे नाही फिटले तर पोरी पण ओढून घेवून जातात. उदा. तुमचे पैसे माझ्याकड असतील दोन चार वर्ष मी दिले नाय तर अशा वेळी मुलगी घेवून जायची. आणि आई–बाप पण मुलगी नेहली तर जाऊ द्या म्हणतात. आणि मुलगा एक तर घेवून जात नाय. पण गेलाच घेवून तर तो लगेच सोडवतात, अस पण व्हत. मुलाला वंश समजतात. गोष्टीतून तर तुम्ही बघीतल ना. मुलाला कस आणलं तिथं राणीन मुलगी घेतली आसती ना तर तिचा विचार नसता केला. पण वंशासाठी मुलगा पाहिजे व्हता. त्याच्या मुलापासून भोसल्याचा वंश चालू झाला आणि तेव्हा पासून पवार चव्हाण काळे होते. पण भोसले नव्हते. मग भोसले तयार झाले. त्यामुळे भोसले व

काळे उच्च जातीचे आहेत. आमच्यात शिंदे, पवार, चव्हाण, काळे पिंपळे येवढीच आडनाव आहेत.

२. गौरीबाई दत्तू चव्हाण, वय-४१ रा. निमगाव कोऱ्हाळे, राहता, जि. अहमदनगर

आमच्या एका कुळात एक कहानी आहे. एक आमचा पारधी महाशिवरात्री दिवशी शिकारीला गेला. त्या दिवशी महाशिवरात्री होती परंतु त्या दिवशी त्यास कोणतीही शिकार सापडली नाही. मग त्या पारध्याने बेलाचे झाड पाहूण तेथे बसला व देवाचा धावा केला. व देवास सांगितले की, माझी मुल उपाशी आहेत. मला शिकारही मिळाली नाही. मी काय करू तो त्या बेलाची पाने तोडायचा तोंडात घालायचा व खाली टाकायचा खाली टाकल्यावर खाली एक शंकराची पिंड होती त्यातून तो देव प्रकट झाला व म्हणाला पारध्या आज तुला जे काही मागायचे आहे ते माग आमच्या वेड्या पारध्याने देवाला सांगितले की तु मला एक शिकार दे. म्हणजे माझी लेकरे खातील आणि म्हणून आम्हाला शिकार हाच व्यवसाय आला.

३. मनू राजन काळे, वय-२४, राहता, जि. अहमदनगर

एक दरोडेखोर होता उतार वय झालेले पण त्यान आपल्या मुलाला त्याच्या व्यवसायाच प्रशिक्षण दिले. (दरोड्याच शिक्षण दिल). कारण चार माणसात आपल मुल गेल तर त्याला मारूण टाकतील म्हणून त्यान सक्षम कला म्हणून दरोड्याची कला दिली. काही कानमंत्र दिले. शिकवण्या दिल्या. चार मंत्र १. कबुल व्हायच नाही, २. मुद्देमाल सापडू द्यायच नाही. ३. कधी साधुसंत महाराजांच ऐकायच नाही. कालातरांने त्याचे वडील मेले.

नंतर त्या मुलाने राजाच्या सेनापतीशी दुश्मनी केली. तो पळत सुटला त्याच्यामागे राजाचे शिपाई होते. तो पळत पळत एका ठिकाणी आला तिथे प्रवचन चालू होते. लपायला जागा नसल्याने तो त्या प्रवचनात सामिल झाला पण बापाने सांगितले होते साधू संताचे ऐकायचे नाही. पण तेवढ्यात त्याला एक शब्द कानी गेला तो होता देवाची छबी नसते. त्याने लगेच कान बंद करून घेतले. कारण वडिलांचा आदेश होता साधू संताचे ऐकायचे नाही. यामध्ये शिपायांनी त्याला पकडले व त्याला घेवून गेले. वडीलांनी सांगितले होते की कबूल व्हायचे नाही. मुद्देमाल सापडू द्यायचा नाही. यामुळे तो तेथे त्या शिपायांना कबूल झाला नाही. राजाला प्रश्न पडला

आता काय करायचे? यावर त्या सेनापतीची मुलगी म्हणते की मी एक चाचणी घेते व त्यानंतर हा अपराधी आहे की नाही ते आपण नंतर ठरवून निर्णय घेवू. रात्री तीनं देवीच रूप घेतल आणि नाट्यरूपांतर करून ती त्याच्या समोर प्रकट झाली. आणि म्हणाली मी देवी आहे. आणि शेवटचा कबूली जबाब काय द्यायचा तो दे. छोटा दिवा दरम्यानच्या काळात चालू होता. त्यान त्या देवीची सावली पाहिली. त्यावेळी त्याला त्या साधू संताचे बोल आठवले की देवाची छबी नसते अशा वेळी त्याने विचार केला या देवीची तर सावली दिसते. मग ही देवी नाही. मग अजीबात बोलायच नाही. मी गरीब माणूस मी निरापराधी आहे. सर्वांना सांगतो तेच तुम्हाला सांगतो. मी निरापराधी आहे यावर त्या सेनापतीच्या मुलीने घोषित केले की हा निरापराधी माणूस आहे. हा सज्जन माणूस असल्याचे सांगितले. त्याला त्या दिवशी पश्चाताप झाला की एका शब्दामुळे (साधु-संताच्या) जीव वाचला नाहीतर मी मेलो असतो.

४. उषा संजय काळे, वय-२८, खडकत, जामखेड, जि. अहमदनगर

आमचे आजोबा सांगायचे की, महाशिवरात्री आपण करायच कारण ज्या दिवशी आमचा पारधी माणूस त्याची बायको गरोदर असताना त्यांनी हरणाचे मांस खाऊ घातले. त्याने महाशिवरात्री दिवशी शिकार करण्यास गेला. आणि फासा लावला व एका बेलाच्या झाडावर जाऊन बसला शिकार ताब्यात येईपर्यंत तो त्या बेलाची पाने तोडायचा की खाली टाकायचा त्यामध्ये खाली शंकराची पिंड होती त्यावर ती पाने पडायची आणि अपोआप शंकराची सेवा व्हायची त्यामुळे शंकर प्रत्यक्ष प्रकट झाला आणि त्याला म्हणाला तुला काय मागायचे असेल ते माग मग हा शिकारी त्याला काही समजेना की काय मागायचे तो म्हणाला मी इथे हरणाची शिकार करतोय कारण त्याचे मांस माझ्या बायकोला खायचे आहे तर तेच मांस तु मला दे म्हणून त्या दिवशी भेट झाली म्हणून महाशिवरात्री महत्त्वाची आहे.

प्राथमिक तथ्य संकलनामध्ये पारधी समाजाचे संघटना प्रमुख श्री अरुण जाधव, (लोकाधिकार आंदोलन सर्व भटक्या विमुक्तांसाठी) यांची मुलाखत घेण्यात आली. या मुलाखतीमध्ये त्यांनी पारधी समाजाच्या रुढी आणि दंतकथांचा उहापोह केला आहे.

पारधी समाजात अनेक दंतकथा आहेत त्यापैकी काही काल्पनिक आहे त्याच्या रचना निर्माण केल्या गेल्या. तर काही वास्तव आहेत. पारधी समाजाबद्दल अनेक लोक अनेक प्रकारच्या दंतकथा सांगीतल्या जातात. जेव्हा एखाद्याला चार हात दहा पाय यासारख्या कथा सांगितल्या की समजायच की दंतकथा आहे. पण अशा काही कथा आहेत की ज्यामध्ये एक माणूस होता तो अत्यंत बलाढ्य होता. त्याला दोन–बायका होत्या. तो दरोडे टाकयचा, चोऱ्या करायचा, श्रीमंताना लुटायचा आणि गोर गरिबांना वाटायचा अशा प्रकारच्या कथा जो कुणी आया बहीणीवर अन्याय केला तर आवाज उठवायचा मग भांडण मिटवायचा जस पूर्वीच्या काळी राजेदरबार भरवून जनतेचा न्याय निवाडा करायचे तशीच समाजात काही मजबूत माणसे होती. त्यांच्या नित्तीमतेची भिती व दहशत लोकांवर होती. ते नैतिकतेने काम करत होती त्यांच्याकडे देखील त्याकाळी अशा प्रकारचा न्याय निवाड्याचा दरबार भरायचा. दहशत दोन प्रकारच्या होत्या एक गुन्हेगारीची व दुसरी नैतिकतेची यांकडे न्याय निवाडा करायचे भटक्या विमुक्तामध्ये हा समाज स्त्री प्रधान समाज आहे. या समाजामध्ये स्त्रिया नेतृत्व करायच्या भटक्या विमुक्तांमध्ये बऱ्याच जाती आहेत. आता कोल्हाटी समाज जो आहे त्यात महिला नेतृत्व करतात. परंतु महिला जरी कमवत असेल तरी ती पुरुष व्यवस्थेची बळी आहे या चार्तुवर्ण व्यवस्थेने स्त्रियांना अत्यंत हिन लेखले आहे. मग ती कुठल्याही समाजातील असो मग ती ब्राम्हण असो किंवा कुठल्याही समाजाची असो तीचे स्थान हे शेवटचे स्थान आहे. पुराण काळात सुद्धा महिलांच्या बाबतीत अगदी रामायन महाभारतापासून महिलांना शेवटचे स्थान आहे. अथवा भारताचा इतिहास महिला भोवती इतिहास फिरतो. तसा पारधी समाजामध्ये कुटूंब प्रमुख महिला आहे. पण त्यांना बंधने आहेत. पण महिला बाहेरील सर्व कामे करते आदिवासी समाजामध्ये देखील बाह्य कामे विक्री महिला करते समजा पुरुष लाकुड आणीन पण महिला विकेन त्याने मच्छी पकडली तर महिला विकेल पारधी समाजात पुरुषांनी शिकार केली तर महिला ती शिकार विकायला जात असत. कोल्हाटी समाजात ७५% महिला नाचतात नाचती महिलापण तो कुटुंब प्रमुख आहे. तशीच ती पारधी समाजातही प्रमुख आहे. समजा पारध्याने पारवे तित्तर, तशा प्रकारचे पक्षी धरले तर महिलाच विक्री करते. काही निर्णय घ्यायचा झाल्यास महिलाच निर्णय घेते. पण तरीही या समाजात महिलेला दुय्यम स्थान आहे. फासे पारध्यांमध्ये जे

प्रकार आहेत यामध्ये फासे पारधी, राज पारधी, गाव पारधी, धनगर पारधी हे सर्व सुरूवातीच्या काळात त्यांच्यात रोटी बेटी व्यवहार होत असत. त्यातील धनगर पारधी हाल्याचे मटण खातो. त्याचा देवदेव हल्याचा बाकीच्यांचा बोकडाचा कुठल्या बोकडाचा? तर खश्शी बोकड तो पक्षी कापत नाही कोंबडा कापत नाही तर तो फक्त देवाला खश्शी बोकड कापतो. त्याच्यानंतर रेड्याचा बळी या पद्धतीने त्यांच्या समाज्यात काम चालते प्रत्येकाचा आहार जरी वेगळा असला कधी एकच असला, राहणीमान एकच असल, बोलीभाषा एकच असली तरी यांचा रीतिरिवाज वेगळा आहे. यांच्यात जातपंचायत भयानक आहे यांच्यात महिलांना स्थान नाही. ही क्रुर जातपंचायत आहे जस की जिभेने विष्ठा उचलणे महाभारत जसे झुगारीवर लावणे, तस तिचा विटाळ पाळणे व बाबी करायच्या हा सगळा ढोंगीपणा आहे. जामखेड भागात इतर पारधी समाजासारखे रितीरिवाज नाहीत याचे कारण म्हणजे येथे दोन प्रकारचे समाज आहे. ही लोक धनगर पारधी आहेत हे लोक स्त्रियांना सामावून घेतात पण तिला घरातील दर्जा दुय्यमच आहे. उस्मानाबाद बीड याठिकाणी पण असच वागवल जात. इथला समाज स्त्रियांचे कपडे वेगळे ठेवत नाही. त्यांचा आहार एक आहे. ते एकमेकांच्या हातच खातात. पण बाकी ठिकाणी नाही. ही जात बाईला नाकरते पण एकत्र रहाते. फक्त धनगर पारधीच हे पाळत नाही. त्यांच्यात दोन प्रकारचा देव देव करता बोकडाच व हल्याचा देव देव केला जातो. इथले पुरुष व स्त्रिया दोन्ही व्यसनाधीन आहेत. दोघंही तंबाखू खातात, दारु पितात. व्यसनाधीन आहे. हे आदिवासी संस्कृती आहे. धनगर पारध्यांमध्ये इतर समाजापेक्षा व्यसन जास्त प्रमाणात आहे.

बालविवाह, व्यसन, जातपंचायत सर्वांचे प्रमाण भरपूर आहे. भेदभाव आहे. द्वारकाची कहानी तुम्ही पहा ते आता संघर्ष केल्याने आता जातपंचायतीचे महत्व कमी होवू लागला आहे. त्यांच्या समाजात व्याजाने मुली देणे घेणे व मुली विकणे हे व्यवहार उघड उघड केले जातात. मुलीचं प्रमाण कमी आहे. तिला खूष करण्यासाठी तो नवरा तिच्या हातात पैसे देतो. पारधी समाजात दोनच व्यवसाय करतात शेती राखणी करणे, वाटयाणी करणे व दुसरी व्यवसाय चोरी करणे काही महिलांना हा व्यवसाय आवडतो. राखणी, चोरी, दारु हे त्यांचे व्यवसाय पाण्यात बुडी घेणे अग्नी परीक्षा देणे याच्यात अग्नी परीक्षा दिली जाते. जोडण्यांची शिक्षा, दंड वसूल करणे. कुऱ्हाड घेणे पिंपळच्या पाणावर कुऱ्हाड घेणे. अंधश्रद्धा खूप आहेत देव धर्म अतिशय

कडक आहेत विशेषतः त्यांच्यात मटणाचा देवदेव जास्त प्रमाणात आहे. ते हिंदूचा एकही देव देव करीत नाहीत. हिंदूचा सण ही करत नाहीत आता अलीकडे हे आक्रमण झालं आहे. हे आम्ही जेव्हा भटकंती करायचो तेव्हा आमच्या पालांवर कधीच गुढी दिसली नाही हे सर्व अत्ताच आहे. खायचीच पंचायत होती मांस खाऊन जगायचो तर सण केव्हा करणार?

एक तर हा समाज अत्यंत दारिद्र्यात होता तो गावकुसाबाहेर होता. त्यामुळे आम्ही नैवेद्य कुठला करणार? मग आमचे सर्व देव मांसाहरी आमच्यात भटक्यांच्यात पित्र नाहीत. पण तसा कार्यक्रम तो मांसाहारानेच करतो. देव देव वडिलांचा आणि मृत माणसांचा केला जातो.

### १.८.६ इतिहास नोंदी, शिलालेख, हस्तकला, चलन :-

पारधी समाजाचा अभ्यास करत असतांना उपलब्ध संदर्भ साहित्याचा आढावा घेतला असता, तसेच प्राथमिक तथ्य संकलनाच्या विश्लेषणात देखील इतिहास नोंदी, शिलालेख, हस्तकला व चलन या संदर्भात माहितीचा अभाव दिसून आला. पारधी समाज हा मूळचा कोठे वास्तव्य करत होता याची इतिहासात नोंद नाही. पारधी समाजाचे शिलालेख, हस्तकला व त्यांचे चलन या संदर्भात देखील इतिहासात नोंद आढळून येत नाही. किंबहुना असे म्हणता येईल की, इतिहासाने त्यांची नोंदच घेतली नाही अथवा इतिहासाकारानी त्यांच्या नोंदी न ठेवून इतिहासकालीन पार्श्वभूमीबाबत अन्याय केला आहे. यापूर्वी पारधी समाजावर संशोधकांनी व अभ्यासकांनी विस्तृत अभ्यास केलेला आढळून येत नाही.

### १.८.७ पौराणिक कथा

पारधी समाजाच्या पौराणिक कथा साहित्यामध्ये खूप कमी प्रमाणात आढळून येतात. या पौराणिक कथा समाजापुढे येण्यासाठी यापूर्वीच्या संशोधकांनी प्रयत्न केलेला नसल्याचे दिसून येते. नमूद पौराणिक कथा संशोधनाच्या माध्यमातून मांडण्यासाठी व्यष्ठी अध्ययन या साधनाचा वापर करण्यात आलेला आहे. श्रीमती ज्योती भोसले यांनी व्यक्त केलेली दंतकथा पुढीलप्रमाणे-

आमच्यातही देवदेव करत असताना बायांना चांगले स्थान होते. देव देव करण्यात सहभागी करून घेतलं जायचं. पण आमच्या समद्या बायांत एक अशी बाई होती की ते समदे झोपले की, ती देव देव करतांना चांगल चुंगल पुऱ्या बिऱ्या करायची आणि सगळी झोपली की समद खायची. देवाचं खायची देवाला नैवेद दाखवायच्या आधी तीच खायची आणि देवाला म्हणायची की जर तु माझी खोड सांगितली की तुझ्या नावाची चप्पल करीन म्हंजी ती चप्पल उलटी करीत आणि नंतर ती गोंधळ करायची आणि म्हणायची की मला प्रसाद मिळाला नाय अस नाय तस नाय. मग त्या बाईचा नवरा कायम देव देव करून थकला एक दिवस तिचा नवरा हि काय भानगड आहे म्हणून शोध घेण्यासाठी रात्रभर जागायच अस ठरवलं. कारण तो सतत देव देव करून कंटाळला होता. त्याला वाटलं आज छडाच लावायचा म्हणून त्या दिवशी त्याने आपल बोट कापून घेतलं म्हंजी त्या बोटाची आग–आग झाल्यावर झोप येवू नये म्हणून आणि रातभर जागा राहिला. अस का व्हतय हे त्याला बघायच होत. त्यानं आंगावर घेतल्याच नाटक केल आणि लक्ष ठेवल तेवढ्यात ती बाई नेहमी प्रमाणे उठली आणि देवाच्या नैवेद्या आधी खाऊन घेण्याचा कार्यक्रम सुरु केला. तेवढ्यातच तो उठला आणि त्यान तिच्या झिंझ्या धरल्या त्यामुळे देवीचा कोप झाला त्यामुळे देवी म्हणाली की या बायांना तुटाक करा व माझा प्रसाद गड्यांनीच करा तेव्हा पासून या बायकांना देव–देव करताना हात लावू देत नाही. ती पारध्याची अंबाबाई होती. आणि त्यानंतर बायांची छी थु झाली. नंतर त्यांना शिवायच नाय, घरात लुगडी ठेवायची नाय, देव देवात याच नाय असं ठरवलं गेल. त्याच्या आधी सर्व बायकांना चालायच. तेव्हा पासून बायका तुटक झाल्या. त्याचं मण ताब्यात नाय.

### १.८.८ सांकेतिक भाषा व बोलीभाषा :–

पारधी समाज घरातमध्ये पारधी भाषा बोलतो. इतर समाजाशी सुसंवाद साधताना मराठी (मऱ्हाटी) आणि हिंदी भाषेचा प्रभाव त्यांच्यावर आहे. भौगोलिक स्थानानुसार या समुदायात अंतर्गत संवादासाठी 'गुजराती' भाषाचा उपयोग करतात असे आढळून आले. तर 'मराठी', 'हिंदी' भाषा त्यांना ज्ञात आहेत. पत्रव्यवहार व संपर्क करण्यासाठी ते देवनागरी व मराठी लिपीचा उपयोग करतात. या समाजात सांकेतिक भाषेचा उपयोग करत असल्याचे आढळून आले नाही.

पारधी जमातीची बोलीभाषा ही गुजराती सारखी आहे. महाराष्ट्रातील कंजारभाट, घिसाडी यांच्या भाषेची जुळणारी अशीच पारध्यांची बोलीभाषा आहे. ही भाषा सहसा दुसऱ्या समाजामधील लोकांना लगेच समजू शकत नाही. गुजराती आणि राजस्थानी बोलीमधील अनेक शब्द पारध्यांच्या भाषेत सापडतात व पारधी बरीच वर्षे महाराष्ट्रात असल्यामुळे त्यांच्या भाषेवर मराठी भाषेचाही प्रभाव आहे.

पारधी समाजात बोलीभाषेमध्ये विशेष शब्दांचा/वाक्प्रचाराचा वापर केला जातो. उदा. शहाणी होणे– वयात येणे, मादी– स्त्रीवाचक शब्द, रानवाऱ्यागत– प्रचंड वेगाने, कुँवाऱ्या– अविवाहीत (पंधरा वर्षाच्या आतल्या पोरीला पारधी भाषेत कुँवारी मुलगी म्हणतात.), रक्तपात– बळी देणे, न्यायनिवाडा– न्याय दान, वाळीत टाकणे– बहिष्कृत करणे, लेंडी पातळ होणे– भयंकर घाबरणे, गाबन– गरोदर स्त्री, उघडे टिंगरावर थाप मारणे, कांडका मोडायचा नाय, शिवता–शिवत, म्होतूर– पाठगोरी, राधी– विधवा पुर्नविवाह इ.

### १.८.९ शस्त्रे–अस्त्रे :–

पारधी समाजात फासेपारधी, गायपारधी, धनगर पारधी, लंगोली पारधी, बहेलिया, चित्ता पारधी, शिकारी, टाकणकर इत्यादी जमाती आढळून येतात. पारध्याच्या जमातीनुसार त्या व्यवसायासाठी त्यांची शस्त्रे–अस्त्रांचा प्रकार उपयोगात आणतात. जसे फासेपारधी शिकार करण्यासाठी सापळे, वाघूर, भाले, बाण इत्यादीचा वापर करतात. गाय पारधी ही जमात शिकारी करीता गायीचा शस्त्र म्हणून उपयोग करतात. त्या गायींना शिकारीकरीता वेगळे प्रशिक्षित केलेले असते.

### १.८.१० गुन्हेगार जमात :–

मुळात पारधी हा गुन्हेगार नाहीच, या अडाणी समाजाचा वापर करून आपले उखळ पांढरे करून घेणारे पोलीस अधिकारी, सरपंच हेच खऱ्या अर्थाने महागुन्हेगार आहेत. हे बदमाश टेबलाखालून चोऱ्या करतात. म्हणून यांच्या चोऱ्या पचतात. पारधी पोटाच्या आगीसाठी रात्री लपून छपून चोऱ्या करतो. म्हणून त्याची चोरी समाजासमोर उघडी होते. कायद्याच्या आडून चोऱ्या करणाऱ्याकडे समाज दुर्लक्ष करतो. आणि पोटासाठी गोधडी चोर, जोंधळं चोर,

पारध्याला मात्र हाच समाज दरोडेखोर म्हणून हेटाळणी करतो. पोलिस खात्यात माणुसकीचा चेहरा असलेले अधिकारी दुर्मिळ असतीलही पण केवळ गुन्हेगार जमात म्हणून पारध्याकडे पाहणाऱ्या जातीयवादी अधिकाऱ्यांचा भरणा पोलिस खात्यात आहे. त्यामुळेच अशा अधिकाऱ्यांच्या छळाला आदिवासी पारधी वर्षानुवर्षे बळी पडत आहे. पारध्यांच्या पालात एखादा माणुस गुन्हेगार असतो, पण पोलीस साऱ्या पारध्यांना वेठीस धरतात. जन्मताच गुन्हेगारीचा शिक्का कपाळावर घेवून जन्माला येणारं पारध्याचं एखादं पोरगं या प्रकारातून बाहेर पडण्यासाठी शिक्षण घेणाऱ्या मुलांना देखील अल्पवयातचं पोलीस चौकीची हवा खावी लागते. पारध्यांनी शिक्षण घेवू नये, त्यांनी प्रतिष्ठीत जीवन जगू नये, गाडी बंगल्यात राहू नये, अंगावर चांगले कपडे घालू नये ही जातीय शक्तिची मानसिकता झालेली आहे. गरीबीच्या गोधडीला धाग्याने शिवले तरी पारध्याला स्वतःच्या संपत्तीवर हक्क सांगताना विचार करावा लागतो. पारध्यानं अपार कष्टाने मिळवलेलं धन पोलिसांच्या व समाजाच्या नजरेत चोरून आणलेलं असतं.[५४]

पोलिसांनी जात गुन्हेगार कायद्याचा आधार घेवून देशातील आदिवासी पारधी समाजाला जास्त कलंकीत केले आहे. पोलिसांच्या जातगुन्हेगार कायद्यामुळे आदिवासी पारधी समाजाचे संपूर्ण जीवन अपमानीत झाले आहे. खेड्यापाड्यात आजही पारधी दिसला की, चोरटा पारधी गावात आला त्याला पोलिसांच्या ताब्यात द्या असा अपमानजनक प्रसार केला जातो. आजही खेड्यात पारध्याला प्रस्थापित जातदांडगे आणि धनदांडगे थारा देत नाहीत. एखादा पारधी कितीही प्रामाणिकपणे जगण्याचा प्रयत्न करो, त्याला बदनाम जात म्हणून जास्त बदनाम केले जाते. पोलिस, जातदांडगे, धनदांडगे यांच्याकडून होणाऱ्या बदनामीमुळेच आदिवासी पारधी जास्त बदनाम होवून गुन्हेगारीकडे वळला आहे. ‘‘इंग्रजांनी ज्यांना जात गुन्हेगार म्हणून देशातल्या ५२ ठिकाणी सेटलमेंट करून आदिवासी पारध्यासह शेकडो जातीला स्थानबद्ध केले आहे. त्या गुन्हेगारीच्या पिंजऱ्यात आडकलेल्या जातींना विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक परिश्रमामुळे विमुक्त करण्यात आले. आदिवासी पारधी भारतीय कायद्यान्वये विमुक्त असला

[५४] संतोष पवार, पारधी पुढे पोलीस मागे...! (२०१०), भीमराज प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, पृ. ४५–४६

तरी ही तो आजही पोलिस खात्याच्या दृष्टीने गुन्हेगारच आहे. कोणत्याही एका जातीला गुन्हेगार समजण्याचा अधिकार पोलिसांना नाही. पण पारंपारिक जात गुन्हेगार कायद्याच्या शिक्क्यामुळे आदिवासी पारधी पोलिसांच्या काठीने घायाळ बनला आहे.''[५५]

पारधी समाज हा मुळातच कुसाळ्यात व डोंगरदऱ्यांच्या कडेला पिंढ्यान-पिढ्या राहणारा समाज आहे. हा पूर्वी शेतीची व गावकुसाची राखन करणे व भिक मागून मिळेल ते अन्न खाऊन कुटुंबाची उपजिविका भागविणे त्यातल्यात्यात गावात काही चोरी किंवा गडबड झाली तर या समाजातील लोकांना अन्न खायला नाही, हाताला काम नाही, दिवसभर फिरत असतात. याच पारधी समाजाने चोरी केली असावी असा १०० टक्के गावकरी व पोलिस यांचा दावा आजही आपणाला दिसून येतो. खरा आरोपी नसला तरी संशयीत म्हणून पारधी समाजाच्या झोळीमध्ये टाकून द्यायचे. विनाकारण गुन्ह्यात घेऊन गावकरीत सामाजिक प्रतिष्ठा मिळावयची. ही प्रथा पोलिसांची सुद्धा पिढ्यान-पिढ्या चालू आहे.

पारधी जमातीवर गुन्हेगारीचा ठपका समाजाने लावला आहे. या गुन्हेगारीबाबतचे वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी संशोधकाने व्यष्ठी अध्ययन साधनाचा वापर केला आहे. व्यष्ठी अध्ययनातून श्रीमती यमुनाबाई किसन पवार यांनी स्पष्ट केलेली माहिती पुढीलप्रमाणे-

जुणी लोक त्रास द्यायचे, मारायचे, काम करायला लावायची, व्यसनी लोकांच्या घरी अजूनही बायकांच हालच हाये. त्या बाईनी करायच पण तिनीच पोरांना संभाळायचं पण तीनीच आणि यांनी नुसत चांगल चुंगल खाऊन दिवस काढायचे.

अजून पण जर गावात चोरी झाली की पारध्यांवर नाव येत. पोलीसांनी आमच्यावर भरपूर अन्याय केला आहे. माझ्या स्वत:वर ती वेळ येऊन गेली आहे. खबऱ्यांना मी दोष देते. आमच्या समाजातील लोक काही खबरी म्हणून पोलीसांना मदत करत्यात. म्हंजे एखादाच चांगल चालल असताना मुद्दाम पोलीसांना खबर द्यायची आणि आपल्याला गुंतवायच कधी खबरे पारधी असतात, किंवा कधी मराठे असतात. आणि आपली दुष्मणी काढण्यासाठी गुंतवण्यासाठी हे खबरी पोलीसांना काय बी सांगतात. मग पोलिस येतात आणि जिथ गुन्हा

[५५] कित्ता, पृ. ५९)

झाला असल नसल तिथुन पोलीस उचलून नेहेत्यात आता आष्टा येथे माझ्या मालकांच नाव कुन्ही तरी दिल. तिथं त्यांना घेवून गेले चौकशी केली. कोणत्याच गुन्ह्याखाली त्यांना काहीच सापडल नाही. आता त्या पोलीसांनी त्यांना निरदोश सोडायच व्हत ना. तर तस नाय केल परत त्यांना कुणीतरी सांगितलं की तुम्ही त्याला निर्दोष सोडल तर तुमच्यावर गुन्हा दाखल होईल. मग पुन्हा आष्ट्याच्या पोलीसांनी बळंचच गुन्हा दाखल केला. मेडम, आमच्यावर खूप अन्याय चाललाय. अजून आमच्यावर अन्याय होतोय. माझी पोलीसांना, सरकारला तळमळीची इनंती हाअे की, त्यांनी खऱ्या चोराच्या मनगटालाच धराव व खरा चोर पकडून द्यावा व त्याला पाहिजे ती शिक्षा करावी. इनाकारण निर्दोषाला शिक्षा करून नये. जो गुन्हेगार नाही त्याच्यावर गुन्हा दाखल करायचा आणि आमच्या प्रपंच मोडायचा. संशोधकाला सांगताना उत्तरदाते म्हणतात की– नुसता मी एक शेळी व एका कोंबडीवर प्रपंच उभा केला. ही सत्य परिस्थिती आहे. माझे सासु–सासरे काही लखपती आणि करोडपती नाहीत. आणि माझे आई बाप पण लखपती करोडपती नाहीत. चार आणि पाच हजारांवर मी प्रपंच उभा करून कष्टाने हितवर आणला आणि आज चाळीस चाळीस हजार आणि पन्नास पन्नास हजार रूपये कोर्ट कचेऱ्यात घालवायचे म्हणजे कस वाटतय. माझी जिंदगी त्याला सोडवण्यात चालली. परत सापडला की सोडवायचा येवढचं चाललय. जर मला जगायच असल तर न्याय पाहिजे. पैसे पोलिसांना, वकीलांना द्यावे लागतात. कर्ज काढायचं ती परतफेड करायची अस आमचं आयुष्य असचं चाललयं.

मला असं म्हणायचं की आम्ही कुणाचं काय चोरीत नाही. मोबाईल नाही किंवा इतर पण नाही. आओ शेजारच्या शेतातलं कणिस पण आम्ही चोरत नाही. तरी सुद्धा सरकार आमच्यावर अस अचानक गुन्हा दाखल करत. आमची आमच्या परिवारांची पार तारांबळ उडते. अन्याय होतो. येवढ्यासाठी आम्ही गावकऱ्यांसाठी सुद्धा लय आदबतो त्याचा पैसा घेत नाही. रुपया घेत नाही. का? तर हे नंतर मदत करतेल त्यांच्यासाठी कष्ट तर होतोच पण मतदान सुद्धा एक जुटीन त्यांनाच करतो. तरी ते आम्हाला ही साथ देत नाही. ही घटना मी आजची सांगते आज पण आम्हाला त्यांची साथ नाही. मतदानावेळी नुसतच म्हणत्यात आम्ही तुमच्यासारखं करू. तुमच काम करू. पण आजपर्यंत इथलया गावच्या पोलीस पाटलांनी म्हणा किंवा इतरांनी म्हणा पोलीसांना  अस सांगितलं नाही का? हा माणूस चांगल आहे तुम्ही त्याला घेवून जाऊ

नका पकडू नका. आओ मेडम, व्याजानी पैसा काढून ते फेडण्यातच आमची जिंदगी जातीया. यामुळ आमच्या पारध्यांची कधीच सुधारणा होणारच नाय आम्ही सुधारूच शकणार नाय. जेव्हा आमचा कमावलेला पैसा आमच्याच प्रपंचासाठी जाईल. तेव्हाच आमची परिस्थिती सुधारण यांच्या पाई माझ्या लेकर बाळाचं लय हाल होत्यात कधी मधी त्यांच्या पोटात अन्नाचा कण नसतो. माझी इतकी तळमळ व्हती कि तुम्हाला काय सांगू. यात आमच्या महिलांच लय हाल होतय. त्यांच्यावर फार बिकट परिस्थिती आहे. माझ ६ वी शिक्षण झाल्यामुळ तरी मला कळतय लय राग येतोय. बगा सगळया गोष्टींचा आओ पोलीसांनी त्यांच्या नवऱ्यांना घेवून गेल्यावर पोरांच शिक्षण तर लांबचीच गोष्ट पण अण्णाचा कण सुद्धा कधी पोटात जात नाही. जे गुन्हा करतात त्याला सजा लावा काय बी करा. पर निरापराध्याला का करता? आमच्यावर अन्याय होतोय. येवढं करून गावात सुद्धा नावाची नासाडीच होती का नाय. निरदोशी असताना शिक्षा भोगावी लागते. शासनान आमाला कसला पगार हाय का? काम आहे का?

मला वाटत आमच्या लोकांवर जेवढे सध्या गुन्हे दाखल हाअेत त्यातील ६० ते ७०% गुन्हे खोटे आहेत. सगळेच गुन्हेगार नाहीत त्यांना चोर सापडला नाही की द्या नाव असा धंदा हाअे. त्यो नाव दिल कि खबरी सांगतात व तो आमुक आमुक आहे त्याच्यावर कोणता गुन्हा लावता येतोय का? की झाल टाकल आत. पोलीसांना आम्ही आमचीच झडती घ्यायला लावतो. आओ आता तरी गुन्हा दाखल करताना विचार करतात पहिल धरंल की टाक आत काहीही न विचारता आत टाकायचे. संघटनांनी आमच्यासाठी खूप चांगल काम केलय. जाधव यांच्यामुळ तरी आमचा अन्याय कमी झालाय. महिला संघटना नाहीत. या रूढी परंपरा पाळती पण जास्त नाही इतर लोक चांगल वागवत नाही.

जात पंचायतीत अंतर्गत गोष्टी मिटवण्यासाठी बसवल्या जातात. पण आता कमीच आधार घेतो आणि सोडचिठ्ठी, वैगरे करतो त्यातले पंच पैसे खातात. जो जास्त पैसे देईल त्यांच्याच बाजूनी निर्णय. मग काय उपयोग यांचा? मग आता जरा कमीच आधार घेतो. आम्ही अरुण जाधव यांची मदत घेतो. त्यांची संघटना आमच्यासाठी खूप काम करते. ही गायरान त्यांनीच आम्हाला द्यायला मदत केली. मानवी हक्क संघटना याच आम्ही काम करतो. राजेंद्र काळे यांनी फासे पारधी संघटना काढली पण आमचे विचार त्यांच्याशी जमत नाही. मागच्या

पंधरा दिवसापूर्वी लोणीमध्ये काही पारध्यांवर अन्याय झाला. पोलिसांनी सर्वांना पकडून घेवून गेले. त्यांनी चार पाच दिवस तिथ ठेवले आणि त्यांच्यावर गुन्हे दाखल केले. तो जाब विचारण्यासाठी आम्ही राजू काळे यांना फोन केला तो आला आणि त्यालाच दारू पाजावी लागली. पैसे द्यावे लागले. म्हणून आम्ही अरुण जाधव यांची मदत घेतली ते मानव तस्करी कलम लावत होते. तो कट करून साध्या कोर्टात जामिन होइल असे गुन्हे टाकले. घटस्फोटासाठी आम्ही फारसा कोर्टाचा आधार घेत नाही. घटस्फोटासाठी कारण म्हंजे मुल न होणे, नवऱ्याशी न पटणे या कारणासाठी घटस्फोट घेतात. पूर्वी सारख्या परीक्षा आमच्याकड आता घेत नाही. पूर्वी घेत होते. जात पंचायती पेक्षा शहाण्या सुरत्या माणसांसारख करतो. उत्पन्नाच साधन शेती फक्त. आमच्या जातीतील बायकांना सरकारी दवाखाना म्हणा कुठ नोकऱ्या देत नाही. दिल्या तर वाईट नजरेने बघतात. विवाह इतरांप्रमाणे परिस्थितीप्रमाणे मंडप न लावता आमच्या वेगळ्या पद्धतीने विवाह करतो. हळद लावून गाठ मारून मिरवणूक काढतात. देवाच्या नावान टिळा लावून घरचे म्हातारी माणस आर्शिवाद देतात झालं लग्न.

## १.८.११ स्वातंत्र्यापूर्वीची पार्श्वभूमी

पारधी समुदायाच्या नोंदी इ.स.१८५७ च्या उठावादरम्यान सापडतात. सदर नोंदीमध्ये पारधी समुदाय हा आदीवासी समुदाय असल्याचे नोंदवण्यात आले आहे. ते रानावनात, जंगलात आदीवास करून राहत असत. इ.स.१८५७ च्या स्वातंत्र्य युद्धामध्ये जंगलात राहत असल्यामुळे इंग्रजांना मोठ्या प्रमाणात त्यांच्या विरूद्ध अडचणी निर्माण केल्या होत्या, त्या समुदायामध्ये सर्वात पुढे होते त्यापैकी काही भिल्ल, रामोशी, पारधी, बेरड इत्यादी समावेश होता. त्यामुळे त्यांच्या या इंग्रजांविरूद्ध उठावात्मक प्रतिकारामुळे त्यांच्यावर 'गुन्हेगार' म्हणून ठपका ठेवण्यात आला ज्या करिता इंग्रजांनी वेगळा गुन्हेगारी कायदा अस्तित्वात/निर्माण केला.

या अगोदर पारधी समुदायाचे अस्तित्वाच्या नोंदी किंवा संबंध इतिहासातील शूर राजा महाराणा प्रताप सोबत आढळतात. सदर जमातीने महाराणा सोबत, मुघलांबरोबर संघर्ष केलेला आढळतो. मुख्यतः पारधी जमात ही त्यांच्या मुळ स्थानापासून दुरावल्याच्या प्रमुख कारणांना पैकी एक म्हणजे त्यांच्या राजाचा मुघलांकडून झालेला पाडाव. तेव्हापासून ही जमात 'उपरे' बाह्यस्त, दुरुस्त, परदेशी पणाचे जीवन जगत आहेत. पारधी समुदाय हा विविध भागात

वेगवेगळ्या नावाने ओळखला जातो. पारधी बोलीभाषेत त्यांना 'वाघारी' म्हणतात. पारधी समुदायाच्या उप जमाती जशा कि राजपुत–पारधी, फासे–पारधी, गाय–पारधी, भिल्ल–पारधी, राज–पारधी, लंगोट–पारधी, हरार–पारधी, पाल–पारधी, धनगर–पारधी, घोड–पारधी, घिसाडी–पारधी, मांग–पारधी, शिरवाज–पारधी, लमान–पारधी, चिचे–पारधी, चिता–पारधी इत्यादी आहेत.

पारधी समुदाय हे स्वतःला राणा प्रताप आणि पृथ्वीराज चौहानाचे वंशज म्हणवतात. पारध्यांचे कुळ/वंशज हे राजपुत असल्याचे समजते. राजपुत दरबारी त्यांना चौकीदार म्हणून नेमणूक केली जायची.

ब्रिटिश राजवटीपासून पारधी समुदायातील सर्व घटक हे गुन्हेगारीचे आयुष्य जगत होते. इ.स.१८७१ च्या इंग्रजाच्या कायद्यानुसार जन्मजात गुन्हेगार ठरवण्यात आल्या आणि तारांच्या कुंपणात ढकलण्यात आल्या. ''एकेकाळी इंग्रजांविरूद्ध बंड करून त्यांना सळो कि पळो करणारी पारधी ही एक जात इंग्रजांनी कायमस्वरूपी गजाआड टाकली.''[५६]

एकोनिसाव्या शतकाच्या अखेरीस तुरुंगात असलेल्या एकूण संख्येपैकी १/३ पेक्षा जास्त लोक चोर म्हणून पकडण्यात आले होते ते या जमातींचे होते. त्याचबरोबर सरकारच्या असेही लक्षात येत होते की, तुरुंगातील छळाचा किंवा उपहाराचा गुन्हेगार जमातींच्या सदस्यांवर काहीही परिणाम होत नव्हता उलट ते जास्तीत जास्त कोडगे बनत चालले होते.

इ.स.१८५७ च्या उठावाचे तत्कालीन कारण जरी ब्रिटिश फौजेतील शिपायांचा असंतोष, संस्थानिकांचा उठाव असे, असले तरी या उठावात धारातीर्थी पडलेले व नंतर खटला चालवून फासावर देण्यात आलेल्या शिपायांची नावे पाहिली तर गुन्हेगार जमाती म्हणून ब्रिटिशांनी ज्यांना ठरविले होते त्यांची संख्या व उठावात लक्षणीय होती. ब्रिटिश सत्तेने हे बंड यशस्वीरित्या मोडून काढल्यानंतर इंग्रजांना या देशातील सशस्त्र जमातींच्या टोळ्यांचा धोका लक्षात आला. या जमातींच्या संदर्भात कायमस्वरूपी उपाय योजना करण्यासाठी ब्रिटिश सत्तेने दोन गोष्टी केल्या. (१) भारतात शस्त्रास्त्र बंदीचा कायदा आणि (२) इ.स.१८७१ चा गुन्हेगार जमाती कायदा. हे

[५६] उत्तम कांबळे (२०१५), आंदकोळ आयचं आंदकोळ, दैनिक सकाळ, २९ नोव्हें. २०१५

कायदे पास करून त्यांची अत्यंत कठोरपणे अंमलबजावणी सुरू केली. ''इ.स.१८७१ मध्ये पास केलेल्या गुन्हेगार जमाती कायद्याची गृहीतके टी. व्ही. स्टिफन्स यांच्या तीन भूमिकांवर आधारलेली होती. (१) एखाद्या गटात किंवा जातीत जन्मलेली व्यक्ती जन्मजात गुन्हेगार बनते कारण ती आपल्या वडिलांचा व्यवसाय पत्करत असते. (२) एकदा गुन्हेगार बनलेली व्यक्ती आयुष्यभर गुन्हेगार राहते कारण आपला नशिबाचा धंदा आहे. तो आपला धर्म आहे असे ती मानत असते. (३) सतत गुन्हेगारी कृत्य केल्याने अशी व्यक्ती सराईत गुन्हेगार बनते.''[५७]

### १.८.१२ स्वातंत्र्यानंतरची स्थिती

स्वातंत्र्यानंतर व अगोदर जशी गुन्हेगारी जमात म्हणून ओळख निर्माण झाली ती सध्य–स्थितीमध्ये तशीच आहे. किंबहुना ती पुसण्याऐवजी अधिक ठळक केली जात आहे. सध्य–परिस्थितीमध्ये ही जमात देशाच्या मुळ प्रवाहात सहभागी झाली आहे परंतू त्यांना स्वतःचे स्थिर जीवनमान व व्यवसाय उपलब्ध राहिलेला नाही. ही जमात अजूनही रानटी/क्रूर, गुन्हेगारी जीवन जगत आहेत, कारण शिक्षणाची वाणवा आणि त्यांचे परंपरागत रूढी परंपरांचा असलेला पगडा याला जास्त कारणीभूत आहे असे त्यांना वाटते.

जे पारधी अपराधी सापडतात त्यांना कोर्ट–कचेऱ्यांमध्ये त्यांचा पैसा आडका वापरावा ओतावा लागतो, आणि उर्वरित पैसा धार्मिक कार्यासाठी वापरतात. असे करण्यामागे त्यांचा उद्देश हा असतो की कोर्टातून निर्दोष मुक्तता ही देवाच्या आर्शिवादामुळेच होते. त्यामुळे हे देवाचे आपल्यावर कर्ज आहे. आणि ते कर्ज पूर्ण करण्याकरीता फेडण्याकरीता तुरुंगातून बाहेर आल्यावर पुन्हा गुन्हेगारीकडे वळतात.

''मुळात पारधी हा गुन्हेगार नाहीच, या अडाणी समाजाचा वापर करून आपले उखळ पांढरे करून घेणारे पोलिस अधिकारी, कोर्टातले सरकारी, निमसरकारी वकील आणि गावचा पोलिस पाटील, सरपंच हेच खऱ्या अर्थाने महागुन्हेगार आहेत.''[५८]

विमुक्त जमाती म्हणजे मोकळया सोडलेल्या जमाती. याचाच अर्थ काही जमातींना पूर्वी

---

[५७] भटके विमुक्त, सम्यक विद्रोही मासिक, जून/जुलै २०१३, पृ.६

[५८] संतोष पवार, पारधी पुढे पोलीस मागे...!, पृ. ४५

बंदिस्त केले गेले होते. गावगाड्याच्या आधारे उदरनिर्वाह करताना काम मिळाले नाही अथावा भीक मिळाली नाही तर लहान–मोठी चोरी करावी लागे. याचा त्रास स्थिर समाजाला होत असे. यातून इंग्रज काळात अशा चोरांवर आळा बसावा म्हणून इ.स.१८७१ मध्ये 'क्रिमिनल ट्राईब्ज ॲक्ट' काढण्यात आला. त्यानुसार इंग्रज सरकाने भारतातील १९८ भटक्यांना गुन्हेगार ठरवले. अशा भटक्यांनी गुन्हा करो वा न करो त्यांना गुन्हेगार म्हणूनच गणले गेले. पुढे इ.स.१९२४ मध्ये 'गुन्हेगारी जमाती वसाहतीकरण कायदा' आला. गुन्हेगार ठरलेल्या जमातींना एकत्र तारेच्या कुंपणात डांबलं. महाराष्ट्रात १४ जमातींना डांबले गेले. भारत स्वतंत्र होऊनही भटक्या जमाती बंदिस्तच होत्या. मागील कायदे रद्द करून ३१ ऑगस्ट १९५२ रोजी डांबण्यात आलेल्या भटक्या जमातींना विशेष बाबत म्हणून मुक्त करण्यात आले. तेव्हापासून या भटक्या जमाती 'विमुक्त जमाती' महणून गणल्या गेल्या. असे असले तरी 'हॅबीच्युअल ऑफेंडर्स ॲक्ट' नुसार आजही संशयित म्हणून भटक्या विमुक्तांची चौकशी केली जाते.

मुळात कोणतीही व्यक्ती व समूह हा विशिष्ट एका जातीचा, जमातीचा वा धर्माचा नसतो. संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेत काही बाबी लादल्या जातात. भटक्या विमुक्त जमातीबाबतही असे होणे साहजिक आहे. आजच्या भटक्या विमुक्तांना प्राप्त स्थितीला का यावे लागते? या प्रश्नांचे उत्तर अनेक विचारवंतांनी आपापल्या परीने मांडले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''आर्यकाळात आर्यांच्या निरनिराळ्या टोळ्या इतर वन्य टोळ्यांसारख्या आपपसात लढत होत्या. विजय टोळ्या स्थायिक होऊन राहात. पराभूत टोळ्यातील काही लोक मात्र आपले घरदार, मालमत्ता सोडून केवळ भ्रमंती करीत राहात. स्थानिक जीवन त्यांनी कधीही स्वीकारले नाही. अशा भटकणाऱ्या लोकांना कालांतराने 'परिव्राजक' म्हटले गेले.''[५९] यावरून युद्धातल्या पराजयामुळे भटके जीवन जगावे लागले. म्हणजेच ते गुन्हेगार नव्हते ते येथे स्पष्ट होते.

जातीय शोषणाच्या उतरंडीत सर्व सहभागी जनसमूह स्थिर आणि गावगाड्याशी बांधलेले दिसतात. म्हणजे त्यांच्या जीवनाला स्थिरता आहे आणि सांगायाला मातृभूमी आहे. ब्राह्मणी

[५९] डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड–३, पृ.५४८

जातिव्यवस्थेने असे गावकेंद्रावर व गावकुसाबाहेर काही जनसमूहांना स्थिर जागा दिली आहे. परंतु या दोन प्रकारच्या समूहांना वगळून आणखी एक समाज या एकूण व्यवस्थेत नांदता ठेवला आहे. फक्त त्यांना स्थिरता दिलेली नाही. त्याच्या मागे आर्थिक आणि उत्पादन संबंधाचेही कारण आहे. या अस्थिर, गाव नाकारला गेलेल्या जनसमूहांना भटका समाज म्हणून ओळखला जातो. भांडवलशाहीने व तिच्यामार्फत आलेल्या औद्योगिकरणाने भटक्याचे जगण्याचे मार्ग उद्ध्वस्त केलेले आहेत. भटक्या समाजाच्या बाबतीत अनेक समाजशास्त्रज्ञांनी शक्यता मांडल्या आहेत. टोळ्याटोळ्यांतील संघर्षातून पराभूत, निर्वासित झालेल्या टोळीपासून ते व्यापारासाठी आवश्यक त्या दळणवळणासाठी पण हा भटका समाज आहे आणि आजही तो गावगाड्याबाहेर आहे.

''सामाजिक कार्यकर्ते, समाजशास्त्रज्ञ यांनी भटक्या–विमुक्तांचे दोन प्रवाह सांगितले आहेत. पहिला प्रवाह हा भटके विमुक्त हेही ब्राह्मणी जातिव्यवस्थेचीची एक निर्मिती आहे असे मानणारा तर दुसरा प्रवाह ज्यांनी या ब्राह्मणी जातिव्यवस्थेच्या उतरंडीत सामील होण्यास नाकारले त्या स्वाभिमानी जनसमूहांनी भटके विमुक्त होणे स्वीकारले असे मानतात.''[६०]

इंग्रजांनी ज्यांना जात गुन्हेगार म्हणून देशातल्या ५२ ठिकाणी सेटलमेंट करून आदिवासी पारध्यासह शेकडो जातीला स्थानबद्ध केले आहे. त्या गुन्हेगारीच्या पिंजऱ्यात आडकलेल्या जातींना विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक परिश्रमामुळे विमुक्त करून टाकले. आदिवासी पारधी भारतीय कायद्यांन्वये विमुक्त असला तरी ही तो आजही पोलीस खात्याच्या दृष्टीने गुन्हेगार आहेच. कोणत्याही एका जातीला गुन्हेगार कायद्याच्या शिक्यामुळे आदिवासी पारधी पोलिसांच्या काठीने घायाळ बनला आहे.

पोलिसांनी जातगुन्हेगार कायद्याचा आधार घेवून देशातील आदिवासी पारधी समाजाला जास्त कलंकीत केले आहे. पोलिसांच्या जातगुन्हेगार कायद्यामुळे आदिवासी पारधी समाजाचे संपूर्ण जीवन अपमानीत झाले आहे. खेड्यापाड्यात आजही पारधी दिसला रे दिसला की, लहान लेकारांपासून वृद्धापर्यंत सारेच चोरटा पारधी गावात आला त्याला पोलिसांच्या ताब्यात द्या असा

[६०] भटके विमुक्त, सम्यक विद्रोही मासिक, पृ.४

अपमानजनक प्रसार पोलिसांनी वर्तमानपत्रांच्या आधारे केला आहे. त्यामुळे आजही खेड्यात पारध्याला कितीही प्रामाणिकपणे जगण्याचा प्रयत्न करो, त्याला बदनाम जात म्हणून जास्त बदनाम केले जाते. पोलिसांच्या व जातदांडग्यांना आणि धनदांडग्यांच्या बदनामीमुळेच आदिवासी पारधी जास्त बदनाम होवून ते गुन्हेगारीकडे वळले आहेत.

भटक्या–विमुक्तांना गुन्हेगार ठरवणारे इ.स.१८७१, इ.स.१८९७, इ.स.१९०८, इ.स.१९११, इ.स.१९१९, इ.स.१९२२, इ.स.१९२४, इ.स.१९३६, इ.स.१९३७, इ.स.१९३८ असे विविध कायदे पास करण्यात आले. या कायद्याचा आणि एकूणच सरकारी धोरणाचा भटक्या–विमुक्तांनी वेळोवेळी प्रतिवाद केला आहे. स्वातंत्र्यानंतर तर या भटक्या–विमुक्तांच्या मुक्ती लढ्याची जबरदस्त चळवळ झाली. या चळवळीचा मध्ये– (१) इ.स.१९४७ ला भारत स्वतंत्र झाला असला तरी या स्वतंत्र भारतातील भटके तारेच्या कुंपणात पाच वर्षे बंदिस्त होते. इ.स.१८७१ चा भटक्यांना गुन्हेगार ठरविणारा कायदा इ.स.१९५२ साली रद्द केला गेला. भटक्या–विमुक्तांच्या चळवळीचा हा पहिला विजय होता. यामुळे तारेच्या कुंपनातील बंदिस्ततेतून भटक्या जमाती मुक्त झाल्या. मात्र असे असले तरी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय–मागण्यांसाठी त्यांचा मुक्ती संघर्ष चालूच होता. (२) इ.स.१८७१ चा गुन्हेगार कायदा १९५२ मध्ये रद्द झाला असला तरी भारतीय पोलिस व सरकार भटक्यांना 'नागरिक' मानण्यास तयार नव्हते. भटक्या–विमुक्तांकडे गुन्हेगार म्हणून पाहिले जात होतेच. या स्वतंत्र भारतात पुन्हा इ.स.१९५२ मध्येच 'Habitual Offenders Act 1952' पास करून विमुक्तांना बंदिस्त केले गेले. या विरोधात भटक्या–विमुक्तांनी पुन्हा चळवळीचे हत्यार उपसले आणि मुक्तीसेना स्थापन करून प्रश्न धसास लावण्याचे ठरविले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आणि भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू यांना सोलापूर येथे इ.स.१९६० मध्ये क्रिमिनल सेटलमेंटच्या तारा तोडणे भाग पडले. स्वातंत्र्यानंतर इ.स.१९५० मध्ये संविधानाच्या रूपाने 'कायद्याचे राज्य' आले. त्याला 'नैतिक अधिष्ठान' देण्यासाठी इ.स.१९५२ मधील पहिली लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक होत असताना 'गुन्हेगार' जमातींना तारेच्या कुंपनातून मुक्त करण्यात आले.

### १.८.१३. इ.स.१८७१ पूर्वीचे ब्रिटिशांचे धोरण

भारताच्या काही भूभागावर ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य असताना भारतात कायद्याचे राज्य आणावयाचे व हे कायदे ब्रिटिश कायद्यांसारखे असतील असे धोरण कंपनी सरकारचे होते. त्या अनुषंगाने ब्रिटिशांनी जमात, जंगल, जीवित, वित्ताचे प्रश्न या संदर्भात कायदे करण्यास सुरुवात केली होती. तत्कालीन भारतात विविध संस्थानांचे, राज्याचे, जातिजमातीचे, धर्मांचे, कायदे अस्तित्वात होते. हिंदूच्या बाबतीत मिताक्षर कायदा, दायभाग कायदा, मुसलमानांच्या बाबतीत शरियत कायदा व जमातींच्या बाबतीत त्यांच्या त्यांच्या पंचायतीचे कायदे पाळले जात होते. जंगलात कायदा तर भारताला सर्वस्वी अपरिचित होता. प्रथम तैनाती फौजांच्या साहाय्याने इंग्रजानी एतद्देशीय राज्यांना व संस्थानिकांना निर्बल करून टाकले होते. त्यानंतर विविध कारणे दाखवून इंग्रजांनी ही संस्थाने खालसा करण्यात सुरुवात केली. याचा परिणाम असा झाला की, छोटे संस्थानिक व टोळ्यांच्या राज्यांना व संस्थानिकांना निर्बल करून टाकले होते. त्यानंतर विविध कारणे दाखवून इंग्रजांनी ही संस्थाने खालसा करण्यास सुरुवात केली. याचा परिणाम असा झाला की, छोटे संस्थानिक व टोळ्यांच्या राज्यांना आपली स्वायत्तता व राज्य धोक्यात आल्याची साधार भीती वाटू लागली. इ.स.१७६१ ते इ.स. १८५७ हा काळ भारताच्या दृष्टीने भयंकर हलाखीचा, दुष्काळाचा, अराजकतेचा व बंडाळ्यांचा काळ होता. मोठी युद्धे थांबून छोट्या चकमकीचे प्रमाण वाढले होते. जहागीरदारांनी स्वतंत्र होऊन हजारो संस्थानिक निर्माण केले होते. दिल्लीतील मोगल सत्ता, दक्षिणेतील मुस्लिम राजवटी, मराठा राज्ये या साऱ्या सत्ता मोडकळीला आल्या होत्या. गुंड, पुंड, ठग, पेंढारी यांच्या लुटालुटीला ऊत आला होता. यातूनच इ.स.१८५७ चे बंड निर्माण झाले. हे बंड म्हणजे पूर्वनियोजित स्वातंत्र्ययुद्ध नव्हते तर धार्मिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक अशा अनेक कारणांनी ब्रिटिशांच्या विरोधात असणाऱ्या लोकांनी केलेला तो एक विस्कळीत उठाव होता. या बंडात निरनिराळ्या वन्य जमातींचे सरदार व लोक मोठ्या संख्येने सामील झाले व या बंडात मरणाऱ्यांमध्ये मात्र रामोशी, कैकाडी, कोळी, पारधी, मुंढा इ. आदिवासी व विमुक्त जमातींची संख्या लक्षणीय होती. ब्रिटिशांच्या जंगल कायद्यामुळे, जंगलावर गुजराण करणारे आदिवासी गुन्हेगार ठरले. मोगल सत्ता खिळखिळी झाल्याने सैन्याची छावणी उभारणारे छप्परबंद गुन्हेगारीकडे वळले. ब्रिटिश रूपयांचे चलन सुरु झाल्याने नाणी

पाडणारे वाममार्गाला लागले. मोठे सैन्य नष्ट झाल्याने त्यांना रसद पुरवणारे लमाण बंजारे देशोधडीला लागले. अन्य उत्पादनाची साधने उपलब्ध नसल्याने हे लोक गुन्हेगारीकडे वळले. त्यातच भरीस भर म्हणून यांनी आपल्या जबानीत, लूट करणे हा आमचा धर्म आहे असे सांगितले. तत्कालीन युरोपात ज्यू वंशीयांना जन्मजात अनैतिक शोषक व गुन्हेगार म्हणून वागविण्याची प्रथा होती, तशीच भारतामध्ये धंदा व्यवसाय म्हणून गुन्हेगार जमात ही संकल्पना ब्रिटिशांच्या मनात तयार होऊ लागली. गुन्हेगारी हा जातधंदा असून या गोष्टीस काही गुन्हेगारांनी तसेच तत्कालीन उच्चवर्णीय सुशिक्षितांनी पुष्टही दिली. परिणामी इ.स.१८७१ साली पहिला गुन्हेगार जमाती कायदा टी. व्ही. स्टिफन्स यांने मांडला व तो पास झाला. हा कायदा होण्यास सिंध प्रांतातील हूर जमातीचे बंड हे एक तत्कालीन कारण होते. त्यामुळे प्रथमतः तो सिंध प्रांतात लागू झाला. हळूहळू त्याची व्याप्ती मध्य प्रांत व संयुक्त प्रांतापर्यंत वाढवण्यात आली. आणि नंतर तो संबंध ब्रिटिश भारताला लागू करण्यात आला. सुरुवातीच्या काळात या कायद्याने स्वरूप अत्यंत विस्कळीत होते. जमातींना गुन्हेगार जाहीर करणे आणि सापडलेल्यांना तुरुंगात डांबणे किंवा शिक्षा करणे असे त्याचे स्वरूप होते. विसाव्या शतकाच्या प्रारंभी गुन्हा हा गुन्हेगार यांचे मानसशास्त्र या बाबतीत नवविचारांची लाट आली. गुन्हेगारी हा परिस्थितीचा परिपाक असतो. तसेच तो संस्कारांचा परिणाम असतो. संगती गुन्हेगारी मनोवृत्ती तयार करण्यास कारणीभूत ठरते आणि शिक्षा करणे हे अमानवी असून गुन्हेगारांना सुधारणे हे कायद्याचे व समाजाचे कार्य असते, अशा विचारसरणीने युरोपात मूळ धरले. या सर्व विचारसरणीचे पडसाद भारतातही उमटल्याशिवाय राहिले नाहित. याच काळात भारतात ब्रिटिश राज्यसत्तेची पकड पक्की होऊन शासनसंस्थेची परिपक्व व आदेश यांची रचना सुरु झाली होती. ब्रिटिश न्यायसंस्थाही सुस्थिर झाल्याने भारतातील गुन्हेगारीच्या संदर्भात मूल्यांकन सुरू झाले होते. म्हणून इ.स.१९०९, इ.स.१९११, इ.स.१९१६, इ.स.१९१७ या सालात गुन्हेगार कायद्यात निरनिराळ्या कलमांची व आदेशांची भर पडली. इ.स.१९२४ सालात खऱ्या अर्थाने परिपूर्ण असा गुन्हेगार जमाती कायदा अस्तित्वात आला. मुंबई सरकारने इ.स.१९२४ साली या कायद्याचे स्वतंत्र पुस्तक ‘क्रिमिनल ट्राइब्ज ॲक्स मॅन्युअल १९२४’ प्रसिद्ध केले.

इ.स.१९०९ सालीच या जमातींतील अट्टल गुन्हेगारांना वेगळ्या वसाहतीत ठेवून त्यांना सुधारण्याचा प्रयत्न करावा असा विचार पुढे आला. युरोपखंडात याच सुमारास मिशनऱ्यांनी 'सॉल्व्हेशन आर्मी' नावाची गुन्हेगारांना सुधारणारी संघटना स्थापन केली व या संघटनेने अशा प्रकारचा कार्यक्रम भारतात चालविण्याची इच्छा प्रदर्शित केली. या काळात भारतात ब्रिटिश मिशन, ऑस्ट्रेलिया मिशन, जर्मन मिशन, अमेरिकन मराठी मिशन असा ख्रिस्ती संस्था धर्मप्रसाराचे, मागासवर्गीयांना सुधारण्याचे, त्यांच्या वस्त्यांत शाळा चालविण्याचे काम करीत होत्या. त्यामुळे सरकारने अशी भूमिका घेतली की, जेथे मिशनऱ्यांना शक्य आहे तेथे त्यांच्याकडे वसाहतींचे व्यवस्थापन सोपवावे व उरलेल्या वसाहतींचे व्यवस्थापन सरकारने करावे. या हेतूनच सोलापूरची वसाहत मिशनऱ्यांकडे देण्यात आली. इंग्रज सरकारने या गुन्हेगारांचे तीन भाग पाडले– (१) ज्या जमाती सुधारलेल्या असून प्रामाणिक उद्योगधंद्यावर स्थायिक झाल्या आहेत. पण त्यांच्यापैकी काही सदस्यांना इतिहास गुन्हेगारी स्वरूपाचा आहे. (२) ज्या जमाती स्थायिक झाल्या आहेत परंतु निरनिराळ्या ऋतूंत गुन्हे करण्यासाठी भटकंती करीत असतात. (३) जिप्सींप्रमाणे पूर्णवेळ भटक्या जमाती याच वेळेस गुन्हेगार जमातीवर करण्याची कारवाई चार टप्प्यांत विभागली गेली. १. नोटिफिकेशन, २. रजिस्ट्रेशन, ३. रिस्ट्रिक्शन, ४. वसाहतीत दाखल करणे. इ.स.१९११ च्या दुरुस्तीत गुन्हेगार जमाती कायद्याचे दोन प्रमुख हेतू स्पष्ट करण्यात आले. १) असामाजिक तत्त्वापासून समाजाच्या हक्कांचे संरक्षण करणे. २) गुन्हेगार जमातीचे पुनर्वसन करणे. एका बाजूने कायद्यात सुधारणा होत राहिल्या तरी नोकरशाहीतील समन्वयाचा अभाव, गैरसमज व कायद्याचा किचकटपणा यामुळे कायद्याची अंमलबजावणी मनमानी पद्धतीने झाली. म्हणून इ.स.१९१९ साली ऑल इंडिया जेल कमिशनची स्थापना झाली. या कमिशनने गुन्हेगार जमाती कायद्याच्या विधायक भागावर प्रचंड भर दिला. त्यांच्या मते या कायद्याचे यश हे या जमातींना पुरेशा आर्थिक सोई, त्यांच्या गरजांची पूर्तता व समाधान देण्यावरच मोजले पाहिजे. गुन्हेगार जमातींच्या वसाहती म्हणजे सुधारित तुरुंग नव्हते, माणसांना अमर्याद काळापर्यंत स्वातंत्र्यापासून वंचित ठेवता येणार नाही. या जमातींचे पुनर्वसन व सुधारणा या गोष्टी प्रमुख होत्या.

### १.८.१४ गुन्हेगारी जमाती वसाहतीकरण कायदा १९२४

देशातील एकूण १९८, तर महाराष्ट्रातील एकूण १४ जमाती इंग्रजांनी गुन्हेगार जमाती ठरविल्या. बेरड, बेस्तर, भामटा, कैकाडी, कंजारभाट, कटाबू, बंजारा, राजपारधी, रजपूत भामटा, रामोशी, वडार, वाघरी, छप्परबंद आणि पारधी या महाराष्ट्रातील भटक्या जमातींचा समावेश करण्यात आला व उर्वरित १८ जमाती केवळ भटक्या जमाती म्हणून त्यांची नोंद करण्यात आली. इंग्रज सरकारने ज्या जमाती गुन्हेगार जमाती म्हणून जाहीर केल्या, त्या जमातींना अर्थातच गावगाड्याने शेजार नाकारला, निवारा नाकारला, कामधंदा नाकारला आणि भीकही नाकारली. अशा गुन्हेगार जमातीतील लोकांना पकडून देण्यासाठी त्या काळच्या पोलिसांना त्यांनी मदतच केली. परिणामी या जमाती गावगाड्यापासून दूर राहिल्या आणि उपजीविकेसाठी नाइलाजाने गावगाड्यात आणि शेतात चोऱ्यामाऱ्या करीत करीत जगू लागल्या. महाराष्ट्रातील अशा गुन्हेगार जमातींचा बिमोड करण्यासाठी किंवा त्यांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी इ.स.१९२४ साली इंग्रजांनी गुन्हेगार जमातींच्या वसाहतींची देशात वेगवेगळ्या ठिकाणी निर्मिती केली. त्या वसाहती 'सेटलमेंट' म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. महाराष्ट्रात पुणे, सोलापूर, बारामती, नंदुरबार, अंबरनाथ, औरंगाबाद, धारवाड, विसापूर, हुबळी आणि जेजुरी इत्यादी बावन्न ठिकाणी स्वतंत्र तारेचे कुंपण ठोकून त्या गुन्हेगार जमातीच्या लोकांना बंदिस्त करण्यात आले तसे त्यांच्या सुधारणेचेही प्रयत्न केले गेले. त्यांच्या निवाऱ्याची आणि उपजीविकेचीही सोय त्याच वसाहतीत करण्यात आली. त्यांच्या मुलांना सक्तीचे प्राथमिक शिक्षण आणि स्त्री–पुरुषांना वसाहतीच्या जमिनीत रोजगाराची सोय करण्यात आली. त्याचबरोबरच नागरी जीवन जगण्याचीही संधी त्यांना उपलब्ध करून देण्यात आली. या लोकांनी वसाहतीमधून पळून जाऊ नये म्हणून त्यांना दिवसा व रात्री हजेरी लावण्यात आली. त्यातून स्त्री–पुरुष आणि लहान मुलेही सुटू शकली नाहीत. त्यामुळे त्यांचे जन्म आणि मृत्यु तीन तारेच्या कुंपनातच होऊ लागले.

इ.स.१९२३ साली इ.स.१९११ चा गुन्हेगार जमाती वसाहत कायदा दुरुस्त करण्यात आला. ही दुरुस्ती गुन्हेगार जमाती कायद्याच्या इतिहासामध्ये अत्यंत महत्त्वाची असल्याचे दिसून येते. या कायद्यामध्ये पूर्वीच्या कायद्यातील काही तरतुदी काढून टाकण्यात आल्या. तसेच हा

कायदा संबंध ब्रिटिश भारतासाठी इ.स.१९२४ साली लागू करण्यात आला. या कायद्यान्वये स्थानिक, प्रातिक सरकारांना या कायद्यास अनुसरून, त्यांना सोयीचे वाटतील असे व्यवस्थापकीय नियम व अधिनियम बनविण्याची मुभा देण्यात आली. महत्त्वाची वैशिष्ट्ये– (१) गुन्हेगार जमाती कायदा हे दमनाचे यंत्र बनू नये, तर या कायद्याचा उद्देश गुन्हेगार जमातींना सर्वसाधारण समाजाशी एकरूप बनविणे हा असला पाहिजे. (२) एखाद्या संपूर्ण जमातीतील किंवा त्यातील व्यक्तीला गुन्हेगार म्हणून घोषित करण्यापूर्वी किंवा वसाहतीत दाखल करण्यापूर्वी त्याची कार्यालयीन चौकशी करणे हे बंधनकारक असले पाहिजे. (३) या कायद्यान्वये एखादी व्यक्ती किंवा जमात सराईत गुन्हेगार असल्याचे लक्षात आले असेल किंवा जे पद्धतशीर गुन्हे करीत असतील, त्या सर्वांना गुन्हेगार जमाती कायद्यान्वये सततच्या देखरेखीखाली आणण्यात आले पाहिजे. (४) नोटिफिकेशन : इ.स.१९२४ च्या गुन्हेगार जमातीच्या कायद्याच्या सेक्शन ३ प्रमाणे स्थानिक सरकारांना, कोणतीही जमात, टोळी, व्यक्तींना वर्ग किंवा त्याचा एक भाग जर विना जामीनपात्र गुन्हे करण्यासाठी सरावलेला आहे असे आढळले तर त्यांना गुन्हेगार जमात म्हणून घोषित करण्याचे अधिकार प्राप्त झाले. (५) गुन्हेगार जमाती कायद्यान्वये एखादी जमात गुन्हेगार म्हणून घोषित झाल्यानंतर जिल्हा दंडाधिकारी हा स्थानिक सरकारांना, त्याच्या प्रदेशातील गुन्हेगार जमातींचे नियमित रजिस्टर ठेवण्याचे आदेश देतो. तसेच अशा जमातीतील प्रत्येक सदस्यास बोलावून घेऊन जिल्हा दंडाधिकाऱ्याला हवी असलेली माहिती व त्यांच्या बोटांचे ठसे रजिस्टरमध्ये नोंदविले जातात. अशी नोंदणी पोलिसखात्याच्या निर्देशांनुसार होते. अशा रीतीने या जमातीतील सदस्यांचे भवितव्य पूर्णपणे स्थानिक कारभारी (पाटील, पटवारी) व पोलिसांच्या लहरीवर अवलंबून राहते, आणि या अधिकारांचा पोलीस, पोलीस पाटील, पटवारी यांनी दुरुपयोग केल्याचे दिसते.[६१] काही ठिकाणी तर आंधळ्या लोकांनाही रजिस्टर करण्यात आले होते. या संदर्भांत जिल्हा दंडाधिकारी नोंदीत सदस्यांना, पाटील किंवा पोलिस पाटील सांगेल तेव्हा हजेरी देण्यात सांगत असे. आणि ही पाटील मंडळी, या सदस्यांना, रात्री अकरा किंवा पहाटे तीन यासारख्या अत्यंत गैरसोयीच्या वेळी हजेरी देण्यासाठी सांगत होते. खेडे सोडावयाचे असल्यास व मुक्काम

[६१] लक्ष्मण माने, विमुक्तायन, पृ.१२७

बदलावयाचा असल्यास गुन्हेगार जमातींच्या सदस्यांना परवाना घेणे बंधनकारक होते. तसेच दुसऱ्या खेड्यात गेल्यानंतर तेथील ग्राम अधिकाऱ्यांना आपल्या येण्याची वर्दी देणे बंधनकारक होते. या नियमांचा भंग केल्यास जास्तीत जास्त ३ वर्षे कारावास किंवा ५०० रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा देण्याची तरतूद, या कायद्याच्या कलम २२ खाली करण्यात आली होती.

गुन्हेगार जमाती कायदा, १९२४ कलम १६ अन्वये प्रांतिक सरकारांना या घोषित जमातींसाठी सुधारात्मक शैक्षणिक आणि शेती-वसाहती स्थापन करण्याचे अधिकार देण्यात आले होते व अशा वसाहतींमध्ये कोणत्याही घोषित जमातीस, गटास किंवा व्यक्तिस दाखल करण्याचे अधिकार देण्यात आले होते. एवढेच नव्हे, तर अशी शिक्षा गुन्हेगार जमाती सदस्यास त्याच्या पूर्वीच्या गुन्ह्याच्या बाबतीतसुद्धा देता येते. केवळ १ रूपया दंड दिल्याबद्दल लोकांना वसाहतीत दाखल केल्याची उदाहरणे आहेत. कलम २३ अन्वये गुन्हेगार जमातीत मोडणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने (ज्याने इंडियन पिनल कोड शेड्यूल एक खाली पूर्वी एखादा गुन्हा केला असेल) तशाच प्रकारचा दुसरा गुन्हा केल्यास किमान ७ ते १० वर्षांची व तिसऱ्यांदा गुन्हा केल्यास जन्मठेपेची किंवा त्याहूनही कठोर शिक्षा देण्यातच येत होती. हा कायदा एवढा अमानवी व मनमानी कारभाराला प्रोत्साहन देणारा होता व समाजातील तथाकथित पाटील, कुलकर्णी, पटवारी यांच्या हातामध्ये अतिशय कठोर शस्त्र या कायद्याने दिले होते. हे पाहिल्यास ब्रिटिश राज्यकर्त्यांनी या गुन्हेगार वसाहती म्हणजे लहरीनुसार माणसे डांबण्याचे कोंडवाडे करून टाकले होते.

गुन्हेगार जमाती कायद्यातील अनेक तरतूदी या अत्यंत जुलमी, कठोर, वेठबिगार, पिळवणूक आणि लाचखोरीला वाव देणाऱ्या होत्या. स्थलांतरासाठी पास देण्याच्या बदल्यात, सदस्यांना रजिस्टर न करण्याच्या त्यांच्याकडून लाच घेणे किंवा पाटलाच्या शेतात फुकट राबणे, यांसारख्या गोष्टी त्यांच्याकडून करून घेतल्या जात होत्या. या गुन्हेगार जमाती कायद्यातील तरतूदींचा गैरवापर किती बेगुमानपणे होत होता हेच त्यांच्या वरील साक्षीवरून स्पष्ट होते. गावातील मालदार, वतनदार, पोलिस पाटील, पटवेगार हे ह्या कायद्याचा सर्रास गैरवापर करीत होते. गुन्हेगार जमातीतील जे लोक गुन्हे करण्यास सरावलेले होते, असे सराईत गुन्हेगार पाटलांशी किंवा पटेलांशी संगनमत करून तीन-चार दिवस हजेरी-पुस्तक न भरता ठेवत होते.

या तीन–चार दिवसांच्या काळात संबंधित गुन्हेगार व्यक्तीस गुन्हे करताना अटक झाली तरच पाटील त्या व्यक्तीला गैरहजर मांडीत होता. अन्यथा गुन्हेगारास रजिस्टरचा व हजेरीचा उपयोग आपले निर्दोषत्व सिद्ध करण्यास होत होता.[६२]

### १.८.१५ १९३८ चा क्रिमिनल ॲक्ट मॅन्युअल

इ.स.१९३८ चा क्रिमिनल ऍक्ट मॅन्युअल हा एक महत्त्वाचा ऐतिहासिक दस्तऐवज आहे. यामध्ये कायद्यातील विविध संज्ञांचे योग्य ते स्पष्टीकरण घेण्यास मदत झाली आहे. मुंबई प्रांतातील विविध गुन्हेगार जमातींच्या नोटिफिकेशनचा सुसुंगत इतिहास मांडण्यात आला. या इतिहासात नोटिफिकेशनचे दिनांक, शासन आदेश क्रमांक, त्यांना लागू केलेली सेक्शन्स, त्यांची लोकसंख्या, मिळालेली सूट या सर्वांचा तपशिलवार विचार केला आहे. यामध्ये तत्कालीन २८ गुन्हेगार जमातींच्या नोटिफिकेशनचा इतिहास नोंदविलेला आहे. इ.स.१९३९ च्या सुमारास भारतातील समाजसुधारक, राजकीय नेते व विचारवंत यांना गुन्हेगार जमाती कायद्यांची अमानुषता लक्षात आली. रविशंकर व्यास, पंडित जवाहरलाल नेहरू, ठक्करबाप्पा, कम्युनिस्ट पुढारी अशा अनेकांनी हा कायदा रद्द करण्याच्या चळवळीला प्रोत्साहन दिले. इ.स.१९३८ साली मद्रास उच्च न्यायालयाने एका महत्त्वपूर्ण निकालपत्रात म्हटले आहे की, 'गुन्हेगार जमाती कायदा हा आपल्या कायद्यावरील डाग आहे आणि तो नष्ट झाला पाहिजे.' १४ मे १९३९ रोजी तिनेवेल्ली येथे एका न्यायमूर्तींनी या कायद्यास 'मानवतेवरील कलंक' म्हटले आहे. १० ऑक्टोबर १९३९ ला बिहारचे गव्हर्नर एस.एस. अने यांनी या कायद्यातील कलम २३ ला कडवा विरोध केला आहे. देशभक्त कोंडा व्यंकटपुय्या व दिवान बहादूर व्ही. भाश्यम अयंगार या कायदातंज्ञांनी या कायद्यास विरोध केला. त्या वेळच्या न्यायखात्याने मंत्री डॉ. के. एन काटजू यांनी अश्राप बालकांना जन्मजात गुन्हेगार मानणे म्हणजे मानवतेचा व परमेश्वराचा अपमान आहे असे म्हटले आहे. व्ही राघवय्या यांच्या नेतृत्त्वाखाली देशभर या कायद्याविरूद्ध चळवळ सुरु झाली. याचा परिणाम म्हणून इ.स.१९४२ साली कलम २३ मधील जन्मठेपेची शिक्षा रद्द केली. मद्रास प्रांतात इ.स.१९४३ व इ.स.१९४५ मध्ये काही कलमे, १३ ऑगस्ट १९४९ ला असे जाहीर केले होते की, गुन्हेगार जमातींतील सदस्यांना यापुढे गुन्हेगार न समजता मागासवर्गीय

[६२] लक्ष्मण माने, विमुक्तायन, पृ.१२८

समजण्यात यावे व त्यांची तशी काळजी घेण्यात यावी. इ.स.१९४९ ला जेव्हा राज्यघटना देशाला सुपूर्त करण्यात आली तेव्हाच हा कायदा रद्द होणे अपेक्षित होते. कारण घटनेतील कलम १३, १४, १९ डी नुसार देशाचे सर्व नागरिक समान बनले व याच्या विरोधात जाणारे पूर्वीचे सर्व कायदे आपोआप रद्द झाले. कलम १९ जी अन्वये सर्व नागरिकांना देशभर मुक्तसंचाराचे स्वातंत्र्य लाभले हे खरे असले, तरी भारतीय लोकसभेने हा कायदा रद्द करण्यास इ.स.१९५२ साल उजाडले. १९५२ साली गुन्हेगार जमाती कायदा रद्द होऊन त्याची जागा सराईत गुन्हेगारी कायद्याने घेतली.

### १.८.१६ मुंबई प्रांतातील गुन्हेगार जमातींच्या नोटिफिकेशनचा इतिहास

१९९२ साली न्यायखाते क्र. ३४१३ दि. ३ जून १९१२ अन्वये मध्य विभागातील सात जिल्ह्यांत व नंतर गृहखाते क्र.४५३८/२, दि. १६ फेब्रुवारी १९२९ अन्वये सर्व प्रांतात पारध्यांना गुन्हेगार म्हणून घोषित करण्यात आले. इ.स.१९३१ च्या गृहखाते क्र.९३५६–३/२३, दिनांक २३ जून १९३१ अन्वये वरील निर्णय कायम करण्यात येऊन पारध्यांना गुन्हेगार जमाती कायद्यामध्ये सेक्शन १० व ११ लागू करण्यात आले. एक वेगळा प्रयोग म्हणून सर्व नोंदीत पारध्यांना बार्शी व हरेगाव येथे स्वतंत्र वसाहतीत दाखल करण्यात आले. या वसाहती पोलिसखात्याच्या ताब्यात होत्या. इ.स.१९३७ च्या दरम्यान यांचे हस्तांतरण सवर्ण अधिकाऱ्यांकडे करण्यात आले. इ.स.१९३७ मध्ये ९०२ पारध्यांची नोंदणी झाली होती. १९३१ च्या जनगणनेनुसार त्यांची लोकसंख्या १७११८ इतकी होती. ३१ मार्च १९४८ ला ४६५ पारधी वसाहतीत तर ७१३ पारधी मुक्तवसाहतीत राहत होते. १२ ऑगस्ट १९४९ ला ८१ पारधी वसाहतीत, तर इ.स.१९६५ पारधी मुक्तवसाहतीत राहत होते.

### १.८.१७ स्वातंत्र्यानंतर भारत सरकारचे धोरण : हॅबीच्युअल ऑफेंडर्स ॲक्ट १९५९

इ.स.१९५९ साली गुन्हेगार जमाती कायदा रद्द झाला मात्र वारंवार गुन्हे करणाऱ्या व्यक्तींसाठी द बॉम्बे हॅबीच्युअल ऑफेंडर्स ॲक्ट १९५९ हा निर्माण करण्यात आला. या कायद्याने राज्य सरकाराला गुन्हेगारांची नोंदणी करण्याचे अधिकार बहाल करण्यात आले. ह्या कायद्यापूर्वी द बॉम्बे हॅबीच्युअल ऑफेंडर्स रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४७, द सौराष्ट्र हॅबीच्युअल

ऑफेंडर्स रजिस्ट्रेशन ॲक्ट १९५१ आणि द हैद्राबाद हॅबीच्युअल ऑफेंडर्स (रिस्ट्रीक्शन ॲड सेटलमेंट) ॲक्ट १९५४ हे कायदे अस्तित्वात होते परंतु विदर्भ व कच्च करीता स्वतंत्र कायदा नव्हता. सर्व प्रदेशाकरीता एक सारखाच कायदा असावा म्हणून ह्या कायद्याची निर्मिती करण्यात आली. कलम ११ नुसार नोंदणी झालेल्या सराईत गुन्हेगारांना त्यांच्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत करण्याचे निर्बंध घालण्यात आलेले होते.

### १.८.१८ महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर भटक्या–विमुक्तीची स्थिती

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि जुन्या मुंबई प्रांतातील काही भाग गुजराथ तर काही कर्नाटकमध्ये सामील झाला. विदर्भ, मराठवाडा आणि संस्थानी इलाखे महाराष्ट्रात सामील झाले. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर राज्य सरकारने प्रत्येक जिल्ह्याच्या समाजकल्याण अधिकाऱ्यांकडून विमुक्त जमातींच्या लोकसंख्येविषयी माहिती मागवून घेतली होती. त्यानुसार महाराष्ट्राच्या २६ जिल्ह्यांत मिळून विमुक्त–भटक्या व निम–भटक्या जमातींची एकूण लोकसंख्या १५,३२,००० इतकी होती. त्यामध्ये फक्त विमुक्तांची संख्या १०,५२,०३५ इतकी होती. इ.स.१९९० च्या सुमारास 'वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती महामंडळाने' तयार केलेल्या अहवालात भटक्या व विमुक्त जमातींची लोकसंख्या नमूद केली आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील २६ जिल्ह्यांत मिळून ८६,४०५ भटक्या जमातींची व १८,९१,४५५ विमुक्त जमातींची लोकसंख्या होती.[६३] नमूद आकडेवारीबाबत कोणतीच खात्री देता येत नाही असे संशोधकाने नमूद केलेले आहे. कारण या सर्व जमाती एके जागी स्थिर न राहणाऱ्या, आपली जात व धंदा लपवून ठेवणाऱ्या व पांढरपेशा माणसांच्या थाऱ्याला व उभ्या राहणाऱ्या आहेत. त्यामुळे इ.स.१९३१ सालात किंवा त्यानंतरची आकडेवारीबाबत शाश्वती देता येत नाही. एकूणच हा सर्व समााज विखुरलेला आणि आदिवासी पद्धतीप्रमाणे तांड्यावर किंवा टोळ्या करून राहणारा आहे. सध्या महाराष्ट्रात फक्त १३ जमाती आढळतात– (१) बेरड, (२) भामटा, (३) बेस्तर, (४), कंजारभाट, (५) पारधी, (६) कटबू, (७) वडार, (८) कैकाडी, (९) बंजारा, (१०) रजपूत भामटा, (११) रामोशी, (१२) मांग–गारुडी आणि (१३) वाघरी.

[६३] लक्ष्मण माने, विमुक्तायन, पृ.१८१

इ.स.१९५० साली अंत्रोळीकर समितीने विमुक्त जमातीसाठी औद्योगिक, शेती सोसायट्या तसेच पतसंस्था सुरु करण्याची व त्या लोकांना भाग-भांडवलसुद्धा कर्जरुपाने उपलब्ध करून देण्याची शिफारस केली. मुंढवा सेटलमेंट (पुणे) येथे अंत्रोळीकर समितीच्या शिफारशीनंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण यांनी विमुक्तांना काही ठिकाणी सहकारी शेती सोसायट्या स्थापन करून दिल्या. सर्वोदय को-ऑपरेटिव्ह फार्मिंग सोसायटी स्थापन करून त्यांना तीनशे एकर जमीन सामुदायिक शेती सोसायटीच्या नावे मुळा-मुठा नदीच्या काठावरील दिली होती. ही सोसायटी चालविण्यासाठी शिकलेले कोणी नव्हते, सचिव किंवा चेअरमन सारेच अडाणी असल्याने सदर शेती सोसायटी चालली नाही. आपपसांतील मतभेदांमुळे खून, मारामाऱ्या झाल्या आणि ही शेतीसंस्था उधळली गेली. इ.स. १९८८-८९ पर्यंत ही स्थिती राहिली. शासनाने सदर जमीन पुणे शहरातील गुरांच्या गोठ्याला देऊन टाकली. समाजातील काही नेत्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री मा. ना. शरदरावजी पवार यांच्याकडे गाऱ्हाणे मांडले. त्यांनी लक्ष घालून सदर जमिनी पुन्हा या सभासदांना देण्याचा निर्णय घेतला व राबवला. १४० एकर जमिनीचे ७/१२ चे उतारे सर्वोदय को-ऑपरेटिव्ह शेती सोसायटीच्या सदस्यांना देण्यात आले. सरकारच्या उदार धोरणांमुळे काही कोटी रुपयांची मुळा-मुठा नदीच्या काठावरची जमीन व्यक्तिगत रीत्या मालकी हक्काने मिळाली आहे.

महाराष्ट्रातील विमुक्त जमाती या सर्व अनादी परंपरा पाळणाऱ्या, स्त्रीप्रधान समाजरचना अंगिकारणाऱ्या आहेत. या जमातींमधील स्त्रिया हा एक अंतमुर्ख घटक आहे. समाजात वावरणारी पुरुषमंडळी अनुकरणाने, भीतीने, प्रतिष्ठेच्या आशेने आपल्या पोशाखात, बोलीभाषेत, परंपरांमध्ये बदल करीत राहतात, परंतु स्त्रिया या आपल्या रूढी, परंपरा, पोशाख, भाषा किंवा इतर गोष्टी सहजासहजी बदलत नाहीत. सर्व जमातींमधील पुरुष लंगोटीवरून धोतरात, तेथून पायजम्यात व आता शर्ट-पँटीमध्ये आले तरी अजूनही स्त्रियांनी आपली केशभूषा व वेशभूषा बदलल्याचे दिसत नाही. आजही बंजारा स्त्रिया आरसे लावलेला, नाणी गुंफलेला पोशाख घालतात, तर वडार स्त्रिया चोळ्या घालत नाहीत. गाडीलोहारांसारख्या अनेक जमाती घर बांधून राहिल्या तरी त्यांच्या स्त्रिया पारंपरिक पद्धतीने घराबाहेरच स्वयंपाक करतात. नवरा तुरुंगात गेल्यानंतर तो सुटून येईपर्यंत पारधी स्त्रिया पालात झोपत नाहीत. इतर समाजाच्या मानाने या जमातींमधील स्त्रिया त्रासमुक्त व स्वावलंबी आहेत. पुनर्विवाह, विधवा विवाह या दोन्ही गोष्टी

सर्व जमातींमध्ये मान्य आहेत. वडार जमातींमध्ये सर्वात जास्त विवाह करणारी स्त्री सर्वांत जास्त आदरणीय समजली जाते. पंचांचे एखाद्या गोष्टीबद्दल एकमत झाले नाही तर तो निर्णय जमातीतील सर्वात वृद्ध स्त्रीवर सोपवला जातो. हिंदू समाजामध्ये पारंपरिक कायद्यांत स्त्रीची साक्ष ग्राह्य मानली जात नाही. मुस्लिम पारंपरिक कायद्यात दोन स्त्रियांची साक्ष एका पुरुषाच्या साक्षीबरोबर ग्राह्य धरली जाते. परंतु विमुक्त जमातींमधील स्त्रियांना आपली बाजू मांडण्याचा पुरुषांएवढाच अधिकार असतो. या जमातीमध्ये हुंड्याऐवजी वधूमूल्याची पद्धत आहे. घटस्फोटित किंवा विधवा मुलीचा तिच्या आईच्या मालमत्तेवर पूर्ण अधिकार असतो. लग्नामध्ये मुलीची आई, आजी व मामा यांचा सर्वात जास्त सन्मान केला जातो. पहिली बायको घरात असताना दुसरी बायको करावयाची असल्यास पंचायतीची परवानगी लागते. बहुसंख्य घरांमध्ये स्त्रियाच कुटुंबाला पोसत असतांना दिसतात.

### १.८.१९ इतर धर्मांबद्दलची मानसिकता

भारतीय समाजामध्ये जातीअंतर्गत उच्चनिचता मोठ्या प्रमाणावर आढळते. भटक्या विमुक्त जमातींचे स्वरूप प्रस्थापित समाजपेक्षा पूर्णतः वेगळे आहे. भटक्या विमुक्त जमाती गाववाड्याच्या आधारे जीवन जगतात. गावगाडा त्यांना कायमचे स्वीकारत नाही. या जमातींमध्ये मोठ्या प्रमाणावर वैविध्य आढळते. भीक मागणे, काम करणे, पशुपालन करणे, भविष्य सांगणे, औषधोपचार करणे, शिकार करणे, प्राण्यांचा खेळ करणे, सोंड घेऊन करमणूक करणे आणि भटकंती हेच त्यांची जीवन असल्याने अर्थार्जनासाठी नव्हे तर पोट भरण्यासाठी त्यांना भटकावे लागते. काही जमातींना गुन्हेगार जमातीचा शिक्का असल्याने इतर समाजाने त्यांना सामावून घेतलेले नाही. भटक्यांना संशयाच्या नावाखाली होणाऱ्या छळाला नेहमीच सामोरे जावे लागते. देशाला स्वातंत्र मिळाले तरी पारंपरिक जातपंचायतीला भटक्यांना सामोरे जावे लागते. पूर्वग्रहांमुळे काम मिळत नाही, भीक मिळत नाही. त्यातून जगण्यासाठी चोरी केली की पुढच्या शिक्षेला सामोरे जावे लागते. शेती नाही, गाव नाही, कायमचा निवारा नाही अशा अवस्थेत भटक्या विमुक्तांना जगावे लागते.

जातिबद्ध गाववस्ती रचना प्रस्थापित झाल्यापासूनच या गावगाड्याबाहेर राहणाऱ्या भटक्या व माजी गुन्हेगार जाती–जमातींना या सामाजिक आर्थिक रचनेत स्थायिक होण्यास

सामंती जातीसमाजातील गावपातळीवरील प्रशासन यंत्रणा आणि तत्कालीन नागरी समाज यांची प्रस्थापित दंडक योजनेचा वापर केला आहे. गावगाड्यातील जातिरचनातमक लोकसंख्या आणि गावगाड्याबाहेरची भटक्या जमातीची लोकसंख्या यांचा सत्ता संतुलनात्मक समीकरण आबाधित राहण्यास प्रस्थापित व्यवस्था आणि जातिसमाजातील अनेक जातीची तसेच भटक्या जाती अंतर्गत नियमन व्यवस्था आणि परस्पर सपोषक कार्य राहिले आहे. उच्च जातीय, शासक, भटक्या व पूर्वीच्या गुन्हेगार जाती–जमातींना गावगाड्याच्या आत स्थानिक न होऊ देण्याच्या कामी समाजातील काही घटक दंडक योजना राबवितात. गावगाड्यापासून भटक्यांची लोकसंख्या सातत्यपूर्ण स्थानांतर्गत अवस्थेत ठेवण्याच्या कामी जातिय प्रशासन व्यवस्था आणि जातीय उतरंड व्यवस्था नियंत्रक भूमिका बजावते. शूद्रातिशूद्र श्रमिक जाती गावस्तरीय रचनेत भटक्या जमातींना स्थायिक हिस्सेदारी देण्याचे नाकारतात. मध्ययुगीन कालखंडात भटक्या जमातींना गावगाड्यात सामावून घेण्यास, त्यांच्या श्रमशक्तीचा विनियोग जातिव्यवस्थापक गावगाड्यात करवून घेण्यास जातिव्यवस्था अवकाश निर्माण होऊ देत नाही असा सामाजिक इतिहास साक्ष देतो. शेती, बलुतेदारी, शेतमजूर आदी गावगाड्यातील श्रमकार्य शूद्र शेतकरी, बलुतेदार जातिमध्ये संरचनात्मक झालेले दिसते.

शिक्षणामुळे काही लोकांमध्ये परिवर्तन झाले असले तरी हे प्रमाण बोटावर मोजण्याइतके आहे. भटक्या विमुक्तांच्या आजच्या प्रश्नांचे स्वरूपही भीषण आहे. खेड्यात काम मिळत नाही, गुन्हेगारासारखे जीवन जगावे लागते. त्यामुळे शहरात स्थलांतरित व्हावे लागते. शहरातही कायमस्वरूपी घर मिळत नाही. झोपडपट्ट्यातून राहावे लागते. कुठे गुन्हा घडला की संशयित म्हणून सर्वप्रथम पोलिसांची नजर पारधी जमातींकडे जाते. पुरेसे शिक्षण नसल्यामुळे नोकरी मिळत नाही. शिक्षणाकडे हा वर्ग अनिच्छेने पाहतो. शिकलेली पिढी जमातीपासून तुटून पांढरपेशी होते.

### १.९ पारधी महिलांची सामाजिक जडण–घडण

पारध्यांचा बाप जर दारु पित असेल तर त्याची पोर देखील याचे अनुकरण करतात. पारध्याची बाई आपल्या दिराबरोबर शरीर संबंध ठेवत असेल तर तिची मुलगीही आईच्या पाऊलावर पाऊल टाकते. पारधी समाजात आई–बापाचा कोणताही संस्कार नसलेली व

शिक्षणाचा अभाव असलेली मुले वाह्यात वागतात. या समाजात जन्माला आलेली एक–दोन वर्षाची पोर सुद्धा आपल्या जन्मदात्यांना शिव्या देतात, कधी–कधी मारहाण करतात. ही पोरं ज्या समाजात वाढतात, तो समाज हा जंगली प्राण्यासारखा संस्कारहीन व अज्ञानी असल्यामुळे त्या समाजातील पिढीही तशीच अडाणी, कोणताही संस्कार नसलेली, जन्मदाते आई–वडील, शेजारी, वडीलधाऱ्यांचा आदर करत नाहीत. म्हणूनच या समाजात सख्या बहिणीकडे व जन्मदात्या आईकडे वासनेच्या दृष्टीने पहातात. पारधी समाजातील पुरुषांच्या दृष्टिने आई–असो की, बहिण केवळ मादी असते. या मादीला केवळ भोगायचे असते असेच लहान–वयातील संस्कार असल्यामुळे पारध्यांचा आठ–दहा वर्षाचा शेंबडा पोरगा बायको करून दे म्हणून आई–बापाला भांडत असतो. रानातील जनावरं जशी नर मादीतला फरक जाणव नाहीत त्यांना कोणतेही नाते नसते, तसेच पारधीही त्याच जनावराप्रमाणे वागत असतात. याला कारण ही त्यांचे जन्मदाते आई–वडिलच असतात. कारण वयात आलेल्या पोरा–पोरीसमोर आई–बापाचा दिवसा ढवळ्या प्रणय क्रिडांमध्ये असतात. ते अश्लिल दृश्य पाहून पालातल्या मुला–मुलींच्या भावना उफाळून येतात. म्हणूनच पारधी समाजाती पंधरा वर्षाचा मुलगा नवरा होतो, आणि चौदा–पंधरा वर्षाची पोरगी नवरी होऊन दोन–तीन लेकराची आई बनते. पारधी समाज त्यामुळेच असुरक्षित आहे. शिक्षित झालेला समाज सोडला तर आजही संपूर्ण समाज जंगली आदिमानवा सारखाच आहे. आदिमानवाने काळानुरूप स्वतःमध्ये बदल केला, पण पारधी समाज स्वतःच बदलायला तयार होत नाही.[६४]

### १.१० पारधी महिलांची सांस्कृतिक जडण घडण :–

### १.१०.१ जीवनशैली, पेहराव, राहणीमान :–

पारधी समाजात शिक्षणाची कमतरता, दारिद्र्य असल्याने आणि सतत भटकंती करत असल्याने आर्थिक परिस्थिती आणि सामाजिक स्थितीनुसार स्वतःची स्वतंत्र जीवनशैली आहे. महाराष्ट्रातील खानदेशातील पारधी स्त्रिया काचेच्या बांगड्या व काळ्या मण्यांच्या माळा वापरतात. गळ्यात मंगलसुत्र, कानात बाळ्या व नाकात नथणी तर पायाच्या बोटात जोडवे घालतात. दागिने पितळचे काचेच्या मण्याचे असते. कर्णभूषणे घालण्याची फार हौस असते.

[६४] संतोष पवार, पारध्यांची जापंचायत, औरंगाबाद, पृ.५५

आर्थिक स्थिती हालाखीचे असल्यामुळे सोन्या–चांदीचे दागिने फारसे दिसत नाही. जो नोकरदार वर्ग आहेत त्यांच्याकडेच फक्त सोन्या–चांदीचे दागिने आढळून येतात. पारधी स्त्रिया दागिण्यांपेक्षा गोंदणाला अधिक महत्त्व देतात. पूर्वी कपाळ, गाल, हनुवटी व मनगटावर, हातावर गोंदणं काढतात. सध्या ही पद्धत हळूहळू कमी होत चालली आहे.

### **१.१०.२ अस्पृश्यता (Untouchability)**

सवर्ण समाज पारधी समाजाबाबत अस्पृश्यता पाळत असल्याचे दिसून येते. पारधी समाजाला खालच्या दर्जाची वागणूक दिली जाते. पारध्यांचा स्पर्श देखील सवर्ण समाज सहन करत नाही. दैनंदिन जीवनात हा अनुभव पारधी समाजाला तर येतोच. परंतु प्राथमिक तथ्य संकलनामध्ये असे दिसून आले की, पारधी समाजाला इतर समाज जवळ करत नाही, इतकेच नाही तर रुग्णालयात गेल्यानंतर तेथे त्यांना स्पर्श देखील करत नाही. या समस्यावर प्रकाश टाकण्यासाठी भारतातील अस्पृश्यतेची संकल्पना समजून घेणे महत्त्वाचे आहे. भारतामध्ये जातीव्यवस्थेच्या पलीकडे, जातीपेक्षा भयानक असणारा रोग म्हणजेच अस्पृश्यता. म्हणून जातीचा उगम, विकास व वैशिष्ट्यांचा अभ्यास केल्यानंतर अस्पृश्यता म्हणजे काय हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे. अस्पृश्यता याला इंग्रजीमध्ये Untouchability म्हणतात. याचाच अर्थ स्पर्श न करुन घेणे होय. भारतामध्ये जातीव्यवस्थेमध्ये सर्वात कनिष्ठ मानला गेलेला समाज अस्पृश्य म्हणून ओळखला जातो. शुद्रामधील सर्वच जाती अस्पृश्य नाहीत. कारण शुद्राचे निर्वासित व अनिर्वासित असे दोन प्रकार पडतात. त्यापैकी ज्यांचे भोजन केलेले पात्र धुतल्यावर त्रेवणीकास चालते ते अनिर्वासित शुद्र होत व ज्यांचे चालत नाही ते निर्वासित शुद्र होय. अस्पृश्य जाती या निर्वासित शुद्र होत म्हणून त्या अस्पृश्य जाती होय हे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, अस्पृश्यतेचा उगम तीन कारणातून झाला आहे. ते पुढीलप्रमाणे– १. अस्पृश्य समाज हा पूर्वकाळी पराभूत झालेल्या टोळयातून फुटून वेगळा पडलेला अवशेष (Broken Man) आहे. २. ब्राह्मण समाजाने बौद्ध धर्मियांशी जो झगडा केला त्या शत्रुत्वातून अस्पृश्यतेचा जन्म झाला. ३. अस्पृश्याने गोमांस भक्षण करने व सोडल्याने

अस्पृश्यता पक्की करण्यात आली. कारण गोमांसास धार्मिक पापाचे रुप देण्यात आले.[६५]

त्याचप्रमाणे अस्पृश्यतेविषयी अर्थ सांगण्याचा अनेक विचारवंतानी प्रयत्न केला असून त्यांची मते पुढीलप्रमाणे आहेत–

१) अस्पृश्यता ज्या रुपात आज हिंदू धर्मामध्ये प्रचलित आहे ती ईश्वर आणि मनुष्य या दोघांच्याही विरुद्ध असून ही समस्या निव्वळ विषाप्रमाणे आहे. जी हिंदू धर्माला गिळंकृत करीत आहे, असे मत महात्मा गांधी यांचे आहे.

२) ज्यांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक शोषण केले जात होते त्यांना महात्मा जोतीराव फुले यांनी अस्पृश्य म्हटले आहे.

३) हिंदूमधील अस्पृश्यता ही एक विचित्र घटना असून जगामधील दुसऱ्या भागात मानवतेने आजपर्यंत कधीच या सस्येचा अनुभव घेतला नाही, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

४) कोणत्याही सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय कारणामुळे एखाद्या वर्गाला उच्च मानून, दुसऱ्या वर्गाला अतिशय खालच्या दर्जाचे स्थान देऊन त्यांना सामाजिक, राजकीय व आर्थिक अधिकारांपासून वंचित ठेवणे व त्यानंतर मानवतेला फारकत देऊन निम्न वर्गाला स्पर्श करण्यास, पाहण्यास किंवा बरोबरीने बसण्यास अयोग्य घोषित करणे म्हणजे अस्पृश्यता होय.[६६]

अस्पृश्यांची सर्वच व्यवहारीक पातळीवर अडवणूक केली जात होती. महात्मा फुले यांच्या चिंतनात अस्पृश्य हे एकेकाळी राजघराण्याचे वंशज असल्याचा निष्कर्ष निघतो. आर्य आणि आर्यत्तर अशी स्पष्ट मांडणी करून महात्मा फुले अस्पृश्यता ऐतिहासिक परंपरेचा वारसा निर्देशित करतात. आर्य हे खैबर खिंडीच्या मार्गाने भारतात आले, ते मुळचे इराणी असून

---

[६५] भोसले एस. एस. (१९७४), सांवत शिवाजी– कर्मवीर वी. रा. शिंदे जन्मशताब्दी स्मृतीग्रंथ, पृ.११५

[६६] काचोळे दा. धो. (१९९८), भारताच्या विघटनात्मक समस्या, कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद, पृ.१०२,१०३)

भारतभूमीवर त्यांनी आपले अस्तित्व निर्माण केल्याचे मतही महात्मा फुले यांनी मांडलेले आहे.[६७]

अस्पृश्यतेचा जन्म इ. स. पूर्व ६०० मध्ये झाला असल्याचे मत आहे. कारण चिनी प्रवाशी युआन त्संग इ. स. पूर्व ६२९ मध्ये भारतात आले होते. भारतामध्ये त्यांचे १६ वर्ष वास्तव्य होते. त्यांनी येथील लोकांच्या चालीरिती आणि रुढी यांची व्यवस्थितपणे नोंद केलेली आहे. ते येथील शहराबाबत असे लिहितात. की, शहराभोवतालच्या भिंती उंच व रुंद असून रहदारीचे रस्ते अरुंद व निमुळते आहेत. चांभार, खाटीक, कोळी, झाडुवाले यांच्या वस्त्या ओळखता याव्यात म्हणून त्या वस्त्यावर विविध चिन्हे उभी केलेली आहेत. त्यांना नरमाईने जावे लागते. म्हणून त्या काळी अस्पृश्यता होती हे स्पष्ट होते. वरील स्पष्टीकरणावरुन अस्पृश्यतेचे मूळ आर्यपूर्व संस्कृतीत व अस्पृश्यतेचे मुळ आग्नेय आशियातील बेटात असावे. अस्पृश्यता इ. स. पूर्व ६०० मध्ये भारतात निर्माण झाली हे सिद्ध होते. अस्पृश्यता आणि जातीसंस्था यांचा अतुट असा संबंध आहे. जाती म्हणजे सतत होणाऱ्या या विभाजनाची क्रिया या संकल्पनेचा आधार घेऊन मानववंश शास्त्रज्ञांनी जातीचा विचार केला आहे. या संकल्पनेचे प्रसिद्ध पुरस्कर्ते प्रा. जी. एस. घुर्य यांच्या मते, भारतातील जातीसंस्था व अस्पृश्यता ही इंडोआर्यन संस्कृतीतील ब्राह्मण अपत्य आहे. या अपत्याचे संगोपन गंगा यमुनेच्या खोऱ्यात झाले व नंतर त्याचे देशाच्या इतर भागात प्रसरण झाले.

अस्पृश्यतेचा विचार करीत असतांना याची निर्मिती जातीसंस्थेमधून झालेली आहे. म्हणजेच उत्तर वैदिक काळात जातीची बंधने कडक होत गेली. अस्पृश्यता किंवा अतिशुद्रांचा जन्म झाला. विविध स्मृतीमध्ये अतिशुद्र किंवा अस्पृश्यतेविषयी विचार मांडले आहेत. मनुस्मृतिमध्ये यांचे घर गावाच्या बाहेर हसून त्यांची संपत्ती गाढवे व कुत्रे असतात. ते मेलेल्या जनावरांची कातडी कापडे म्हणून वापरतात. लोखंडाचे अलंकार वापरतात. त्यांना कसल्याच प्रकारच्या धार्मिक कार्यामध्ये भाग घेता येत नाही. संध्याकाळी उशीरा त्यांना राज्यांच्या परवानगीशिवाय संचार करता येणार नाही, असा नियम होता. अस्पृश्यतेच्या संदर्भात थोर

[६७] कीर धनंजय, मालशे स. ग. (१९६९), महात्मा फुले समग्र वाङ्मय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.२८

समाजसुधारक वि. रा. शिंदे असे म्हणतात की, भारतीय अस्पृश्यता ही आग्नेय आशियातील देशातून आर्यपूर्व संस्कृतीमध्ये दक्षिणेकडे प्रथम आलेली असावी. कारण पूर्वी दक्षिण हिंदुस्थानचा समुद्र मार्गाने आग्नेय आशियातील देशाशी संबंध असला पाहिजे.[६८]

अस्पृश्यांना पशुतुल्य जीवन जगावे लागत होते. याविषयी डॉ. मुर त्यांच्या ओरिजनल संस्कृत टेक्स्ट या ग्रंथात म्हटले आहे की, शुद्रातिशुद्राच्या बाबतीत पेशवाईत जेवढी क्रुरता लादली तेवढी क्रुरता मानवी इतिहासाच्या कुठल्याही कालखंडात अस्तित्वात नव्हती. मुर यांनी आपले संपूर्ण जीवन हे सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा वेध घेण्यासाठी घालविला असल्यामुळे त्यांचे हे संशोधन नाकारता येत नाही. म्हणून या काळातील अस्पृश्यांची दयनीय अवस्था, सामाजिक अधिकार नसलेले जीवन त्यामधून होणारी मानसिक व भावनिक कोंडी इत्यादींचा पुरावा पेशवाईत मिळतो.[६९]

'दुर्बल घटकांच्या हितरक्षणाची घटनात्मक' समाजातील दुर्बल घटक विशेषतः अनुसूचित जाती–जमाती यांच्या सामाजिक आर्थिक शैक्षणिक हिताचे संरक्षण करणे आणि सर्व प्रकारच्या शोषणापासून त्यांचे संरक्षण करणे ही शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे. आपल्या देशातील जाती आधारित समाजरचनेने फार मोठे नुकसान केले आहे. सुरुवातीला व्यवसायावर आधारित अशी ही व्यवस्था कालांतराने जन्मावर आधारित झाली आणि प्रत्येकाला जात चिकटली ती कायमचीच या व्यवस्थेने समाजात एक उतरंड निर्माण केली. या अनिष्ठ प्रथेचे समुळ निर्मूलन करण्यासाठी अनेक महारपुरुषाने कार्य केले आहे. या अनिष्ठ प्रथेमुळे निर्माण झालेली सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विषमता दूर करण्याचे प्रयत्न शासन, प्रशासन सामाजिक समतेच्या माध्यमातून कार्य करते. लोककल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी घटनात्मक कर्तव्य व जबाबदारीच्या माध्यमातून राज्यघटनेच्या कलम ४६ मधील तरतूदीनुसार समाजातील दुर्बलतेवर वर्ग, विशेषतः अनुसूचित जाती आणि जमाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक आणि आर्थिक हितसंवर्धन करणे सामाजिक अन्याय व सर्व प्रकारच्या शोषणांपासून संरक्षण करणे हे प्रत्येक घटक राज्याचे कर्तव्य ठरविण्यात आले आहे. यासाठी विविध प्रकारच्या

---

[६८] जाधव व्रि तु. (१९८४), महाराष्ट्राचा महार, सुगत प्रकाशन, नागपूर, पृ.४०

[६९] मंगुडकर मा. प., वि. रा. शिंदे लेखन संग्रह, पृ. १४

योजना राबवून त्याची प्रभावी अंमलबजावनी आणि अर्थातच त्यासाठी पुरेशा निधी दिला जात आहे. महाराष्ट्रात सामाजिक न्यायाची संकल्पना खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात आली आहे. सामाजिक न्यायाचा अर्थसंकल्प प्रत्यक्षात आला आहे.[७०]

अस्पृश्यता आणि तद्जन्य भेदभाव यामुळे अनुसूचित जाती–जमातीचे फार नुकसान होते. Civil Right Protection Act 1955 या नागरी हक्कांच्या संरक्षण देणाऱ्या आणि Prevention of Atrocities Act 1989 या अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या आधाराने गुन्हाची नोंद झाली आहे अशा नागरी हक्कांच्या उल्लंघनामध्ये अनुसूचित जातींना विहारीवर किंवा नळावर पाणी भरण्यास मनाई करणे, मंदिरात हॉटेलात, उपहारगृहात, सार्वजनिक आंघोळीच्या जागी तसेच सार्वजिक रस्त्यावर वावरण्याला मनाई करणे अशा गुन्हांचा समावेश होतो. एवढे कायदे होऊन देखील अस्पृश्यता आणि सामाजिक भेदभाव आजही खूप मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे, शासकीय माहितीनुसार इ.स.१९८१–२००० या काळात अनुसूचित जातीवर इतर समाजाकडून झालेल्या अत्याचाराच्या नोंद झालेल्या घटनाची संख्या ३,४५,९४५ इतकी आहे, या दरम्यान दरवर्षी लहान मोठे गुन्हे आणि दलित वरील अत्याचाराचे गुन्हे सरासरी २२,३७१ घडले होते, इ.स.२००० सालामध्ये हिंसेच्या आणि अत्याचाराच्या घडलेल्या घटनांचा तपशील ४५६ खून, ३२९८ गंभीर दुखापत करणे. २६० जाळपोळीच्या घटना, १०३४ बलात्काराच्या घटना आणि १,१८,६६४ इतर स्वरुपाचे गुन्हे असा आहे. इ.स.२०१४ च्या अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार न्यायालयात सुनावणी झालेल्या एकूण खटल्यापैकी केवळ ६ ते ७ टक्के गुन्ह्यात आरोपींना शिक्षा सुनावण्यात आली आहे. ह्या गुन्ह्यात आरोपीची निर्दोष मुक्तता झालेल्या खटल्याचे प्रमाण ९१ ते ९३ टक्के आहे. एका संशोधनानुसार इ.स.२०१४ मध्ये ८ टक्के, इ.स.२०१३ मध्ये ७ टक्के इ.स.२०१२ मध्ये ६ टक्के या खटल्यात गुन्हेगारांना शिक्षा झाली आहे, इ.स.२०११ मध्ये ९२ टक्के, इ.स.२०१२ मध्ये ९३ टक्के, २०१३.९१ टक्के, इ.स.२०१४ मध्ये ९१ टक्के खटल्यातील आरोपी निर्दोष मुक्त झाले. इ.स.२०११ ते २०१४ या चार वर्षात ५०२७ खटले आणि नव्याने दाखल झालेले

[७०] चव्हाण पृथ्वीराज, लोकराज्य– मार्च २०१३ पान ०६, प्रकाशन–माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

५२२६ असे एकूण १०२५३ खटले न्यायालयात दाखल झाले होते. त्यापैकी ३२४५ खटल्यांची सुनावणी पूर्ण झाली आहे, अशा अनेक स्वरुपात दलितावर अत्याचार अन्याय होत आहेत.[७१]

### १.१०.३ लोकगिते :–

पारधी समाजात सण, उत्सव साजरे करण्यासाठी देवी–देवता आराधना करण्यासाठी स्वतंत्र लोकगिते आहेत. यातील काही गाणी पुढील प्रमाणे–

देवीचे गाणे–

चला बायानो मला देवीला जायाच

तुळजा देईच देवूळ डोळ्याण बघायचं

ही गाणी देवा धर्माची गाणी.

लग्नाच गाण–

धोबीचे धोबर गिरणा उजाल लेकर कपेडे

थेरे कपडे परंगाचे छोडो के जियोरे

सायरे बंगला नबंग बंग ले, छे, बागु मोरे एतोनी,

घोडा अण घोडी जेवुत झेडो सायबा (जुन्या पद्धतीचे हे गाणे हाय)

हळदीचे गाण–

जिमोरे जिलो, हळदी ने छे तेशारी मंडप शियक

शियल शियक तारा गर्मी वाड तारा मंडीर शिवस

निळोरे निळे हालदीचे चोघों

हळद कालवताना ते हळदीच्या वेळी म्हणतात.

### १.१०.४. रुढी–परंपरा

पारधी समाजात पाळण्यातचं गुडघ्याला बांशिंग बांधण्याचा नियम असल्यामुळे कमी वयातील मुले–मुली ही नवरा–नवरी बनतात. वाईट गोष्टी तात्काळ स्वीकारणे आणि चांगल्या गोष्टीला लाथ मारणे ही पारध्यांची फार जुनी परंपरा आहे.

---

[७१] सुखदेव थोरात, प्रशांत नेगी (२००७) : महाराष्ट्रातील सामाजिक भेदभाव, नागरी हक्कभंग, आणि अत्याचार, (IIDS-Delhi), सुगावा प्रकाशन, पुणे, पृ.२०–२१

पारधी समाजातील स्त्री किंवा पुरुषाने बाहेर काही अनैतिक व्यवहार केला असल्यास देवाचा नवस फेडायच्या अगोदर पाच–दहा रू. मांगाच्या हातात दिल्यास ते पाप देव धुवून काढतो. किंवा देवाच्या भक्ताचा गुन्हा माफ करतो अशी जगावेगळी पारधी समाजात समज आहे.

पारधी समाजात भरपूर हुंडा देण्याची परंपरा आहे. हुंडा देऊन मुलीसमान पोरी बरोबर लग्न करणे, हुंड्यासाठी आपल्या पोरीला अनेक पुरुषांना विकणे, देव–धर्मांच्या नावाखाली रेडे–बकऱ्याचा बळी देणे, स्वतःजवळ पैसा असूनही दुसऱ्याला फसवण्यासाठी कटकारस्थान करणे. गुंठा–दोन गुंठे जमीन घेऊन स्वतःचे घर बांधून एक ठिकाणी न राहाता, जंगलातल्या जनावराप्रमाणे नुसते रानोमाळ भटकत राहाणे, सतत ऐतं खाण्याची सवय असल्यामुळे चोऱ्या–दारोडे टाकणे, शिक्षणाच्या एवढ्या सोई सवलती असताना त्यांना शाळेत न पाठवणे, पालातल्या मुला–मुलींचे लहान वयात लग्न लावून देणे, लहान वयापासूनच दारू–गांजा, बिडी, सिगारेट, तंबाखू, गुटखा अशा व्यवसान गुरफटून जाणे, स्वतःची बायकोजवळ असतानाही दुसऱ्याच्या बायकोवर, अथवा स्वतःच्या भावजयी, चुलत बहिणी सोबत संसार थाटणे, रोज मांसाहार केल्याने माणूस रागीट बनतो. पारधी सुद्धा प्रचंड रागीट स्वभावाचा असल्यामुळे तो कधी रागाच्या भरात भावाचा, वडिलांचा, आईचा, बहिणीचा, तर दुसऱ्याचा खून करतो.[७२] देवाच्या नावाने मानव रूपी जंगली प्राणी अथवा जंगली हिस्त्र प्राण्याप्रमाणे बकऱ्याच्या नरडीचा घोट घेऊन आपणही जंगली हिंस पशू सारखे आहोत याची जाणीव करून देतात.

पारधी पूर्वी अनेक चालीरीती पाळायचे, महिलांचे आतले कपडे बाहेर ठेवायचे. इतर समाजाचे अनुकरण करून आता सर्व कपडे घरातच असतात. पारध्यांच्या सुनेचे बाळंतपण सुद्धा ते करतात, पूर्वी सुनांचे बाळंतपणाच्या काळात तीला कुणी शिवत नव्हते.

पारधी समाजातील रुढी–परंपरांचा अभ्यास करत असतांना प्राथमिक तथ्य संकलनामध्ये पारधी समाजाचे संघटना प्रमुख श्री अरुण जाधव, (लोकाधिकार आंदोलन सर्व

[७२] संतोष पवार (२०१४), पारध्यांची जातपंचायत, आयडीया पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, पृ. ५५

भटक्या विमुक्तांसाठी) यांची मुलाखत घेण्यात आली या मुलाखतीमध्ये त्यांनी पारधी समाजाच्या रुढी–परंपरा विषयी त्यांचे विचार मांडले, ते पुढील प्रमाणे–

पारधी समाजात पुरुष महिलांना स्पर्श करत नाहीत त्यांच्या हातच खात नाहीत. वेगळी नहाणी असते पण तो सर्व एक भाग आहे. या सर्व बाबी तकलादू आहेत पारधी समाजात महिलांचे कपडे बाहेर ठेवतात त्याचा विटाळ माणला जातो. पण ते एकत्र रहातातच ना? हा मतलबी पणा आहे. पुरुष माणसांना जर पोलीसांनी अटक केल तर सोडवायला बाईच जाते. बायकांचा वापर अशा कोणत्याही कामात करुन घेतात. तरीही तिला दुय्यम स्थान आहे. बाईचा वापर पाहिजे तसा करुण घेतात. इकडे नैतिकतेच्या गप्पा मारायच्या व दुसरीकडे तिला पोलीस स्टेशनला पाठवायचे.

**१.१०.५ प्रथा–**

पारधी समाज ज्या गावात राहतो त्याच गावातील ब्राम्हणाला लग्न लावण्याचा अधिकार असतो. दुसऱ्या गावच्या ब्राम्हणाला लग्न लावण्यचा अधिकार नाही. लग्न लावणाऱ्या ब्राम्हणाला लग्न लागल्याबरोबर वऱ्हाडातील किंवा नवरा–नवरीच्या नात्यातली एखादी व्यक्ती त्या ब्राम्हणाला जोराने सुई टोचते, त्याचे कारण ते लग्न किंवा त्या मुला–मुलींचा विवाह आपल्या साक्षीने लागला किंवा आपण स्वतः लावला ही आठवण ब्राम्हणास रहावी अशी प्रथा आहे.

पारधी समाजातील महिला व पुरुष एका ठिकाणी आंघोळ करीत नाहीत त्यांचे आंघोळीचे ठिकाण वेगवेगळे असते. दोन नान्ह्या असतात. या शिवाय अद्यापही त्यांचे कपडे बाहेर ठेवले जातात. एखाद्या पारधी कुटुंबात जर कोणी पाहुणा आला तर त्याला हॉटेल मधून जेवण मागविले जाते किंवा पाहुण्यांना सुका शिधा देवून त्यांचे त्यांनी करून खायचे असते. पारध्याची जात पंचायत उन्हाळ्यात पाण्याच्या शेजारी भरत असते. गुडीपाडव्याच्या दिवशी जातपंचायतीला सुरुवात होते. पारध्यांच्या देवकार्यात लग्न न झालेल्या पोरीकडूनच सारा स्वयंपाक करून घेण्याची प्रथा आहे. पारध्यांच्या देवकार्याच्या निमित्ताने गावठी दारू वापरली जाते. देवकार्याची पहिली रात्र जागून काढायची परंपरा असल्यामुळे सारेच जण देवाचे गाणे गुण

गुणत रात्र जागून काढतात. पारध्यांच्या अंगात देवी आली की घुमत–घुमत बकऱ्याच्या नरड्याचा घोट घेऊन गरम–रक्त पितात.

एकमेकांच्या बाईच्या हातचे शिवलेले अन्न खायचे नाही. बाईच्या साडी चोळीचे गाठोडं नेहमी पालाबाहेर लांब ठेवावे लागते. लग्न झालेल्या बाईच्या हातचे अन्न खाल्ल्याने अंगात येणारा देव पळून जातो. लग्न झालेल्या बाईने केलेल्या स्वयंपाकाला स्पर्श केला तर तो सारा स्वयंपाक टाकून दिला जातो. बाईची साधी सावलीसुद्धा पारध्यांच्या देवाला खपत नाही. देवकार्यातून आणि जातपंचायतीतून पळणाऱ्यासाठी गाईचे मटन खाऊ घालण्याची प्रथा आहे. वर्षे–वर्षे अंघोळ न करणे, स्वतःजवळ मुबलक पैसा असूनही भीक मागून खाणे, पालातच राहाणे, कितीही बायका करणे.

### १.१०.६ बाळंतपणाचा विधी :–

पारधी समाजामध्ये महिला गर्भवती असल्याचे कळल्यानंतर ती बाळाला जन्म देईपर्यंत विविध प्रकारचे विधी संस्कार केले जातात. कुटुंबामध्ये बाळाचा जन्म होणे ही शुभ घटना समजली जाते शक्यतो महिला स्वतःचे बाळंतपण स्वतः करत, तीला कोणीही स्पर्श करीत नसे, बाळाचा जन्म झाल्यानंतर साखर–पान वाटून आनंद साजरा केला जातो. बाळाच्या जन्मापासून ते त्याचे नामकरण विधीपर्यंत त्या कुटुंबात आनंदोत्सव साजरा केला जातो. घरात मुलगा जन्माला येणे हे भाग्याचे लक्षण मानले जाते. मुलगा हा वंश पुढे चालू ठेवणारा वंशाचा दिवाच समजला जातो. मुलीचा जन्माचा सोहळा त्या तुलनेत कमी असतो. मुलगी ही दुसऱ्या घरची देणं असते. त्यामुळे मुलीला मुलाच्या तुलनेत कमी महत्त्व दिले जाते.

### १.१०.७ सण–उत्सव–

पारधी विविध देवी देवतांचे विशेषतः देवींची मोठ्या उत्साहाने पूजा करतात. त्याचबरोबर नवरात्र, दसरा, दिवाळी, पाडवा, गटार अमावस्या, सर्वपित्री अमावस्या, अक्षय तृतीया इ. सण मोठ्या उत्साहाने साजरे करतात. परंतु देव–देव अतिशय महत्त्वाची समजली जाते, पूर्वी असे सण उत्सव साजरे केले जात नव्हते किंबहुना त्यांना ते माहितही नव्हते.

### १.१०.८ विवाह प्रथा (गोत्र व वंशावळी)

पारधी समुदायामध्ये अंतर्गत विवाहास मान्यता आहे परंतू त्यांची आडनावे पारधी–उपजाती समुदायाशी साधर्म्यच असलेली हवीत. पारधी समुदायामध्ये विवाहासाठी मुलांचे वय १९ ते २२ वर्षे आणि मुलींसाठी वय १६ ते १८ वर्ष असावे असा नियम आहे. पारधी समुदायात लग्नाला 'बिहाय'–'विवाह' म्हणून संबोधले जाते. पारधी समाजात वाटाघाटी करून जुळवलेले किंवा प्रचलित असलेले विवाहाची पद्धत आहे. 'वधु'– नवरी मुलगीच्या किंमतीला 'देज' असे संबोधले जाते. त्या किंमतीची श्रेणी साधारणतः १०० रू. ते २०० रू. पासून होते. हे सर्वतोपरी त्या संबंधीत व्यक्तीच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून आहे. लग्नानंतर मुलीचे राहते घर बदलते ती पितृस्ताक घरात प्रवेश करते. काही विशिष्ट परिस्थितीमध्ये त्याच वस्तीमध्ये नविन घर नव दांपत्याला उपलब्ध करून देण्यात येते. विवाह संपुष्टांत येण्याच्या 'घटस्फोट' प्रक्रियेला पारधी समाजात 'सोडचिट्टी' फारकत घेणे म्हणून संबोधले जाते. विवाह तुटणे/संपुष्टात येण्याची काही कारणे आहेत जसे की, व्यभिचार, समायोजनातील अडचणी आणि हिंसा/हिंस्त्रपणा, मुल न होणे यातील अज्ञान इत्यादी. पारधी समुदायात विधवा पुर्नविवाहास मान्यता आहे. अशा विधवा पुर्नविवाहास 'राधी' म्हणून ओळखले जाते ते मान्यता प्राप्त आहे. पारधी समाजात मुलीचा विवाह एकादाच होतो. पुनर्विवाह असल्यास तीला म्होतूर असे म्हटले जाते किंवा पाटगोरी म्हटले जाते अशा वेळी स्त्रीला फक्त हळद लावून दोन तीन खोबऱ्याच्या वाट्या घेवून विवाह केला जातो. नातेसंबंधामध्ये विवाह जुळवण्याची प्रथेमध्ये आईच्या भावाची मुलगी आणि वडिलांच्या बहिणीची मुलगी वधु–नवरी म्हणून करण्यास मान्यता आहे. विधुर विवाहाच्या बाबतीत विधुर त्याच्या मृत पत्नीच्या लहान बहिणीशी विवाह करण्याची प्रथा आहे. यामध्ये प्रथम पत्नी वंश–किंवा मुल जन्मास घालण्यास असमर्थ असेल तर किंवा प्रथम पत्नी मृत्युपावली असल्यास सदर बाबींमध्ये मान्यता आहे, परंतू मोठ्या बंधुच्या विधवेशी लहान बंधूच्या विवाहास मान्यता नाही, मान्य नाही. सध्याच्या काळात मुला–मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा वर्षे वाढत असल्याचे दिसते.

पारधी समाजात लग्न 'विवाह' हा मुलीच्या वडीलांच्या घरी समारंभ पार पाडला जातो. इतरांपेक्षा काहीशी वेगळी अशी पारध्याची लग्नपद्धती आहे. पारध्यांचा इतर कुणाशी संबंध

आलेला नाही. पारध्यांवर इतर कोणत्याच जातीचा प्रभाव पडलेला नाही. त्यामुळे पारध्यांचे जे रीतिरिवाज आणि ज्या काही रूढी व परंपरा आहेत, त्या त्यांच्या मूळच्याच आणि फार पूर्वीपासून चालत आलेल्या आहेत. पारध्यांच्या पोट प्रकारांमध्ये रोटी–व्यवहार होतात. परंतु बेटी–व्यवहार होत नाहीत. काही पारध्यांमध्ये अगदी लहान वयात लग्ने केली जातात, तर काहींमध्ये मुलगा–मुलगी वयात आल्यावर लग्ने लावली जातात. मुलगा वयात आल्यावर मुलाचा बाप मुलीचा शोध घेतो. त्याचे मुलीच्या बापाला द्याज किंवा वधूमूल्य द्यावे लागते. तरच मुलगी करता येते. मुलाचा बाप मुलीच्या बापाकडे मुलगी देण्याबद्दल विचारणा करतो. जर मुलीचा बाप तयार असेल तर मुलगी दिली म्हणून सांगतो. या वचनावरच विश्वास ठेवण्यात येतो. त्यात कधीच बदल होत नाही. मुलीला वधू मूल्य दिले जाते. कालपरत्वे ही रक्कम परिस्थितीनुसार बदलत आलेली आहे. लग्नासाठी ब्राह्मण बोलविला जात नाही. जमातीमधीलच जाणती व्यक्ती लग्न लावते. पारध्यांमध्ये समान आडनावांमध्ये विवाह होत नाहीत, जसे की– पवार–पवार, शिंदे–शिंदे. मुला–मुलींना नविन कपडे करतात. लग्नाचा दिवस सोईनुसार ठरविण्यात येतो. जो लग्न लावतो त्यास लग्नाच्या विधीची सर्व माहिती असावी लागते किंवा त्याने ती माहिती करून घ्यावी लागते किंवा जर तो विधी करण्यास चुकला तर त्यासही दंड करण्यात येतो. लग्न लावणाऱ्यास सुई, दोरा, हळद, कापूस देतात. पिंपळाच्या किंवा रुईच्या सात पानांचे बाशिंग केले जाते. हे बाशिंग लग्न लावणाऱ्याने तयार करावयाचे असते. लग्नात अक्षदा म्हणून सरकीच्या बिया हळदीत बुडवून फेकतात. मुलीच्या घरी मुलाने जायचे व तिच्या ओटीत पैसे, सुपारी व नारळ ठेवायचे आणि नवरीला खांद्यावर उचलून घेऊन आपल्या घरी आणावयाचे अशी पद्धत आहे. नवरा–नवरीच्या वस्त्राला गाठी मारण्याचा कार्यक्रम होतो. पहिली गाठ कुणी मारावी हे मानाप्रमाणे ठरते व नंतर इतर गणगोत मिळून मुलामुलीच्या वस्त्राला सात–आठ गाठी मारतात. नवरा–नवरीला दोघांच्याही देवासमोर बसविले जाते व तिथे पाया पडावे लागते. हा कार्यक्रम झाल्यानंतर बांधलेल्या गाठी सोडल्या जातात. या वेळी निरनिराळ्या देवांची नावे घेतली जातात. गाणीही म्हटली जातात. लग्नाच्या अगोदर दोन तीन दिवस पूर्वी हळद खेळण्याचा कार्यक्रम होत असतो. गाठ मारण्याच्या कार्यक्रमानंतर मुलाचा बाप नवरा–नवरीला कुंकू लावतो व मुलीचे आईबाप मुलीच्या गळयात काळी पोत बांधतात. या पोत

बांधण्यासाठी विशेष महत्त्व आहे. लग्न लावणारा पंच तांब्या भरून पाणी देवासमोर ठेवतो. नवरा–नवरी देवाला प्रदक्षिणा घालतात. नमस्कार करतात आणि लग्न लावणारा पंच देवापुढे ठेवलेल्या तांब्या प्रथम नवरदेवाला व नंतर नवरीला देतो. नवरा–नवरीने तांब्यातले पाणी चूळ भरून एकमेकांच्या तोंडावर टाकायचे असते. पाणी कोणत्याही परिस्थितीत आपल्या जोडीदाराच्या तोंडावरच पडले पाहिजे याची काळजी घ्यायची असते. पाच चुळा भरून झाल्यावर नवरा–नवरीच्या अंगावर अक्षता टाकल्या जातात व लग्न लावण्याचा समारंभ संपतो.

### १.१०.९ रोटी–बेटी व्यवहार नीति–

पारधी समाजात रोटी–बेटी व्यवहार नीती पाळली जाते. पारधी समाजात इतर समाजातील पुरुषांबरोबर अंतरजातिय विवाह मान्य नाही. पारध्यामध्ये असलेल्या उपजाती प्रकारातील पारधी त्यांच्याशी संबंधित आडनावामध्ये रोटी–बेटी व्यवहार करतात. उदा. पवार–काळे, पिंगळे, चव्हाण, शिंदे यांच्याशी लग्न करतात. गायपारधी हे फासेपारधी यांच्याबरोबर रोटी–बेटी व्यवहार करत नाहीत अथवा उप जमातींमध्ये रोटी–बेटी व्यवहार होत नाहीत. समाजाच्या नीतीच्या विरोधात गेल्यास जात पंचायतीद्वारे त्यांच्या कुटुंबाला जाती बाहेर काढले जाते.

### १.१०.१० मृत्यु विधी–

पूर्वी पारधी समाजात कोणी व्यक्ती मृत झाल्यास त्यास जमीनीत पुरण्याची पद्धत होती. सुतक हे तीन दिवस पाळले जात असे. या समाजात मुंडण करण्याची पद्धत नाही. या समाजात खांदे उतरविण्याची पद्धत आहे. त्यात ज्या–ज्या व्यक्तींनी मृत व्यक्तींच्या तिरडीला खांदा दिला असेल त्यांना हा विधी करावा लागतो.

हिंदू प्रमाणे सध्या पारध्यांमध्येही मृत व्यक्तींचे दहन केले जाते. पूर्वी हे लोक मृत व्यक्तीला जमिनीत दफण करत होते. झोपलेल्या स्थितीत शरीराला दक्षिण दिशेस डोके फिरवून पुरले जाते. दफन करण्यापूर्वी मृत शरीरास अंघोळ घातली जाते. दफण केलेली जागा झाड झुडपांनी वेडली जातात (पसरली) नंतर साखर, तांदुळ, आणि तंबाखू मृतास शांती मिळावी म्हणून पुरण्याअगोदर दफन खड्यामध्ये पुरली जाते. पारध्यांची स्वतंत्र अशी स्मशानभूमी नाही.

पारध्यांना ज्या–ज्या ठिकाणी जमिनी नाहीत त्या ठिकाणी मृत्युविधी करता प्रतिक्षा करावी लागते. स्थानिक जागा देत नाहीत त्यामुळे रात्रीच्या वेळी सार्वजनिक ठिकाणी अंत विधी केला जातो. कधी–कधी चार–पाच दिवस मृतदेह संभाळावा लागतो. अलिकडे गावाबाहेर नदीच्या कडेला मृत व्यक्तीचे दहन केले जाते. दहावे, बारावे किंवा तेराव्या दिवशी मिठाई, भाजीपाला घेवून शिजवून जाळ करून त्यामध्ये टाकले जाते. भाद्रपद महिन्यात सर्वपित्री अमावस्येला पित्रांना जेवायला घालतात. पित्र कावळ्याच्या रूपाने नैवैद्य ग्रहण करतात अशी या समाजाची समजूत आहे.

### १.१०.११ चालीरीती

पारध्यांमध्ये देव–देव करतात. महिलांना देव–देव करण्याचा अधिकार नाही. उपवास केला जातो नवचंडी व शिवरात्र पाळली जाते. लग्न झाल्यानंतर सासरी महिलांचे कपडे घराच्या बाहेर ठेवण्याची पद्धत आहे. त्यांच्या हातचे कुणीही खात नाही, त्यामुळे पारधी महिलांना रोज सकाळी व संध्याकाळी भिक्षा मागून खावे लागते. विवाहित महिलांचा बाट पाळला जातो. सगळ्या चालीरिती पाळल्या जातात. लहान वयात लग्न केले जाते. बाळंतपण महिला स्वत:चे स्वतः करतात, दुसऱ्या स्त्रिया तीला हात लावत नाही. महिलांचे नवरे बाळंतपणाच्या वेळी पायाने महिलांच्या पोटावर दाब देतात. सततच्या बाळंतपणामुळे बहुतांशी महिलांचे गुडघे दुखीच्या त्रासाने त्रस्त आहेत. महिलांचे लग्न झाल्यानंतर त्यांना दुसऱ्याच्या चादरीवर किंवा पांघरूणावर बसायचा अधिकार नसतो, तसे झाल्यास बाट (तुच्छ) मानण्यात येतो. पुरुष व्यक्ती पांघरूण अंगावर घेतात त्यामुळे ही प्रथा पाळली जाते. महिला देखील एकमेकांच्या अंथरूणावर बसत नाहीत. शिवा–शिव चालत नाही. कपडे घरावर टांगले जात नाही. महिलांना अंघोळ संपूर्ण (डोक्यापासून पायापर्यंत) करावी लागते. बाळंतपणात औषध पाणी करत नाहीत. बाळांतीनीला शेक–भाज दिले जात नाही. बाजारीची भाकरी तेल व गुळाच्या मिश्रणात चुरुन खावी लागते. बाळांतीनच स्वत:च्या मुलाला अंघोळ घालते.

### १.१०.१२ उपवास व आराधना :-

पारधी समाजात उपवास व देवाची आराधना करतात. नवचंडी व शिवरात्रीचा उपवास केला जातो.

### १.१०.१३ देवी-देवता-

पारधी हे हिंदू धार्मिय असल्याचे समजतात, ते खूप देवी देवतांची पूर्जा, अर्चा, उपासना करतात. त्यामध्ये 'महादेव', 'शिव', 'गुजराती देवी', 'मारूती', 'मरीआई' आणि 'दुर्गा' इ. त्यामध्ये 'मारुती, मरीबाई आणि दुर्गा' हे गावातील देवता/दैवत तर उर्वरित सर्व देव-देवता हे कुटुंबाचे देवता/दैवत म्हणून पूजा केली जाते.

पारधी समाजाचा देवावर फार विश्वास असतो. कौटुंबिक देवता दैनंदिन जीवनात महत्त्वाची भूमिका पार पाडतात असा समज आहे. प्रत्येक कुळ आडनावावरून स्वतंत्र देव देवता आहेत. पवार कुळास नऊ (९) देत आहेत. घोसला कुळास पाच (५) देव, चौहाण- सात (७) देव, माना- सहा (६) देव, रावत-चार (४) देव, सिंधा-तीन (३) आणि फुलमाळी सात (७) देव आहेत. वेगळ्या प्रसंगी ते निरनिराळे देवांची पूजा-उपासना करतात. उदा. Yasat-यासाट, Deo-देव Salddevi-सालदेवी, Sukatr Devi-सुकातर देवी, Wagidevi-वाघी देवी, Mamli Devi-मामली देवी, Jarimari Devi-जरीमरी देवी आणि Bhimdeo-भिमदेव इ. त्यांच्या मते Yasat Deo-यासाट देव हा त्यांचा सर्वात प्रमुख देव आहे. कधी-कधी ते 'माहूर' आणि इतर आजूबाजूंच्या देवाला जातात.

गावातील देवतांचे पूजा/प्रार्थना 'पुढारी' मार्फत केली जाते. पुढारी हे पूजा/प्रार्थनाच्या सोबत पंचायतीमधून न्यायनिवाडयाचे काम पण करतात. पुढाऱ्यांचे काम भूमिका ही आजार/ रोगराई दूर करण्याचे देखिल आहे. त्यामध्ये मंत्राचा उपयोग करणे (Inchanting) जप करणे (Chanting), भूत बादा-प्रेत आत्माचे घरातून, कुटुंबाला उच्चाटन करणे/बाहेर काढण्याचे काम करतात. ते अंबाबाई-कोल्हापूर आणि पार्वती देऊळ पंढरपूरला जात असतात ते पवित्र तिर्थस्थान म्हणून मानतात. डिसेंबर महिन्यात ते आळंदी येथील संत ज्ञानेश्वरांच्या देवळाला जात असतात.

### १.१०.१४ देवाच्या नावाने साजरे होणारे उत्सव–

पारधी समाजात तुळजापूरची देवी, काळूबाई, कोरष देवी, खोडीयार, पारधन, नवनाथ या देवतांचे उत्सव साजरे केले जातात. देवी देवतांसाठी हल्या (रेडा) व बकरे कापले जातात. देवांचे जागरण रात्रभर केले जाते. महिला रात्रभर जागरण करण्यासाठी देवी गाणे म्हणतात. देव–देव करतांना देवाला गुढी लावतात.

पारधी समाज चिंध्यात बांधलेल्या काळुबाईला खूश करण्यासाठी चोरून आणलेल्या पैशाचे बकरे कापतात. पारध्यांचं देवकार्य म्हणजे पैशाची उधळण आणि पै–पावण्यांची चंगळ असते. पारध्यांच्या देवकार्यात दारू तर असतेच त्याचबरोबर जातपंचायतीचाही फड असतो. एकमेकांपासून दुरावलेले सर्व पारधी देवकार्यात येतात. देवकार्य म्हणजे पारध्यांचा धाार्मिक कार्यक्रम असतो. देवकार्याची पहिली रात्र जागून काढायची परंपरा असल्यामुळे सारेच जण देवाचे गाणे गुण गुणत रात्र जागून काढतात. पारध्यांच्या देवकार्याच्या निमित्ताने गावठी दारू वापरली जाते. पारध्यांच्या पुरुषांप्रमाणे त्यांच्या बायकांही दारू पिऊन झिंगत असतात. देवकार्याकरीता जे अन्न तयार केले जाते ते कुँवाऱ्या पोरीमार्फत केले जाते. एकमेकांच्या बाईच्या हातचे शिवलेले अन्न खायचे नाही. बाईच्या लुगड्याला स्पर्श करायचा नाही. बाईच्या साडी चोळीचे गाठोडं नेहमी पालाबाहेर लांब ठेवावे लागते. चुकून एखाद्या पुरुषाला बाईच्या साडीचा स्पर्श झाला तर त्याला अपवित्र मानतात. लग्न झालेल्या बाईच्या हातचे अन्न खाल्ल्याने अंगात येणारा देव पळून जातो असा पारधी समाजात गैरसमज आजही आहे. त्यामुळे देवकार्याच्या दिवशी लग्न न झालेल्या पोरीकडूनच सारा स्वयंपाक केला जातो. एखाद्या लग्न झालेल्या बाईने केलेल्या स्वयंपाकाला स्पर्श केला तर तो सारा स्वयंपाक टाकून दिला जातो किंवा ज्या बाईने अन्न शिजवलेले असते त्याच बाईला ते अन्न खावे लागते. असा विचित्र गैरसमज आजही पारध्यांमध्ये आहे. बाईची साधी सावलीसुद्धा पारध्यांच्या देवाला खपत नाही. ज्या स्त्रीच्या योनीतून हा पारध्याचा पुरुष जन्मला त्याच जन्मदात्या स्त्रीला पारध्यांचा देव आणि पारधी वाळीत टाकतात. दुसऱ्या दिवशी पालाच्या बाहेर जवळच एक वर्तूळकार गार खोदली जाते. त्या गोलाकार खड्यात पाय बांधून अंगात देवी आणत घुमत–घुमत तोंडातून जंबोल्लय जंबोल्लय असा देवीचा जय घोष करून बकऱ्याच्या रक्ताचे गरम घोट देवी आलेला पारधी

पितो. पारधी समाज आदिवासी असल्यामुळे त्याची वृत्ती ही आदिमानवासारखी आहे. देवाच्या नावाने अघोरी रक्तपात करतांना त्यांना थोडीशीसुद्धा मुक्याप्राण्याची दया–माया नसते. पुरातन काळापासून शिकार करणे हा त्यांचा धंदा असला तरी रक्तपात करण्याची सवय असणाऱ्या पारध्यांना एकमेकांविरूद्ध भांडण करताना, रक्तपात करताना सुद्धा कसलीच भिती वाटत नाही. बकऱ्याच्या काळजाचा नेवैद आणि गुगळयाउद जाळून देवीला भोग चढविला जातो. काळजाचा आणि गुगळ्याउदाचा भोग हाच देवीचा आहार मानला जातो. देवकार्यात पहिल्यांदा पुरुषमंडळीनी अगोदर जेवायचे असते, असा नियम असल्यामुळे पारध्यांच्या महिला पुरुष मंडळीचे जेवण संपण्याची वाट पाहतात. देवकार्यातून आणि जातपंचायतीतून पळणाऱ्यासाठी गाईचे मटन खाऊ घालण्याची प्रथा आहे, त्यामुळे गुन्हेगारांची अडचण होते.

पाण्याची आणि पारध्यांची दुश्मनी परंपरेन चालत आली आहे. देवकार्याच्या काळात अंगालाचं काय, ढुंगनालासुद्धा पाणी लावायचे नाही असा अजब नियम पारध्यांचा आहे. तिसरा दिवस मुंडीचा असतो, देवालासुद्धा दारु पाजावी लागते. पारध्यांचा देवालाही दारू लागते.

### १.१०.१५ महिलांचे स्थान :–

पारधी समाजात महिलांना दुय्यम स्थान आहे. मात्र पुरुषांच्या अनुपस्थितीमध्ये स्त्रीच कुटुंब प्रमुखाची जबाबदारी पार पाडते. सामाजिक निर्बंधामुळे स्त्रीला सामाजिक कार्यात स्थान नाही मात्र पडद्या आडून स्त्री ही मुख्य सुत्रधार असते. अविवाहित मुलींना मानाचे स्थान दिले जाते. देवकार्यात विवाहित महिलांच्या हातचे भोजन वर्ज्य असते, देवकार्याचे भोजन अविवाहित मुलींच्या हस्ते सर्वांना चालते.

### १.१०.१६ कुटुंबव्यवस्था :–

पारधी समाजात विभक्त कुटुंबे मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. या समाजामध्ये बहुपत्नीत्व पद्धत दिसून येते. लग्न करत असतांना स्त्री आणि पुरुषांच्या वयामध्ये तफावत आढळून येते. लग्न करत असतांना मुलीच्या वयाचा विचार केला जात नाही. स्त्रीकडे फक्त मादी म्हणून पाहिले जाते. स्त्रीचा उपयोग फक्त शारीरिक उपभोग व उत्पत्तीसाठीच केला जातो. उपजीविका व पोट भरण्यासाठी कुटुंब विभक्त झालेली आहेत.

पारधी समुदायात कुटुंबाचे प्रकार हे एकत्रित ते विभक्त असा प्रवास करतात. कुटुंबातील सदस्यांची संख्या कमी जास्त होत राहते. मुल कुटुंबातील पालकांचा व थोरा–मोठ्यांचा आदर सन्मान करतात. हा आदर सन्मान मुलतः पालकामधील व वरिष्ठांमधील प्रेम–सन्मान आदर तिथ्यामुळे, देवाण–घेवाणीमुळे ते पुढच्या पिढीस शिकवण मिळते. सुन आणि सासरे यांची कृतीमधील भेट जेवढे शक्य होईल तेवढ्या कमी प्रमाणात कटाक्षाने टाळतात त्याचप्रमाणे जावई व सासुबाई हे नियम पाळतात. वडीलधाऱ्या मंडळीच्या पालन पोषणाची जबाबदारी मुलांची असते. काही काही ठिकाणी दुर्लक्ष झाल्याचे आढळून येते. भांडण–वडील–मुलगा, भावंडा–भावंडामधील तंटा–भांडणे होतात. वडीलोपार्जित संपत्ती ही सर्व भांवडांमध्ये विभागून दिली जाते. मुलांना मुलींपेक्षा अधिक वाटा मिळतो. परंपरागत उत्तराधिकारी (Succession) हा आई–वडिलांचे प्रथम अपत्य (Primogeniture) पुलिंग असावे लागते. कुटुंबा–कुटुंबातील नाते संबंध विविध सण–समारंभ, लग्न किंवा अडचण, दुःखाच्या (मृत्यु) क्षणी वृद्धींगत होतात. सर्व नातेवाईक जवळचे लांबचे अशा सर्व प्रसंगी आप्तेष्टांच्या भेटी गाठी घेतात.

### १.१०.१७ समाजातील भिन्न घटकांचे परस्परसंबंध

भटक्या विमुक्त जमातीं ह्या प्रस्थापित समाजपेक्षा पूर्णतः वेगळ्या आहेत. या जमातीचे वास्तव्य येथील समाजाने नेहमीच गाववाड्याच्या बाहेर ठेवलेले आहे. गुन्हेगारी जमाती म्हणून शिक्का असल्याने इतर समाजाने त्यांना सामावून घेतलेले नाही. गावगाडा त्यांचा स्वीकार करत नाही. भीक मागणे, काम करणे, पशुपालन करणे, खोटे भविष्य सांगणे, औषधोपचार करणे, शिकार करणे, प्राण्यांचा खेळ करणे, सोंग घेऊन करमणूक करणे आणि नेहमीची भटकंती यामुळे हा समाज गावोगाव वन–वन भटकतांना दिसून येतो. प्रस्थापित व पोलिस यांच्या छळाला नेहमीच सामोरे जावे लागते. देशाला स्वातंत्र मिळून आज ७५ वर्षे झाले तरीही या जमातींचा विकास झालेला दिसून येत नाही. प्रस्थापित समाजाने स्वतःच्या स्वार्थासाठी या जमाचा वापर करून घेतलेला आहे. बहुतांशी जमाती स्वतःला हिंदू म्हणून घेतात परंतू प्रस्थापित हिंदूनी त्यांना कधीही जवळ केलेले नाही. देशात शारीरिक श्रम करणाऱ्यांकडे उपेक्षेने, तिरस्काराने पाहण्यात आले आहे. या शारीरिक श्रम करणाऱ्यांकडे बुद्धिमता, चाणाक्षपणा

असतो, यावर पांढरपेशा वर्ग विश्वास ठेवण्यास तयार नाही. या वर्गास तथाकथित प्रस्थापित वर्गाची सहानुभूती फारशी कधी मिळालेली नाही. गावगाड्यापासून भटक्यांची लोकसंख्या सातत्यपूर्ण स्थानांतर्गत अवस्थेत ठेवण्याच्या कामी जातिय प्रशासन व्यवस्था नियंत्रक म्हणून भूमिका बजावते.

## १.११ पारधी महिलांची सामाजिक सद्यस्थिती

### १.११.१ पारध्यांच्या घरांची रचना :–

गावाबाहेर या पारध्यांची वस्ती असते. त्यांच्या झोपड्यांच्या भिंती मातीने लेपलेल्या व सारवलेल्या असतात. पूर्वी घरांच्या छतावर नारळाच्या झावळ्या किंवा गवत वापरत असत. आता मात्र पारंपरिक कौल वापरतात. झोपड्या जवळ–जवळ असतात. झोपड्याचा एक समूह असतो. त्याला पारधी वाडा असे म्हणतात. खानदेशातील लोकांच्या घरांचे निरीक्षण केले असता असे दिसते की, गवताचे छप्पर असलेल्या झोपड्या, मंगलोरी कौल असलेल्या झोपड्या, मंगलोरी कौल असलेली पक्की घरे, लोखंडी पत्र्याची घरे अशी घराची रचना दिसते.

### १.११.२ पारध्यांची आडनावे :–

प्रत्येक पोटप्रकारातील पारधी स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजतात. चित्तापारधी लहान चित्त्यांना पकडून राजाला भेट देत आणि राजाशी संबंध येईल म्हणून स्वतःला राजपारधीही म्हणवून घेतात. पारधी स्वतःला राजपूत वंशातील समजतात. या समुदायात प्रामुख्याने ५ कुळे आढळून येतात. कुळांप्रमाणे काळे, पवार, शिंदे, चव्हाण, भोसले, राठोड, जाधव, सिसोदिया, पिंपळे अशी आडनावे वापरतात. यामध्ये काळे हे सर्वश्रेष्ठ समजलेले जात असून पारधी समाजाचे प्रतिनिधीत्व करतात.

### १.११.३ पारधी लोकांची शारिरीक रचना :–

मानववंश शास्त्रीय शारीरिक वर्गीकरणानुसार महाराष्ट्रातील खांदेशातील पारधी जमाती स्त्री–पुरुषांची शरीररचना सरळ नाक, लहान परिघाचे डोके असलेले उंच कपाळ, मध्यम ते अधिक उंची असलेले काही गौरवर्गीय तर काही सावळे कृष्णवर्गीय, सडपातळ, पण रेखीव बांधा, पिंगट व काळे केस या शारिरीक वैशिष्ट्यनुसार हा पारधी समाज ओळखला जातो.

### १.११.४ पारध्यांचा पोषाख :–

पारधी (फासे) त्यांचे परंपरागत विविध–रंगाचा पोशाख परिधान करतात.फासे–पारधी–पुरुष हा अर्ध नग्न लंगोटी बांधतो (कमरे खाली) आणि पैरण (कमरेवरती), विस्कटलेले केस (पिंजारलेले केस) त्यांचा मुखिया (प्रमुख) पुर्ण धोतर व नेहरू शर्ट (झब्बा) व मोठी पगडी (फेटा) ज्याची लांब शेंडी खालीपर्यंत पाटीवर लटकते, तर आकडे केलेली मोठी मिशी असते.

### १.११.५ प्रमुख अन्नखाद्य पदार्थ (खाद्य जीवन): –

पारधी समाजाचे प्रमुख अन्न घटक 'चपाती', 'भाकरी' ज्वारी, गहू किंवा बाजरीची, त्यांना 'भात' (तांदुळापासून तयार होणारा) खायला आवडतो. परंतू कधी–कधी ते खातात कारण त्याची किंमत त्यांना परवडत नाही. प्रामुख्याने 'डाळी' 'उडीद', 'तूर', 'मसूर', खोबरे वेगवेगळ्या कार्यक्रमात किंवा विशिष्ट वेळी अन्नामध्ये समावेश करतात. ते घरामध्ये चहा पितात. विशिष्ट भौगोलिक भागात उपलब्ध हिरव्या पालेभाज्या ते खातात. ते मांसाहारी देखील आहेत त्यामध्ये कोंबडी, मटन (बकरे, मेंढे), गाय–म्हैस, डुकरांचे मांस आणि मासे विशिष्ट वेळी खातात. खोबरे खाण्याची आवड या समाजात विशेष दिसून येते. पूर्वी ते प्राण्यांची शिकार करायचे त्याचबरोबर मागून आणलेले (भिक्षा) खायचे.

### १.११.६ मद्यपान :

पुरुष प्रामुख्याने विशिष्ट वेळी मद्यप्राशन करतात. ते राहत्या घरी गुळापासून दारू गाळतात (तयार करतात). स्त्रीया ह्या वेळप्रसंगी मद्यपान करतात (फासे–पारधी) ते प्रामुख्याने शिकारी असल्यामुळे विविध पक्षी, प्राण्यांचे मांस स्वतः जवळ बाळगतात. जसे कि, 'कबुतर', 'तीतर' इ. शेंगदाण्याचे तेलाचा वापर जेवण तयार करण्यासाठी तर अन्न शिजवण्यासाठी इंधन (जळण) म्हणून लाकडाचा वापर करतात.

### १.११.७ सामाजिक जीवन व महिला समस्या :–

पारधी समाजात कुटुंब नियोजनाची पद्धत अस्तित्वात नाही. महिलांना स्वतःचे बाळंतपण स्वतःच करावे लागत असल्याने बाळंतपणाच्या कालावधीत त्यांच्या शरिराची होणारी झिज भरून काढण्यासाठी कोणतीही उपाययोजना उपलब्ध नाही. बाळंतपणानंतर स्त्रीला शेकोटी

जवळ जाता येत नाही त्यामुळे बाळंतपणासंबंधी विविध आजारांना त्यांना समोरे जावे लागते. जास्तीच्या बाळंतपणामुळे गुडखे दुखी, पोट दुखी, कंबर दुखी, पाठदुखी, थायरॉईड, पिशवीचा आजार इत्यादी आजार पारधी समाजातील महिलांना जडलेले आहेत. त्यांना सरकारी दवाखान्यात चांगली वागणूक दिली जात नाही. मुलगी उपवर झाल्यानंतर तिचे वागणे बिघडू नये किंवा तीने कोणताही अनुचित प्रकार करू नये, किंवा तिच्या सोबत बलात्कारासारखे प्रकार होवू नयेत म्हणून मुलींचे लहान वयात लग्न लावून दिले जाते. लग्नानंतर स्त्रियांना पुढे शिक्षण घेण्याची प्रथा नाही. शिक्षणाच्या अभावामुळे आरोग्याचे मोठे प्रश्न पारधी महिलांना भेडसावत आहेत. मुलींना शिक्षणच दिले जात नाही. त्यामुळे महिला शिक्षणापासून वंचित राहतात. स्वच्छता व आरोग्याची विशेष काळजी न घेतल्यामुळे साथींच्या रोगांमुळे महिलांमध्ये आजारी पडण्याचे प्रमाण लक्षणीय दिसून येते. पारधी समाजाची आरोग्यस्थिती नेहमी अत्यंत वाईट असते. कॉलरा, जुलाब, मलेरिया, गोवर, निमोनिया, हिवताप, टायफॉईड इ. रोगांचे साम्राज्य पसलेले असते. यापैकी कॉलरा, जुलाब, मलेरिया, गोवर, निमोनिया इ. आजार प्रामुख्याने आढळून येतात. आजार बरा करण्याकरता बहुतांशी घरगुती उपचार केले जातात. बहुतांशी पारधी महिला हात–पाय, गुडघे दुखीचा आजार सांगतात.

पारधी समाजातील महिलांना पुनर्विवाह करण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर रक्कम मोजावी लागते. तेवढा पैसा उपलब्ध होत नसल्यामुळे मुलगी आई–वडिलांना कडेच वास्तव्यास रहाते. स्त्रीने काडीमोड घेतल्यास पुनर्विवाह करण्याकरीता मुलींच्या वडिलांना अतिरिक्त रक्कम मिळते. परंतु विधवा मुलींचा पुनर्विवाह करण्याकरीता मुलींच्या वडिलांना अतिरिक्त रक्कम मुलाला द्यावी लागते.

### १.११.८ जात पंचायतीचा पगडा (न्यायव्यवस्था)

जातपंचायत ही भटक्या–विमुक्तांची न्यायसंस्था समजली जाते. जातपंचायतीच्या प्रमुखास 'पंच', 'तळगे', 'पाटील', 'नायक', 'कारभारी' अशी जमातीपरत्वे नावे आहेत. त्यांच्या मदतीला त्याच समाजातील चार–पाच अनुभवी माणसं असतात. त्यांना जातपंचायतीचे सदस्य म्हणतात. मुख्यपंचाला न्यायाधीशाचा दर्जा असतो. या जमातीवर जात पंचायतीचा पिढीजात

पगडा आहे, त्याने दिलेला न्याय शिरोधार्थ मानतात. पंचायतीला विरोध करण्याचे धाडस कोणी करीत नाही. एखाद्या व्यक्तीचे पंचाच्या निर्णयाने समाधान झाले नाही तर अहमदनगर जिल्ह्यातील 'मढी' हे ठिकाण सर्व भटक्या–विमुक्तांचे उच्च न्यायालय समजले जाते. तेथे भरणाऱ्या जातपंचायतीत सदर व्यक्तीला पंचाच्या सल्ल्याने दाद मागता येते. खाजगी देण्याघेण्याचे व्यवहार, भावकीतली भांडणं, व्यापार, व्यवसायातील देवघेव, किरकोळ कारणावरुन उद्‌भवलेले तंटे, सोईरसंबंधातील अडचणी, चोरीची प्रकरणं, वाटून दिलेल्या गावात न मागता दुसऱ्याच्या गावात मागणे, समाजातील मानमानतुक, गहाणवट व्यवहार, अनैतिक भानगडी अशा स्वरुपाचे तंटे जातपंचायतीत येतात. गुन्ह्याचे स्वरुप व गांभीर्य लक्षात घेऊन दोषी व्यक्तीला शिक्षा दिल्या जातात. एक पैशापासून पाच हजारापर्यंत आर्थिक दंड केला जातो. एक पैसा दंड होणे समाजात नामुश्कीचे समजले जाते. त्याशिवाय जातीबाहेर टाकणे, भावकीला जेवण देणे, काडीमोड असल्यास लग्नाचा खर्च देणे अशा शिक्षा दिल्या जातात. महिलांना त्यांचे पावित्र सिद्ध करण्यासाठी 'जोडवी' (पायांच्या बोटात घालण्याचा अलंकार) गरम करून कपाळावर चटका देणे, तापलेली कुऱ्हाड हातात घेणे, तापलेल्या तेलातून नाणे काढणे या सारख्या शिक्षा दिल्या जातात.

भटक्या–विमुक्त जमाती सतत भटकंती करीत असतात. सततच्या भटकंतीमुळे त्यांना स्थिर जीवन जगता आले नाही. धार्मिक बंधनांमुळे मालमत्ता व धनसंपत्ती यांचा संचयन करता येत नाही त्यामुळे ते दरिद्री राहिले. त्यांचे दारिद्र्य हे नैसर्गिक नसून मानवनिर्मित आहे. स्वतंत्र भारतातही त्यांना अस्थिर, अमानवी जीवन जगावे लागते. याला येथील समाजव्यवस्था कारणीभूत आहे. यासंदर्भात लीनकुमार बावने म्हणतात, ''मनुष्याचा सामाजिक दर्जा त्याला मिळालेल्या नागरीकपणावर, स्वतंत्रतेवर आणि कौटुंबिक संबंधांवर अवलंबून असतो. परंतु भटक्या–विमुक्तांना यापैकी कोणतेच स्वातंत्र्य व नागरिकत्व या देशातील समाजव्यवस्थेने दिलेले नाही.''[७३]

पारधी समाजाची स्वत:ची परंपरागत परिषद अशी त्यांना जात पंचायत म्हणून ओळखले

[७३] लीनकुमार बावने (२००६), 'भटक्यांचा भग्न संसार आणि संस्कृती', द्वि. आ., वर्धा, पृ.५३.

जाते. त्याचे प्रमुख नेते पुढारी म्हणून ओळखले जातात. ही पदे परंपरागत पिढयान–पिढया त्यांना मिळत जातात. काळे (आडनाव) घराण्याचा तो मान त्याच्यासाठी (राखीव) राखून ठेवलेला आहे. उत्तराधिकारी हा आईवडीलांची पुल्लिंग अपत्य असते. परंपरागत पंचायत समुदायाचे तें मिटविण्याचे काम करते. तसेच लहान–सहान तंटे–भांडणे, व्यभिचार आणि समुदायाचे परंपरागत नियम फेडण्यासारखे बाबी वर न्याय–निवाडा करते. पंच रक्कमेच्या स्वरुपात दंड लादतात. पारधी सुद्धा करार पाळतात त्याला ते 'टेकडी' (Tekadi) म्हणून ओळखतात. त्यामध्ये अपराधी व्यक्तीस उकळल्या तेलामधून काही वस्तु हात घालून बाहेर काढण्यास सांगितले जाते. जर त्या व्यक्तीचे हात पोळले, जळले, भाजले तर ती व्यक्ती गुन्हेगार अपराधी आहे असे मानले जाते. असे जरी असले तरी अपराधी व्यक्तीने गुन्हा मानण्यास नकार दिल्यास पंचायतीचे निर्णयास मानले नाही तरी त्यास अपराधी ठरवून त्यावर रोख रक्कमेचा दंड ठोठावला जातो. वाळीत टाकले जाते बहिष्कृत केले जाते.

सद्य परिस्थतीमध्ये पारधी समाज हा काही ठिकाणी स्थायिक झालेले आहेत. आणि वैधानिक पंचायतीच्या अधिपत्याखाली त्यांचे जीवन नियंत्रित आहे. पारधी समुदायातील सदस्य ह्या पंचायतीमध्ये सदस्य म्हणून निवडले जातात.

### १.११.९ आर्थिक व्यवहार (अंतर्गत व बाह्य)

'फासेपारधी' गट फासे–पारधी गटात न येणाऱ्या परंतू इतर पारधी गटासोबत सामाजिक अंतर्गत व्यवहार करत नाहीत, संबंध ठेवत नाहीत. हे पारधी या सर्व पारधी गटांमध्ये स्वतःला सर्वोच्च स्थानी मानतात. जे फासे–पारधी नाहीत ते पारधी गटांमध्ये खालच्या गटातील मानले जातात. कारण त्यांच्या जेवणाच्या पद्धतीमुळे त्या गटांना कमी प्रतिष्ठेचे मानले जाते. पारधी समुदायात प्रमुख आडनावे आहेत जसे कि, चौहान, पवार आणि काळे. पारधी समुदायात 'काळे' हे आडनाव उतरंडीमध्ये सर्वात सर्वोच्च स्थानी आहे.[७४]

---

[७४] People of India (Maharashtra) Vol.XXX-Part 3, General Editor, Singh, K. S. 2004 (Editors) Bhanu, B. V., Bhatnagar, B.R., Bose, D. K., Kulkarni, V. S., Sreenath, J., Anthropological Survey of India, Popular Prakashan Pvt. L. Mumbai, page 1650-54

### १.११.१० उदरनिर्वाहाची साधने

पारधी लोक शिकारी व्यतिरिक्त पाथरवट्याचे काम करणे, जंगलातील वनौऔषधी विकणे, शेतमजूरी करणे, पहारा करणे असे विविध उद्योग हे लोक करतात. महाराष्ट्रातील काही भागातील पारधी पूर्वी व आताही जबरी चोरी व दरोडे हे गुन्हे करतांना दिसून येतात. काही अंशी उदरनिर्वावासाठी पारधी शेतीच्या हंगामात पिके रानात असतांना छोट्या–मोठ्या प्रमाणात कसणे तोडणे, जनावरे पाळणे, छोट–मोठ्या चोऱ्या करण्याचे प्रकार करतात. परंतु आता सद्यस्थितीत मात्र यांचे गुन्हेगारीचे प्रमाण कमी झालेले दिसून येते. दारु विकण्याचा व्यवसाय जास्त प्रमाणात करताना दिसतात, व्यवस्थेमध्ये हाच व्यवसाय योग्य वाटतो. अशा प्रकारे पारधी समाजातील महिलांची जडण–घडण होते.

### १.१२ पारधी महिलांची राजकीय सद्यस्थिती :–

प्रस्थापित राजकीय पक्षांचे पुढारी निवडणूकांच्या वेळेला प्रचार करत असतांना पारधी समाजातील लोकांना आश्वासने देऊन मतदान करून घेतात. परंतु त्यांच्या अडी–अडचणींना उभे राहत नाहीत. प्रस्थापित राजकीय पक्षांचे पुढारी हे पारधी समाजातील जात पंचायतीच्या प्रमुखांना निवडणूकांच्या वेळेला हाताशी धरून स्वत:चा फायदा करून घेतात. महिलांना घरातील लोकांनी सांगितल्याप्रमाणे मतदान करतात, दबावतंत्रास बळी पडतात. निवडणूकांच्या वेळेला आर्थिक, दारु व मासांहारी मेजवाणी प्रलोभणे देवून तात्पुरता मतांचा फायदा करून घेतात परंतु या समाजावर जेव्हा शासकीय यंत्रणेकडून दबाव येतो किंवा सामाजिक कल्याणाच्या योजनांचा फायदा देण्याची वेळ येते त्यावेळी रितसर बाजूला करून जबाबदारी पार पाडत नाहीत. निवडणूकीला उभा असलेला उमेदवार अयशस्वी झाल्यास असे उमेदवार त्यांच्या पैशाची वसूली करण्याकरीता कमकूवत घटक म्हणून पारधी समाजाकडून वसूली करतात. पारधी समाज मतदान करतो, मतदानाविषयी जागृकता आहे. मात्र राजकीय पुढारी समाजातून पुढे आलेले नाहीत. या समाजाला राजकीय आरक्षणाबद्दल पुरेसे ज्ञान व जागृकता नसल्यामुळे प्रस्थापित पक्षातील पुढारी त्यांचा मतदान बँक म्हणून उपयोग करून घेतात परंतु त्या समाजाला राजकीय क्षेत्रात स्थान निर्माण करून देत नाहीत. त्यामुळे या समाजात राजकीय नेतृत्व उदयास आलेले नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व दिसून येत नाही.

### १.१२.१ पारधी महिलांचे गट :-

पारधी समाजामध्ये काही प्रमाणात महिलांचे बचत गट आहेत. परंतु बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण झालेले दिसून येत नाही. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना छोटे-मोठे रोजगार निर्माण करता आलेले नाहीत त्यामुळे बचत गटांचा प्रभाव या समाजावर पडलेला दिसून येत नाही. बचत गटांचे प्रमाण अत्यल्प आहे.

### १.१२.२ पारधी महिलांचे सामाजिक समूह :-

पारधी समाज हा असंघटित व विस्कळीत स्वरूपात स्थलांतरीतांचे जीवन जगत असल्याने सामाजिक संघटन झाल्याचे दिसून येत नाही. एका कुटुंबावर अन्याय झाल्यास इतर कुटुंबे कारवाईच्या भितीने पिडित कुटुंबाला सहकार्य करत नाहीत अथवा समाज या कुटुंबाच्या पाठीशी उभा राहत नाही. महिलांचे सामाजिक समूह नसल्याने कुटुंबाबरोबरच समाजाकडून देखील पारधी महिलांचे शोषण होत आहे. पारधी समाजात मुलींना शिक्षण देण्याची प्रथा नाही. मुलींना शाळेत पाठविले जात नाही. अशिक्षितपणामुळे महिलांना त्यांचे अधिकार अवगत नसल्यामुळे संघटित होत नाहीत आणि अन्यायाला प्रतिकार करत नाहीत. यावरून प्रथम दर्शनी असे दिसून येते की, पारधी समाजातील महिलांची राजकिय स्थिती खूप हालाखीची दुर्लक्षित आहे.

### १.१३. पारधी महिलांच्या शिक्षणाची वाटचाल :-

बंगालमध्ये ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर शिक्षणप्रसाराला सुरुवात झाली. ब्रिटिशांनी मिशनऱ्यांच्या माध्यमातून शिक्षणबरोबरच धर्मप्रसार व प्रसाराच्या कार्याला प्रारंभ केला. 'डेव्हिड हेअर नावाच्या एका ख्रिस्ती मिशनऱ्यानेच कलकत्त्यास पहिली मुलींची शाळा काढली.' त्यानंतर इ. स. १९२४ मध्ये मिस मेरी कुक नावाच्या अमेरिकन ख्रिस्ती मिशनरी बाईने मुलींची शाळा काढली.'[७५] ब्रिटिशांचा हेतू जरी आपले राज्य टिकविणे असा असला तरी त्यांनी शिक्षणाच्या बाबतीत भारतात बरेचसे कार्य केलेले दिसून येते. मुलींना त्याकाळत शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यावेळी खिस्ती मिशऱ्यांनी पहिली मुलींची शाळा काढली पुढे इ. स. १८४८

---

[७५] एन. एस. तांबोळी, व्ही. पी. पवार (२०१०), आधुनिक भारत, इ.स. १७५० ते २००९, निराली प्रकाशन, प्र. आ., पृ.६-११)

पासून स्त्रीशिक्षणविषयक पाऊले उचलली गेली. म. जोतिराव फुले यांच्याप्रमाणेच पंडिता रमाबाई रानडे, ताराबाई शिंदे यांनी स्त्रीशिक्षणासाठी प्रयत्न केले. 'धोंडो केशव कर्वे' यांनी 'हिंगणे स्त्री-शिक्षणसंस्थेची' स्थापना इ. स. १८९६ साली केली. पुढे याचेच रुपांतर इ. स. १९१६ मध्ये 'भारतातील पहिल्या महिला विद्यापीठात' झाले. स्त्रियांसाठी उपयुक्त ठरेल असा मातृभाषेतून शिक्षण व खास स्त्रियांसाठी उपयुक्त ठरेल असा अभ्यासक्रम बनविला गेला. अशा बऱ्याचशा सुधारणा केल्या गेल्या.

अशा विविध समित्यांनी विविध तरतुदी आपल्या अहवालांच्या माध्यमातून केलेल्या होत्या. भारतातील शिक्षणविषयक सुधारणांसाठी केलेले विविध आयोग व त्यांच्या शिफारशी ह्या कमी-अधिक प्रमाणात शैक्षणिक प्रगतीत महत्त्वाच्या ठरलेल्या दिसतात. शिक्षणविषयक परिवर्तनाचा खरा पाया एकोणिसाव्या शतकामध्येच घातला गेलेला होता. हळू-हळू काळानुरुप त्यामध्ये काही बदल हे केलेले दिसतात. ह्या विविध समित्यांनी केलेले कार्य हे निश्चित प्रेरणादायी अशाच स्वरुपाचे आहे. वरील सर्व आयोग हे स्वातंत्र्यपूर्ण काळातील असून त्या काळाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या सुधारणा या खरोखर महत्त्वपूर्ण आहेत. स्वातंत्र्योत्तर काळातही शिक्षणविषयक सुधारणांसाठी बरेचसे आयोग आलेले आहेत. त्यामध्ये 'राधाकृष्णन आयोग- इ.स. १९४९', 'कोठारी आयोग-१९६४-६६' इ. नामोल्लेख करता येतो. प्रस्तुत विभागामध्ये केवळ स्वातंत्र्यपूर्वकालखंडातील शैक्षणिक सुधारणांचा आढावा घेतलेला असून त्यासंदर्भातील आयोगांचा व शिफारशींचा अभ्यास केलेला आहे.

### १.१३.१ स्त्री शिक्षण :-

महाराष्ट्राच्या तसेच भारताच्या विकासात, इतिहासात एकोणिसावे शतक हे महत्त्वाचे मानले जाते. महाराष्ट्रात सुरु झालेल्या इंग्रजी राजवटीमुळे नव्या युगाचा प्रारंभ झाला. सामाजिक जीवनामध्ये हळू-हळू परिवर्तन यायला लागले. समाजाच्या राजकीय, आर्थिक, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनात आधुनिक, वैज्ञानिक, प्रगत व पुरोगामी विचारांचा स्वीकार केल्याशिवाय आपल्या समाजाचा सर्वांगीण विकास होणार नाही याची जाणीव महाराष्ट्रातील इंग्रजीतून नवशिक्षण घेतलेल्या. बुद्धिप्रामण्यवादी व पुरोगामी विचारांच्या सुशिक्षितांना झाली.

इ. स. १८०० ते इ.स.१९०० याकाळात महाराष्ट्रामध्ये स्त्री शिक्षणाबद्दल सतत चर्चा झालेली होती. या काळामध्येच 'स्त्रीशिक्षणाचा' पाया घातला गेला असला तरी त्याचवेळी प्रचंड विरोधही त्यांना सहन करावा लागलेला आहे. मुलींसाठी शाळा निघत होत्या आणि कुटुंबाकडून, समाजाकडून वेगवेगळ्या पद्धतींनी छळ केला जात होता. त्यातूनही बऱ्याच स्त्रियांनी शिक्षण घेतले. 'जोतीबा फुले' यांनी समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी फार मोठे प्रयत्न केले. त्यावेळच्या समाजात विषमता, जातिभेद, अज्ञान, स्त्रीदास्त्र यासारंख्या अनिष्ट प्रथा केवळ धर्मामुळे हदमूल झाल्या असे स्पष्ट होते. याची पाळेमुळे शोधताना आपल्या आ. ह. साळुंखेचे म्हणणे विचारात घ्यावे लागते ते म्हणतात, ''हिंदू संस्कृती ही एकच ईश्वर, एकच प्रेषित आणि एकच धर्मग्रंथ मानणारी अशी एकात्म, एकसंघ संस्कृती नाही.'' ही गोष्ट येथे तिचा गुण वा दोष म्हणून नव्हे. तर तिचे एक खास वैशिष्ट्य म्हणून ध्यानात घ्यावयाची आहे. खरे तर हिंदू संस्कृती हा 'हिंदू' या एकाच नावाखाली वावरणारा अनेक संस्कृतींचा समुच्चय आहे. या अनेक संस्कृती परस्परांपासून केवळ भिन्नच आहेत. असे नव्हे, तर अनेकदा परस्परांच्या विरोधीही आहेत. या सर्वांचा विशिष्ट प्रमाणात समन्वय होऊन सर्वांनीच हिंदू हे नाव धारण केलेले असले, तरी त्यांच्यातील वेगळेपण संपलेले मात्र नाही. आपल्या या वेगवेगळ्या मतांचा त्वेषाने पुरस्कार करणारे असंख्य पंथ, संप्रदाय इ. चा हिंदू संस्कृतीमध्ये अंतर्भाव आहे. सर्वांच्या उपास्य देवता भिन्न, आचारपद्धती भिन्न, तत्त्वज्ञानाने भिन्न अशी स्थिती होती. परंतु इतर बाबतीत आपापले वेगळेपण जपणाऱ्या या सर्व पंथांचे, प्रवाहांचे, एका बाबतीत मात्र बहुतांशी एकमत होते. पुरुषांचे सुख हे साध्य असून 'स्त्री' हे त्या सुखाच्या अनेक साधनांपैकी एक महत्त्वाचे साधन होते. आपल्या संस्कृतीच्या मुळापर्यंत जरी आपण गेलो तर आपल्या लक्षात येते की, स्त्रियांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन हा केवळ 'उपभोग्य' वस्तु अशाच स्वरुपाचा आहे. इतर अनेक बाबींमध्ये भेद असलेले आपणास दिसतात. मात्र 'स्त्री' ला पुरुषांच्या तुलनेने कमी महत्त्व देणे याबातीत सर्व ठिकाणी समान परिस्थिती असलेली दिसते पुरुषप्रधानवृत्तीचा जयजयकार अन् स्त्रिया म्हणजे त्यांच्या सुखातील केवळ 'साधन' असा विचार अगदी प्राचीनही काळीही केला केलेला दिसतो.

स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने कधी आल्या तर त्यांना बरोबरीचे हक्क दयावे लागतील ही भीती त्यावेळीही होती. त्यामुळे कदाचित विरोध कायम राहिला. ज्यावेळी ब्रिटिश भारतात आले त्यापूर्वी स्त्रिया शिकत होत्या पण फक्त उच्चभ्रू घरातील स्त्रियांना तो अधिकार होता. इ.स. १८२४ साली मुंबई शहरात अमेरिकन मिशन सोसायटीने पहिली मुलींची शाळा स्थापन केली. इ.स. १८२९ पर्यंत नऊ शाळा मुलींसाठी सुरु झाल्या होत्या. आणि त्यामध्ये ४०० मुली शिकत होत्या. इ.स. १८३१ मध्ये अहमदनगरमध्ये मुलींसाठी शाळा अमेरिकन मिशनने सुरु केली, काही काळातच तिथे मुलींसाठी वसतीगृह ही सुरु झाले. म्हणजे मिशनऱ्यांनी आपल्याकडे स्त्री शिक्षणाची दखल होऊन वेगवेगळ्या ठिकाणी शाळा सुरु केल्या, ही एक मोठी परिवर्तनाची गोष्ट म्हणायला हवी मुलींना शिक्षण देणे ही काळाची गरज असून शाळांच्या ठिकाणीच राहण्याची सोय करण्याच्या दृष्टीने वसतिगृहांचीही बांधणी त्याठिकाणी केली.

शिक्षणाचा प्रसार आणि सामाजिक सुधारणा करण्याच्या उद्देशाने इ.स. १८४८ मध्ये स्टुडंट्स लिटररी ॲन्ड सायंटिफिक सोसायटीची स्थापना मुंबईमध्ये झालेली होती. डॉ. भाऊ दाजी लाड, रावसाहेब मंडलीक, दादाभाई नवरोजी वगैरे मंडळी या संस्थेशी निगडित होती. मुलींसाठी शाळा काढणारी ही पहिलीच ऐतद्देशीय संस्था, दादाभाई नवरोजी, डॉ. भाऊ दाजी लाड पगार न घेता या शाळेतून मुलींना दररोज दोन तास शिकवीत. दादाभाई घरोघर जाऊन मुलींना शाळेत पाठवा अशी विनंती पालकांना करीत. इ.स.१८५१ साली डॉ. भाऊ दाजी लाड हे या संस्थेचे पहिले भारतीय अध्यक्ष झाले. तेव्हा या संस्थेने चालविलेल्या मुलींच्या एकंदर पाच शाळा होत्या व त्यांतून सुमारे ५०० मुली शिकत होत्या. ही शाळा सुरुवातीपासूनच कितीतरी वर्षे डॉ. भाऊ दाजी लाड पदरचा पैसा खर्च करुन चालवीत. इ.स.१८६० मध्ये भाऊ दाजींच्या मित्रांनी, सर अलेक्झांडर ग्रॅन्ट यांच्या सहीने या शाळेसाठी फंड, जमविण्यासाठी एक विनंती पत्र काढले. रावसाहेब मंडलीक प्रा. रा. गो. भांडारकर, माधवराव बर्वे, बदिरामजी, जीजीभाई, मंकरजी पंथकी वगैरे प्रमुख व्यक्तींनी फंड जमविण्यात पुढाकार घेतला आणि १४,००० रुपये जमवून लोहार चाळीतील शाळा चालविण्यासाठी स्टुडंट्स लिटररी ॲन्ड सायंटिफिक, सोसायटीच्या स्वाधीन केले. त्यानंतर ती शाळा सोसायटी चालवू लागली तरी त्या शाळेला भाऊ दाजींची शाळा म्हणून ओळखले जात होते. एतद्देशीयांनी स्त्रीशिक्षणासाठी उचलेले हे पहिले

पाऊल होते. सामाजिक सुधारणांबरोबर शिक्षणाचा प्रसार करणे, स्त्रियांना शिक्षण देणे हे त्यांनी ओळखून तशा पद्धतीने प्रयत्न केलेले दिसून येतात. प्रत्यक्ष मुलींची घरी जावून त्यांच्या घरच्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देवून मुलींसाठी शाळा काढण्याचे काम या सुधारकांनी केले. शाळा चालविणे ही काही सोपी गोष्ट नव्हे तर त्यासाठी ब्रिटिश अधिकाऱ्याच्या विनंतीपत्राचा वापर करुन आपल्याकडील समाजातील मुलींना शिक्षण मिळावे, शाळा निघाव्यात यासाठी पुढाकार घेऊन लोकवर्गण्यांद्वारे, विविध नामवंत व्यक्तींकडून पैसे मिळवून या चांगल्या कार्यासाठी त्याचा वापर केला. खऱ्याअर्थाने समाजसुधारकांचे हे स्त्रीशिक्षणाविषयीचे प्रयत्नांमुळेच आजची स्त्री–पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहे हे त्यांचेच यश म्हणायला हवे.

'महात्मा जोतिबा फुले' यांनी मुलींसाठी शाळा काढली. मुलींसाठी शाळा काढण्यासाठी सायंटिफिक सोसायटीने प्रयत्न केले. म. फुल्यांनी काढलेली शाळा हीच खरी पहिली मुलींची शाळा होय. याचे अगोदर एक पाद्रीची मुलींची शाळा मंगळवार पेठेत होती व तेथे काय त्या पाच दहा मुली शिकत असत. पण यासाठी एक तरुण लोकांची मंडळी जमून त्यांनी आपसात वर्गणी करुन भर बुधवार पेठेत एक मुलींची शाळा काढली. म. फुलेंनी प्रथम स्त्रीशिक्षणाचे कार्य हाती घेतले. स्त्रीशिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलाचे शिक्षण. आपण जर एखाद्या पुरुषाला शिक्षण दिले तर ते एकट्याला दिल्यासारखे आहे. परंतु तर एका स्त्रीला शिक्षण दिले तर ते सर्व कुटुंबाला दिल्यासारखे आहे. हे ओळखूनच जोतिबांनी स्त्रीशिक्षणाला प्रारंभ केला. इ.स. १८४८ मध्ये पहिली मुलींची शाळा सुरु केली. इ.स. १८८२ साली हंटर कमिशन पुढे सादर केलेल्या निवेदनात फुले म्हणतात, सुमारे पंचवीस वर्षापूर्वी खिस्ती धर्मप्रसारकांनी या पुण्यात स्त्रियांसाठी एक शाळा स्थापन केली होती. म. फुले यांनी सर्वप्रथम पुण्यामध्ये मुलींची शाळा सुरु केली ही एकूणच स्त्रीशिक्षणाच्या कार्यातील मुहूर्तमेढ ठरली. त्याअगोदर जरी शाळा होती ती परकियांनी स्थापन केलेली होती. मात्र इ.स.१८५४ साली म. फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुढाकार घेऊन ही शाळा स्थापन केली. त्यानंतर इतरही शाळा सुरु केल्या गेल्या. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये फुले दांपत्याने ही मोठी कामगिरी केली. 'स्वतंत्रपणे मुलींची शाळा काढणारे ते पहिले भारतीय होते. हंटर आयोगासमोर आपल्या मागण्यांची मांडणी केल्यानंतर 'माध्यमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याची मागणी ही केली. महात्मा फुलेंचे हे कार्य त्या काळाच्या

दृष्टीने विचार केला असता अतिशय महत्त्वपूर्ण असे आहे. या शाळांमध्ये शिकविण्यासाठी शिक्षक उपलब्ध नसल्याने जोतिबा अन् सावित्रीबाई दोघे मिळून शाळा चालवत असत. 'पहिली स्त्रीशिक्षिका' स्वतः घरी शिकून पुढे शिक्षिकेचे काम त्यांनी केली.

सावित्रीबाई फुले स्वतः शिकून मुलींना शिकविण्यासाठी शाळेत जात होत्या. त्या शाळांमधून महार–मांगांच्या मुलींनाही शिकवित असत. सनातन्यांना ही गोष्ट समाजद्रोही आणि धर्मद्रोही वाटली. त्यांच्याविरुद्ध प्रचंड संतापाची लाट उसळली. सनातन्यांनी सावित्रीबाईंना शाळेत जाता येता त्रास देण्यास सुरुवात केली. चिखल फेकणे, घाण टाकणे, दगड मारणे, शिव्या देणे अशा प्रकारे त्यांना त्रास देण्यास सुरुवात केली. म. फुलेप्रमाणेच त्यावेळी इतरही काही समाजसुधारक स्त्रीशिक्षणाबाबतीत जागृक होते. त्यामध्ये 'धों. के. कर्वे, यांचाही समावेश होता. त्यांचा स्त्रीशिक्षणाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन दिसतो जसे स्वतःच्या पत्नीला वेडावाकडा प्रसंग आल्यास उपयोगी पडावे म्हणून नर्सिंग शिकविले. तसेच वेडावाकडा प्रसंग आलेल्या पार्वतीबाईना, आपल्या मेव्हणीला त्यांनी शिक्षिका व्हायचा सल्ला दिला. त्या स्वतःच आश्रमामध्ये स्वयंपाकाचे, अंगमेहनतीचे काम करण्यास तयार होत्या. विधवेने उपजीविकेसाठी तेच काम करण्याची हाती पोळपाट लाटने घेण्याचीच पद्धत होती तरीही लोकनिंदेचा विचार न करता कर्वेंनी आपल्या मेव्हणीला शिक्षणाची वाट दाखविली त्यामधून कर्त्यांची दूरदृष्टी आपल्याला दिसून येते. पार्वतीबाई आठवले म्हणजेच कर्वेंची मेव्हणी त्या विधवा होत्या. वैधव्य आल्यानंतर त्या स्त्रीचा स्वतःशीच संघर्ष सुरु झालेला असताना शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे ओळखून कर्वेंनी 'विधवाश्रमाची' कल्पना मांडली ते म्हणतात– विधवाश्रम निघाला तर तू त्यात काम करशील काय? त्यावेळी पार्वतीबाईंना शिक्षणाची कल्पना मुळीच नव्हती व आश्रम शब्दाचा अर्थ काय हेही ठाऊक नव्हते. त्यानंतर पार्वतीबाई आपल्या 'माझी कहाणी' आत्मचरित्रात म्हणतात की तुमच आश्रम निघाला म्हणजे मी त्यात स्वयंपाक करण्याचे काम घेईन. दुसरे काही मला करता येईल असे वाटत नाही त्यावर कर्वे म्हणतात, 'आश्रम निघावयास अजून अवकाश आहे. तोपर्यंत तू शिक्षकिणीचे सर्टिफिकेट मिळवावेस. त्या कामास लागण्याकरिता उदयापासून होम क्लासेसमध्ये जा. म्हणजे कर्वेंनी सांगितलेला हा विचार प्रेरणादायीच आहे. पार्वतीबाईंना शिक्षणाचे महत्त्व सांगून आणि विधवाश्रम चालविण्याची

त्यांची कल्पना ही त्या काळाच्या दृष्टिने उचललेले अतिशय महत्त्वाचे पाऊल होते. स्त्रियांना संघटित करुन त्यांच्या कलागुणांना वाव देण्यास हे एक हक्काचे व्यासपीठ कर्वेनी उभे केले. विधवास्त्रीला सर्वात जास्त विरोध आणि अन्याय सहन करावा लागतो तो तिच्या घरातील माणसांकडूनच. हे ओळखून ती जर स्वावलंबी झाली तिने जर काही शिक्षण घेतले तर स्वतःचा चरित्रार्थ ती निश्चितपणे चालवू शकते हे ओळखून कर्वेंनी 'पार्वतीबाईना' प्रोत्साहन दिलेले असावे.

स्त्रियांना शिक्षण देणे किती महत्त्वाचे आहे याविषयी केवळ पुरुष सुधारकच बोलत होते असे नसून स्त्रियांचा देखील त्याविषयीचा काही एक विचारव्यूह असल्याचे दिसून येते. त्याविषयी काशीबाई कानिटकर म्हणतात की– आमची कोवळी बालके आम्ही अक्षरशत्रू असल्यामुळे निर्दय, कठोर, अविचारी पंतोजींच्या हातात आम्हांला दयावी लागतात आणि त्यांच्या पाठीवर, गालावर, हातांवर उठलेले बळ व सुजलेले शरीराचे भाग आम्हांला मुकाटयाने पाहावे लागतात. त्यावर हळदबोळ उगाळून घालताना त्या कोवळ्या बालकांना होणाऱ्या यातना डोळ्यांनी पाहाव्या लागतात व त्यामुळे आम्हांला अश्रू ढाळावे लागतात. परंतु उपाय काय? ह्या गोष्टी जर पुरुषवर्गाच्या काळजाल झोंबून ते आम्हांला शिक्षण देऊन, शाळा चालविण्याची परवानगी देतील तर! काशीबाईंनी आपल्या मनातील खंत याठिकाणी व्यक्त केलेली आहे. त्या म्हणतात, की 'आम्ही अक्षरशत्रू' म्हणजे अक्षरे शिकण्याचे, शिक्षणाचे आमच्याशी कसलेली नाते नाही. शत्रूत्वाचे नाते असणाऱ्या सर्व स्त्रिया त्यामुळे आमची मुलं दुसऱ्यांच्या हाती सोपवावी लागतात. पुरुषांच्या तुलनेत एक स्त्री चांगल्यारितीने ज्ञानदान करु शकते तिच्यामध्ये त्या क्षमता आहेत याची जाणीव स्वतःला स्त्रियांना आहे मात्र हा समाज त्यांना तसे करु देत नाही. ही शोकांतिका म्हणायला हवी.

अशा रीतीने विविध भागांमधून स्त्रीशिक्षण घेऊन स्त्रिया तयार होत होत्या. उदाहरणार्थ डॉ. आनंदीबाई जोशी यांना वडिलांनी आग्रहाने शाळेची वाट दाखविली त्यानंतर त्यांचे पती नवरा गोपाळराव यांनी ही आनंदीबाईंच्या शिक्षणाची 'वाट' मोकळी केली. डॉक्टर होण्यासाठी अमेरिकेस पाठविले हिंदुस्थानात स्त्री डॉक्टरांची गरज आहे हे ओळखून एवढी मोठी झेप घेतली. अमेरिकेस गेल्यावर अत्यंत कष्ट सोसून, मानसिक, शारीरिक, त्रास सहन करून डॉक्टर झाल्या

आणि 'हिंदूस्थानातल्या पहिली प्रशिक्षित डॉक्टर' म्हणून सन्मान मिळविला अशी इतरही उदाहरणे देता येतील इ.स.१८८२ मध्ये 'ताराबाई शिंदे' यांनी शिक्षण घेऊन 'स्त्री–पुरुष तुलना' नावाचा एक ग्रंथ लिहिला. तत्कालीन समाजातील स्त्रियांच्या परिस्थितीबद्दल ताराबाईंनी अतिशय परखड शब्दात तळमळीने मांडणी केलेली आहे. अनेकविध प्रश्न उभे करण्याचे काम हे पुस्तक करते. योग्य, अयोग्य दाखवून देऊन काय चांगले हे सांगण्याचा प्रयत्न हे पुस्तक करते. त्यामधून समाजात, कुटुंबात कशा पद्धतीने स्त्रियांवरती अन्याय, अत्याचार होतात, तिचे कसे शोषण केले जाते पुरुषांना मात्र पूर्णतः मोकळीक आणि स्त्रियांना सर्व बंधनात जखडून ठेवलेले अशी तफावत का? त्यावरती अतिशय मार्मिक भाष्य ताराबाई करतात. त्यांची भाषा एकदम परखड स्वरुपाची असून पुरुषीव्यवस्थेला जाब विचारताना दिसते.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील स्त्रीशिक्षणाबद्दल प्रचंड उदासीनता होती. ब्रिटिशांची राजवट प्रस्थापित झाल्यावर नवीन राज्यव्यवस्थेसाठी त्यांना नोकरदारांची गरज वाटू लागली आणि त्यातून मिशनऱ्यांनी शाळा सुरु केल्या स्त्रीशिक्षणाला सुरुवात करणाऱ्यापैकी पहिले ऐतद्देशीय समाजसुधारक म. फुले हे होते. जातिव्यवस्थेच्या उतरंडीनुसार या शाळांमधून अस्पृश्य मुलींना शिक्षण घेणे अशक्य होते फुलेंनी विरोध झाल्यामुळे अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा त्यांनी काढल्या परंतु पुढे त्या शाळांचे काय झाले? हा प्रश्नच आहे.

आजच्या २१ व्या शतकात धावपळीच्या युगात शिक्षणासाठी संघर्ष आजही सुरुच आहे. त्याचे स्वरुप तेवढे बदललेले दिसते. १९ व्या शतकाकडे बघताना असे दिसते की, शिक्षणाबाबतील बरीचशी प्रगती झालेली होती. सुधारकांच्या प्रयत्नांमधूनच हे यश मिळालेले होते. म. फुलेंनी जर ही 'स्त्रीशिक्षणाची' गरज ओळखली नसती तिचे महत्त्व समाजाला पटवून दिले नसते तर आजही स्त्रिया त्याच ठिकाणी असत्या. सर्वोच्च पातळीवरचे संशोधन, तंत्रज्ञान अत्याधुनिक कॉम्प्युटर सायन्सपासून विविध ज्ञानाच्या, कलाशाखा असे प्रत्येक क्षेत्र स्त्रियांनी गाजविले आहे. मिळालेल्या संधीचा योग्य उपयोग आजची स्त्री करते आहे याचे श्रेय केवळ अन् केवळ फुले दांपत्यालाच दयावे लागेल तरीही आजच्या प्रत्येक मुलीला उच्चशिक्षण घेता येतेच अशी परिस्थिती राहिलेली नाही. शिक्षणाचे 'व्यावसायिकरण' हेच त्यामागील प्रमुख कारण म्हणायला हवे.

भारताच्या आधुनिक होण्याच्या वाटचालीमध्ये स्त्रियांची उन्नती व 'स्त्रीशिक्षण' अतिशय महत्त्वाचे ठरलेले आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विविध समाजसुधारकांनी घेतलेल्या पुढाकारामुळे स्त्रीशिक्षणाला थोड्याफार प्रमाणात का होईना चालना मिळाली होती. 'राजा राममोहन रॉय', यांचा चांगला पाठिंबा स्त्रीशिक्षणाला लाभलेला होता समाजातील स्त्रियांची स्थिती दयनीय अशा स्वरुपाची होती. अन्याय, अत्याचारी ती बळी ठरलेली होती. अशा परिस्थितीत 'चार्लस वूडने आपल्या शिक्षणाविषयक खलित्यामध्ये 'स्त्रीशिक्षणाची' शिफारस केलेली दिसते. 'पंडिता रमाबाईंनी' आर्य महिला समाजाची स्थापना इ. स. १८८२ रोजी केली. या समाजाने असा एक नियम केलेला होता की 'त्यांच्या व्याख्यानांना जी गर्दी जमत असे त्यामध्ये कुटुंबातील स्त्रियांनाही बरोबर आणले पाहिजे' केवळ भाषणातून सांगण्यासाठी नव्हे तर स्त्रियांचा अशा सभांतील सहभाग वाढविण्यासाठी अशा प्रकारचा नियम केलेला होता भारतात धर्मग्रंथांच्या आधारे स्त्रियांचे शोषण हे केले जात होते. स्त्रियांच्या प्रश्नांचे ते फक्त धार्मिक पद्धतीनेच विश्लेषण करीत असत. पंडिता रमाबाईंनी 'शारदासदन'च्या माध्यमातून स्त्रियांच्या प्रश्नांचा अभ्यास केला होता, शारदा सदनच्या माध्यमातून विधवांना, बालविधवांना, अन्याय झालेल्या स्त्रियांना स्वतःची ओळख मिळवून दिली. स्वतःकडे माणूस म्हणून बघण्याची शिकवण त्या कार्यामधून समाजाला देत असत.

स्त्रीशिक्षणाबाबत समाजाबरोबरच कुटुंबाकडूनही स्त्रियांना विरोध होत असे. 'सावित्रीबाईंनी' मुलींच्या शिक्षणासाठी हा सर्व छळ भोगलेला होता. वेळप्रसंगी दुखापतही त्यांनी झेललेली होती. मात्र या विरोधाला त्या घाबरल्या नाहीत. उलट आपले कार्य त्यांनी वेगाने चालू ठेवले. स्त्रियांना समाजातील त्रासाबरोबरच शारिरीक त्रास देखील सोसावा लागत असे. त्यासाठी स्त्रियांच्या आजारपणात, बाळंतपणात त्यांची काळजी घेण्यासाठी स्त्री-डॉक्टर्स असावेत असे जाणवू लागल्यानंतर 'पंडिता रमाबाईंनी स्त्रियांना वैद्यकीय शिक्षण मिळावे' अशी मागणी हंटर कमिशनला केलेला होता. त्याचे फलित म्हणजे 'आनंदीबाई जोशी' यांनी अमेरिकेस जावून ते शिक्षण घेतले. स्त्रियांना आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग व्हावा अशी त्यांची अपेक्षा होती. ह्या वैद्यकीय शिक्षणासाठी 'मुंबईमध्ये' 'ग्रँट मेडिकल कॉलेजची स्थापना इ. स. १८३५ साली झाली' स्त्रीशिक्षणाला विरोध, धर्म संकल्पना, पुरूषप्रधानता, प्रथा, रूढी या काळात स्त्रियांना

वैद्यकीय शिक्षण दयावे ही फार मोठी क्रांती होती. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात बऱ्याच स्त्रियांनी नर्सिंगचे प्रशिक्षण घेतलेले होते. आनंदीबाई जोशी अमेरिकेहून डॉक्टर होऊन परत आल्यानंतर तत्कालीन सर्व संस्थांनी वृत्तपत्रांनी, चळवळींना त्यांचे अतिशय कौतुक केले.

याचे सर्व श्रेय महात्मा जोतीराव फुले यांनाच जाते. तत्कालीन समाज सुधारकांना 'स्त्रीशिक्षणाचे' महत्त्व पटलेले होते. 'स्त्री' एक महत्त्वाचा घटक असून स्त्रीशिक्षणाने स्त्रियांची प्रगती होईल हा आशावाद ते जाणत होते. एकोणिसाव्या शतकात ही जाणीव होऊन स्त्रियांना काही प्रमाणात सुविधा ह्या उपलब्ध झालेल्या होत्या.

### १.१३.२ म. जोतिराव फुले (१८२७–१८९०) :–

स्त्री शिक्षणाचा विचार केला असता आणि सामाजिक सुधारकांच्या कामगिरीचा कालखंडानुसार विचार केला, की म. फुले यांचे नाव डोळ्यांसमारे येते. हिंदुसमाजातील जातीभेद, उच्चनीचता, अस्पृश्यता, दारिद्र्य ह्या गोष्टी नष्ट करण्याचा प्रयत्न फुलेंनी केला. त्यांचे घरचे वातावरणही धार्मिक, अध्यात्मिक असेच होते. परंतु अंधश्रद्धाळूपणे भक्ती न करता डोळसपणे तर्काच्यापातळीवरती प्रत्येक गोष्ट तपासून घेऊनच स्वीकारणे ही वृत्ती जोतिबांकडे होती. धर्म स्वीकाराबाबतीतही ते हेच करतात. एकेश्वरवादी होते. परमेश्वर हा निर्गुण निराकर आहे. तो सर्व कणाकणांत सामावलेला आहे यावरती त्यांची श्रद्धा होती.

ईश्वराविषयी ते म्हणतात, की 'खरा ईश्वप्रणित धर्म एकच आहे त्यांना मूर्तिपूजा मान्य नव्हती. परमेश्वराची त्याच्या शुद्ध स्वरुपात आराधना केली पाहिजे?' प्रत्येक गोष्टीमध्ये ईश्वराचे अस्तित्व ते मान्य करतात. त्यासाठी वेगळ्या मूर्तीची पूजा करायला हवी या गोष्टीला ते विरोध करतात. परमेश्वराची शुद्ध मनाने केलेली आराधना ही महत्त्वाची असते. जोतिरावांनी ईश्वराला 'निर्मिक' असे म्हटले आहे. निर्माता संबोधून पूजा, नामस्करण, नैवेद्य, अन्नदान, पापपुण्य इ. चा ऊहापोह केला आहे. धर्माचे आचरण करताना ते सुसंगत असायला हवे. व्यर्थ अपव्यय न करता हितार्थ असेल तेच स्वीकारणे. परमेश्वर आणि भक्त यांच्यामध्ये मध्यस्थाची गरज नाही. हे मुख्य तत्त्वच ते सांगतात. कर्मकांड, देवभोळेपणा, अंधश्रद्धा त्यांना विरोध करुन 'सत्य' ह्या गोष्टीला ते महत्त्व देताना दिसतात.

'सर्वधर्म सामोवशक' अशा उदारमतवादी विचारसरणीचा पुरस्कार करुन समतेवरती आधारलेल्या समाजाचे चित्र ते बघतात. जातियेतेची बंधने न मानता 'माणसाकडे माणूस म्हणून बघण्याची अपेक्षा जोतिबांनी व्यक्त केलेली आहे. स्त्रियांचे जीवन एखाद्या गुलामाप्रमाणे होते. रुढी, परंपरा, प्रथांनी तिला बांधून ठेवलेले होते. कुटुंबातील महत्त्वाचा घटक असलेली स्त्री, मात्र सर्व सुख-सुविधांपासून वंचित ठेवलेली होती. त्याकडे जोतिबांनी सजगपणे बघून 'स्त्रीशिक्षणाचा' पाया घातला. सर्वप्रथम आपली पत्नी 'सावित्री' हिला शिक्षण देऊन 'पहिली स्त्रीशिक्षिका' भारताला दिली. बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी धार्मिक विषमता घालविण्यासाठी 'सत्यशोधक समाजाची स्थापना केली. 'समतेची' समाजामध्ये रुजवणूक करण्याचे प्रयत्न जोतिबांनी केलेले असले तरी प्रत्येक कार्यामध्ये त्यांना सावित्रीबाईंची साथ लाभलेली आहे. शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी बरेचसे कार्य केलेले आहे. अनेक ग्रंथ लिहिलेले आहेत. 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा आसूड', 'इशारा', 'नियतकालिका', 'सार्वजनिक सत्यधर्म' तसेच 'तृतीयरत्न' हे नाटक लिहिलेले आहे.

आयुष्यभर त्यांनी समाजाची सेवा निर्हेतुकपणे केली. त्यांच्या ह्या कार्याबद्दल 'महात्मा' ही पदवी बहाल करण्यात आली.[७६]

### १.१३.३ राजर्षी छत्रपती शाहू महाराज (इ.स.१८७४ ते १९२२) :-

बहुजन समाजाला शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक कार्याद्वारे प्रगतीपथावरती घेऊन जाणारे सुधारक म्हणजे 'शाहू महाराज' समाजामध्ये असणाऱ्या सर्वसामान्य माणसाचे हित करणे हे आपले प्रथम कर्तव्य होय असे ते मानत असत. जातिभेदाला सुरुवातीपासूनच त्यांनी विरोध केलेला आहे. धर्मकृत्यातील ब्राह्मणांची मक्तेदारी नाहीशी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. स्वातंत्र्योत्तर काळात समाजातील सर्व जातींना समान अधिार मिळविण्यासाठी समाजाचा शैक्षणिक विकास होण्याची गरज असते हे तत्त्व महाराजांनी स्वीकारले. आणि त्यामधून जागृती करण्याचा प्रयत्न केला. बहुजन समाजाला निरनिराळी संधी व अधिकारपदे देऊन त्यांचा विकास घडवून आणण्याचे धोरण महाराजांनी चालविले. जातिभेदामुळे समाजातील व्यक्तिंना माणूस

---

[76] http://en.m.wikipedia.org/jyptirao_phule

म्हणून असलेले अधिकारही मिळत नव्हते. जातिभेद ही आपल्या देशाच्या उन्नतीच्या मार्गातील धोंड आहे हे ओळखून तो भेद नष्ट करण्याचे कार्य महाराजांनी केले.

समाजातील स्त्रियांची स्थिती सुधारण्याच्या कार्याला ही त्यांनी प्रोत्साहन दिले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्रिया शिक्षित झाल्यास कुटुंब, समाज व पर्यायाने देशाचा विकास होईल असा त्यांना विश्वास होता. 'आंतरजातीय विवाहाचा' कायदा करुन तसे विवाह देखील त्यांनी घडवून आणले. विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता देवून जातिनिर्मूलन, अस्पृश्योद्धार, स्त्रीशिक्षण, ब्राह्मणाला विरोध इ. सुधारणांचा अग्रह धरुन परिवर्तनाची लाट बसविण्याचे कार्य ही केले. समाजाच्या आर्थिक विकासावरच इतर क्षेत्रातील विकास अवलंबून असतो. म्हणून आर्थिक विकासासाठी शेती, उद्योगधंदे, व्यापार या क्षेत्रांत नवीन उपाययोजना त्यांनी केली. शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून होती. त्यासाठी शेतीला मुबलक व निश्चित स्वरुपाचा पाणीपुरवठा ह्या प्रश्नाचा विचार करुन 'महाराणी लक्ष्मीबाई तलाव' असे नामकरण केलेला बंधारा बांधला, त्यातूनच पुढील काळात शेतीचा पाण्याचा प्रश्न सुटला.

अज्ञान, अंधश्रद्धा, सामाजिक बंधने यांच्यातून बहुजन समाजाची सुटका केल्याशिवाय हा समाज प्रगत होणार नाही हे ओळखून शैक्षणिक क्रांतीला त्यांनी विशेष प्राधान्य दिले. आधुनिक महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या चळवळीत शाहू महाराजांचे कार्य अतिशय मौलिक स्वरूपाचे होते. 'शाहूपूरी' या व्यापारी पेठेची स्थापना करुन जनतेला व्यापारांकडे वळविले. उद्योगधंद्यांची पायाभरणी केली. मल्लविद्येला उत्तेजन दिले. नाटक संगीत कलांच्या पुरस्कार करुन कोल्हापूरला 'कलानगरी' बनविले. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेले कार्य हे सर्वपरिचित आहे.

### १.१३.४ पंडिता रमाबाई (इ.स.१८५७–१९२२) :–

त्यांच्या विद्वत्तेवरुन रमाबाईंना 'पंडिता' ही पदवी देण्यात आली. इ.स.१८८२ मध्ये पतीचे निधन झाल्यानंतर स्त्रियांच्या उद्धारासाठी त्यांनी स्वतःला वाहून घेतले. 'आर्य महिला समाजाची' स्थापना रमाबाईंनी केली. ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केल्यानंतर ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या मदतीने इ.स.१८८९ मध्ये बालविधवांसाठी मुंबई येथे 'शारदा सदन' ही संस्था सुरु

केली. या आश्रमामध्ये विधवा व अनाथ स्त्रियांच्या राहण्याची व जेवणाची मोफत सोय केलेली होती. बालविवाह, केशववनासारख्या अमानुष रुढींना, त्यांचा कडाडून विरोध केला. 'शारदा सदन' पुढील काळात 'मुक्तीसदन' नावाने ओळखले जाऊ लागले. रमाबाईंच्या ह्या कार्याबद्दल त्यांना 'कैसर–इ–हिंद' ही पद्‌वी व सुवर्ण पदक देण्यात आलेले होते. हाच त्यांच्या कार्याचा गौरव होय.

### १.१३.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर (इ.स.१८९१–१९५६) :–

भारतीय समाज जातिव्यवस्थेच्या बंधनामध्ये जखडलेल्या असतात डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले. शिक्षणाद्‌वारे त्यांनी त्यांच्यात नवविचारांची पायाभरणी करण्याचे काम बाबासाहेबांनी केलेले आहे. आपल्या अस्पृश्य बांधवांना अत्याचार व गुलामगिरीतून मुक्त करुन भारतीय घटनेनुसार त्यांना आपल्या आर्थिक विकासाची संधी उपलब्ध करुन देण्याचे काम बाबासाहेबांनी केले. 'जात' ही भारतीय समाजामध्ये फोफावलेली सर्वात भयानक अशी गोष्ट आहे. जातीच्या नावाने माणसांची होणारी कुचंबना, गुणवत्तेला डावलले जाणे ही खरोखर शोकनिय बाब म्हणायला हवी. 'जातिसंस्था' व 'अस्पृश्यता' ही भारतीय समाजजीवनातील कीड आहे. ही कीड वाळवीप्रमाणे असून मानवी समाजाला पोखरुन काढते. हे वास्तव आंबेडकरांनी बरोबर ओळखून त्यावरती परिवर्तनाची अपेक्षा व्यक्त केलेली दिसते.

आपल्या बांधवांना आपल्यावरती होणाऱ्या अन्यायाची, अत्याचाराची जाणीव ही बाबासाहेबांनी करुन दिली. 'मंदिर प्रवेशाची चळवळ' राबवून 'काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेशाचा हक्क मिळवून दिला. आम्हाला समतेची वागणूक मिळावी हीच माफक अपेक्षा व्यक्त केलेली आहे. 'माणसाकडे माणूस म्हणून न बघता त्याच्या जातिवरुन त्याची ओळख होते हे वास्तव प्रकर्षाने समोर आहे. अस्पृश्य समाजाच्या जागृतीसाठी इ. स. १९४६ मध्ये पिपल्स एज्युकेशन सोसायटी ची स्थापना केली. मुंबई येथे 'सिद्धार्थ महाविद्यालय' तर औरंगाबाद येथे 'मिलिंद महाविद्यालयाची' स्थापना केली याबरोबरच डॉ. बाबासाहेबांनी 'मूकनायक' हे पाक्षिक सुरु केले. अस्पृश्यांच्या जागृतीसाठी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' ह्या संस्थेची निर्मिती केली.

'बहिष्कृत भारत', 'जनता', 'समता' हे वृत्तपत्र सुरु केले बाबासाहेबांनी बरेचसे लेखन इंग्रजीमधून केलेले आहे.

'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असे सांगून आपल्या हक्कासाठी संघर्ष करण्यास शिकले पाहिजे. अस्पृश्यामध्ये आत्मविश्वास, स्वाभिमान निर्माण केला तो बाबासाहेबांनी सामाजिक समतेच्या न्यायहक्कांसाठी अस्पृश्यांना संघटित करणे हे अहिंसक मार्गाने संघर्ष करण्यासाठी जागृत करणे त्यांना महत्त्वाचे वाटले होते. जातीजातींमध्ये असलेले हे उच्च–निच्चतेचे राजकारण ही खरेतर खूप लाजिरवाणी बाब आहे. आपलाच हिंदू धर्म आपल्याच अस्पृश्य बांधवांना माणूस म्हणून अधिकार देण्यास तयार नाही. म्हणून डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर आवश्यक मानून १३ ऑक्टो. १९३५ च्या येवला परिषदेत घोषणा केली, की 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी मी हिंदू म्हणून मरणार नाही' अनेक धर्मांचे प्रस्ताव डॉ. आंबेडकरांना आले मात्र त्यांनी याच भारतभूमीतील पूर्वी वैभवशाली असणारा बौद्ध धर्म स्वीकारण्याचा निर्णय घेतला. दिनांक १४ ऑक्टो. १९५६ रोजी नागपूर येथे ऐतिहासिक समारंभात डॉ. बाबासाहेबांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली.''[७७] बाबासाहेबांनी जी घोषणा केलेली होती त्याचप्रमाणे त्यांनी बौद्ध धर्मात धर्मांतरण केले. ज्या हिंदू धर्माने माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारला त्या धर्माचा त्याग करून बाबासाहेबांनी अनेक अनुयायांसह हा धर्म स्वीकारला.

'भारतीय घटनेचे शिल्पकार', असून स्वातंत्र्य, समता, बंधुता, विज्ञानविषयक दृष्टिकोन बाबासाहेबांनी स्वीकारलेल्या होता.

भारताच्या इतिहासातील 'प्रबोधनपर्व' म्हणून एकोणिसाव्या शतकाला मानले जाते. ह्या शतकात ब्रिटिशांची सत्ता अस्तित्वात असताना देखील भारतीयांना नवी दृष्टी लागली. धर्मभोळेपणा, बालविधवा, कर्मकांड, प्रथा, रुढी ह्या गोष्टींमध्ये भारतीय समाज गुरफडून गेलेला होता. नवे जीवन त्याकडे बघण्याची नवी दृष्टी शिक्षणाने दिली. त्यामधून साक्षर झालेली पहिली पिढी शिकून बाहेर पडल्यानंतर परिवर्तनाची लाटच आली. बुद्धिचातुर्याच्या आधारे, विज्ञाननिष्ठा

[७७] एन. एस. तांबोळी, व्ही. पी. पवार, उनि. पृ.क्र.७–२९

बाळगून रुढींकडे, परंपरांकडे सजगपणे, तार्किकपणे बघितले जाऊ लागले. नवी मूल्ये विकसित केली गेली. ही मूल्ये आत्मसात केलेल्या ह्या समाज सुधारकांनी समाजात परिवर्तन घडवून आणण्याचे अतिशय महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे.

''एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सुरु झालेल्या समाज सुधारणेला उत्तरार्धात पुष्कळ चालना मिळाली. लोकहितवादी, आगरकर, ईश्वरचंद्र विद्यासागर महर्षी कर्वे, न्या. रानडे, म. फुले इ. पुरुषांनी स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, बालविवाह, जातिभेद अस्पृश्यतानिवारण वगैरे बाबतींत आपले पुरोगामी विचार लोकांत प्रस्तृत केले व त्या दृष्टीने कार्य ही बरेच केले.''[७८] आपल्या शिक्षणाचा समाजासाठी उपयोग व्हावा, तसेच क्रांती घडून यावी हा हेतू प्रत्येक सुधारकाच्या कार्यामागे असलेला दिसून येतो. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ह्या सुधारणांचा प्रयत्न केल्यानंतर उत्तरार्धात बरीचशी क्रांती झालेली आहे. आपले विचार लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी विविध लेखांच्या नियतकालिकांच्या माध्यमांचा वापर करुन समाजातील अनिष्ट प्रथांना कडाडून विरोध केला होता. त्यांच्या ह्या कार्यामुळेच स्त्रीशिक्षणाला चालना मिळाली. शिक्षणामुळे जागृत झालेली ही पहिली पिढी खऱ्याअर्थी समाजविकासाची मुहूर्तमेढ ठरली हे आपणांस स्पष्टपणाने सांगता येते.

### १.१४ पारधी स्त्री जीवन विषयक सुधारणा :–

पारधी समाजात शिक्षणाबाबत जनजागृकता झाल्यामुळे मुलींना शिक्षण देण्यास सद्यस्थितीत सुरुवात झाली आहे. प्राथमिक तथ्य संकलन करत असतांना काही मुलीं महाविद्यालयीन शिक्षण घेत असल्याचे आढळून आले आहे, परंतु त्यांना अनेक अडचणींना समोरे जावे लागते. घरातील मुलींना सांभाळावे लागते, त्यामुळे शिक्षण मिळत नाही. एकोणिसावे शतक हे महाराष्ट्राच्या इतिहासातील स्थित्यंतराचे शतक म्हणून ओळखले जाते. सामाजिक वातावरणही जुन्या प्रथा–परंपरांना, रुढींना जोपासणारे असेच होते. अनेक अनिष्ट प्रथा प्रचलित होत्या. असंख्य लोक शिक्षणापासून वंचित राहिलेले होते अशावेळी सन इ.स.१८१८ मध्ये पेशवाईचा अस्त होऊन ब्रिटिशांनी सत्ता भारतात प्रस्थापित झाली. ब्रिटिशांनी

[७८] 'भारतीय संस्कृतिकोश'– खंड–सहावा, बंगाल ते मराठी भाषासाहित्य, संपा. पै. महादेवशास्त्री जोशी, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, प्र.आ. १९७०, पृ.क्र.४६१

त्यांचे कायदे, कानून ठरविले. त्याचा भारतीयांच्या जीवनावर परिणाम झाला. शिक्षणाने साक्षर झालेली पहिली पिढी शिक्षणातून विकसित बनली आणि समाजात सुधारणा घडवून आणण्याची तयारी करून तसे कार्यही ह्या समाजसुधारकांनी केलेले आहे. धार्मिक व सामाजिक जीवनात परिवर्तन करण्याचे, प्रथा, परंपरांना विरोध करण्याचे कार्य करुन परिवर्तनाची एक नवी दिशा दिली. त्यांमध्ये वेगवेगळ्या चळवळींचाही समावेश होतो. समाजाकडे आणि जीवनाकडे तर्कदृष्टीने बघण्याची नजर ह्या सुधारकांमध्ये असल्यानेच समाज प्रबोधनासाठी त्यांनी विविध चळवळींना निर्माण केले. समाजसुधारणेच्या कार्यात अनेक सुधारकांचे योगदान आहे मात्र प्रस्तुत घटकात काहीच महत्त्वाच्या पारधी महिलांच्या जीवन विषयक सुधारणा व त्याच्या पैलूंचा अभ्यास थोडक्यात करण्यात आला आहे.

### १.१४.१ बालविवाह :–

स्त्रियांच्या विकासाचे अनेक प्रयत्न एकोणिसाव्या शतकात सुरु झाले. स्त्रियांचे शोषण थांबावे, त्यांना शिक्षण मिळावे, त्यांच्यावर होणारा अन्याय नष्ट व्हावा. स्वत:चा विकास करून त्यांना 'माणूस' म्हणून जगण्याचा अधिकार मिळावा यासाठी अनेक तत्कालीन सुधारक प्रयत्न करत होते. सतीबंदी, केशवपनबंदी, बालविवाहास विरोध, पुनर्विवाहास संमती यासारख्या अनेक चळवळी सुरु झाल्या. 'शिक्षण' हाच स्त्रियांच्या उन्नतीचा मुख्य मार्ग होता हे ओळखल्यामुळे 'स्त्रीशिक्षणाचा' पाया एकोणिसाव्या शतकात घातला गेला. या शतकाने जगाकडे बघण्याची एक नवी दृष्टी दिली. समाजामध्ये प्रचलित असणाऱ्या चालीरीतींकडे अंतर्मुख होऊन बघण्याची नवी वृत्ती, नवी दृष्टी ह्या शतकाने दिली. त्यातूनच 'बालविवाह' सारख्या प्रथेला असलेले महत्त्व ही अतिशय अमानुष स्वरुपाची असलेली प्रथा ही याकाळात होती. 'धर्मशास्त्रांचे' आधारे बालविवाह हे करु देत जात असत.

मुलींचे अतिशय लहान वयात 'विवाह' करुन दिले जात. समाजातील जाचक धर्मपरंपरा–रुढींमुळे निरापराधी लहान वयातील मुलींचा बळी घेतला जात असे. धर्मशास्त्राचा आधार घेऊन श्लोकांच्या माध्यमातून विवाहाचे वय किती असावे हे पटवून दिले जात असे. लहान वयातच मुलीचा विवाह झाला नाही तर आपल्यावरती समाज रोष पत्कारायला तिचे

कुटुंब तयार नसे. अन् पर्यायाने 'बालविवाह' केले जात यासंदर्भात बरीचशी चर्चा झालेली दिसते. मुलीला 'नवरा' म्हणजे काय? हे सुद्धा समजत नाही अशा वयात हे बालविवाह होत असत. त्यामुळे अतिशय बालवयातच घरातील जबाबदाऱ्या, कामे अंगावरती येत असत. याविषयी सीताबाई लांडगे म्हणतात, ''मुलींची लग्ने जो पर्यंत लहानपणी होतील, तो पर्यंत मुली, चांगल्या आया निपजणे कठीण सारांश, मुलींची लहानपणी लग्ने करण्याची चाल बंद होईल जर आपल्या समाजाला फारच फायदा होईल. मात्र नुसती लग्ने मोठेपणी केली म्हणजे आटोपले असे नाही तर त्यांना योग्य ते शिक्षण देण्यासाठी ही आईबापांनी झटले पाहिजे, त्यांना शिकविण्याची योग्य व्यवस्था केली पाहिजे.''[७९] बालविवाहाविषयी केलेले विवेचन अतिशय महत्त्वपूर्ण अशा स्वरुपाचे असून लहान वयात लग्ने करुन देण्याची चाल ही बंद व्हायला हवी. त्यामधून चांगले काहीच साध्य होणार नाही हे ठामपणाने सांगण्याचा प्रयत्न एकोणिसाव्या शतकाची साक्षीदार असणारी 'स्त्रीच' करते आहे. तर स्त्रियांच्या प्रगतीसाठी शिक्षण देणे ही महत्त्वाचे आहे असे त्या म्हणतात.[८०]

'एकोणिसाव्या' शतकात बालविवाहाला कडाडून विरोध करणारे एक सुधारक, 'बेहेरामजी मलबारी' हे होत. त्यांनी मुलीवर लहान वयात होणाऱ्या ह्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविला. बालविवाहामुळे वधु-वरांच्या वयातील फरकामुळे तिच्यावरती होणारे दुःखाचे आघात नष्ट करण्यासाठी 'संमतीवयाच्या कायदयाबाबत' मलबारींनी प्रयत्न केले. ही प्रथा चालू राहण्यामध्ये धर्मशास्त्राचा मोठा हस्तक्षेप होता. धर्माच्या आधारे समाजाची फसवणूक केली जात असे. तर मुलीचा विवाह 'मुलगी वयात येण्याअगोदर झाला नाही तर त्या घराच्या अनेक पिढ्या नरकात जातात' अशा प्रकारचे दंडक समाजात रुजविले जात होते. त्यामुळे मुलगी जन्माला येण्याअगोदरच अशा प्रकारची लग्ने ही ठरविली जात असत. विधवा विवाहाला समाज मान्यता देत नव्हता मात्र त्या समाजात एखाद्या विधुराला पुन्हा विवाह करण्याचा अधिकार दिलेला होता. ही फार मोठी तफावत बालविवाहास उत्तेजन देण्यास कारणीभूत ठरत होती. लहान वयात विवाह झाल्याने घरातील सर्व जबाबदारी त्या मुलीला पार पाडावी लागे. खेळण्या-बागडण्याच्या वयात

[७९] संपा. डॉ. स्वाती कर्वे (२००३), स्त्री विकासाच्या पाऊलखुणा, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ., पृ.१०९

[८०] कित्ता, पृ.१०९

डोक्यावरती पदर घेऊन मुलांना सांभाळण्याचे काम तिला करावे लागत होते. समाजामध्ये ही 'बालविवाह' झालेले आहेत हे आपणास माहितीच आहे. काहीच विवाह हे 'स्वेच्छेने' तर काहींच्या घरातील दबावाखाली हे 'विवाह' पार पडलेले दिसतात. ह्या चालीरीतींमुळे सुधारकांमधून याला विरोध केला जाऊ लागला.

याबरोबरच ज्यांचे बालविवाह झालेले होते अशा पुरुषांना जर ती स्त्री पुढे आवडत नसेल तर तिला तो सोडून देई. त्या स्त्रियांना 'परितकत्या' असे म्हटले जात असे. म्हणजे त्या स्त्रीचे अस्तित्व कोणी विचारात घेतलेले दिसत नाही. वडिलांनी पाळण्यात असतानच मनाविरुद्ध माहिती नसताना विवाह करु दिला आणि कळत्या वयात आवडत नाही म्हणून नवऱ्याने सोडून देणे ही स्त्रियांच्या अस्तित्वावर बंधने घालण्याची पद्धत त्यावेळी वापरली जात होती. जरी पहिली पिढी पाश्चात्य शिक्षण घेऊन साक्षर बनलेली असली तरी परंपरेने चालत आलेल्या प्रथांना थांबविणे त्यांना लगेचच शक्य झालेले नाही. त्यासाठी काही काळ हा जावा लागलेला आहे.

परंपरेने चालत आलेल्या चालीरीती, रुढी, परंपरा यांना पायबंद घालण्यासाठी काही प्रयत्न केले जाऊ लागले. 'बेहेरामजी मलबारी' यांनी इ. स. १८८४ मध्ये 'बालविवाह आणि असंमत वैधव्य' यांविषयावर लेख लिहिला होता. हा सर्वप्रथम 'बालविवाह' विरोधी चळवळीचा प्रारंभ आपण म्हणू शकतो. 'स्त्रीजीवनविषयक सुधारणांची' गरज ही एकोणिसाव्या शतकात खऱ्याअर्थी जाणवू लागली. ह्या समस्येविषयी तत्कालीन नियतकालिके, मासिके, वृत्तपत्रांतून येणारे चर्चा–परिसंवाद, लेखनही केले जाऊ लागल्याने समाजात वाद–विवादांना, चर्चांना नवे बळ आले. सामाजिक समस्या, रुढी म्हणजे समाजविकासाला लागलेली कीड असते ही जाणिव समाजात रुजविण्याचे कार्य ही साधने करत होती. कायदेविषयक जनजागृती होत असल्याने अशा प्रथांना बंदी घालण्यासाठी 'कायद्यान्वये' प्रयत्न केले जात असत 'बहेरामजी मलवारी'चे याबाबतीतील कार्य अतिशय महत्त्वपूर्ण स्वरुपाचे आहे. बालविवाहसंदर्भात त्यांनी गव्हर्नर जनरल, लॉर्ड रिपन यांच्याकडे दोन टिपणे पाठविलेली होती. ते म्हणतात, ''तान्ह्यामुलींना मारण्यापेक्षा बालविवाहाची चाल वाईट आहे. समाजातील अनेक दुःखांचे कारण, विशेषतः लादले जाणारे वैधव्य याला कारण बालविवाहाची पद्धत आहे. मुलां–मुलींची लग्ने त्यांच्या

आई–वडिलांनीच ठरवून, लावून देण्याची चाल असल्यामुळे लहान वयातील वधू–वरांचे आयुष्य, शारीरिकदृष्ट्या, मानसिक दृष्ट्या दुःखातच जाते. पुष्कळदा या लहान वयातील वधू–वरांचे एकमेकांशी चांगले जमते देखील, तरीही या चालीमुळे लहान वयातच संसाराच्या जबाबदारीच्या ओझ्याखालील तरुण वयातच नवरे पिचून जातात, त्यांचे शिक्षण थांबून जाते. मुली लहान वयातच संसाराला लागल्यामुळे, त्यांची प्रकृती निस्तेज होते. कधीकधी तर मुलींना कायमचे अपंगत्व येते. लहान वयातच मुले झाल्यामुळे ती मुलेही योग्य पोषणाच्या अभावी अशक्त, रोगट होतात. पत्नी लहान वयात वारली तर तिची मुले अनाथ होतात. जर नवरा लहान वयात वारला, तर या लहान स्त्रीवर जन्मभर विधवापण लादले जाते.''[८१] मलबारींनी बालविवाहाची चाल ही किती अमानुष स्वरुपाची असून त्यामुळे कोणत्या वाईट परिणामांना सामोरे लागते हे सांगितलेले आहे. बाल वयातील या जबाबऱ्यांमुळे स्त्रीच्या शरीरावरती किती दूरगामी परिणाम होतात, त्याचे परिणाम जन्माला येणाऱ्या आपल्यालाही भोगावे लागतात, ही प्रथा नष्ट करण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व समाजाला पटवून दयायला हवे. धर्मशास्त्राच्या आधाराने ह्या प्रथेला मोठ्या प्रमाणात खतपाणी घातलेले दिसते. त्यावेळच्या समाज हा फारसा शिक्षित नसल्याने धर्मश्रद्धांना, परंपरांना, प्रथांना जिवापाड जपण्याचा प्रयत्न करत राहिला. आणि त्यामुळे ह्या प्रथेने आपला पाया भक्कम बनविण्याचे कार्य केले. एक अतिशय महत्त्वाचे कारण मलबारींनी याठिकाणी नोंदविलेले आहे ते म्हणजे 'लोकसंख्यावाढ' घरामध्ये अनेक बालके जन्माला घातली जात असल्यामुळे एवढ्यांचा खर्च कसा भागविणार, उत्पन्नाचे साधन ही एकच हे आर्थिक कारण ही बालविवाहाच्या अनेक कारणांपैकी एक असू शकते. असे असल्याने वयाने मोठ्या असलेल्या श्रीमंत विधुराशी सुद्धा आपल्या बालिकेचा विवाह हे माता–पिता करत असावेत असा अंदाज बांधता येतो. ही प्रथा नष्ट करण्यासाठी मलबारींनी ही टिपणे सरकारला पाठविली.

मलबारीपूर्वी 'लोकहितवादी'नी 'शतपत्रांच्या' माध्यमातून 'शास्त्राज्ञांना विरोध करण्याचे काम केलेले दिसते. हितकारक कायदे नसतील तर काढून टाकून नवे कायदे करायला हवेत

[८१] प्रतिभा रानडे (१९९१), स्त्रीप्रश्नांची चर्चा : एकोणिसावे शतक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. पृ.९१–९२

अशी मागणी ही ते करतात. 'न्या. रानडे चे' याबाबतचे 'स्त्रियांचे हक्क' या विषयावर भाषण दिलेले होते. स्मृतिग्रंथ स्त्रियांच्या विकासासाठी योग्य नाही सांगितले होते. त्याबरोबरच हिंदू शास्त्रे, पुराणे, स्मृती यांचा डोळसपणे अभ्यास करून द्या जाचक प्रथांना कडाडून विरोध केलेला होता. 'संमती वयासंदर्भात आगरकर असे म्हणतात, ''मुलगी कोणत्याही स्थितीत असो, किंवा 'ती' कोणत्याही वयाची असो, तिला खतू प्राप्त झाला की, सोळा दिवसांच्या आत नवऱ्याला गर्भादान करण्याकरिता तिच्याकडे पाठविलेच पाहिजे, अशी शास्त्राज्ञा कोठे आहे ती या धर्माभिमाण्यांनी आम्हांस दाखवावी.''[८२] अतिशय लहान वयात लग्न करणे ही खूपच गंभीर स्वरुपाची समस्या होती. आपल्या बुद्धिप्रामाण्यवादाच्या आधारे या प्रथेला आळा घातला पाहिजे असे विवेचन आगरकरांनी देखील केलेले आहे.

इ. स. १८९१ त्याची 'संमतीवयाचा कायदा' पास केला गेला. 'सर ॲन्ड्रयू स्कोबल' यांनी हे बिल पास करण्याची परवानगी मागितलेली होती. बालविवाहाची चाल ही अन्यायकारक असून असे कृत्यकरणारांना शिक्षा ठोठावण्यात यावी असा विचार समोर आला. 'आपल्या अल्पवयीन पत्नीचा गैरफायदा घेणाऱ्या नवऱ्यांना धाक लावण्यासाठी हे बिल मांडले गेले होते.' विवाहाच्या नावाखाली होणाऱ्या वाईट कृत्यांना त्यामुळे बंदी करण्यात आली. विवाहितांच्या संबंधात पत्नीचे वय बारापर्यंत वाढवून घेण्यात आलेले होते. हा कायदा पास व्हावा यासाठी स्त्रियांनी देखील प्रयत्न केलेले होते. 'संमातीवयाच्या कायद्याला' मंजूरी मिळाल्यानंतर विवाहाची वयोमर्यादा वाढण्यासाठी त्या स्त्रियांनी पुढाकार घेतला. स्त्रियांचे कायद्यासंबंधातील महत्त्वाचे योगदान हे नाकारता येत नाही.

एकोणिसाव्या शतकातील ही रुढी आजही काही ठिकाणी आपले रूप दर्शविते. धर्मशास्त्राच्या नियमांमुळे ही रुढी समाजामध्ये रुतून बसलेली दिसते. 'बेहेरामनी मलबारी' यांच्याबरोबरच इतर सुधारकांनी जे प्रयत्न केले त्यामुळे स्त्रियांसंर्भात हा कायदा पास करण्यात आला. एकविसाव्या शतकात देखील पारधी समाजात बालविवाहाची प्रथा आज देखील पूर्वीसारखीच अजून देखील चालू असल्याचे सप्रमाण निदर्शनास येते.

---

[८२] कित्ता, पृ.१००)

### १.१४.२ विधवांची स्थिती व पुनर्विवाहाची चळवळ :–

बालविवाहाची चाल ही कायद्यान्वये संपुष्टात आणण्यासाठी जे प्रयत्न केलेले होते त्याच बालविवाहीत मुलींच्या पतीचे अकाली निधन झाल्यानंतर स्त्रियांना वैधव्याला सामोरे जावे लागे. वयाने मोठ्या असलेल्या पुरुषाशी विवाह झाल्यानंतर काही दिवसांतच त्यावरती 'मृत्यू' ओढावत असे परिणामी स्त्रियांना ते हाल ते दुःख सोसावे लागत असे. एकोणिसाव्या शतकात इ. स. १८२९ साली सतीबंदीचा कायदा केला गेला. इ. स. १८५६ मध्ये विधवाविवाहाचा कायदा त्यानंतर १८९१ मध्ये 'संमतिवयाचा' असे. कायदे पास करण्यात आले. ब्रिटिशांचे राज्य प्रस्थापित झाल्यानंतर बरेच नवे बदल भारतीयांनी स्वीकारलेले होते. नवसाक्षर सुधारकांनी प्रथमतःस्त्रीविषयक प्रश्नांकडे विशेष लक्ष पुरविलेले दिसून येते. शिक्षणामुळे, नोकरदार वर्गाचा उदय आला. भारतात स्त्रिया पती निधनानंतर 'सती' जात असत. ही फार जुनी चाल प्रचलित होती उदाहरणादाखल 'माधवराव पेशव्यांची पत्नी रमाबाई' यांचा नामोल्लेख करायलाच हवा. एकोणिसाव्या शतकात ही स्त्रिया 'सती' जात होत्या. विशेषतः बंगालमध्ये याचे प्रमाण अधिक असावे कारण त्याठिकाणी सतीजाण्यासाठी सक्तीने 'संतीकुंड' व 'सिंदुरी पहाड' बनविण्यात आलेले होते. सर्वप्रथम 'राजा राममोहन रॉय' यांनी ह्या प्रथेला विरोध केला. स्वतःची इच्छा असोवा नसो तरी सुद्धा पतीच्या निधनानंतर स्त्रीला 'सती' जावेच लागत असे. तशी सक्ती तिच्यावर केली जाई. अशा ह्या जिवंतपणी जाळणाऱ्या प्रथांना थांबविण्यासाठी प्रयत्न केले गेले. धर्मशास्त्राच्या आधारे स्त्रियांना जबरदस्तीचे 'सती' जावे लागत असे. परंतु शास्त्रात असे कुठेही सांगितलेले नाही याविषयावर चर्चा झाल्यानंतर स्त्रियांची इच्छा नसताना जबरदस्तीने वागणाऱ्या लोकांवरती कठीण कारवाई केली जाऊ लागली. इ.स. १८२९ रोजी जरी ह्या अमानुष प्रथेवर बंधन आणणारा कायदा झालेला होता तरीही इतर ठिकाणी ही कृत्ये घडलेली होती.

''एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात एकीकडे भारताचा अधिकाधिक प्रदेश आपल्या सत्तेखाली होत असताना इंग्रज, जिंकलेल्या प्रदेशात राज्यकारभाराची घडी नीट बसवीत होते. इ. स. १७७४ च्या रेग्युलेटिंग ॲक्टमुळे सर्व कार्यकारी सत्ता गव्हर्नर जनरलच्या हाती आली होती. इ.स. १८३३ साली भारतात कायदे करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाकडे

सोपवण्यात आला. व त्यासाठी लॉर्ड मेकॉले या प्रसिद्ध कायदेपंडिताची नेमणूक करण्यात आली. त्याने देशात चालू असलेल्या दिवाणी व फौजदारी कायद्यांचा अभ्यास करून त्यांत सुसूत्रता आणली. इ. स. १८५३ साली इंग्लंडमध्ये सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा सुरु झाली. आणि भारताचा कारभार करण्यासाठी लायक अधिकारी निवडून पाठविण्यास सुरुवात झाली.''[८३]

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात जी 'दर्पण', 'प्रभाकर' ही नियतकालिके निघालेली होती त्यांनी सुद्धा 'बालविवाह' स्त्रीशिक्षण ह्याच विषयांना विशेष प्राधान्य दिलेले होते. घरातील व्यक्तींकडूनच विधवेवरती अत्याचार हे केले जात असत. तिचे सौंदर्य नष्ट करावयाच्या हेतूने 'केशवपनाची' ही प्रथा सुरु करण्यात आलेली असावी. पतीच्या मृत्युनंतर पत्नीला विद्रूप करून टाकले म्हणजे तिच्याकडे स्वतःचीच इच्छा स्वतःला बघण्याची राहत नसे असा त्यामधील हेतू होय. अशा प्रकारचे वास्तव चित्रण आपल्याला 'बाबा पद्मनजी'च्या 'यमुनापर्यटन' तसेच 'हरिभाऊ आपटे' यांच्या कादंबऱ्यातून दिसून येते. 'केशवपनाच्या' ह्या भयानक प्रथेचे वर्णन त्यांनी केलेले होते. ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री–पुरुष तुलना' या पुस्तकातून केशवपनाच्या चालीला विरोध करुन प्रश्न विचारलेले आहेत. त्या म्हणतात, तुमच्या बायका गेल्या म्हणजे तुम्हीही आपले तोंड काळे करुन दाढ्या–मिशा भादरुन मरेपर्यंत कोठेही अरण्यवासात का राहू नये बरे?''[८४] स्त्री–पुरुष दोघे ही समान असून त्यांच्यासाठी कायदे देखील समान असावेत. पुरुष मेल्यानंतर त्या स्त्रियांचे प्रचंड हाल हा समाज, कुटुंब करतो. जर स्त्रियांना केशवपन, सती प्रथांना बळी पडावे लागत असेल तर पुरुषांनाही तेच नियम लागू करायला पाहिजेत असा प्रश्न ताराबाईंनी आपल्या लेखनीच्या माध्यमातून विचारलेला आहे. या प्रथेला विरोध करण्यासाठी अशा प्रकारची चर्चा ही त्या काळात झालेली होती.

समाजातील ह्या अमानुष प्रथा कमी करण्यासाठी ह्या शतकात अनेक प्रयत्न झालेले होते. कुटुंबातील कर्त्या पुरुषांकडून घरातील विधवेवरती अत्याचार केला जात असे अशा कृत्यातून जर त्या स्त्रीला 'गर्भ' राहिला तर तिला जगणेच अवघड होत असे. अशा अनाचारामुळे 'गर्भपात' ही केले जात असत. या अशा पीडित स्त्रियांसाठी म. फुलेंनी आपल्या घरात

---

[८३] भारतीय संस्कृत कोश, खंड–सहावा, भा.सं.को.मं, पुणे, प्र.आ. १९७०, पृ.४५८

[८४] स. ग. मालशे, (१९७५), स्त्री–पुरुष तुलना, पृ.८

'बालहत्या प्रतिबंधक गृहाची' स्थापना केलेली होती त्या स्त्रीवर असा प्रसंग ओढावत असे ती स्त्री अशा प्रकारे ह्या गृहाचा आधार घेऊ शकत होती. म्हणजे गर्भपाताची जी समस्या आज एकविसाव्या शतकात भयानक रूप घेत असताना तिला विरोध करण्यासाठी महात्मा फुलेंनी एकोणिसाव्या शतकाच ह्या प्रथेला कडाडून विरोध करुन प्रत्यक्ष कृति कार्यक्रमाद्वारे स्त्रियांना त्यांचे स्वतःचे महत्त्व पटवून दिले. कमलाबाई देशपांडे यांच्या 'स्त्रियांच्या कायद्याची वाटचाल' ह्या ग्रंथात ह्या कायद्यांविषयी बरीच माहिती उपलब्ध होते. इ.स. १८६० नंतर अनेक विधवाविवाह झाल्याची उदाहरणे आहेत.

### १.१४.३ समाजाचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन :-

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रातच नव्हे तर सर्व देशात अनेक स्थित्यंतरे झालेली आहेत. महाराष्ट्र राज्याचा विचार केला असता 'स्त्री' विकासाला विशेष महत्त्व ह्या शतकाने दिले. हे वेगळेपण सांगता येते. स्त्रीशिक्षण बालविवाहास विरोध सतीप्रथेला बंदी विधवाविवाहास मान्यता, अशा अनेक सुधारणा एकोणिसाव्या शतकामध्ये केल्या गेल्या स्त्री हा समाजाचा तसेच कुटुंबाचा अतिशय महत्त्वाचा घटक होय ही जाणीव नव्याने करून देण्याचे कार्य समाजसुधारकांनी केले. स्त्रियांच्या विकासासाठी विविध कायद्यांची पायाभरणी केली गेली. स्त्रियांना घराबाहेर पडण्याचा अधिकार नव्हता अशा काळातील स्त्री समस्या किती गंभीर स्वरुपाच्या असू शकतात याचा विचार केला तरी आपण गंभीर होऊ शकतो. ह्याचे चित्रण त्या शतकातील लेखनामधून आलेले आहे. या विविध कथा, कादंबऱ्यांमधून स्त्री प्रश्नांची तिच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराची नोंद, दाखले ह्या लेखनीच्या माध्यमातून लेखकांनी घेतलेली दिसते.

कुटुंबात मुलीचा जन्म हा आनंदाचा मानला जात नसे. मुलगी म्हणजे परक्याचे धन ही वृत्ती तसेच कुटुंबावरती तिच्या लग्नाचा पडणारा बोजा यामुळे तिच्या जन्माचे स्वागत समाजात नव्हेच तर कुटुंबातही केले जात नसे. काही ठिकाणी नवजात बालिकांना मारुन टाकण्याची पद्धत रुढ होती. त्यामागे आर्थिक परिस्थिती हे मुख्य कारण असावे असे दिसून येते मुलींची लग्ने ही बालवयातच लावावी लागत जर तसे केले नाही तर समाजाचा रोष पत्करण्याची तयारी

त्या माता-पित्यांची नसे. कुटुंबात स्त्रियांना आपल्या पतीशी बोलण्याचा अधिकारही नव्हता घरातील मोठ्या व्यक्तिसमोर बोलण्याची परवानगी समाज देत नसे. याविषयी काशीबाई कानिटकर म्हणतात, ''जुन्या माणसांना घरचे नव्या मताचे पुरुष आपल्या बायकोशी एखाद्या शब्द बोललण्याचे समजले म्हणजे अपमान वाटे, व नव्या पुरुषांना त्यात काय आहे! बाकीच्या सगळ्या माणसांशी बोलावयाचे आणि तेवढेच का वगळायचे? मग त्याच माणसाने काय केले? असे वाटायचे. त्यामुळे घरातल्या सासुरवाशिणीला मृदंगाप्रमाणे दोहोंकडून थापट्या मिळावयाच्या''[८५] शिक्षित माणसांचा समाजाकडे, कुटुंबाकडे स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन हा समान स्वरुपाचा होता. पती-पत्नींच्या विवाहाला हा समाज मान्यता देतो मात्र कुटुंबात त्या दोघांना एकमेकांशी बोलण्याचा अधिकार मात्र नाही. घरातील मोठी माणसे त्या घरातील स्त्रियादेखील त्यांना एकमेकांशी बोलू देत नसत. कुटुंबातील हे अलिखित नियम शिक्षित पुरुषांनाही पाळावे लागत असत. त्यांच्या हसण्या-बोलण्यावर बंदी घातलेली असे. अशी ही कुटुंबव्यवस्था स्त्रियांच्या अस्तित्वाची दखल घेताना दिसत नाही.

'ताराबाई शिंदे' लिखित 'स्त्री-पुरुष तुलना' ग्रंथ समाजामध्ये असलेल्या जाचक गोष्टींना परखडपणाने प्रश्न विचारतो आहे. ताराबाईंच्या विचारांची स्पष्टता त्या पानापानांतून जाणवते. कुटुंबव्यवस्था, स्त्रीशिक्षण, स्त्री-पुरुष समानता इत्यादी विषयांची चर्चा प्रस्तुत ग्रंथातून केलेली आहे. त्याकाळात स्त्रियांशी घरात बोलण्यावर बंधने घातली जात होती. अशावेळी प्रेमाचे, प्रीतीचे महत्त्व सांगताना त्या म्हणतात, ''प्रीती काही आंबा, जांब नाही, म्हणून वाटून घेता येईल, प्रीती ही केवळ दुधाप्रमाणे आहे. दूध एकदा नासले म्हणजे जसे त्याचे फिरुन दूध होत नाही तशी ही प्रीती एकदा फाटली म्हणजे ती पुनः कधी जुळत नाही.''[८६] पती पत्नीच्या नात्यातील प्रेमाचे वर्णन करताना दूधाची प्रतिमा वापरलेली आहे. स्त्रीचे विश्व हे स्वंपाकघराच्या भिंतीतच बंधिस्त राहिलेले असल्याने उदाहरणे देत असताना सुद्धा त्यातीलच उदाहरणे. दिलेली आहेत. जसे दूध एकदा नासल्यानंतर काहीही केले तरी त्याला पूर्ववत होता येत नाही तशाच प्रकारचे नाते हे पती-पत्नीतील प्रीतीचे असते. परंतु ही प्रीती व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य त्या

[८५] काशीबाई कानिटकर (१९८०), आत्मचरित्र आणि चरित्र, संपा, सरोजिनी वैद्य, प्र.आ., पृ.१३०)

[८६] संपा. मालशे, 'स्त्री-पुरुष तुलना', पृ.क्र.२१

दोघांनाही नाही ही वास्तव परिस्थिती ताराबाईंनी आपल्या ग्रंथातून स्पष्टपणाने मांडलेली आहे. पती–पत्नीच्या नात्यातील नाजूक धाग्याचे वर्णन केलेले आहे. ताराबाईंच्या विचारांची धार ही त्यांच्या लेखनीच्या माध्यमातून प्रतिबिंबीत झालेली दिसून येते. असे परखड समाजाचा, पुरुषसत्ताक व्यवस्थेला विचारण्याचे प्रथम प्रयत्न ताराबाईंनी केलेले होते. तर एखाद्या व्यक्तीला बालवयात केलेली पत्नी आवडत नसेल तर तिला सोडून काडीमोड घेऊन एकापेक्षा अधिक विवाह करण्याचा अधिकार समाज देत होता. याला 'महात्मा जोतिरावांनी' कडाडून विरोध केला होता. याव्यतिरिक्त 'सामाजिक समस्यांचा विचार' करण्यासाठी, काही एक कृती करण्यासाठी ज्योतिरावांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केलेली होती, ''खालच्या जातीतील स्त्री समस्यांची चर्चा, उच्चवर्णीय स्त्रियांच्या समस्यांबद्दलच्या चर्चेच्या तुलनेमध्ये फारच कमी झालेली दिसते. फुल्यांनी स्त्री शिक्षण, केशवपन, विधवाविवाह या बाबतींत विचार मांडले, अनाथाश्रम काढून केशवपनाला बंदी घालण्यातली न्हाव्यांची सभा घेतली, विधवाविवाह चळवळीत स्त्री समस्यांचा खास विचार, चर्चा केली नाही.''[८७] समाजात कनिष्ठ समजल्याजाणाऱ्या जातीमधील स्त्रियांचे प्रश्न तर निराळेच होते. परंतु समाजसुधारकांनी त्याकडे लक्ष दिल्याचे दिसून येत नाही. कारण, जातिव्यवस्थेच्या सीमारेषा प्रत्येकांच्या मनामध्ये अगदी खोलवर रुजून बसलेल्या होत्या त्या गोष्टीकडे त्यांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले नाही.

### १.१५ पारधी महिलांकरीता संघटनांचे योगदानः–

संघटनांचे पारधी समाजाबाबतचे योगदान अभ्यासत असतांना असे दिसून येते की, महिलांसंदर्भातील सामाजिक चळवळींचा अभ्यास व  चळवळी ह्या सवर्ण समाजातील पुरुष व महिलांनी केलेल्या आहेत. त्यामुळे सवर्ण समाजातील जरी महिला ह्या चळवळींमध्ये सहभागी असल्या तरी त्यांना अवर्ण (पारधी) समाजातील महिलांच्या समस्या व अडी–अडचणींबद्दलची जाण, समरसता याबाबतचा अभाव नेहमीच दिसून येतो. त्यामुळे अशा चळवळी व अभ्यासांचा फायदा हा सहसा अवर्ण समाजाला न होता सवर्ण समाजालाच झालेला दिसून येतो. त्यामुळे चळवळी ह्या सवर्ण समाजाने त्यांच्या फायद्यासाठी केल्या परंतु तोटा मात्र अवर्ण समाजाचा

---

[८७] रानडे प्रतिभा (१९९१), स्त्रीप्रश्नांची चर्चा; एकोणिसावे शतक, पॉल्युलर प्रकाशन मुंबई, प्र.आ., पृ.३७८)

झाला हे सर्वत्र ज्ञात आहे. ह्याबाबत इतिहासात देखील नोंदी आढळतात. उदा. अहिल्याबाई होळकर ह्या अवर्ण समाजातील महिला असून देखील त्यांनी सवर्ण समाजातील महिलांपेक्षा लाखमोलाचे कार्य सर्वच समाजातील महिलांसाठी केल्याची नोंद इतिहासाला घ्यावीच लागलेली आहे. परंतु सद्यस्थितीमध्ये अहिल्याबाई होळकरांसारख्या इतिहासात शौर्य गाजविलेल्या महिलांचा उल्लेख सवर्ण समाजातील महिला किंवा पुरुष नोंदविताना कुठेही दिसून येत नाही.

**पारधी समाजाच्या संघटना प्रमुखांच्या मुलाखती–**

१. **श्री अरुण जाधव**, (लोकाधिकार आंदोलन सर्व भटक्या विमुक्तांसाठी) यांची मुलाखत घेण्यात आली या मुलाखतीमध्ये त्यांनी पारधी समाजाच्या दंतकथा आणि संघटनात्मक योगदाना विषयी त्यांचे विचार मांडले, ते पुढील प्रमाणे–

एकूणच समाजाचा दृष्टीकोण नकारार्थी आहे पारधी म्हणजे चोरी करणारा, असाच आहे. पारधी समाजाने काढलेली दारु बाकी समाज पितो पण त्यांच्या लग्न कार्यात हे बाकी जेवत नाहीत. राज पारधी हे आपापसातील एकमेकांचा लग्न कार्यात जेवत नाहीत पण धनगर पारधी हे आपापसातील कार्यक्रमात जेवतात त्यांच्या अविश्वास आहे त्यांना धोके झाल्याने ते एकमेकांच्यात जेवत नाहीत. पूर्वी पासूनच राजांच्या काळात महिला स्वयंपाक करत नव्हत्या.

– कागदपत्रांच्या अडचणी आहेत, विकासाची पॅकेज नाही. त्यामुळे सरकारी सुविधा मिळत नाहीत. आपल्याकडे कुटुंबाचे नियोजन असते पण या समाजातील शिक्षित व सुज्ञ लोकांचे मार्गदर्शन घेतले जात नाही. सरकार विचार घेत नाही. कुठलही नियोजन नाही सेमिनार नाही, बैठका नाही. समाजातील लेखक, विचारवंत यांचे विचार मंथन होत नाही. कोणत्या योजना राबविल्या जाव्यात याचे मंथन नाही.

– नियोजनातील अंमलबजावणी अधिक महत्वाची असते तीच इथे नाही. यामुळे त्यांच्या अडचणी सुटतच नाही. याची कागदपत्रे नाहीत. खूप बारीक गोष्टीत हा समाज गुंतवूण ठेवला आहे. वर्षानुवर्षी त्यांच्या कागदपत्रा अभावी त्यांचा विकास थांबवला जातो. मग पाच वर्षाच्या पैसा कुठे जातो?

– शिक्षण हे समाजाची मोठी समस्या आहे. शिक्षण हे समतावादी असला पाहिजे ते इथे नाही तर काही लोक पारध्यांचे शोषण करतो तो विषमतावादी शिक्षणाचे लोक आम्हास त्रास देतात.

**संघटना प्रमुख म्हणून अडचणी**

१. आमचा लढा आमच्या घरच्यांशीच आहे तो ५ हजार वर्षापूर्वीचा आहे. देवधर्म, अंधश्रद्धा यांच्या विरोधातील लढे आहेत. आम्हाला आमचे देवघर बाहेर काढायचे आहे. तो विळोखा सोडवायसाठी आम्हांस २५ वर्ष गेले.
२. आम्हाला बाहेरील समाजाने आमच्या विरोधी केलेल्या उपद्यापाचा संघर्ष करावा लागतो.
३. आमचा आर्थिक संघर्ष ही करावा लागतो यासर्वांना पुढे चालू ठेवण्यासाठी हा संघर्ष ही आम्हास करावा लागतो.
४. मतभेदाचा संघर्ष आहेच.
५. यात आमचे आतोनात हाल होतात. आम्हाला खूप कष्ट करावे लागतात.

पण आमचा मार्ग सत्य, खडतर, व स्पष्ट असल्याने आम्ही बरोबर आहोत आणि आम्ही शाहू, फुले, आंबेडकर यांचा वारसा घेवून परिवर्तन करणार आहोत. आम्ही अत्यंत आशावादी आहोत यामुळे आम्ही खचत नाही. आमचे लढे चालूच रहातील आमचा संघर्ष अनादिकाळापासून आहे. आम्ही आमचे कार्य सातत्याने करत राहू. मी प्रचंड काम केले आहे. मला श्रीगोंद्यातील पारध्यांनी पुढारी केला आहे. आमच्या तरुण पिढीतील महिला बदलत आहे. मी खूप नैतिकतेने वागलो आहे, त्या महिलांचा माझ्यावर प्रचंड विश्वास आहे.

– पारधी महिलांची आर्थिक स्थिती अत्यंत वाईट आहे, उपजिविकेचे साधन नाही. समाज स्विकारत नाही. ७५% समाज स्विकारत नाही, गावचा पाटील दारुप्यायला येईल पण घरी कपभर चहा पाजणार नाही, घरकाम देणार नाही, सरकारची मदत नाही, आम्ही पारधी महिलांना गुलामी मुक्तीचा लढा सुरु केला, आपण ही करावा.

– शिक्षणाबद्दल पारध्यांचा दृष्टीकोण असा आहे की त्या म्हणतात शिकून नोकऱ्या नाहीतर शिक्षणाच काय कराव?

- राजकीय स्थिती– नेतृत्व नाही. आत्ता एक पुण्यात नगर सेविका आहे. सध्या ग्रामपंचायत सदस्य, सरपंच या पर्यंत एकही महिला गेली आहे. यांचे मतदान दहशतवाद, लोभ, अंधश्रद्धा या दबावातून होते. महिला ऐवजी पुरुषच कारभार पहातात हे सर्वत्रच आहे.
- पारधी समाजातील महिलांवर लैंगिक अत्याचार सध्या वाढले आहेत. सध्या त्यांचा पुरुष व्यसनाधीन झाल्याने आता हे प्रमाण वाढत आहे. पूर्वी नव्हते. पूर्वी जर एखादा पुरुष तुरुंगात गेला तर त्यांच्या महिला त्यांच्याच समाजातील पुरुषांबरोबर विवाह करायच्या दोन दोन चार चार विवाह त्या स्त्रीचे व्हायचे कधी कधी गावचे सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील इत्यादी सारखे लोक पारध्यांच्या महिलांवर अत्याचार करीत असत. अंतर्गत लैंगिक शोषण होत असते पण तिच्या बाजू लक्षात घेतल्या जात नाहीत. मोठी लोक तीला न्याय मिळू देत नाहीत. सर्वच बायकांवर अन्याय होतोच त्यातून हा दुर्लक्षित घटक आहे. या बायकांचे लैंगिक शोषण मोठ्या प्रमाणात होते. पोलीस लोक, गावगुंड दलाल हे त्यांचे लैंगिक शोषण करतात. या समाजात खूप सुंदर मुली असतात. म्हणून अत्याचार होतात.
- हे क्रॉस ब्रिड आहे. त्यांचे संबंध ब्रिटीशांबरोबर आले आहेत. त्यांचे संबंध हे अशा लोकांशी संबंध येवून क्रॉसब्रिड तयार झाले असावे. त्यांचे जिन्स ब्राम्हण, लंबाणी, पारधी, यामध्ये क्रॉस ब्रिड आहे. हे राजस्थानचे वैगरे नाहीत धनगर पारधी यांच्यात क्रॉस ब्रिड नाही पण फासे पारधी व राज पारधी यांच्यात क्रॉसब्रिड जास्त झाल आहे.

येथील महिलांचे स्वातंत्र्याच्या काळात ही फार मोठे योगदान आहे. १८५७ चा उठावात पुरुष लढत होते. पण स्त्रिया त्यांना मदत करत होत्या त्यांना एक प्रकारे सहकार्य करत होत्या यांचा इतिहास लिहिला गेला पाहिजे. पुस्तके लिहिली पाहिजे महिलांच्या चळवळी आमच्या महिलांकडे लक्ष देत नाही आमची द्वारका व्यवस्थेबरोबर भांडते पण कोणत्या चळवळी पुढे आल्या का? बहुजनांचे संशोधन पुढे आले पाहिजे. पारधी समाजाच्या विकासासाठी काम करणारी संस्था, संघटना अस्तित्वात नाही. हा समाज मुळातच विस्कळीत, अशिक्षित, दबलेला, अन्याय–अत्याचाराने पिडीत असलेला व इतर संघटनांकडून दूर्लक्षित असलेला हा समाज व त्यातील महिला आजून देखील सुधारणांपासून वंचित आहेत.

२. **श्री प्रमोद बाजीराव काळे**, (लोकाधिकार आंदोलन जिल्हा सचिव) आणि श्री बबन खिसमिस भोसले, शेती संघटनेचे कार्यकर्ते) यांची संयुक्त मुलाखत घेण्यात आली या मुलाखतीमध्ये त्यांनी पारधी समाजाच्या संघटनात्मक योगदाना विषयी त्यांचे विचार मांडले, ते पुढील प्रमाणे–

पारधी समाजात अंधश्रद्धा आहेत. प्रश्नांचे जाळे आहे. रोजगार, उदरनिर्वाह, शिक्षण नाही, बालविवाह आहेत, इतर समाजाचा दृष्टीकोन अत्यंत नकारात्मक आहे. तालुक्यातील गावांचा विचार करता समाजाचा लोक प्रतिनिधी नाही. उदार निर्वाहाची साधने नाहीत. पूर्वपरंपरागत मानसिकतेमुळे सध्या लोकांमध्ये काम करण्याची मनस्थिती नाही.

महिलांना अस्पृश्य म्हणून पाहिले जाते, पारधी समाजातील लोक त्यांनी बनविलेले अन्न खात नाहीत. महिलांना घराबाहेर वेगळी आंघोळ करावी लागते. महिलांनी तयार केलेले अन्न कुणी खात नाही. महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. पिढीजात रिवाज कुणी सोडायला तयार नाहीत. जुन्या लोकांच्या विचारधारेचा नविन पुढीला त्रास होत आहे.

पारधी समाजात संघटनामार्फत प्रबोधन मेळावे चालू आहेत. यामध्ये स्त्री–पुरुष समानता यासारख्या विषयावर प्रबोधन करतो. गावातील बैठका आयोजित केल्या जातात, प्रश्न विचारतो, चाली–रिती संबंधात चर्चा करतो. पारध्याबरोबरच इतर जातीच्या लोकांमध्ये देखील प्रबोधन केले जाते. यामुळे नविन लोकांची मानसिकतेमध्ये बदल होत आहेत. समाजामध्ये दंतकथा आहेत परंतु त्या कुणाला माहित नाहीत. पारधी समाजात देव–देव खूप करतात. हे सर्व केल्याने देवाचा अपमान होत असल्याची भावना असल्याने ह्या समाजात चालीरिती रूढी परंपरा आहेत. सध्या संघटनामार्फत २५ जणांची टीम केली आहे व प्रबोधनाची कामे सुरु केली आहेत.

अंधश्रद्धा, बालविवाह, व्यसनाधिनता, देव–देव, एकमेकांवर खोटे आरोप घ्यायचे व आपपसात भांडणे करतात. जातपंचायत अद्याप चालू आहे. यामुळे समाज सुधारत नाही. समाज एकी आहे पण अंतर्गत संघर्ष, कलह व खोट्या आरोपाखाली सातत्याने थोडे संघर्ष असतात. इतर समाजातील पाटील लोक असल्याने सरकारी व्यवस्थेकडून अनास्था असल्यामुळे न्यायासाठी जातपंचायतीवर अवलंबून असतात. महिलांना जातपंचायत संविधानिक अधिकार

देत नाहीत, उदा. संचार स्वातंत्र्य, निर्णय स्वातंत्र्य, बालविवाहामुळे महिलांमध्ये निर्णयक्षमता नसते. समाजामध्ये पुरुषांचे आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे, ते रेकॉर्डवर येत नाही, त्यांच्या आत्महत्येची कारणे कर्जबाजारीपणा, पत्नीचे गैरसंबंध, पोलिसांचे खोटे आरोप, समाजातील अंतर्गत वाद, समाजातील खोटे आरोप असे आहेत. महिला फारशा आत्महत्या करत नाहीत.

नोकरी लागल्यानंतर समाजासाठी काहीही कामे करत नाहीत. बाकी इतर श्रीमंत होऊ नयेत म्हणून अंतर्गत भांडणे लावणे, त्यामुळे त्यांचे समाजासाठी काहीही योगदान नाही. त्यांना वाटते की, या दलदलीतून बाहेर पडलो पण आता जर दुसऱ्यांना मदत केली तर आपणच अडचणीत येऊ खोटेनाटे आरोप करून ते आपल्यालाच अडचणीत आणतील अशी त्यांना भीती वाटते. म्हणून कदाचित ते पुन्हा समाजात येत नाहीत. पारधी समाजातील माणसे एकमेकांना मागे खेचतात, इतराला पुढे जावू देत नाहीत. समाज सुधारणा होण्यासाठी बचत गटांची कर्ज महिलांना मिळावीत. जमीन मिळावी, मुलांना शिक्षणासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. प्रबोधन करण्याची जबाबदारी सरकारमार्फत संघटनावर सोपवावी. समाजातील मुलांसाठी स्वतंत्र वसतीगृह असावे, समाजासाठी स्वतंत्र अंगणवाड्या असाव्यात, समाजामधील असलेल्या असुरक्षित भावनेमुळे शाळा बाह्यतेचे प्रमाण खूप आहे. व्यवसायासाठी प्रशिक्षण व कर्ज द्यावे. शासनाकडून समाजाचा सर्व्हे करण्यात यावा आणि नविन माहिती पुढे आणावी.

३. **श्री अजित भोसले**, (जिल्हा अध्यक्ष, आदिवासी फासेपारधी संघटना) यांची मुलाखत घेण्यात आली या मुलाखतीमध्ये त्यांनी पारधी समाजाच्या संघटनात्मक योगदाना विषयी त्यांचे विचार मांडले, ते पुढील प्रमाणे–

पारधी लोकांकडे दाखले नाहीत, शिधा वाटप पत्रिका (कुपन) नाही, आधार कार्ड नाही. समाज मागासलेला आहे. अंधश्रद्धा आहे. महिलांचा प्रश्न गंभीर आहेत. समाजातील वयस्कर मंडळी समाज सुधारणेचे बदल होऊ देत नाहीत परंतु तरुण बदलत आहेत. तरुणांना वाटते की, समाज सुधारणेच्या वाटेत वयस्कर मंडळी ही मोठी अडकाठी आहे. वयस्कर लोक बंधने आणतात. समाजात वैयक्तिक स्वच्छेतवर कमी लक्ष दिले जाते. समाजात ८० टक्के लोक अद्यापही अस्वच्छ राहतात. २० टक्के लोक इतर सुधारलेल्या समाजाकडे बघून सुधारतात.

आळशीपणामुळे काहीही कामधंदा नाही. रिकामा वेळ नुसते बसून खाणे, पिणे, झोपणे यासाठी कुणी चोऱ्या करतात, गवंडी कामे करतात. समाजात एकमेकांच्या लग्नात महिला जेवणात. बाकी कुणीच जेवण करत नाहीत. समाजामधील लग्ने आता मराठा समाजाच्या रिती रिवाजाप्रमाणे करण्यास सुरुवात झाली आहे. त्यामध्ये जेवण करण्यासाठी आचार्यांना बोलविले जातते. असे बदल करण्यासाठी आदिवासी फासेपारधी संघटना पूर्ण प्रयत्न करत आहे. शासनाच्या सुविधा मिळाल्या तर जसे की, घरकुल, गायपालन, शेळीपालन, तर समाजाची स्थिती सुधारेल अशा सुविधा दिल्या तर सुशिक्षित बेरोजगारांन रोजगार उपलब्ध होईल. तसेच शासनाने रसवंतीगृह, किराणामाल दुकान, कपड्याचे दुकान असे उद्योग बेरोजगारांना शासनाने उपलब्ध करून द्यावेत.

संघटनेच्या वतीने समाजातील होतकरू तरुणांना पोलिस भरती करता प्रशिक्षण दिले जाते. सातत्याने शासनाने कौशल्य आधारित प्रशिक्षण सुरु करावे. शासनाने मुलींना पोलिस भरतीमध्ये आरक्षण द्यावे. श्रीगोंदा तालुक्यामध्ये समाजातील महिलाचा व पुरुषांचा एक-एकच बचत गट आहे. हे बचत गट पंचायत समितीला जोडले पाहिजेत. शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजना या गटामार्फत समाजासाठी मिळविण्यासाठी प्रयत्न केला असता, शासनाकडून निराशाजनक उत्तरे प्राप्त होतात. शासकीय अधिकारी पारधी समाज म्हणून गुन्हेगारी प्रवृत्तीचा समाज अशा दृष्टीनेच हाताळणी करतात व शासनाच्या योजना समाजाच्या विकासासाठी न पोहचू देण्याचे प्रयत्न करतात. संघटनेत समाजातील सर्व लोक विचार विनिमय करत नाहीत. परस्पर सहकार्य करत नाहीत. मदतीची भावना नसते, काही कामे अडली तरच लोक संघटनेकडे धाव घेतात.

### १.१६ स्त्रीवादी चळवळींची उगमस्थाने :-

एकोणिसाव्या शतकातील स्त्री चळवळीने कुटुंब आणि समाज यांमधील स्त्रियांच्या हक्कांचा प्रश्न पुढे आणला. स्त्रियांच्या दुय्यम स्थानाविषयीच्या पूर्वीचे विचार कल्पनात्मक समर्थनांतमधून बाहेर पडण्यासाठी या चळवळींमधून असा युक्तिवाद मांडला गेला की, स्त्रिया या संपूर्ण मानव आहेत. पुरुषांबरोबरीने त्यांच्यातही सुप्त गुणधर्म आहेत व त्यांचे आकलन

होण्यासाठी संधी मिळण्याचा त्यांनाही समान हक्क आहे. पितृसत्ता ही एक दडपणुकीची व्यवस्था आहे, अशी या काळातील स्त्रीवादी अभ्यासकांची धारणा नव्हती. त्याचे एक कारण तत्कालिन विचारातच संपूर्ण समाजच शोषण आणि विसंगती यांनी संरचित झालेला असतो अशी धारणा नव्हती. आयझेन्स्टाईनने म्हटले आहे की मेरी वॉलस्टोनक्राफ्ट, एलिझाबेथ केडी स्टॅण्डन व हॅरिएट मिल सारख्या स्त्रियांनी त्यांच्या विस्कळीत पद्धतीने जाणले होते की, लैंगिक विश्वांमध्ये विभागलेल्या समाजात पुरुषांना केवळ ते पुरुष आहेत म्हणून सत्ता मिळते. पण सत्तेचा वर्गाच्या संदर्भात विचार करत असताना श्रमाचे लैंगिक विभाजन आणि समाज यांच्यामधून स्त्रियांवर लादल्या जाणाऱ्या सत्तेच्या संरचनांचे त्यांना नुकतेच आकलन होऊ लागले होते. लैंगिक दुय्यमता, श्रमाचे लैंगिक आधारांवरील विभाजन आणि आर्थिक वर्ग संरचना यांमधील महत्वाच्या परस्परासंबंधांचा विचार न केल्यामुळे त्यांचा (वरील अभ्यासकांचा) विचार सुधारक/सुधारणावादी स्वरुपाचाच राहिला. (आयझेन्स्टाईन, १९७९: १६)

समान हक्काची मागणी करताना देखील या स्त्रीवादी अभ्यासकांनी भिन्न लैंगिक ‘विश्वाची’ संकल्पना मान्य केली होती असे दिसते. उदाहरणार्थ, स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा व राजकारणात त्याचा सहभाग असणे आवश्यक आहे. कारण त्यांच्या स्त्रीजातीय शांत स्वभावाचा सार्वजनिक जीवनावर चांगला परिणाम घडून येईल असा युक्तिवाद त्यांनी मांडला. पुढे त्यांनी असेही म्हटले की स्त्रियांना सत्ता व स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे याचे एक मूलभूत कारण म्हणजे स्त्रियांचा मातृत्वगुण. स्त्रियांनी घर टाकून द्यावे असा आग्रह (त्यांनी) धरला नाही; आणि १९३० च्या सुमारास काही स्त्रीवादी अभ्यासकांनी म्हटल्याप्रमाणे– पुरुषांनी घरकामात सहभागी व्हावे असा विचारही (त्यांनी) केला नाही. (लिंडा गॉर्डन; ११२) या स्त्रीवादी अभ्यासकांनी एकोणिसाव्या शतकातील पितृसत्ताक संरचनांना आव्हान देणाऱ्या लढाऊ कृती मांडल्या तरीही त्यांनी त्यांच्या कृतींचे सिद्धान्तन विकसित केले नाही. त्याचप्रमाणे कुटुंब संस्थेविरुद्ध एक संपूर्ण स्वरूपाचे आव्हानही तयार केले नाही. याचे एक कारण असे असावे की एकोणिसाव्या शतकातील भांडवलशाही व्यवस्थेतील कुटुंबसंस्था अजून विसंगतीच्या टोकाला पोचली नव्हती व बहुतांश स्त्रियांना लग्नाशिवाय तरणोपायही नव्हता. (एलन द्युबुवा, १४९)

द जर्मन आयडिऑलॉजी (जर्मन विचारप्रणाली) या ऐतिहासिक जडवादावरील ग्रंथात मार्क्स आणि एंगल्स यांनी स्त्रियांसंबंधी अत्यंत महत्वाचे विचार समाविष्ट केले आहेत. मूलभूत मानवेतिहासाची चर्चा करताना त्यांनी असे प्रतिपादन केले आहे की जडवादी जीवन आणि 'नवीन गरजां' बरोबरच पुनरुत्पादनाचाही विचार व्हावा. मानवी इतिहासाच्या विकासात सुरुवातीपासूनच प्रविष्ठ असणारी तिसरी परिस्थिती म्हणजे दररोज स्वत:चे जीवन नव्याने/पुन: घडवणारा मानव स्वजातीय जीवांची उत्पत्ती/प्रसारण करण्यासाठी इतर मानवांची निर्मिती करू लागतो. यातूनच स्त्रिया व पुरुष, मुले व आई–वडील, म्हणजेच कुटुंब होते. सुरुवातीला केवळ एक सामाजिक नातेसंबंध म्हणून असणारे कुटुंब पुढे वाढत्या गरजांनी नव्या सामाजिक संबंधांची निर्मिती केल्यानंतर व वाढत्या लोकसंख्येमुळे नव्या गरजा उत्पन्न झाल्यानंतर दुय्यम स्थानवार जाते. या अवस्थेत उपलब्ध असणाऱ्या अनुभवजन्य माहितीवरून कुटुंबाचे विश्लेषण करावे लागते. सामाजिक कृतींची ही तीन अंगे म्हणजे अर्थातच तीन वेगवेगळ्या अवस्था/टप्पे नसून मी म्हटल्याप्रमाणे ही तीन अंगे इतिहासाच्या उष:कालापासून व पहिल्या मानवापासून एकाच वेळी उपस्थित/अस्तित्वात असतात आणि आजही इतिहासात स्वत:चे महत्व ठसवीत आहेत. जीवनोत्पादनाचे– म्हणजे श्रमात स्वत:चे उत्पादन आणि नव्या जीवाचे उत्पादन यांचे– जनक्रियेत एक दुहेरी नाते निर्माण झाल्यासारखे दिसते. हे नाते एकीकडे नैसर्गिक आहे तर दुसरीकडे ते सामाजिक संबंधाच्या स्वरुपात आहे.[८८] यापुढे मार्क्स व एंगल्स उत्पादनाच्या इतर दोन रूपांबरोबरच 'जीवनोत्पादना'ची ही उत्पादक शक्ती म्हणून वर्गवारी करतात. त्याभोवती तयार होणाऱ्या सामाजिक संबंधांचे वर्णनही 'समाजाची स्थिती' (यालाच पुढे उत्पादन संबंध असे त्यांनी म्हटले आहे) असे केले आहे. त्याचप्रमाणे पुढे, जाणिवा या पहिल्या दोन उत्पादन प्रकारांचे परिणाम आहेत असे त्यांचे विश्लेषण केले आहे. पण यानंतर मात्र मार्क्सने 'जीवनोत्पादन' (आणि त्याबरोबर कुटुंब) यांच्यावरील त्याचा पूर्वीचा भर विकसित केला नाही, किंवा कायमही राखलेला दिसत नाही. कदाचित त्याने केवळ असे गृहित धरले असावे की, भांडवलशाहीमधील उत्पादक शक्तीच्या प्रचंड विकासामुळे उत्पादनाचा हा प्रकार इतका 'दुय्यम' गणला जाऊ लागला की, त्याचे महत्व कमी झाले. कारण काही असले तरी कॅपिटल या त्याच्या प्रमुख ग्रंथामध्ये श्रमशक्तीच्या उत्पादनाचे विश्लेषण जवळजवळ पूर्णपणे दुर्लक्षित राहिले आहे

[८८] मार्क्स व एंगल्स (१९७२) पृ.२५–२९

आणि अस्तित्वात असलेल्या पितृसत्ताक कुटुंबपद्धती गृहीत धरून भांडवलशाहीच्या विश्लेषणात एक महत्वाची रिकामी जागा तशीच राहू दिली आहे. याचबरोबर स्त्रियांच्या विशेष दडपणुकीचा महत्वाचा प्रश्न तसाच दुर्लक्षित राहतो हे वेगळे सांगायला नकोच. मात्र एंगल्स कुटुंबाच्या विश्लेषणाकडे परत वळला आहे. ओरिजिन ऑफ द फॅमिली प्रायव्हेट प्रॉपर्टी अॅण्ड द स्टेट (कुटुंब संस्था, खाजगी मालमत्ता आणि राज्यसंस्था यांचा उगम) हा ग्रंथ इ.स.१८८४ मध्ये प्रथम प्रकाशित झाला, आणि आजही हा एक महत्वाचा ग्रंथ मानला जातो. विशेषत: उत्पादक शक्तींच्या विकासाची राज्यसंस्था आणि कुटुंबसंस्था या सारख्या संस्थांमधील बदलांशी त्यात घातलेली सांगत आजही अतुलनीय आहे. स्त्रियांचे शोषण हे सामाजिक ऐतिहासिक विकासाचे केंद्रस्थान आहे व कुटुंब ही एक अत्यंत महत्वाची सामाजिक संस्था आहे. यावर त्याने दिलेला भर एकमेवाद्वितीय आहे. सैद्धान्तिक दृष्टिकोनातून पाहिल्यास मात्र या ग्रंथात एकमेकांशी पूर्णपणे तादात्म्य न पावलेले दोन भाग दिसतात.

सामाजिक संरचनेची व्याख्या बनविण्यासाठी 'जीवनोत्पादन' हा घटक क्रयवस्तूंच्या उत्पादनाइतकाच महत्वाचा घटक आहे असे त्यात म्हटले आहे. येथे एंगल्सने असे सूचित केले आहे की, वर्गपूर्व समाजात अशा रीतीचे 'जीवनोत्पादन' घडवणारे 'लैंगिक संबंध' (म्हणजे नातेसमूहांमधील संबंध) प्रबल असतात. हे सूत्र आधुनिक मार्क्सवादी मानववंशशास्त्रीय विश्लेषणची दिशा दर्शविते. याच सूत्रामधून एंगल्सच्या राज्यसंस्थेच्या उगमाच्या चर्चेची चौकट तयार होते. भूक्षेत्राच्या आधारावर आयोजित झालेल्या राज्यसंस्थात्मक संरचनांना नातेसंबंधावर आधारित आदिवासी राजकीय संघटनांना नष्ट करावे लागते असे त्यात अंतर्भूत आहे. परंतु, कुटुंबसंस्थेचा उगम आणि विकास याची चर्चा करताना हा वरील दृष्टिकोन वापरलेला नाही. येथे, कुटुंबसंस्था ही नातेसंबंधावर आधारित अशी आदिवासी समाजामधील संरचनांशी निगडित किंवा विरोधात्मक संस्था आहे असे मानण्याऐवजी एंगल्स असे दर्शवतो की उत्पादनातील बदलांवर आधारलेल्या बदलत्या उत्पादनपद्धतींमधून कुटुंबसंस्था उत्क्रांत होत असते. थोडक्यात सांगायचे तर येथे एंगल्सचा दृष्टिकोन अधिक यांत्रिक आणि अर्थवादी आहे. एंगल्सच्या भूमिकेची सांगोपांग समीक्षा 'मातृसत्ता' या निबंधात केली जाईल. परंतु येथे दोन मुद्दे मांडता येतील. एंगल्सचे महत्वाचे योगदान म्हणजे 'स्त्री' हा निसर्गत: बनलेला 'दुय्यम लैंगिक वर्ग' नसून

दडपणूक करणाऱ्या कुटुंबरचनेत स्त्रियांचे शोषण होते व ही शोषण व्यवस्था ऐतिहासिकरित्या निर्माण झाली असून ती ऐतिहासिकरित्याच अदृश्य होऊ शकते. एंगल्सने पितृहक्क/पैतृक हा शब्दबंध वापरला असला तरी 'पितृसत्ता' ही संकल्पना त्यात समाविष्ट होती. असे असूनही एंगल्सचे विश्लेषण बऱ्याच अंशी अर्थवादी आणि एकारलेले आहे.

स्त्री-मुक्ती चळवळ आणि त्या अंतर्गत चळवळीतील न्यूयॉर्क रॅडिकल फेमिनिस्ट्स किंवा रेडस्टॉकिंग्ज यासारखे समूह उदयाला येण्याच्या नवीन लाटेबरोबरच, १९७० च्या सुमारास केट मिलेट चे सेक्श्युअल पॉलिटिक्स (लैंगिक राजकारण) आणि शुलामिथ फायरस्टोनचे द डायलेक्टिक्स ऑफ सेक्स (लैंगिक द्वंद्ववाद) ही पुस्तके प्रकाशित झाली. या दोन्ही पुस्तकांमध्ये पितृसत्ता ही पुरुषांच्या स्त्रियांवरील सत्तेची एक व्यापक व्यवस्था आहे असे म्हटले आहे. विशेषत: स्त्रियांच्या लैंगिक व्यवहारावर ही सत्ता असते आणि ही व्यवस्था इतिहासात वर्गभेदांच्या आधीपासून व अधिक मूलभूत स्वरुपाची असते. पितृसत्ता या संज्ञेची मिलेटने बनवलेली व्याख्या या संज्ञेचा सर्वव्यापी वापर दर्शवते. आपला समाज पितृसत्ताक आहे....लष्कर, उद्योगधंदे, तंत्रज्ञान, विद्यापीठे, शास्त्रे, राजकीय अधिकारपदे अर्थव्यवस्था- थोडक्यात पोलिसदलासारख्या जुलमी व्यवस्थेसकट सत्तेचे सर्व मार्ग- पुरुषांच्या हातात आहेत हे लक्षात घेतल्यास आपल्याला (वरील विधानातील) वस्तुस्थिती स्पष्टपणे दिसेल. (मिलेट, १९७० : २५)

पुरुषी सत्तेचे अस्तित्व समाजव्यवस्थेच्या उगमा इतके प्राचीन आहे. अशासारखे तत्कालिन मानव्यविद्याशाखांनी मांडलेले विचार मूलग्राही स्त्रीवादाने स्वीकारले आहेत. वस्तुस्थिती यापेक्षा वेगळी होती असा भास निर्माण करणाऱ्या गोष्टी म्हणजे घरातील स्त्रीचा 'गृहलक्ष्मी' म्हणून होणारा गौरव, 'मातृत्वा'ची थोरवी, मातृदेवतांचे पूजन वगैरे गोष्टी- स्त्रीला 'देव्हाऱ्यात' बसवून तिला दुय्यम ठरविण्याचे मार्ग आहेत असे म्हणून त्यांची संभावना केली गेली. म्हणजेच पुरुषी सत्ता मूलभूत आणि अनैतिहासिक आहे असे ठरवून तिचे मुख्य अंग लैंगिक संज्ञांच्या संदर्भात पाहिले गेले.

इ.स.१९६० च्या दशकाच्या शेवटी शेवटी आणखी एक क्षेत्र सिद्धान्तनासाठी उघडे केले गेले. यात घरकाम, जननक्रिया, बालसंगोपन आणि पुरुष कामगार आणि मुलांचे संवर्धन/पोषण या प्रश्नांवर भर दिला गेला. 'घरकामाचे राजकारण' आणि त्याची जबाबदारी केवळ स्त्रियांवरच का असावी, पुरुषांवर का नसावी या प्रश्नाबाबत चळवळीतील स्त्रिया नेहमीच जागरूक होत्या. पण मार्गारिट बेण्टसन (इ.स.१९६९) यांच्या लेखांमधून हेही स्पष्ट झाले की घरकाम हे केवळ त्रासदायक, कष्टकारक आणि कधी न संपणारे पण क्षुल्लक काम नाही. तर त्याला आर्थिक महत्वही आहे. कारण मुख्य पुनरुत्पादनाचे काम आहे, म्हणजेच श्रमशक्तीच्या उत्पादनाचे काम आहे आणि श्रमशक्ती ही भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील सर्वात महत्वाची 'क्रयवस्तू' आहे. मारिया रोझा देल्ला कॉस्सा या इटॅलियन स्त्रीवादी अभ्यासकाने लिहिलेल्या लेखामधून हा विचार मार्क्सवादी चर्चा आणि चळवळीच्या केंद्रस्थानी आला (१९७२–७३) स्त्रियांचे घरातील श्रम हे केवळ देल्ला कॉस्ताचा युक्तिवाद नव्हता तर तिच्या म्हणण्याप्रमाणे कारखान्याच्या पातळीवरील संघर्षापलिकडे जाऊन सामाजिक पातळीवरील व्यापक क्रांतिकारी व्यूहरचना उत्क्रांत करण्यासाठी या घटनेचा वापर केला जाऊ शकतो. म्हणजेच त्यातून एक खरीखुरी 'सामाजिक उलथापालथ' घडून येऊ शकते. या कारणासाठी केलेली महत्वाची मागणी 'आर्थिक' तर होतीच, पण त्याचबरोबर ती निव्वळ सुधारणावादापलिकडे जाणारी व भांडवलशाहीच्या मुळावरच घाव घालणारीही होती. ही मागणी म्हणजे 'घरकामाच्या वेतनाची' मागणी.

इ.स.१९८० पासून पुढे चाललेल्या स्त्री चळवळीमध्ये आणि सिद्धान्त प्रक्रियेमध्ये वरील प्रश्नांचे निराकरण करण्याची व त्यांना सामोरे जाण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. स्त्रीवादी विचार आणि दृष्टिकोन यांना एकूण सामाजिक, शास्त्रीय सिद्धांताच्या जवळ आणण्याच्या एकूण प्रयत्नांमध्ये चार मुख्य मतप्रवाह पाहता येतील.

१) संपूर्ण विश्लेषण साध्य करण्याचा प्रयत्न न करता 'पितृसत्ता' ही संकल्पना तशीच वापरत राहणे व त्यात अंतर्भूत असलेला द्वैतभावी दृष्टीकोन तसाच कायम राखणे.

२) स्त्रियांच्या श्रमावरील नियंत्रण हा घटक केंद्रस्थानी मानून, मानवी समाजाच्या बदलत्या रुपातील एक विशिष्ट श्रमप्रकार अशी स्त्रियांच्या श्रमाची व्याख्या करणे. या दृष्टिकोनाला पितृसत्तेच्या विश्लेषणाचा 'श्रम' किंवा 'पुनरुत्पादनवादी दृष्टिकोन' असे म्हणता येईल.

३) काही जण वरील दृष्टिकोनाशी संबंधित पण अधिक पारंपारिक मार्क्सवादी दृष्टिकोन मांडतात. स्त्रियांच्या दुय्यम स्थानाची व्याख्या पुनरुत्पादन संबंधांच्या संदर्भात म्हणजे 'श्रमवादी दृष्टिकोनाशी' निगडित असली तरी 'पुनरुत्पादनसंबंध' मुळात उत्पादन संबंधांमधून निर्धारित होतात असा त्यांचा आग्रह आहे.

४) शेवटी, पितृसत्तेच्या ''विचारप्रणालीवादी सिद्धान्तनात'' मानसिक/विचार कल्पनात्मक संरचना या पितृसत्तेतील सारभूत संरचना आहेत या विचारावर भर दिला जातो. पितृसत्ता आणि उत्पादनपद्धती यांच्यामधील संबंधांचे विश्लेषण करताना या दृष्टिकोनात मार्क्सवादाच्या नवीन (अल्थूझरनंतरच्या काळातील) मीमांसेचा म्हणजेच इमारत/ अतिसंरचन या संकल्पनेचे सुधारित रूप आणि पाया या संकल्पनेशी असलेल्या तिच्या संबंधांचे सुधारित सिद्धान्त यांचा आधार घेतला जातो.

पुरुष इतिहासाच्या वर्गप्रणित संरचनांमध्ये प्रवेश करु शकतात, पण स्त्रियांची व्याख्या (एक स्त्री म्हणूनच, मग उत्पादनात त्यांचे काही का श्रम असेनात) मात्र नातेसंबंधाच्या व्यवस्थांच्या आयोजनाद्वारे केली जाते. वर्ग, ऐतिहासिक कालखंड, विशिष्ट सामाजिक परिस्थिती यांमधील भेदांमुळे स्त्रीत्वाची अभिव्यक्ती बदलेल, पण पितृविधानाच्या संदर्भात सर्व स्त्रियांचे स्थान सारखेच असते.

मिचेलने स्पष्टपणे म्हटले आहे की पितृसत्ताक विचारप्रणालीच्या या संरचेनला भांडवलशाही वर्ग समाजात काही खास कार्य नसते. परिणामत: दोन भिन्न स्वरूपाच्या क्रांतिकारी संघर्षाची मागणी करणाऱ्या द्वैतभावाची निर्मिती होते– एक म्हणजे पितृसत्तेच्या विरुद्ध स्त्रीवादी सांस्कृतिक संघर्ष आणि दुसरा, भांडवलशाही विरुद्ध आर्थिक संघर्ष, रुबिननेही मिचेल सारखीच भूमिका घेतली आहे.

स्त्रीवादाने नातेसंबंधांमधील क्रांतीची मागणी केली पाहिजे. (पूर्वी) लिंग–लिंगभाव यांच्या आयोजनाला एक कार्य होते : ते म्हणजे समाजाचे संघटन. आता हे आयोजन स्वत:लाच संघटित आणि पुनरुत्पादित करते. (रुबिन, १९७५ : १९९)

### १.१७ पारधी महिलांचा स्त्रीवादी चळवळीमध्ये सहभाग :–

वासाहतिक काळात आदिवासी जमाती आणि ग्रामीण भागात सुरु झालेल्या संघर्ष व क्रांत्यांमध्ये स्त्रियांनी पुरुषांबरोबर सहभाग घेतला. बंगालमध्ये तिभागा चळवळ, निजामाच्या राज्यापूर्वीचा तेलंगणातील सशस्त्र संघर्ष तसेच महाराष्ट्रातील वारली जमातीच्या बंधुना गुलामगिरीच्या विरूद्ध क्रांती ही काही उदाहरणे आहेत. स्त्रीवादी महिलांच्या चळवळींमध्ये पारधी महिलांचा सहभाग आढळून येत नाही. कारण पारधी समाजात पुरुषप्रधान संस्कृती असल्याने आणि पारधी महिलांना दुय्यम स्थान असल्याने पारधी महिला संघटित होऊ शकल्या नाहीत. तथापि, स्त्रीवादी चळवळींमध्ये, सर्व सामान्य महिलांच्या सहभागावर भाष्य करणे आवश्यक आहे.

१९४७ पूर्वी स्त्रियांची चळवळ एक सक्रिय चळवळ होती तर नंतर त्याचे काय झाले. याचे असे एक विश्लेषण केले जाते की, राष्ट्रीय चळवळीत भाग घेणाऱ्या बऱ्याचशा स्त्रिया राष्ट्र निर्मितीच्या कार्यात सहभागी झाल्या. इतर लोक विभाजनाच्या आघाताला जबाबदार मानतात. १९७० च्या दशकाच्या मध्यात भारतामध्ये स्त्रियांच्या चळवळीचे नुतनीकरण झाले. काही लोक याला भारतीय स्त्री चळवळीचे दुसरे पर्व म्हणतात. नंतर संघटनात्मक डावपेच तसेच विचारधारा या दोन्हीमध्ये परिवर्तन झाले. स्वायत्त स्त्री चळवळ म्हटली जाणाऱ्या चळवळीत वाढ झाली. राजकीय पक्षांना स्त्रियांच्या प्रश्नांना वेगळे ठेवण्याची प्रवृत्ती असते असा अनुभव येत होता. संघटनात्मक परिवर्तनापेक्षा काही नवीन मुद्देही होते, ज्यांच्याकडे लक्ष दिले गेले. उदाहरणार्थ, स्त्रियांवरील हिंसेचा मुद्दा गेल्या काही वर्षात अनेक अभियाने चालविली गेली. आपण पाहिले असेल की, शाळेच्या प्रवेशपत्रात आई व वडील या दोघांची नावे असतात. असे अगोदर नव्हते. अशा प्रकारे स्त्रियांच्या चळवळीमुळे महत्त्वपुर्ण अशी कायदेशीर परिवर्तने झाली आहेत. जमीनीचा अधिकार व रोजगाराच्या प्रश्नांचा वाद, लैंगिक शोषण तसेच हुंडयाविरोधी अधिकारांच्या मागणीसोबत लढले गेले. पितृसत्तेचे विचारप्रणाली–स्वरुप ही कायम अस्तित्वात असणारी एक संरचना आहे व भांडवलशाही या संरचनेशी काही नाते नसते असे गृहीत धरल्यामुळे हा दृष्टिकोन पुनः एकदा एका द्वैतभावाकडे वळतो. त्याचप्रमाणे असे

विचारकल्पनात्मक रूप का राखले जाते याचे विवेचन न करता आल्यामुळे या दृष्टिकोनाला एका आदर्शवादाचाही आश्रय घ्यावा लागतो.

आर्य व द्रविड, महाभारत व रामायण, सिंधू खोऱ्यातील समाज–संस्कृती व भारतातील भौतिक/जडवादी आणि आत्मिक परंपरा यांविषयीचे उलसुलट स्वरूपाचे वादविवाद उसळत असतानाच, शरद पाटील यांच्या दासशुद्र स्लेव्हरी इन इंडिया या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर मातृसत्तेच्या प्रश्नाला पुन: एकदा उठाव मिळाला आहे. पाटीलांनी असे म्हटले आहे की भारतातील नांगरशेतीवर आधारित आर्यपूर्व आदिवासी समाज आणि हरप्पा समाज संस्कृती देखील मातृसत्ताक स्वरूपाचे समाज होते. या समाजात उत्पादन साधनांवर स्त्रियांचे नियंत्रण असल्यामुळे त्यांना समाजावर अंमल चालविता येत असे. पितृसत्ताक कुटुंबाच्या ठिकाणी मातृवंशपरंपरावादी आणि मातृसत्ताक टोळ्या अस्तित्वात होत्या. स्त्रिया या पहिल्या 'पत्नी' होत्या तर त्यांच्या पुरुष जोडीदारांना वेळोवेळी सुगीच्या रक्तरंजित समारंभात बळीही दिले जात असे. मातृदेवतांच्या संप्रदायाच्या/उपासनापंथाच्या खऱ्या युगात स्त्रिया पौरोहित्यही करीत असल्यामुळे त्यांना धर्मावरही नियंत्रण गाजवता येत असे. पुरुषांचे नियंत्रण असणारे कळप व नांगरशेती यांच्या विकासानंतरच या प्राचीन मातृसत्ता उलथून टाकण्यात आल्या आणि त्याचबरोबर या मातृसत्ताचे अवशेष असणाऱ्या मातृवंशपरंपरावादी जमातींचेही उच्चाटन होऊन त्यांच्या जागी पितृवंश परंपरावादी आणि आदिवासी समाज प्रस्थापित झाले, व त्यानंतरच संपूर्णपणे पितृसत्ताक स्वरूपाच्या राज्यसंस्थेचा उदय झाला. देबीप्रसाद चट्टोपाध्याय आणि जॉर्ज टॉम्सन यांसारख्या पारंपारिक मार्क्सवादी विचारवंतांप्रमाणेच पाटिलांचेही मत असे आहे की सर्व समाज याचसारख्या स्थित्यंतरातून गेले. भारतातील स्थित्यंतराचे विशेष लक्षण म्हणजे जाती आणि वर्णांची रचना, व आर्य व द्रविड यांच्यामधील संघर्ष या घटना या स्थित्यंतराबरोबरीनेच घडून आल्या. प्राचीन द्राविडी समाज मातृवंशपरंपरावादी असून मातृसत्ताक स्वरूपाचा शेतकरी व्यवसाय करत, तर प्राचीन आर्य जमाती पितृसत्ताक स्वरूपाच्या असून मेंढपाळीच्या अवस्थेत होत्या.

वरील विचार अनेक दृष्टिने स्वागतार्ह आहे, विशेषत: स्त्रियांसाठी, कारण आपण नेहमीच दडपलेल्या व न्यून प्रतीच्या नव्हतो तर एके काळी समाजावर अंमलही गाजवीत होतो हा मोठाच

दावा त्यांना करता येण्याजोगा आहे. वरवर पाहता तरी हा विचार संपूर्णपणे मार्क्सवादी अथवा जडवादी आहे कारण 'मातृसत्ताक सिद्धांतना'तून असे स्पष्ट होते की कुटुंबसंस्थेसारखी 'निरंतर' आणि 'नैसर्गिक' समजली जाणारी सामाजिक संस्था खरे तर एक ऐतिहासिक संस्था असून, ती बदलते, आणि बदलाच्या या प्रक्रियेसाठी ती सामाजिक उत्पादनाच्या बदलत्या रूपांचा आधार घेते.

आदिवासी समाज आणि त्याचे घटक यांच्यावर स्त्रियांचा राजकीय अंमल होता. विवाह मातृगृहनिवासी असे तर वंश/वंशावळ आणि वारसा हक्क स्त्रियांकडून चालत असे. यालाच मातृसत्ता किंवा मातृअधिपत्य म्हणतात. (पाटील, १९८२ : १००)

मातृसत्ताक गृहीततत्त्वाचे हे मार्क्सवादी प्रसारक, एक ऐतिहासिक जडवादी अभ्यासक म्हणून एंगल्सला त्यांचा आद्य प्रवर्तक मानतात. पण वस्तुत: एंगल्सने काहीसे वेगळे सिद्धांतन मांडले आहे. ओरिजिन्स ऑफ द फॅमिली, प्रायव्हेट प्रॉपर्टी अॅण्ड द स्टेट या ग्रंथामध्ये एंगल्सने 'मातृहक्काचा' प्रश्न मांडला तेव्हा त्याने हा प्रश्नाला निव्वळ आर्थिक आधार न देता, विकासाशी– प्रथम आदिवासी राजकीय सत्ता आणि नंतर राज्यसंस्था यांच्याशी– मेळ घालून त्याने आर्थिक पायाची संकल्पना बदलली व ती विकसित स्वरूपात मांडली. पण मार्क्सवादी परंपरेतदेखील एंगल्सच्या विचारातील काही महत्वाचे मुद्दे दुर्लक्षित राहतात. याचे एक कारण असे असावे की (मार्क्सवादाच्या अर्थवादी मीमांसेमधून निर्माण झालेल्या) एका सुलभीकरणाच्या प्रवृत्तीमुळे मातृसत्ता म्हणजेच आदिवासी समाजाचा टप्पा असे गृहीत धरले जाते; व पितृसत्ताक कुटुंबाचा उदय आणि राज्यसंस्था व वर्गाचा उदय या घटना समकालिन/एकाच वेळी घडून आल्या असेही समजले जाते. दुसरे एक कारण असे असावे की मार्क्सवादी– स्त्रीवादी मानववंशशास्त्रज्ञ आणि स्त्रीवादी अभ्यासक यांच्या सकट बहुतेक जण एंगल्स वाचताना त्याचा पहिला अर्धा भाग अत्यंत काळजीपूर्वक वाचतात, पण पुढील अर्ध्या भागात आलेल्या महत्वाच्या ठोस मुद्यांच्या विवरणाकडे म्हणजेच आदिवासी समाजांमधून उदयाला आलेल्या रोमन, ग्रीक व जर्मन समाजाच्या वर्णनाकडे दुर्लक्ष करतात.

## १.१८ खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणामध्ये पारधी महिलांची आर्थिकस्थिती :

भारतीय समाजात नागरीकरण वाढत असले तरीही तो प्रामुख्याने ग्रामीण समाज आहे. भारतातील बहुसंख्य लोक गावातच राहतात. (६७ टक्के, २००१ च्या जनगणनेनुसार) त्यांचे जीवन शेती किंवा त्याच्याशी संबंधित व्यवसायांशी निगडीत असते. याचा अर्थ असा की, मोठ्या प्रमाणावरील भारतीयांसाठी शेतजमीन हे उत्पादनाचे एक महत्वाचे साधन आहे. जमीन हा संपत्तीचा एक महत्वाचा प्रकार देखील आहे. परंतु जमीन ही केवळ त्यांच्या 'उत्पादनाचे साधन' किंवा 'संपत्तीचा एक प्रकार' नाही तसेच शेती हे फक्त उपजीवीकेचे साधन नसून ती त्यांच्या जीवन जगण्याचा एक मार्ग आहे.

जागतिकीकरण या शब्दाची तुतारी विशेषतः १९९० पासून फार जोरात फुंकली गेली. आर्थिक क्षेत्रात जागतिकीकरणाचे सारतत्त्व आणि दावाही असा की आता जागतिक पातळीवर अर्थव्यवस्था अधिक एकात्म होत चालली आहे. देशाच्या सीमारेषा पार करून भांडवल प्रवाहीपणे इकडून तिकडे जाते आहे. व्यापाराची कक्षा रूंदावली आहे. त्यामुळे वस्तू आणि सेवा यांची देवाण–घेवाण, संपर्काची सुलभता आणि श्रमाचा विनिमय यामध्ये गतिशीलता आली आहे. विकसनशील देशांनी आपली अंतर्गत अर्थव्यवस्था जितकी होईल तितकी मुक्त करावी, जागतिक भांडवलशाहीमध्ये मिसळून जावे म्हणजे विकसनशील जगातील सर्वसामान्य माणसांचे जीवनमान उंचावेल, आर्थिक स्तरही उंचावेल. १९९३ साली जयंती घोष यांनी 'समग्रलक्षी आर्थिक धोरणातून दिसणारी लिंगभावविषयक जाणीव' या लेखात अशी मांडणी केली होती की, भारतात १९९१ सालानंतर आर्थिक क्षेत्रात ज्या नव्या रचनात्मक सुधारणा वा बदल झाले त्यांचा परिणाम स्त्रियांवर कसा होतो एवढेच पाहणे चुकीचे आहे. भारतातील स्त्रियांकडे 'दुर्बल घटक' म्हणून पाहून त्यांना काही प्रमाणात सुरक्षिततेचे आश्वासन देणे पुरेसे नाही. उलट स्त्रियांच्या मूलभूत गरजा आणि त्यांची एकूण परिस्थिती लक्षात घेऊन त्या संदर्भात, व्यापक आर्थिक सुधारणांचा एकूण अर्थव्यवस्थेवर, समाजव्यवस्थेवर होणारा परिणाम तपासला गेला पाहिजे. स्थिरीकरण, रचनात्मक बदल, उदारीकरण, आर्थिक सुधारणा अशा अनेक पद्धतीने ज्या जागतिकीकरणाचा विचार केला जातो, त्याचे प्रमुख घटक म्हणजे शासकीय खजिन्यातील तूट भरून काढण्यासाठी देशांतर्गत दिली जाणारी कर्जे नियंत्रित करणे, रूपयाचे अवमूल्यन करणे,

देशाबाहेरून येणारा व्यापार मुक्तपणे होऊ देणे. परदेशी भांडवलाच्या प्रवाहाचा ओघ सोपा करणे, देशातील गरजेच्या वस्तूंवरील किंमतीवर नियंत्रण आणि नियमन न ठेवता त्यांचा व्यवहारही मुक्त करणे, प्रत्यक्ष आणि छुप्या सवलती काढून घेणे, देशी वित्तबाजाराचे उदारीकरण, श्रमाच्या बाजारपेठेते सुटका करणे धोरण राबविणे इ. अशा नव्या आर्थिक धोरणातून देशामध्ये आर्थिक स्थिरता येईल आणि भारत देश जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडला जाईल असे गृहित धरले होते. परंतू दक्षिणपूर्व आशियामध्ये झालेली वताहत पाहता नव्या दृष्टिकोनातून, विकास नावाची संकल्पना तपासून पाहिली गेली पाहिजे. विशेषतः स्त्री–जीवनाचा विचार करताना काही महत्त्वाचे निकष लक्षात घेतले पाहिजे. ते म्हणजे अन्नधान्य, वस्त्र, निवारा यासारख्या मूलभूत गरजांची उपलब्धता, शिक्षण, कौशल्य विकसित करण्यासाठी संधी, अपत्यसंगोपन, मुलांची देखभाल यासाठी सोयीसुविधा, घराबाहेर उत्पादक कामाची उपलब्धता आणि घरकामाला 'काम' मानले जाणे इत्यादी.[८९]

१९९० साली लिहिलेल्या आपल्या लेखात जयंती घोष यांनी वरील मुद्दा अधिक स्पष्ट केला आहे. जागतिकीकरण आणि आशिया खंडातील स्त्रियांचा रोजगार या लेखात पूर्व आशिया खंडात १९८० ते १९९६ या काळात निर्यातीच्या क्षेत्रात रोजगारामध्ये स्त्रियांचे प्रमाण कसे वाढले याची मांडणी केली आहे. स्त्रियांचे श्रम कमी दरात लवचीकपणे वापरता येतात, त्यांना अर्धवेळ–नगानुसार कामेही देता येतात. इतकेच नाही तर नोकऱ्यांमध्ये घेणे–काढणे याही बाबतीत त्या फार काही प्रतिकार करत नाहीत. अशा विचारसरणीतून स्त्रियांचे रोजगार वाढतात. विवाह, बाळंपणे या सर्व गोष्टींचे स्त्रियांच्या आयुष्यातील अपरिहार्य स्थान लक्षात घेता, स्त्रिया नावाचा गट कमी वेतनामध्ये अधिक कष्ट घेतो, युनियन वगैरे भानगडी करीत नाही, आणि एकूण आज्ञाधारक कामगार म्हणूनही त्या अधिक चांगले काम करतात अशी धारणा दिसते.

घराबाहेर मिळणाऱ्या वेतनातून स्त्रियांची परिस्थिती सुधारायला हवी. परंतु घरातील पुरुषाचा रोजगार जेव्हा संपलेला असतो तेव्हा स्त्रियांवर दुहेरी कामाचे ओझे तर लादले जातेच परंतु परिस्थितीने नाडलेल्या स्त्रिया मिळेल त्या वेतनावर काम करतात आणि घरातही विनावेतन

[८९] विद्युत भागवत (२००९), स्त्री–प्रश्नाची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने, प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, पृ.४७०–४७१

राबतात. पूर्व आणि दक्षिणपूर्व आशियाई देशात निर्यात, निर्मिती आणि सेवाक्षेत्रात स्त्रियांना भरपूर काम मिळाले होते. आता तेथे जी कामगारकपात चालली आहे त्यात स्त्रियांचे प्रमाण भरपूर आहे. दक्षिण कोरिया, थायलंड या देशांतील वस्त्रोद्योगाची पडझड झाल्याने स्त्री–कामगारांची हकालपट्टी होते आहे. कॉम्प्युटर आणि इलेक्ट्रॉनिक्स वस्तुनिर्मिती क्षेत्रातही स्त्रियांच्या नोकऱ्या कमी केल्या जात आहे. वस्त्रोद्योग, फर्निचर, प्लॅस्टिक यामध्ये काम करणाऱ्या थायलंडमधील अनेक स्त्रिया बेरोजगार होऊन पुन्हा आपल्या घरी गेल्या किंवा परतायला घर नसल्याने बेघर झाल्या. दक्षिण कोरिया वगळता या प्रदेशात अन्य ठिकाणी संरक्षक जाळीही नाहीत. भारतातही काही मोठ्या शहरांमध्ये एकीकडे जरी स्त्रियांना मिळणाऱ्या, विशेषतः निर्यातीवर आधारित वस्त्र अथावा इलेक्ट्रॉनिक वस्तू निर्माण करणाऱ्या कंपन्यांमधील नोकऱ्यांचे प्रमाण वाढले असले तरी त्यांची गतही कोरिया, थायलंडसारखीच होण्याची शक्यता आहे. परंतु १९९० नंतर भारतातील ग्रामीण भागात जो रोजगार वाढला आहे त्यात स्त्रियांचे प्रमाणच मोठे आहे.

जागतिकीकरणाचा विचार फक्त आर्थिक क्षेत्रापुरता करणे अयोग्य आहे, असेही सर्व अभ्यासक मानतात. व्यवस्थेच्या मार्फत अधिकृतता देऊन स्त्रियांचे लैंगिक शोषण करणे, त्यांचा व्यापार करणे हे मोठे चिंतेचे विषय आहेत. इतकेच नाही, टेलिव्हिजन आणि तत्संबंधी आलेले विविध चॅनल्स यातून नवी जागतिक संस्कृती निर्माण करण्याचे प्रयत्न आणि दावे केले जातात. त्यातही स्त्री–जीवन भरडून निघते. परंतु या प्रश्नाचा विचार करताना संस्कृती आणि भौतिक जीवन यांचा विचार सुट्या पद्धतीने केला जातो. संस्कृतीचा भौतिक पाया आणि भौतिकतेच्या पायाशी असणारी संस्कृती, असा विचार अभ्यासक क्वचितच करतात. जागतिक संस्कृती जग नावाचे एकात्मक खेडे असे दावे करणाऱ्यांबद्दल रास्त संशयास्पदता सर्वसामान्य माणसांच्या मनात असते. परंतु केवळ पाश्चात्य विरूद्ध पौर्वात्य संस्कृती असे द्वैत निर्माण करून या प्रश्नांची गुंतागुंतही लक्षात येणार नाही. पर्यटन व्यवसाय, त्यातून निर्माण केले गेलेले भोगवादी, चंगळवादी उपभोग, त्यात होणारा परंपरेचा साधनवादी उपयोग, स्त्रियांच्या वाट्याला येणारा देहविक्रय, देहप्रदर्शन याचा विचार फक्त 'भारतीय' किंवा 'हिंदुस्थानी' संस्कृतीवरील हल्ला या पद्धतीने करणे चुकीचे ठरेल. कोणत्या स्त्रिया (जात, वर्ग, धर्म) अशा व्यवसायात खेचल्या

जातात, अशा तऱ्हेच्या अनेक तारांकित जगण्यासाठी इतकी रोकड ज्यांच्याकडे असते ती निर्माण करणारा 'जुगारी' पैसा कसा अधिकृत केला जातो हे सर्व अभ्यासावे लागेल. आणि त्याविरूद्ध भूमिका घेऊन लढेही उभारावे लागतील. अशा लढ्यात स्त्रिया-पुरुष खऱ्या अर्थाने समान पायावर एकत्र यायचे झाल्यास भारतीय परिस्थितीत पुरुषसत्ताक व्यवस्था, जातिसत्ताक व्यवस्था, वर्गव्यवस्था आणि धार्मिक पंथोपंथ या संदर्भातील गुंतागुंत लक्षात घ्यावी लागेल. विशेषतः नव्या जागतिकीकरणाच्या लाटेत आता दारिद्र्यनिर्मूलनाची भाषा बदलली आहे. दारिद्र्याचे रूप स्त्रीरूपात आहे असे मांडणारी जगातील तज्ज्ञ मंडळी विकसनशील देशातील स्त्रिया आता दारिद्र्याचे तत्पर व्यवस्थापन करतील असे म्हणू लागली आहेत. स्त्रियांसाठी रोजगार कौशल्याबरोबर प्रतिष्ठा, हक्काची विश्रांती आणि संस्कृती निर्मिण्याचा पैसा आणि अधिकार अशीही मागणी केली गेली पाहिजे, तसे नियोजन झाले पाहिजे. [१०]

जागतिकीकरणावरील चर्चाविश्वात व्यापकतेसोबत सखोलता आलेली दिसते. त्या अगोदर यावरील चर्चा संशय, नकार, स्वीकाराच्या आधारावर होत होती. यात जागतिकीकरण समर्थक आणि विरोधक गट क्रियाशील होता. या दोन्ही बाजूचे अभ्यासक आपले म्हणणे किती वास्तविक आहे ते दाखविण्यासाठी गुणात्मक आणि संख्यात्मक पद्धतीचा पुरेपुर वापर करत होते. सर्वसाधारणपणे जागतिकीकरणाच्या समर्थकांना उजव्या विचारसरणीने प्रभावित असल्याचे समजले जात होते. तर त्याला विरोध करणाऱ्यांना डाव्या विचारसरणीचे समजले जात होते. पण आज या पारंपरिक 'उजव्या' आणि 'डाव्या' अशा दोन्ही विचारसरणीच्या गटांमध्ये जागतिकीकरणाच्या मुद्यावर दोन फळया निर्माण झाल्या आहेत. यात उजव्या विचारसरणीतील एक गट जागतिकीकरणाला 'मानवी चेहरा' देण्याची आवश्यकता व्यक्त करतो. तर जागतिकीकरणाला सर्रास विरोध करणे सोडून त्याचे फायदे घेताना त्यातील दमनकारी घटकांना विरोध करण्याची भुमिका घेणे डाव्यातील काही गटांना महत्वाची कृती वाटते. तिसरा गट पर्यायी विकासाची मांडणी करतो. या सगळयांचा प्रत्यय स्त्रीवादी, मार्क्सवादी आंबेडकरवादी इ. विचारसरणीवर आधारित पक्ष, संख्या, गट, व्यक्तीच्या प्रस्तुत विषयावरील चर्चेत दिसून येतो.

---

[१०] विद्युत भागवत, स्त्री-प्रश्नाची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने, प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती-२००९, पृ.४७०-४७६

तर सामाजिकशास्त्राचे अभ्यासक आणि विविध चळवळीदेखील अशाच वैचारिक द्वंद्ववाद सापडलेली आहेत. प्रस्तुत लेख जागतिकीकरण, भांडवलशाही आणि पुरुषसत्ता यांचा विचार सेवाक्षेत्राबाबतीत करताना त्याचा भारतातील स्त्रियांवर कोणत्या प्रकारचा परिणाम होत आहे त्याचे विश्लेषण मार्क्सवादी स्त्रीवादाच्या आधारे करतो. आज एका बाजूला शासनप्रणीत 'महिला सबलीकरणा'ची चर्चा केली जात आहे तर दुसऱ्या बाजूला जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे सार्वजनिक क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण पूर्वीपेक्षा तुलनेने अधिक दिसत असल्यामुळे स्त्री प्रश्नाचा अंत होत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे खाजगी क्षेत्रातील स्त्रियांच्या दमनाचा विचार करताना सार्वजनिक क्षेत्रात होणाऱ्या शोषणाचाही अधिक चिकित्सक विचार केला पाहिजे. याचाच एक भाग म्हणून प्रस्तुत लेखात भांडवलशाही आणि शोषणाच्या इतर व्यवस्थात भरडली जाणारी स्त्री यातील आंतरसंबंधांचा समकालीन संदर्भात वेध घेतला आहे.

जागतिकीकरण आणि जागतिक अर्थव्यवस्था यांच्या मुलभूत विचारसरणीमध्ये व्यक्ती–व्यक्तीत, देशा–देशात मतभेद असल्याचे आपण जाणतोच. पण स्त्री प्रश्नाचा समकालीन संदर्भात विचार करताना, विशेषत: वर्चस्ववादी भांडवली अर्थव्यवस्थेतून स्त्री जीवनात निर्माण झालेली गुंतागुंत स्पष्टपणे विश्लेषित करण्यासाठी मार्क्सवादी स्त्रीवाद हा मार्गदर्शक ठरतो. मुळात मार्क्सवाद हा वर्गसमाजाचा विकास, भांडवलशाही समाजामधील संचयप्रक्रिया वर्गवर्चस्वाचे पुनरुत्पादन आंतरविरोध व वर्गसंघर्षाचा विकास या विषयांचा सिध्दांत आहे. मार्क्सवादी स्त्रीवादी विचारसरणीनुसार ऐतिहासिकदृष्ट्या खाजगी संपत्तीच्या उदयातच स्त्रियांच्या दडपणूकीची कारणे सापडतात. म्हणून त्यांच्या मते स्त्री मुक्तीवाद हा साम्यवादी समाज अस्तित्वात आणण्यासाठी द्यावयाच्या लढयाचाच एक भाग आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत स्त्रियांना पुरुषांपेक्षा वेगळया तऱ्हेच्या प्रश्नांना तोंड द्यावे लागते. त्याकरीता स्त्रियांनी एक गट म्हणून भांडवलशाहीच्या विरोधात उभे राहिले पाहिजे. भांडवलशाहीच्या उदयाबरोबर स्त्रीचे आणखी अवमुल्यन झाले व अधिकाधिक होते गेले. स्त्रियांचे श्रम स्वस्तात मिळवून एकूण मजूरी कमी ठेवणे ही भांडवलशाहीच्या लाभाची गोष्ट पुरुषी वर्चस्वातून साधली जाते. स्त्रिया घरात जे काम करतात त्याला मोल नसणे हे भांडवलशाहीच्या पथ्यावर पडते. सार्वजनिक उद्योगधंद्यात स्त्रियांना स्वतंत्रपणे समान पातळीवर

सहभाग घेता आला पाहिजे असा आग्रह मार्क्सवादी विचार त्यामुळे घटतो. यातून स्त्रियांना खरी मुक्ती मिळेल असे त्यांना वाटते. शासनाने बालसंगोपन, वृध्दांची देखभाल व कुटुंबात होणारे इतर उत्पादक काम यांची जबाबदारी उचलली पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. त्यांच्यामते समान संधी म्हणजे प्रत्येक व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी स्पर्धा करण्यासाठी मिळविलेली समानता नाही तर माणसाच्या गरजा भागविण्यासाठी सर्वांना समान सहभाग. भांडवलशाही समाजात उत्पादन उपयोगितेऐवजी विनिमयाकरीता होते. हे निव्वळ वास्तव लक्षात घेतले तर त्या समाजाचे अंतरंग उघड होते. भांडवलशाही व्यवस्थेत नफा मिळविण्याचे एक साधन एवढेच महत्व उत्पादनाला असते. वस्तूच्या उपयोगितेचा विचार गौण ठरतो. श्रमिक शक्तीचे शोषण भांडवलदार करतात. एवढेच नव्हे तर व्यक्तीवाद, स्पर्धात्मकता, वर्चस्ववृत्ती आणि आताच्या आपल्या काळात एक विशिष्ट प्रकारचा उपभोग या गोष्टी प्रस्थापित वर्चस्ववादी विचारप्रणालीचाच भाग आहेत. म्हणून भांडवलशाहीचे पुरुषसत्तेशी असणारे संबंध ओळखणे गरजेचे आहे. पण ते कसे ओळखणार हा त्यातील अंतर्गत प्रश्न आहे. कारण प्रत्येक स्त्री जणू काही फक्त तिच्या स्वत:च्या पुरुषाकडून दडपली जाते असा भास होतो, तिची दडपणूक एक खाजगी बाब आहे असे दिसते. पुरुषा–पुरुषामधील संबंध खंडीत झाल्यासारखे दिसतात. तेच दृश्य कुटुंबा–कुटुंबाच्या संबंधात आढळते. त्यामुळे पुरुषांमधील परस्परसंबंध आणि पुरुष व स्त्रीयांतील संबंध हे लिंगभावावर आधारित असतात तर पुरुष आणि भांडवलशाही यांचे हितसंबंध विरोधात्मक असतात. विशेषत: स्त्रियांची श्रमशक्ती कशी वापरायची याविषयी त्यांच्यात दुमत असते. उदाहरणार्थ, बहुसंख्य पुरुषांना आपल्या घरच्या बायकांनी आपली व्यक्तीगत सेवाच करीत रहावे असे वाटत राहील. पण काही मुठभर भांडवलदार पुरुषांना मात्र (आपल्या स्वत:च्या बायका वगळून) बाकीच्या बहुसंख्य बायकांनी श्रमाच्या बाजारपेठेत मोलमजूरी करावी असे वाटेल. भांडवलशाहीला पुरुषसत्तेशी जुळवून घ्यावे लागते. तर दुसऱ्या बाजूला पुरुषसत्तेला सुध्दा भांडवलशाहीशी मिळते–जुळते घ्यावेच लागते. नोकऱ्यांच्या लिंगाधिष्ठित वर्गीकरणातून स्त्रियांना कमी पगाराच्या नोकऱ्या मिळतील अशीच तजबीज होते. श्रमिकांच्या बाजारपेठेत स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी वेतन मिळाल्यामुळे स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांची भौतिकसरशी कायम राहते. म्हणून स्त्रियांच्या श्रमशक्तीच्या संदर्भात पुरुषांमध्ये विरोधात्मक हितसंबंधांमुळे जे ताण

निर्माण होतात त्यांचे ऐतिहासिक परीक्षण झाले पाहिजे. त्यामुळे आपल्याला भांडवलशाही समाजातील पुरुषसत्तेचा भौतिक पाया ओळखता येईल. या दोघांच्या भागीदारीचे स्वरुपही तेव्हाच स्पष्ट होईल. आणि याचे विश्लेषण मार्क्सवादी स्त्रीवादच अधिक चांगल्या प्रकारे करु शकेल. कारण मार्क्सवादी स्त्रीवादी विश्लेषण स्त्रियांचे पुरुषांशी कोणते नाते असते हा प्रश्न प्रमेय म्हणून लक्षात घेत नाहीत तर स्त्रियांचे आर्थिक व्यवस्थेशी कोणते संबंध असतात हा प्रश्न मुळ मानून तो सोडविण्याचा प्रयत्न करतात. मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी रोजगार निर्मिती आणि श्रमाचा परस्पर संबंध जोडून, विकासाच्या प्रक्रियेवर आणि पुरुषसत्तेवर प्रश्न उभे करुन, लिंगभाव आणि विकास यावर विचाराचे एक नवीन दालन खुले केले.

२० व्या शतकाच्या सुरुवातीला बहुतांशी भारतीय स्त्रिया कृषी क्षेत्रात काम करीत होत्या, पण तरीही संपूर्ण देशातील गृहोद्योगांमधून खास स्त्रियांसाठीच असलेली बरीच कामे होती. विक्रीसाठी माल तयार करणे हे स्त्रियांचे एक मोठे काम होते. परंतु जेव्हापासून यांत्रिक पद्धतीने कारखान्यात माल बनू लागला तेव्हा पासून स्त्रियांच्या या गृहोद्योगाला मोठे खिडांर पडले. उदाहरणार्थ, वस्त्रोद्योग हा शेती नंतरच्या स्त्रियांसाठी रोजगार उत्पन्न करणारा सर्वात मोठ्या व्यवसाय होता. या उद्योगात हाताने धागा तयार केला जायचा. पण १८२० च्या दरम्यान ब्रिटीशांच्या कारखान्यात बनलेला धागा बाजारात आला तेव्हा पासून हस्तोद्योगातून स्त्रिया परिघाबाहेर फेकल्या जाऊ लागल्या. कारण हाताने धागा बनविण्याचा उद्योग नष्ट झाला. या संदर्भात बॅनर्जी आणि मित्तर यांनी १९९८ मध्ये केलेले संशोधन महत्वाचे आहे. कृषी क्षेत्राशिवाय स्त्रियांचा दुसरा मोठा पारंपारिक उद्योग होता अन्न प्रक्रियेचा. पण १९२० सालानंतर जसजसे या क्षेत्रातही यांत्रिकीकरण आले तेव्हा पासून स्त्रियांचा हा उद्योगही कमी झाला. १९११ साली जितक्या स्त्रिया निर्माण उद्योगात उत्पादक उद्योगांत काम करीत होत्या त्यापेक्षा १९६१ साली त्यांची संख्या घटली होती.[११]

इ.स.१९६१ ते १९९० च्या मध्यापर्यंत स्त्रियांच्या रोजगाराच्या स्तरामध्ये फारसा बदल झाला नाही असे निर्मला बॅनर्जी 'समकालीन भारतातील स्त्रियांसमोरील संकुचित होत जाणारे

[११] बॅनर्जी, निर्मला (१९९९), समकालीन भारतातील स्त्रियांसमोरील संकुचित होत जाणारे पर्याय, पृ. ८३

पर्याय' या लेखात मांडतात. याच कालखंडावर बोझरप सारखे अर्थशास्त्रज्ञ प्रतिपादन करतात की, इ.स.१९६० च्या दशकामध्ये विकसनशील देशामधील आधुनिक क्षेत्राच्या विकासामुळे स्त्रियांचे कामगार म्हणून सीमांतीकरण होईल. इ.स.१९७० व १९८० ह्या दशकांमध्ये भारतात आधुनिक उद्योगधंद्यांच्या विकासाबरोबर मालक व मजूर यांच्या संबंधांमध्ये औद्योगिक व औद्योगिकरणाच्या मार्गावर असलेल्या सर्व अर्थव्यवस्थांमध्ये अनौपचारिकता प्रत्ययाला येत गेली. इ.स.१९६१ मध्ये ग्रामीण स्त्री कामगारांपैकी ९०% या कृषी क्षेत्रात होत्या, हेच प्रमाण १९९४ मध्ये ८६% पर्यंत घसरले.[९२]

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री प्रश्नावर काही महत्वाचे अहवाल प्रकाशित झाले. 'समानतेच्या दिशेने' हा स्त्रियांच्या समाज, अर्थव्यवस्था, आणि राजकीय व्यवस्थांतील सहभागाचे चित्रण करणारा देशव्यापी अहवाल प्रसिध्द झाल्यानंतर एक प्रकारे स्त्री प्रश्नाला दृश्य स्वरुप प्राप्त झाले. भरपूर आकडेवारी देऊन या अहवालाने भारतातील स्त्रीप्रश्नाचे गांभिर्य दाखवून दिले. इ.स.१९८५ मध्ये निर्मला बॅनर्जी यांनी असंघटीत क्षेत्रातील स्त्री कामगारांवर एक महत्वपूर्ण अभ्यास प्रसिद्ध केला. यामध्ये त्यांनी असंघटीत क्षेत्राची दोन महत्वाची वैशिष्टये सांगितली विविधता आणि अनिश्चितता. स्त्रियांच्या राखीव किंवा पुरक श्रमाच्या संकल्पनेशी असंघटीत क्षेत्र सुसंगत आहे असे बॅनर्जी यांनी मांडले. या क्षेत्रात स्त्रियांचा प्रवेश सुलभ असतो. स्थानिक साधनांचा वापर केला जातो. या उद्योगांचे स्वरुप आटोपशीर असते. कामगारांच्या श्रमशक्तीचा भरपूर वापर करणारे व कामचलावू तंत्रज्ञान यात वापरले जाते.

इ.स.१९८८ साली इलाभट यांच्या अध्यक्षतेखाली असंघटीत क्षेत्रात असलेल्या स्त्रियांचा अभ्यास वाचला की, किती असुरक्षित आणि माणूसपणा हिरावून घेणारे काम स्त्रिया करीत असतात हे जाणवते. म्हणूनच कष्टकरी अथवा मध्यमवर्गीय स्त्रियांच्या कामाचा विचार करताना अखंड चालणारे काम, कामाची असमाधानकारक जागा आणि आरोग्यास हानीकारक असलेले व्यवसाय यांचे तपशील लक्षात येतात.

[९२] कित्ता, पृ. ८६

इ.स.१९९१ नंतर नवीन आर्थिक धोरणाचा लिंगभावावर होणारा परिणाम लक्षात घेताना सुरुवातीच्या काळात संभ्रमता निर्माण झाली. त्यामुळे या दशकात स्त्रियांच्या अन्न, वस्त्र, निवारा ह्या प्राथमिक गरजा कशा पूर्ण केल्या जात आहेत? सामूहिक सार्वजनिक संपदेचा त्या किती प्रमाणात उपभोग घेऊ शकतात? शिक्षण आणि कुशलता वाढविण्याच्या संधी त्यांना किती प्रमाणात उपलब्ध आहेत? पुनरुत्पादन मुलांची काळजी, सुरक्षा वगैरेसाठी कोणत्या सुविधा स्त्रियांना उपलब्ध आहेत? घराबाहेर रोजगाराच्या कोणत्या संधी त्यांच्या समोर आहेत इत्यादी पैलूंचा अभ्यास करण्यावर भर देण्यात आला.

नवीन आर्थिक धोरणाच्या स्वीकारानंतर सेवा क्षेत्रांमध्ये बऱ्यापैकी सुशिक्षितांचा शिक्षण, नर्सिंग आणि कारकुनी ह्या क्षेत्रांमध्ये शिरकाव झाला. तर फारसे शिक्षण नसलेल्यांना घरकाम व इतर अंगमेहनतीची कामे हीच क्षेत्रे उरली. स्वयंरोजगारामधील लोक पशुपालन (Live stock) व दुग्धोत्पादन, घरबसल्या काम करणारे लोक हे विडया वळणे, हातमाग, हस्तकला, तयार कपडे तर वस्तुनिर्मिती कारखान्यांमधील नमुना दरावर काम करणारे कामगार अथवा उक्त्याने द्यावयाचे काम (Put out work) अशा उद्योगधंद्यांमध्ये आढळतात. (जागतिक बँक,१९९१)

नवीन आर्थिक धोरणानंतर शासनाने अनेक गोष्टींवरील खर्चात आणि अनुदानात कपात केली. तर दुसऱ्या बाजूला वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यातून अंग काढून घेतल्याने खुल्या बाजारपेठेच्या मर्जीवर आता अवलंबून राहायची वेळ आली. याचा थेट परिणाम उत्पादन क्षमतेवर आणि कामाच्या एकूण वातावरणावर झाला. कृषीक्षेत्र, असंघटीत क्षेत्र यांचा विकास तर खुंटला आहेच परंतु संघटीत क्षेत्र आणि सेवा क्षेत्रावरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

आजच्या आर्थिक मंदीच्या काळात तर कंपन्यांतील अनेक कामगारांना कामावरुन काढून टाकले जात आहे. त्या अगोदर यंत्राचा वापर जेव्हा मोठ्या प्रमाणात वाढला तेव्हा स्त्रियांना कामावरुन काढून टाकल्याची अनेक उदाहरणे आपणास माहित आहेत. तर दुसऱ्या बाजूला काम मेहनतीचे आहे, स्त्रियांना जमणारे नाही. रात्रपाळीवर स्त्रिया कशा येतील अशा अनेक कारणांमुळे स्त्रियांऐवजी पुरुषांना कामावर ठेवण्याची पूर्वापार वृत्ती आजदेखील अगोदरपासूनच कार्यरत आहे.

समकालीन परिस्थितीत आर्थिक मंदीच्या पार्श्वभूमीवर देखील पाहिले तर लक्षात येईल की, आजची कुटुंब व्यवस्था ही भांडवलशाहीची गरज आहे. स्त्रियांना घरात बसवावे की सार्वजनिक क्षेत्रात श्रमात त्यांचा सहभाग वाढू द्यावा हे आजची व्यवस्था त्या त्या वेळच्या परिस्थितीनुसार ठरवते. तर दुसऱ्या बाजूला इथल्या काही विशिष्ट कामांच्या माध्यमातून स्त्रियांचा श्रमाचे अवमुल्यन केले जात आहे. की कामे हंगामी, कंत्राटी किंवा नगावारी स्वरुपाची शोषण होत असल्याचे दिसतानाच आर्थिकदृष्ट्या असुरक्षिततेत जीवन व्यथित करावे लागते आहे.

सार्वजनिक क्षेत्रामध्ये इ.स.१९९१ नंतर स्त्रियांना नोकऱ्यांचे प्रमाण काही क्षेत्रात वाढले असल्याचे भासत असले तरी स्त्रियांच्या श्रमाचे आजच्या आधुनिक काळात काय होत आहे ह्याकडे लक्ष वेधणे गरजेचे आणि महत्वाचे आहे. त्यामुळे यापुढील विश्लेषणात जागतिकीकरण आणि सेवा क्षेत्राचा परस्परावर काय परिणाम होत असतो. आणि दुसरे, या दोन्हींचा स्त्रियांवर काय परिणाम होतो ते तपासले गेले आहे. त्या अगोदर भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे स्थान कशा प्रकारचे आहे ते लक्षात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

जागतिकीकरण, आंतरराष्ट्रीय उद्योगधंदे आणि जागतिक अर्थव्यवस्था यांच्या झपाटयामध्ये स्थानिक संस्कृती, छोटे उद्योग छोटे शेतकरी, पारंपारिक कला इ. भरडून नष्ट होण्याच्या वाटेवर आहेत असे एका बाजूला वाटत असतानाच दुसऱ्या बाजूला तरुणपिढी पारंपारिक संस्कृतीची सुस्ती आणि काही प्रमाणातला निष्क्रियपणा झुगारुन देऊन जागतिकीकरणाची आव्हाने आनंदाने स्वीकारायला निघालेली दिसत आहे. संपूर्ण जगभरच विशेषत: अविकसित देशात स्त्रिया पुरुषाबरोबर व अनेक क्षेत्रामध्ये त्यांच्या पुढेही जाऊन कार्यनिपून होताना दिसत आहेत. अगदी अतिक्रमण देशामध्येही स्त्रीवर्ग 'कात' टाकून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सामील होताना दिसत आहे. काही ठिकाणी पंरपरागत चालीरीतींनी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत स्वत:ला वैशिष्टयपूर्ण पद्धतीने सांभाळलेलेही दिसत आहे.

कॉ. सिताराम येचुरी व इतर मार्क्सवादी नेत्यांच्या मते, जागतिकीकरण जर विज्ञान तंत्रज्ञानात्मक पातळी उंचावणारे असेल, त्यामुळे नोकऱ्यांची संख्या वाढणार असेल तर आमचा त्याला विरोध नाही असे विधान त्यांनी केले आहे. सध्या आपल्याकडील ५५% लोकसंख्या ३५

वर्षांच्या खालील वयोगटातली आहे. यातील बहुतांशी १९८० नंतर जन्माला आलेले आहेत. म्हणजेच स्वातंत्र्यानंतर जवळपास ३५ वर्षांनी जन्मलेली ही पिढी आहे. या पिढीचा विचार करण्याची प्रवृत्ती वेगळी आहे. त्यांच्यापुढे अनेक संधी उभ्या आहेत. विशेषत: बडया महानगरामध्ये राहणाऱ्यांसाठी स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेल्या पिढीपुढे तेवढया संधीही नव्हत्या. त्यांच्यादृष्टीने जग हे साचेबंद होते. एकदा नोकरीला लागले की आयुष्यभर तीच नोकरी करायची हा त्यांच्यापुढे आदर्श होता पण आता सध्याच्या तरुण–तरुणींना ते मान्य नाही. नोकरीच करायची तर मग पगार जास्त मिळत असेल तर एका झटक्यात नोकरी बदलायची त्याची मानसिकता आहे. कारण आर्थिक उदारीकरणाचे युग सुरु झाल्यावर साचेबंदपणा हळूहळू सैल होऊ लागला. जागतिक पातळीवरील विशेषत: भांडवली विचारसरणीच्या देशातील विचारांचा मोकळेपणा काम करण्याची पद्धती आपल्याकडेही येऊ लागली. बदलत्या काळानुसार न बदलल्यास आपल्याला जीवन जगणे कठीण होईल हे वास्तव बडया महानगरातील तरुण पिढीने स्वीकारले आहे. याचा फायदा उदारीकरणाची प्रक्रिया सफल होण्यात निश्चितच झाला.

महिलांकरीता रोजगारासाठी अनेक नवे क्षेत्र खुले होत आहेत. यातून रोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध होतात. मात्र त्याला इंग्रजीचे चांगले ज्ञान हवे ही किमान अट नवीन पिढी आता इंग्रजी माध्यमात शिकलेली असल्याने इंग्रजी बोलून वेळ मारुन नेऊ शकते. आज काल तर दिवसागणिक स्त्रियांच्या भूमिका, त्यांच्याकडून पार पाडल्या जाणाऱ्या जबाबदाऱ्या यात सतत बदल होताना दिसतो. केवळ अध्यापन आणि कारकूनवजा कामांच्या संकुचित वर्तुळातून सर्वप्रकारच्या नोकऱ्याच्या विशाल जगात आता महिला अग्रभागी झळकताना दिसतात. त्याही आपल्या अंगभूत अचार क्षमतेच्या बळावर शहरातील महिलांच्या भूमिकांतील बदलांमुळे त्यांच्या स्थितीत जलद परिवर्तन होत आहे. त्यांच्या उच्च शिक्षणामुळे आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यामुळे त्या आपल्या विरुद्ध होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध आवाज उठवू लागल्या आहेत. कायदा त्यांच्या बाजूने असल्यामुळे त्यांचा आवाज बंद करणे इतके सहज सोपे नाही.

कॉर्पोरेट जगतात आज महिलांचे प्रमाण वाढले आहे. काही उद्योगक्षेत्रे तर 'महिला स्पेशल' वाटावित इतकी महिलाधिष्ठित झाली आहेत. माहिती–तंत्रज्ञान, B.P.C. कॉल सेंटर, पर्यटन, आदरातिथ्य, खाजगी बँकिंग, टेलिमार्केटिंग, दुरचित्रवाणी, पत्रकारीता अशा अनेक

व्यवसाय क्षेत्रात आज महिलांचे अधिपत्य दिसते आहे. Marketing हे पूर्वी पुरुषांचेच क्षेत्र मानले जायचे. आज तिथेही बहुसंख्येने महिला आहेत.

जागतिकीकरणामुळे बहुसंख्येने महिला आहेत. बीपीओ आणि कॉल सेंटरमध्ये महिलांना विशेषत: तरुण मुलींना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्या ठिकाणी सध्या महिला रात्रपाळीत काम करताना दिसतात. तसेच इस्पितळे, टेलिफोन एक्सचेंज, हॉटेल, विमान वाहतुक याठिकाणी देखील महिला बरीच वर्षे रात्रपाळी करीत आल्या आहेत. रात्रपाळीसंबंधी नवीन कायदा झाल्यामुळे इतरही अनेक क्षेत्रात महिला रात्रपाळीत काम करु शकतील. बेरोजगार महिलांना विशेषत: तरुण मुलींना रोजगार मिळवून देण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी या कायद्याचा उपयोग होऊ शकतो. यासाठी सामाजिक मानसिकता बदलायला थोडा वेळ लागेल. सर्व स्त्रीयांना साथ मिळणे आवश्यक आहे.

कॉल सेंटर व आय. टी. संलग्न क्षेत्रामधील मुलींचे पुण्यातील प्रमाण मुलांच्या तुलनेत ६०% आहे. तर मुंबईत ७० ते ८० हजार इतके आहे. टेलिफोन ऑपरेटर्स, नर्स, एअरलाइन्स क्षेत्रात स्त्रिया अगोदरपासूनच आहेत पण कॉल सेंटरमधील तरुणींची संख्या व मुख्यतत्वे त्यांची जीवनशैली यामुळे लोकांच्या भुवया उंचावत आहेत. विज्ञान विषयात उच्चशिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण आता चांगलेच वाढले आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र हे विषय मुलांचे, तर जीवशास्त्राकडे (प्राणीशास्त्र–वनस्पतीशास्त्र) मुलींचा ओढा अधिक हे वर्गीकरणही आता बदलत आहे. वाढत्या स्पर्धेमुळे आणि गतिमान जीवनामुळे स्त्रियांदेखील अनेक जबाबदाऱ्या पेलत आहेत. ग्राहकांच्या अधिकाधिक जागरुक होण्यामुळे ग्राहकोपयोगी उत्पादनात सातत्याने बदल होत आहेत. अन्न प्रक्रिया उद्योग, दैनंदिन वापराच्या उत्पादनांची निर्मिती अशा काही क्षेत्रात बरेच संशोधन होत आहे. आणखीही बरेच अपेक्षित आहे. स्त्री–पुरुषांचे स्वत:च्या व्यक्तीमत्वाबद्दलचे भान वाढले असल्याने सौंदर्य प्रसाधनाचे मार्केट वाढत आहे. या क्षेत्रात नवनव्या उत्पादनांची भर पडत आहे. प्रसारमाध्यमे, दुग्धव्यवसाय, इ. क्षेत्रात सातत्याने संशोधन व विकास होत आहे. याचाही परिणाम स्त्रियांच्या रोजगारावर सकारात्मकपणे होण्याची शक्यता आहे.

पूर्वी फॅशन डिझायनिंगला टेलर मास्टरचा व्यवसाय म्हणून ओळखले जायचे परंतु या व्यवसायाने आता कात टाकली आहे. आणि स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्याचा परिणाम म्हणून आज अनेक ठिकाणी यशस्वीपणे फॅशन शोज्चे आयोजन डिझायनर्स करीत असतात आणि त्यांना बाजारात चांगली मागणीही आहे. म्हणूनच या गरजा लक्षात घेऊन टेक्सटाईल आणि ज्वेलरी डिझायनिंग, गारमेंट मॅन्युफॅक्चरिंग, कॉम्प्युटर एडेडी डिझायनिंग या उद्योजक मानसिकतेला पोषक असणाऱ्या क्षेत्रात जास्तीत जास्त करीयर करण्यासारखे असल्यामुळे शहरी महिलांचा, मुलींचा ओढा त्याकडे आहे.

शेअर व्यवहारातील सुलभीकरण आणि आर्थिक जाणीव जागृतीमुळे स्त्रीयाही शेअर बाजाराकडे वळत आहेत. घरबसल्या ऑनलाइन ट्रेडिंग करण्याच्य उपलब्ध पर्यायामुळे तर त्यांना शेअर व्यवहारात अधिकच रुची निर्माण होत आहे. गेल्या काही वर्षात विविध थरातील लोकांमध्ये शेअर बाजारासंबंधी खूपच जागृती निर्माण झालेली आहे. विशेषत: बडया महानगरातील अनेक महिला या व्यवहारांकडे गांभीर्याने बघू लागल्या आहेत. कमाईचा हा मार्ग अनेक महिलांना सोयीस्कर वाटू लागलेला आहे. त्याच प्रमाणे शेअरमध्ये गुंतवणूक करणाऱ्या महिलांचेच प्रमाण केवळ वाढत नाही तर शेअर बाजाराशी संबंधीत ज्या ब्रेकिंग करणाऱ्या कंपन्या आहेत त्यामध्ये काम करणाऱ्यांमध्येही महिलांचा सहभाग वाढतो आहे. कुठल्याही ब्रोकरकडे फ्रंट ऑफिस असो वा बँक ऑफिस असो त्यातील २५ ते ३०% स्टाफ हा महिलांचाच असतो. असे अनेक अभ्यासकांचे निरीक्षण आहे. या महिलांमध्ये जास्त करुन कॅथलिक त्या खालोखाल पंजाबी, दक्षिण भारतीय व मग मराठी महिलांचा क्रम लागतो. कॉलेजला जाणाऱ्या मुलींमध्येही शेअर बाजाराची चांगलीच ओढ निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

भारतातील पर्यटन बाजारपेठ झपाटयाने वाढत असताना परदेशी पर्यटकांच्या विशेषत: परदेशी महिलांच्या मनात भारताविषयी विश्वासाची भावना निर्माण करण्याच्या तसेच पर्यटन व्यवसायात महिलांचा सहभाग वाढविण्याच्या हेतूने स्व. इंदिरा गांधी यांच्या नावाने पर्यटन क्षेत्रात महिला सबलीकरणासाठी प्रियदर्शनी प्रकल्प राबविण्यास येत आहे. या क्षेत्रात महिला व्यावसायिक घडविण्याची ही अफलातून कल्पना जगात प्रथमच राबविली जाणार आहे. टॅक्सी ड्रायव्हर, दुभाषा, गाईड, मित्र, पोलिस इ. अशा विविध भूमिका पार पाडण्यासाठी निवडक

महिलांना पर्यटन मंत्रालयाकडून या साऱ्यांचे सर्वंकष प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रथम दिल्लीत ही योजना राबविण्यात येणार आहे. नंतर अन्य शहरांतून ती टप्प्याटप्प्याने राबविली जाईल.

'महिला प्रवासी' हे एक नवे उभरते मार्केट आहे. हे आता हॉटेल इंडस्ट्रीला उमगले आहे. महिला प्रवाशांना निश्चित, सोयीस्कर व आरामदायी वाटाव्यात अशा सोयी सुविधा देण्याचा ट्रेंड स्थिरावंत आहे. महिलांसाठी खास मजले राखीव खोल्या व विशेष सुविधा देत त्यांचे अगत्याचे आदरातिथ्य करण्याची प्रथा अलीकडेच काही तारांकित हॉटेल्सनी सुरु केली आहे. या महिला प्रवाशी आपल्या कंपनीच्या कामकाजानिमित्ताने किंवा व्यवसायाशी संबंधीत कामकाजामुळे सतत विविध ठिकाणी जात असतात. अशा अनेक घडामोडी घडत आहेत की, ज्याच्या माध्यमातून भारतात सेवा क्षेत्राच्या विस्ताराला चालना मिळत आहे. म्हणून विचार करण्याचा मुद्दा हा आहे की, या सेवा क्षेत्रात स्त्रियांचे स्थान कशा स्वरुपाचे आहे? या क्षेत्राच्या विस्ताराने स्त्रियांना फायदा होत आहे की तोटा होत आहे? म्हणून आपण यापुढील मुद्यात सेवा क्षेत्रातील स्त्रियांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करणार आहोत.

उदारीकरणाचे धोरण, ज्याचा अवलंब भारताने १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धापासून केला आहे याचा शेती आणि ग्रामीण समाजावर खूप महत्वपूर्ण असा परिणाम झालेला आहे. या धोरणांतर्गत जागतिक व्यापार संघटने (डब्लूटीओ) मध्ये सहभागीत्व मिळाले आहे. या संघटनेचा उद्देश अधिक मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवस्था उभारणे हा आहे आणि त्या दृष्टीने भारतीय बाजारांना आयातीच्या उद्देशाने खुले करण्याची आवश्यकता आहे. दशक भरापूर्वीपर्यंत शासकीय सहकार्य आणि संरक्षित बाजारव्यवस्थेवर अवलंबून असलेला भारतीय शेतकरी आंतरराष्ट्रीय बाजाराशी स्पर्धा करण्यात सिद्ध झालेला आहे. उदाहरणाकरीता आपण सगळ्यांनी आयात केलेले फळे आणि इतर खाद्य पदार्थांच्या सामुग्रीला आपल्या स्थानिक बाजारांमध्ये पाहिले आहे. त्या या वस्तू आहेत ज्या काही वर्षापूर्वीपर्यंत आयातीच्या निर्बंधामुळे उपलब्ध नव्हत्या. काही काळापूर्वीच भारताने गहू आयातीचा निर्णय घेतला जो एक विवादास्पद निर्णय होता. ज्यामुळे अन्नधान्यातील स्वयंपूर्णतेचे अगोदरचे धोरण उलटवून टाकले. यासोबतच स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळातील आपल्या अमेरिकन अन्नधान्यावरील अवलंबित्वाच्या कटु आठवणी देतात.

ही शेतीच्या जागतिकीकरणाची प्रक्रिया किंवा शेतीला व्यापक आंतरराष्ट्रीय बाजारात समाविष्ट करण्याचे संकेत आहेत ही अशी प्रक्रिया आहे ज्याचा शेतकरी आणि ग्रामीण समाजावर प्रत्यक्ष परिणाम होतो. उदाहरणार्थ, पंजाब आणि कर्नाटक सारख्या काही प्रदेशातील शेतकरी बहुराष्ट्रीय कंपन्या (जसे पेप्सी, कोक.) काही ठराविक पिके (जसे टमाटे आणि बटाटे) घेण्यासाठी करार करतात. त्यानंतर या कंपन्या त्यांच्याकडून ही पिके खरेदी करतात आणि त्यावर प्रक्रिया करतात किंवा निर्यात करतात. अशा 'करार शेती' पद्धतीमध्ये, कंपन्या पेरल्या जाणाऱ्या पीकाची निवड करतात, बियाणे आणि इतर वस्तुं गुंतवणूकीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देतात, यासोबतच माहिती आणि साधारणतः काम चलावू भांडवल देखील देतात. याचा परतावा म्हणून शेतकरी बाजाराच्या भरवशावर राहतो. कारण कंपनी अगोदरच ठरविलेल्या किंमतीवर पीकांची खरेदी करण्याची हमी देत असते. 'करार शेती' काही विशिष्ट फळे जसे फुले (कट प्लावर), द्राक्षे, अंजीर आणि डाळिंब यासारखी फळे तसेच कापूस आणि तेलबियाकरीता आजकाल सामान्यतः प्रसिद्ध आहेत. जेथे करार शेती शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षितता देत असते त्याचवेळी ती शेतकऱ्यांकरीता असुरक्षित देखील असते. कारण ते आपल्या उदरनिर्वाहाकरीता या कंपन्यावर अवलंबून असतात. निर्यातीकरता करण्यात येणारे उत्पादन जसे फुल आणि खीरे यांच्यासाठी 'करार शेती'चा अर्थ हा देखील आहे की शेत जमीनीचा वापर अन्नधान्य उत्पादनासाठी प्रामुख्याने होत नाही. करार शेतीचे समाजशास्त्रीय महत्व हे आहे की, अनेक व्यक्तींना उत्पादन प्रक्रियेपासून दुर केले जाते आणि त्यांचे शेतीचे परंपरागत ज्ञान निरर्थक ठरते या व्यतिरिक्त 'करार शेती' प्रामुख्याने अभिजन वस्तूंचे उत्पादन करते आणि यात साधारणतः खते आणि किटकनाशकांचा मोठ्या प्रमाणात वापर करते त्यामुळे हे बऱ्याचदा पर्यावरणीय दृष्टीने सुरक्षित असत नाही.

शेतीच्या जागतिकीकरणाची एक अधिक प्रचलित बाजू म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे या क्षेत्रात आगमन या कंपन्यांनी शेतीच्या वस्तू जसे बियाणे, किटकनाशके आणि खताच्या विक्रितून या क्षेत्रात प्रवेश केला आहे. जवळपास मागच्या दशकापासून आपल्या शेती विकास कार्यक्रमांत कमी करण्यात आली आहे आणि 'कृषी विस्तार' एजंटांचे स्थान गावात बियाने, खत आणि किटकनाशक कंपनीच्या एजंटांनी घेतले आहे. हे एजेंट शेतकऱ्यांसाठी नेहमी बियाणे

आणि शेतीच्या कामाची माहिती देण्याचे एकमेव स्त्रोत असतात आणि नि:संदेह ते आपले उत्पादन विकण्याचे इच्छूक असतात. यामुळे शेतकऱ्यांची महाग खते आणि किटकनाशकांवरील अवलंबित्व वाढले त्यामुळे त्यांचा फायदा कमी झाला. अनेक शेतकरी कर्जबाजारी झालेले आहेत. आणि ग्रामीण भागात पर्यावरणाचे संकट देखील निर्माण झाले आहे.

भारतातील शेतकरी अनेक वर्षांपासून वेळोवेळी दुष्काळ, शेती न पिकणे किंवा कर्जामुळे ताणाचा सामना करत आहेतच पण शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा नवीनच घटनाप्रकार दिसत आहे. या प्रक्रियांची व्याख्या समाजशास्त्रज्ञांनी शेती आणि शेतकी समाजात होणाऱ्या संरचनात्मक आणि सामाजिक परिवर्तनांच्या दृष्टिकोनातून करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशा आत्महत्या मैट्रिक्स घटना झाल्या आहेत. अर्थात जेथे कारणांची एक मालिका मिळून त्याची एक घटना तयार होत असते. आत्महत्या करणारे अनेक शेतकरी 'सीमांत शेतकरी' होते जे मुळात हरीतक्रांतीच्या पद्धतीचा अवलंब करुन आपली उत्पादकता वाढविण्याचा प्रयत्न करत होते. तथापि असे उत्पादन करण्याचा अर्थ होता, अनेक प्रकारची जोखीम घेणे; शेतीच्या सबसिडीमध्ये केलेल्या कमतरतेमुळे उत्पादनाच्या आणेवारीत कमतरता झाली, बाजार अस्थिर आहे. आणि अनेक शेतकरी आपले उत्पादन वाढविण्यासाठी महाग वस्तूंवर गुंतवणूक करण्याच्यादृष्टीने अत्याधिक कर्ज घेत होते. शेतीचे न पिकणे, (पिकावरील रोग किंवा विनाशकारी जंतु, अत्याधिक पाऊस किंवा दुष्काळामुळे) आणि काही घटनात योग्य आधारभुत सहाय्य किंवा बाजारमुल्याचा अभाव यामुळे शेतकरी कर्जाचे ओझे किंवा आपले कुटुंब चालविण्यास असमर्थ होत असतात. ग्रामीण भागातील बदलणारी संस्कृती ज्यामध्ये विवाह, हुंडा आणि इतर नवीन बाबी आणि शिक्षण व आरोग्याच्या देखभालीचा खर्च यामुळे अधिक उत्पन्नाची आवश्यकता होती, त्यामुळे अशा संकटांची तीव्रता वाढत जाते.[९३]

शेतकऱ्यांच्या आत्महत्या ग्रामीण भागात अनुभवास येणाऱ्या मोठ्या संकटांचा निर्देश करतात. शेती अनेक लोकांसाठी अलाभदायक होत असल्याचे दिसते, आणि शेतीसाठी राज्याचे सहाय्य देखील कमी मिळत आहे. तसेच शेतीचे प्रश्न आता महत्वाचे सार्वजनिक प्रश्न या

[९३] वासवी. ए. आर. (१९९९), 'हरब्रिंगर्स ऑफ रेन: लँड अँड लाइफ इन साऊथ इंडिया,' ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, दिल्ली.

स्वरुपात मांडले जात नाहीत आणि गतिशिलतेच्या अभावामुळे शेतकरी आपल्या बाजूने धोरण ठरवू शकेल किंवा धोरण प्रभावित करु शकेल. असा बळकट दबाव गट तयार करु शकत नाही.

देशाच्या वेगवेगळ्या भागात १९९७–९८ पासून शेतकऱ्यांकडून केल्या जात असलेल्या आत्महत्यांचा संबंध शेतीमधील संरचनात्मक परिवर्तन व आर्थिक आणि कृषी धोरणामध्ये केलेल्या बदलामुळे निर्माण झालेली शेतकी समस्या आहे. यात समाविष्ठ बाबी: जमीन अधिग्रहणाच्या प्रतिमानातील बदल; नगदी पीकांकडे वाढलेल्या कलामुळे पीकांच्या प्रतिमानातील बदल, उदारीकरणाचे धोरण ज्यांनी भारतीय शेतीला जागतिक शक्तींसाठी खुले केले; जास्त किंमतीच्या गुंतवणुकीवर अत्याधिक अवलंबित्व; राज्याचे कृषी विस्ताराच्या कार्यक्रमातून माघार घेणे आणि बहुराष्ट्रीय बियाणे आणि खत कंपनीकडून त्यांचे स्थान अधिग्रहण करणे; शेतीकरीता राज्याच्या सहाय्यात कमतरता; आणि शेती कार्याचे व्यक्तीकरण. सरकारी आकडेवारीनुसार २००१ आणि २००६ च्या दरम्यान आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ आणि महाराष्ट्रात ८९०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.[९४]

### १.१८.१ पारधी महिलांची आर्थिक पार्श्वभूमी :–

भारतामध्ये इतर समाज मुलांना वंशाचा दिवा समजतात तर स्त्रीच्या जन्मास कलंक म्हणून मानले जाते. पारधी समाजात मुलगी जन्मल्यानंतर आनंदउत्सव साजरा करतात. मुलीला धनाची पेटी म्हणून समजले जाते. पारधी समाजातील आर्थिक व्यवहार हे संपूर्णतः स्त्रियाभोवती केंद्रीत असतात. पारधी समाजातील आर्थिक व्यवहार हे छुप्या पद्धतीने स्त्रिया नियंत्रित करतात. मुलींचे लग्न, जात पंचायतींचा निर्णय, एकाच मुलींचे अनेक विवाह या घटनांना उत्पन्नाचे साधन समजले जाते. बहुतांशी पारध्यांना हक्काचे व्यवसाय आणि उपजिवीका करण्यासाठी जमिनी उपलब्ध नसल्यामुळे ते मिळेल ती मोलमजूरी, विट भट्ट्यांवरील कामे, बिगारी कामे अशा स्वरूपाची कामे करून उदरनिर्वाह करतात. ही कामे उपलब्ध नसल्यास भिक्षा मागून उपजिवीका करावी लागते. ठराविक कालावधीमध्ये पारधी समाजातील पुरुष व महिला

---

[९४] सुरी, के. सी. (२००६), 'पॉलिटिकल इकोनॉमी ऑफ ॲग्रेरियन डिस्ट्रेस' इकोनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली ४१:१५२३–२९१

शहरांमध्ये भिक्षा मागण्यासाठी जातात. त्याचबरोबर ऊसतोड कामगार म्हणून देखील काम करतात.

### १.१८.२ पारधी महिलांची उदरनिर्वाहाची साधने व व्यवसाय :–

पूर्वी उदरनिर्वाहासाठी पारधी लोक चोऱ्या–माऱ्या, भिक मागत असत. आता ते शहरात गेल्यावर तेथे ही भिक मागणे, फुगे विकणे, तर शहरात जावून आचाऱ्याच्या हाताखाली महिला काम करतात. पारध्यांच्या बायकांना भुलभुलैया फारच आवडतो. पितळेचा नकली अलंकार सोन्याचे म्हणून दिवसाढवळ्या विकतात. मोठ–मोठ्या गिऱ्हाईकाला शोधायचे, त्यांना बोलण्याच्या नादात गुंतवून हळूच भरपूर सोन आहे, आपल्याला निम्म्या किंमतीत देतो म्हणून सांगून ज्यांच्याजवळ दोन नंबरचा काळा पैसा आहे त्यांना निम्म्या किंमतीला सोन मिळत असल्यास लालचेच्या पोटी नकली सोन विकले जाते. रानोमाळ भटकत असणाऱ्या आणि पोलीसांच्या धाकाने पळत असलेले खरं सोन बाळगू शकतात याचा विचार करणे आवश्यक असते.[९५]

पारधी समाजात पैसेवाले नवरदेव पैसा फेकून कोवळ्या पोरी खरेदी करतात. महिने सहा महिने मनसोक्त भोगतात आणि तिला पुन्हा वाऱ्यावर सोडून देतात. पारधी समाजात आजही दोन धंदे तेजीत चालू आहे. एक नंबरला मुली विकण्याचा आणि दोन नंबरला नकली सोने विकण्याचा दोन्ही धंदे ऐतखाऊ आहेत. गावगाड्यातील इतर समाजात मुली ह्या आई–बापाला डोईजड होतात. तर पारधी समाजात मुलीचा भाव हिऱ्यासमान असतो. म्हणूनचं पारध्यांना आर्थिक रसद पुरवणारी मुलगी ही त्यांच्या दृष्टीने एक ए.टी.एम. असते.[९६]

### १.१९ कौटुंबिक आर्थिक विकासात पारधी महिलांचे स्थान :–

पारधी समाजात परंपरागत व्यवसाय हा चोरी करणे नसून जंगलाच्या सानिध्यात राहून तिथे उपलब्ध असलेल्या साधन संपत्तीवर उपजिवीका करणे निसर्गतः आहे. परंतु शहरातील

---

[९५] संतोष पवार (२०१४), पारध्यांची जातपंचायत, आयडीया पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, पृ.२६

[९६] कित्ता, पृ.३२)

मानवाच्या हस्तक्षेपामुळे या आदिवासी जमातीला आपला नैसर्गिक व्यवसाय विसरून शहरातील शहरी मानवाच्या अनुसार जगावे लागत आहे. त्यांचा नैसर्गिक व्यवसाय हद्दपार झाल्यामुळे उपजिवीकेसाठी चोरी किंवा भिक्षा मागणे हा व्यवसाय पत्कारावा लागला आहे. ही जमात नैसर्गिकता काटक शूरवीर आहे. कुठल्याही दबावाला बळी न पडता पूर्ण ताकदीनिशी त्याचा विरोध करते हीच बाब हेरून ब्रिटीशांनी सदर जमातीस चोरी करणारी जमात म्हणून इतिहासात नोंद केली आहे. त्यामुळे पारधी नावावर चोरी करणारी जमात म्हणून शिक्का मोहर्तब झालेला आहे. सध्याची पारधी जमात ही चोरी करून आपली उपजिवी करते. त्यामध्ये पुरुषांनी चोरी करून आणलेला ऐवज सांभाळून ठेवणे हे घरातील प्रमुख स्त्रीचे मुख्य काम आहे. लग्नाच्या वेळेस स्त्रियांना पुरुषांकडून हुंडा म्हणून स्त्रीचा वडील जी रक्कम ठरवेल ती मिळते. यावरून असे दिसून येते की, स्त्रियांना लग्नाच्या वेळेस विकून त्यापासून उत्पन्न मिळवतात. जर पारधी पंचायतीने पारधी पुरुषास दोषी ठरवून दंड ठोठावल्यास व तो पुरुष तो आर्थिक दंड भरण्यास असमर्थ असेल आणि त्याच्या घरात वयात आलेली अविवाहित मुलगी असेल तर सदर मुलीस विकून दंडाची रक्कम भरली जाते. यावरून असे दिसून येते की, पारधी समाजात ज्या घरामध्ये जास्त मुलीं जन्माला आल्या असतील त्या घरातील उत्पन्नाचे साधन म्हणून मुलींकडे पाहिले जाते व त्या घरातील आई व वडिल मुलींचा उपयोग उत्पन्न मिळविण्यासाठी करतात.

### १.२० आर्थिक व्यवहार (अंतर्गत व बाह्य) :–

पारधी समाजात अंतर्गत देणे–घेण्याचे व्यवहार चालतात. बहुतांशी पारध्यांचे बँकामध्ये खाते नसल्यामुळे पैसे व ऐवज स्त्रिया गाठोड्यामध्ये बांधून स्त्रीच्या गाठोड्या सोबत घराच्या बाहेर ठेवले जाते ही प्रथा संपूर्ण पारधी समाजात ज्ञात आहे. त्यामुळे एकाचा ऐवज दुसरे कोणी चोरी करत नाही. त्याचबरोबर स्त्रीच्या लुगड्याला हात लावणे हे तुच्छपणाचे लक्षण मानले जाते त्यामुळे त्यांचा पैसा किंवा ऐवज सुरक्षित राहतो. अडी–अडचणीला पारधी समाज ऐकमेकांना आर्थिक स्वरूपात उसणवारी करतात. जर पारधी पुरुष हा कुठल्याही अडचणीत अडकला असेल जसे की, पोलिसांनी अटक केली असेल किंवा जात पंचायतीने दोषी ठरवला असेल तर त्यावेळी उसणवारी घेऊन पुरुषांची सुटका करण्यामध्ये स्त्रियांचे महत्त्वाचे योगदान असते. पारधी समाजातील स्त्रीने जर कर्ज स्वरूपात रक्कम घेतली असेल आणि ती जर परतफेड करण्यास

असमर्थता दर्शवित असेल तर त्या बदल्यात तीला आपल्या शरीराचा उपयोग करून कर्जफेड करावी लागते.

### १.२१ अनुसूचित जमातींसाठी (पारधी) भारतीय राज्यघटनेतील महत्त्वाच्या तरतूदी :–

भारतीय राज्य घटनेमध्ये दुर्बल घटकांतील विशेषतः अनुसूचित जाती आणि जमाती यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक हितसंबंधाची जपवणूक व संरक्षण करण्यासाठी तसेच सर्व प्रकारच्या शोषणातून वंचित करण्यासाठी तसेच त्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी खास तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे–

**कलम (१५ व १६)** ''कायद्यापुढे समानता धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई व सार्वजनिक सेवा योजनांच्या बाबींमध्ये समान संधी.''

**कलम–१५ (४)** नुसार, ''अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती तसेच आर्थिकदृष्ट्याा मागास सामाजिक घटकांना शैक्षणिक, सामाजिक गतिशिलता प्राप्त करून देण्यासाठी राज्य या कलमाद्वारे प्रयत्न करेल.''[९७]

**कलम (१६) (४)** नुसार, ''सरकारच्या विविध विभागातील शासकीय सेवेमध्ये मागास प्रवर्गातील उमेदवारास आरक्षण देण्यात येईल, तसेच राज्य मागासवर्गासाठी शासकीय सेवेत संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करेल.''[९८]

**कलम (१७)** ''अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे व तिथे कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिद्ध करण्यात आले आहे. अस्पृश्यतेतून उद्भवणारी कोणतीही निःसमद लादणे हा कायद्यानुसार शिक्षा पात्र अपराध असेल.''[९९]

---

[९७] गायकवाड प्रदीप (२०००) (अनुवादित), भारताचे संविधान, समता प्रकाशन, लष्करी बाग, नागपूर, पृ. ०३

[९८] कित्ता, पृ.०३

[99] कित्ता, पृ.०४

**कलम (२३)** ''माणसांचा व्यापार आणि बिगार यांसारख्या अन्य स्वरुपातील वेठबिगार यांना सक्त मनाई करण्यात येत असून या बाबींचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणारे कृत्य कायद्यानुसार शिक्षेस पात्र ठरतील.''[१००]

**कलम (२५) (२)** नुसार ''सामाजिक कल्याण व सुधारणा या बाबत अथवा सार्वजनिक स्वरुपाच्या हिंदू-धार्मिक संस्था, हिंदूंचे सर्व वर्ग व त्यामधील सर्व पोटभेट यांना खुल्या करण्यात येतील.''[१०१]

**कलम (२९) (१)** नुसार भारताच्या कोणत्याही भागामध्ये राहणाऱ्या सर्व अल्पसंख्याकांची भाषा, लीपी, तसेच त्यांच्या सांस्कृतिक परंपरेची जपणूक करण्याचा राज्य प्रयत्न करेल.

**कलम (४६)** नुसार, ''समाजातील कमकुवत वर्गाचे विशेषत: अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीचे शैक्षणिक आणि आर्थिक हीत जपण्यासाठी सरकार विशेषत्वाने काळजी घेईल. याबरोबरच सामाजिक अन्याय व सर्व प्रकारच्या शोषणापासून राज्य त्यांचे संरक्षण करेल.''[१०२]

थोडक्यात कायद्यासमोर समानता असेल तरच धर्म, जात, वंश, लिंग किंवा भाषा, जन्म स्थान यावरून भेदभाव केला जाणार नाही. तसेच सार्वजनिक सेवा योजनांच्या बाबतीत समान संधी दिली जाईल.

**कलम (३३०) (१)** नुसार, ''लोकसभेमध्ये अनुसूचित जाती (आसाममधील आदिवासी क्षेत्रातील अनुसूचित जमातींना वगळून) तथा अनुसूचित जमातींसाठी जागा आरक्षित राहतील.

**(२)** नुसार, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींकरिता जागा आरक्षित करण्यात येणाऱ्या जागांची संख्या ही त्या त्या राज्यातील एकूण लोकसंख्येतील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या प्रमाणात असेल.''[१०३]

---

[१००] कित्ता, पृ. ०४
[१०१] कित्ता, पृ. १०
[१०२] कित्ता, पृ. १५९
[१०३] भारत सरकार, भारत का संविधान, विधी और न्याय मंत्रालय, नई दिल्ली, १९७३, पृ.१७६

**कलम (३३२)** मध्ये असे स्पष्ट सांगितले आहे की, ''प्रत्येक राज्य विधानसभेमध्ये अनुसूचित जाती व जमातींकरिता (आसाममधील आदिवासी क्षेत्रातील अनुसूचित जमातींना वगळून) जागेचे आरक्षण असेल.''[१०४]

**कलम (३३५)** नुसार, ''मध्यवर्ती तथा राज्य शासनाच्या सेवेतील भरती करतेवेळी प्रशासनातील सेवा तथा पदावरील अनुसूचित जाती आणि जमातीच्या दाव्याची दखल घेतली जाईल.''[१०५]

**कलम (३३८) (१)** नुसार ''अनुसूचित जाती आणि जमातीकरिता एक विशेष प्रशासकीय अधिकारी असेल, याची नियुक्ती भारताचे राष्ट्रपती करतील.

**(२)** नुसार, अनुसूचित जाती आणि जमातीकरिता राज्य घटनेच्या मर्यादित सुरक्षाविषयक सर्व बाबींचा शोध घेणे, त्याबरोबरच या सुरक्षिततेच्या कार्याच्या संदर्भात राष्ट्रपतींना अहवाल देणे, राष्ट्रपती असे सर्व अहवाल संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यास सांगतील.''[१०६]

**कलम (३४२)**

''एखाद्या समाजास आदिवासी जमातीचा दर्जा देण्यासाठी काही महत्त्वाचे निकष निश्चित केलेले आहेत.

**(२)** नुसार, शासकीय अनुदानावर चालणाऱ्या शैक्षणिक संस्थेत जात, धर्म, वंश, भाषा किंवा इतर कोणत्याही आधारावर प्रवेश नाकारला जाणार नाही.''[१०७]

उपरोक्त उल्लेखित कलमांचा थोडक्यात आढावा घेतल्यास कलम ४६ मध्ये विकासात्मक आणि नियामक या दोन्ही बाबी सामावलेल्या दिसून येतात. तर कलम १५(४), १६(४) व १७ मध्ये कायद्याने कोणत्याही कारणावरून भेदभाव, अस्पृश्यतेसारख्या अनिष्ठ व तुच्छ रुढी या नष्ट करण्यात आल्या आहेत. कलम २३ मध्ये वेठबिगारीस सक्त मनाई करण्यात

---

[१०४] कित्ता, पृ.१७७

[१०५] कित्ता, पृ.१७९

[१०६] कित्ता, पृ.१८०

[१०७] गायकवाड प्रदीप (अनुवादित), भारताचे संविधान, पृ. १९

आलेली आहे. तर कलम ३३५ नुसार शासकीय सेवेतील मागासवर्गीयांचा दावा ग्राह्य धरला जाईल हे स्पष्ट होते. कलम ३३२ व ३३० नुसार विधान सभा तथा लोकसभेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींकरिता विशिष्ठ जागा आरक्षित करण्यात आल्याचे आढळते. म्हणून उपरोक्त सर्व घटनात्मक तरतुदी (कलमे) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

## १.२२ पंचवार्षिक योजनांमध्ये आदिवासींकरीता (पारधी) करण्यात आलेल्या शिफारशी :–

भारतीय सरकारने नियोजनबद्ध आणि जलदगतीने विकास करण्यासाठी इ.स. १९५१ पासून पंचवार्षिक योजनेची आखणी केलेली आहे. त्यानुसार भारतीय नियोजनाची दीर्घकालीन सर्व सामान्य उद्दिष्ट्ये साध्य करण्याचा प्रयत्न केंद्रीय सत्तेचा होताना दिसून येतो. सध्या भारतात जवळपास दहा पंचवार्षिक योजना पूर्ण झालेल्या आहेत. यावरून भारतीय नियोजनाचे दीर्घकालीन प्रमुख उद्दिष्ट हे 'सम न्यायासह सामाजिक व आर्थिक विकास करणे' हे आहे, असे स्पष्ट होते. हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने इतर अनेक सर्वसामान्य उद्दिष्ट्ये ठरविण्यात आलेली आहेत. त्यात आर्थिक विकासाचा दर वाढविणे, राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नात वाढ करणे, बेकारी व दारिद्र्य निर्मूलन करणे, आर्थिक विषमता कमी करणे व संतुलीत आर्थिक विकास साध्य करणे.[१०८] इत्यादी उद्दिष्ट्ये असल्याचे दिसून येतात.

या सर्व निर्देशित केलेल्या उद्दिष्टांना मागील प्रत्येक पंचवार्षिक योजनेत कमी–जास्त महत्त्व दिल्याचे आढळून येते, त्याचबरोबर विशिष्ट प्रमाणात खर्च करून ते साध्य करण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. नियोजनाच्या काळात ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी भारत सरकारने अनेक कार्यक्रम व योजना राबवून विविध विभागांमार्फत कोटयावधी रुपये खर्च केलेले आहेत, असे असले तरी आपण या संपूर्ण उद्दिष्टांची पूर्तता शंभर टक्के करू शकलेलो नाहीत, हे वास्तव कटू सत्य मान्य करावेच लागते.

[१०८] कुलकर्णी सर्वोत्तम (१९९७), 'भारताच्या आर्थिक नियोजाची व्यूव्हरचना : एक सिंहावलोकन', योजना, अंक–५, मुंबई, पृ.१८

भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ७६.२७ टक्के लोकसंख्या देशाच्या पाच लाख खेड्यात राहते. तर अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या एकूण लोकसंख्येपैकी साधारणत: ८२.७० टक्के लोकसंख्या खेड्यात राहते.[१०९] म्हणून देशाचा विकास हा ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासावर अवलंबून आहे. राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेच्या (N.S.S.O.) १९६४-६५ सर्व्हेनुसार बहुतांश ग्रामीण भारतीय लोक दारिद्रय रेषेखाली राहतात. यात समाजातील दुर्बल घटक अनुसूचित जाती व जमाती यांचे प्रमाण निश्चितच अधिक असल्याचे दिसून येते व त्यांच्या दारिद्रयाची तीव्रता इतरांच्या तुलनेत जास्त असल्याचे आढळून आले.[११०]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय सरकारने पंचवार्षिक योजनांच्या सुरुवातीच्या काळापासूनच आर्थिक विकासाबरोबर दारिद्रय निर्मूलन आणि बेकारीचे उच्चाटन हे प्रमुख उद्दिष्ट मानलेले दिसून येते. परंतु राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ म्हणजे देशाचा आर्थिक विकास असा चुकीचा अर्थ लावला गेल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न वाढीवरच अधिक लक्ष केंद्रित होवून वाढीव उत्पन्नाच्या न्याय वितरणाकडे मात्र पूर्णत: दुर्लक्ष झाल्याचे आढळून येते. असे होण्याचे प्रमुख कारण म्हणजे 'झिरपत्या सिद्धांतानुसार' (Trickle Down Theory) वाढीव राष्ट्रीय उत्पन्नाचा हिस्सा आपोआपच समाजातील तळागाळातील अत्यंत गरीब लोकांपर्यंत पोहोचतो, असा गैरसमज नियोजनकारांचा झालेला असावा असे मानले जाते.

भारतात गेल्या ६० ते ६५ वर्षातील आर्थिक नियोजनाच्या विकासाचा लाभ श्रीमंतांनाच मोठ्या प्रमाणात झालेला असल्यामुळे भारतातील गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी दिवसेंदिवस वाढताना आढळून येते. याचा परिणाम म्हणून भारतात मध्यमवर्गीयांचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होऊन भविष्यात भांडवलशाहीतील गरीब-श्रीमंतांचा (कामगार-मालक) संघर्ष अटळ आहे, असे भारतीय अभ्यासकांचे भाकीत आहे, ते सत्य ठरण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

---

[109] Agrwal A. K. Employment in Rural India, Indian Economic Issue, P. Jagdish Gandhi (Ed.), Pointer Publisher, Jaipur, 1995, P. 25.

[११०] दत्त आणि सुंदरम (२०००), भारतीय अर्थव्यवस्था, एस चाँद आणि कंपनी, नवी दिल्ली, पृ.१४६

थोडक्यात स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतातील सर्वसामान्यांच्या आर्थिक परिस्थितीत फारसा फरक पडल्याचे पाहावयास मिळत नाही. या संदर्भात नोबेल पुरस्कार प्राप्त अर्थतज्ज्ञ (१९९८), डॉ. अमर्त्य सेन यांचा निष्कर्ष उल्लेखनीय ठरतो.

सेन यांच्या मते, ''देशाच्या आर्थिक विकासाकरिता राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ आवश्यक असली तरी ती पुरेशी; मात्र निश्चित नाही. राष्ट्रीय उत्पन्नाचा संबंध जोपर्यंत उत्पन्नाच्या न्याय वितरणाशी जोडला जात नाही, तोपर्यंत सर्व विकास हा निरर्थक ठरतो. उत्पन्नाच्या वाढत्या प्रमाणाबरोबर समाजातील दुर्बल घटकांचे जीवनमान जोपर्यंत उंचावणार नाही, तोपर्यंत वाढत्या उत्पन्नाच्या प्रमाणास अर्थ प्राप्त होणार नाही. आर्थिक विकासासोबतच सामान्य माणसांचे राहणीमान, आरोग्य, शैक्षणिक विकास यासह सामाजिक व आर्थिक सेवा सुविधा उपलब्ध होणे, सामुहिक निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग असणे हे झाले तरच खऱ्या अर्थाने विकास झाला असे म्हणता येईल.[१११]

डॉ. अमर्त्य सेन म्हणतात त्या पद्धतीने विकासाची प्रक्रिया भारतात आजपर्यंत राबविली गेली नसल्याचे आढळून येते. सन १९७९-८१ च्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या आयोगाने असे मत व्यक्त केलेले आहे की, ''रोजगारीचा दर कमी आणि उपभोग खर्चाचा दर जास्त असल्यामुळे भारतातील अनुसूचित जाती व जमातीतील दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. या समुहाचे दारिद्र्य निर्मूलन एकाच उद्दिष्टांमुळे शक्य आहे ते म्हणजे न्यायासह सामाजिक आर्थिक विकास करणे हे होय.[११२]

देशातील सर्वसामान्यांचा तथा दुर्बलांचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचे उद्दिष्ट साध्य होणे शक्य नाही. हे सर्व मान्य झाल्यामुळे आर्थिक विकासाच्या नियोजनाचे ध्येय म्हणून लोकशाही समाजवाद डोळ्यासमोर ठेवण्यात आला. वस्तुत: १९७४-७५ मध्ये भारतातील सुमारे ४० टक्के लोक दारिद्र्यरेषेच्या खालच्या पातळीवर

---

[111] Sen A. K. (1975), Poverty Inequality and Unemployment, Economic and Political Weekly, Mumbai, P. 12.

[११२] दांडेकर आणि रथ (१९९८), भारतातील दारिद्र्य, साठे प्रकाशन, पुणे, पृ.२४

जीवन जगत होते. दारिद्र्याच्या खालचे जीवन जगणाऱ्यांची संख्या १९७० पासून सतत वाढत असल्याचे दिसून येते.

भारतात लोकशाही समाजवाद प्रस्थापित करण्यासाठी सर्वांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे आणि प्रत्येकाला किमान वेतन मिळवून दिले जाणे आवश्यक ठरते.[११३]

भारतात सन १९७४–७५ मध्ये पाचव्या पंचवार्षिक योजनेस सुरुवात झाली. या योजनेची उद्दिष्ट्ये उत्पादक रोजगारात वाढ घडवून आणने, समाज कल्याण कार्यक्रमाची व्याप्ती वाढविणे, सामाजिक, आर्थिक व राजकीय विषमता कमी करण्यासाठी संस्थात्मक राज्यवित्तीय आणि इतर उपाय–योजना करणे, भारतातील भूमिहीन शेतमजुरांसाठी, वन्य जमातींसाठी आणि समाजातील अत्यंत गरीब लोकांसाठी किमान गरजांच्या राष्ट्रीय कार्यक्रमांची यशस्वीरीतीने अंमलबजावणी करणे, यासाठी प्राथमिक शिक्षणाची सोय, पिण्याच्या पाण्याची सोय, वैद्यकीय सोय–सुविधा, गृहनिर्माण, ग्रामीण विद्युतीकरण, झोपडपट्ट्यांची सुधारणा इत्यादी उपाय योजना करणे.[११४] इत्यादी स्वरुपाची उद्दिष्ट्यो या पंचवार्षिक योजनेत ठरविण्यात आलेली आढळून येतात.

समाजवादी समाजरचना प्रस्थापित करण्याकरिता सर्वात प्रमुख कसोटी म्हणजे राष्ट्रीय संपत्ती व उत्पन्नाचे वाटप न्याय पद्धतीने समाजातील दुर्बलांच्या दृष्टीने अनुकूल होणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देखील याचे समर्थन त्यांच्या राज्य समाजवाद (State Socialism) या संकल्पनेत केल्याचे आढळते.[११५]

डॉ. आंबेडकरांच्या मते, भारतातील जातीव्यवस्थेमुळे देशातील उत्पादक साधनांच्या उत्पादक साधनांच्या मालकी हककाचे मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण झालेले आहे. भारताच्या ग्रामीण भागात 'शेती' हे एकमेव उत्पादक स्वरुपाचे साधन आणि अशा दुर्मिळ उत्पादक साधनाची मालकी हक्काचे केंद्रीकरण झाल्यामुळे ग्रामीण भारतात मोठ्या प्रमाणात आर्थिक

---

[११३] देसाई भालेराव (१९९८), भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे, पृ.१३४

[११४] कित्ता, पृ.१३५

[115] Dongre M. K. (1974), Economic Thoughts of Dr. B. R. Ambedkar, Nagpur, P. 66.

विषमता निर्माण झालेली आहे. याचा दूरगामी परिणाम हा भारतातील जातीव्यवस्थेला बळकटी मिळण्यास झालेली दिसून येते.

देशातील साधन सामुग्रीचा मालकी हक्क व अधिकार, त्यांचे नियंत्रण आणि राष्ट्रीय उत्पन्न व संपत्तीचे न्याय वाटप होण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी राज्य समाजवादाची संकल्पना प्रभावीपणे मांडल्याचे स्पष्ट होते. त्यांच्या राज्य समाजवाद या संकल्पनेची काही प्रमुख वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

शेतीचे राष्ट्रीयकरण करून, शेत जमिनीचे किफायतशीर आकाराचे तुकडे करावेत. त्याचे भूमिहीनांना न्याय पद्धतीने वाटप केले जावे, जेणेकरून शेतजमिनीची उत्पादकता वाढेल. त्याला गती देण्यासाठी शेतीकरिता लागणारे भांडवल, सिंचनाच्या सोयी–सुविधा, सुधारीत तंत्रज्ञान व आधुनिक अवजारे सरकारने जाणीवपूर्वक पुरवावेत.

देशातील संपूर्ण प्रमुख उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करून उपलब्ध साधन सामग्रीचा अधिकाधिक वापर केला जावा. त्याचप्रमाणे डॉ. अमर्त्यसेन यांचे दारिद्र्य आणि बेरोजगारी यांच्यातील संबंधाच्या विश्लेषणावरून स्पष्ट होते की, दारिद्र्य हे नेहमी रोजगारीशी संबंधित असते. समाजातील दुर्बल घटकाकडे उत्पादनाची साधने व स्वत:चा कोणताही व्यवसाय नसल्यामुळे दारिद्र्यातून पुन्हा दारिद्र्य निर्माण होते. म्हणून जोपर्यंत दुर्बलांना मोठ्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत, तोपर्यंत दारिद्र्याचे निर्मूलन होणे अशक्य असल्याचे त्यांनी नमूद केलेले आहे. या दारिद्र्याच्या दुष्ट चक्राची कोंडी फोडण्याकरिता राष्ट्रीय उत्पन्न व सार्वजनिक संपत्तीचे वाटप दुर्बल घटकांच्या दृष्टीने अनुकूल होणे आवश्यक ठरते, असा विचार डॉ. अमर्त्य सेन यांच्या दारिद्र्य, विषमता आणि बेरोजगारी या निबंधात आढळते.[११६]

## १.२३ अनुसूचित जाती व जमाती आयोगामार्फत करण्यात आलेल्या शिफारशी

भारत सरकारने देशातील दारिद्र्याचा अभ्यास करण्यासाठी अनुसूचित जाती व जमाती आयोग १९७९–८१ मध्ये नेमलेला आहे. या आयोगाने आपल्या २७ व्या अहवालात अनुसूचित

---

[116] Sen A.K. (1975), Poverty Inequality and Unemployment, Economic and Political Weekly, Mumbai, August, P. 10-15

जाती व जमातीच्या संदर्भात असे नमूद केले आहे की, अनुसूचित जाती प्रवर्गातील लोकांच्या रोजगारीचा दर कमी आणि उपभोग खर्चाचा दर जास्त असल्यामुळे त्यांच्यात दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्यांचे प्रमाण तुलनेने सर्वाधिक आढळते. त्यांचे दारिद्र्य निर्मूलन हे एकाच उद्दिष्टाने शक्य आहे, ते म्हणजे न्यायासह समान विकास होय.[११७]

भारतातील दारिद्र्याचा अभ्यास करण्यासाठी स्वातंत्र्योतर कालखंडात अनेक तज्ञांच्या समित्या व अभ्यास आयोग नेमण्यात आले. या समित्यांनी दारिद्र्यासंबंधी स्वतंत्र अशी वेगवेगळ्या स्वरुपाची निष्कर्ष नोंदविल्याचे दिसून येते. यापैकी उल्लेखनीय निष्कर्ष म्हणजे डॉ. पार्थ सारथी यांचे आहे. डॉ. पार्थ सारथी यांनी भारतातील दारिद्र्याचा सविस्तर अभ्यास करून असे निर्देशीत केलेले आहे की, भारतातील जाती व्यवस्थेमुळे समाजातील दुर्बल घटक हा राष्ट्रीय संपत्तीच्या उपभोगापासून वंचित राहिला गेला. त्याचप्रमाणे असंघटीत क्षेत्रातील लोकांची अवस्था अत्यंत दयनीय झाल्याचे दिसून येते. त्यामुळे राष्ट्रीय संपत्तीचा कायदा या क्षेत्रीय श्रमिकांनाही फारसा होऊ शकलेला नाही म्हणून अशा दुर्बल घटकांच्या सामाजिक व आर्थिक उत्कर्षासाठी आणि दारिद्र्य निर्मूलनाकरिता सरकारने संयुक्त कार्यक्रम हाती घेणे आवश्यक ठरते. यामुळे दुर्बल घटकांतील बेकार सामाजिक व आर्थिक उत्कर्षासाठी आणि दारिद्र्य निर्मूलनाकरिता सरकारने संयुक्त कार्यक्रम हाती घेणे आवश्यक ठरते. यामुळे दुर्बल घटकांतील बेकार लोकांना रोजगार प्राप्त होऊन त्यांच्या नियमित उत्पन्नात व संपत्तीत वाढ होईल. याकरिता सरकारबरोबरच देशातील सर्व जबाबदार घटकांची एकत्रितरित्या जाणीवपूर्वक प्रयत्न करणे अनिवार्य आहे.[११८]

अनुसूचित जाती व जमातीच्या (१९७९–८१) आयोगाने आपल्या २७ व्या अहवालात या प्रवर्गाची प्रमुख वैशिष्ट्ये सांगितलेली दिसून येतात. या समुहातील बहुतांश लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगतात, त्यांच्याकडे अत्यल्प संपतीची मालकी असते, सर्व सामान्यत: हे सर्वलोक केवळ शेतमजुरीवर आपली गुजरान करताना आढळतात.

---

[117] Govt. of India, Report of the commissioner for SC/ST, Part-I, 27th Report, 1978-81, Delhi, P. 2

[118] Parth Sarathy G., 'Reriention of rural Development programmers', E.P.W., Vol. XX, Non. 1985, P.2125

अनुसूचित जाती व जमातीतील लोक प्रामुख्याने पारंपरिक लघु व कुटीर उद्योग करताना दिसतात. तथा कमी उत्पन्न मिळवून देणाऱ्या व्यवसायात ते अधिक राबतात. अशा दारिद्र्याच्या संकटात सापडलेल्या लोकांची त्यातून मुक्तता करण्यासाठी सरकार आर्थिक विकासाच्या नितीचा एक भाग म्हणून विशेष प्रयत्नांच्या अनुषंगाने काही विशिष्ट कार्यक्रम व योजना राबविण्याची आवश्यकता असल्याचे अनुसूचित जाती–जमाती आयोगाने सुचविलेले दिसते.[११९] या आयोगाच्या निष्कर्ष व शिफारशीवरून अधिक स्पष्ट होते की, इ.स. १९८० मध्ये भारतात दारिद्र्य रेषेखाली राहणाऱ्या एकूण लोकसंख्येचे प्रमाण जवळपास ५० टक्के होते. अनुसूचित जातीच्या एकूण कुटुंबांपैकी जवळपास ७५ टक्के पेक्षा जास्त कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील अत्यंत निकृष्ठ प्रतीचे जीवन जगताना आढळतात. याचा अर्थ असा होतो की, ग्रामीण भारतात दारिद्र्याचे मोठे प्रमाण असून ते अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांमध्ये तुलनेने अधिक असल्याचे दिसून येते.

## १.२४ शासकीय आर्थिक विकासाच्या योजना :–

भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वांनुसार राज्यातील दुर्बल घटक विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती/आदिवासी लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घेण्याची तसेच त्यांची सामाजिक अन्याय व इतर पिळवणूकीपासून संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आलेली आहे. या मार्गदर्शक तत्वांस अनुसरून राज्य शासन आदिवासी जमातींच्या विकासासाठी विविध योजना राबवित आहे. आदिवासी उपयोजनेत अनेक कल्याणकारी योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. या योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी तसेच या योजना यशस्वी होण्यासाठी अंदाजपत्रकात भरीव तरतूद केली जाते. राज्य सरकार आदिवासी उपयोजने– अंतर्गत शैक्षणिक विकासाच्या योजना, आर्थिक उन्नतीच्या योजना तसेच इतर योजना राबवित आहे. त्याचप्रमाणे शासन इतर विभागांमार्फतही अनेक योजना राबवित आहे. त्यामध्ये जिल्हा परिषद, पंचायत

---

[119] Parth Sarathy G., 'Reriention of rural Development programmers', E.P.W., Vol. XX, Non. 1985, P.25

समिती, स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा विशेषत्वाने समावेश होतो. महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत पुढील योजना राबविण्यात येतात.

**(अ) शैक्षणिक विकासाच्या योजना**

१) शासकीय आश्रमशाळा समूह योजना.

२) स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य.

३) आदर्श आश्रमशाळा.

४) आदिवासी मुला-मुलींची शासकीय वसतिगृहे.

५) अनुसूचित जमातीच्या (आदिवासी) विद्यार्थ्यांना शालान्त परिक्षोत्तर शिष्यवृत्ती (भारत सरकार शिष्यवृत्ती)

६) अनुसूचित जमातीच्या (आदिवासी) विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करणे योजना.

७) व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता देण्याची योजना.

८) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना.

**(ब) आर्थिक उन्नतीच्या योजना**

१) अनुसूचित जमातीच्या (आदिवासी) शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप पुरवठा योजना.

२) अनुसूचित जमातीच्या (आदिवासी) लोकांना घरावरील गवती छपरांऐवजी मंगलोरी कौले किंवा पन्हाळी पत्रे टाकण्याकरिता अर्थसहाय्य योजना.

३) केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना.

४) मोटार वाहनचालक प्रशिक्षण केंद्र योजना.

५) आदिवासी युवकांना पोलीस व लष्कर भरतीपूर्व प्रशिक्षण योजना.

६) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना.

७) स्वयंरोजगारासाठी कर्जपुरवठा योजना.

**(क) इतर योजना**

१) मागासवर्गीयांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना अर्थसहाय्य.

२) खावटी कर्ज योजना.

३) धान्यकोष योजना.

४) आदिवासी जमातीच्या उमेदवारांसाठी सेवायोजन नोंदणी.

५) आदिवासी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना/संस्थांना आदिवासी सेवक/संस्था पुरस्कार.

६) आदिवासी हस्तकला प्रदर्शन.

७) आदिवासी पारंपारिक नृत्यस्पर्धा.

८) वारली चित्रकला स्पर्धा.

९) आदिवासी युवकांकरिता नेतृत्व प्रशिक्षण व स्पर्धापूर्व प्रशिक्षण योजना.

**१.२५ शासकीय योजनांची फलश्रुती :–**

**१) शासकीय आश्रमशाळा समूह योजना**

भारतीय संविधानाच्या कलम ४६ प्रमाणे शासनावर अनुसूचित जमातीच्या/आदिवासी लोकांसाठी शिक्षणाच्या व आर्थिक उन्नतीच्या दृष्टीकोणातून खास जबाबदारी टाकण्यात आलेली आहे. आदिवासी जमातींमध्ये निरक्षरतेचे प्रमाण फार मोठे आहे. महाराष्ट्रात आदिवासी जमातींचे साक्षरतेचे प्रमाण इ.स.१९६१ च्या जनगणनेनुसार फक्त ७.२१ टक्के होते. तर एकूण साक्षरतेचे प्रमाण २९.८२ टक्के होते. इ.स.१९७१ च्या जनगणनेनुसार आदिवासी जमातींच्या साक्षरतेचे प्रमाण ११.७४ टक्के होते. तर एकूण साक्षरतेचे प्रमाण ३९.१३ टक्के होते. म्हणजेच एकूण साक्षरता व आदिवासींची साक्षरता यात फार मोठी तफावत होती. शिक्षण हा आदिवासी विकासाचा पाया समजून महाराष्ट्र शासनाने इ.स.१९७२ पासून आश्रमशाळा समूह योजना सुरू केली. डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींची सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रगती व्हावी हा समूह आश्रमशाळा सुरू करण्यामागचा उद्देश आहे. डोंगराळ भागात आदिवासी जमातींची ५००० ते ७००० लोकसंख्या असलेल्या विभागात आश्रमशाळा सुरू करण्यात येते. आश्रमशाळा समूहात शाळा आणि वसतिगृह यांचा समावेश असतो. इयत्ता १० वी पर्यंत वर्ग असलेल्या आश्रमशाळेस पोस्ट–बेसिक आश्रमशाळा असे म्हणतात. आश्रमशाळेत शिकणाऱ्या मुलांची राहण्याची व जेवणाची मोफत सोय केली जाते. तसेच वह्या–पुस्तके, शालेय साहित्य,

वैद्यकीय मदत दिली जाते. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राज्यात १११४ निवासी आश्रमशाळा आहेत. त्यापैकी ५६० शासकीय आश्रमशाळा, २ आदर्श आश्रमशाळा, १३ इंग्रजी माध्यमाच्या निवासीशाळा शासनाकडून चालविण्यात येतात. उर्वरित ५५४ आश्रमशाळा स्वेच्छा संस्थांमार्फत चालविल्या जातात. शासकीय आश्रमशाळांमध्ये सुमारे २ लाख मुले–मुली मोफत शिक्षण घेत आहेत. अतिमागासलेल्या जमातींच्या मुलांना प्राधान्याने प्रवेश दिला जातो. त्यानंतर दारिद्र्य रेषेखालील, गरीब कुटुंबातील, शेतमजूर, भूमिहीन व लहान शेतकरी कुटुंबातील आदिवासी मुलांना प्राधान्य दिले जाते.[१२०]

**२) स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य**

आदिवासी जमातींच्या शैक्षणिक विकासाकरिता अनेक स्वेच्छा संस्था कार्यरत आहेत. अशा संस्थांमार्फत स्थापन करण्यात आलेल्या आश्रमशाळांना इ.स.१९५३–५४ पासून अनुदान देण्यात येत आहे. या आश्रमशाळांत आदिवासी विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, शैक्षणिक साहित्य व इतर सवलती मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. अशा आश्रमशाळा चालविण्यासाठी स्वेच्छा संस्थांना सरकारकडून विहित प्रमाणात अनुदान दिले जाते. स्वेच्छा संस्थांमार्फत अनुदान तत्वावर ५५४ आश्रमशाळा चालविण्यात येत आहेत. अशा अनुदानित आश्रमशाळांमध्ये सध्या १ लाख ७७ हजार मुले–मुली शिक्षण घेत आहेत.[१२१]

**३) आदर्श आश्रमशाळा**

महाराष्ट्र शासनातर्फे चालविण्यात येणाऱ्या शासकीय आश्रमशाळा तसेच स्वेच्छा संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळांमधील हुशार आदिवासी विद्यार्थ्यांची निवड करून अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाकडे विशेष लक्ष देणे हा आदर्श आश्रमशाळा सुरू करण्यामागे सरकारचा उद्देश आहे. आदर्श आश्रमशाळांमुळे आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक विकासासाठी स्पर्धा निर्माण होऊन त्यांची गुणवत्ता वाढण्यास मदत होईल. तसेच त्यांना विविध क्षेत्रातील उच्च पदावर पोहोचण्यासही मदत होईल. महाराष्ट्र शासनाने अशा दोन आदर्श

[१२०] आदिवासी उपयोजना, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, २००९–१०, पृ.४२
[१२१] आदिवासी उपयोजना, पृ.४३

आश्रमशाळा १९९०–९१ मध्ये सुरू केल्या आहेत. या शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन, गणवेश व सर्व शैक्षणिक साहित्य पुरविण्यात येते.[१२२]

### ४) आदिवासी मुला–मुलींची शासकीय वसतिगृहे

आदिवासी जमाती या नागरी समाजापासून दूर डोंगर–दऱ्यात, कडे–कपारीत, जंगलात, दुर्गम प्रदेशात राहतात. अशा प्रदेशातील आदिवासी होतकरू विद्यार्थ्यांना त्यांच्या गावाजवळ उच्च शिक्षणाची सोय नसते. आदिवासी समाजाची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीब आहे. तसेच त्यांची शहरात राहण्याची सोय नसल्याने व गरिबीमुळे शहरात राहून उच्च शिक्षण घेणे परवडत नसल्याने हुशार होतकरू विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. असे हुशार आदिवासी विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून शासनाने तालुका आणि जिल्हा स्तरांवर तसेच मुंबई, पुण्यासारख्या महानगरांतही आदिवासी मुला–मुलींची वसतिगृहे चालविली आहेत. सन २००४–०५ च्या आकडेवारीनुसार राज्यात २९५ वसतिगृहे चालविण्यात येतात. अलिकडे त्यांच्यात वाढ करण्यात आलेली आहे. अशा वसतिगृहांचा फायदा जवळ–जवळ १५ हजार विद्यार्थी घेत आहेत.

आदिवासी मुला–मुलींना शासकीय वसतिगृहात राहण्याची व भोजनाची मोफत व्यवस्था केली जाते. त्याशिवाय पाठ्यपुस्तके, संदर्भ पुस्तके, शैक्षणिक साधनसामग्री तसेच इतर आवश्यक साहित्य मोफत दिले जाते. शासकीय वसतिगृहांच्या सुविधांमुळे वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापनाशास्त्र, शिक्षणशास्त्र, कला, वाणिज्य व विज्ञान तसेच विधी महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा होत आहे.[१२३]

### ५) आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती

ग्रामीण डोंगराळ भागांत राहणाऱ्या आदिवासी जमातीच्या गरीब तसेच आर्थिकदृष्ट्या कमकुवत अशा विद्यार्थ्यांना वरील शिष्यवृत्ती दिली जाते. आदिवासी विद्यार्थ्यांना शालांत परिक्षोत्तर उच्च शिक्षणाकरिता प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने व त्यांना उच्च शिक्षणाचा खर्च

---

[१२२] आदिवासी उपयोजना, पृ.४३
[१२३] आदिवासी उपयोजना, पृ.४४

भागविणे शक्य व्हावे म्हणून भारत सरकारतर्फे ही योजना राबविण्यात येते. या योजनेखाली विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, शिक्षण फी, नोंदणी शुल्क, ग्रंथालय फी, परीक्षा फी, प्रयोगशाळा फी व अन्य मान्य फी मंजूर केल्या जातात. शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्य दराच्या १/३ एवढाच निर्वाह भत्ता दिला जातो. ही योजना प्रकल्प अधिकाऱ्यांच्या स्तरावरून राबविली जाते.[१२४]

**६) आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करणे–**

कोणत्याही स्तरावर आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण घेता यावे हा या योजनेमागील उद्देश आहे. उत्पन्नाच्या मर्यादेमुळे भारत सरकारच्या शिष्यवृत्ती योजनेचा सर्वच विद्यार्थ्यांना फायदा मिळू शकत नाही. असा फायदा मिळू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या दराने मान्यता प्राप्त शिक्षण संस्थेत शिक्षण घेत असताना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची शिक्षण संस्थेस प्रतिपूर्ती करण्यात येते.

**७) व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याची योजना.**

सर्वसाधारण अभ्यासक्रमापेक्षा उच्च व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी जास्त खर्च येतो. आदिवासी विद्यार्थी गरीब असल्याने असे जास्त खर्चिक असलेले व्यावसायिक शिक्षण घेत नाहीत. काही विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने मध्येच शिक्षण सोडून देतात. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या इतर आर्थिक सवलतींशिवाय उच्च व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागणारा जादा खर्च भरून काढण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आलेली आहे.

**८) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना**

आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांमध्ये औद्योगिक किंवा तांत्रिक प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे. औद्योगिक किंवा तांत्रिक प्रशिक्षण घेतल्याने नोकरीच्या किंवा स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. आदिवासी क्षेत्रात असे अभ्यासक्रम उपलब्ध नाहीत. तसेच या शिक्षणासाठी सर्वसाधारण शिक्षणापेक्षा जास्त खर्च येतो. त्यामुळे आदिवासी विद्यार्थी

---

[१२४] आदिवासी उपयोजना, पृ.४५

अशा शिक्षणापासून वंचित राहतात. परिणामी त्यांच्या स्वयंनिर्भरतेवर मर्यादा पडतात. म्हणून औद्योगिक प्रशिक्षण घेण्यास आदिवासी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येते.

**९) आर्थिक उन्नतीच्या योजना**

महाराष्ट्र राज्यातील आदिवासींची आर्थिक परिस्थिती गरिबीची आहे. त्यांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन शेती, शेतमजूरी आणि जंगलकाम हे आहे. शेती व्यवसाय करणाऱ्यांमध्ये स्वत:चे शेत असणारे, कूळ म्हणून शेती करणारे आणि शेतमजूर अशी विभागणी दिसून येते. कूळ कायद्यापूर्वी अनेक लोक शेतमजूर होते. कूळ कायद्याच्या आधारामुळे ते आता शेतमालक झालेले आहेत. महाराष्ट्र शासनाने कायदेशीर व बेकायदेशीर जमीन हस्तांतरणाचा कायदा केल्यामुळे ज्या आदिवासींना आपल्या जमिनी गमवाव्या लागल्या होत्या ते आता जमिनी मिळाल्याने जमीनमालक झालेले आहेत. महाराष्ट्र राज्यात आदिवासी शेतकरी हे प्रामुख्याने सीमांत व लहान शेतकरी आहेत. आदिवासी शेतकऱ्यांचा सरासरी जमीन धारण आकार हा ३ ते ४ हेक्टर आहे. जवळजवळ ८५ ते ९० टक्के आदिवासी लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून आहे. त्यामध्ये ४० ते ४५ टक्के शेतमजूर आहेत.

शेती व्यतिरिक्त दुसरा धंदा म्हणजे मजूरी, लाकूड वाहतूक, जंगलातील वस्तू गोळा करणे, उदाहरणार्थ– मध, डिंक, तेंदूची पाने, मोहाची फुले, कढीपत्ता, शिकेकाई, हिरडा, बेहडा, कोकम, जंगली फळे इत्यादी. याशिवाय रोजगार मिळवून देणारा दुसरा जोडधंदा आदिवासींना मिळत नाही. शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. बहुसंख्य लोकांना जमिनी अपुऱ्या असल्याने शेतीतून उत्पन्नही अपुरेच मिळते. त्याचा परिणाम म्हणून आदिवासींना उदरनिर्वाहासाठी बँकेकडून, सावकाराकडून किंवा जमीनमालकाकडून कर्ज घ्यावे लागते. अशा कर्जावर सावकार, जमीनमालक अधिक दराने व्याज आकारतात. अपुरे शेती उत्पादन, अपुरा रोजगार आणि सण, समारंभ, लग्नविधी इ. वरील खर्च यामुळे त्यांना जास्त व्याजदराने कर्ज घेण्याशिवाय पर्यायच नसतो. परिणामी ते कर्जाच्या दुष्टचक्रात अडकतात व त्यातून त्यांना बाहेर

पडता येत नाही. कर्जफेड करण्यासाठी काही आदिवासींना सावकार किंवा जमीनमालकाच्या घरी आयुष्यभर 'घरगडी' किंवा 'लग्नगडी' म्हणून काम करावे लागते.

आदिवासी जमाती दुर्गम प्रदेशांत व जंगल दऱ्याखोऱ्यांत राहतात. त्यामुळे त्यांना वर्षातून कित्येक दिवस पिण्यासाठी शुध्द, स्वच्छ व भरपूर पाणी मिळत नाही. गरिबीमुळे अपुरा व निकृष्ट आहार, अस्वच्छ पाणी यामुळे मलेरिया, हगवण, क्षय, ताप, पोटाचे विकार, कातडीचे विविध रोग यांच्याशी त्यांना वारंवार सामना करावा लागतो. आदिवासी जमातींमध्ये कुपोषणही मोठ्या प्रमाणात आढळून येते.

अशा प्रकारे वरील परिस्थिती विचारात घेऊन महाराष्ट्र शासन आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी जमातींच्या आर्थिक कल्याणासाठी पुढील योजना राबविते.

**१०) आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंपाचा पुरवठा**

शेती हा आदिवासींचा मुख्य व्यवसाय आहे. महाराष्ट्रातील जवळजवळ ८५ ते ९० टक्के आदिवासी शेतीवर अवलंबून आहेत. त्यांची शेती ही पावसावर अवलंबून असल्याने त्यांना वर्षातून फक्त एकच पीक घेता येते. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीला मजुगारफ असे म्हटले जाते. आदिवासींचे जमीन धारण क्षेत्र अत्यंत कमी असल्याने तसेच आर्थिक परिस्थिती गरिबीची असल्याने ते आपल्या शेतात भांडवल गुंतवणूक करू शकत नाहीत. भांडवलाअभावी त्यांना आपल्या शेतात विहीर खोदणे, जमिनीचे सपाटीकरण करणे, बांध बंधिस्ती करणे, जलसिंचनाच्या सुविधा पुरविणे शक्य होत नाही. आदिवासी शेतकऱ्यांना वर्षातून दोन ते तीन पिके काढणे शक्य व्हावे म्हणून तसेच जलसिंचनाची सोय उपलब्ध व्हावी म्हणून त्यांना त्यांच्या शेतातील विहिरींवर अथवा जवळपासच्या नदी–नाल्यांवर मोफत वीजपंप बसवून देण्याची योजना सन १९७३–७४ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. साधारणपणे ज्या शेतकऱ्याला स्वत:च्या मालकीची कमीत–कमी दोन एकर व जास्तीत–जास्त १६ एकर जमीन असेल अशा शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा घेता येतो. ज्या गावातील शेतकऱ्यांच्या शेतात नजीकच्या भविष्यात विजेची लाईन जाण्याची शक्यता नसते अशा गावांतील आदिवासी शेतकऱ्यांना मोफत तेलपंप (ऑईल इंजिन) पुरविला जातो. विजेअभावी आदिवासी शेतकऱ्यांची शेती अविकसित

राहू नये हा त्यामागील उद्देश आहे. ही योजना १९७६–७७ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. साधारणत: ज्या शेतकऱ्यांना स्वत:च्या मालकीची दोन ते सोळा एकर जमीन असेल अशा शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा घेता येतो. मोफत वीजपंप व तेलपंपाच्या योजनेमुळे आदिवासींना त्यांची शेती विकसित करण्यास मदत होत आहे.

**तक्ता १.५**

**आदिवासी शेतकऱ्यांना वाटप झालेल्या वीजपंप व तेलपंप इंजिनांची वर्षवार माहिती**

| वर्ष | वीजपंप | तेलपंप |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १९८० – १९८१ | ५४६ | १०३ |
| १९८१ – १९८२ | ५८६ | ९३ |
| १९८२ – १९८३ | ८०६ | १२४ |
| १९८३ – १९८४ | ८८३ | ९५ |
| १९८४ – १९८५ | १००४ | १९४ |
| १९८५ – १९८६ | १३९९ | १५३ |
| १९८६ – १९८७ | १४६४ | ३०९ |
| १९८७ – १९८८ | १४११ | ३१४ |
| १९८८ – १९८९ | २१०५ | ४२२ |
| १९८९ – १९९० | २१२१ | ३८० |
| १९९० – १९९१ | २२७२ | ३५१ |
| १९९१ – १९९२ | १९८० | ५०४ |
| १९९२ – १९९३ | १४९७ | ५१६ |
| १९९३ – १९९४ | १५३० | ४९० |
| १९९४ – १९९५ | २७४३ | १३०२ |
| १९९५ – १९९६ | २७२५ | १३६२ |
| १९९६ – १९९७ | ३३४२ | १६१९ |
| १९९७ – १९९८ | ४२१८ | १९३४ |
| १९९८ – १९९९ | ५२४४ | २७७२ |
| १९९९ – २००० | ३६७३ | १६७० |
| २००० – २००१ | ३८४५ | २५६९ |
| २००१ – २००२ | १४४१ | २३६० |
| २००२ – २००३ | १३५९ | २६८४ |
| २००३ – २००४ | १०१३ | १६२४ |
| २००४ – २००५ | ०० | ५००० |

संदर्भ: वार्षिक आदिवासी उपयोजना (२००४–२००५) पृ. ४५५

तक्ता क्र. १.५ मध्ये आदिवासींना शेती ओलीताखाली आणण्यासाठी वाटप केलेल्या वीजपंप व तेलपंपाची माहिती दिलेली आहे.

सन १९८०–१९८१ मध्ये आदिवासींना ५४६ वीजपंपांचे व १०३ तेलपंपांचे वाटप करण्यात आले होते. १९९०–९१ मध्ये २२७२ वीजपंपांचे व ३५१ तेलपंपांचे वाटप करण्यात आले होते. सन १९९८–९९ मध्ये ५२४४ वीजपंपांचे म्हणजेच सर्वाधिक वाटप करण्यात आले होते. सन २०००–२००१ मध्ये ३८४५ वीजपंपांचे व २५६९ तेलपंपांचे वाटप करण्यात आले होते. सन २००४–२००५ मध्ये एकही वीजपंपांचे वाटप केले गेले नाही परंतु तेलपंपांचे सर्वाधिक म्हणजे ५००० तेलपंप इतके वाटप करण्यात आले.

वीजपंप व तेलपंपाच्या वाटपात प्रत्येक वर्षी तफावत दिसून येते. सरकारने आदिवासींची जमीन ओलिताखाली आणण्यासाठी आजपर्यंत मोठ्या प्रमाणात वीजपंप व तेलपंपांचे वाटप केलेले दिसून येते.

**११) एकाधिकार धान्य खरेदी योजना**

आदिवासी लोक हे अशिक्षित व अज्ञानी आहेत. त्यांना विविध वस्तूंच्या बाजारातील किंमती, वजन, मापे इत्यादींची माहिती नसते. त्यामुळे व्यापाऱ्यांकडून त्यांच्या अज्ञानाचा गैर–फायदा घेतला जातो व त्यांची पिळवणूक केली जाते. त्यांचा शेतीमाल कमी किंमतीला विकत घेतला जातो. वजनमापांमध्येही फसवणूक केली जाते. पावसाळ्यापूर्वी जेव्हा आदिवासींच्या घरातील धान्याचा साठा संपुष्ठात येतो तेव्हा ते व्यापारी व दुकानदारांकडून कर्ज घेतात. अशा परिस्थितीत व्यापारी कर्जाच्या मोबदल्यात धान्य देण्याची अट घालतात. शेती उत्पादन झाल्यावर अटीप्रमाणे ते अत्यंत कमी भावात खरेदी केले जाते. व्याजही जास्त आकारले जाते. अशा रितीने व्यापारी आदिवासींना कर्ज देऊन पिळवणूक करतात. आजपर्यंत आदिवासी या दुष्टचक्रात सापडलेला होता. आदिवासींची ही पिळवणूक थांबवण्यासाठी व त्यांच्या शेतमालाला योग्य भाव देण्यासाठी ही योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. एकाधिकार खरेदी योजनेनुसार आदिवासींना रास्त भाव देण्यासाठी त्या विभागातील प्रमुख बाजारपेठांतील शेतमालाचे दर लक्षात घेऊन संबंधित जिल्हाधिकाऱ्यांमार्फत दर निश्चित केले जातात. त्यामुळे आदिवासींना

रास्त भाव मिळतो. थोडक्यात महामंडळाच्या या योजनेमुळे आदिवासींची व्यापारी, सावकार, दलाल यांच्या तावडीतून सुटका होण्यास मदत झाली आहे. आदिवासी सहकारी संस्था महामंडळाच्या वतीने मालाची खरेदी करतात.

महामंडळाने सन २००४–०५ मध्ये एकाधिकार व आधारभूत मिळून एकूण २१ कृषी उपज वस्तूंची ७,४४,२७५ क्विंटल इतकी खरेदी केली होती. त्याची किंमत ४,८९६.२० लाख रू. इतकी होती. सन २००५–०६ मध्ये महामंडळाने कृषी उपज वस्तूंची १२,०६,८६९ क्विंटल वजनाची, रक्कम रूपये ७,९५२.०९ लाख इतक्या किंमतीची खरेदी केली होती.

### अ) आदिवासी सोसायट्यांमार्फत धान्य खरेदी

महामंडळाने २७५ आदिवासी सोसायट्यांमार्फत ७५ तालुक्यांमध्ये धान्य खरेदी केंद्रे सुरू केली आहेत. या केंद्रामध्ये भात, तांदूळ, ज्वारी, भुईमूग शेंगा, तूर, वरई, नागली, खुरासनी, तीळ, उडीद, हरभरा इ. धान्यांची खरेदी केली जाते. जवळच्या बाजारातील धान्यांचे भाव लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांकडून दर निश्चित केले जातात.

### ब) गौण वनोत्पादनांची खरेदी

आदिवासी जंगलातून गौण वनोत्पादने गोळा करण्याचे काम करतात. ही गौण उत्पादने जंगलातून गोळा करणे अतिशय कष्टाचे काम असते. या गौण उत्पादनांमध्ये हिरडा, डिंक, मोहाची फुले, मध, तेंदूची पाने, कढीपत्ता, शिकेकाई, टोळंबी इ. समावेश होतो. ही गौण वनोत्पादने ते बाजारात विकतात. व्यापारी ही वनोत्पादने अतिशय कमी किंमतीला खरेदी करून आदिवासींची फसवणूक करतात. आदिवासींची फसवणूक व पिळवणूक होऊ नये म्हणून ही गौण वनोत्पादने आदिवासी सहकारी संस्था महामंडळाने निश्चित केलेल्या केंद्रावर खरेदी करतात.

महामंडळाने सन २००४–०५ मध्ये १४,६६४.२१ क्विंटल गौण वनोत्पादनांची, रूपये ३३५.२४ लाख किंमतीला खरेदी केली होती. सन २००५–०६ मध्ये २६,०३१ क्विंटल गौण वनोत्पादनांची, रूपये २७३.२६ लाख इतक्या किंमतीची खरेदी केली होती.

## १.२६ शासनाची भूमिका :–

देशातील आदिवासींची सामाजिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन मध्यवर्ती सरकारने आदिवासी समाजाच्या विकासासाठी एकात्मिक क्षेत्र विकास पद्धतीचा अवलंब केला आहे. या पद्धतीनुसार १९७५–७६ साली 'आदिवासी उपयोजना' तयार करण्याचे मार्गदर्शन राज्य सरकारला करण्यात आले. केंद्र सरकारच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र शासनाने 'आदिवासी उपयोजना' तयार केली. ही योजना १९७५–७६ साली राज्याला लागू करण्यात आली. आदिवासी जमातींची वस्ती असलेल्या राज्यातील १५ जिल्ह्यांचा त्यामध्ये समावेश करण्यात आला. ठाणे, रायगड, नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, अहमदनगर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा इत्यादी हे ते जिल्हे होत. या १५ जिल्ह्यांतील ७३ तालुक्यांमधील ६७६७ गावांचा 'आदिवासी उपयोजनेत' समावेश करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासींच्या उत्थानासाठी आर्थिक उन्नतीच्या योजना, शैक्षणिक विकासाच्या योजना तसेच सामुहिक विकासाच्या योजना राबविण्यात येतात. यामध्ये विशेषतः शासकीय आश्रमशाळा समूह योजना, स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य, आदर्श आश्रमशाळा, आदिवासी मुला–मुलींची शासकीय वसतिगृहे, विद्यार्थ्यांना शालान्त परिक्षोत्तर शिष्यवृत्ती, विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करणे योजना, व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता देण्याची योजना, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना, शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप पुरवठा योजना, अनुसूचित जमातीच्या लोकांना घरावरील गवती छपरांऐवजी मंगलोरी कौले किंवा पन्हाळी पत्रे टाकण्याकरिता अर्थसहाय्य योजना, केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना, मोटार वाहनचालक प्रशिक्षण केंद्र योजना, आदिवासी युवकांना पोलीस व लष्कर भरतीपूर्व प्रशिक्षण योजना, व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना, स्वयंरोजगारासाठी कर्जपुरवठा योजना, मागासवर्गीयांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना अर्थसहाय्य, खावटी कर्ज योजना, धान्यकोष योजना, आदिवासी युवकांकरिता नेतृत्व प्रशिक्षण व स्पर्धापूर्व प्रशिक्षण योजना या महत्त्वाच्या योजना राबविण्यात येतात.

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या ९,६८,७९,००० इतकी आहे. आदिवासींची लोकसंख्या ८५,७७,२७६ इतकी आहे. एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येचे असलेले प्रमाण ८.८५ टक्के आहे. महाराष्ट्र राज्यातील एकूण आदिवासी

लोकसंख्येपैकी ६९ टक्के आदिवासी लोकसंख्या उपयोजना क्षेत्रात समाविष्ट करण्यात आलेली आहे. ही लोकसंख्या राज्यातील १५ जिल्ह्यांतील आदिवासी उपयोजना क्षेत्रात विखुरलेली आहे. या क्षेत्रातील आदिवासींची लोकसंख्या ५० टक्के पेक्षा जास्त आहे. त्याचप्रमाणे आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील १० हजार लोकसंख्येपैकी आदिवासींची लोकसंख्या ५० टक्के पेक्षा जास्त असलेल्या खेड्यांच्या समूहाला 'माडा' (MADA - Modified Area Development Approach) म्हणजेच 'सुधारित क्षेत्र विकास पध्दती' असे म्हटले जाते. ५००० लोकसंख्येमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेल्या लहान खेड्यांचा समूहास '*मिनी माडा*' (Mini MADA) असे म्हणतात. माडा व मिनी माडा क्षेत्रात राज्यातील ६ टक्के आदिवासी राहतात. उर्वरित आदिवासींची लोकसंख्या ही आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर आहे. महाराष्ट्रात आदिवासी बहुल क्षेत्रामध्ये एकूण २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यरत आहेत. या प्रकल्पांतर्गत सर्व योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. महाराष्ट्र शासनाने १९८०–१९८१ पासून २००२–२००३ या दरम्यान आदिवासींच्या उत्थानासाठी अर्थसंकल्पीय तरतूद, प्रत्यक्ष खर्च आणि तरतुदीची प्रत्यक्ष खर्चाची टक्केवारी याबाबतची माहिती खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

**तक्ता–१.६**

**महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तरतूद व खर्च**

(रु. लाखात)

| अ.क्र. | वर्ष | अर्थसंकल्पीय तरतूद | प्रत्यक्ष खर्च | तरतुदीची प्रत्यक्ष खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | १९८० – १९८१ | ५११३.२० | ५०२५.३० | ९८.२८ |
| २. | १९८१ – १९८२ | ६२५४.६२ | ५१५१.२६ | ९८.३५ |
| ३. | १९८२ – १९८३ | ७१४७.९२ | ८२५८.७५ | ११५.५४ |
| ४. | १९८३ – १९८४ | ७३९९.८९ | ९२९७.५० | १२५.५४ |
| ५. | १९८४ – १९८५ | ८०८९.७६ | ९३८८.८० | ११६.०६ |
| ६. | १९८५ – १९८६ | ८९७१.४१ | १०४५४.६३ | ११६.५३ |
| ७. | १९८६ – १९८७ | १११८७.८९ | १०६२१.६३ | ९४.९४ |
| ८. | १९८७ – १९८८ | १४७८९.०० | १३९६८.०० | ९४.४५ |
| ९. | १९८८ – १९८९ | १७९३६.३४ | १७०२५.२८ | ९४.९२ |
| १०. | १९८९ – १९९० | १७७४३.५९ | १७४९०.९८ | ९८.५८ |
| ११. | १९९० – १९९१ | १६६३९.९० | १६११३.२१ | ९६.८३ |
| १२. | १९९१ – १९९२ | २००५०.३२ | १९६०४.७७ | ९७.७८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३. | १९९२ – १९९३ | २१६९४.०८ | २०६०४.९४ | ९४.९८ |
| १४. | १९९३ – १९९४ | ३०५४६.६० | २६६३९.२४ | ८७.२१ |
| १५. | १९९४ – १९९५ | ३२१८२.७९ | २७५००.०० | ८५.४४ |
| १६. | १९९५ – १९९६ | ४३६०८.३७ | ४१२००.०० | ९४.४७ |
| १७. | १९९६ – १९९७ | ४२७६१.७७ | ५३५००.०० | १२५.११ |
| १८. | १९९७ – १९९८ | ५०३५५.७८ | ४९८००.०० | ९८.९० |
| १९. | १९९८ – १९९९ | ५७३९०.६४ | ५२०००.०० | ९०.६१ |
| २०. | १९९९ – २००० | ५८००६.०६ | ४६७००.०० | ८०.५१ |
| २१. | २००० – २००१ | ५२५००.०० | ४४४१८.०० | ८४.६१ |
| २२. | २००१ – २००२ | ४४४००.०० | ३६६७७.०० | ८२.६१ |
| २३. | २००२ – २००३ | २९२७५.०८ | ३२३४२.०० | ११०.४८ |

**संदर्भ: वार्षिक आदिवासी उपयोजना (२००४–२००५) पृ. ४५१**

**वरील सारणीमध्ये महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी करण्यात आलेली खर्चाची तरतूद व प्रत्यक्ष झालेला खर्च दर्शविला आहे. अर्थसंकल्पीय तरतूद ही १९८०–८१ मध्ये ५११३.२० लाख रु. होती. ती १९८९–९० मध्ये १७७४३.५९ लाख रु. होती. मधल्या वर्षांत अर्थसंकल्पीय तरतुदीत उत्तरोत्तर वाढ झालेली आहे. सन १९९०–९१ मध्ये अर्थसंकल्पीय तरतुदीत घट होऊन ती १६६३९.९० लाख रु. इतकी झाली आहे. सन १९९५–९६ पर्यंत अर्थसंकल्पीय तरतुदीत पुन्हा वाढ झालेली आढळून येते. सन १९९६–९७ मध्ये अर्थसंकल्पीय तरतुदीत ४३६०८.३७ लाख रु. वरून ४२७६१.७७ लाख रु. पर्यंत घट झालेली आहे. त्यानंतर अर्थसंकल्पीय तरतुदीत २००१–०२ पर्यंत ४४४००.०० लाख रु. पर्यंत वाढ झालेली आहे. २००२–०३ सालापासून अर्थसंकल्पीय तरतुदीत घट झाल्याचे दिसून येते. सरकारने आदिवासी विकास विभागाचा निधी इतर विभागांकडे वळविल्याने तरतुदीत घट झालेली आहे. अर्थसंकल्पीय तरतुदीचे प्रत्यक्ष खर्चाशी असणारे प्रमाण विचारात घेता असे दिसते की, सन १९८२–८३, १९८३–८४, १९८४–८५, १९८५–८६, १९९६–९७, २००२–०३ या वर्षांत अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा प्रत्यक्ष खर्च अधिक झालेला आहे. उर्वरित वर्षांमध्ये तो अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा कमी झालेला आढळून येतो.**

**सन २०१५–२०१६ मध्ये रु. ६,२५९ कोटी, २०१६–१७ मध्ये ७,६४४ कोटी आणि २०१७–१८ मध्ये ८,८१७ कोटीं रूपयांची अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे. २०१६–१७ च्या तुलनेत २०१७–१८ मध्ये १४.५ टक्के वाढ केल्याची दिसून येते. २०१७–१८ मध्ये ४२४ कोटी**

रुपये हौसिंग योजनांकरीता आणि रु. ४४८ कोटी रुपयांची तरतूद आदिवासी भागामध्ये रस्ते विकासासाठी करण्यात आलेली आहे.

'एकच ध्यास, पारधी विकास' हा कर्जत उपविभागाचे तत्कालीन प्रांताधिकारी संजीव पलांडे यांचा उपक्रम नगर जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण राज्याला पथदर्शक ठरला. पारधी समाजाच्या रूढी–परंपरांचा सखोल अभयास करून त्यांच्यात परितर्वनाची यशस्वी प्रयत्न करण्यात आले. पारधी समाजाचा मुख्य व्यवसाय हा शिकार करणे, त्यासाठी ते सतत भटकंती करत असतात. मात्र कालांतरांने सरकारने जंगले राखीव संरक्षित म्हणून घोषित केली. वन्य प्राण्यांची शिकार हा अपराध ठरविण्यात आला. व्यवसाय नष्ट झाल्यामुळे हा समाज गुन्हेगारीकडे वळला. उदरनिर्वाहाचे साधन नष्ट झाल्यामुळेच हा समाज गुन्हेगारीकडे वळल्याचे वेळोवेळी स्पष्ट झाले. वर्षानुवर्ष अज्ञान, गुन्हेगारीत खितपत पडलेल्या या समाजाला कधीही कोणीही माणुसकीचे दर्शन घडविले नाही. फक्त सरकारी योजना व सोयी सवलतींच्या माध्यमातून पारध्यांचा सर्वांगिण विकास साधता येणार नाही. हा विकास अल्पायुषी ठरेल. त्यासाठी या समाजात जनजागृती व परिवर्तनाची गरज ओळखून पारध्यांच्या पालावर जाऊन समाजाला गुन्हेगारीपासून परावृत्त करणे, पारधी विकास प्रकल्पाच्या माध्यमातून मतदार नोंदणी, जातीच्या दाखल्यांचे वाटप, घरकुल, रेशनकार्ड, जेष्ठनागरीकांना ओळखपत्र, आर्थिक दुर्बलांचा दारिद्र्यरेषेखालील यादीत समावेश तसेच भूमिहिनांना जमीन वाटप अशा योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या.[१२५]

गुन्हेगारी जमात म्हणून कलंक लागलेल्या पारधी समाजातील लोकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तत्कालीन पोलिस अधिक्षक कृष्ण प्रकाश यांनी 'मिशन पारधी पुनर्वसन' हाती घेतला. कंलकित जीवन जगायचे नाही, पोलिस प्रशासन मागे लागणार नाही. समाजातील मुख्य प्रवाहात सामील होऊन उजळ माथ्याने जीवन जगायचे आहे, ही भावना पारधी समाजात रूजविण्यासाठी कृष्णप्रकाश यांनी पुढाकार घेतला.[१२६]

पारधी समाजाचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाच्या विविध योजना राबविण्यात याव्यात,

---

[१२५] पुढारी, अहमदनगर, दि. १८ जानेवारी, २००७, पृ.सहा

[१२६] लोकमत, अहमदनगर, दि. १० जून, २०११

अशा सूचना तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. संजीवकुमार यांनी दिल्या. यामध्ये पालावर अंगणवाडी सुरु करणे, पुनर्वसनासाठी समिती स्थापन करणे, तलाठी, ग्रामसेवक, पोलिस पालावर जाऊन सर्वेक्षण करणार, पुनर्वसनासाठी दहमहा बैठका, मुलांना आश्रमशाळेत दाखल करणे, रोजगारासाठी विविध योजनांचा लाभ देणे, बारावी उत्तीर्ण मुलांना पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण, मेळाव्यात विविध योजनांची माहिती देणे.[१२७]

**सारांश :–**

प्रस्तुत प्रकरणात पारधी महिलांचा अभ्यास करत असतांना आदिवासी समाजाची ओळख, भारतीय आदिवासी जमाती, पारधी समाजाचा ओळख, पारध्यांची वस्तीस्थाने, लोकसंख्या, वैशिष्ट्ये, प्रथा, परंपरा सामाजिक जडण–घडण याचा आढावा घेण्यात आला आहे. पारधी समाजातील महिलांची ऐतिहासिक पार्श्वभूमी नोंदवत असतांना या समाजाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. महिला या ह्या समाजाचा अविभाज्य घटक आहेत. त्यामध्ये विशेष नोंद घेताना हे नमूद करणे महत्त्वाचे वाटते की, स्त्रिया या ऐतिहासिक काळापासून पुरुषाच्या बरोबरीने किंबहुना पुरुषाच्या एक पाऊल पुढे जावून कुटुंबाचे पालनपोषण व सरंक्षण या जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडत असतांना दिसतात. पारधी समाजाची सांस्कृतिक जडण–घडण पाहत असतांना समाजातील परंपरागत चालीरिती, रुढी परंपरांचा पगडा घट असल्याचा दिसून येतो. त्याचबरोबर सामाजिक सद्यस्थिती नोंदवत असतांना इतर समाजात होत असलेल्या बदलांचा प्रभाव पारधी समाजावर झाल्याचा दिसून येतो. तसेच पुढारलेल्या समाजाप्रमाणे हा समाज जीवनमान जगण्याचा प्रयत्न हा समाज करत आहे. परंतु त्यांना त्यांच्या कपाळी नोंदविलेल्या गुन्हेगारी जमातीचा शिक्का त्यांची पाठ सोडत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे विविध शासकीय योजनांचा लाभ या समाजातील तरूण तरुणींचा घेता येत नाही. शिक्षणाचे प्रमाण तसे पाहिल्यास कमीच आहे त्यामध्ये स्त्रियांच्या शिक्षणांचे प्रमाण काही प्रमाणात सुधारणा दिसून येत आहे. समाजातील मुली या महाविद्यालयीन शिक्षणाकडे वळल्याचे दिसून येते. त्यामुळे या समाजात सुधारणांचे वारे वाहत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

[१२७] देशदूत, अहमदनगर आवृत्ती, दि. २० जुलै, २०११, पृ.२

पारधी महिलांच्या स्त्रीवादी चळवळी व संघटनांच्या योगदानाबाबत अभ्यास करत असतांना असे दिसून येते की, पारधी महिला या संघटित नसल्याने त्यांच्या सामाजिक संघटना अस्तित्वा नाहीत. किंबहुना सवर्ण समाजातील महिला संघटनांनी देखील पारधी समाजातील महिलांकरीता विशेष कार्य केल्याचे दिसून येत नाही. अहमदनगर जिल्ह्यातील पारधी महिला, स्त्रीवादी चळवळी ह्या फक्त सवर्ण समाजातील महिलांच्या अभ्यासाचा विषय आहे. त्यांनी केलेल्या चळवळी व अभ्यास यांचा पारधी समाजातील महिलांच्या विकासाकरीता योगदान पाहतांना या चळवळींनी महिलांचा भ्रमनिरास केला आहे.

पारधी समाजावर सवर्ण समाजामार्फत व शासकीय यंत्रणांमार्फत पिढ्यांन–पिढ्या अन्याय झालेला आहे, त्यातही स्त्रियांचे सामाजिक, आर्थिक, शारिरीक व मानसिक शोषण झालेले आहे. पुरुषाविना पारधी स्त्रिया ह्या बेवारस समजल्या जातात. पुरुषांना चोरीच्या गुन्ह्यांमध्ये अथवा खोट्या तक्रारींवरून वर्षानुवर्ष तुरुंगात डाबले जाते. पुरुषांच्या गैरहजेरीत स्त्रियांना खूप त्रास भोगावा लागतो. समाजातील जातपंचायतीबरोबरच पोलिस यंत्रणेच्या अत्याचाराला बळी पडावे लागते. नवऱ्याला तुरुंगातून सोडविण्यासाठी काही स्त्रियांचा जन्म वाया गेला आहे. व्याजाने पैसे घेवून त्यांची परतफेड करण्याच्या प्रक्रियेमध्ये त्यांचे शोषण होते. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणामुळे जसे बलुतेदारी पद्धतीची वाताहत झाली त्याच प्रमाणे पारधी समाजाची देखील उपजीविकेची साधने नष्ट झाली आहेत. पारधी समाजाला स्वत:ची जागा जमिन व वस्तीस्थाने कायमस्वरूपाची उपलब्ध नसल्यामुळे त्यांना उपजिवीकेसाठी भटकंती करावी लागते. खाजगीकरणामुळे व जागतिकीकरणामुळे छोटे–मोठे व्यवसायाकरीता लागणारा कामगार वर्गाच्या पूर्ततेपोटी पारधी समाजाला काही प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला आहे. नमूद प्रकरणामध्ये पारधी समाजाची आर्थिक पार्श्वभूमी, पारंपारिक व्यवसाय, उदरनिर्वाहाची साधने व व्यवसाय, आर्थिक विकासात कुटुंबाचे स्थान, आर्थिक व्यवहार, आर्थिक विकासात महिलांचे स्थान व महत्त्व, घटनात्मक तरतूदी, विविध आयोगाच्या शिफारशी, शासकीय आर्थिक विकासाच्या योजना व त्यांची फलश्रृती, शासनाची भूमिका आणि खाजगीकरण, जागतिकीकरण व उदारीकरण या बाबींचा उहापोह केला आहे.

***

# प्रकरण दुसरे
# संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा


२.१ प्रस्तावना

२.२ साहित्याचे सिंहावलोकन

२.२.१ पूर्वीच्या संशोधनाशी संबंधीत साहित्याचा आढावा (ग्रंथ)

२.२.२ संशोधन प्रबंध आढावा (Thesis Review)

२.२.३ एम.फिल. लघु प्रबंध

२.२.४ नियतकालिके, लेख व मासिके

२.२.५ शासकीय अहवाल

२.२.६ भटक्या–विमुक्त जमातींवरील साहित्य

सारांश

# प्रकरण दुसरे
# संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा

**२.१ प्रस्तावना**

भारतीय समाजव्यवस्थेत पारधी समाजाच्या लोकांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने भारतात जे वेगवेगळ्या स्वरूपाचे संशोधन करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने होत राहील अशा सर्व संशोधीत बार्बीचा एकूणच परामर्श घेऊन सदरील संशोधनाचा खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील पारधी जमातीच्या लोकांच्या विकासाच्यादृष्टीने काही तात्वीक उपयोग कशा पद्धतीने झालेला आहे. शासन व्यवस्था महिला धोरणांच्या माध्यमातून कशा पद्धतीने कामकाज करीत आहे त्या संदर्भातील लेखी दस्तऐवज यांचा संशोधनासाठी निवडलेल्या घटकाला न्याय देण्यासाठी या सर्व संदर्भाचा आढावा घेणे आवश्यक आहे. यातून निवडलेले संशोधन घटक अनेक अंगाने व पैलूने अभ्यास करता येऊ शकतो.

सदर संशोधनासाठी ''अहमदनगर जिल्ह्यातील पारधी समाजातील महिलांचा सर्वांगीण अभ्यास'' (इ.स.१९४७ ते इ.स.२०१०) या विषयाचे सविस्तर विश्लेषण करताना सर्व संदर्भाचा आणि संशोधीत संदर्भ साहित्याचा अभ्यास करणे अत्याश्यक व महत्वाचे ठरते. संशोधनाच्या संदर्भात अनेक पैलूने संशोधन होत असते.

सदरील संशोधन महाराष्ट्रातील पारधी समाजाच्या महिलांचा ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय सद्यस्थितीचा अभ्यास करण्यात येत आहे. पारधी समाजाच्या महिलांच्या सर्वांगिण अभ्यास करत असतांना पूर्व ऐतिहासीक पार्श्वभूमी, सांस्कृतिक पार्श्वभूमी त्याची शैक्षणिक, राजकीय, धार्मिक स्थिती व त्याची प्रमुख वैशिष्ट्ये या अनुशंगाने पूर्व संशोधकाने प्रस्तुत संशोधनात केलेले अध्ययन या अभ्यासासाठी पूरक व मार्गदर्शक ठरले आहे. त्यावरुन सदरील संशोधनाच्या अभ्यासाची दिशी ठरणार आहे. पूर्वीच्या संशोधक अभ्यासकाच्या अध्ययनापेक्षा वेगळ्या पैलूने पारधी जमातीच्या व्यापक पातळीवर आणि शासकीय वेगवेगळ्या योजनांवर दृष्टीक्षेप टाकण्यासाठी व सामाजिक न्यायाच्या निर्मितीसाठी आणि वस्तुस्थितीचा

आढावा घेण्यासाठी सदर संशोधनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधन अध्ययातून केला आहे. पारधी जमातीची जडण–घडण व त्या अनुषंगाने उपलब्ध असलेल्या साहित्याचा आढावा त्यामध्ये एम.फिल., पीएच.डी. अहवाल पुस्तके व लेख नियतकालिके व मासिके, शासकीय अहवाल या संशोधन साहित्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

### २.२ साहित्याचे सिंहावलोकन

### २.२.१ पूर्वीच्या संशोधनाशी संबंधीत साहित्याचा आढावा (ग्रंथ)

**आंबेडकर बी. आर. (१९४३) 'शुद्र पूर्वी कोण होते?'** हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इ.स.१९४६ मध्ये प्रकाशित केला. हा ग्रंथ त्यांनी महात्मा जोतिराव फुल्यांना अर्पण केला अर्पणपत्रिकेत ते म्हणतात, 'हिंदू उच्च वर्गाच्या गुलामीत असलेल्या खालच्या वर्गाला महात्मा फुल्यांनी जागृत केले आणि भारताला राजकीय स्वातंत्र्यापेक्षाही सामाजिक लोकशाही अधिक गरजेची आहे. हे त्यांनी पटवून दिले. प्रस्तावनेत बाबासाहेब आंबेडकर म्हणतात शुद्राची अधोगती घडवून आणण्यात तरी चातुर्वर्ण्याची पद्धत प्रामुख्याने कारणीभूत झाली तरी तिला टिकवून ठेवण्यास बराच कार्यभाग शुद्रांनी केलेला आहे. या ग्रंथात एकूण १२ प्रकरणे आहेत. १) शुद्रांचा कुट प्रश्न २) शुद्रांच्या उत्त्पतीबद्दल ब्राह्मण ग्रंथातील सिद्धांत ३) शुद्रांचा दर्जा कोणता, यांचे प्रमेय ४) शुद्र आणि आर्य यांचा झगडा ५) आर्यांचा परस्परातील झगडा ६) शुद्र आणि दास ७) शुद्र पूर्वी क्षत्रिय होते. ८) वर्णाची संख्या इ. किंवा ९) ब्राह्मण व शुद्र यांचा झगडा १०) ब्राह्मणांनी शुद्रांना अधोगतीला कसे नेले. ११) समेटाची हकीकत १२) सिद्धांताची कसोटी इ. प्रकरणात त्यांनी आपला ग्रंथ मांडलेला आहे.

शुद्र जर हिंदुस्थानचे मूळ रहिवासी नव्हते तर ते कोण होते या प्रश्नाचा आता विचार केला पाहिजे मी या बाबतीत जो एक सिद्धांत मांडण्याचे धारिष्ठ करणार आहे त्या सिद्धांताच्या तीन बाजू– १) शुद्र पूर्वी आर्य होते. २) शुद्र क्षत्रिय वर्णाचे होते. ३) शुद्रांचा समाज क्षत्रिय वर्णात इतका प्रबळ समाज होता की प्राचीन काळच्या अत्यंत प्रमुख व प्रबळ आर्य जातीतील राजापैकी बरेच राजे शुद्र होते. हा सिद्धांत सिद्ध करत असताना अनेक पुरावे मांडलेली आहेत. महाभारतातील ६० वा अध्यायात ३८–४० श्लोक पेजन राजाचा उल्लेख करता पैजवनाचा

कथा त्यात नमुद केलेली आहे शुद्र शब्दाऐवजी पुरा शब्द वापरलेला आढळतो. त्यानंतर ऋग्वेद ७–१८–२१ ते ७–१८–२५ या अध्यायात शुद्राचा उल्लेख आलेला आहेत (शुद्र पूर्वी कोण– १२५–१२८, १२५, १२८) त्याचबरोबर सुक्ताचा नामलेख झालेला आहे ८३ वे सुक्त म्हणजे इंद्र व शुद्र चा राजा उल्लेख येतो ३३ वे सुक्तातही उल्लेखीत झालेला आहे. भागवत पुराणात उद्धृत केलेला श्लोक (Quated by Vaidya in Mahabharatcha Upaosamharap.200)

प्रियवंदो नाम सुतो नम मनोः स्वायंभुवस्य हा

तस्याग्रिधस्ततो नार्भिर्क्रैषभश्च सुतस्ततः।

अवतीणं पुत्रशत तस्यासीद्रहमपारगम्।

तेषां वै भरतो ज्येष्ठो नारायणपरायणः।

विख्यात वर्ष मेतदयन्नाम्ना भारतमुत्तमम

किती थोर राजाच्या दैदीप्यमान कुळात शुद्र सुदास याचा जन्म झालेला होता हे वरुन श्लोकावरुन सांगता येते. प्रो. वेबर म्हणतात शुद्रांना आर्याच्या पवित्र यज्ञकार्यात भाग घेऊ देण्यात आला होता आणि शुद्रांना आर्याची भाषा बोलता येत नव्हती. तरी ते भाषा समजू शकत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेवटी म्हणतात शुद्र हे कोण होते असा जो प्रो. वेबर यांनी निष्कर्ष काढलेला आहे तो शंभर १००% बरोबर आहे. शुद्र हा शब्द एका वेळीचे नाव दर्शविणारा शब्द होय. एकाच संशयाचे मुद्दे शिल्लक राहतो. परंतु शुद्र हे आर्य व क्षत्रिय होते यात तिळमात्र शंका संशय नाही. (आंबेडकर बी. आर. (१९४३), शुद्र पूर्वी कोण होते?, सुगावा प्रकाशन, (मराठी अनुवाद– चरित्रकार चांगदेव भगवानराव खैरमोडे)

**रामनाथ चव्हाण (२००४), 'भटक्या–विमुक्तांची जातपंचायत, खंड–२'** या पुस्तकात पारधी जमातींमधील ९ जमातींच्या जीवनपद्धतीचे विस्तृत विवेचन केले आहे. यामध्ये मांग गारूडी, काशीकापडी, सिकलीकर, रजपूत भामटा, दसनाम गोसावी, गोपाळ, टकारी, घिसाडी, छप्परबंद या जमातींचा समावेश आहे. भटक्यांची भाषा, जमातीची निर्मिती, कुळ, पोट–जाती, देव–देवता, देवक, सण, लग्नप्रथा, पंचांचे महत्व, काडीमोड प्रथा, विधवा विवाह, मयत, जातपंचायत, जातपंचायत पंच व प्रमुख आणि पाटलाचे मान–सन्मान, जातपंचायतीत

हाताळणी जाणारी प्रकरणे, जातपंचायत बैठकीची पद्धत, न्यायनिवाडा, शिक्षा व स्वरूप याबाबींचा उहापोह या पुस्तकात करण्यात आला आहे.

**रामनाथ चव्हाण, (२००६) 'भटक्या-विमुक्तांची जातपंचायत, खंड-३'** या पुस्तकात पारधी जमातींमधील ६ जमातींच्या जीवनपद्धतीचे विस्तृत विवेचन केले आहे. यामध्ये नंदीबैलवाले, गाढवगोती 'बेलदार', कसबी कलावंत 'रायरंद', मरी आईवाला, सोंगी-ढोंगी 'बहुरूपी', नाथपंथी 'रावळ' या जमातींचा समावेश आहे. भटक्यांची वसतीस्थाने, पालपद्धती, स्त्रियांचा व्यवसाय, भाषा, पोषाख, कुळांचे महत्व, पोट-जाती, देव-देवता, देवक, सण, लग्नप्रथा, पंचांचे महत्व, काडीमोड प्रथा, विधवा विवाह, जन्म व मयत विधी, शिक्षण, जातपंचायत, जातपंचायत पंच व प्रमुख आणि पाटलाचे मान-सन्मान, जातपंचायतीत हाताळणी जाणारी प्रकरणे, जातपंचायत बैठकीची पद्धत, न्यायनिवाडा, शिक्षा व स्वरूप याबाबींचा उहापोह या पुस्तकात करण्यात आला आहे.

**रामनाथ चव्हाण, (२००८) 'भटक्या-विमुक्तांची जातपंचायत, खंड-४'** या पुस्तकात पारधी जमातींमधील ६ जमातींच्या जीवनपद्धतीचे विस्तृत विवेचन केले आहे. यामध्ये परदेशी भोई, मदारी, मसण जोगी, चित्रकथी, पाथरवट, घ्यारे कंजर, डक्कलवार या जमातींचा समावेश आहे. भटक्यांची वसतीस्थाने, स्त्रियांचा व्यवसाय, भाषा, पोषाख, कुळांचे महत्व, पोट-जाती, देव-देवता, देवक, सण, लग्नप्रथा, पंचांचे महत्व, काडीमोड प्रथा, विधवा विवाह, जन्म व मयत विधी, शिक्षण, जातपंचायत, जातपंचायत पंच व प्रमुख आणि पाटलाचे मान-सन्मान, जातपंचायतीत महिलांचे स्थान, जातपंचायतीत हाताळणी जाणारी प्रकरणे, जातपंचायत बैठकीची पद्धत, न्यायनिवाडा, शिक्षा व स्वरूप याबाबींचा उहापोह या पुस्तकात करण्यात आला आहे.

**डॉ. नारायण भोसले, (२००८) 'भटक्यांची पितृसत्ताक जात पंचायत परंपरा आणि संघर्ष'** या पुस्तकात लेखकाने भटक्या जमातीची सद्यस्थिती आणि आव्हाने, भटक्या-विमुक्तांच्या जातीय-वर्गीय-स्वीदास्य समर्थक पंचांतील बंदिस्त स्त्रिया, पितृसत्ताक

जातपंचायती, भिकारी भटक्या जमाती, भटक्या विमुक्तांचे मुक्ती लढे इ. विषयाचा परामर्श घेतला आहे.

**गिरीश प्रभुणे, (२००३) 'पालावरचं जिणं'** या पुस्तकात लेखकाने कथात्मक रचनास्वरूपात भटक्या जमातीचे चित्रण केले आहे. पालांवर राहून भटका समाज ज्या पद्धतीने गुजरण करत आहे त्यांचे विवेचन करण्यात आले आहे.

**संतोष पवार, (२०१०) 'पारधी पुढे पोलीस मागे'** या पुस्तकात पारध्याचं जगणं, पारध्याविषयी भारतीय समाजमनात असलेली भेदभावाची भावना, जातीयतेच्या दाहक अग्नीत होरपळून कपळावर गुन्हेगारीचा शिक्का घेऊन जगत असलेला पारधी समाज त्याचबरोबर आदिवासी पारधी गेल्या अनेक वर्षापासून नेभळटासारखा का वागतो, पारध्यात स्वाभिमान, आत्मविश्वास का नाही, अन्याय अत्याचाराविरुद्ध पेटून उठायची क्षमता पारध्यात का निर्माण होत नाही याचा सर्वांच्या पाठिमागे देशातील प्रशासन आणि जातीयव्यवस्था याबाबतची कारणमिमांसा करण्यात आली आहे. पारध्यांच्या रूढी–परंपरा, प्रथा आणि जीवनपद्धतीमुळे वर्षानुवर्ष हा समाज मागसलेला का आहे याचे चित्रण लेखकाने केले आहे.

**संतोष पवार, (२०१४) 'पारध्यांची जातपंचायत'** या पुस्तकात पारध्यांची जातपंचायत हा विषय पारध्यातील अनिष्ठरूढी, परंपरा, चाली, रिती, रिवाज, असंविधानिक जातपंचायतीसारखा अनिष्ठ स्वयंघोषित माणसांची निर्माण केलेला कायदा यावर प्रखरपणे लिखाणं केले आहे. ऐतखाऊ, दारुड्या व स्वयंघोषित पंचांनी आपल्याच माणसांचे शोषण करण्यासाठी निर्माण केलेल्या जातपंचायतीचं चित्रण केले आहे. आदिवासी पारधी समाजात शिक्षणाचा अभाव आणि शिकलेले पांढरपेशी वर्गातले पारधी सुद्धा अशा जातपंचायतीला, अंधश्रद्धेला, रूढीपंरपरेला, रितीरिवाजांना खतपाणी घालत असल्याचे चित्रण केले आहे.

**वाघ विलास (संपादन) (२०१२) 'जातीसंस्थेचे बदलते आधार'** ही पुस्तिका जातीवर आधारित लेख संग्रह आहे या पुस्तिकेला विलास वाघ यांची प्रस्तावना आहे. जात आजचे वास्तव डॉ. स. देशपांडे, समकालीन जातिव्यवस्था डॉ. सुहास पळशीकर, मला जात अशी दिसते. डॉ. राजेंद्र व्होरा, भांडवली विकास आणि जातिप्रश्न डॉ. राजेश्वरी देशपांडे, शोषित

जातींना जागतिकीकरणामुळे मुक्तीचे संधी प्रा. नितिन बिरमल या विचारवंताची अभ्यास पूर्ण विवेचन आहे. शोषणावर आधारित, जातिप्रथा कशी घट्ट बनली स्त्रियांची पिळवणूक, कनिष्ठ जाती व्यवसायात कशा अडकल्या आहेत, कनिष्ठ जाती नवीन धोरणाच्या पिळवणूकीत अडकल्या जाणार, शोषण वाढणार, जातिसंस्था जातिविहीन समाज आरक्षणाचा प्रश्न जातवास्तवाचे बदलते स्वरुप अशा अनेक प्रश्नांवर चर्चा हा चर्चा सत्रातून व लेखातून केलेली आहे.

**पाटील शरद (२००८) 'दास–शुद्रांची गुलामगिरी खंड–१'** हे पुस्तक फार महत्त्वाच्या अशा आधुनिक वैचारिक परंपरेचे फलित आहे. भारतीय लोकशाहीचे संस्कृतीशी आणि सामाजिक जीवनपद्धतीशी सुसंगत नसल्यामुळे तिचा हळूहळू नकळत संकोच होत चालला आहे कारण परंपरागत समाजरचना, वर्णजातिव्यवस्थेच्या तत्त्वावर दृढमूल झालेली आहे. भारतीय समाजाचे त्या समाजाच्या रचनापद्धतीचे, त्या समाजाच्या इतिहास पूर्ण व इतिहासकालीन आर्थिक जीवनपद्धतीचे आणि निरनिराळ्या सामाजिक व धार्मिक संस्थाचे मूलगामी चिंतन या पुस्तकात करण्यात आलेले आहे. सुंसगत अशी ऐतिहासिक उपपत्ती आणि सुसंगत अशा ऐतिहासिक घटनाक्रमांचा कार्यकारणभाव उलगघडण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रस्तुत पुस्तकात दीड–दोनशे वर्षातील अभ्यास मांडला गेला आहे सखोल परामर्श घेऊन घटनांचे, कथांचे, धार्मिक रीतीभातींचे विशेषत संस्कृत, प्राकृत व अन्य भाषातील विशिष्ट शब्दप्रयोगाचे नवीन अर्थ मातृप्रधान व पितृप्रधान सामाजिक संस्थाचा सखोल मोगावा विलक्षण पद्धतीने घेतलेला आहे. भारतीय संस्कृतीचा अत्यंत दृढ व खोल आर्थिक पाया म्हणजे सुमारे ६० ते ७० टक्के समाजसदस्याची गुलामगिरी होय. यांनाच दास व शुद्र या संज्ञा वेदकालापासून प्राप्त झाल्या आहेत अशाप्रकारे दिर्घकालीन चिंतन या पुस्तकात लेखकाने केलेले आहे.

**पानसरे गोविंद (२०१५) 'धर्म जात वर्ग आणि परिवर्तनाच्या दिशा'** लेखकाने प्रस्तुत ग्रंथात वेळोवेळी लिहिलेल्या लेखाचा संग्रह आहेत. लेखकाचे असे मत आहे धर्म, जात, सामाजिक न्याय या बाबीसंबंधी सखोल व सर्वकष आकलन अत्यावश्यक आहे हे लेख त्या दिशेने विचार करावयास मदत करणारे आहेत, धर्म जात आणि सामाजिक, न्याय हे महत्वाचे विषय आहेत परिवर्तनाच्या चळवळीसाठी व ज्ञानार्जानासाठी महत्त्वाचे आहेत. लेखकाने ग्रंथात

एका ठिकाणी म्हणतात ''विचारवंत कार्यकर्ता असतोच असे नाही कार्यकर्ता मात्र विचार करणारा असावाच लागतो समाज बदलायला निघालेल्या कार्यकर्त्याला विचारही करावा लागतो आणि कार्यही करावे लागते. विचारातून कार्यास प्रेरणा मिळते कार्यातून विचार परिपूर्ण होतो. नुसता विचार पुरेसा नसतो, नुसते कार्य पुरेसे नसते. दोन्ही असावे लागते.'' 'सर्वात महत्त्वाचा मुद्दा जग बदलण्याचाच आहे यात शंकाच नाही. परंतू जगासंबधीचा समजच जर चुकीचा असेल तर जग बदलण्याचा बरोबर मार्गही सापडणार नाही.' जात व जमातवाद हे आव्हान हे हिंदूत्वाचा फॅसिझमचा धोका नव्वदोत्तार भारतीय लोकशाहीसमोरचे नक्कीच सर्वात गंभीर गंडांतर आहे असे लेखकाचे मत आहे. त्याच बरोबर धर्म द्वेष विकृत व भयानक शत्रूप्रति द्वेष, तुच्छताभाव, संशय आणि दुरावा कशा प्रकारे निर्माण केला जाते. कथित उज्ज्वल भूतकाळाचे स्मरण परंपराचा अभिमान स्वधर्माचा अहंकार धार्मिक प्रतिके व सणवार यांचे स्तोम कौशल्यपूर्वक परधर्मीय द्वेष हे साधन उपयुक्त ठरवतात असे लेखक प्रस्तुत ग्रंथात नमूद करतात जातिग्रस्त समाज बनलेला आहे. जातीचा व वर्गाचा योग्य पद्धतीने विचार आणि त्याबाबतची कृती याविषयीचे विचारमंथन थांबले आहे.

**तांबे सिद्धार्थ (२००७) 'जात नाही जात'** सदर ग्रंथ एक सामाजिक नाटक आहे. जातिव्यवस्था प्रस्थापित समाज परंपरागत रुढींना कशा प्रकारे जात हा घटक का पुढे चालवत आहे या संदर्भाने विचार मांडणारा हा ग्रंथ नाटक रुपाने लेखाने मांडले आहे. नाटकातील पात्र ही समाज व्यवस्थेचे प्रतिनिधित्व करत असताना दिसून येतात. शरद पाटील, कांबळे, जोशी, वेदाचार्य गुरुजी, अब्दुल शेख, पगारे मेश्राम, चौडप्पा ही पात्र जात व वर्ग कशा प्रकारे पिछा सोडत नाही यांचा प्रवास व्यक्त करताना दिसतात. म्हणून नाटकाचे नाव जात नाही जात असे आहे लेखकाने समाजाचे सूक्ष्म निरिक्षणे पात्राच्या रुपाने रेखाटलेले आहे.

**रणसुभे विलास (२००७) 'जात-वर्ग व परिवर्तनाचा लढा'** प्रस्तुत ग्रंथात जात-वर्ग व परिवर्तनाचा लढा कशा प्रकारे १९८० सालापासून भारतीय राजकारणात जलद गतीने होणाऱ्या आंतरबाह्य बदलांमध्ये जात व वर्गाचे स्वरुप कसे पालटत आहे आणि परिवर्तनाची दिशा योग्य हेतून चालू आहे की नाही यावर भाष्य करताना दिसते जात वर्ग आणि परिवर्तनाचा लढा प्राचीन काळापासून सुरु आहे किंबहूना जेव्हा जात निर्माण झाली तेव्हापासून जातिव्यवस्थेशी लढा चालू

होता चार्वाक  गौतम बुद्ध निरनिराळे संत ते म. फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंत या लढ्यात सातत्य आहे तरीही जातीचा अंत होत नाही याची कारणमिमांसा केली आहे. जात व वर्गलढ्याचे ऐतिहासिक संदर्भ स्पष्ट केले आहेत. ग्रंथात अनेक मान्यवराचे भाषण संग्रह आहेत ते म्हणतात. डॉ. रावसाहेब कसबे– जातिसंस्थेचा अभ्यास अनेकांनी केला तरी तिची उकल होत नव्हती. त्यामुळे सगळेच जातिअंताचे लढे दिशाहीन बनले होते. जातिअंताचे मार्ग सांगितले. बंदिस्तवर्ग म्हणजे जात अशी बाबासाहेबांची व्याख्या सांगतात.

**वाघमारे वसंत (२०१४) 'जातिव्यवस्था निर्मिती आणि स्वरूप'** सदर ग्रंथ भारतातील जातिव्यवस्था, अन्याय कारक गुलामगिरी कशी दीर्घकाळ टिकवून ठेवली आहे यावर मान्य करत अन्यायाचे स्वरुप किती विदारक असू शकतो आहे हे मांडले आहे. भारतीय समाजरचना ही जातिवर आधारलेली असल्याने जातधर्म हा तिचा पाया आहे परमेश्वर निर्मिती समजून जातिव्यवस्था सांभाळली जाते. मानवनिर्मित जात ही ईश्वर निर्मित सांगितली जाते. मनू हा जातीव्यवस्थेचा समर्थक आहे. ग्रंथात जातिनिर्मूलनाचा संघर्षाचा परामर्श मांडला आहे.

**आंबेडकर बी. आर. (२०१३) 'रिडल्स इन हिंदूइझम'** प्रस्तुत ग्रंथ डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी ब्राह्मणवाद्याच्या विकृत स्वरुपाच्या विचारांना ज्यास दैवीशास्त्रात गुंतविले आहे त्यातून बाहेर काढण्यासाठी ब्राह्मणवादाचे पितळ उघडे करण्यासाठी हा ग्रंथ सर्वसाधारण हिंदूनी ब्राह्मणांनी ज्या संकटात पाडले आहे त्यासंबंधी त्यांना जागरुक करण्याचा योग्य विचार करण्यास प्रवृत्त करण्याचा आहे. हिंदू संस्कृती ही सनातन असा ब्राह्मणांनी प्रचार केला आहे. सनातन म्हणजे बदल न घेणारे व विचारांस अनेक युरोपीय विद्वानांनी दुजोरा दिला या ग्रंथात हा समाज सत्य घटनांनी सुसंगत नाही हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. हिसेंपासून अहिसेंपर्यंत आणि अहिसेंपासून परत हिसेंपर्यंत कोड्याचा विचार करा; हिंदूचे ब्राह्मणांच्या कलूपत्याकडे लक्ष वेधण्याचा व ब्राह्मणांनी त्यांना कसे चुकीचे मार्गदर्शन केले याचा विचार करण्यास प्रवृत्त करण्याचा आहे. वैशिक देवतांचे पूजन करणारे नंतर अवैदिक देवतांचे पूजन सुरु केले. देव, इंद्र, ब्रह्म, वरुण, मित्र वगैरे अदृश्य पात्र निर्माण केले. धर्म अधर्माचा ब्राह्मणांना विचारा नसतो. त्यांना हवी असते केवळ दक्षिणा ब्राह्मणांना धर्माला खरोखरच एका व्यवसायिकतेचे स्वरुप दिले आहे असा युक्तिवाद केला आहे.

**तेलंग प्रियदर्शी, संपादक (२०१३) 'जातीय अत्याचाराविरुद्ध एल्गर– दलित आदिवासी अधिकार आंदोलन'** एल्गार ही पुस्तिका जातीय अत्याचारावर भाष्य करते आहे जातिअंताशिवाय जातीय अत्याचार पूर्णपणे संपणार नाहीत. हे सांगण्याचा कोणाची गरज नाही कारण भारतात राहणारा प्रत्येक नागरिक हा या जातिव्यवस्थेचे अपत्य असल्याने तो नाही रे वर्गाचा प्रतिनिधी असल्यास तो स्वतः अत्याचाराचा बळी पडलेला असल्याने त्याच्या पाठीशी जातीय अत्याचाराचा अनुभव आहेच व तो आहे रे वर्गाचा प्रतिनिधी असल्यास तो अत्याचाराच कारक घटक अथवा तटस्थ प्रेक्षक म्हणून जातीय अत्याचाराचा अनुभव त्याच्या पाठीशी आहेच प्रश्न आहे तो जातीय अत्याचार संपविण्याचा, जातीय अत्याचार का कमी होत नाहीत १) जातीचे राजकारण २) प्रशासकीय व राजकीय इच्छाशक्तीचा अभाव ३) जाति अंताच्या चळवळीची अनुपस्थिती ४) प्रभावशाली इच्छाशक्तीचा अपुरेपणा ५) कनिष्ठ जातीचे आर्थिक परावलंबन ६) ग्रामीण अर्थव्यवस्थेतील परावलंबन ७) अत्याचाराला बळी पडणाऱ्या जाती ८) आर्थिक संसाधानांच्या फेरवाटपाबाबतची उदासिनता इ. कारणे सांगितली आहे सदर पुस्तिकेत महाराष्ट्रात जातीय अत्याचाराच्या ताज्या घटनांचा क्रम दिला आहे. सोनई हत्याकांड, खर्डा हत्याकांड जवखेडा हत्याकांड परामर्श घेतलेला आहे. अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंद कायदा १९८९ व इतर कायद्यांची कडक अंमलबजावणी कशा प्रकारे झाली पाहिजे यावर भाष्य केले आहे. एल्गार या पुस्तिकेत अत्याचारग्रस्त कुटुंबाची व्यथा मांडलेली आहे. अन्यायग्रस्त व्यक्ती व त्याचे कुटूंब यांची दयनिय अवस्था समाजातील उच्च वर्गाकडून केली जाते. त्यात प्रशासन ही जबाबदार असते अन्याय ग्रस्त कुटूंबातील व्यक्तीच तपासणी करून चौकशी केली जाते. अनेक प्रकाराच्या दबावाला सामोरे जावे लागते ही व्यथा आहे. महाराष्ट्रात नव्हे तर देश भर दलित समाजावरील अन्याय दिवसेंदिवस वाढत असताना दिसून येतात या पुस्तिकेत फक्त महाराष्ट्रात दलितावर झालेल्या अत्याचाराचा विचार केलेला आहे.

**बगाडे उमेश (२०१३), 'दलित जाणिवेतील द्वंद्व : प्रभूत्व आणि प्रतिकार'** सदर पुस्तिकात जातिसंघर्ष व त्याच्या सामाजिक इतिहासाचे स्थित्यंतर कशा प्रकारे बदलत गेलेले आहे या बदल भाष्य करते. जातिव्यवस्थेतील आर्थिक–सामाजिक संबंध उतरंडीच्या शोषणाचे व विषमतेचे असल्यामुळे जातिसंघर्षाला अनेकविध पदर प्राप्त झाले आहेत जात–

सरंजामशाहीच्या प्रशासकीय व सामाजिक सत्तेचे ताबेदार असलेल्या ब्राह्मण, बनिया व सामंत जातीच्या आर्थिक लुटीच्या व सामाजिक विरोधात निम्न जातीयांचे संघर्ष होतात. या विषयाबद्दल या ठिकाणी चर्चा केलेली आहे. वर्गपूर्व समाजातील प्रभुत्व आणि प्रतिकाराच्या द्वंद्वामध्ये प्रवाहित झालेल्या दलित जाणिवेचा वेध घेणारी पुस्तिका

**कांबळे उत्तम (२००२), 'जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न'** 'जो सक्षम असेल तो जगेल' असे सांगणारी ही व्यवस्था गरिबांचे अधिक शोषण करणारी त्याला अस्तित्वहीन बनवणारी आहे. दलित ही संकल्पना खूप व्यापक अर्थाने घेतलेली आहे. उपेक्षित वर्ग जागतिकीकरणात भरडलेले जाणारे उपेक्षित वर्ग हा दलित आहे. म. फुले म्हणतात शुद्र जेसा तैसीच स्त्रीही हीन अशी व्यथा दीन–दलित गरिब समाजाची अवस्था २१ व्या शतकात ही कायम आहे. जीवन जगण्याची साधने विशिष्ट गटाकडे आहेत ती साधने मिळवण्यासाठी गरिब समाज दोन हात करत आहे. दोन वेळच्या भूकेची काळजी त्यांना अस्वस्थ करते आहे असे एकूण पुस्तिकात दिसून येते.

**कसबे रावसाहेब (एप्रिल–जून २०१३ अन्वीक्षण) 'जातिअंत आणि जातीच्या मानसशास्त्राची शक्यता'** अन्वीक्षण संपादीत लेख सदर विशेषांकात प्रकाशित आहे जातियतेची मूळ समाजात खूप खोलवर रुजलेली आहेत आणि समाज व्यवस्थेचा एक भाग बनलेली आहेत त्यात सांस्कृतिक ऐक्य निर्माण झालेले आहे. जात विवाहसंस्थेने बळकट केलेली आहे आणि ती बंदिस्त वर्गात बंद केली गेलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सिद्धांतात 'बंदिस्त वर्ग म्हणजे जात' त्याच प्रमाणे वर्ग बंदिस्त करणे म्हणजे वर्गबाह्य विवाहसंबंधावर वर्गांतर्गत विवाहाचा वरचष्मा कायम ठेवणे. जातीचे मूळ शोधत असताना जातीची निर्मिती मनूच्या पूर्वी झालेली आहे मनूने जातीला अधिक मजबूत आणि वर्गबंद कशा करता येतील यावर जास्त काम केलेले आहे. जात ही मानसिक व भौतिक आहे असे मानत असताना ब्राह्मण वर्ग निर्माण केला पाहिजे स्वत:ला उच्चपदस्थ श्रेष्ठ दर्शविण्यासाठी म्हणजे श्रेष्ठ झाला म्हणजे त्याचे अनुकरण करणारे कनिष्ठ ठरतात आणि त्यातूनच अनुसरण्याची पद्धती समजात निर्माण झाली, त्याला जोड दिली धार्मिकतेची त्यातून आजची समाज व्यवस्था निर्माण झाली आहे हे त्याचे मानसशास्त्रीय कारण दर्शविते. लेखकाने अतिशय दीर्घ स्वरुपाचा जातीविषयक मांडणी केलेली

आहे ऐतिहासिक मूळ व कारणमिमांसा त्यावरील अभ्यासकांच्या विचारांशी जोड देत तौलनिक पद्धतीची मांडणी केलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १९१६ च्या Caste in India Their Mechanism Genesis and Development व १९३६ सालचा Annihilation of Caste या दोन्ही निबंधाचा आधार घेत जातियतेची ऐतिहासिक पार्श्वभूमी त्याविषयात निर्माण केली गेलेली मानसिकता सविस्तर चर्चेलेली आहे त्याबरोबर कॉ. शरद पाटील यांच्या अनेक ग्रंथाचा आढावा घेऊन टिकात्मक विश्लेषण ही झालेले आहे कार्लमार्क्स नी भारतीय जातीयतेवर केलेल्या लिखाणाचा संदर्भ ही यात आलेला आहे. डॉ. सेलिग्मन, सिग्मंड फ्राईड, सी–जी. युग, एडलर आणि एरिक फ्रॉम मनोविश्लेषकांचे आकलन विषयक विश्लेषण दिलेले आहे. जातिसंस्थेचा प्रश्न भौतिक आणि मानसिक असल्यामुळे तो मानवी स्वाभावशी संबंधित आहे अशा संदर्भ दिलेला आहे. जाणिव (Conscious) नेणीव (Uncoscious) जात विषय जाणिव आणि नेणीव कशा निर्माण झालाय त्यातून जातीयता कशी गहन विषयक बनत गेली व ती प्रत्येक क्षेत्रात वास्तव करते आहे अनेक समस्यांचे मूळ बनलेली, अशा जातीयेतेबद्दल कार्ल मार्क्सचे विचार डाव्या चळवळींनी कशाप्रकारे समजून घेतल्या आणि आज डाव्या चळवळीतील विचारवंताची उपेक्षा कशी झालेली आहे. तत्वप्रणाली आणि जाणिव कशा वेगळ्या झाल्या याबद्दल ही सांगून गेलेला आहे. सद्यस्थिति जातिअंताचा प्रश्न कसा गंभीर झालेला आहे आणि प्रश्न आता क्रांतीपर्यंत येऊन पोहचला आहे बुद्धाची क्रांती तत्वावर आधारित झालेली आहे तशी क्रांती जातीअंताच्या प्रश्नावर काम करण्याची गरज व्यक्त केली गेली आहे. जातिअंत ही एक सामाजिक प्रक्रिया आहे या प्रक्रियेवर खूप काम करण्याची आवश्यकता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यानंतर यावर खूप काम करण्याची गरज होती पण ती झालेले नाही शेवटी १९५६ ची क्रांती होणे आहे अशा लेखकाचा दृष्टिकोण आहे.

**तेलतुंबडे आनंद (एप्रिल–जून २०१३)** (अन्वीक्षण) '**जातीच्या सातत्यामागचे मानसशास्त्रीय घटक**' जातीच्या सामाजिक मानसशास्त्रीय अनन्यसाधारण घटकाची चिकित्सक मांडणी ह्या लेखातून केलेली आहे. जाती सारखी टोकाची पिळवणूक आणि दडपणूक करणारी व्यवस्था दोन हजार वर्षापासून कल्पना करता येणार नाही अशा दीर्घ काळापर्यंत शिल्लक राहावी ही वस्तूस्थिती मान्य करणे कमालीचे जड जात आहे. जातिव्यवस्थेच्या दीर्घयुष्याचे रचनेतून

असंख्य जाती पैदा झाल्या आणि त्याचा निकष धर्म लावलेला दिसतो. जात संघर्षाच्या अनेक टप्प्यातून प्रवास करत आहे. अध्यात्मापासून ते जडवादापर्यंत सर्व प्रकारचे विचार त्यात केले जातात. तर श्रमण परंपरेतून जैन आणि बौद्ध परंपराचा उदय झाला. विशेषतः बौद्ध हे जातिव्यवस्थेच्या विरोधात होते तरी या सामाजिक समस्येला त्यांनी आवर्जुन विरोध केल्याचे दिसत नाही. परंपरेशी दृष्टी ही व्यक्तिगत प्रबोधनातून सामाजिकतेकडे जाणारी होती बौद्धांचा समाज हा त्यांच्या संघापूरताच सीमित होता. पण संघ हा काही सामान्य तळागळातल्या माणसांचा समुह नव्हता. इस्लाम राज्यात ही जात होती शीख धर्माने जाती विरुद्धी विचार मांडले पण तेही मर्यादित राहिले. मध्ययुगीन काळात धार्मिक, सामाजिक, राजकीय उलथापालथीतून भक्ती चळवळी निर्माण झाल्या त्यातील लोक हे भक्त हे कनिष्ठ जातीतून आलेले होते. त्याचा मुख्य भर हा दैवी कृपा मिळवण्यावर असल्याने प्रत्यक्ष जगण्यातील जात घट्ट उभी राहिली. जातिव्यवस्थेने माखलेल्या हिंदू समाजापेक्षा वेगळे असलेले त्याचे अस्तित्व तसे जानवेनासे झाले. ब्रिटिश वसाहतवादी सत्तेचे आगमन झाले तसे भारतभराच्या लोकांमध्ये जात जाणिव रूजलेली होती. त्यातून खालच्या जातीतील लोकांना त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव झाली आणि त्यांच्यात एकजुटीची भावना जागृत झाली व मानसिक ताकदीच्या साह्याने जातिनिर्मूलन करण्याची इच्छा निर्माण झाली. थोडक्यात धर्ममार्तंडानी धर्म, वर्ग, वंश, जात कशा प्रकारे बंदिस्त करुन स्वतःला श्रेष्ठत्व प्राप्त करुन उच्चपदस्थ नेहमीच राहण्याचा प्रयत्न केलेला आहे असे विचार या लेखाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न आहे.

**कांबळे गौतमीपुत्र (एप्रिल–जून २०१३) (अन्वीक्षण) 'जातीचे मानसशास्त्र आणि जाति निर्मूलनाचा प्रश्न'** जातिनिर्मूलनाच्या प्रयत्नामध्ये जातिव्यवस्थेची सामाजिक, आर्थिक, धाार्मिक दृष्टीकोनातून चिकित्सा झालेली आहे. पण मानसिक चिकित्सा फारशी झालेली नाही. वास्तविक जातिव्यवस्थेच्या निर्मितीबरोबरच किंबहुना तिच्या दुष्परिणामाच्या जाणिवेबरोबरच तिच्या निर्मूलनाचे प्रयत्नही सुरु झाले. जातिव्यवस्थेच्या आकलनामध्ये जातिनिर्मुलनामध्ये व प्रयत्नामध्ये काही उणिवा राहिल्या का, डॉ. बाबासाहेबांचे जातिव्यवस्थेबदलचे विवेचन जातिव्यवस्थेचे मानसशास्त्रीय विश्लेषण व जातिनिर्मूलन चळवळ ही एक प्रमुख उद्दिष्ट होते. त्यांनी जातिव्यवस्थेच्या निर्मितीची आणि विकासाची ही आर्थिक, सामाजिक दृष्टिकोणातून

जशी चिकित्सा केली त्याप्रमाणे मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून चिकित्सा केली आहे. धम्मक्रांती आणि जातिनिर्मुलनाची मानसिकता कोणत्याही पद्धतीने कार्यन्वित झालेली आहे. या बाबीचा विचार यात दिसून येतात.

**कसबे रावसाहेब (१९९६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'जात व वर्गविषय विचार'** हा लेख आणि स्मृती व्याख्यानमालेत केलेले भाषण आहे अतिशय दीर्घ अशा स्वरुपाचा हा लेख बाबासाहेबांच्या जात विषय वर्ग विषयक विचारावर प्रकाश टाकणारा आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे जातिसंस्थेचा अभ्यास हा काही नवीन नाहीत तर तिच्या जन्मापासूनच सुरु झालेला आहे जाती ईश्वर निर्मित आहेत असा समज भारतात ब्रिटिश येईपर्यंत होता, १७ व्या शतकात प्रबोधनाची चळवळ सुरु झाली भारतीय समाजाचा, त्याच्या जातिसंस्थेचा त्यांच्या पारंपारिक धर्मग्रंथाचा अभ्यास नव्याने सुरु केला गेला. भारतातील जातिअंताचे सगळे लढे दिशाहीन बनलेले होते. जातिनिर्मितीची शास्त्रीय कारणे ज्ञात होत नव्हती तोपर्यंत जाती नष्ट कशा करायच्या यासंबधीचा कार्यक्रम नव्हता. जातीनिर्मितीचे गूढ तर उकलत नव्हे अशाच काळत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इ.स.१९१६ साली 'भारतातील जाती त्यांची घडण, उत्पत्ती आणि प्रसार' अशा शोधनिबंध लिहिला, गोल्डन बिजर मानववंशकरणाच्या चर्चासत्रात सादर केला. त्यावेळी त्याचे वय अवघे २५ वर्षाचे होते. तो शोधनिबंध Caste in India : Their Genesis Mechanism & Development असा होता अनेक घटकावर प्रभाव टाकणारा जातीच्या वर्गाच्या दिशा स्पष्ट करा, हा लेख एका वेगळ्या वळणावर जातीचे वर्गाचे स्पष्टीकरण करुन जातिसंदर्भात माहितीचे जाळे विस्तारण्यास निश्चितच मदत करणार आहे.

**चावरे यशवंत (१९९९) अनुसूचित जाती जमातीचे कल्याण व संरक्षण कायदे व त्याची अमंलबजावणी** या संशोधनात्मक ग्रंथात मागासवर्गीय कल्याणार्थ विविध कायदे अधिकार या संदर्भात मांडणी केलेली आहे. यात प्रामुख्याने अनुसूचित जाती अनुसूचित जमाती स्थिती सुधारण्यासाठी जे कायदे करण्यात आलेले आहेत त्याचा ऐतिहासिक आढावा भारतीय संविधनातील विविध कल्याणकारी तरतूदीची माहिती आर्थिक व सामाजिक विकासासाठी झालेले कायदे व योजना यांचा संदर्भ कायद्याची प्रभावी अमंलबजावणी करुन या समाजाला

संविधानाच्या दृष्टीने मानवधिकार सहित प्रतिष्ठीत सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी विविध सूचना करण्यात आलेल्या आहेत.

**बनसोडे टी. के. (१९९४) 'अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अधिनियम १९८९'** या अधिनियमानुसार अनुसूचित जाती जमातींना कायद्याने संरक्षित केले आहे. १९५५ च्या नागरी हक्क संरक्षण अधिनियमाबाबत लोकांना माहिती देणे अप्रचारच्या अपराधासाठी शिक्षा तरतूद व अभ्यास सामुदायिक दंड अधिकार कायदा सुव्यवस्था या संबंधीच्या यंत्रणेत करावयाची प्रतिबंधात्मक कार्यवाही अधिनियमाची परिणामकारक रितीने अमंलबजावणी करणे व त्याची खातरजमा करणे शासनाचे कर्तव्य नियम करण्याचा अधिकार इ. चा सविस्तर आढावा घेतलेला आहे.

**गायकवाड प्रदीप (२०१३) 'मागासवर्गीयांचे आरक्षण'** सदर ग्रंथ संपादीत केलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या सर्व सेवांमधील नोकऱ्यामधील मागासवर्गीयांच्या नियुक्त्या व पदोन्नतीच्या आरक्षणाबाबत संपूर्ण माहिती व ग्रंथात दिलेली आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या शासकीय नोकऱ्यामधील आरक्षणाची संपूर्ण माहिती या ग्रंथात दिली आहे. आरक्षणाचा इतिहास, भारताचे संविधान, निवडक संवैधानिक तरतुदी आणि आरक्षण, लोकसेवामधील विविध नियुक्त्या व पदोन्नती आरक्षण कायदा, शासकीय सेवेत गट 'क' आणि 'ड' सेवा भरतीची एकत्रित मार्गदर्शक तत्त्वे स्थानिक स्वराज्य संस्थामधील आरक्षण, महिला आरक्षण, अपंगाकरिता आरक्षण, प्रकल्पग्रस्ताचे आरक्षण व नियुक्त्या, अनुसूचित जाती आणि जनजाती आदेश अधिनियम १९७६ व याची यादी, आरक्षण अमंलबजावणी व त्या संबंधात विविध करावयाची कार्यवाही महाराष्ट्र राज्यातील मागासवर्ग व आरक्षणाच्या तरतुदी मागासवर्गीयांना जातीचे प्रमाणपत्र देणे व प्रमाणपत्राची पडताळणी करणे, इ. प्रकरणात या ग्रंथाची मांडणी करण्यात आलेली आहे. सदर ग्रंथाची उपयुक्ताता सर्वच मागास घटकांच्या दृष्टीने उपयुक्त आहे. सर्व अधिनियम या ग्रंथात देण्यात आलेले आहेत.

**सोनवणी संजय (२०१६) 'जाती संस्थेचा इतिहास आणि काही जातींचा इतिहास'** सदर ग्रंथात जातिसंस्थेचा इतिहास, समाजाचा विकास प्रवाहातील मानवी संस्कृतीच्या उदयाच्या सम्यक आलेख यात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रामुख्याने वैदिक ब्राह्मण, धनगर, गवळी, वडार, लोहार, वंजारी, बंजारा लमान, कलाल, सुतार, कोष्टी, साळी, शिंपी, ढोर, चर्मकार, आगळी, कोळी इत्यादी जाती इतिहास विस्तृत मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रत्येक जातीसंस्थेच्या वेगवेगळ्या संस्कृती चालीरिती व समज यात मांडलेला आहे. व्यावसायिक जडण–घडणातून जातीचे स्वरूप असे लागू झालेले आहे व त्यावर आधारित जात मानसिकता कशी दृढ बनत गेलेली आहे यावर सविस्तर मांडणी केलेली आहे. या ग्रंथी मांडणी दोन विभागात करण्यात आलेली आहे. पहिला विभाग हा जातीसंस्थेचा इतिहास– यात एकूण अकरा प्रकरणात मांडणी केलेली आहे. यामध्ये जनमाधारित जातीसंस्थेचा उगम कसा झाला? जात भावनेने कळस कसा गाठला? जाती नष्ट करायचे प्रयत्न अयशस्वी का ठरले? जातीनष्ट का होत नाही? आरक्षण अपयशी झाले आहे? आरक्षण कायमचे नष्ठ करण्यासाठी? जातीअंताच्या दिशेने आपण जाणारच असे अनेक प्रश्न विचारलेले आहे त्याचे उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. दुसऱ्या विभागात– वैदिक ब्राह्मण कोण आहेत, महाराष्ट्राचे आद्य वसाहतकार, धनगर–गवळी, वडार समाजाचा इतिहास, लोहार समाजाचा इतिहास, वंजारी–बंजारा–लमान समाजाचा इतिहास, कलाम समाजाचा इतिहास, सुतार समाजचा इतिहास कोष्टी–साळी विणकर समाजाचा इतिहास, शिंपी समाजाचा इतिहास, ढोर–चर्मकार समाजाचा इतिहास, आगरी–कोळी समाजाचा इतिहास या प्रकरणात या ग्रंथाची मांडणी करण्यात आलेली आहे. यात सर्व माहिती ही तर्कसंगत व संशोधनात्मक मांडणी बरोबरच ऐतिहासिक, पुरातत्वीय, मानववंशशास्त्रीय समाज अर्थशास्त्रीय मांडणीला महत्त्व दिलेले आहे.

**महाराष्ट्र शासन (२०१३) 'वाटचाल सामाजिक न्यायाच्या दिशेने'** वाटचाल सामाजिक न्यायाच्या दिशेने ही माहिती पुस्तिका समाजातील दुर्बल घटक व प्रामुख्याने अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास करून समता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४६ अन्वये राज्यातील जनतेसाठी कल्याणकारी योजनाची

निर्मिती करून ती सक्षमपणे राबविणे हे शासनाची जबाबदारी त्याच अनुषंगाने या माहिती पुस्तिकेत योजनांची माहिती देण्यात आलेली वास्तवतः ह्या योजनांची माहिती जनसामान्य पर्यंत पोहचविण्यासाठी ही पुस्तिका उपयुक्त ठरते. या पुस्तिकेत एकूण २०६ योजनांची माहिती दिलेली आहे. यात शैक्षणिक सामाजिक व आर्थिक अशा योजनांची विस्तृत माहिती व कोणत्या विभागने, कशा प्रकारे राबवावी, त्याचे निकष. आर्थिक तरतूद त्यासंदर्भात कागदपत्रांची पूर्तता कोणती व कशाप्रकारे करावी. या अनुषंगाने जनजागृती करण्याचे दृष्टीने ही माहिती पुस्तिका तयार करण्यात आलेली आहे. जनसामान्याच्या दृष्टीने ही महत्वपूर्ण पुस्तिका आहे.

### २.२.२ संशोधन प्रबंध आढावा (Thesis Review)

**चव्हाण सीमा रविंद्र** (२०११) शासकीय उपयोजनाचा अनुसूचित जमातीवर (पारधी समाज) झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामांचा अभ्यास या संशोधन अहवालामध्ये आदिवासी उपयोजनेवर केलेल्या खर्चाचे लाभार्थी कुटूंबाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राहणीमानाच्या दर्जावर काय परिणाम झाले आहेत याचा शोध घेण्यासाठी आदिवासी उपयोजनेच्या परिणामकारक फलश्रुतीचे आणि कार्यक्षम अंमलबजावणीचे मूल्यमापन करण्याकरीता पारधी कुटूंबावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करण्यात आला असून काही निष्कर्ष मांडले आहेत. यामध्ये अभ्यास करण्यात आलेल्या कुटूंबातील ८२.८६ टक्के कुटूंबाचे प्रमुख पुरुष आणि केवळ १७.१४ टक्के कुटूंबाच्या प्रमुख स्त्रिया असल्याचे आढळून आले. नमुना कुटूंबाच्या प्रमुखांचे वयोगटनिहाय वर्गीकरण केल्यास ४१–५० वयोगटातील ३५.७ टक्के, ५१–६० वयोगटातील १६.६ टक्के, ३० वर्षापेक्षा कमी १४.२८ टक्के आणि सर्वांत कमी म्हणजे ८.५७ टक्के कुटुंबाचे प्रमुख ६० वर्षापेक्षा जास्त वय असल्याचे आढळून आले. नमुना कुटूंबाचा सरासरी आकार ४.६२ एवढा आहे. नमुना कुटूंबात पाच व्यक्ती असणाऱ्या कुटूंबाचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे २६.८० टक्के आहे. त्या खालोखाल चार व्यक्ती असणारे २४.७५ टक्के ६ व्यक्ती असणारे १२.३८ टक्के ३ व्यक्ती असणारे १०.८२ टक्के सात व्यक्ती असणारे १०.१० टक्के, आठ व्यकती असणारे ७.४२ टक्के नऊ व्यक्ती असणारे ४.६४ टक्के आणि सर्वात कमी दोन व्यक्ती असणारे ३.०९ टक्के असल्याचे आढळून आले. नमुना कुटूंबातील एकूण व्यक्तींपैकी ५२.४७ टक्के पुरुष आणि ४७.५३ टक्के स्त्रिया आहेत.

**भागडे पोपट मच्छिंद्र,** ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन या अभ्यासामध्ये महत्त्वाच्या शिफारशी अशा आहेत– आदिवासी महिलांना आर्थिक व शैक्षणिक सवलतींची पुरेशी माहिती नसते. त्यामुळे शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी गावपातळीवर व तालुका स्तरावर मार्गदर्शन केंद्र असावे. आदिवासी मुलींना शिक्षण घेण्याची इच्छा असते. त्याचा उपयोग मुलींच्या शैक्षणिक विकासासाठी करावा. म्हणून शासनाने आदिवासी आश्रम शाळेतील शैक्षणिक दर्जा व त्या ठिकाणी मिळणाऱ्या सुविधा तसेच वसतीगृहे यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. आश्रमशाळेच्या सुविधांमध्ये आदिवासींमधील साक्षरता प्रमाण वाढत आहे हे अमान्य करता येणार नाही. असे असले तरी आश्रम शाळेला आलेली व्यावसायिक स्वरूप यातून ढासळलेली गुणवत्ता यामुळे आदिवासी तरूण स्पर्धेच्या युगात टिकत नाही. त्यामुळे आश्रमशाळेतून संख्यात्मक विद्यार्थी बाहेर न पडता गुणात्मक विद्यार्थ्यांची संख्या बाहेर पडावी यावर भर देण्यात यावा. अशा शिफारशी या अभ्यासात करण्यात आल्या आहेत.

**प्रा. पानी** (१९७६) मध्ये आदिवासी भागातील शेतींची उत्पादन क्षमता आणि व्याप्ती वाढविण्यात नवीन तंत्रज्ञान कितपत उपयुक्त आहे हे पाहण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी ५७ बिगर आदिवासी व शेतकऱ्यांच्या मुलाखती घेऊन असे निदर्शनास आणून दिले की, आदिवासी भागातील केवळ २५% जमीन (शेती जमीन) ही नवीन तंत्रज्ञानाच्या उपयोगास उपयुक्त आहे. कारण या भागातील ७५% शेत जमीन ही कोरडवाहू असून नैसर्गिक पावसावर अवलंबून आहे आणि या भागात जलसिंचनाच्या सोईचा अभाव असल्याचे म्हटले आहे. असेही निदर्शनास आणून दिले आहे की, आदिवासी भागात सिंचनावर आधारित अधिक उत्पन्न देणाऱ्या पिकांची लागवड करण्याची कमी शक्यता दर्शविली आहे. अशा भागात विशेष घटक योजनांची परिणामकारक अंमलबजावणी केल्यास काही प्रमाणात आदिवासी भागात शेतीचा विकास करणे शक्य आहे.

**शहा निरंजन** (१९७०), आसाममधील स्थलांतरित शेतीचे अर्थशास्त्र, या पी.एच्.डी. संशोधनामधून काढण्यात आलेले महत्त्वाचे निष्कर्ष– जगातील बहुतेक देशांत स्थलांतरित शेती केली जाते. स्थलांतरित शेती ही प्रामुख्याने आदिवासी जमाती करतात. भारतातही स्थलांतरित

शेती केली जाते. पूर्वेकडील राज्यांमध्ये आशी शेती करण्याचे प्रमाण जास्त आहे. आसाममधील स्थलांतरित शेती ही त्या भागातील लोकांचा सामाजिक, सांस्कृतिक दृष्टीकोण आणि हेतू याच्याशी निगडीत आहे. तांत्रिक मागासलेपणा, निकृष्ठ राहणीमान, स्थिर अर्थव्यवस्था, भौगोलिक वातावरणीय स्थिती, लोकसंख्येची घनता, तुलनात्मक अलगता हे सर्व घटक स्थलांतरित शेतीस कारणीभूत आहेत. आसाममधील डोंगराळ भागातील ६० टक्के लोक हे स्थलांतरित शेती करतात. तसेच शिकार करणे, गौण वनौपजे गोळा करणे, हस्तकला, कुक्कुटपालन इ. जोडधंदेही करतात. कुटुंबाच्या उदर निर्वाहाच्या गरजा भागविण्यासाठी लागणारी उत्पादने या शेतीत घेतली जातात. कुटुंबातील सर्व सदस्य या शेतीत सहभागी होतात. स्थलांतरित शेतीमुळे जंगले नष्ट होतात तसेच जमिनीची धूप होते. स्थलांतरित शेतीला प्राथमिक अवस्थेतील शेती असेही म्हटले जाते.

**जगबंधू समल** (१९९२), आदिवासी अर्थव्यवस्थेची काही दृश्ये : ओरिसा राज्यातील कोरापूट जिल्हाचा वस्तुनिष्ट अभ्यास या पीएच.डी. पदवीमधून काढण्यात आलेले निष्कर्ष– संशोधनासाठी ओरिसा राज्यातील कोरापूट जिल्ह्यामधील तीन खेडी व एक पुनर्रनिर्माण वसाहत यांचा अभ्यास केला. कोरापूट जिल्ह्यात स्त्री–पुरुष प्रमाण चांगले असून विशेषता आदिवासींमध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरुषांपेक्षा अधिक आहे. संशोधनासाठी निवडलेल्या आदिवासी गावांमध्ये साक्षरतेचा दर अत्यंत कमी म्हणजे फक्त ६ टक्के होता. शाळेत जाणाऱ्या लहान मुलांची संख्या अत्यंत कमी होती. मुलांना बसण्यासाठी पडक्याच शाळा होत्या. चारही आदिवासी गावांत पुरुष, स्त्रिया, लहान मुले यांचा आर्थिक उत्पन्न मिळविण्यात सहभाग होता. बहुतेक सर्व मजूर होते. सन १९८१ ची जनगणना व संशोधकाने प्रत्यक्ष केलेली पाहणी यांच्यात मोठ्या प्रमाणात तफावत होती. जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या कमी होती. आदिवासी मजूरांना अवजड काम करूनही मोबदला अतिशय कमी मिळत होता. किरकोळ मजूरी दर फक्त ३ रु. प्रतिदिन होता. चारही आदिवासी खेडयांमध्ये स्थलांतरित शेती केली जात होती. स्थलांतरित शेतीपासून अत्यंत तुटपुंजे उत्पन्न मिळत होते.

**एस. राजू क्रिणन** भारतातील आदिवासी लोकसंख्येत झालेले सामाजिक आर्थिक बदल (१९६१–१९९१) यांनी वरील विषयावर संशोधन करून खालील निष्कर्ष काढलेले आहेत.

आदिवासी लोकसंख्येत इ.स.१९६१ ते १९९१ या काळात १२७ टक्के वाढ झाली. नमूद काळात शहरी आदिवासी स्त्रिया व ग्रामीण आदिवासी स्त्रिया यांच्यातील फरक कमी झाला. आदिवासी स्त्री–पुरुष प्रमाण उर्वरित लोकसंख्येपेक्षा चांगले आहे. इ.स.१९९१ च्या जनगणनेनुसार १००० पुरुषांमागे १०२९ स्त्रिया आढळतात. देशातील इतर लोकसंख्येच्या तुलनेन आदिवासींची साक्षरता अत्यंत कमी आहे. इ.स. १९६१ मध्ये साक्षरता फक्त ८.५ टक्के होती. ती १९९१ मध्ये ३२ टक्के इतकी वाढली. शहरातील आदिवासींची साक्षरता ग्रामीण भागाच्या तुलनेत जास्त आहे. ग्रामीण भागात स्त्रियांची साक्षरता अत्यंत कमी आहे. इ.स.१९६१ ते १९९१ या काळात स्त्री–पुरुष साक्षरतेतील तफावत कमी झाली. इ.स.१९६१ ते १९९१ या काळात जिल्हा पातळीवर आदिवासी स्त्री–पुरुषांच्या कामातील सहभागाची सरासरी पातळी कमी झालेली आहे. नमूद काळात स्त्रियांच्या कामाचा दर पुरुषांपेक्षा अधिक वेगाने कमी झाला आहे. देशाच्या पूर्वोत्तर राज्यात ग्रामीण भागात राहणाऱ्या आदिवासींचे प्रमाण ९२.१३ टक्के आहे. देशाच्या दक्षिण विभागात ते ३.८६ टक्के इतके आहे. देशाच्या पचिम विभागात शहरांत केंद्रीत झालेल्या आदिवासींचे प्रमाण जास्त आढळते.

**भोसेकर व्ही. व्ही.** (१९७९) यांनी पीएच्. डी. पदवीसाठी 'धुळे जिल्ह्यातील सहकारी चळवळ' या विषयावर संशोधन केलेले आहे. त्यांचे निष्कर्ष– धुळे जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ३८ टक्के लोकसंख्या आदिवासी आहे. नंदूरबार, तळोदा, शहादा, शिरपूर आणि साक्री हे आदिवासी बहुल तालुके आहेत. तसेच केंद्र सरकारने नवापूर, अक्राणी आणि अक्कलकुवा हे पूर्ण आदिवासी क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहे. या जिल्ह्यातील ढाणका, भिल्ल, गावित, पारधी या जमाती अत्यंत मागासलेल्या आहेत. तर पाडवी, तडवी, वसावे, वळवी या जमाती सुधारलेल्या आहेत व त्या सपाट भू–प्रदेशात राहतात. धुळे जिल्ह्यातील आदिवासींचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. फक्त ५ टक्के आदिवासींकडे शेतीयोग्य जमीन आहे. आदिवासींना फक्त २ ते ३ महिनेच रोजगार मिळतो. २५ टक्के आदिवासी भूमिहीन शेतमजूर आहेत. बहुतेक आदिवासी शेती, शेळीपालन, लाकूड गोळा करणे, डिंक व लाख गोळा करणे तसेच हिरडा, बेहडा अशी आयुर्वेदिक उत्पादने गोळा करणे अशा छोटा उद्योगधंद्यात गुंतलेले आहेत. गरीब आदिवासी जमीनदार, सावकार यांच्याकडे सालगडी, घरगडी म्हणून काम करतात. सहकारी

चळवळीने आदिवासींना विकासाची संधी निर्माण केली आहे. या चळवळीमार्फत त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला जात आहे. व्यापारी, सावकार यांच्या पाशातून आदिवासींची मुक्तता करणे हे सहकारी चळवळीचे उद्दिष्ट आहे. आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी विभागात आदिवासी सहकारी पतसंस्थांची स्थापना करण्यात आलेली आहे. आदिवासी सहकारी पतसंस्थांमार्फत आदिवासींना सर्व प्रकारचा कर्जपुरवठा केला जातो. आदिवासी गोळा करीत असलेल्या गौण वनौपजांच्या खरेदी–विक्रीसाठी आदिवासी सहकारी खरेदी–विक्री संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. आदिवासी भागात कामगार करार सहकारी संस्था व जंगल कामगार सहकारी संस्था आढळून येतात. आदिवासी बहुल प्रदेशात सहकारी चळवळ पुरेशी फोफावलेली नाही. सहकारी संस्थांमध्ये आदिवासी सभासदांची संख्या कमी आहे. आदिवासी सहकारी संस्थांवर खाजगी कंत्राटदारांचे वर्चस्व दिसून येते. सरकारी विभाग खाजगी कंत्राटदारांनाच अधिक मदत करतात. सरकारकडून देण्यात येणारी अनुदाने, सूट, सुविधा या फक्त कागदावरच असतात. प्रत्यक्षात त्याचा आदिवासींना काहीच फायदा होत नाही. बहुतेक आदिवासी सहकारी सोसायट्याा तोट्यात आहेत.

**पोळ अमृत वासुदेव** 'आदिवासींमधील आर्थिक बदल' या विषयावर संशोधन केले होते. त्यांनी ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील कोसबाड मधील 'वारली' आदिवासी या जमातीबाबत अभ्यास केला होता. आदिवासी भागातील धारण क्षेत्राचे स्वरूप, शेतीमाल बदल, जंगल संपत्ती, सांस्कृतिक घटकांचा प्रभाव इत्यादी बाबींविषयी त्यांनी अभ्यास केला होता. या अभ्यासाचे प्रमुख निष्कर्ष–'वारली' लोक झोपडांमध्ये राहतात. १० ते १५ झोपडांच्या गटाला 'पाडा' असे म्हणतात. साधारणपणे ३ ते १२ पाडे मिळून एक खेडेगाव असते. 'वारली' लोक वारली ही बोलीभाषा बोलतात. 'वारली' लोक सुंदर चित्रे काढतात. त्यांची चित्रकला 'वारली चित्रकला' या नावाने प्रसिद्ध आहे. कोसबाडमधील 'वारली' जमातींचे सरासरी जमीन धारणक्षेत्र १ हेक्टर इतके आहे. भात हे प्रमुख पीक असून नाचणी व वरई ही पिकेही घेतली जातात. 'वारली' लोकांमध्ये दारिद्राचे प्रमाण जवळ–जवळ ९२ टक्के इतके आहे. 'वारली' लोकांच्या प्रदेशात साग, खैर, जांभूळ, करवंद, मोह ही प्रमुख वनसंपदा आहे. विशिष्ट पेहराव, चित्रकला,

ढोलनाच, वेगळी बोलीभाषा, विाष्टि राहणी, एकमेकांना सहकार्य करण्याची वृत्ती ही 'वारली' लोकांची प्रमुख वैाष्टि आहेत.

**कांबळे बी. एन.** 'महाराष्ट्रातील विकास कार्यक्रमांची अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींवरील (आदिवासी) परिणामकारकता' या विषयावरील संशोधनामध्ये १०५२ कुटुंबांची निवड केलेली होती. या अभ्यासाचे निष्कर्ष– अनुसूचित जातींमध्ये सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. आदिवासींमध्ये लहान व मध्यम शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमांमुळे अनुसूचित जाती व आदिवासींमध्ये दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकांचे चित्र स्पष्ट होण्यास मदत झाली आहे. अहमदनगर जिल्ह्यातील १३ तालुक्यांपैकी ६ तालुक्यांत एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (ए.ग्रा.वि.का.) अंतर्गत राबविण्यात आलेल्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी झालेली आहे तर उर्वरित ७ तालुक्यांत त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही. अहमदनगर जिल्ह्यातील सर्व खेड्यांत प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध आहे. अहमदनगर जिल्ह्यातील एकूण कुटुंबांपैकी ५० टक्के कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली आहेत. दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या लोकांमध्ये ४० टक्के लोक हे अनुसूचित जाती व आदिवासी जमातीचे आहेत. ए.ग्रा.वि.का. मुळे १५ टक्के लोकांना दारिद्र्यरेषा पार करण्यास मदत झालेली होती. ए.ग्रा.वि.का. लाभ ६० टक्के अनुसूचित जातीमधील व ३८ टक्के आदिवासी जमातींमधील कुटुंबांना झालेला होता. जवळजवळ ४७ टक्के लोकांच्या उत्पन्नात कोणतीही वाढ झालेली नव्हती. एकूण १०५२ कुटुंबांपैकी ४६ टक्के लोक भूमिहीन होते. संशोधनासाठी निवडलेल्या सर्व कुटुंबांचे सरासरी वार्षिक उत्पन्न १३००० रु. च्या जवळपास होते. त्यातील २/३ लोकांचे वार्षिक उत्पन्न २५०० रु. पेक्षा कमी होते. जवळजवळ ७० टक्के कुटुंबे झोपडीत राहत होती ५ टक्के कुटुंबे पक्क्या घरात राहात होती. कर्ज घेतलेले लोक ८ टक्क्यांपेक्षा जास्त नव्हते.

**जाधव छाया (२००८),** 'एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमातंर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा सन १९९०–९५ कालखंडातील अभ्यास व मूल्यमापन (विशेष संदर्भ–आंबेगाव तालुका जि. पुणे)' सदर संशोधनासाठी उद्दिष्टे असे होते. महाराष्ट्र शासनाकडून अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा प्रभाव व

परिणाम अभ्यासणे, आदिवासी क्षेत्रातील विशिष्ट भौतिक परिस्थितीनुसार योजना कार्यक्रमाचे आयोजन कसे आहे किंवा काय याचा शोध घेणे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, एकात्मिक ग्रामीण विकास यंत्रणा कृषी व संलग्न सेवा, जवाहर रोजगार योजना, दशलक्ष विहीर योजना, समाजकल्याण योजना आढावा. आदिवासी विकास योजना (उपयोजना) आदिवासी समुदायांना सामावून घेत असताना त्याच्या आर्थिक व सामाजिक जीवनमानात बद्दल झाला पाहिजे, त्याचे जीवनमान उंचावणे यासाठी कार्य करत आहे. पण शिक्षणाचा अभाव त्या संदर्भात जनजागृती चा अभाव दिसून आलेला आहे. विशिष्ट गटापर्यंत ही उपयोजना सिमीत राहिलेली दिसून येते मात्र ज्या घटकांपर्यंत पोहचलेली आहे त्या समुदायाचा आर्थिक व सामाजिक जिवनात बदल झालेला जाणवले आहे.

**नगरकर राजेश (२००२)**, 'महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जनजातीच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (TRTI Tribal Research & Training Institute) योगदान एक विश्लेषणात्मक अध्ययन १९८९–९०–१९९९–२०००' या विषयावर पीएच.डी. संशोधन केले असून त्याच्या संशोधनाची उद्दिष्टे– महाराष्ट्रातील वास्तव त्याच्या करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या कुटुंबाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अधयन करणे, महाराष्ट्रातील आदिवासी कल्याण आणि विकास योजनांचा अभ्यास करणे. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेच्या कार्याचा आढावा घेणे. सदर संशोधन आदिवासी जनजातीच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीत TRTI च्या योदानावर भाष्य करते आहे. आदिवासी समुदाय विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी TRTI ची भूमिका कशा प्रकारची आहे याचा एकूणच आढावा घेतला आहे त्याच्या संदर्भात TRTI चे संशोधन व जाणीव जागृती आणि कौशल्य आधारित प्रशिक्षण त्याचे दैनंदिन जीवनमान उंचावल्यास मदत करते आहे असा संशोधनाचा निष्कर्ष आहे.

**कांबळे बी. एन (१९९५)**, 'Effectiveness of Development programmers for scheduled castes and scheduled Tribles in Maharashtra' या विषयावर संशोधन केले असून त्याच्या संशोधनाची उद्दिष्टे गृहितके व निष्कर्ष पुढील प्रमाणे होती. अनुसूचित जाती व जमातीच्या समस्या आणि विकास कार्यक्रम या अनुषंगाने झालेल्या अभ्यासाचा परिक्षणात्मक

आढावा घेणे, अनुसूचित जाती व जमातीच्या सामाजिक व आर्थिक जीवनमानात विकास कार्यक्रमांमुळे झालेल्या बदलांची नोंद घेणे, अनुसूचित जाती व जमातीसाठीच्या शासकीय विकास योजनांचा आढावा घेणे, अनुसूचित जाती व जमातीसंदर्भात विकास कार्यक्रमाच्या प्रभावाचे विश्लेषण करणे, अनुसूचित जमातीच्या समस्या व विशेष साहाय्य योजनांचा अभ्यास करणे. गृहितके– विशेष सहाय्य योजनांचा लाभ अनुसूचित जाती, जमातीना होत आहे. अनुसूचित जाती जमाती विकासासाठी सरकार प्रयत्न करत आहे. संशोधन पद्धती, या संशोधनासाठी दुय्यम व प्राथमिक साधनाचा वापर करून म्हणजे संख्यात्मक व गुणात्मक पद्धतीचा वापर करून पुढील प्रमाणे निष्कर्ष काढले. शासकीय योजनांच्या लाभामुळे अनुसूचित जाती जमातीच्या आर्थिक सामाजिक व शैक्षणिक स्तर उंचावला, राहणीमान दर्जा व कौटुंबिक स्तर सुधारणा आहे. जीवनपद्धतीत एकूणच बदल झाल्यामुळे उपभोग खर्च वाढला आहे. रोजगार निर्मितीमुळे उत्पन्नाचे स्त्रोत वाढून उपभोग पातळी वाढली आहे. योजनांच्या लाभामुळे शैक्षणिक बदल मोठ्या प्रमाणात सुधारला आहे. त्यामुळे या समाजात जाणिव जागृती मोठ्या प्रमाणात झालेली आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पीय तरतूद होणे आवश्यक आहे. तसेच अधिक चांगल्या पद्धतीने विकास घडवून येऊ शकतो असे संशोधन निष्कर्ष मांडलेली आहेत.

**महाजन फुलसिंग (२००३),** 'An Analytical Economic Studya of Tribals in Jalgaon District 1990-2000' यांनी पीएच.डी. साठी सादर केलेल्या संशोधनाची उद्दिष्टे– जळगाव जिल्ह्याचे ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक व आर्थिक अध्ययन करणे,आदिवासी उपयोजनेचा अभ्यास करणे, भारतातील विविध आदिवासी विकास योजनांचा आढावा घेणे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल अंतर्गत आदिवासी सामाजिक व आर्थिक स्तराचे अध्ययन करणे, जळगाव जिल्ह्यातील रावेर, चोपडा व यावल या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी व त्यांच्यासाठीच्या विकास योजनांचा आढावा घेणे, जळगाव जिल्ह्यातील आदिवासी विकासासाठी व्युहरचना सुचविणे.

आदिवासी उपयोजनेची अमंलबजावणी ज्या समुदायातील घटकापर्यंत पोहचलेली आहे त्यांचे जिवनमान निश्चितपणे उंचावलेले दिसून येते. पण उपयोजनेच्या लाभापासून असंख्य

लाभार्थी वंचित आहे त्यांच्या पर्यंत पोहचणे आवश्यक आहे तरच उपयोजनेची उद्दिष्टे साध्य होऊ शकतात. त्याकरिता उपयोजनांची जनजागृती करणे हाच उपाय होऊ शकतो व त्या आदिवासी समुदायांना उपयोजनाच्या विकास आराखड्यात सामवून घेऊन सर्वसमावेशक विकास साध्य करावा लागेल अशा प्रकारे संशोधन निष्कर्ष संशोधकाने काढलेली आहेत.

**जोसेफ व्ही. व्ही. (२००४),** Tribal Developmnet in Kerala A Critique A Case Sutdy of the Malai Aryans in Kottayam District. सदर संशोधनाची उद्दिष्टे, निष्कर्ष पुढील प्रमाणे– भारतातील आदिवासी व आदिवासी क्षेत्राचा अभ्यास करणे, केरळमधील आदिवासीचा अभ्यास करणे, केरळमधील मलाया आर्यन जमातीचे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक अध्ययन करणे, आदिवासी विकास योजना लाभार्थ्यांचे परिक्षण करणे, आदिवासी विकासविषयक प्रशासकीय यंत्रणा व योजनांचा अभ्यास करणे. गृहितके– आदिवासी विकास योजनांचा लाभ आर्थिक व सामाजिक व सांस्कृतिक स्तर उंचावत आहे. आदिवासी समुदाय मोठ्या प्रमाणात मागास आहे. या संशोधनाची निष्कर्ष– आदिवासी समुदायचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला नाही. विकास योजनांची जाणिव जागृती झालेली नाही. अर्थसंकल्पीय तरतूद लोकसंख्येच्या प्रमाणात झालेली दिसून येत नाही. अतिदूर्गम भागात मूलभूत सोयी सुविधा शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणी यांचा अभाव आहे. जिवनपद्धती अति मागास आहे. शासकीय योजना त्यांच्यापर्यंत पोहचू शकलेल्या नाहीत. जाणिव जागृतीसाठी शासन विशेष प्रयत्न केलेले नाहीत असे संशोधन निष्कर्ष मांडलेली आहेत.

**तेगपुरे मारोती (२००८),** 'किनवट तालुक्यातील आदिवासी उपयोजनाचे मूल्यमापन' सदर संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके व निष्कर्ष पुढील प्रमाणे– आदिवासी उपयोजनेचा अभ्यास करणे, किनवट एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचा अभ्यास करणे, आदिवासी विकास योजनांचा आढावा घेणे, आदिवासी उपयोजनेवरील खर्च प्रवृत्तीचा अभ्यास करणे, आदिवासीच्या सामाजिक व आर्थिक जीवनावरील आदिवासी उपयोजनेच्या परिणामाचा अभ्यास करणे, आदिवासी उपयोजनेअंतर्गत विविध विकास योजनांचे मूल्यमापन करणे. गृहितके– आदिवासी उपयोजनामुळे आदिवासी समुदायाचा विकास होत आहे. व आर्थिक व सामाजिक, शैक्षणिक जीवनाबरोबरच सांस्कृतिक जीवनात बदल होत आहे. निष्कर्ष–

आदिवासी उपयोजने करिता करण्यात येणारी आर्थिक तरतूद लोकसंख्येच्या प्रमाणात होत नाही. आदिवासी उपयोजना सर्व वंचित घटकांपर्यंत पोहचू शकलेल्या नाहीत. योजनाचा लाभ काही प्रमुख घटकांना झालेला आहे. म्हणून त्याचा विकास झालेला आहे. अशाप्रकारे सर्व वंचित घटकाला याचा फायदा झाला तर समान विकास होईल. योजनांच्या स्वरूपामध्ये बदल करणे आवश्यक आहे. चांगल्या योजना दिर्घकालावधी साठी राबविणे आवश्यक आहे. आदिवासी उपयोजनेसाठी करण्यात येणारी आर्थिक तरतूद त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे आवश्यक आहे. त्यावर्षातील शिल्लक पुढील वर्षात आर्थिक तरतूदीत मिळविणे आवश्यक आहे. योजनेचा खर्च इतर योजनांना व विभागाना वर्ग केल्याचे निर्देशनास येते. वरील प्रमाणे उद्दिष्ट्ये, गृहिते निष्कर्ष मांडलेली आहेत.

**गव्हाळे संदिपान (मे २०१२),** ‘भटक्या जमातीचा सामाजिक व आर्थिक अभ्यास : महाराष्ट्रातील पारधी जमातीच्या विशेष संदर्भात Socio-Economic Study of Nomadic Tribes with Special Reference to Pardhi Commanity from Maharashtra' सदर संशोधनाची उद्दिष्टे, निष्कर्ष पुढीलप्रमाणे– पारधी जमातीच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे, पारधी जमातीच्या गुन्हेगारी व मागासलेपणाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे. त्यांच्या सद्यः जीवनामानाचा बदलत्या सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे, पारधी जमातीसाठीच्या शासकीय योजनांचा परामर्श घेऊन संबंधित योजनांचा प्रत्यक्ष परिणाम आणि प्रभाव तपासणे, बदलत्या काळानुसार पारधी जमातीच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत परिवर्तनाचे विश्लेषण करुन त्यावर उचित शिफारशी करणे. निष्कर्ष– पारधी जमातीचा आर्थिक व सामाजिक विकास आजही दुर्लक्षित आहे. समाजातील त्याच्या बदलाचा दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे. गुन्हेगारी हा शिक्का आजही त्यांच्यावर कायम आहे. शैक्षणिक बदलाने व जाणीव जागृतीने यावर मात करता येते. शासकीय योजना परिणामकाकररित्या अमंलबजावणी झालेली दिसून येत नाही. सर्व कारणांनी पारधी जमात आजही दुर्लक्षीत आहे. वरील प्रमाणे संशोधकाने उद्दिष्ट्ये व निष्कर्ष मांडलेली आहेत.

**खरात गोपीनाथ (सप्टेंबर २०१०),** ‘एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमाचे टीकात्मक मूल्यमापन नाशिक जिल्हा (महाराष्ट्र)’ या संशोधानाची उद्दिष्ये व निष्कर्ष पुढील

प्रमाणे– आदिवासी जमातीच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनमानाचा नाशिक जिल्ह्याच्या विशेष संदर्भासह अभ्यास करणे; एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमाचे स्वरुप व व्याप्ती अभ्यास करणे महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजनेचा अभ्यास करणे, नाशिक व कळवण एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांचे अध्ययन करणे, संशोधन विषयक क्षेत्रीय पाहणी आधारे निष्कर्ष व शिफारशी प्रस्तुत करणे. निष्कर्ष– आदिवासी जमातीचा आर्थिक सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक विकास अद्याप ही झालेला नाही. शासकीय योजनांची परिणामकारकता दिसून आलेली नाही. शासकीय योजनांची जाणीव जागृती आदिवासी समुदायात झालेली नाही. एकात्मिक आदिवासी योजना जिल्हास्तरावर असल्याने कागदपत्राची पूर्तता अधिक प्रमाणात अथवा अनावश्यक कागदपत्रे सादर करावी लागतात. अर्थात योजनेच्या अटी व शर्ती सुलभ होणे आवश्यक आहे. योजनामधील पारदर्शकता अधिक प्रमाणात होऊन प्रत्यक्ष लाभार्थ्यांना लाभ होणे आवश्यक आहे. सदर संशोधनाची उद्दिष्ट्ये व निष्कर्ष वरील प्रमाणे मांडलेली आहेत.

**कांबळे बी. एन. (१९९५),** 'Effectiveness of Development Programmes for Scheduled Cates and Scheduled Tribes in Maharshtra.' सदर संशोधनाची निष्कर्ष अनुसूचित जाती व जमातीच्या शिक्षणावर शासकीय योजनांचा विशेष परिणाम होणे आवश्यक होते पण तसे झाले नसल्याने SCP चे उद्दिष्ट साध्य झाले नाही. विशेष घटक योजनेची अमंलबजावणी प्रभावीपणे होणे आवश्यक आहे. निधीचा वापर लाभार्थ्यांच्या विकासासाठी करणे आवश्यक आहे. दारिद्र्य निर्मुलन हे उद्दिष्ट काही अंशी साध्य झाले असले तरी सामाजिक न्याय, समता निर्माण करण्यात शासन अपयशी ठरले आहे.

### २.२.३ एम.फिल. लघु प्रबंध

**पवार किरण सर्जेराव** (२०१४), 'घिसाडी जमात : एक ऐतिहासिक अवलोकन', पुणे विद्यापीठाच्या इतिहास विषयात एम.फिल. या विषयात अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासात भटक्या विमुक्त जाती–जमाती व त्यांची सद्यस्थिती, घिसाडी जमातीची उत्पत्ती व इतिहास, घिसाडी जमातीचे सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवन या विषयावर प्रकाश

टाकला आहे. घिसाडी जमातींचा व्यवसाय, त्यांचे आर्थिक प्राप्तीचे मार्ग, सततची भटकंतीमुळे ते एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करतात. ही स्थिर जमात नाही. ही जमात उदरनिर्वाहासाठी भटकंती करत गुजरात, खान्देश, मध्यप्रदेश मार्गे महाराष्ट्रात आलेले आहेत. घिसाडी जमात ही मुळची राजस्थानमधील असल्याने त्यांची बोलीभाषा मेवाडी, मारवाडी या भाषेचे प्रभुत्व आहे.

**२.२.४ नियतकालिके, लेख व मासिके :-**

**कांबळे उत्तम, 'आंदकोळ आयचं आंदकोळ'** या लेखामध्ये किसन चव्हाण लिखित आंदकोळ आयचं आंदकोळ या आत्मकथनावर भाष्य केले आहे. या लेखात पारध्यांच्या जीवनपद्धतीवर प्रकाश टाकला आहे.

**पाटील अविनाश, 'जात पंचायतीला हवा लगाम'**, या लेखामध्ये जातपंचायतीच्या निर्णयावर दिलेल्या शिक्षा कशा कायदेबाह्य आहेत यावर प्रकाश टाकला आहे. जातपंचायतीच्या निर्णयामुळे स्त्रियांवर अन्याय व अत्याचारकारक असतात. जातपंचायतींचं अस्तित्व बहुतांश समाजात असल्याचं दिसून येते. जातीच्या किंवा गावकीच्या पंचानी स्वतःच्या जातीच्या लोकांसाठी नियम बनवले ते अनेक पिढ्यांपासून चालत आले आहेत. पंच न्यायनिवाडे करतात, दंड करतात, शिक्षाही देतात. जातपंचायत कामकाज म्हणजे समांतर (अ) न्याय व्यवस्था आहे याचे चित्रण या लेखात करण्यात आले आहे.

**भांडाळकर दत्तात्रय,** Excluding the Ex-Criminal Tribes: Undertanding Domination and Interplay of Caste in India या लेखामध्ये गुन्हेगारी जमाती कायदा १८७१ नुसार भटक्या जमातींना समुदायामध्ये गुन्हेगारी ठरण्याची प्रक्रिया नमूद करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील रामोशी समाजावर गुणात्मक संशोधनावर आधारीत हा लेख लिहिण्यात आला आहे. सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यात व्यष्टी अध्ययनाचा वापर या संशोधनात करण्यात आलेला आहे. भटक्या जमातींना सामान्य समुदायाकडूनच गुन्हेगारीसाठी प्रवृत्त केले जात असल्याचा निष्कर्ष मांडण्यात आला आहे.

**कांबळे स्वप्निल एम.,** Marginalization of Youths and Women in Phase Paradhi Scheduled Tribes in Kolhapur Distric, Maharashtra **हा लेख कोल्हापूर जिल्ह्यात फासे पारधी जमातीवर करण्यात आलेल्या संशोधनावर आधारित आहे. संशोधकाने ३५ युवक व ४० महिला अपघाती नमुना निवड पद्धतीने अभ्यासासाठी निवड केले होते. या अभ्यासात ३१.४% युवक दारिद्र्यरेषेखाली दिसून आले आहेत. सर्व उत्तरदाते रोजंदारीवर काम करणारे आढळून आले. शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प तर व्यसनाधिनता मोठ्याप्रमाणावर दिसून आली आहे. ७२.५ % महिला अशिक्षित असून २७.५% महिलांची लग्ने कमी वयात करण्यात आलेली आहेत. ६७.५% महिला रोजंदारीवर काम करत असल्याचा निष्कर्ष मांडण्यात आला आहे.**

**डिसुजा दिलीप,** Declared Criminal at Birth: India's Denotified Tribes **लेखामध्ये भटक्या जमाती ह्या जन्मापासूनच गुन्हेगारी जमाती कायदा १८७१ नुसार गुन्हेगारी जमाती म्हणून इंग्रज अधिकाऱ्यानी घोषित केलेल्या आहेत. भारतामध्ये एकूण १५० आदिवासी जमाती या गुन्हेगारी समजल्या जातात. पारधी जमातीचे दैनंदिन जीवन, व्यवसाय, त्यांच्या चाली–रिती, अंतर्गत संबंध व जीवनपद्धतीवर प्रकाश टाकला आहे.**

**XAXA Virginius (2001),** Protective Discrimination: Why Scheduled Tribes Behind Scheduled Caste : (Source- Economic and Political Weekly (July 21, 2001) pp 2765-2772) **सदर संशोधनात विषमतावादी संस्कृतीचा अनुसूचित जाती व जमाती या समुहाल विकासाच्या प्रवाहापासून वंचित का? ठेवले आहे या प्रश्नाच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न केला आहे. या समुहांचा ऐतिहासिक पार्श्वभूमी वैभवशाली असताना सद्यस्थितीत त्यांना अनेक प्रश्नाना सामोरे का जावे लागत आहे, प्रस्थापित समाजव्यवस्थाने त्याच्यावर अमानुषपणे का अत्याचार केलेला आहे. त्याच्या न्याय हक्कासाठी कोणतीही रचना का कार्यन्वीत होऊ शकत नाही. विशेषतः संरक्षित न्यायव्यवस्था निर्माण करुन समता समानता निर्माण करणे हे सरकारचे काम आहे त्या देशातील सरकार अपयशी व कुंचकामी का ठरावे असे अनेक प्रश्न निर्माण करुन त्याच्या सर्वांगीण विकासासाठी उपाययोजना सुचविलेल्या आहे.**

**Thorat Sukhadeo, New Man S Katherine (2007),** Caste and Economic Discrimination: (Causes, Consequences and Remedies, published by: Economic and Political Weekly (October 13, 2007) pp 4121-4124). **जात आणि आर्थिक विषमता या संदर्भात हा लेख भाष्य करतो. भारतीय समाज व्यवस्थेत जात मानसिकतेने विषमतावादी बिज रोपण करण्याचे काम केलेले आहे. कार्यप्रणाली ही जातवार विभागणीद्वारे रुजविले गेली आहे आणि संस्कृती अधिक भक्कम करण्यासाठी अनेक संस्थाद्वारे कामकाज राबविले जात आहे. आर्थिक असमानता निर्माण करणारी ही व्यवस्था नष्ट करण्यासाठी जातीच्या मर्मावर हल्ला केला पाहिजे आणि त्याकरिता शैक्षणिक प्रगती होणे आवश्यक आहे त्यातून आर्थिक उन्नतीचे दारे खुले होतील व सामाजिक समता प्रस्थापित होईल यासाठी नियोजन बद्ध पद्धतीने काम करणे आवश्यक आहे. आर्थिक उन्नतीचे स्त्रोत विशिष्ट गटाने एकत्रित केलेली आहेत त्याचे केंद्रिकरण करण्यासाठी सरकारने नियोजन आखणे गरजेचे आहे.**

**Sukhadeo Thorat (2005),** Reservation and Efficiency Myth and Reality : (Published by Economic and Political Weekly (Feb. 26, 2005) pp. 807-810). **सदर लेखात आरक्षणाची दक्षता आणि वास्तवता पुराण या संदर्भात मांडणी केलेली आहे. या लेखाच्या माध्यमातून खाजगी क्षेत्रात आरक्षणाची मागणी करण्यात आलेली आहे. विषमतावादी समाजसंरचनेतून समतावादी समाजसंरचना प्रस्थापित करण्यासाठी व वंचित दुर्लक्षित घटकांना न्यायदेण्यासाठी ही मागणी लेखकाला रास्त वाटते आहे. मुक्त बाजारु अर्थव्यवस्थेत प्रस्थापित घटकांनाच वाव मिळतो वंचित घटकांना न्याय मिळत नाही म्हणून खाजगी क्षेत्रात आरक्षणाची आवश्यकता आहे असे यातून निर्देशास येते.**

**Gopal Guru (2014),** Understanding Violence against Dalits in Marathwada (Source: Economic and Political Weekly, Vol. 29, No.9 (Feb. 9, 2014) pp. 469-472). **सदर लेखात महाराष्ट्रातील मराठवाडा या प्रादेशिक भागातील हिंसाचारावर भाष्य करणारा आहे. एका प्रस्थापित समाजाने विशेषतः मराठा समाजाने मराठवाडा विद्यापीठच्या नामांतरांच्या मागणीदरम्यान अमानुश हिंसाचार व अत्याचार घडवून आलेली विशेषतः परभणी, नांदेड, बीड उस्मानाबाद या जिल्ह्यात दलितांवर मोठ्याप्रमाणात अत्याचार सत्र चालू होते. त्याला कारण ही सर्वसाधारणच होते ते म्हणजे मराठवाडा विद्यापीठाला डॉ.**

बाबासाहेब आंबेडकराचे नाव देण्याची मागणी झाली आणि त्यानंतर तीव्र मोठ्या प्रमाणात अत्याचार घडवून आणलेली होती, त्याचा आढावा यात घेतलेला आहे. शेवटी या विद्यापीठाचा नामांतराचा प्रश्न मार्गी लावून नामांतराऐवजी नामविस्तार केला पण त्याकरिता अनेकाचे अमानुष बळी दिले हे एक वास्तव या घटनेच्या माध्यमातून पुढे येते.

**Thorat Amit (2010),** Ethnicity, Caste and Religion Implications for Poverty Outcomes, (Source: Economic and Political Weekly, Vol. XLV, No.51 (Dec. 18, 2010) (pp. 47-53). लेखकाने भारतीय वंश, जात, धर्म यांचा सहसंबंध दारिद्र्याशी कशाप्रकारे सलग्नीत झालेला आहे याचा अभ्यास विश्लेषण मांडलेले आहे. भारतीय समाजव्यवस्थेते विषमतावादी बिज पेरण्याचे काम जात, धर्म वंशाने केलेले आहे असे मत मांडतात. उत्पन्नाचे साधन धर्माने, जातीने बहाल केली जातात. त्यामुळे बहुजन समाज बहुताश हा दारिद्र्य आणि धर्मव्यवस्था, सामाजिक गट, जात आणि वंश या अनुषंगाने मांडणी केलेली आहे. भारतीय समाज रचना ही आर्थिक विषमतावादी का बनली गेली यांचे उत्तर वंश, जात, धर्म ही वैशिष्ट्ये लेखकाने दिलेले आहे.

**Srinivas M. N. (1955),** Caste Can They Exit in India of Tomorrow, (Source: The Economic Weekly, (Oct.. 15, 1955) pp. 1230-1232). लेखकाने जात मानसिकता कशाप्रकारे काम करते या प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे. जात विरहित समाजाच्या निर्मितीसाठी कोणत्या भूमिका घेणे आवश्यक आहे. जाती व्यवस्थेच्या निर्मुलनासाठी मोठी चळवळ निर्माण करून जनमानसात जनजागृती व मानवतावाद विचारश्रेणी प्रसार करणे अत्यंत आवश्यक आहे अशा भूमिकेतून लेखक पुढे म्हणतात आरक्षण हे प्रतिनिधित्व आहे. वंचित घटकांना समान न्याय देण्यासाठी दिलेली संधी आहे. समतामूलक समाजाच्या निर्मितीसाठी आजही आरक्षणाची गरज तीव्रतेने जाणवते. आरक्षणाची सार्वजनिक क्षेत्रात योग्य पद्धतीने अमंलबजावणी झालेली दिसून येत नाही म्हणून आजही आरक्षणाची आवश्यकता आहे. दारिद्र्य बेगारी निर्मुलनासाठी अपुरे प्रयत्न हे सरकारचे मोठे अपयश आहे. या लेखात भारतातील मागील चार दशकातील जात मानसिकतेवर प्रकाश टाकला आहे. जात

विरहित समाज विकासाच्या संधी निर्माण करून देशाला विकसित करु शकतो अशा विचार यात मांडला आहे.

**Kamat A. R. (1981),** Education and Social Change amongst the Scheduled Castes and Scheduled Tribes, (Source: Economic and Political Weekly, (August 1, 1981) pp. 1279-1283). सदर लेखात अनुसूचित जातीच्या शैक्षणिक प्रगतीवर प्रकाश टाकला आहे. शैक्षणिक प्रगतीमुळे सामाजिक बदल कशाप्रकारे झालेला आहे. संघटित व असंघटित समाज व्यवस्थेत या समुहाची विभागणी झालेली आहे शिक्षित समाज संघटित झालेला दिसून येतो तर अशिक्षित अशाा बहुसंख्य समाज आजही असंघटीत आहे. संघटित समाजाने शिक्षणाद्वारे प्रगती करुन नविन विकासाचे मार्ग निर्माण केले. मात्र असंघटित समाजात शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी आणि त्यातही प्राथमिक शिक्षण घेतलेल्या समुहाचा मोठा अभाव आहे, हे कारण त्याच्या प्रगतीतील मोठा अडथळा आहे. हिंदू समाज व्यवस्थेत अनुसूचित जाती–जमातीना असमानतेचा वागणूक देण्यात आलेली आहे त्यात काही प्रमाणात बदल हा शैक्षणिक प्रगतिमुळे झालेला आहे. मात्र अपेक्षित बदल झालेला दिसून येत नाही. मूळात हा लेख अस्पृश्यता, जात विषमता आणि त्यातून समाजात निर्माण झालेले परिणाम याचा अभ्यास केलेला आहे.

**सम्यक विद्रोही**, भटके विमुक्त : साहित्य, संस्कृती आणि समकालीन समाजवास्तव, मासिक (जून–जुलै २०१३) या त्रैमासिकात भारतातील भटके विमुक्ताच्या जाती–जमातींचा अभ्यास केला आहे. भटक्या जमातींचा अभ्यास करणाऱ्यांमध्ये सर हेन्रीमन, मोल्सवर्ध, एम. केनेडी, सिमरॉक्स, आर. इ. इंथोवेन यांचा उल्लेख करता येतो. भारतीयांमध्ये लोकहितवादी, त्रि. ना. अत्रे, गो. मं. कालेलकर, य. दि. फडके आणि अलिकडे रामनाथ चव्हाण यांचा उल्लेख केलेला आहे. जातीव्यवस्था, गावगाडा आणि भटक्या जमाती, भटक्या विमुक्तांची चळवळ, भटके विमुक्तांचे उत्पादन व्यवस्थेतील स्थान इ. विषयांवरील लेखांच्या माध्यमातून भटक्याच्या प्रश्नावर प्रकाश टाकला आहे. (सम्यक विद्रोही, भटके विमुक्त : साहित्य, संस्कृती आणि समकालीन समाजवास्तव, मासिक (जून–जुलै २०१३)

**चव्हाण पृथ्वीराज** (मार्च २०१३ लोकराज्य), 'दुर्बल घटकांच्या हितरक्षणाची घटनात्मक' समाजातील दुर्बल घटक विशेषतः अनुसूचित जाती–जमाती यांच्या सामाजिक आर्थिक शैक्षणिक हिताचे संरक्षण करणे आणि सर्व प्रकारच्या शोषणापासून त्यांचे संरक्षण करणे ही शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे. आपल्या देशातील जाती आधारित समाजरचनेने फार मोठे नुकसान केले आहे. सुरुवातीला व्यवसायावर आधारित अशी ही व्यवस्था कालांतराने जन्मावर आधारित झाली आणि प्रत्येकाला जात चिकटली ती कायमचीच या व्यवस्थेने समाजात एक उतरंड निर्माण केली. या अनिष्ठ प्रथेचे समुळ निर्मूलन करण्यासाठी अनेक महारपुरुषाने कार्य केले आहे. या अनिष्ठ प्रथेमुळे निर्माण झालेली सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विषमता दूर करण्याचे प्रयत्न शासन, प्रशासन सामाजिक समतेच्या माध्यमातून कार्य करते. लोककल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी घटनात्मक कर्तव्य व जबाबदारीच्या माध्यमातून राज्यघटनेच्या कलम ४६ मधील तरतूदीनुसार समाजातील दुर्बलतेवर वर्ग, विशेषतः अनुसूचित जाती आणि जमाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक आणि आर्थिक हितसंवर्धन करणे सामाजिक अन्याय व सर्व प्रकारच्या शोषणांपासून संरक्षण करणे हे प्रत्येक घटक राज्याचे कर्तव्य ठरविण्यात आले आहे. यासाठी विविध प्रकारच्या योजना राबवून त्याची प्रभावी अंमलबजावनी आणि अर्थातच त्यासाठी पुरेशा निधी दिला जात आहे. महाराष्ट्रात सामाजिक न्यायाची संकल्पना खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात आली आहे. सामाजिक न्यायाचा अर्थसंकल्प प्रत्यक्षात आला आहे. (लोकराज्य– प्रकाशन–माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मार्च २०१३ पृ. ०६)

**लोकराज्य (मार्च २०१३)** 'सामाजिक न्याय विशेषांक' : समाजातील दुर्बल घटक–विशेषतः अनुसूचित जाती–जमाती यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक हितांचे संरक्षण करणे सर्व प्रकारच्या शोषणापासून त्यांचे संरक्षण करणे ही शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे. यासाठी विविध प्रकारच्या योजना राबवून त्यांची प्रभावी अंमलंबजावणी आणि त्यासाठी पुरेसी निधीची पुर्तता यातून सामाजिक न्यायाची संकल्पना वास्तवात आणण्यासाठी महाराष्ट्र शासन तत्पर आहे. सक्षम आणि समर्थ समाजाच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र राज्य पुरोगामी विचारधारा घेऊन समाजातील दुर्बल घटकांच्या विकासासाठी कार्यरत आहे. सामाजिक न्याय विभागामार्फत शैक्षणिक सामाजिक व आर्थिक स्तर उंचविण्यासाठी अनेक योजना राबविण्यात येत आहेत.

दुर्बल घटक अधिक स्वावलंबी व अधिक स्वाभिमानी व्हावे यादृष्टीने प्रयत्न आहे. अनुसूचित जाती व मागासवर्गीय समाजाच्या वंचित घटकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सामाजिक न्याय समर्थ आहे. सामाजिक न्यायाचे सामर्थ्य अधिक सक्षम विविध ११७ योजना मार्फत करण्याचा सार्थ प्रयत्न चालू आहे. सामाजिक न्याय विभागासाठी ३००० कोटी रुपयाची तरतूद दर आर्थिक वर्षाला करण्यात येत आहे. यात अनेक योजनाची निर्मिती करुन सर्वसामान्य अनुसूचित जाती जमाती समुहापर्यंत पोहचण्यासाठी हा सामाजिक न्यायाचा विशेषांक महत्त्वाचा ठरतो आहे. (लोकराज्य– मार्च २०१३, सामाजिक न्याय विशेषांक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन)

**दलित आदिवासी अधिकार आंदोलन (२०१६)** : अनुसूचित जाती आणि जमातीसाठी असणाऱ्या योजनांना संविधानिक दर्जा देणारा कायदा करावा या मागणीसाठी पुण्यातील विधान भवनासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. दलित आदिवासींसाठी असणाऱ्या योजनांसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात तरतदुरी होणे आवश्यक आहे. सातत्याने अनुसूचित जाती व जमातीसाठी असणाऱ्या अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये सातत्याने कपात करण्यात आली आहे. त्यामुळे अनुसूचित जाती जमाती योजनांना संविधानिक दर्जा मिळणे गरजेचे आहे. त्यासाठी कायदा होणे आवश्यक आहे. १९ फेब्रुवारी २०१६ रोजी अर्थसंकल्पात दलित आदिवासीच्या योजनांसाठी ७५,७६१ रुपयाचा अनुशेष निर्माण झालेला आहे तो भरुन काढण्यात यावा. दलित आदिवासीसाठी असणाऱ्या योजना पैकी ५०% टक्के योजना दलित आदिवासी महिलांच्या विकासासाठी राखीव करण्यात याव्यात त्याचबरोबर तरतूद करण्यात आलेल्या रक्कमेचा वापर इतर कोणत्याही विभागाच्या योजनांसाठी करण्यात येवू नये नियोजन आयोगाच्या निकषानुसार अर्थसंकल्पात दलित आदिवासीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतूद होणे गरजेचे आहे. त्यासाठी कायदा होणे आवश्यक आहे. सरकारने मागील तीन वर्षात २,१७,१६० रुपये नाकारले आहेत.( दै. सकाळ, १५ मे २०१६)

**२.२.५ शासकीय अहवाल :–**

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २००० मध्ये या सहस्त्रकातील विकासाची लक्ष्य घोषित केली आहेत. या घोषणापत्रात असे नमूद केले आहे की, जगातील आदिवासी हे जागतिक आर्थिक

विकासाच्या प्रक्रियेत व व्यूहरचनेत समाविष्ट नाहीत. ते विकासापासून अलिप्त व वंचित आहेत. या सहस्त्रकातील विकास लक्ष्यांमध्ये आदिवासी लोकांना समाविष्ट करून घेण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने पुढील मुद्दे विचारात घेतले आहेत.

१. राष्ट्रीय अर्थव्यवस्था आणि संस्था शेवटच्या आदिवासी माणसाला जास्तीत जास्त फायदा मिळवूण देण्याचा प्रयत्न करतील.
२. आदिवासी लोकांसाठीची सहस्त्रकातील लक्ष्ये/ध्येये साध्य करण्यासाठी हक्क–आधारित दृष्टीकोण व चांगले शासन हे घटक महत्वाचे आहेत.
३. सहस्त्रकातील विकासाची लक्ष्ये गाठण्यासाठी आदिवासी लोकांना चर्चा, मूल्यमापन आणि व्यूहरचना यात समाविष्ट केले जाईल.

**संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेली या सहस्त्रकातील विकास लक्ष्ये–**

१. अति दारिद्र आणि कुपोषणाचे निर्मुलन करणे.
२. वैश्विक प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करणे.
३. स्त्री–पुरुष समानता आणि महिलांचे सबलीकरण करणे.
४. बालमृत्यू दर कमी करणे.
५. मातृत्व आरोग्यात सुधारणा करणे.
६. पर्यावरणाचे चिरस्थायी संरक्षण करणे.
७. विकासाची जागतिक मैत्री विकसित करणे.

वरील लक्ष्ये इ.स. २०१५ पर्यंत साध्य करावयाची आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर आदिवासी विकास या विषयावर उपलब्ध साहित्याचा परामर्श घेतला असता असे दिसते की, संयुक्त राष्ट्रसंघाने सुध्दा या विषयाकडे गांभिर्याने लक्ष दिलेले आहे.

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी जमातींच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक संशोधनाचे प्रमुख कार्य **आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे** या संस्थेमार्फत केले जाते. ही संस्था आदिवासी संशोधन पत्रिका प्रकाशित करते व त्यामध्ये संशोधित माहिती प्रकाशित

केली जाते. तसेच या संस्थेमार्फत बेंच मार्क सर्व्हे केले जातात. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेतर्फे करण्यात आलेल्या संशोधनांचा संदर्भ आवश्यक तेथे देण्यात आलेला आहे.

**स्टार्ट कमिटी** (१९२२) वसाहतींच्या व्यवस्थानातील सुधारणांसाठी मि.ओ.एच.बी.स्टार्ट यांच्या नेतृत्वाखाली स्टार्ट कमिटीची नियुक्ती करण्यात आली. मि. स्टार्ट हे स्वतः वसाहत–अधिकारी होते. त्यामुळे त्यांना गुन्हेगार जमातींच्या प्रश्नांची योग्य ती जाण व त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणूकीची तळमळ होती. स्टार्ट हे मानवतावादी अधिकारी असल्याने या जमातींकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून ते पाहत होते. त्यामुळे वसाहतीतील जमातींचे त्यांना पुरेसे सहकार्य मिळत होते.

**इदाते भि. रा., विमुक्त जाती व भटक्या जमाती अभ्यास व संशोधन समिती**, अहवाल–खंड १, महाराष्ट्र शासन, समाजकल्याण विभाग, जानेवारी १९९९ या अहलात भटके व विमुक्तांची लोकसंख्या, भटके व विमुक्तांचे सर्वेक्षण, शासकीय विकास कामे आणि शासकीय सेवांमधील अनुशेष, अन्याय–अत्याचार घटनांची नोंद वस्त्या, तांडे व पालांना भेटी देऊन सर्व्हेक्षण करण्यात आले आहे. भटके व विमुक्त जाती जमातींसाठी महाराष्ट्र शासनात स्वतंत्र विभाग निर्माण करावा, भटके व विमुक्तांची स्वतंत्र जनगणना करावी, जातीचे दाखले देण्याचे निकष, गायरान व अन्य शासकीय जमिनीचे हस्तांतरण, विद्यावेतन व शिष्यवृत्ती, बालवाड्या, आश्रमशाळा, क्रिडा व कौशल्य प्रशिक्षण, वसंतराव नाईक भटके व विमुक्त आर्थिक विकास महामंडळाला भाग भांडवल, उद्योगपूर्व प्राणी अनुदान, उद्योजकता प्रशिक्षण इ. बाबींच्या शिफारशी या अहवालात शासनाला करण्यात आल्या आहेत.

**गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे** या संस्थेने राज्यपातळीवर अनेक संशोधन प्रकल्प केलेले आहेत. या संस्थेतर्फे १९६४–६५ मध्ये हरसूल (नाशिक जिल्हा) विकास गटातील आदिवासी गावांची कर्जबाजारीपणासंबंधी पाहणी करण्यात आलेली होती. त्याचे प्रमुख निष्कर्ष– हरसूल विकास गटात एकूण १२ आदिवासी गावे आहेत. या विकास गटातील एकूण १२ गावांमध्ये १८० शेतकरी व १०९ शेतमजूर कुटुंबे आहेत. हरसूल विकास गटातील १८० शेतकरी कुटुंबांपैकी १५४ (८५.५ टक्के) कुटुंबे व १०९ शेतमजूर कुटुंबापैकी ६४ (५८.७

टक्के) कुटुंबे कर्जबाजारी आहेत. १५४ शेतकरी कुटुंबांत एकूण ७२,६५६ रूपये व १५,१२९ किलो धान्य एवढे कर्ज असल्याचे आढळून आले. ६४ शेतमजूर कुटुंबांत एकूण २९०४ रूपये व ३५४९ किलो धान्य एवढे कर्ज असल्याचे आढळून आले. शेतकरी कुटुंबांत सरासरी ४७१.७९ रूपये व ९८.२४ किलो धान्य व शेतमजूर कुटुंबांत सरासरी ४५.३१ रूपये ५५.४५ किलो धान्य एवढे कर्ज होते. शेतकरी कुटुंबांनी रोख रक्कमेत घेतलेले कर्जशेती व त्या संबंधित बाबी, किराणा माल, खावटी, घरगुती खर्च, लग्न, कपडे, कर्जफेड इत्यादी कारणांसाठी घेतलेले होते. धान्याच्या स्वरूपात घेतलेले कर्ज खावटी म्हणून व बी–बियाणांसाठी घेतलेले होते. शेतकऱ्यांनी रोख स्वरूपात घेतलेले कर्ज सरकारी संस्था ५५ टक्के, सहकारी संस्था १२ टक्के व सावकार, दुकानदार आणि व्यापारी ३३ टक्के याप्रमाणे होते. शेतमजूर कुटुंबांनी किराणामाल, कपडे, लग्न, खावटी आणि इतर घरगुती खर्च या कारणांसाठी कर्ज घेतलेले होते. शेतमजूर कुटुंबांनी रोख स्वरूपातील ८१ टक्के कर्ज सावकारांकडून व उर्वरित इतर संस्थांकडून घेतलेले होते. धान्याच्या स्वरूपात घेतलेले कर्ज खावटी म्हणून घेतलेले होते.

**यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी** (यशदा), पुणे या संस्थेमार्फत आदिवासी जमातींसंबंधी काही संशोधन प्रकल्प पूर्ण करण्यात आलेले आहेत. मेळघाट मधील आदिवासींच्या कुपोषणा संदर्भात या संस्थेने मोठा प्रमाणात संशोधन केलेले आहे. कुपोषणा संदर्भातील प्रमुख निष्कर्ष– मेळघाटात १९९१ ते २००४ या काळात कुपोषणामुळे ८६२४ इतके बालमृत्यु झालेले आहेत. कुपोषणाचे सौम्य (सरासरी वजनाच्या ७५ ते ९० टक्के वजन), मध्यम (सरासरी वजनाच्या ६० ते ७४ टक्के वजन) व तिव्र (सरासरी वजनाच्या ६० टक्क्यांपेक्षा कमी वजन) असे तीन प्रकार आहेत. मेळघाटात ९० टक्क्यांपेक्षा अधिक लोक दारिद्ररेषेखाली जीवन जगतात. निरक्षरता, अंधश्रद्धा, रूढी व परंपरा, दारिद्र, बेकारी, अल्पवयीन विवाह, रोगराई, निकृष्ट आहार, आरोग्य सुविधांची अनुपलब्धता ही कुपोषणाची प्रमुख कारणे आहेत.

महाराष्ट्र राज्य सरकार, आदिवासी विकास विभाग यांच्यातर्फे वार्षिक आदिवासी उपयोजना हा संशोधित वार्षिक अहवाल प्रसिध्द केला जातो. सरकारी वार्षिक अहवाल, **बेंच मार्क सर्व्हे** (टी.आर.टी.आय.), आदिवासी संशोधन पत्रिका, विविध संस्थांचे संशोधन प्रकल्प, तसेच हाकारा, आदिवासी महासंघ वार्ता, समाज प्रबोधन पत्रिका, अर्थसंवाद, सुगावा इ.

मासिके व त्रैमासिके त्याचप्रमाणे महाराष्ट्र टाईम्स, सकाळ व लोकसत्ता या दैनिकांतील आदिवासींवरील संशोधित लेख इत्यादी वरील सर्वांचे चिकित्सक वाचन करून अवलोकन केलेले आहे.

**टाटा सामाजिक विज्ञान संस्था**, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद मार्फत महाराष्ट्र शासनाकरीता इ.स.२००६ मध्ये '**Pardhi Rehabilitation Study**' या विषयावर अहवाल तयार करण्यात आला आहे. या अभ्यासामध्ये उस्मानाबाद जिल्ह्यातील ढोकी या गावाची निवड करण्यात आली होती. या अहवालामध्ये पारधी कुटुंबांचे सर्व बाबींचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. पारधी कुटुंबाचे पुनर्वसन करण्यासाठी हा अहवाल तयार करण्यात आलेला असून पारध्यांच्या पुनर्वसनासाठी या अहवालामध्ये महत्त्वाच्या शिफारशी सूचविलेल्या आहेत. (१) प्रत्येक कुटूंबाला कमीत कमी ४ एकर जिरायत किंवा २ एकर बागायत जमीन उपलब्ध करून द्यावी. आदिवासी स्वाभिमान व सबलीकरण योजनेअंतर्गत कोणत्याही व्यक्तीच्या नावे शेतजमीन नसल्यास अशा कुटूंबाला २ एकर बागायती किंवा ४ एकर जिरायती जमीन देण्याची तरतुद आहे. (२) जमिनीच्या मशागतीसाठी रोजगार हमी योजनेतून किमान तीन वर्षे या कुटूंबाला स्वतःच्या जमिनीवर काम करण्यासाठी मजुरी उपलब्ध करून द्यावी. या जमिनीवर पाणलोट विकासाच्या सर्व योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी. (३) शासनाच्या वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून शेतीची अवजारे, विहीर, वेगवेगळ्या प्रकारची बियाणे आणि खतांची मदत करण्यात यावी. (४) शेतीबरोबरच इतर संलग्न उद्योगधंद्यांची जोड द्यावी. यामध्ये शेळीपालन व दुग्धव्यवसाय या दोन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात यावी.

**आदिवासी महिलांची स्थिती मूल्यमापन अहवाल** (२००६) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या अहवालात आदिवासी समाजात स्त्रियांचे प्रमाण साधारणतः ५०% आहे असे दर्शविण्यात आले आहे. आदिवासी समाजात स्त्री ही मातृत्वाची भूमिका पार पाडते. आदिवासी महिलांची प्रगल्भता, जाणकारी, साक्षरता इतर महिलांपेक्षा कमी आहे. महिलांच्या सहभागाशिवाय कुटुंबास पूर्णत्व प्राप्त होत नाही. आदिवासी महिलांची साक्षरता आणि जाणकारी इत्यादी बाबी कमी प्रमाणात आहे. विकास प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग महत्त्वाचा आहे. या अहवालात आदिवासींचा सामाजिक दर्जा, सामाजिक प्रबोधनाची गरज, महिलांच्या

शिक्षणाची आवश्यकता, शैक्षणिक स्थिती, शिक्षणाची इच्छा व ओढ निर्माण होण्यासाठी दृक श्राव्य माध्यमाचा वापर मोठ्या प्रमाणात करणे, मुलींना शिष्यवृत्ती देण्याची योजना अधिक प्रभावीपणे राबविणे, आरोग्य विषयक स्तर, कुटुंब नियोजनाची योग्य माहिती, मातृत्व योजना, आदिवासी युवक युवतींना मार्गदर्शन, फिरत्या माहिती प्रसारण गटामार्फत योजनांचा प्रसार करणे, राजकीय स्थिती, पंचायत (अनुसूचित क्षेत्रास विस्तारीत) कायदा, १९९६ यांची माहिती अनुसूचित क्षेत्रातील प्रत्येक ग्रामसभेतील आदिवासी महिलांना विशेष मोहिमांद्वारे करून देण्यास भर देणे याबाबींचा उल्लेख या अहवालात करण्यात आला आहे.

**थाडे समितीचा अहवाल** (१९६०) या अहवालामध्ये भटक्या–विमुक्तीचा जाती–निहाय व जिल्हानिहाय आकडेवारी दिली आहे. यात कैकाडी, ठेलारी व ओतारी यांची लोकसंख्या दिली नाही.

**पारधी गणना व विकास प्रारूप आराखडा**, अहमदनगर या अहवालात उमाकांत दांगट, भाप्रसे, जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी २००६ साली तयार केलेल्या पारधी विकास आराखडा तयार केला आहे. या आरखड्यामध्ये पारधी समाजाची ओळख, १९७१ च्या जनगणनेची पार्श्वभूमी, अहमदनगर जिल्ह्याची तालुकानिहाय अनुसूचित जाती–जमातींची लोकसंख्या व त्यामध्ये पारधी लोकसंख्या, पारधी म्हणजे कोण व त्यांच्यामध्ये असणाऱ्या विविध पोट–भेद, पारध्यांची कुळे, बोलीभाषा, देवदेवता, उत्सव, गुन्हेगारी विषयक माहिती, तालुकानिहाय शिक्षण, शैक्षणिक समस्या याबाबींवर भाष्य केले आहे.

**माने लक्ष्मण, (१९९७) विमुक्तायन, महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : एक चिकित्सक अभ्यास**, हा अभ्यास यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईमार्फत प्रकाशित करण्यात आला आहे. या अभ्यासामध्ये विमुक्त जमातींचा सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहास, विमुक्त जमातींचे विस्थापन, पारधी जमातीची जात–पंचायत, गुन्हेगार जमाती कायद्याची वाटचाल, महाराष्ट्रातील विमुक्त जमातींची सामाजिक व आर्थिक स्थिती इ. बाबींचे विस्तृत अभ्यास करण्यात आला आहे. (लक्ष्मण माने, विमुक्तायन, महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : एक चिकित्सक अभ्यास, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, प्रथम आवृत्ती–१९९७)

**मांडे प्रभाकर, (१९८३) गावगाड्याबाहेर** या पुस्तकामध्ये भटक्या जमातींच्या जीवनपद्धतीचे वर्णन करण्यात आले आहे. गावगाड्यामध्ये भटक्यांच्या गावाबाहेरील वस्त्या, पाल, जातीव्यवस्था, रूढी–परंपराचा उहापोह करून सामाजिक समस्यांचा लेखकाने मांडल्या आहेत. (डॉ. प्रभाकर मांडे, गावगाड्याबाहेर, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती–१९८३)

**भागवत विद्युत, (२००९) स्त्री प्रश्नाची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने** या पुस्तकात लेखिकेने महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास लिंगभाव परिप्रेक्ष्यातून स्त्रियांची स्थिती, स्त्रीमुक्तीचा प्रश्न, स्त्री–पुरुष नात्याविषयीचे विचार, विधवा पुनर्विवाह, लैंगिकतेचा प्रश्न, स्त्रीशिक्षण इ. विषयांचे विवेचन लेखिकेने केले आहे. (विद्युत भागवत, स्त्री प्रश्नाची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने, प्रतिमा प्रकाशन, पुणे द्वितीय आवृत्ती–२००९)

**चव्हाण प्रवीण, (२०११) प्रारंभीचे स्त्रीवाद : संदर्भ साहित्याचा वेध,** या पुस्तकामध्ये लेखकाने स्त्रिया काय आहेत, त्यांचे सकारात्मक गुण काय आहेत, त्यांच्या स्वतःसाठी काय चांगले आहे, याची स्त्रियांना संपूर्ण माहिती झाली पाहिजे. स्त्रियांची शारीरता, त्यांचे नैतिक सौंदर्य यासह त्या काय आत्मसात करून शकतात. स्वतःच्या बौद्धिकतेच्या आधारे काय मिळवू शकतात, स्त्रीलिंगी म्हणून त्यांच्याकडे दुय्यमतेने न पाहता प्रबळतेने विचार व्हावा यासाठी लेखकाने स्त्री प्रश्नांवर प्रकाश टाकला आहे. (प्रवीण चव्हाण, प्रारंभीचे स्त्रीवाद : संदर्भ साहित्याचा वेध, क्रातिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, आवृत्ती–२०११)

**देहाडराय स्वाती, तांबे अनघा (२००९) स्त्रियांच्या चळवळी आणि संघटना,** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या लिंगभाव अभ्यासक्रमासाठी वापरण्यात येणाऱ्या पुस्तकात स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील स्त्री चळवळी, स्वातंत्र्योत्तर भारतीतील स्त्री चळवळी, समकालीन भारतातील स्त्री चळवळ : १९९० नंतरचा प्रवास या बाबींचा उहापोह लेखिकांनी केला आहे.

**महाराष्ट्र शासन (२०१०–११) :** Various Schemes Implemented for the Welfare of Backward Classes for the years 2010-11 (Publication- Social Justice

and Special Assistance Department (Social Justice) Government of Maharashtra. **अनुसूचित जाती-जमाती, भटके, विमुक्त इतर मागासवर्ग व अन्य मागासवर्गीच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास योजनांच्या आर्थिक तरतूदीचा आढावा अहवाल आणि योजनांचा तपशिल या पुस्तिकेत घेण्यात आलेला आहे. प्रामुख्याने शैक्षणिक, आर्थिक गृहबांधणी इतर योजनाच्या वार्षिक आर्थिक तरतूद कोणत्या घटकासाठी वापरण्यात आली. त्यासंदर्भात विस्तृत माहिती देवून कोणता योजनांसाठी किती तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचे निकष कोणती, या योजना लाभ घेण्यासाठीचे निकषांची पूर्तता कशापद्धतीने पूर्ण करणे आवश्यक आहे. या योजनेचे लाभ लाभधारक कशापद्धतीने घेऊ शकतो व कोणत्या कार्यालयामार्फत या योजनांची अमंलबजावणी करण्यात येते. त्यासंदर्भातील अनुदान, किती टक्केवारी पर्यंत देण्यात येते. गृहबांधणीसाठी आवश्यक घटक त्यासंदर्भात आर्थिक तरतूद या पद्धतीने ही पुस्तिका माहिती वजा देते. माहिती मागील वर्षातील आर्थिक तरतूद कशापद्धतीने केलेली आहे यासंदर्भात विस्तृत माहिती ही देते. त्याचबरोबर जनजागृती करते. सर्व सामान्याना व प्रशासकीय अधिकाऱ्यांना व संशोधकांना ही माहितीवजा पुस्तिका उपयुक्त ठरते.**

### **२.२.६ भटक्या-विमुक्त जमातींवरील साहित्य**

**१९६० ते १९७० या दशकात भटक्या-विमुक्त जमातींच्या जीवनाचे वास्तववादी चित्रण करणाऱ्या भटक्या-विमुक्तांच्या जीवनावर आधारित कादंबऱ्यांचा उदय ही याच काळात झाला. याला अपवाद 'बळी' (विभावरी शिरूरकर) ही कादंबरी होय. कारण ही कादंबरी १९५० साली लिहिलेली आहे. 'बारी' (रणजित देसाई), 'माकडीचा माळ'-१९६३ (अण्णाभाऊ साठे), 'वस्ती'-१९७५ (महादेव मोरे), 'कातळ' (१९७९) आणि 'वाघीण' (देवदत्त पाटील) इत्यादी कादंबऱ्या १९६० नंतरच लिहिलेल्या आहेत. असे असले तरी वरील सर्व कादंबरीलेखन भटक्या-विमुक्त जमातीतेर लेखकांनी केलेले आहे. खऱ्या अर्थाने भटक्या-विमुक्त लेखकांनी १९९० नंतरच स्वतःच्या जीवनवास्तवाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. सरदार जाधव- 'कोयता' (प्र.आ.१९९४, द्वि.आ.२००८), नागनाथ पाटील- 'लम्बाडी' (प्र.आ. मार्च १९९५, द्वि.आ.- २३ एप्रिल २००९), लक्ष्मण गायकवाड- 'वडार वेदना' (प्र.आ. १ डिसेंबर २०००, द्वि.आ. २००४), दादासाहेब मोरे- 'अंधाराचे वारसदार' (प्र.आ. ऑगस्ट २००१),**

लक्ष्मण गायकवाड– 'वकिल्या पारधी' (प्र.आ. ऑक्टो. २००२, द्वि.आ. ऑगस्ट २००६), लक्ष्मण गायकवाड– 'उठाव' (प्र.आ. २५ जून २००५, द्वि.आ. १५ जुलै २००९), रामचंद्र नलावडे– 'लाडी' (प्र.आ. २६ जाने. २००७), रावजी राठोड– 'गोठण' (प्र.आ. १ मे २००७), अशोक पवार– 'इळनमाळ' (प्र.आ. नोव्हें. २००८, द्वि.आ. २०११), प्रकाश जाधव– 'तिम्मा' (प्र.आ. २६ ऑगस्ट २००९), रामचंद्र नलावडे– 'प्रहार' (प्र.आ. २००९), अशोक पवार– 'दर कोस दर मुक्काम' (प्र.आ. १५ जाने. २०१०) इत्यादी कादंबऱ्यांचा समावेश होतो. एकूणच विभावरी शिरूरकर यांची 'बळी' (१९५०) ही कादंबरी भटक्या–विमुक्त लेखकांच्या कादंबरीच्या उद्‌गमावरील एक महत्त्वाची व वाङ्मयीनदृष्ट्या सजग असणारी कादंबरी मानावी लागते.

**सारांश :**

पारधी समाजाच्या अनुषंगाने साहित्याचे सिंहावलोकन करण्यात आलेले आहे. यामध्ये मागासघटक, आदिवासी तसेच पारधी समाजाच्या अनुषंगाने ग्रंथ, पीएच.डी., एम.फिल. संशोधन, नियतकालिके, लेख, मासिके व शासकीय अहवाल यांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

*****

# प्रकरण तिसरे
# संशोधन पद्धती


३.१ प्रस्तावना

३.२ इतिहास लेखन शास्त्र

३.३ इतिहासाची व्याप्ती

३.४ संशोधन विषयाची व्याप्ती/गरज

३.५ संशोधन प्रश्न

३.६ संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये

३.७ संशोधन पद्धती

३.७.१ नमुना निवड

३.७.२ प्राथमिक तथ्य संकलन

३.७.२ दुय्यम तथ्य संकलन

३.८ संशोधन अभ्यासाच्या मर्यादा

३.९ संशोधन अभ्यासाची नैतिकता

३.१० प्रकरणांची रचना

सारांश

# प्रकरण तिसरे
# संशोधन पद्धती

## ३.१ प्रस्तावना

भटक्या जमातींची जीवनप्रणाली ही आदिवासी आणि आदिम जमातींच्या जीवनपद्धतीशी सदृश्य असल्याने अशा भटक्या जमातींचा समावेश आदिवासी जमातींमध्ये करण्यात आलेला असल्याने भटक्या जाती–जमातींचा उगम त्यामध्ये प्रकर्षाने पारधी जमातींचा उगम, त्यांचे भौगोलिक स्थान व स्थानंतरणाचा इतिहास, इतिहास काळापासून सध्या परिस्थितीपर्यंतची लोकसंख्येचा आढावा, मुख्यतः जेव्हापासून जनगणना सुरू करण्यात आली तेव्हापासून शासनाने निर्माण केलेले संवर्ग (घटक–उपघटक) त्यामध्ये पारधी समाजचे स्थान, जन्मदर, मृत्युदर, लिंग गुणोत्तर, कुटुंबव्यवस्थेच्या निर्मितीचा इतिहास, जीवनप्रणालीचा इतिहास, जीवनप्रणालीचा इतिहास, पारधी जमातीचे समाजातील भिन्न घटकांशी असलेले परस्परसंबंध, पारधी जमातीची सामाजिक जडण–घडण व त्या अनुषंगाने उपलब्ध असलेल्या साहित्याचा आढावा त्यामध्ये एम.फिल., पीएच.डी. अहवाल पुस्तके व लेख नियतकालिके व मासिके, शासकीय अहवाल यांचा समावेश केलेला आहे. संशोधन पद्धतीमध्ये इतिहास लेखनशास्त्र, विषयाची व्याप्ती, गरज, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितके, संशोधन पद्धती, नमुना निवड, तथ्य संकलनाच्या पद्धती या बाबींवर सविस्तर विवेचन करण्यात आले आहे.

## ३.२ इतिहास लेखन शास्त्र

सामाजिक शास्त्रांचा अभ्यास करतांना असा प्रश्न नेहमी उपस्थित केला जातो. मानवी जीवनाचा व त्याच्या अवती भोवती असलेल्या संघटना, समाज, याचा अभ्यास करणारे इतिहास हे एक सामाजिकशास्त्र आहे. मानवाने राजकीय राज्यकारभारविषयक, लष्करी, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक वैज्ञानिक व तांत्रिक अशा सर्व क्षेत्रात जी काही प्रगती केली तिचा शुद्ध निरपेक्ष बुद्धीने अभ्यास करून सांगितलेली सत्यकथा म्हणजे इतिहास हे नामवंत इतिहासकार राजवाडे यांनी इतिहासासंबंधी त्यांची मांडलेली भूमिका होती.

इतिहास मानवी जीवनाचा, मनुष्याच्या विविध कृत्यांचा त्याच्या भौतिक प्रगतीचा संबंध येतो शिवाय गतकाळातील मानवी जीवनाचा त्याच्याशी निकटचा संबंध असल्याने पुन्हा काही मर्यादा अडचणी आल्यात असे जरी असले तरी आज इतिहास हा विषय अत्यंत प्रगत असे शास्त्र बनले आहे यात शंका नाही. इतिहासकारांचा मूळ हेतू म्हणजे पुराव्याचा योग्य, यथार्थ अर्थ लावून नेमके त्या काळी काय घडले हे जर सत्य जनतेसमोर सांगावयाचे असले तर इतिहास त्याही अर्थाने शास्त्रच आहे यात शंका नाही. अनेक वेळा असे देखील झाले आहे की इतिहासकारास इतिहासचे लिखाण करतांना मानवशास्त्रीय, आर्थिक, सामाजिक अशा विविध घटनांचा/घटकांचा विचार अन्वयार्थ लावतांना करावा लागतो असे करणे म्हणजे घडून गेलेल्या गोष्टींचा परिचय इतिहासातून समाजपर्यंत नेणे तसे करणे आवश्यक ठरते कारण त्या शिवाय घडून गेलेल्या घटनेचे मर्मस्थान त्याचे त्यावेळचे महत्व किंवा त्या मागची भूमिका कळणे शक्य होते. नुसत्या घटनांची साखळी मांडून त्यातून काही अर्थ काढणे अवघड बनते.

फ्रॅन्सिस बेकन यांच्या मते– 'मानवाला शहाणी बनविणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास होय.' माणसाला अवतीभोवती पूर्वी काय घडले होते त्याची माहिती मिळविण्यासाठी इतिहासाचे अध्ययन आवश्यक आहे. हेन्री जॉन्सन यांच्या मते– 'इतिहास म्हणजे जे घडले जसे घडले ते जसेच्या तसे सांगणे.' टॉइन्बी ह्या सुप्रसिद्ध इंग्रज इतिहासकार अर्नाड टॉइन्बी याने जगातील सर्व संस्कृत्यांचा अभ्यास करून इतिहासाची व्याख्या अशी केली आहे की, ''मानवी संस्कृतीचा उदय व ऱ्हास म्हणजे इतिहास'' इतिहास म्हणजे दुसरे काही नसून संस्कृतीचा उदय व त्यांचा कालानुरूप होणारा ऱ्हास ह्याचा एक मोठा पट इतिहास निर्माण करते म्हणजे इतिहास संस्कृती असणे आवश्यक आहे.

इतिहासात प्रामुख्याने तीन गोष्टींवर भर देण्यात आला आहे.

(१) भूतकाळात होऊन गेलेल्या घटनांतून सत्यशोधन केले गेले पाहिजे.

(२) घटना जशा घडल्या त्या तशाच स्वरूपात वर्तमानकाळात मांडता आल्या पाहिजे.

(३) ज्ञात असलेल्या घटनांचा अन्वयार्थ लावून त्याचे यथायोग्य स्पष्टीकरण केले पाहिजे व समाजाला कळेल अशा स्वरूपात हा इतिहास लिहिला गेला पहिजे.

सर्व इतिहास हा समकालीन इतिहास असतो (All History is contemporary history) इतिहासाचे स्वरूपाबद्दल वरील विधान बेनेटो क्रोसे याचे आहे. त्याच्या मते इतिहास हा भूतकाळ, वर्तमानकाळ भविष्यकाळ यांच्याशी जोडलेला आहे. यामुळे गतकाळातील घटना देखील समकालीन आहे की काय याचा संभ्रम आपल्याला होता. कॉलिंगवुड यांनी क्रोसे यांचे म्हणणे हे योग्य आहे असे सांगून इतिहास म्हणजे दुसरे तिसरे काही नसून गतकाळातील घडून गेलेल्या गोष्टी वर्तमानकाळात सांगणे असे म्हटले आहे. या गोष्टीमुळे खरोखर इतिहासाचे स्वरूप हे सर्वार्थाने सर्व इतिहास हा समकालीन स्वरूपाचाच असतो हे म्हणणे बरोबर आहे.

## ३.३ इतिहासाची व्याप्ती :–

इतिहास या विषयाची व्याप्ती ही विविध कालानुरूप सातत्याने बदलती राहिली आहे. आधुनिक कालखंडात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, मानसशास्त्रीय अशा असंख्य सामाजिक शास्त्रांचा जन्म झाला प्रत्येक सामाजिकशास्त्र आपली महत्त्वाची भूमिका आपआपल्या चौकटीप्रमाणे पार पाडत आहे आणि आपला विषय हा इतर विषयांप्रमाणेच महत्त्वाचा आहे असे सातत्याने सांगत आहे. इतिहास या विषयाच्या संदर्भात अशी गोष्ट घडली आहे की त्याची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणात असून त्याचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. त्याची शिकवण सर्वच दृष्टीने जीवनाला उपयुक्त आहे. कारण मानवी जीवनात घडून गेलेल्या गोष्टी व त्याचे होणारे परिणाम हे फार मोठे आहेत. इतिहासाचे अध्ययन भविष्यकाळात निर्णय घेताना नेहमीच उपयुक्त ठरले आहेत. काळाच्या ओघात इतिहासाची व्याप्ती वाढली असून हकीकत सांगणे, ही हकीगत कशी घडली ते सांगणे शिवाय हकीगतीचे बौद्धिकदृष्ट्या विश्लेषण करणे व त्याच्यावर आधारित भविष्यकाळासाठी काही अनुमान तयार करणे असे खरे आता इतिहासाचे स्वरूप बनत चालले आहे म्हणून त्याची व्याप्ती वाढीस लागली आहे.

इतिहासाच्या बदलत्या व्याप्तीसाठी इतिहास लेखनशास्त्र देखील तेवढेच जबाबदार मानले पाहिजे. कारण ऐकोणिसाव्या शतकापर्यंत इतिहासाचे अध्ययन हे केवळ राजकीय घटना, प्रसंग यांच्याशी निगडीत होते. पण सध्या इतिहासाचा विचार करतांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, नैतिक, साहित्यविषयक, गोष्टींचा आपण विचार करतो, कारण इतिहासात आपण

मानवाच्या प्रगतीचा विचार करतो तेव्हा वरील विषयांचा विचार करणे केवळ अपरिहार्य ठरते. अनेक इतिहासकाराचा आवडता विषय म्हणून राजकीय इतिहास ही शाखा विशेष करून ओळखली जाते. राजकीय इतिहास या शाखेत प्रामुख्याने गतकाळातील राजकीय स्थिती, राजा, राजपद, राजकीय व्यवहार, राजकीय संबंध, राजकीय संघटना, पक्ष इ. गोष्टींचा अगदी प्राचीन कालखंडपासून विचार केला जातो. इतिहासात सामाजिक इतिहास ही अलिकडे विकसित होत असलेली एक नवी शाखा आहे. या इतिहासात प्रामुख्याने लोकांचे सामाजिक जीवन, सामाजिक व्यवहार, सामाजिक संघटना, समाजाच्या धार्मिक संकल्पना, विचार, सामाजिक नीतीमूल्ये, वागण्याच्या पद्धती, भोजन पद्धती, कपडे, अलंकार, कला इ. या सर्वातून निर्माण झालेली एक विशिष्ट जीवनपद्धती याचा प्रामुख्याने विचार केला जातो. सामाजिक बदल, सामाजिक प्रेरणा, सामाजिक अभिसरण, सामाजिक संघटनांचे समाजावर होणारे परिणाम, संस्कार इ. चा विचार केला जातो. इतिहासाच्या अंतर्गत दूसरी एक महत्त्वाची शाखा म्हणून आर्थिक इतिहास म्हणून ओळखली जाते. या शाखेचा उदय १९ व्या शतकात झालेला आहे. प्रामुख्याने व्यापारवादाच्या निर्मितीनंतर आर्थिक इतिहासात मोठ्या प्रमाणात संशोधन सुरु झाले. ॲडम स्मिथ याने 'वेल्थ ऑफ नेशन्स' या नावाचा ग्रंथ लिहून आर्थिक इतिहासाची सुरुवात केली. माँटेस्क्यू या नामवंत विचारवंतावर या ग्रंथाचा मोठा प्रभाव होता. त्याने व्यापार, व्यापारी संबंध यांचा संस्कृती तथा सभ्यता व मानवाची सर्व सामान्य प्रगती याच्याशी परस्पर संबंध लावून त्याचा सखोल अभ्यास केला. प्रा. कॉमेजर यांनी सांस्कृतिक इतिहासाची एक वेगळी शाखा वेगळी असल्याचे सांगितले आहे. सांस्कृतिक इतिहासाची संकल्पना ही नवी नाही. मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर घडवून आणलेली प्रगती व त्याचबरोबर मानवी बुद्धिमतेचा झालेला विकास म्हणजे सांस्कृतिक इतिहास असे स्थूलमानाने म्हणता येईल. मानवी संस्कृतीच्या संवर्धनाचा विचार सांस्कृतिक इतिहासात केला जातो. धार्मिक इतिहास म्हणजे केवळ धर्माचा इतिहास असे नाही. उदा. रोमच्या धर्मसंस्थेचा इतिहास पहात असतांना धर्म विचाराबरोबर त्यात तत्कालीन राजकारण, समाजकारण, अर्थकारण, समाजातील रूढी आणि परंपरा यांचा विचार करणे अपरिहार्य बनते. धार्मिक इतिहासात धर्मभावनेचा विचार प्रधान मानला जातो. आज आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण यात धार्मिक घटकाला नाही म्हटले तरी स्थान आहे ते नाकारता येत नाही.

धर्मशास्त्राचा इतिहास हा धर्मामध्ये घडलेली अनेक स्थित्यंतरे, धर्मावर सामाजिक/आर्थिक पर्यावरणाचा झालेला परिणाम अथवा प्रभाव आपण चांगल्या पद्धतीने पाहू शकतो. त्याचबरोबर सर्व धर्मातील धर्मसुधारकांनी केलेल्या धर्मातील सुधारणाचा आढावा आपल्याला चांगल्या पद्धतीने घेता येतो. स्थानिक इतिहास ही एक महत्त्वाची शाखा आहे. सुक्ष्मलक्षी स्वरूपाचा इतिहास यामध्ये प्रामुख्याने अभ्यासला जातो. अनेक वेळा आपण जगाचा देशाचा किंवा आपल्या खंडाचा, शेजारील देशांच्या इतिहासाचा अभ्यास करतो. पण आपल्याला आपल्या गावाचा, शहराचा किंवा आजुबाजूचा इतिहास ठाऊक नसतो. तो इतिहास आपल्याला माहित असणे आवश्यक असते अगदी साधी गोष्ट आपल्या गावातील प्राचीन मंदिरे, जुने वाडे, नदीचे घाट, डोंगर, किल्ले, लेणी याबाबत आपल्याला खरोखर माहिती नसते. कोणी त्याबद्दल विचारले तर त्याचा इतिहास सांगत येत नाही, कालखंड सांगता येत नाही. म्हणून आपल्याला भागाचा इतिहास शोधण्याच्या दृष्टीने स्थानिक इतिहास हा महत्त्वाचा ठरतो. युरोपमध्ये फ्रान्स, इंग्लंड, नेदरलँड इ. भागात १८ व्या शतकात स्थानिक इतिहासाच्या अध्ययनाला संशोधनाला मोठे महत्त्व प्राप्त झाले. स्थानिक इतिहास हा देशाच्या/राष्ट्राच्या इतिहासाचाच एक भाग आहे हे विसरता कामा नये. स्थानिक इतिहासात सांस्कृतिक, राजकीय चळवळी, सामाजिक चळवळी, आर्थिक बाबी, धार्मिक बाबी यांचा समावेश होतो. स्थानिक इतिहासाच्या अध्ययनामुळे व संशोधनामुळे राष्ट्राच्या/देशाच्या इतिहासात फार मोलाची भर पडते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. सदर प्रबंधात या इतिहास लेखनाच्या प्रवाहाचा वापर करून प्रबंध पूर्ण करण्यात आला आहे.

### ३.४ संशोधन विषयाची व्याप्ती/गरज

भारतातील नव्हे तर संपूर्ण जगातील अस्तित्वात असलेल्या गटांचा (जात, धर्म, लिंग, पंथ) ह्याचे स्वरूप कालानुरूप सातत्याने बदलत राहिलेले आहे. आधुनिक कालखंडात पारधी समाज व त्यांच्या महिलांच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक व मानसशास्त्रीय विषयांच्या संदर्भात बऱ्याच गोष्टी घडल्या आहेत. त्याची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणात असून त्याचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. कारण पारधी समाजाच्या महिलांच्या जीवनात घडून गेलल्या गोष्टी व त्याचे होणारे परिणाम व त्यांच्या परिणामाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

काळाच्या ओघात पारधी समाजाच्या इतिहासाची व्याप्ती वाढली आहे. ती/त्याची हकिकत कधी घडली याचे बौद्धिकदृष्ट्या विश्लेषण करणे व त्याच्यावर आधारित भविष्यकाळासाठी काही अनुमान तयार करणे. इतिहासात आपणास पारधी समाजाच्या प्रगतीचा विचार हा राजकिय घटना प्रसंग यांच्याशी संबंध न लावता, सध्याच्या वर्तमानात सामाजिक, आर्थिक, राजकीय, नैतिक, साहित्यविषयक, गोष्टींचा येथे विचार करणे गरजेचे आहे. कारण कोणत्याही समुहाच्या प्रगतीचा विचार करताना वरील विषयांचा विचार करणे अपरिहार्य ठरते.

इतिहासाच्या अध्ययनामुळे आजच्या काळातील जागतिक घडामोडींचे मर्मही सहजपणे उलगडते. जिज्ञासा म्हणजे नवे ज्ञान प्राप्त करण्याची तीव्र इच्छा, ह्या जिज्ञसेपोटी पारधी समाजाचे पूर्वज कसे राहत होते. त्यांची जीवनपद्धती काय होती हे जाणून घेण्याची जिज्ञासा संशोधकाला आहे. सबाल्र्टन या संज्ञेच्या विचार करण्याच्या तत्वाप्रमाणे एका वैशिष्टयपूर्ण वैचारिक धारणेतून आजवर दुर्लक्षित राहिलेल्या विषयांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये दुर्लक्षित असलेल्या पारधी समाज वस्त्यामध्ये महिला अतिदुर्लक्षित आहेत. महिलांच्या मागासलेपणाबाबत आणि त्यांच्या विकासाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी इ.स.१९४७ ते २०१० या कालावधीतील पारधी समाजातील महिलांचा विविध अंगाने अभ्यास करण्यात आलेला आहे.

राजवाडे यांनी इतिहास ह्या सामाजिक शास्त्राबद्दलचे जे मत मांडलेले आहे तीच भूमिका संशोधक विद्यार्थ्यांची आहे. त्यामधून पारधी समाजाच्या स्त्रीयांच्या राजकिय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक वैज्ञानिक व तांत्रिक अशा सर्वच प्रगतीचा क्षेत्रांमध्ये शुद्ध व निरपेक्ष अभ्यास करून सत्यकथा मांडण्यांचा प्रयास केला आहे. अशा या इतिहास प्रगत शास्त्राच्या मदतीने पारधी समाजाच्या जीवन इतिहास, त्याच्या विविध कृत्यांचा भौतिक प्रगतीचा संबंध त्याच्या गतकाळातील जीवनाचा निकट संबंध ह्या अभ्यासातून संशोधकाने मांडण्यावर भर दिला आहे.

मुळातच हा विषय स्थानिक असल्यामुळे या विषयाची व्याप्ती सुद्धा कमी आहे. त्यामुळे तपशीलवार या विषयाचा अभ्यास करता येईल. या महिलांचा सामाजिक दर्जा, त्यांच्या

चालीरिती, रूढी–परंपरा, विवाहपद्धती, बोलीभाषा, पार्श्वभूमी यांचा अभ्यास प्रबंधात होणार आहे. त्याचप्रमाणे ब्रिटीशांनी केलेल्या सोयी सुविधांमुळे व कायद्यांमुळे त्यांचे उपजिवीकेचे साधन संपले त्यानंतर उपजिविकेसाठी त्यांनी केलेले प्रयत्न व सद्यस्थिती यावर प्रकाश टाकणार आहे. याशिवाय शिक्षण हे त्यांच्या मागासलेपणाचे कारण असून त्यांचा सद्यस्थितीतील शैक्षणिक दर्जा, धार्मिक, राजकीय स्थिती याचा विचार या संशोधन प्रबंधात होणार आहे. या संशोधनात पारधी महिलांचा सद्यस्थिती पर्यंतचा विकास कसा होत गेला, कोणत्या घटकांचा परिणाम त्यांच्या जडणघडणीवर झाला, त्यांचे विश्व, खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाचा त्यांच्या जीवनावर झालेला परिणाम, स्त्री–वादी चळवळ, संघटना यांचा परस्पर संबंध, याची मीमांसा ही या विषयाची व्याप्ती असेल.

## ३.५ संशोधन प्रश्न

१. अहमदनगर जिल्ह्यातील पारधी महिला सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व राजकीयदृष्ट्या उपेक्षित आहेत का याची संशोधनातून पाहणी करणे.

२. पारधी महिलांना शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक स्थितीमुळे विविध समस्यांना सामोरे जावे लागते का याची पाहणी करणे.

३. पारधी महिलांच्या सर्वांगिण विकासामध्ये स्त्री चळवळींचे योगदान आहे का याची पाहणी करणे

४. पारधी समाजाच्या महिलांच्या जीवनमानावर खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणामुळे प्रतिकुल परिणाम झाला आहे का याची पाहणी करणे.

## ३.६ संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये

१. पारधी महिलांचा भारतातील ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२. पारधी महिलांचा सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, व राजकीय सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

३. पारधी महिलांना सद्यस्थितीत भेडसावणाऱ्या सर्वांगिण समस्यांचा अभ्यास करणे.

४. पारधी महिलांच्या अनुषंगाने स्त्री चळवळींच्या योगदानाचा अभ्यास करणे.

५. पारधी समाजातील महिलांच्या जीवनमानावर खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचा झालेला परिणाम अभ्यासणे.

## ३.७ संशोधन पद्धती

नमूद संशोधनासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या संशोधनामध्ये पारधी समाजाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक माहितीचा, साधनांचा व सद्यस्थितीमध्ये उपलब्ध होणाऱ्या तथ्यांचा अभ्यास करून प्रस्थापित प्रमेयाहून भिन्न प्रमेय मांडणे हा उद्देश होता. उपलब्ध साधन सामग्रीचे पुनःनिरीक्षण करून प्रचलित मतांपेक्षा वेगळा निष्कर्ष काढण्याचा या संशोधनाचा प्रयत्न सफल झाला आहे. यात नव्या साधनाच्या शोधाला स्थान दिलेले आहे, विविध नवी सामग्री, नवे पुरावे जे हाती लागले त्यामुळे नवे प्रमेय मांडण्यास पुष्टी मिळाली आहे. ऐतिहासिक माहिती संकलित करण्यासाठी साधारणपणे सर्व्हेक्षण व निरीक्षण पद्धती, मुलाखत पद्धती आणि इतिहास विषयासाठी विशेष महत्त्वाची असलेली टिपणे तयार करण्याच्या पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. तथ्य संकलनामध्ये प्राथमिक व दुय्यम स्त्रोतसाधनांचा वापर करून माहिती संकलित करण्यात आली आहे.

### ३.७.१ नमुना निवड

सदर संशोधन हे अहमदनगर जिल्ह्याशी संबंधीत असल्यामुळे जिल्ह्याबाबतची पारधी समाजाच्या लोकसंख्येशी संबंधित पूर्ण माहिती खालील प्रमाणे–

अहमदनगर जिल्हा लोकसंख्या[१]–

| | |
|---|---|
| एकूण गावे– | १५८८ |
| पारधी गावे | २०७ |
| कुटुंब संख्या | १३३१ |
| व्यक्तींची संख्या | ६९६४ |
| तालुके | १४ |

[१] उमाकांत दांगट, भाप्रसे यांनी २००६ चा अहवाल, पारधी जनगणना व विकास पारूप आराखडा, अहमदनगर

**अहमदनगर जिल्हा पारधी समाज लोकसंख्या**

| जिल्हा लोकसंख्या | दांगट अहवालानुसार | निवड केलेले तालुके | तालुक्याची पारधी लोकसंख्या | नमुना |
|---|---|---|---|---|
| जिल्हा एकूण लोकसंख्या | ४०,४०,६४२ | श्रीगोंदा | २०६६ | – |
| जिल्ह्यातील एकूण गावे | १५८८ | अहमदनगर | १०६९ | – |
| एकूण तालुके/गट | १४ | जामखेड | ९७९ | ६ |
| जिल्ह्यात पारधी समाज असलेले गावे | २०७ | कर्जत | ९५३ | २५ |
| जिल्ह्यात पारधी कुटुंब संख्या | १३३१ | राहता | ६१ | ५ |
| जिल्ह्यात पारधी लोकसंख्या | ६९६४ | राहुरी | १०९ | १२५ |

| क्र. | अभ्यासासाठी निवड केलेला तालुका | पारधी लोकसंख्या | प्रती तालुका गावे | गावनिहाय उत्तरदात्याची निवड | एकूण नमुना |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्रीगोंदा | २०६६ | २ | ५ | १० |
| २. | अहमदनगर | १०६९ | २ | ५ | १० |
| ३. | जामखेड | ९७९ | ५ | ५ | २५ |
| ४. | कर्जत | ९५३ | ५ | ५ | २५ |
| ५. | राहता | ६१ | ५ | ५ | २५ |
| ६. | राहूरी | १०९ | ६ | ५ | ३० |
| | एकूण पारधी गावे | २०७ | २५ | | १२५ |

प्रथमतः संपूर्ण जिल्ह्यांची तालुका निहाय लोकसंख्येचा तपशिलवार अभ्यास करून त्यातील पारधी बहुल लोकसंख्या असलेल्या ६ तालुक्यांची निवड करण्यात आली. नमुना निवड करण्यासाठी खालील निकषांचा अवलंब करण्यात आला आहे.

(१) सर्वाधिक लोकसंख्येचे तालुके

(२) मध्यम लोकसंख्येचा तालुका

(३) सर्वात कमी लोकसंख्येचा तालुका

या निकषांवर प्रत्येकी २ गावे असे ६ तालुके निवड करून त्यातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या गावांची निवड करून त्या गावांमध्ये पारधी समाजातील स्त्रीयांच्या प्रत्यक्षात मुलाखती घेऊन तथ्य संकलन करण्यात आले आहे.

### ३.७.२ प्राथमिक तथ्य संकलन

इतिहास अभ्यासातील तथ्य संकलनाच्या पद्धतीचा विचार करीत असताना प्राथमिक व दुय्यम साधने याचा परिचय करून देणे आवश्यक आहे. प्राथमिक साधनात (१) लिखित (२) अलिखित असे दोन प्रकार आहेत.

सदर संशोधन अहवालाच्या प्राथमिक तथ्य संकलनासाठी पारधी समाजाची माहिती व्यष्ठी अध्ययन, निरिक्षण आणि टिपणे या सांधनांचा वापर करून प्राथमिक तथ्य संकलन करण्यात आले आहे. तथ्य संकलन करण्याकरीता अहमदनगर जिल्ह्यातील राहता, राहूरी, कर्जत, जामखेड, अहमदनगर व श्रीगोंदा या तालुक्यांची निवड करून तथ्य संकलन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त माहिती जमा करण्यावर संशोधकाने भर दिला आहे.

### ३.७.३ दुय्यम तथ्य संकलन

प्रस्तुत संशोधन अभ्यासामध्ये दुय्यम तथ्य संकलन करतांना शासन निर्णय, शासकीय अहवाल, आयोगाचे अहवाल, संशोधन व एम.फिल. अहवाल, लेख, वर्तमानपत्रे इ. द्वारे दुय्यम तथ्य संकलन करण्यात आले आहे.

ज्या विशिष्ट काळाचा इतिहास संशोधक अभ्यास करीत आहे त्या काळातील समकालीन हस्तलिखित पत्रे, गुप्त स्वरूपाची पत्रे, व्यक्तीने व्यक्तीस पाठवलेली अथवा राजकीय गुप्तपत्रे, सांकेतिक भाषेत लिहिलेली अथवा नेहमीच्या भाषेतील. सार्वजनिक महत्त्वाची कागदपत्रे ज्यात प्रामुख्याने तत्कालीन वृत्तपत्रे, आत्मवृत्ते, आत्मचरित्र, फुटकळ पण काही मोजक्या आठवणी संगतवार असलेल्या, सरकारी कागदपत्रे अथवा एखाद्या घटनेच्या संगतवार असलेल्या फाईल्स, राज्यकारभाराची पत्रे, सरकारी व्यावहारिक पत्रे, खाजगी पत्रे, इ. त्यानंतर जमाखर्च, त्याच्या पद्धती, विविध प्रकारच्या प्रश्नावली, धार्मिक सनदा, कागदावर लिहिलेल्या अथवा ताम्रपटावर लिहून दिलेल्या, एखाद्या धार्मिक स्थळासाठी झालेला खर्च, किंवा धार्मिक कार्यासाठी झालेला

सविस्तर खर्च, त्याचा उद्देश वगैरे बद्दलची माहिती सांगणारा कागद, धार्मिक क्षेत्रांना भेट देणाऱ्या राजकीय घराण्यातील राजाच्या कुटुंबातील लोकांच्या पुरोहितांकडील नामावल्यात त्यांचा असलेला उल्लेख, सही किंवा दानपत्र इ. गोष्टींचा या प्राथमिक साधनांमध्ये समावेश होतो.

अलिखित साधनांमध्ये सर्वसामान्यपणे पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या लोककथा, सामान्य वाङ्मय, पुराणवस्तू, दंतकथा, वेगवेगळ्या काळात पाडण्यात आलेली नाणी, वेगवेगळ्या भाषेत लिहिलेले शिलालेख, त्याचबरोबर चित्रे, नकाशे, भौगोलिक स्वरूपाची माहिती इ. त्यानंतर दुय्यम संदर्भ साधने– या दुय्यम स्वरूपाच्या संदर्भ साधनांचा देखील बराच वेळा उपयोग होतो. या साधनांचा सविस्तर परिचय आपण करून घेणार आहोतच, त्यापूर्वी ही साधने कोणती तर (१) बखरी (२) कुलकथा, वंशवेल, महजर, करीने, शकावल्या, पोवाडे, काव्ये, महाकाव्ये, ऐतिहासिक म्हणी, वाङ्मय, इ.[२]

### ३.८ संशोधन अभ्यासाच्या मर्यादा :–

नमूद अभ्यासात फक्त अहमदनगर जिल्ह्यातील पारधी समाजाचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये पारधी समाजातील पोट जमातीमधील महिलांचा विस्तृत करण्यात आलेला नाही. त्यामुळे पारधी समाजातील पोट जातीतील महिलांच्या समस्या सखोल मांडता आलेल्या नाहीत. या अभ्यासात व्यष्ठी अध्ययन पद्धतीचा अवलंब केलेला असल्याने प्राथमिक तथ्य संकलनाद्वारे सामाजिक–आर्थिक सांख्यिकीय माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. अभ्यास क्षेत्रातील महिला या प्रामुख्याने रोजगार व उपजिवीके निमित्त शहरात स्थलांतरीत झाल्यामुळे जुन्या लोकांचा सहभाग कमी प्रमाणात झाला आहे. त्यामुळे त्यांची परंपरागत चालीरिती, रूढी याबद्दलची सखोल माहिती कमी प्रमाणात उपलब्ध झालेली आहे. या समाजातील लोकांना आजून ही साशंकता वाटते. संशयास्पद नजरेने आणि दृष्टिकोनाने ते आपल्याकडे पहातात. खरी माहिती देण्यासाठी थोडी कचरतात. भिती वाटत असल्याने ती माहिती गप्पांच्या ओघात महत्त्वाची निरीक्षणे नोंदविली आहेत.

---

[२] सुहाज राजदेरकर, इतिहास लेखन शास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.३१, ३२

### ३.९ संशोधन अभ्यासाची नैतिकता :–

नमूद अभ्यासाचे प्राथमिक तथ्य संकलन करत असतांना संशोधक अभ्यासकाने अभ्यासातील सहभागीतांना त्यांचे अधिकार अभ्यासातून उपलब्ध होणारे फायदे–तोटे याबद्दल विस्तृत माहिती देवून अभ्यासात सहभागी होण्याकरीता त्यांची सहमती घेऊन तथ्य संकलित करण्यात आलेले आहे. अभ्यास संशोधकाने कुठल्याही प्रकारचे खोटे आश्वासन किंवा प्रलोभन दाखवून तथ्य संकलित केलेले नाही. अभ्यास क्षेत्रातील सर्व सहभागी स्वइच्छेने सहभागी होवून त्यांनी तथ्य संकलन करण्याकरीता अभ्यासकास मदत केलेली आहे.

### ३.१० प्रकरणांची रचना :

**प्रकरण पहिले – संशोधन विषयाची पार्श्वभूमी व ओळख**

प्रस्तुत प्रकरणात पारधी समाजाची ओळख, भौगोलिक स्थान, रूढी–परंपरा, दंतकथा, लोकगीते, पारंपारिक व्यवसाय, सांस्कृतिक जडण–घडण, लोकसंख्या, जन्मदर, मृत्युदर, लिंग गुणोत्तर, शासनाने निर्माण केलेले संवर्ग (घटक–उपघटक) इ. समावेश करण्यात आला आहे. पारधी समाजाच्या महिलांची ऐतिहासिक व पौराणिक पार्श्वभूमी, जाती–जमातींचा स्थान, लोकवस्ती, सामाजिक उतरंडी व त्यांचे स्थान, दंतकथा, इतिहास नोंदी, पौराणिक कथा, शिलालेख, सांकेतिक भाषा व बोलीभाषा, हस्तकला, कलास्थापत्य, शस्त्रे–अस्त्रे, चलन, गुन्हेगार जमात, स्वातंत्र्यापूर्वीची पार्श्वभूमी, स्वातंत्र्यानंतरची स्थिती, इ.स.१८७१ पूर्वीचे ब्रिटिशांचे धोरण, गुन्हेगारी जमाती वसाहतीकरण कायदा १९२४, १९३८ चा क्रिमिनल ॲक्ट मॅन्युअल, मुंबई प्रांतातील गुन्हेगार जमातींच्या नोटिफिकेशनचा इतिहास, स्वातंत्र्यानंतर भारत सरकारचे धोरण : हॅबीच्युअल ऑफेंडर्स ॲक्ट १९५९, महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर भटक्या–विमुक्तीची स्थिती, इतर धर्मांबद्दलची मानसिकता अभ्यासण्यात आली आहे. सांस्कृतिक जडण–घडण व सामाजिक सद्यस्थिती या दृष्टिकोनाचा आढावा घेताना पारध्यांची जीवनशैली, पेहराव, राहणीमान, लोकगिते, रूढी–परंपरा, सण–उत्सव, चालीरीती, प्रथा, व्यवहार नीति, देव–देवता, कुटुंबव्यवस्था, घटकांचे परस्परसंबंध, नातेसंबंध व महिला, सामाजिक उतरंडीत महिलांचे स्थान, सामाजिक जीवन व महिला समस्या, न्यायव्यवस्था (जात पंचायत), पारधी

महिलांवर होणारे अन्याय–अत्याचार, महिलांचा शैक्षणिक दर्जा व स्थान या बाबींचा ऊहापोह करण्यात आला आहे.

समाज सुधारणा चळवळींचा इतिहास, स्त्री चळवळी, पारधी समाजाच्या संघटना, पारधी समाजाच्या महिलांच्या संघटना, संघटनांचे योगदान, पारधी समाजातील महिलांचे सामाजिक अभिसरण, पारधी समाजातील महिलांमधील जनजागृती, भारतातील स्त्रीवादी चळवळी, महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळी व संघटनात्मक बांधणी, पारधी महिलांचा स्त्रीवादी चळवळीमध्ये सहभाग, स्त्री चळवळींचा पारधी महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन या संकल्पनाच अभ्यास करण्यात आला आहे. इ.स.१९७० च्या दशकात महाराष्ट्रभर काही स्त्रीवादी चळवळींनी तसेच विविध संघटनांनी आपले कार्य सुरु केले. पारधी समाजातील महिलांचा आत्तापर्यंत स्त्रीवाद्यांनी विचार केला का? तसेच त्यांच्या जमातीतील काही संघटना या महिलांबाबत कोणती भूमिका मांडतात, अशा सामाजिक संघटनांचा त्यांच्यावर झालेला परिणाम या सर्व घटकांचा अभ्यास केला आहे.

भारतामध्ये गेल्या काही वर्षापासून जागतिकीकरणाची चर्चा सर्वच स्तरातून होत आहे. जागतिकीकरण म्हणजे नेमके काय त्याचे बरे वाईट परिणाम कोणकोणत्या स्वरूपाचे होणार आहेत या बाबीत तर्काधिष्ठीत विवेचन होताना दिसते. विषमतेच्या जातीयतेच्या पायावर उभी असलेल्या समाजव्यवस्थेच्या संदर्भात त्याचे स्वरूप अत्यंत गंभीर आहे. समाज विकासाच्या उपक्रमातून शासन व्यवस्थेने अंग काढून घेतल्याने, उपेक्षित वर्ग अगतिक बनला आहे. यांचे पारंपारिक व्यवसाय कालबाह्य होऊ लागले आहेत. यामुळे या महिलांवर झालेले परिणाम व सद्यस्थितीत त्यांनी स्विकारलेले व्यवसाय, तसेच पारधी महिलांची आर्थिकस्थिती आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शासनाने त्यांच्या विषयी घेतलेली भूमिका, विविध सरकारी योजना व या योजनेमुळे झालेली फलश्रृती व अडचणी यांचा सर्वांगिण अभ्यास या प्रकरणाद्वारे करण्यात आला आहे.

**प्रकरण दुसरे – संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा :**

पारधी समाजाच्या सर्वांगीण साहित्यावर झालेल्या निर्माण झालेल्या साहित्याचा, संशोधनाचा परामर्श या प्रकरणात घेण्यात आला आहे. या संदर्भातील लेखी दस्तऐवज यांचा संशोधनासाठी निवडलेल्या घटकाला न्याय देण्यासाठी संदर्भाचा आढावा घेतला आहे. महाराष्ट्रातील पारधी समाजाच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी एम.फिल., पीएच.डी. अहवाल, पुस्तके व लेख नियतकालिके व मासिके, शासकीय अहवाल असे प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापराद्वारे या संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण तिसरे – संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनामध्ये विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या संशोधनामध्ये पारधी समाजाच्या महिलांच्या अनुषंगाने उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक माहितीचा, ऐतिहासिक साधनांचा व प्राथमिक तथ्य संकलनासाठी व्यष्ठी अध्ययन साधनांचा वापर करण्यात आला आहे. उपलब्ध साधन सामग्रीचे पुन:निरीक्षण करून प्रचलित मतांपेक्षा वेगळा निष्कर्ष काढण्याचा या संशोधनाचा प्रयत्न सफल झाला आहे. नव्या साधनाच्या शोधाला आणि संकल्पनांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. व्यष्ठी अध्ययन व निरीक्षण पद्धतीचा अवलंब करून महत्त्वाची टिपणे तयार करण्यात आली आहेत. तथ्य संकलनामध्ये प्राथमिक व दुय्यम स्त्रोतसाधनांचा वापर करून माहिती संकलित करण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणात पारधी महिलांचा अभ्यास करत असतांना महिला केंद्रीत पारधी समाजाची ओळख, भौगोलिक स्थान, रूढी–परंपरा, पारंपारिक व्यवसाय, सांस्कृतिक जडण–घडण, लोकसंख्या, जन्मदर, मृत्युदर, लिंग गुणोत्तर, शासनाने निर्माण केलेले संवर्ग (घटक–उपघटक) इ. समावेश करण्यात येईल. त्याचबरोबर विषयाच्या अनुषंगाने झालेल्या संशोधनांचे अवलोकन करण्यात येईल. नमूद संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन पद्धतीचा उहापोह या प्रकरणात करण्यात आला आहे.

**प्रकरण चौथे– माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

प्रस्तुत प्रकरणात पारधी महिलांच्या सर्वांगिण विकासासंबंधी प्राथमिक व दुय्यम स्त्रोत व साधनांच्याद्वारे संकलीत केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. ऐतिहासिक माहितीचा, ऐतिहासिक साधनांचा व सद्यस्थितीमध्ये उपलब्ध होणाऱ्या तथ्यांचा अभ्यास करून पारधी समाजाचे वास्तव चित्र संशोधन अहवालाच्या माध्यमातून मांडण्यात आले आहे. ऐतिहासिक माहिती संकलित करण्यासाठी व्यष्ठी अध्ययन, निरीक्षण आणि महत्त्वाची असलेली टिपणे या साधनांचा उपयोग केला आहे. अहमदनगर जिल्ह्यातील पारधी महिलांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, पारधी महिलांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय परिस्थिती तसेच इ.स.१९७० च्या दशकानंतरच्या चळवळींचा आढावा घेण्यात आला आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण याचा महिलांवर झालेला परिणाम आणि पारधी महिलांची आर्थिकस्थितीचा अभ्यास करण्यात आला आहे.

**प्रकरण पाचवे– संशोधनाचा सारांश, निष्कर्ष व शिफारशी :**

या प्रकरणात संशोधनाची सारांशामध्ये व्यष्ठी अध्ययनाद्वारे पारधी समाजातील महिलांच्या सामाजिक समस्या, आरोग्याच्या समस्या, उदरनिर्वाहाच्या समस्या, शासन योजनांचा लाभ घेण्यातील अडथळे, शैक्षणिक समस्यांची मांडणी करण्यात आलेली आहे. पारधी समाजातील महिलांचा सर्वांगीन अभ्यास करतांना प्राथमिक व दुय्यम स्त्रोत व साधनांच्या सहाय्याने संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून निष्कर्ष मांडले आहेत. निष्कर्षाच्या आधारे पारधी समाजाच्या उन्नतीसाठी आणि शासनाने धोरणात्मक उपाययोजना करण्यासाठी शिफारशी सूचविण्यात आल्या आहेत.

**सारांश :–**

प्रस्तुत प्रकरणात ‘अहमदनगर जिल्ह्यातील पारधी समाजातील महिलांचा सर्वांगीण अभ्यास’ (इ.स. १९४७ ते इ.स. २०१०) या विषयाचा अभ्यास करण्यासाठी अवलंबिण्यात आलेल्या संशोधन पद्धती विशद करण्यात आली आहे. ऐतिहासिक संशोधन पद्धतीची संकल्पना स्पष्ट करताना इतिहास लेखन शास्त्र, इतिहासाची व्याप्ती याबाबींचा नमूद करण्यात आल्या

आहेत. त्याचबरोबर संशोधनाची व्याप्ती/गरज, संशोधन प्रश्न, अभ्यासाची उद्दिष्ट्ये, नमुना निवड, प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनाची साधने, संशोधन अभ्यासाच्या मर्यादा व नैतिकता स्पष्ट करण्यात आली आहे.

***

# प्रकरण चौथे
# माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

४.१ तथ्य संकलन

४.१.१ व्यक्तींच्या मुलाखती

४.१.२ समुहाच्या मुलाखती

४.२ तथ्य विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

४.२.१. सामाजिक इतिहास

४.२.२. सामाजिक सद्यस्थिती

४.२.३. सांस्कृतिक इतिहास

४.२.४. आर्थिक पार्श्वभूमी व सद्यस्थिती

४.२.५. राजनैतिक सद्यस्थिती

४.२.६. शैक्षणिक सद्यस्थिती

४.३ व्यष्ठी अध्ययन करतांना उत्तरदात्यांनी सुचविलेल्या सूचना/समस्या

# प्रकरण चौथे
# माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

## ४.१ तथ्य संकलन

''अहमदनगर जिल्ह्यातील पारधी समाजातील महिलांचा सर्वांगीण अभ्यास'' (इ.स. १९४७ ते इ.स. २०१०) या विषयाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने प्राथमिक तथ्य संकलन करण्यासाठी व्यष्ठी अध्ययनाचा वापर केला आहे. अहमदनगर जिल्ह्यामधून व्यक्ती आणि समूहांच्या मुलाखती घेण्यात आल्या खालील तथ्य संकलन करण्यात आले आहे.

### ४.१.१ व्यक्तींच्या मुलाखती–

**व्यष्ठी क्र.१**

उत्तरदात्याचे नाव– ज्योती राज भोसले, वय–३२ शिक्षण–६ वी

ठिकाण– आरणगाव, अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक ०७.०४.२०१७ वेळ– सकाळी ११.३०

सासर माहेर जवळच आहे. आई वडील लोणीत आहे.

हिवरे बाजार मध्ये सासू सासरे होते. फिरतीवर होते. जमिनी भेटल्यामुळे इथे.

**भाषा–** पारधी

**चालीरिती–**

आम्ही चांगल्या जातीचे हाओत, आम्ही फासे पारधी हाओत ते हालके आहेत. ते भिल्ल पारधी हाअेत ते मिक्स आहेत. पारध्यांच्या जाती पाच सहा आहेत देव देव होतात आमच्यात बायकांना देव देव पात्र करून देत नाही. उपास करतो वाटल तर नवचंडी व शिवरात्र हे नेमूण करतो.

ही घर आम्ही स्वतः बांधली आहेत. दोन घरकुलांची आवश्यकता आहे. कागदपत्र समदे आहेत. फक्त दारिद्रय रेषेखाली कार्ड नाही.

कधी कधी बाळांतपण झाल्यावर नोंदी नसायच्या पूर्वी कसल्या नोंदी नव्हत्या. आणि सरकार मागचा पुरावा मागते.

**आरोग्य–**

बऱ्याच वेळा पिशवीचे प्रश्न आहेत.

स्वच्छतेमुळे आरोग्याचे प्रश्न आहेत.

हॉस्पीटलमध्ये कोणत्याही आजाराला एकच गोळ्या देतात. सरकारीमध्ये तर ह्या गोळ्या बघु नच कळत की कोणत्याही दुखण्याला तेच औषध मग आपण बरच होणार नाही.

आमच्या बायका नाही पण दुसऱ्या बायका दारु गांज्या घेतात त्या त्यातच व्यसनी बनतात.

शिक्षणाची सोय नाही. कॅनॉलला पाणी आल्यावर अडचणीच आहे. मुलींचे प्रश्न आहेतच. मुलींचे प्रमाण आमच्यात कमी होत चाललय.

**समस्या–**

पाण्याची सोय नाही.

रस्ता नाही, आमच्याकडे कुणाचच लक्ष नसत.

म्हाताऱ्या माणसांना डोल मिळावा.

आमच्या म्हताऱ्या माणसांना संभाळण्यासाठी आमची परिस्थितीच चांगली नाही.

**व्यक्ती क्र.२**

उत्तरदात्याचे नाव– नटी विलास भोसले, वय–३०, शिक्षण–६ वी

ठिकाण– आरणगाव, अहमदनगर तालुका

मुलाखतीचा दिनांक ०७.०४.२०१७ वेळ– दुपारी २.३०

३ मुली, २ मुल.

**समाजाचा उगम–**

हिंदू फासे पारधी. नगरला रहातो. गावकरी सहकार्य नाही करत. आमचा जन्मच नगरला झाला आहे. पण गावकरी सारख हाकलून काढत्यात. आम्ही म्हणतो जवा लय काय होईल तेव्हा बघता येईल. आम्ही तसच रहातो. कोणला जागा काय कोणाला नाय. आम्ही इकडे कस राहायला आलो अस आमच वडील सांगायच की पहिल इंदीराबाईच्या काळात नसबंदीच्या वेळी आम्हाला जबरदस्तीने मुल होवू नये म्हणून आप्रिशन करायच मग काही वेळा झोपडपट्या दिल्या गेल्या

नंतर त्यांचा परिवार वाढला मग जागा पुरत नव्हती मग आपोआप जागा वाढवावी लागली. पण गावकऱ्यांच सहकार्य अजिबात नाही. आता जागा येवढी मिळाली त्यावर पुरणार हाओ का?

**जातीचा उगम–**

पूर्वी आमची लोक हिंडून, फिरूनच खाचचे, फिरताना हिंडताना कोणता आलाय काम किंवा धंदा मागून खात होते. म्हजी आमच्या आधीच्या लोकांनी मागूनच खाऊन पोट भरत असायची. इंदिराबाईच्या काळात थोड्या थोड्या जागा इंदिराबाईंनी दिली मग आमची लोक स्थिर झाली.

**जीवनमान–**

माझ लग्न झाल होत नवरा लय पेताड बेवडा मग कोण आम्हाला इचारतय. लय हाल व्हायच मारल्या भितीने. मी इकडे चार दिवस तिकड चार दिवस यायची जायची मग मी माहेरीच राहिले.

**बोलीभाषा–**

घरात पारधी, तुमच्या सारख्या बरोबर मराठी

**व्यवसाय–**

हे काय मजूरी करायची पोर भी गवंड्याच्या हाताखाली जातो. पाणी नसल्यामुळ बाकी शेतीची ही काम मिळतच नाय. मग अशीच कामे करत फिरायच. मजूरी पण लय कमी मिळती पण काय करणार. कामच भेटत नाय म्हणल्यावर आहे तेच कराव लागत. लोक काम कधी देतात कधी नाय मग मिळल त्या दिवशी काम करायच म्हंजी चार दिवस काम करायच कुणी मग गावात जावून भाकरी मागूण खात. मागून खाण्याशिवाय पर्यायच नसतो. काय करता. म्हंजी आमची परंपरा तशीच चालू आहे. भागतच नाय तर मग काय करायच. मजूरीचे पैसे लोक बरोबर देतात बर का? पण एखाद्या दिवस उपाशीपण झोपाव लागत. कुणाला सांगता. येवढी परिस्थिती असते आपल्यासाठी दिवस सारखे नसतात. शहरात व्यवसाय करीत नाही. बचत गट नाही आमची लोक कुठ डोक बी घालत नाहीत. मॅडम तुमच्या सारख इचारायला बी कुणी येत नाही.

**चालीरिती–**

आमच्याकडे बाईचे कपडे बाहेरच असतात. आमच्या हातच दुसर कुनीही खात नाही. बाट होत असतो. सगळ्या चालीरिती पाळल्या जातात. पहिल्यापासून रित आल्याने लगिन झाल की बाई माणसाची कपडे बाहेर राहातात.

**धर्मविधी–**

घरात आमच्या तुळजापूरची देवी, काळूबाई ही सगळी देव असतात. आमच्याकड मराठ्यात आहेत ना तेच देव आहेत. पण आमच शास्त्र जरा निराळ हाय. म्हंजी देवस्थानता लय पाळतात देव देवात आमची बाया माणस जात नाय समद गड्यांनीच करायच निवद–बिवद गड्यांनीच करायच. फक्त बाया देवाची गाणी बीनी बोलणार. राती आमची गाणी झाली रातभर गाणी चालू असत्यात. जागच रहाव लागत आता हा देवदेव दोन दिवस चालल आम्ही दोन दिवस जाग रहातो. देवी जागृत होईल अस गाण म्हणायच. देवाला गाण्यातून म्हणायच ये आम्ही येवढा खर्च केला हा परसाद केलाय माणून घे अस म्हणाव लागतं. ते देवस्थान पावन झाल का? बघायच गुढी लावून देवाला विचारल जात ते सगळ पुरुष माणसच करत्यात मग देव सांगतो. पसंद आहे का नाही ते (देव गुढीत सांगतो) ते रात्री आल्यापासून काही जेवण केल. देवाच जेवन कर पुरुष माणसच करतात. बायकांना देव–देव करायला हातावर वाढून घेवून साईडला करायच खायचं.

**आरोग्य–**

शौचालयास बाहेर जातो इथ घरांना रहायची सोय नाही तर शौचाची सोय कुठून होणार. व्यसन नाही. तंबाखूची मिश्री पोरी गुटखा खातात. नवऱ्याला पोलीसांनी कधी नेले नाही पण दारूच लय बगा दारूपायी तो आपली लेकर वळखत नाय. काय करत नाय लय आहरी गेलय. संसाराची फरपट हाय.

**सामाजिक संबंध–**

गावातील लोक आम्हांला सहकार्य करत नाही त्यांनी आमच्याकड कधीच लक्ष दिल नाही रहात्यात ना पारधी जस रहातील तस कधीच लक्ष देत नाहीत. आरे तो रे बोरलात शिव्या बिव्या देतात. पोरांमधी आमची पोरं गेली तर त्यांना हाण–मार करत्यात. आमची परिस्थिती गरीबी असल्यामुळं आम्ही गप्प बसतो.

**जात पंचायत–**

सध्या आम्ही काही आधार घेत नाही. आम्ही आपल पोलीस स्टेशनला जाती जात पंचायत पूर्वीसारख्या राहिल्या नाहीत. ते सगळे आता पैशाच्या माग पळतात. त्यांना गरीब समजाला आणि परिस्थिती पण समज ना. असय त्यामुळे आम्ही आपल आता पोलिस स्टेशनला जातो. हा

जस तू येवढ दे ते येवढ दे आता जे गरीब आहे. त्यांनी काढून द्याच. आपल्या जातवाले असून ते आपल्याला तरी वागवतात म्हणता. आणि जातच नाय जायच तर आपल पोलिस स्टेशनला जायच.

**सामाजिक स्थिती–**

आतापर्यंत आमच्यात कोणी आस पुढ लय आलं नाही. कुठ जायच पण शिक्षानी यानी स्वत:च वाहन नाही. पोलीस त्रास देत नाही. सगळे कष्ट करून खातात त्यामुळ पोलीस फारसा त्रास देत नाहीत. इथ कुणी पाल करून रहात, कुणी असच बाहेर उघड्यावर रहात तर कुणी कसबी घर करूनही रहात अस काय नाय की एकाच परकाटे रहात. सण समारंभ मागूण खातो. गावातील यात्रेलाच जातो. बाकी कुठ नाय. देव देवाला आल तर तिथच न्याय पंचायत कधी एकच टाईम करायच, आसल तर करायच नसल तर मागूण आणायच खायच चपाती भाजी मांसाहार करतो. पशुपालन नाही. काही लोकांकडे आहे. कुटुंबातील व्यवहार कधी पुरुष कधी बाईकड असतो. सर्व कागदपत्रे नाहीत. मतदान करतो. सर्वांना पैसे देतात पण मी पैसे घेत नाही पण त्यांना म्हणते अडी–अडचणींना मदत करा. माझ्या अडचणी सोडवा ते लोक पण आम्हाला कोणती ही जबरदस्ती करत नाहीत. आमी आमच्या मनानी मतदान करतो. बटनावर कळत जुन्या लोकांना असेल तर आपण जायच व जुन्या लोकांच आपण मतदान करायच. त्या लोकांना सांगितल की आपल्या घरातल माणूस मतदान करत. काही जण कार्यकर्त्या आहेत. पण ते पैसे घेतात. खायच्या मागच्या आहेत. त्यांच्या नादी लागण्यापेक्षा आपणच आपल बघायच.

**लग्नविधी–**

आमच्या बायकांवर बलात्कार होतो. काही वेळा डाव घालून आपण कधी असतो नसतो अशा पोरींवर बलात्कार होतात. पारध्यांच्या पारध्यांमध्ये दुष्मणीमुळ बी अस करतात. त्यांना कधी नात गोत सुद्धा बघत नाही. बाहेरच असल तर आम्ही पोलीस स्टेशनला जातो आणि आमच्यातल आमच्यात असल तर जातीतल्या जातीत संभाळतो. आल खुशीन तर लग्न करून द्यायच नाहीतर संभाळायच. म्होतूर तोड–जोड करून करतात. आडाणी लोक हे खूप करतात.

**चालीरिती–**

लग्न लय बारीक वयात करतात. बाळांतपणात पूर्वी हात लावत नव्हते. तिलाच सर्व करायला

लावतात. या  सततच्या बाळांतपणामुळ गुडघ दुखण पोटात पाठीत दुखन चालूच असत. हे चालूच आहे. दवाखान्यात जातो. दवाखान्यात चांगली वागणूक देतात. आपण स्वच्छ रहाण्यावरच असत. आमच्या लोकांत कंटाळा जास्त. मागूण खायावर जास्त लक्ष्य असत.

**शिक्षण–**

पुढील शिक्षणासाठी मुलींना शिकवण्याची ताकदच नाय. त्यांना शिक्षक लोक चांगले आहेत ते समजून घेतात. शिक्षणाची सोय आहे. पण मुलींना खर्च कोण करणार. कमावत कोणीच नाही.

**संघटना–**

संघटना हाय पण लुबाडणाऱ्या असल्याने आमी जात नाही.

**समस्या–**

घरकुल

जातीचे दाखले

कागदपत्र मिळावी

६० वर्षाचे पुरावे मागितल्यास मिळत नाही.

पोरांना काम लावावीत

**व्यष्ठी क्र.३**

उत्तरदात्याचे नाव–    सुवर्णा चव्हाण, वय– १९ (नटीची मुलगी)

ठिकाण–    आरणगाव, अहमदनगर तालुका

मुलाखतीचा दिनांक    ०७.०४.२०१७    वेळ– दुपारी ४.३०

लग्न करताना विचारल. लग्नानंतर तिकड रहाण्याची सोय नाही. तिकड सर्वजन चांगले आहेत. पण त्यांची सर्व लोक दारू पितात आणि भांडण करतात. मग मला त्रास होतो.

काम बिगारी काम करतात. सासरा ड्रायव्हर आहे. सासू वाचमन आहे.

मला नवऱ्याचा त्रास होतो. सांगता येत नाही बोलतात. घरची भांडण झाल्यावर सासू–सासरे घरी राहून देत नाही. आई त्यावेळी आधार देते. कधी नवरा येतो कधी येत नाही. आल्यावर जायच नाहीतर आईकडच राहायच. (बाकी सर्व माहिती आईने सांगितल्याप्रमाणे)

**समस्या–**

दारु बंदी करावी

**व्यष्ठी क्र.४**

उत्तरदात्याचे नाव– नरशा मेशार चव्हाण, वय– ५५

ठिकाण– आरणगाव, अहमदनगर तालुका

मुलाखतीचा दिनांक ०८.०४.२०१७ वेळ– सकाळी १०.४५

हे बघ बाई मला सोडलेली आहे. माझी फरकात झाली आहे. दोन पोरी आहेत.

आम्हाला जेला मधी नका घालू

मला आजी बाजी माहिती नाही

फरकत म्हणजे सोडचिठ्ठी झाली आहे.

भांडण रोज मला नवरा मारत होता.

मला भाकरी, कालवण येत नव्हत येडी म्हणून मला सोडल. मुलींच लग्न केल

पण एका मुलींचा लग्न झाल पण नवरा हिसकवून घेतला

मागायला जाते तर रुपया नीट देत नाही.

संघटना पुढारी काय करत नाय लोक भांडण करतात. गावचे पुढारी एकही आम्हाला मदत करत नाही.

जागा नाही म्हणतात पैसे घरकुल मंजूर करतात पण जागा नाही म्हणून तसच ठेवतात.

देवदेव कधीच केला नाही माझ्याकडे पुरुष माणूसच नाही मग कशाला करायचा देवदेव

बाकी सर्व लोक त्रास देतात. घाण घाण शिव्या देतात. वागणूक वाईट देतात.

आमचे लोक पण शिव्या देतात.

आम्हाल घर नाही. पावसाळ्यात ताडपत्री घेवून झोपतो. घर नाही. काय नाही

अंतरजातीय विवाह होत नाही

कपड्यांना हात लावत नाहीत. ज्याच त्यानी

वयस्कर झाल्यावर मुली करतात ते सुना करत नाही.

पशु, पक्षी नाही

कागदपत्रे आहेत

व्यसन– तंबाखू, गुटखा, मिस्त्री

मतदान करतो, कळत, आश्वासन घेतो आणि मतदान करतो.

आरोग्याचे प्रश्न आहेत गुडघे दुखतात

**समस्या–**

घरे, गॅस, शेती

परितक्त्या महिलांचा प्रश्न सोडवावा

**व्यष्ठी क्र.५**

उत्तरदात्याचे नाव– चांदणी जाकेरा काळे, वय– २०

ठिकाण– खडकी, अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक ०९.०४.२०१७ वेळ– सकाळी ११.३०

ताई माझं लग्न झाल की नाई, मला लय त्रास हाय. घरची लोकांचा मला त्रास हाय. घरची लोक मला त्रास देतात. नणंदा पण त्रास द्यायच्या.

हिथ बसली ना तिची बहिणीनी ने भांडण काढली.

त्यात दुसर लग्न केल. एक मुलगा व दुसरी मुलगी आहे. आता अगोदर हाअे.

ही मुलाखत घेताना तिची बहिण म्हटल की दुसऱ्या बाईची आणि तिची भांडणे सुरु झाली.

मुलाखत घेणे शक्य नाही.

भांडणे सुरु झाली. जोर जोराणे.

**व्यष्ठी क्र.६**

उत्तरदात्याचे नाव– सविता संजय काळे, वय– १९ शिक्षण प्रथम वर्ष कला

ठिकाण– खडकी, अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक ०९.०४.२०१७ वेळ– दुपारी ०१.३०

**जातीचा/समाजाचा उगम–**

आम्ही फासे पारधी जातीचा उगम कसा झाला काय ते सांगत येणार नाही.

दंतकथा माहित नाही. मला येवढी दंतकथा माहित नाही पण येवढ माहिती आहे की शिवाजी महारांजाच्या काळात आमची लोक मावळे म्हणून काम करत होती. सैनिक म्हणून सुद्धा तेव्हा आमच्या जातीचा उपयोग करायचे. येवढेच माहिती आहे.

**कुटुंबव्यवस्था–**

प्रमुख म्हणून आई आहे. ती शिक्षणाचा खर्च करते. लहाण मुलांच दुखण सर्व काही आईच बघते ती लहान असतानाच माझ्या बापानी आईला सोडल. त्यामुळे आईनी मोल मजूरी करून आम्हाला वाढवल. आई विधवा झाली. यामुळे आईनीच पुढे आमचा संभाळ केला. मॅडम आता भांडणे झाली ना. ती माझी आत्याच होती. त्यांच घर बसवण्यासाठी आमच्या आईला सोडून दिल मग ती विधवा झाली. आमचे लोक असचं वागतात ते अंतर्गत भांडणच लय करतात. आणि असाच गोंधळ लय असतो. आता माझा भाऊ येईन तो तीस वर्षाचा आहे. बाकी सर्व माहिती आमच्या घरातील आईनी तुम्हाला सांगितलीच आहे.

आमच्यात विधवा बायकांची मॅडम दखल कोणी घेत नाही. आता मॅडम माझ लग्न या लोकांनी बोट घालू घालू माझ लग्न लहाणपणी झाल. मी पण नांदत नाही. तिथ पण मला त्रास होता. मला तो समजत पण नव्हत.

माझा खरा प्रॉब्लेम असा आहे की माझ्या आईची आर्थिक परिस्थिती चांगली नाही म्हणून माझे शिक्षण रखडले आहे.

मॅडम स्कॉलरशिप्सचा फॉर्म ऑनलाईन भरता येत नाही. म्हणून माझ शिक्षण थांबलय मी काय करू.

**बोली भाषा–**

पारधी बाहेर मराठी

**महिलांसाठी सरकारणे काय करावे व शिक्षण बंद करण्याची कारणे.**

१. शाळेत शिकवलेले पुरेस कळत नाही मग त्यांना शिक्षक त्यांना माग बसवतात उच्च जातीच्या लोकांना पुढे बसवतात. मग त्यांना काहीच कळत नाही.

२. लहान भावांना संभाळण्यासाठी शिक्षण बंद होते.

३. या भांडणाचा लय वाईट परिणाम आमच्या मनावर होता. मग तीला वाटते की आपण वेळ घालवण्यापेक्षा घरच्यांना त्रास नको, खर्च नको. मग हेच आमच होणार याचीच मानसिकता होवून गेलीये. मी सारडा कॉलेजला आहे. आमच्यासाठी काही तरी करा मॅडम.

**संघटना–**

आमच्या संघटना आहेत पण त्या संघटना आम्हाला काहीही मदत करत नाहीत. आता संघटना उलट आम्हाला त्रास देतात ती आमल्याची (गावाचे नाव) सुनिता भोसले आहे ना तिच्या मुळ माझ एक वर्ष वाया गेल. तिन मला नर्सिंग कोर्सला पाठवल तिथली मॅडम म्हणाली की हिच्या हा कोर्स होणार नाही. कारण मला रक्त बघितल की चक्कर यायची. मग त्या भोसले बाईन तिथलच्या मॅडमना तिथून गाडीत बसवून द्या ती तिच्या पद्धतीने घरी जाईल अस सांगितल म्हणजे आमच्यातली आमच्यात पण अस आहे मॅडम.

त्यात मी कधीच गेले नव्हते. म्हणून मला जमल नाही. हळू हळू आला असताना मला धीट पणा आमची लोक बरीच इथच असतात.

**समस्या/उपाय–**

सरकारने व्यवसनमुक्ती कायद्याने बंद करावी. त्याचा त्रास आमच्या स्त्रियांना अनेक वेळ होता. खूप हाल होते त्याच.

आमच्या स्त्रियांच्या प्रश्नाकडे सरकारने गांभिर्याने पहावे.

**व्यष्ठी क्र.७**

उत्तरदात्याचे नाव– शांताबाई रामा चव्हाण, वय– ८४ वर्षे

ठिकाण– खडकी, आरणगाव, अहमदनगर, ७–८ मुले

मुलाखतीचा दिनांक ०९.०४.२०१७ वेळ– दुपारी ३.१५

आता भांडणे झाली त्या सुना होत्या. मी कशी बशी रहाते. सुना संभाळत नाहीत. त्याच कारण अस की ते म्हणतात आमचं आम्हाला जड झालय तर तुला कुठ संभाळू माझी हालत लय बेकार हाये. हे बघ आता कालच माझा ॲक्सीडेंट झाला. चालता चालता चक्कर आली आणि पडले

त्यामुळे हाताला लागलय. डोक्याला लागलय काय करू... मी चांगले व्हते तेव्हा सगळ्यासाठी केल पण आता कोण नाही कुणाच...

दवाखान्यात जायला पैसे नाहीत, सुना, तुकडा देत नाही. अन्न नाही, पाणी नाही, पैसा नाही. पोर खाताड पिताड आहे. मी त्यांच्यात रहात पण नाही. कुठ बी रहाते. त्यांच्या कड जात पण नाही. मला कोण संभाळायच.

सरकारी दवाखान्यात गेल्यावर गोळ्या घेतल्यावर पोट लय दुखत डोळ्याची ऑपरेशन झालय. पायांनीच चालताच येत नाही. तुमच्या सारख्या माणसांनाच माझी दया आली तर काय बाय देत्यात नाही तर सगळच अवघड असत.

माझी सगळी पोर दारु पितात बघा नाही पिल तर बाकीचे पाजतात. दहा बारा वर्ष झाल आसल नवरा मेला माझा हे सगळ इथच आहे मी इतके वर्ष इंदीरा बाईचा काळात मस पैसे भेटले होते म्हणत्यात पण मधीच खाणाऱ्यांनी खाल्ले आम्हाला काय नाय मिळाल. काय करू सांगा आमचे पारधी सुधरायचेच नाहीत.

चार पिढ्या झाल्या असतील अस चाललय आम्हाला रहायची सोयच नाय.

दाढ काढली लय दुखातय. औषध पाणी काहीच केल नाही.

या माझ्या नातीच हायेत या नातीच मारून मारून अस हाल केलय. लय मारहाण हाअे तिला. काय कराव...

सारख म्हणत्यात सुना, ''काय कमावल तू काय कमावल तू.''

**व्यक्ती क्र.८**

उत्तरदात्याचे नाव– जाली लहाशा भोसले,

ठिकाण– खंडेश्वर टाकळी, अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक ०९.०४.२०१७ वेळ– दुपारी ५.००

मला न्हावरा कोकरेवाडी इथ दिल होत.

घरचे कारण नसताना लय मारहाण करत्यात मारुन मारुन हालत खराब झाली आहे. आमच्या सर्वच असल आहे.

नवऱ्यान पिऊन खाऊन सगळ डोक्स लाल करून टाकलय लय हाणत्यात. कितीबी मारतात. मागूण टुकडे मागायचे आणि पोट भरायचे म्हणून दिल. घरामध्ये कोंडू कोंडू मारतात. लय मारतात लोकच काही बी शिकवत्यात व दारू पाजतात.

आईच संभाळ करते. माझा भाऊ पण पितो माझ्या भावावर सुद्धा माझ्याच आईन सुनंसाठी केस केली आहे. दारु सोडाव म्हणून मला ३ पोर झालीत मी तरी आता काय करू

**व्यक्ती क्र.९**

उत्तरदात्याचे नाव– कांताबाई इश्वनाथ भोसले, वय ६० वर्षे

ठिकाण– खंडेश्वर टाकळी, अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक १०.०४.२०१७ वेळ– सकाळी १०.२०

मला नवरा नाय, गाववाल्यांनी अनेक चोरीच्या आरोपाखाली त्याला पकडून दिल. म्हतारीच लय हाल हायेत.

मला कोणी बघत नाही माझ काही तरी करा. माझी नातीच लय हाल हायेत.

लोकांनी आमच्यावर लय अत्याचार केलाय, आम्हांला येवून फटा फटा मारलय, अस घेतलाय कधी तस त्रास दिलाय.

आमच्या बायकांना लय हाल अपेष्टा भोगाव्या लागतात. सहा सहा महिने पोट भरण्यासाठी कामावर गेल तर पोर सोडून यायच तीकड त्यांच काय का व्हायना. माझ्या सुनंन पर लय कष्ट घेतल. माझा लेक एका हातान अपंग हाये त्यान तर काय करायच माझी सून म्हंजी ती अत्ता बोलली ती सुरेखा राजेंद्र भोसले माझ्या नाती वर बलात्कार झाला तिची आई. ती आता माहेरात आली बहिनीबाळा येत्यात दोन गोष्टी सुखा दुःखाच्या व्हत्यात. म्हणून इकड विसाव्याला आली हाये.

बायका लय दारू पित नाही पण गडी माणस पितात. बायकांना पण लय टेन्शन होत. त्यांनाही त्रास होतो.

**समस्या–**

माझ्या नातांची सरकारनी सोय करावी.

**व्यष्ठी क्र.१०**

उत्तरदात्याचे नाव– अश्विनी रविंद्र काळे, वय २४ वर्षे शिक्षण– टी.वाय.बी.ए.

ठिकाण– खंडेश्वर टाकळी, अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक १०.०४.२०१७ वेळ– दुपारी १२.१५

**जात/समाज उगम**

आम्ही फासे पारधी ३०, ४० वर्ष झाल असेल आम्ही इकडेच रहात आहोत. आमची पहिली लोक फिरीस्ती होते. भटकत असत पोट भरायला म्हण इकडे आले ते कुठून आले ते माहित नाही.

**बोली भाषा–**

घरात पारधी

**नातेसंबंध–**

काळे, चव्हाण, भोसले, शिंदे

**चालीरिती–**

कपडे बाहेर

**देवदेव–**

बोकड इतरांप्रमाणे, वाघजाई आणि काळूबाई देव आहे. अंगात येत महिलांच्या येत नाही. पुरुषांच्या येत. दुसरी माणस आमच्या हातच खात नाही.

**अन्याय–अत्याचार–**

नवऱ्याला विनाकारण पोलिसांनी एका गुन्ह्याखाली आत घेतल मी त्यांना सोडून पण आणल. माझी तीन मुल शिकवत शिकवत मी पण शिकत राहिले. पोलीसांनी दोन दिवस त्यांना ताब्यात ठेवल आणि नंतर सोडून दिल ते पण माझ्याच वर्गात शिकत्यात तरी पण इथल्या मराठ्यांनी आमच्यावर आरोप केला इथ एकदा ते शिकारीला गेले आणि फासा लावला. गावातील सर्व लोक एकत्र आले आणि त्यांनी माझ्या मालकांना मारहाण केली. त्यांना सोडविण्यासाठी माझी खूप फरपट झाली. त्यावेळी मला सासू सासऱ्यांनी मदत केली. आमच्याकडे पूर्वी बालविवाह होता आता नाही. मुलींनी पळून जाऊ नये म्हणून कदाचित बाल विवाह असावा.

**इतर सामाजिक संबंध–**

इतर समाज आमच्याशी चांगला वागतो. पण काही लोक मात्र चांगल वागवत नाहीत. लाईट, पाणी नाही. लोक चांगल वागत नाही आमची जित्राब देखवत नाही. आंतरजातीय विवाह होत नाहीत. आताच आमच्या दिराच्या पोरीवर बौद्ध मुला बरोबर लग्न केल. आम्ही आणखी पण परत गेली ती. सण, समारंभ करत नाही. एकादशी धरतो. पशुपालन बरच आहे त्यावर पोट भरतो.

कागदपत्रे सर्व आहेत.

बचत गट नाही.

शहरात कोणी जात नाही.

राजकीय नेतृत्व नाही.

चळवळींनी आमच्यासाठी काय केल नाही.

**समस्या/अडचणी–**

घर, शेती द्या

पोरांचा शिक्षण खर्च द्यावा

**व्यक्ती क्र.११**

| | | |
|---|---|---|
| उत्तरदात्याचे नाव– | सिंधूताई राजाराम पवार, वय ४८ वर्षे | |
| ठिकाण– | खंडेश्वर टाकळी, अहमदनगर | |
| मुलाखतीचा दिनांक | १०.०४.२०१७ | वेळ– दुपारी ३.१५ |

**जात/समाज उगम–**

फासेपारधी लहानपणी मला कुठ ही आईबाप घेवून फिरत होते हिंडत होते. त्या याच्यात आमच्यावर कोण लक्ष देतय. मग दगडावर पडले मोडला आई बापानी हात अन काय.

आमच्या जन्मापासून इथच आहे माझा तीन हजार देज घेतले.

जात पंचायतीवर जाऊन घटस्फोट होतो.

चारशे पाचशे अंपगाचे पैसे भेटतात पण तेवढ्यात भागत का?

बाळांतपण स्वतःच केल. आपणच आपण करायच

बाकी सर्व मागील माहिती (अश्विनी काळे) प्रमाणे–

**समस्या/अडचणी–**

स्कीम पोहोचत नाही आमच्या पर्यंत देत नाही.

दवाखान्यात चांगली वाणूक दिली जाते.

हे गावच चांगल नाही

मुलांच संगोपण व्यवस्थित नाही.

**व्यष्ठी क्र.१२**

उत्तरदात्याचे नाव– गरमबाई जयराम काळे, वय ६१ वर्षे

ठिकाण– खंडेश्वर टाकळी, अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक १०.०४.२०१७ वेळ– दुपारी ४.२०

हे बघ माझी सून मला सांभाळत नाही. येवढ मोठ घर हाये पण मला काही नाही.

मुलगा तीच्याच हारी गेलाय

(घर स्लॅपचा बंगला आहे)

आम्हाला मदत करत नाही इतर लोक

**उपाययोजना–**

वृद्धाश्रम असाव (महिलांसाठी) खास असावे

डोल द्यायला लावा

**व्यष्ठी क्र.१३**

उत्तरदात्याचे नाव– संध्या जयराम काळे, वय ४५ वर्षे

ठिकाण– खंडेश्वर टाकळी, अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक १०.०४.२०१७ वेळ– दुपारी ५.४५

नवऱ्याने मला सोडली. त्याला दुसर लग्न करायच होत माझ्यावर खोटे आरोप केलेत. मी दुसर लग्न करणार नाही. पहिलयानीच फसवल दुसर कशावरून चांगल निघल. मनात भय उदासिनता

आहे.

**समस्या–**

तीला कुणीच संभाळत नाही

मला काम मिळाव

**व्यष्ठी क्र.१४**

उत्तरदात्याचे नाव– जयराम आंगठ्या काळे,

ठिकाण– खंडेश्वर टाकळी, अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक ११.०४.२०१७ वेळ– सकाळी १०.००

आता बगा पारध्यांनी असे दिवस काढले. समदे पारधी शिकारी होते. त्यात त्याच्या योगाने त्यांनी शिकार आणायचे आणि त्या राजाला द्यायचे त्या राजाच नाव शिलोमन राजा असे होत. तो तिकडला पुण्याचा राजा व्हता. तिथ एक ना आरधा सातशे पारधी होते. मग त्यांनी काय केल त्या राजाच्या नजरत एक गोष्ट येत नव्हती. तिच नाव होत सोने की सवन लाख चिडीया यांना काय वाटल म्हंजी पारध्यांना काय वाटल की राजाला सोने की चिडीया पकडून द्यायची होती त्यासाठी राजान त्यांना भरपूर पैसे दिल सगळ पाहिजे ते दिल अण सांगितल की तुमी सोने की चिडियाच आणून द्या आता किती केल तरी हे अनपढ पारधी हे लय पक्षी यांची शिकार करायचे आणि राजाला दाखवायचे की हीच का ती सोने की चिडीया. अस झाल्यावर पारध्यांना ती काय सापडली नाही मग राजानी सांगितल की समद्या पारध्यांना एकत्र बोलवा. समदे पारधी पोरा बाळा सहीत एकत्र आले फुकस्त एकच बाई तुकड मागायला गेली होती. ती बाई होती गरोदर त्यामुळ तीच एक बाई वाचली नाही तर बाकी पारधी चरक्यात, घाण्यात घातले. आणि पिळून काढले. म्हजी मारुण टाकले. कए नाय त्यान राजान माग ठेवल. मग लहाणाचा मोठा तो त्या गरोदर बाईचा पोरगा झाला. तो जसा लहाणाचा मोठा झाला तसा बाकी पोर त्याला बिनबापाचा म्हणायची अस म्हटल्यावर त्याला राग यायचा नंतर तो त्याच्या आज्याकड गेला म्हणाला बाईच्या बापाकड ते दुसरीकड व्हते म्हणून वाचले त्या आज्याला तो म्हणाला माझा बाप कुठय ते सांगा मग जावा. आता बाप जिवंतच नाय तर काय सांगणार. आता तो एकटाच आजा

रडायचा, आई रडायची नंतर शेवटी तो म्हणला तुम्ही सांगितल तर मी जगणार नाही तर जगणार नाय लय खळीला आला. मग त्यांनी ती घटना सांगितली. त्यांनी सांगितल हे बघ बाबा त्या शिलीमत राजात मोठी जत्रा भरवली बरीच जित्राब मारली जत्रत पारध्यांना पाहिजे ते खायला घातल आणि त्यांनी त्याला सवनलाख सोने की चिडीया मागितली ती काय त्यांना गाव्हली नाय म्हणून त्यांना त्या राजानी चरक्यात घालून मारून टाकल. येवढच त्यांनी ऐकल आणि त्याला देवी प्रसन्न झाली तो म्हणला त्याचा सूड घेतल्या शिवाय मी तीला सोडणार नाही. देवीच म्हणली चल तु माझ्या माग ये मी तुला नेमक कुठ काय हाये ती दावते मग गेला तो राजदरबारात गेला व राजाला जाब विचारला आमची सातशे पारधी तु घाण्यात पिळल कशासाठी? काय कारण राजा म्हणाला तु काय करशील? मग तो पोरगा म्हणाला मी तुझी वस्तू आणून दिली तर तु मला काय देशील तो राजा म्हणाला मी राज्य पण देईल आणि सवताची पोरगी बी देईन पण तो पोरगा म्हणाला मी ती वस्तू आणतो. पण तू मला तुझी संपत्ती नको, पोरगी नको, काय नको तू मी वस्तु आणली तर तुझ शिर दे आणि नाही आणल तर माझ शिर घे. बोलवल सगळ्यांना राजाला म्हणाला ठीक विडा, विडा ठेवला तो उचलला कराकरा खाल्ला व गिळाला व निघाला देव त्याच्या बरोबर एक बारक होती त्यात पऱ्या होत्या त्यांच्याकड ती सवनलाख सोन्याची चिडिया व्हती. तो तिथ गेला देव म्हणाला तुला हे घे त्यांनी ती वस्तू घेतली आणि परत राजवाड्यात गेला तीथ आई, आजा, आलीच व्हती म्हणली बाबा जाऊ दे तु एकुलता एक पण तो म्हणाला तुम्ही गप बसा तो राजाकड आला, म्हणाला बोलीव तुझ्या इतर राजांना लय राजे आले त्याने त्यांना ती वस्तू दाखवली. दाखवल्यावर राजाला म्हणला तू येवढ्यासाठी आमचे पारधी कापले आता तुझी पोरगी नको संपत्ती नको धाडक्यात शिर कापल आणि त्याच्या कपटीवर आईला आंघूळ करायला लावली. तिथपासून त्याचे आम्ही सगळे वंशज झालो. आमची जात लय शूर लढायची त्यामुळे दमुन गेली आणि मग काना कोपऱ्यात लपून बसली. आणि तशीच राहिली नाही तर आता सुद्धा आमच एक आख्ख राज्य असत. अशी आमची कथा हाये बगा.

**व्यक्ती क्र.१५**

उत्तरदात्याचे नाव– हिराबाई झुंबर पिंगळे, वय–६५ वर्षे, शिक्षण नाही

ठिकाण– एकरूखे गाव

मुलाखतीचा दिनांक ११.०४.२०१७ वेळ– सकाळी ११.४५

आमची लोक दारु धंद्यामुळे विखूरलेले आहेत.

**वास्तव्य–**

सासु सासरे पहिल्यापासून येथेच रहातात ते पुण्याहून श्रीरामपूरला आले व तेथून एकरुख्यात आले. काम धंदा करून खाऊ लागले.

**देव–**

पिपळाई देवी, खोडीयार देवी, खुडीयार, आत्ता मोठा देव्हारा होता. ज्याची त्याची ती वेगळी असते. देव चांदीचे असतात देव देव करताना दोन बोकड लागतात. १ पाट (शेळी) लागते. अंगात आल की दारातच हा देव देव आम्ही करतो. पूर्वी आमच्यामध्ये दोन हेले (रेडा) कापायचे पण आता एक बोकड व एक पाट कापतात.

**स्थलांतर–**

सासू–सासऱ्यांच्या भांडणामुळे मी वेगळी झाले. पोलीस आमच्या मालकांना खूप मारायचे चोरी बाकीचे करायचे म्हणून आम्ही या राणात रहाण्यास आलो. गणेशनगरहून इकडे आलो. गणेशनगर मध्ये आमचे हाल झाले. धंदा नव्हता काहीच नव्हते. नंतर आमचे चांगल झाल. एकरुखे मध्ये ही काळे पारध्यांमुळे माझ्या मालकांना मारहाण होत असे. कारण काळे पारधी चोरी करायचे, बोकड, पाट वैगरे. नवरा, सासू, सासरे यांचे रेकॉर्ड होत परंतु आता मात्र ते आमच्याकडे येत नाहीत. पण गणेशनगर मध्ये अवस्था वाईट आहे. तेथे रोज पोलीस असतात. एकही घर गणेशनगर मध्ये चांगले नाही. आम्ही देखील पोलीसांच्या भितीमुळे तिथून निघून आलो. गाव सोडल व रानात आलो. (कारण तो त्रास आम्हास असाह्य झाला होता) आता पोलिसांचा दृष्टिकोण आमच्याकडे बदलायला लागला.

आमचा धंदा दारुचा आहे आणि या धंद्यानेच आम्हास वर आणले. आमची भाषा गुजराती सारखी आहे.

**व्यवसाय–**

रानावनात जाणे काम करणे, शेती करणे

**नातेसंबंध–**

सोयरे संबंध पिंपळे, पवार चालते. काळे, चव्हाण आम्ही हिंदू–पारधी (फासे पारधी) आहोत.

**सण–**

पित्र नसतात. (पितृ) पण आंब्याचा रस व भात मेलेल्या माणसांना (पित्राला) दाखवायचे. (आंब्याच्या सिझनमध्ये) बाई माणसांचा १२ वा करायचा (लवकर सूतक सोडायचे) व पुरुष माणसाचा १३ वा टाकतात.

**व्यसन–**

तंबाखूची मिस्त्री लावतो.

**जन्मविधी–**

आस्कन ही मुळी असते. मुळीचा चहा डिलव्हरी झाल्या झाल्या प्यायचा दुखने होत नाही. पाच दिवस बाहेर पाल टाकून रहावे लागत असे. स्वतःची डिलव्हरी स्वतः करायची आई, नंदा कोणीही हात लावू शकत नाही.

**मृत्यु विधी–**

आग्नीडाव देतात. स्मशानभूमी एकच आहे. ७ मडकी आणून कार्यक्रम करायचा.

**विवाह–**

आम्ही दोन्ही पद्धतीने करतो. (रात्री पारधी व सकाळी हिंदू) पारधी पद्धत, पंच लोक गाठ मारूण लग्न लावत असतात. (पिंपळे, काळे चव्हाण पंच) नवरीचा पदर व नवरदेवाच्या पंचानी गाठ मारायच्या सुरुवातीस हळद प्रत्येकाच्या घरी ज्यांनी त्यानीच करायची. मुले–मुली लवकर लग्न करायचे पण आता १८–१९ होवू देत नाही. आमच्या काळात २१० रू. देज देवून लग्न केले. ४ पायल्या गहू आणून चार खांब लावून चादरी बांधून लगन करून दिले. लग्न नवऱ्या कडच्यांनी केले. देव देव करण्यावर सारखा भर असतो. अद्याप अंतरजातीय विवाह नव्हते केल्यास आम्ही जातीबाहेर काढतो.

**देवी देवता–**

वणी देवीला जातो. मराठ्यांमध्ये जास्त वावरत यामुळे त्यांचे अनुकरण आम्ही केले. कोणी आम्हास शिकवले नाही.

**जात पंचायत–**

आता कोणीही त्यावर फार मनावर घेत नाहीत. आपली मूल खूप शिकवावी असे वाटते. आमची बाई मिराबाई पिंगळे ही आम्हास मार्गदर्शन करते. आम्हास कसे वर्तन करावे हे शिकवते.

**व्यवसाय–**

पारंपारिक कोणताही व्यवसाय नाही. माझ्या मालकांवर चोरीचा आळ बऱ्याच वेळा आला. नंतर मात्र ते म्हणाले आम्हाला कायमच ठेवून घ्या व पहिल्यादा मी पोलीसातून सोडवले. पण दुसऱ्या वेळेस ते म्हणाले मला फक्त भाकरीच पाहिजे. दारु धंद्यामुळे माझी उपजिवीका व्यवस्थित झाली आहे. पारधी स्त्रिया दारु पित नव्हत्या. पण विकतात. पुरुष दुसरे लग्न करू शकत होता. पण स्त्रिया नाही.

**शिक्षा–**

नाक कापणे, वगैरेच्या कठोर शिक्षा असायची. संशयावरून पुरुष लोक मारहाण होत असे मला सासू सासरे यांनी मारहाण केली.

**प्रायश्चित–**

स्त्रियांना व पुरुषांना विश्वसनीयता सिद्ध करण्यासाठी भक्ताच्या सर्व बायका सात पिंपळाची पाणे घेवून त्यावर तप्त कुऱ्हाड हातात द्यायची. व तिचे शुद्धत्व सिद्ध करायचे जर निर्दोष असेल तर ती तप्त कुऱ्हाड भाजत नाही फोड येत नाही.

**जीवनमान–**

सपराची (पालाची) होती. आतामात्र शौचालयासहीत आम्ही बांधली आहे.

**समस्या–**

राणावणात आम्हास घर दिले पाहिजे. डोल– (संजय गांधी) दिली पाहिजे.

**व्यष्ठी क्र.१६**

उत्तरदात्याचे नाव– कमल दत्तु पवार वय वर्ष ५५

ठिकाण– आरणगाव, अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक ११.०४.२०१७ वेळ– दुपारी २.१०

**समाजाचा उगम व पार्श्वभूमी–**

समाजाचा उगम सांगता येणार नाही. पण आम्हाला कळत असल्या पासून फार पूर्वोपासून आम्ही इकडे आलो आहोत आमचे जुणे लोक इंथे रहात होते अस म्हणतात. आम्ही पण लय दिवसापासून इथ आहोत.

**जाती जमाती उगम–**

आम्ही धनगर पारधी आमच्या दाखल्यावर हिंदु–पारधी आहे.

**भौगोलिक स्थान–**

आम्ही इथलेच कोठून आलो सांगता येत नाही.

**वंश/गोत्र–** सांगता येत नाही

**जीवन प्रणाली–**

पूर्वी उधरनिर्वाहाचे साधन काहीच नव्हते मागुण खाणे व खूप पूर्वी आमचे पूर्वज चोरी मारी करायचे असे सांगतात पण आम्हाला आठवत नाही फक्त म्हणायचे पण आमच्यापूर्वजांनी या आरणगावात कामे केली आहेत सडकेची कामे, शेतातील मशागतीची कामे आम्हांस होती. आता आम्ही मोल मजूरी करतो शेरड करड पाळली आहेत त्यांच्यावर आमचे पोट आहे.

**धार्मिक निष्ठा–**

महाशिवरात्री, नवरात्र तुमच्या सारखेच देव–देव करावे लागते, तो विधी अत्यंत महत्वपूर्ण आहे. यामध्ये आमचा सर्वांचा सहभाग असतो तुळजापूरची देवी आम्ही मानतो व तीचा देव देव करतो. देव देव करताना आम्ही कधी बोकडाचा वापर करतो तर कधी हाले (रेडे) याचा देवदेव आमच्याकडे केला जातो. आमचा देवदेव रात्रभर चालतो त्याच्या जेवणावळी होण्यासाठी आम्हास मंगळवार दुपार होते. सर्व जण यात सहभागी होत असतात.

**समाजातील भिन्न घटक परस्पर संबंध–**

पूर्वी आमच्याबरोबर बाकी समाज संबंध ठेवत नसे कारण आम्ही बदनाम लोक चोरी हा शिक्का त्यावर आम्हाला संशयीत नजरेने पहायचे आम्हाला लोकांनी पूर्वी कधी जवळ केले नाही. पण जस जस लोकांना समजायला लागल कि आम्ही चोरी करणारे नाही. पण जस जस लोकांना समजायला लागल की आम्ही चोरी करत नाही तस तस हळू हळू त्यांना आमचा विश्वास वाटायला लागला तरी सुद्धा हे सगळा बदल होण्यासाठी आमच्या दोन तीन पिढ्या जाव्या लागल्या. या वस्तीवर आम्ही बऱ्याच दिवसापासून रहातो पण बाकीच्या लोकांचा संबंध फारसा येत नाही. किंवा आला नाही.

**सामाजिक जडण घडण–**

आमचा समाज हा फिरीस्ता सारखा होता पण या गावात आम्ही बराच काळ राहिल्यामुळे लोक आमच्याशी संबंध ठेवत होते. आम्हीपण त्याचं बघून तस वागायला शिकलो.

**जात पंचायत–**

गरज पडली तर मदत घेतो. चांगले पंच असले तर खूप पैसे घेत नाही. पण काहीजण खूप पैसे घेतात. बऱ्याच वेळा आम्ही ही भांडणे घरातल्या घरात मिटवण्याचा प्रयत्न करतो. आता तर ते पूर्णच बंद झाल आहे.

**विविध घटक–**

वाहतुक व्यवस्था आत्ता सायकल आहे पूर्वी पायीच सर्व कराव लागायच. व्यसन असणाऱ्या बायकांना खूप रहात तंबाखू, गुटखा, मावा, दारु याचेही व्यसन असते पण आम्हाला नाही किंवा आम्हाला असले तरी फक्त तंबाखूची मिश्री आम्ही लावतो आणि काही बायका तंबाखू खातात.

**स्त्री जीवन–**

उठायच, घरचा स्वयंपाक असेल तर अवरायच अंघोळी या पाण्यावर अवलंबून पूर्वी तर पाणी पण नसायच. कुठल्या आल्यात आंघोळी अण काय उठायच आणि सकाळीच मागायला जायच व मिळेल ते लेकरा बाळांना घेवून यायच पण आमचे सासरे काम करत होते यामुळे आमच्या बायकांना तेव्हा घरात स्वयंपाक करुण त्यांच्या मदतीला जाव लागायच. पण एक भाजी व भाकरी येवढाच स्वयंपाक.

पूर्वी आमच्याजवळ पुरुष लोक लय म्हणल तर नसायचीच पोलीसांच्या भितीमुळे त्यांना लपून रहाव लागायच अशावेळी रात्री एकटी दुकटी बाई, भिती वाटायची, पण आम्हाला ते नित्याच होत आता मात्र स्थिर झाल्यामुळे पोलीस आम्हाला त्रास देत नाहीत. आता कमी झाल आहे. पुरुषांच्या गैर हजेरीत सर्व काही बाई माणसांना बगावच लागत.

**शिक्षण–**

आम्ही शिक्षण शिकलोच नाही आमच्यावेळी तेवढ महत्व नाही आता मुलींना शिक्षण देतो. सरकारण इंग्रजी माध्यमामध्ये शिक्षण सुरु केल्याने आता–आता तसल्याच शाळेत पाठवतो.

**कथा–दंतकथा–**

महाशिवरात्रीची तेवढीच बाकी सांगता येणार नाही.

**भाषा–**

आमची पारधी गुजराती सारखी

**सामाजिक जीवन–**

घर साधे पत्र्याचे, अगदी एकटी वस्ती कोणत्याही सुधारणा, सुविधा नाही. लाईट, पाणी यांची व्यवस्था नाही. तरीही समाज सहसंबंध चांगला असे म्हणतात. ही एक वस्ती आहे.

**सण उत्सव –**

सर्व तुमच्यात असतात तेच करतो पूर्वी कोणतेच सणसमारंभ केले जात नसायच आता दिवाळी करतो फक्त गणपती बसवत नाही.

**मनोरंजन–**

नाही खेळ नाही. जत्रा यात्रा गावची असते तेव्हा अंगात येते गड्यांच्या व बायकांच्या पण येत असत. उपास करतो मंगळवार वैगरे

**रोटी बेटी व्यवहार–**

आम्ही आमच्याच कुळात करतो बाकीच्या कुळात करत नाही.

**आहार –**

मांसाहार, प्रामुख्याने, शाकाहार करतो. मिळेल तस.

**आर्थिक स्थिती–**

पूर्वी अत्यंत नाजूक. आता काबाड कष्ट दुसऱ्याच्या शेतात कामाला जातो. मिळेल ते वेठबिगाराची कामे करतो. पशुपालन आहे. आर्थिक व्यवहार अतंर्गत होतात. व्याजाने पैसे देवून घेवून होतात. घरातील सर्व खर्च महिला करतात.

**कागदपत्रे–**

सर्व आहेत काही नाहीत. बचत गट नाही

**मतदान–**

करतो घरचे सांगतात तेथे करतो. मतदान करता येते पण कुठ करायच घरचे मालक सांगतात मग करतो. राजकीय नेत्तृत्व नाही. पुढारी मतदानापुरते येतात. नंतर येत नाही.

**संघटना–**

कधी तरी मदत घेतो पण फार नाही

**स्त्रीवादी चळवळी–**

आम्हास माहित नाही. आमचे प्रश्न आम्ही मिटवतो आमच्यातील आमच्यात

**शिक्षण–**

आम्हाला नाही शिक्षकांकडून मुलांना चांगली वागणूक दिली जाते. सोयी सुविधा नाही.

**विवाह–**

बालविवाह सर्रास होत होते. आता सुद्धा होतात फार १८ वर्षाची मुलगी होईपर्यंत वाट पहातो अस नाही मध्येच चांगले मागण आल तर लग्न, करुण देतो.

ब्राम्हण आणूण आता लग्न करतो. पूर्वी आमचेच लोक लग्न लावत होते.

हुंडा मुलीकडून यायचा पण नंतर मात्र आमच्याकडे मुलीकडून मुलाला हुंडा मिळण्याची पद्धत सुरु झाली आणि आता काही ठिकाणी तर निमा निम्मा खर्च करतात. पण सगळं तुमच्यासारखच असत.

अंतरजातीय विवाह होत नाही झाल्यास त्यांचे ते मिटवतात लग्न करुण देतात पण समाज त्या घराला वाळीत टाकतो पण असं काही उदाहरण घडल नाही.

**चालीरीती–** आमच्याकडे कोणत्याच चालीरीती पाळल्या जात नाही आमचे तुमच्यासारखेच

असते. रुढी परंपरा विशेष नाही.

**समस्या–**

१. लाईट, पाणी, घरकुल मिळावे.

२. आम्हाला धंदा टाकून देण्यास मदत करावी

३. ग्रामपंचायती ने आमच्यासाठी काय सुविधा आहे याची माहिती बोर्डवर लिहावी.

**व्यष्ठी क्र.१७**

उत्तरदात्याचे नाव– यमुनाबाई किसन पवार वय वर्ष ३५

ठिकाण– आरणगाव, अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक ११.०४.२०१७ वेळ– दुपारी ३.४५

**समाजाचा उगम व पार्श्वभूमी–**

आम्ही हिंदु पारधी आहोत आमच्या दाखल्यावर असच आहे. आमच्या मुलांच्या दाखल्यावर आता हिंदू पारधीच येते. पण आम्ही आमचे धनगर पारधी म्हणून समजतो.

**जात/पोटजात–**

धनगर म्हणजेच आम्ही हिंदू पारधी आहे.

**भौगोलिक स्थान–**

बऱ्याच म्हणजे ४०/५० वर्षापासून इथे आहोत कुठून आले सांगता येत नाही.

**वंश/गोत्र–**

माहीत नाही. आमच्या पारध्यांच्या वेगवेगळ्या कुळी आहेत व पोटजाती आहेत. आम्ही मात्र आमचे संबंध ठराविक कुळीशीच ठेवतो तेच आमचे सोयरे धायरे असतात.

**जीवन प्रणाली–**

आमच्या पूर्वीपासून आम्हाला वंचित व चोर ठरवले गेल यामुळे जीवन प्रणाली सुद्धा तशीच असावी सकाळपासून घरचा परिवाराचा विचार स्त्रियांना होता. उठल्यापासून ते झोपेपर्यंत परिवाराचा त्यांच्या उदरनिर्वाहाच्या दृष्टीने भिक मागणे, नंतर कष्ट करणे येवढेच माहित बाकी कोणत्याच गोष्टीचा विचार करण्यास वेळ त्यांना नव्हता. मला अठवतय आमच्यावेळी

आतासुद्धा जे काम मिळेल ते उकतेच घ्यायच सकाळी पोराचं खाणं–पिणं झाल की कामावर जायच व तिथे कांदा लावणे किंवा काही कामे अंगावर घेतो यामुळे सध्या घरातील अवरुण कामावर निघायच. काम करुन थकुन भागुण आल्यावर भाकरी खाऊन झोपायचं.

**धार्मिक जीवन–**

आम्ही देव तुळजापुरचा करतो आमचे कुल दैवतच ते आहे. आमच्या भाषेत आम्ही तुळजापुरची देवी म्हणतो आमच्या देवीचे, पारध्याच्या देवीचे बरेच अवतार आहेत त्यातीलच एक तुळजापूरची देवी आहे. म्हणून आम्ही तीला मानतो. महादेवाची पूजा सुद्धा करतो. देवदेव करताना टोणगे व हाले याचा देवदवे करतो. महिलांना स्थान असते. स्वयंपाकाचे काम त्यांच्याकडेच असते. पुरुष मंडळी बाकी अवजड कामासाठी मदत करतात.

**समाजातील भिन्न घटक –**

आमचा आणि बाहेरील समाजाचा संबध अगदी थोडा येतो. पूर्वी सुद्धा मागण्यापुरताच यायचा यामुळे ते लोक आम्हाला फार पूर्वी त्रास द्यायचे असे सांगायचे पण भीक मागण्यास गेल्यावर कधी कधी लोक एखादे काम (अवजड) करुन घ्यायचे आणि तस तशी कामे मिळायला लागली अजून सुद्धा आम्ही इतर समाजाशी संबंध ठेवतो पण कुणाच्या घरात प्रवेश करत नाही. टेलर सुद्धा अंगावर माप घेत नाही. आंदाजे ब्लाऊज शिवून घेतो. फक्त आता चांगल बोलतात पूर्वी बोलत सुद्धा नव्हते बऱ्याच वेळा जुणे कपडे मेलेल्या माणसाचे कपडे साड्या ब्लाऊज आम्ही आणून घातले आहेत. सर्व मागुणच म्हणजे दुसऱ्याने देईल ते आमच जीवन

**सामाजिक जडण घडण–**

सर्वांच्या कडे बघून बघून आम्ही आमच्यात बदल केले. पण लय पिढ्यानं पिढ्या आमच्या यामध्ये गेल्या आहेत आमची लोक एकमेकांना फार शिकवत नाही. उलट कधी कधी आमच्याच लोकांचा आम्हाला त्रास होतो. बाकीचे लोक थोडसं अमिश दाखवून आम्हाला त्रास देण्याचा प्रयत्न करतात आमचे लोक खबऱ्या म्हणून काम करतात. आम्ही यातून पुढे पुढे जाऊन आमच्यात बदल करत चालले आहोत.

**जात पंचायत–**

जात पंचायत म्हणजे घरची भांडणे चव्हाट्यावर आणणे. मिटण्यासारखे असले तर मिटवत होतो

नाहीतर ज्याचे त्याचे मार्ग त्याला मोकळा होता आता कधीतरी आम्ही एकत्र येतो आता जात पंचायत नाही म्हटल तरी नाही. महिलांचे बलात्काराचे, खोडी केलेले, नवरा न नांदवलेले. मूल न होणे, व्यभिचारी असल्याचे महिला संबंधी खटले जात पंचायतीत येत असायचे आता मात्र पोलीस स्टेशनचा आधार घेतो.

**कला स्थापत्य–** नाही पण घरच्या घरी बसून मूल संभाळायच बाकी काही नाही

**विविध घटक–**

वहातुक व्यवस्थेमध्ये गाडी घोड फार लांबची गोष्ट होती पूर्वी खूप चालतच सर्व नंतर सायकलचा वापर सुरु केला.

व्यवसन तंबाखूचे फक्त पूर्वी बायकांना दारुचे असायचे असे म्हणत

लैंगिक शोषण कधी घरातच दिराकडून वैगरे

कधी नवरा नसताना कोण मालक होते तीला कधी पोलीस लोकांनी सुद्धा याचा फायदा घेतला आहे.

**स्त्री जीवन–**

अत्यंत खडतर म्हटले तरी चालेल

सकाळपासून आम्ही आमच्या अस्तित्वाची लढाई लढत असतो.

दिवसभर कधी मानपानाचे जीवन आमच्या वाट्याला येईलच अस नाही.

पूर्वी आमच्या बायका भीक मागायला गेल्यातरी अशीच वागणूक दिली जाते.

आमचा सन्मान कधीच आठवत नाही.

**धार्मिक निष्ठा–**

महादेवाची सेवा केली. आमचा देवदेव २ ते ३ दिवस चालतो. साधारणपणे सर्व पाहुण्यांना सोमवारी देव देव सांगितला तर त्यांना जेवणासाठी मंगळवार दुपार होते, बुधवारी संपतो.

**बोलीभाषा–** पारधी

**सण/उत्सव –**

तुमच्या सारखेच आम्ही करतो.

**रोटी बेटी व्यवहार –**

आम्ही आमच्या कुळातील लोकांशी विवाह करतो बाकीचे करत नाही. आहारात मांसाहार जास्त शाकाहार कमी आता दोन्ही करतो.

**मृत्युविधी–**

पूर्वी खुप त्रास व्हायचा आता काही म्हणत नाही आम्ही प्रेत जाळतो पूर्वी पुरायचे.

**आर्थिक स्थिती–**

अत्यंत हालाखीची पूर्वा मजुरी व वेढबिगारीची कामे करत चोरी–मारीचे ही धंदे काही लोक करत. सध्या आम्ही पशुपालन व दारुचा व्यवसाय करतो.

**कागदपत्रे–**

काही आहेत काही नाही

**मतदान–**

मालक सांगतात त्यांनी शिकवलय तेथे करतो द्यायचे समजते घाबरल्यासारखे होते पण आता हळूहळू करतो पूर्वी हे अधिकारही नव्हते.

**संघटना–**

मदत होत नाही.

**स्त्रीवादी चळवळी–**

तो विषयच आम्हाला माहित नाही.

**शिक्षण–**

आम्ही शिकलोच नाही. या सगळ्या पासून आम्ही खूप दूर आहोत याची जाणिवच आम्हाला नव्हती.

**बालविवाह–**

साधारणपणे मुलगी वयात येताच आम्ही तिच्या विवाहाचा विचार करतो. तीला साजेल अस स्थळ ही आम्ही–आमच्यातच जमवतो. आता हिंदु पद्धतीने पूर्वी आमचीच लोक लग्न लावायचे. हुंडा मुलीचा येतो. पूर्वी दोन्ही मिळून करत होते.

**आंतरजातीय विवाह–**

नाही होत नाही

**चालीरीती–**

विशेष वेगवेगळ्या नाहीत. तुमच्यात असतात त्याच प्रकारच्या चालीरीती आहेत. त्या तर सर्वांकडे असतात. फार पूर्वी पासून म्हणतात सर्व पाळायचे पण त्याच प्रमाण खूप कमी आहे. तुमच्या पेक्षा वेगळया चालीरीती रुढी परंपरा नाही. पण विटाळाच असल्यावर पाळतो.

**समस्या–**

१. आम्हाला नोकरी मिळावी.

२. सरकारने आम्हाला काम द्यावे.

३. छोटे–छोटे व्यवसाय सुरु करुन द्यावे.

४. दारुच्या धंद्याला परवानगी द्यावी.

**व्यष्ठी क्र.१८**

उत्तरदात्याचे नाव– शितल संतोष काळे, वय वर्ष ४०, अपत्य, ४ मुली

ठिकाण– गणेशनगर, रहाता, जि. अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक ११.०४.२०१७ वेळ– दुपारी ४.४०

**समाजाचा उगम व पार्श्वभूमी–**

आम्ही हिंदू पारधी आहोत तसे प्रमाणपत्र आहे. समाजाचा उगम कसा झाला हे माहित नाही. परंतु रहाता येथे सासु–सासऱ्यांनी छोट घर बांधले ते सुधारले होते. परंतु सातत्याने पोलिस पोरांना विनाकारण तुरुंगात टाकतात. यामुळे त्यांना निराशा आली होती. खचून गेले होते.

**जात/पोटजात–**

आम्ही डाबी पारधी आहोत (पारधन देवी आमची देवी आहे) आम्ही वाघाची शिकार करणारे आहोत. कर्नाटक मधील गदक या ठिकाणी आम्ही पूजा अर्चा करतो. आमच्यामध्ये ४ कुले आहेत.

**भौगोलिक स्थान–**

बऱ्याच म्हणजे चाळीस एक वर्ष इथ राहतो.

**वंश/गोत्र–**

डाभी– (Dabhee) काळे

पिंपळाज– पात्र वाले, पिंपळे अडनाव (Pimpalaj)

चावंड देवी– चव्हाण (Chavand Devi)

कोरबिया– पवार (Korabiya)

आमचा समाज मध्यप्रदेश, रुगिया, अगदी अलाहाबाद पर्यंत गेले आहे. मूळ सांगता येत नाही. फक्त आजोबा आमचा कायमच फिरती वर रहायचा एका स्टेशन वर ४ दिवस दुसऱ्या स्टेशन वर ८ दिवस कायम फिरता रहायचा अत्ता आम्ही थोड घर बांधून रहायला लागलो आहोत. त्यांनी आम्हाला आमच गाव सांगितले नाही.

**व्यवसाय–**

दारु काढणे व घरातील कामे करतो.

**कला स्थापत्य–** नाही पण घरच्या घरी बसून मूल संभाळायच बाकी काही नाही

**बोलीभाषा–**

भाषा घिसाड्यांसारखी आहे, भाषा सरळ व गुजराती राजस्थानी खडी (कडक) आहे. परंतु आता मराठी बोलतो.

**सण/उत्सव –**

सण उत्सव हिंदु प्रमाणे साजरे करतो. पूर्वी मात्र सण करीत नव्हतो. मागून खात होतो.

**मृत्युविधी–**

आमच्याकडे प्रेत जाळले जाते.

**कुटुंब नियोजन–**

पूर्वी आमच्याकडे कुटूंब नियोजनाचे ऑपरेशन केले जात नव्हते. वयाच्या आत कितीतरी बाळांतपण व्हायची बायका म्हताऱ्या होईपर्यंत त्यांना मुल होत असे आता थोड्या फार प्रमाणात बदल झाला आहे. यामध्ये मुलांचे योग्य संगोपण वगैरे खूप दूरची गोष्ट होती. यासर्व

बाळांतपणामध्ये कितीतरी मुले जगत होते कितीतरी मरत ही होते. त्यांना सर्व गोष्टीची कमतरता असायची एक तर घरी पोटाला पोटभर जेवन मिळत नसे यामुळे त्या बायकांचीच उपासमार होई त्यांना त्यावेळी औषधे पाणी काहीच मिळत नसे. दवाखाना हीच दूरची गोष्ट होती. यामध्ये कधी–कधी बाळतंपणात त्या बायकांनाही मृत्यु येत असे. बायका एकट्याच स्वतःची डिलीव्हरी करीत असत.

**कागदपत्रे–**

आम्हाला कोणत्याही सरकारी योजनांचा लाभ नाही. आमच्या मालकांना काहीही कारण नसताना संशयावरून पोलीसांनी पकडले आहे. मी आता ही ४ लेकरे कशी संभाळू?

**विवाह–**

पारधी समाजाप्रमाणे रात्री गाठी बांधून विवाह केला जातो पुन्हा सकाळी हिंदु पद्धतीने लग्न लावतो.

**व्यसन–**

महिला तंबाखू खाणे, गुटखा खाणे, व सर्रास बायका दारू पितात. या बायका लग्न कार्यात, देव–देव कार्यावेळी दारु पीत असत. परंतु सध्या तशा प्रकारे फार दारु पीत नाहीत दारु पिण्यामागे पूर्वी महिला आपले दुःख विसरून जाण्यासाठी, हाल आपेष्ठा संकट हे सोप होण्यासाठी दारु पीत असत. यामुळे त्यांना तखलीप व्हायची नाही. (सहनशक्ती व्हावी म्हणून)

पूर्वी महिलांना खूप मार खावा लागत असे. खुद्द माझ्या आईचे पाय दोन्ही बाजूंनी रक्ताळून काढत असत. मार खाण्याची कारणे अगदी किरकोळ होती. स्वयंपाक वेळेत झाला नाही. किंवा अगदी किरकोळ कारणावरून मारहाण केली जायची. आमच्या डोळ्यांनी आम्ही आमच्या बापाला आईला रक्तपडेपर्यंत मारताना पाहिले आहे.

**चालीरीती–**

कोणत्याही प्रकारची कला नाही परंतु देवकार्यावेळी बायका नाचत होत्या गाणी म्हणत होत्या आता या प्रकारे काही नाही. इतर समाजाकडे बघून आम्हाला खूप बदलावस वाटत त्यांच्या सारख रहावस वाटत पण आम्ही व बदल कसा करू तेच कळत नाही.

**मनोरंजर–**

मनोरंजनासाठी काही खेळ खेळत होत्या पण खेळ सांगता येत नाही.

**व्यक्ती क्र.१९**

उत्तरदात्याचे नाव– श्रीमती द्वारका पवार

ठिकाण– जामखेड, ता. अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक ११.०४.२०१७ वेळ– दुपारी ५.४५

''आज आम्हाला कुणी आदर्श नेता नाही, की ज्याच्या पावलांवर पाऊल ठेवून आम्ही चालावं. माझ्या महिलांची स्थिती तर खूपच वाईट आहे. हे सगळं बघून मला वाटायला लागलं, आपण आपल्या लोकांसाठी आयुष्याच्या अंतापर्यंत काम करायला हवं....''

द्वारका च्रंदकांत पवार. माहेरचं नाव द्वारका भागुजी काळे दोन बहिणींच्या पाठीर द्वारकाचा जन्म झाला. तीनही बहिणींचा 'रांडेची पोरं', या हेटाळणीच्या शब्दांनी कायम उल्लेख होत असे. लहानपणी या शब्दांचा अर्थ कळायचा नाही. समजायला लागला तेंव्हा कधी स्वतःची, कधी आईची लाज वाटायची, रागही यायचा. पण जसजसं वय वाढत गेलं, चारचौघांत उठबस व्हायला लागली, तसतशी हे असं बोलणाऱ्यांचीच कीव वाटायला लागली.

माझा जन्म जामखेड तालुक्यात झाला. वडील पारधी समाजातून आलेले. त्यांच्याकडे तीन गावांच्या रखवालदारीचं काम होतं. आधी दोन लग्न झालेली असताना तिसऱ्या बाईच्या प्रेमात पडले. रंजनाबाई म्हणजे माझी आई मराठा समाजातली होती. घरातून, समाजातून लग्नाला मान्यता मिळणं शक्य नव्हतं. म्हणून मग आई–बापाने लग्नाशिवाय एकत्र राहण्याचा निर्णय घेतला. माझ्या वडिलांना तीन बायका, त्यांपैकी दोघी लग्नाच्या. तीन बायकांची एकूण चौदा मुलं असं मोठं बारदान होतं. पण गडी मोठा हिकमती. तिघींना शेजारी–शेजारी तीन झोपड्या काढून दिल्या. बाकी घरसंसार सांभाळण्याची जबाबदारी बहुदा पारधी महिलाच स्वीकारत असल्याने पुरुषांना फार चिंता नसते. माझ्या सख्ख्या आईलाही आपलं घरदार आणि मुलांची चिंता असल्याने आपणच काहीतरी हालचाल करायला हवी असं वाटून तिने घरातच दारू गाळून विकण्याचा धंदा सुरू केला.

मला आपल्या आईचं आजही खूप कौतुक वाटतं. जग रहाटी विरुद्ध जाणाऱ्या आपल्या आईमुळे आपण अधिक टापटीप, स्वच्छ, व्यवस्थित राहायला शिकलो, नियमित शाळेत जाऊन लागलो, असं त्यांना वाटतं. माझी आई माझ्या सोबत वेगळी राहत होती, तरीही सावत्र आया आणि भावंडे यांचा कायमच त्रास व्हायचा. मोठ्या बहिणीचं सोळावं वर्ष संपतं न संपतं तोच लग्न करून देण्यात आलं होतं. एके दिवशी कोणत्या तरी कारणावरुन माझी आई आणि सावत्र आई यांच्यात कडाक्याचं भांडण झालं. झाल्या प्रकाराने मी हबकून गेले माझ्या बहिणीने आत्महत्या केली. मी आठवीत शिकत होती. रीतसर जाब जबाब होऊन, आत्महत्येची केस नोंदवून फाइल बंद करण्यात आली.

एक बहीण लग्न होऊन सासरी गेलेली, तर दुसरीने आत्महत्या केली. घरी आई आणि मी दोघीच असायच्या. आईने हाय खाल्लेली. माझ शाळेवरचं. शिकण्यावरचं मन उडालं आणि मी घरातल्या दारूच्या धंद्याचा ताबा स्वत:कडे घेतला. दारू प्यायला लोक यायचे. सुरुवातीला थोडी भीड वाटायची, पण हळूहळू गिऱ्हाईकांसोबत हसूनखेळून बोलणं सुरू झालं. अधूनमधून पोलीस देखील यायचे. आपल कर्तव्य (?) बजावून जायचे. वयाच्या पंधरा–सोळाव्या वर्षीच हातात बऱ्यापैकी पैसा खेळू लागला. चार लोकांच्या ओळखी झाल्या. वागण्याबोलण्यात एक बेदरकापणा आला. कदाचित दारूच्या या धंद्यात टिकून राहण्यासाठी तो गरजेचाही असेल. लोक आणि मुख्य म्हणजे सावत्र आया आणि भावंड माझा तिरस्कार करायचे, माझ्या चारित्र्यावर संशय घ्यायचे. कायम 'रांडेची' असा माझा उद्धार व्हायचा माझ्यामुळे घराची अब्रू चव्हाट्यावर मांडली जातेय असं त्यांना वाटायचं.

माझ्याकडे दारू प्यायला येणाऱ्या एका तरुणासोबत मी हसून खेळून बोलायची. मी आणि तो तरुण यांच्या कथित संबंधांना घेऊन घरात वाद सुरू झाले. त्यात, तो तरुण मुस्लीम असल्याने सावत्र आई आणि भाऊ यांनी माझ्या चारित्र्याला घेऊन हे प्रकरण जातपंचायतीत नेलं. आरोप कबूल आहेत का? म्हणून मला विचारलं. त्यावर आपल्या अरोप कबूल नाही, असं मी म्हणाली. मग 'इमान जाळायला' तयार आहेस का? असं विचारलं. त्यावर, 'कर नाही त्याला डर कसला' असं म्हणत, आपण कोणत्याही अग्निपरीक्षेला तोंड द्यायला तयार आहोत असं सांगिलं.

दुसऱ्याच दिवशी 'इमान जाळायचं' ठरलं. इमान जाळण्यासाठी माध्यम म्हणून सावत्र आईचा भाचा उभा राहिला, कारण ही अग्निपरीक्षा जरी एका आरोपी व्यक्तीसाठी असली तरी त्यातून प्रत्यक्षात दुसऱ्याच व्यक्तीला जावं लागतं. ती व्यक्ती जर या परीक्षेत खरी उतरली नाही तर जिच्यावर आरोप आहे ती व्यक्ती गुन्हेगार आहे असं समजलं जातं. गुन्ह्याच्या स्वरूपावरुन, आर्थिक दंडापासून ते वाळीत टाकण्यापर्यंत कोणतीही शिक्षा भोगावी लागते.

मी निर्भयपणे या अग्निपरीक्षेला तोंड देण्याची तयारी दाखवली. सर्व तयारी झाली...कुऱ्हाडीचं गरम पातं सावत्र आईच्या भाच्याच्या हातावर ठेवलं. त्याने ते अलगत आपल्या हातात तोललं आणि चालत जाऊन समोरच्या पाचोळ्यात नेऊन टाकलं. सुक्या पाचोळ्याने क्षणात पेट घेतला. पंचांनी जवळ येऊन त्या तरुणाचा हात निरखला. पिंपळाची पानं तशीच बांधलेली होती, हाताला भाजल्याच्याखुणा नव्हत्या. यावरून मुलीचं चारित्र्य डागाळलेलं नाही अस अर्थ निघत होता. जमलेल्यापैकी काहींना बरं वाटलं, काहींचा हिरमोड झाला. मी सर्वांच्या देखत ठसक्यात निघून गेली. अजूनही सावत्र मंडळींचे टोमणे सुरूच होते. दारूचा धंदा करते, गावात फिरते आणि आम्हालां येड्यात काढते, हिनेच काहीतरी जादुटोणा केला असावा म्हणून सहीसलामत सुटली.

वास्तविक, त्या वेळचं माझ वय, माझी परिस्थिती यांचा कोणी विचारच केला नव्हता. ती त्या मुस्लीम तरुणात गुंतली होती हे खरं होतं. त्याची आधी दोन लग्नं झाली होती. लवकरच त्यने द्वारकासोबत निकाह केला, पण त्याला खरंच लग्न म्हणावं का असा सवाल आजही मला जाणवतो. आपल्या पतीपासून हिला दिवस गेले आणि आपल्या लग्नाला खरचं काही अर्थ आहे का ही भावना अधिक तीव्र झाली....आपण मूल जन्मालाच घालू नये या निर्णयाप्रत मी आली....पण जन्माला येणाऱ्या मुलाचा काय दोष...? आपल्य चुकीची शिक्षा त्याला का....? आपल्या नवऱ्याच्या आधीच्या बायकांचा दोष काय? त्यांच्या चार मुलींचा अपराध काय? मी खूप विचार केला आणि मनाशी निर्णय घेतला, आपण आपल्या मुलाला स्वतःच्या हिंमतीवर जन्माला घालायचं, वाढवायचं, शिकवायचं, त्याला मोठे करायचं...'मी आपल्या नवऱ्यापासून कायमची फारकत घेतली आणि मी आईकडे निघून आली. नऊ महिने पूर्ण झाले आणि मुलगा रोहित जन्माला आला. आज माझ्या या मुलाचं पदवीपर्यंत शिक्षण झालं आहे.

मी आपल्या नवऱ्यापासून काडीमोड घेऊन माहेरी निघून तर आले. पुन्हा दारूचा धंदा आणि आई व मुलाची जबाबदारी व्यवस्थित पार पाडता येईल याची काळजी घेऊ लागले. मध्यंतरी मोठ्या बहिणीचा तिच्या कुटुंबात छळ होतो हे समजलं तेव्हा आपल्या बहिणीला आणि तिच्या मुलांना आपल्याकडे घेऊन आहेत आणि त्यांचा सांभाळ करू लागले.

एकूणच, माझ आयुष्य एकसुरी पद्धतीने सुरू होतं आणि हे असंच चालणार याचा मी स्वीकार केला होता. असं म्हणतात, माणसाचं वर्तन हे अनेक वेळा त्याच्या तर्कसंगत विचारांपेक्षा (Logical Thinking) त्यांच्या भावनांवर (Emotions) अधिक अवलंबून असतं. त्यामुळेच खूप विचार करून घेतलेल्या एखाद्या निर्णयावर त्याला ठाम राहणं जमतचं असं नाही. मी चंद्रकांत नावाच्या तरुणाच्या मनात भरले. त्याने लग्नासाठी शब्द टाकले. आणि फार गडबड न होता माझा आणि चंद्रकांतचा विवाह पार पडला. मी चंद्रकांतची दुसरी पत्नी. लग्नानंतचे काही दिवस बरे गेले, पण थोड्याच दिवसांत हे लग्न आपणास मानवणार नाही, यातून कोणाच्याच वाट्याला सुखसमाधान नाही असं वाटून एके दिवशी मी आपला गाशा गुंडाळला आणि आणि ती निमूटपणे माहेरी निघून आले. नवरा अधूनमधून बघायला, भेटायला यायचा. २००५ साली मला दुसरा मुलगा झाला.

आपल्या मुलांवर आपल्या व्यवसायाचा, आजूबाजूच्या वातावरणाचा परिणाम होऊ नये, ती वाईट मार्गाला लागू नयेत याची काळजी मी सतत घेत होते. आपली मुलं चांगली शिकायची असतील तर ती इथल्या वातावरणापासून दूर राहायला हवीत असं वाटू लागलं. मुलांना आपल्यापासून दूर करण्याच्या विचाराने मला त्रास होत होता, पण मी आपल्या मनाची समजूत काढली आणि आपल्या दोन्ही मुलांना शिक्षणाच्या निमित्ताने आपल्यापासून दूर तालुक्याच्या गावात ठेवलं.

सत्तावीस–अठावीस वय होईपर्यंत मी पारधी समाजाशी तसं फार काही देणं–घेणं नव्हतं. उलट, आपली आई ही मराठा समाजाची असल्यामुळे पारधी महिलांपेक्षा आपण अधिक स्वच्छ, टापटीप, पुढारलेल्या विचारांच्या आहोत असंच मला वाटायचं. उच्चनीचतेची कल्पना नकळत का होईना, पण माझ्याही डोक्यात होती. या पारधी बायकांइतक्या घाणेरड्या का राहतात. म्हणून

मला रागच यायचा. त्यांच्यासोबत संपर्क ठेवू नये असं वाटायचं. साधारण इ.स.२००७ च्या सुमारास माझी अँड. अरुण जाधवांसोबत भेट झाली. अॅड अरुण जाधव हे माझे वर्गमित्र. आम्ही एकाच शाळेत शिकत होते. गप्पांच्या ओघात मला समजलं, की अरुण जाधव हे ग्रामीण विकास केंद्र आणि लोकधिकार आंदोलनाच्या माध्यमातून दलित आणि पारधी समाजाच्या विकासासाठी काम करत आहेत. मला वागण्या–बोलण्यातली निर्भीडपणा बघून अरुण जाधवांना वाटलं, मला जर योग्य मार्गदर्शन आणि संधी मिळाली तर चळवळीच्या कामात माझी मदत होऊ शकेल. त्यांनी हळूहळू मला आपल्या बैठकांना, कार्यक्रमांना बोलवायला सुरूवात केली. सुरूवातीला आपल्या मित्राच्या आग्रहाखातर आणि नंतर हे काही तरी वेगळं आहे, आपल्याशी संबंधित आहे याबद्दल अधिक समजून घेतलं पाहिजे असं वाटून मी लोकाधिकार आंदोलनाशी कधी जोडले गेले हे मला कळलं देखील नाही.

मी सुरूवातीला बैठकांना नुसत्याच येऊन बसायचे, मग हळूहळू चर्चांत भाग घेऊ लागले, पुढे अगदी मोर्चा, धरणं यांसारख्या कार्यक्रमाचं नियोजन आणि नेतृत्व करण्यापर्यंत माझा आत्मविश्वास वाढला. पारधी समाजाच्या समस्या कशा आहेत हे मी जवळून पाहिलं होत, स्वतः अनुभव घेतला होता. पण हे असं का? याची कारणं 'लोकाधिकार' मोहिमेसोबत जोडून घेतल्यावर समजायला लागली. आपल्या समाजतला अशिक्षितपणा, अंधश्रद्धा, चोरटी जमात म्हणून कपाळावर बसलेला शिक्का यांची मुळं कुठेकुठे आहेत याची जाणीव व्हायला लागली. पारधी समाज आणि त्यातही महिलांविषयीची घृणेची भावना नाहीशी होत गेली.

मला, आपणही अरुणसारखं काहीतरी करायला हवं असं वाटू लागलं. पण स्वतःबद्दल तितका आत्मविश्वास नव्हता. अरुण जाधवांना मला अडचण समजत होती. एक बेदरकारपणे आयुष्य जगलेली ही बाई आहे, हिच्यात प्रचंड ऊर्जा आहे. त्याला योग्य दिशा मिळणं गरजेचं होतं. लोकांना रोजच्या आयुष्यातल्या छोट्या छोट्या कारणांमुळे अडचणी येत असतात. त्या समजून घेऊन त्या सोडवण्याच्या प्रयत्न करण्यावर भर देण्यास सांगितलं. मी सुरूवातीला कार्यकर्त्यांच्या मदतीने आणि पुढे एकट्याने मुलांना शाळेत दाखल करण्यापासून ते रेशनकार्डस, जातीचे दाखले काढून देणं सुरू केले, पारधी महिलांना त्यांनी स्वच्छता आणि आरोग्याचं महत्त्व पटवून द्यायला सुरूवात केली. लोकांसोबतच्या अशा नियमित संवादांतून मी स्वतःही घडत होते.

मला सुरूवातीला बोलण्याची खूप भीती वाटायची. आपण कय बोलावं हेच कळायचं नाही. मग अरुण जाधव, बापू ओव्हाळ यांच्यासोबत चर्चा करायच्या. काही वेळा विचित्र प्रकार घडायचे. पारधी समाजात बाईने पुरुषांसमोर येऊन बोलायचं, त्यांना काही समजावून सांगायचं हे जरा अतीच समजलं जातं. एकदा कुंभारतळे नावाच्या गावात एक बैठक आयोजित केली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी माझ नाव जाहीर झालं आणि समोर बसलेली सगळी अध्यक्षाच्या हाताखाली काम करायचं का? असं विचारू लागली. काही लोग बैठक सोडून निघून गेले. या अशा प्रसंगाने मी गडबडले नाहीत, थांबल्या नाहीत. आपण आपली ओळख तयार करायला हवी असं वाटून अधिक जोमाने काम करायला लागले. नवरा–बायकोच्या भांडणांत समुपदेश करू लागले, पारधी तरुणांवर खरे–खोटे गुन्हे दाखल होत. त्याकरता पोलीस स्टेशनमध्ये जाऊन बाजू मांडू लागले. संस्थेच्या बैठकांमधून स्वतःचे विचार मांडू लागले. हळूहळू माझा आत्मविश्वास वाढू लागला. आणि आपल्या जीवनाला वेगळा अर्थ मिळाला आहे याची जाणीव झाली. मी आपला दारूचा धंदा दुसऱ्यावर सोपवला आणि पारधी समूहाच्या कामासाठी स्वतः पूर्णवेळ वाहून घेतलं.

या ठिकाणी एक गमतीशीर किस्सा सांगायला हवा. जेव्हा मी लोकाधिकारच्या कामानिमित्त अधिक वेळ जाऊ लागले, घरी यायला उशीर होणं किंवा घरात कमी लक्ष देणं असं होऊ लागलं तेव्हा नवऱ्याची कुरबुर सुरू झाली. एकदा याच गोष्टीवरुन मोठा वाद झाला. मला तिरीमिरीत एक कागद घेतला आणि नवऱ्याच्या नावाने चार ओळीचं पत्र खरडलं. त्याचा आशय साधारण असा होता. 'मी माझं आयुष्य माझ्या मर्जीने समाजासाठी द्यायचं ठरवलं आहे, तुला या गोष्टीचा त्रास होत असेल तर यापुढे तू माझा नवरा नाहीस आणि मी तुझी बायको नाही. मी तुला सोडचिठ्ठी देत आहे. मी स्वतःला एखाद्या गोष्टीने झपाटून घेतलं, की अनेक महत्त्वाच्या गोष्टी किंवा जवळची नाती बाजूला करायला ती मागेपुढे पाहत नाही.

मी हळूहळू स्वतः पुढाकार घेऊन काही गोष्टी करून बघू लागले. केवळ लोकांसोब संवाद साधणं इतकचं नाही, तर तथाकथित पुढारी आणि प्रशासनातल्या लोकांना कसं हाताळावं हेही अनुभवांतून मला कळू लागलं. त्यामुळे तहसील किंवा अन्य कार्यालयांत कोणाचं काम

अडवलं जात असेल तर संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी जो कोणी असेल त्याला एक-दोन प्रश्न विचारून किंवा योग्य प्रकारे बाजू मांडून काम करून घेते.

मी अवघ्या तीन-चार वर्षांत 'लोकाधिकार आंदोलना'त स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं होतं. पारधी समाजात जिथे पुरुष नेतृत्व पुढे येणं अवघड वाटत होतं. तिथे एक महिला असूनही हिरिरीने पुढे घेऊन स्वतःला जमेल त्या पद्धतीने अन्याय-अत्याचाराविरुद्ध आवाज उठवण्याचा प्रयत्न करत होते. समाजाप्रती असलेली माझी तळमळ, बांधिलकी याबद्दल शंका घेण्याचं काही कारण नव्हतं. पण मला आपलं काम अधिक शिस्तीनं, अभ्यासपूर्ण, अधिकाधिक लोकांचा सहभाग मिळवून करता यायला हवं. त्यासाठी मला काही कौशल्यं, काही अनुभव मिळाला तर माझ नेतृत्व वेगळ्या प्रकारे बहरेल असं अरुण जाधवांना वाटत होतं.

'कोरो साक्षरता समिती' या संघटनेच्या वतीने हक्काधारीत मुद्दयांवर काम करणाऱ्या संघटनांमधल्या नेतृत्वक्षमता असणाऱ्या व्यक्तीला एक वर्ष कालावधीची फेलोशिप दिली जाते ही गोष्ट अरुण जाधवांना माहीत होती. इ.स.२०११ साली, 'ग्रामीण विकास केंद्राच्या' वतीने, माझा अर्ज करावा असं त्यांनी कार्यकर्त्यांच्या सहमतीने ठरवलं. मी मात्र यासाठी तयार नव्हते. त्यांना वाटत होतं; आपण अशिक्षित, अडाणी बाई आपल्याला काही हे जमणार नाही. अरुण जाधवांनी त्यांच्यासोबत खूप चर्चा केली. या फेलोशिपमुळे मला नवीन गोष्टी शिकायला, बघायला मिळतील, नवीन लोकांच्या ओळखी होतील, नवीन गोष्टी करून बघायला मिळतील इत्यादी. शेवटी खूप आढेवेढे घेतल्यानंतर मी अर्ज भरायला तयार झाले. मुळातच, फेलोची निवड करताना एखाद्या व्यक्तीचं शिक्षण किती झालं किंवा ती व्यक्ती किती कालावधीपासून विकास कामाशी जोडून आहे यापेक्षा तिच्यात नेतृत्व क्षमता आहे का, काही करून बघण्याची इच्छा आहे का, शिकण्याची, समजून घेण्याची इच्छा किती आहे, या गोष्टी इथं महत्त्वाच्या होत्या. माझा अर्ज भरताना आणि मुलाखतीदरम्यानही स्वतःच्या कामाला घेऊन बोलल्या. त्याचं काम, अनुभव आणि क्षमता लक्षात घेता 'उभरत्या नेतृत्वा'साठी दिली जाणारी ही फेलोशिप मला मिळणं अवघड गेलं नाही.

मी फेलोशिपसाठी पारधी 'महिलांचे संघटन आणि सक्षमीकरण' हा विषय निवडला होता. सुरूवातीला महिलांना एकत्र करून नुसतंच गप्प मारणं सुरू केलं. हळूहळू व्यक्तिगत स्वच्छता आणि आरोग्याला घेऊन बोलू लागले. पुढे जाऊन आपल्यात ज्या परंपरा, रितिरिवाज पाळतो त्यातल्या कितीतरी गोष्टी ह्या केवळ अंधश्रद्धा कशा आहेत हे पटवून देण्याचा प्रयत्न झाला. महिलांना जर पुरुषांचं सहकार्य मिळालं तर अधिक चांगल्या प्रकारे काम होऊ शकेल असा विचार करून मी युवकांसोबत पारधी समूहाच्या मुद्दयांना घेऊन चर्चा सुरू केली. आपल्यासोबत जोडून घेतलेल्या महिला आणि युवकांना प्रत्यक्ष सभा, मोर्चे, बैठका, कार्यक्रम यांत सहभागी करून घेऊ लागले. फेलोशिपच्या काळात त्यांनी आणखी एक महत्त्वाचं काम केलं. ते म्हणजे पारधी समूहातल्या लोकांना मोठ्या प्रमाणात जातीचे दाखले काढून दिले आहेत.

अहमदनगर जिल्ह्यातील सहा तालुक्यात पारधी आराखडयाला घेऊन एक सर्वेक्षण करण्यात आले. यावेळी मी हे पाहिलं, की ही माहिती जमा करणारे, त्यावर विचार करणारे, शासनासोबत भांडणारे केवळ पारधी नाहीत, तर अन्य समाजातले, इतर भागांतले लोकही आहेत. जर ही मंडळी आमच्या जिल्ह्यातील येऊन आमच्यासाठी काही करू इच्छितात तर मी कशी मागे राहू, असा विचार त्या करू लागल्या. यावेळी जामखेड तालुक्यातल्या एकोणतीस वाडयांची जबाबदारी मी घेतली होती. ज्याच्याकडे मोटारसायकल आहे अशा कार्यकर्त्याला किंवा युवकाला अक्षरशः पिंजून काढला आणि चारशे पाच कुटुंबांची तपशीलवार माहिती जमा केली.

पुढे एकूण सहा तालुक्यांतून मिळालेल्या माहितीचं रीतसर विश्लेषण केलं गेलं. त्यावर कार्यकर्त्यांच्या चर्चा होत. त्यातही मी पुढाकाराने आपलं मत मांडू लागले. इतकचं नाही, तर पारधी विकास आराखड्याला घेऊन जिल्हाधिकाऱ्यांसोबत जी चर्चा झाली त्यावेळीही मी मुद्देसूद मांडणी केली.

या कामातून आमच्या जिल्ह्यातल्या पारधी समूहाची परिस्थिती काय आहे हे मला कळलं. इथे शिक्षणाचा आणि रोजगाराचा प्रश्न आहे, आरोग्याचा आणि अंधश्रद्धेचा प्रश्न आहे.

आज आम्हाला कोणी आदर्श नेता नाही की ज्याच्या पावलांवर पावून ठेवून आम्ही चालावं. महिलांची स्थिती तर खूपच वाईट आहे. हे सगळं बघून मला वाटायला लागलं, आपण आपल्या लोकांसाठी आयुष्याच्या अंतापर्यंत काम करायला हवं.

माझा फेलोशिपचा एका वर्षाचा कालावधी संपला तरी पुढची सलग दोन वर्षं मी आशा काळे आणि विशाल पवार या दोन फेलोंच्या मेंटोर म्हणून काम केलं आहे. त्यांपैकी आशा काळे ही नवऱ्याने नाकारलेली एक पीडित मुलगी होती. मी तिला धीर तर दिलाच, पण सामाजिक कामात सहभागी करून घेतलं. विशाल पवार या पारधी तरुणाला सहा महिन्यांची कैद झाली होती. त्याच्यावर खोटा आळ घेतला होता. पण त्यामुळे तो सुटून आल्यावर, खरोखरीच्या गुन्हेगारीत अडकण्याची शक्यता खूप होती. मी त्याला जवळ घेऊन बसले आणि अगदी आईच्या मायेने त्याच्या भविष्याला घेऊन खूप समजावलं. आज आशा आणि विशाल हे लोकाधिकार आंदोलनातल्या दुसऱ्या फळीतले नेते आहेत.

माझा प्रवास हा एक अल्लड कुमारी, गृहिणी, घरातील कर्ती व्यक्ती असा होत होत, चळवळीतली एक स्वयंसेवक, कार्यकर्ती, संघटक ते एका समूहाचं नेतृत्व करणारी पारधी महिला असा ही नकळत झालेला दिसून येतो.

पारधी समाज बहुधा मुख्य गावापासून थोड्या दूर अंतरावर पाल टाकतात. जामखेडपासून साधारण दहा किलोमीटर अंतरावर राजेवाडी भागात अशीच एक पारधी वस्ती अनेक वर्षांपासून वसलेली आहे. त्यात गावपारध्यांसोबत, गायपारधीही सामील झालेले. गावपारधी हे एका जागी वस्ती करून राहणारे तर गायपारधी भटकून जीवन जगणारे. या भागात साधारण शंभर एक एकर गायरान जमीन अशीच पडून होती. या जमिनीवर कुणीच कधी कसलीच लागवड केली नव्हती. कायम मुख्य समाज आणि प्रशासनाच्या रोषाला बळी पडलेल्या पारधी समूहातल्या काही मंडळींनी विचार केला. आता एका जागी स्थिर राहून, कष्ट करून प्रामाणिकपणाने जीवन जगायचं. यापैकी काही जणांनी धीर करून जमीन कसायला सुरूवात केली आणि गावकरी–पारधी समूहात वेगळाच संघर्ष सुरू झाला. गावकऱ्यांना वाटलं, पारधी आपल्या हक्काच्या जमिनीवर अतिक्रमण करत आहेत. गावकऱ्यांनी जमीन कसू

पाहणाऱ्या पारध्यांना त्रास द्यायला सुरूवात केली. कोणी ट्रॅक्टर घेऊन आलं तर त्याच्या चालकाला मारहाण कर, पिकांची नासधूस कर, उभ्या पिकांत गुरं सोडून दे, पोरांना आणि गुरांना मारहाण कर, तरुणांवर खोटे आरोप करून पोलीस कैदेत टाक असे प्रकार सुरू झाले.

तिथल्या पारधी समूहाने 'लोकाधिकार आंदोलना'च्या माध्यमातून तडजोड करायचा प्रयत्न केला. स्वतः मी गावचे सरपंच आणि इतर लोकांना जाऊन भेटले, पण त्याचा फार उपयोग होताना दिसत नव्हता. या पारधी जमातीमुळे आपल्या हातची जमीन तर जाईलच, उलट इतर गुन्हेही वाढतील अशी भीती गावकऱ्यांना वाटत होती. त्या भीतीचे रूपांतर द्वेष आणि संतापात झालं. दिनांक १५ ऑगस्ट २०१४ या स्वातंत्र्यदिनी गावसभा झाली आणि काही मंडळींनी या पारध्यांना धडा कसा शिकवायचा याबद्दल खासगीत चर्चा करून निर्णय घेतला. दिनांक १६ ऑगस्ट २०१४ रोजी गावातल्या काही मंडळी जमावाने पारधी वस्तीत शिरलं आणि तोंडाने शिवीगाळ करत जो समोर दिसेल त्याला मारत सुटलं. मग त्यात महिला, पुरुष, म्हातारे, मुलं यांच्यात भेद केला नाही. त्यांच्या घरातले धान्याचे डबे उलटे केले, भांडीकुंडी फोडून टाकली, घराचे बांबू उखडले, वस्तीत कहर माजवला आणि धमक्या देतच आले तसे निघून गेले.

पारधी समूहातली काही मंडळी भीतीने, संतापाने तक्रार करण्यासाठी पोलीस ठाण्यावर गेली. तक्रार करायला गेलेल्या पारधी मंडळींना उलट पोलीस अधिकाऱ्याने दमात घेतलं. 'लहान-सहान चोऱ्या करून भागत नाही, तेव्हा आता लोकांच्या जमिनी लाटायला निघालात का?' असं विचारलं. 'जा, पुन्हा तक्रार आली नाही पाहिजे', असं म्हणून अक्षरशः हुसकावून लावलं. आपला कोणीच वाली नाही अशी तिथल्या पारध्यांची भावना झाली.

हा प्रकार जेव्हा मला समजला तेव्हा त्या अत्याचारग्रस्त पारधी समूहाला येऊन भेटले, काय झालं ते समजून घेतलं आणि मी आपल्या लोकांना सबुरीने घेण्याचा सल्ला दिला. तिथून मी दोन कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पोलीस ठाण्यावर गेले. तिथल्या पोलीस अधिकाऱ्यांना भेटून म्हटले, ''साहेब तुम्ही एकच बाजू समजून घेऊन मत कसं बनवता? आम्ही असं म्हणत नाही की, सगळेच गावकरी वाईट आहेत, पण त्यातल्याच काहींनी लोकांना मारहाण केलीय हे ही

लक्षात घ्या. आम्हालाही हा वाद वाढायला नकोय. ज्या मंडळींवर काय अन्याय झाला, ज्यांच्या कपाळावर चोर म्हणून कायम शिक्का बसलाय, जे भूमिहीन गरीब आहेत, ज्यांना आपली सुधारणा व्हावी असंच वाटतंय असे हे लोक आहेत. अशा वेळी, जर त्यांच्यात अन्यायाची भावना तयार झाली तर ते आज आहेत त्यापेक्षा जास्त मोठे गुन्हेगार होतील. आम्हाला वाटतं, तुम्ही पुढाकार घेऊन दोन्ही बाजूंना समोरासमोर बसवावं आणि योग्य तो तोडगा काढावा. त्या पोलीस अधिकाऱ्यालाही माझ्याशी बोलण्यात तथ्य वाटलं. त्यांनी आपण प्रयत्न करू असं आश्वासन दिलं.

इथल्या पारधी समूहावर नेहमीच अन्याय होत आला आहे, पण यावेळी झालेल्या हमल्याने पारधी समूह बिथरला होता. कोणालाच धीर धरवत नव्हता. आपण काही केलं नाही तर याहून वाईट व्हायला वेळ लागणार नाही अशी भीती त्यांना वाटत होती. त्यामुळे यातली काही मंडळी एका तथाकथित प्रस्थापित पुढाऱ्याला जाऊन भेटलं. त्या पुढाऱ्याने (त्यांना या भागात सेटिंग बादशहा म्हणून ओळखतात) आपले कार्यकर्ते व प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना पोलीस ठाण्यावर पाठवून दिलं आणि 'दलित अत्याचारविरोधी कायद्याखाली' गुन्हा नोंदवण्याची मागणी केली. यावेळी पोलिसांनी मला बोलावून घेतले. यावेळी ''लोकांचं म्हणणं बरोबर आहे, नियमानुसार तुम्हाला तक्रार नोंदवून घ्यायची असेल तर नोंदवून घ्या, पण आम्हांला वाटतं, जर पारधी आणि बाकीचा समाज एकाच ठिकाणी राहणार असेल तर हे प्रकरण चिघळू नये याची काळजी घ्यायला हवी, थोडं सबुरीनं घ्यावं.''

दुसऱ्या दिवशी मी आपल्या कार्यकर्त्यांसोबत स्वतः पारध्यांच्या पालावर जाऊन प्रत्येकासोबत बोलले. दुसऱ्या गावातल्या समजूतदार पुढारी मंडळींना भेटून मी, आपण दोन्हीकडून समजुतीनं घ्यायला हवं, नाही तर हाणामारी, अंगावरच्या जखमा, दावे, पोलिसांना पैसे चारणं हे प्रकार सुरूच रहातील यातून कोणाचाच फायदा होणार नाही. हे दुष्टचक्र थांबायचं असेल तर दोन्ही बाजूंनी पुढाकार घ्यायला हवा. उद्वेगाने दुसऱ्या पुढाऱ्याकडे गेलेल्या पारधी समूहातल्या लोकांनाही माझं म्हणणं पटू लागलं. कारण आदल्या दिवशी अन्याय, अत्याचाराच्या मोठमोठ्या गप्पा करणारे पुढारी, प्रसारमाध्यमं आणि गाडीच्या डिझेलचा, कार्यकर्त्यांवर झालेला एकूण चौदा हजार खर्च खिशात टाकून चालत झाले होते.

या घटनेनंतर अनेक दिवस पारधी आणि गावकरी यांच्यात समेट होण्यासाठी मी प्रयत्न करत राहिले. शेवटी पारधी समूहाने निम्म्या गायरान जमिनीवर शेती करण्यास हरकत नाही असं गावकऱ्यांनी कबलू केलं. खरं तर गावाला तो अधिकार नव्हता, तरी या कबुलीमुळे गावाकडून पारधी समूहाला त्रास होणार नाही अशी खात्री होती.

मला वाटते मी सावित्रीबाईंची लेक आहे आणि कोणी भेटलं, की मी त्यांना 'जयभीम' म्हणते. सुरुवातीला माझ तसं जयभीम बोलणं ऐकून, आता मी आपली जात बदलली की काय असं उपरोधाने लोग म्हणायचे. पण मी काही थांबले नाही. एखादा पहिलवान आखाडयात उतरल्यावर त्याला जसं त्याला वाटत असेल तसं 'जयभीम' म्हटलं, की अंगात काहीतरी बळ आल्यासारखं वाटतं.

वयाच्या सोळाव्या वर्षी दारूच्या धंद्यातून रग्गड पैसा मिळत पण आज मात्र या पैशाचं आकर्षण वाटत नाही. मुलं-सुना-नातवंडं यांनी पुढे नाव काढावं यासाठी संपत्ती जमवून ठेवण्यापेक्षा समाजासाठी आपला देह झिजावा यात जास्त आनंद वाटतो. लहान वयात घरातल्या लोकांशीच इतका संघर्ष झालाय, की आता बाहेरच्या संघर्षाचं काही वाटेनासं झालंय.

'लोकाधिकार' आंदोलन संघटनेच्या जिल्हा प्रवक्त्या म्हणून मी काम करते. आंदोलनाच्या कामानिमित्त मी सहा तालुक्यांतल्या अडतीस गावांमधून सतत फिरत असते. त्यांनी आता पारधी समूहासोबतच अन्य भटक्या जमातींना संघटित करून त्यांच्या न्याय्य हक्कासांठी लढायचं ठरवलं आहे. सुरूवात आरोळे नावाच्या गावापासून केली आहे. त्यांना वाटतं, या समाजाला आपल्य अधिकारांची जाणीव होण्याची गरज आहे. त्याकरता शिक्षण, आरोग्य, सन्मानाने जगणं, कष्ट करण्याची तयारी दाखवायला हवी. आज एकूणच पारधी, भटके समूह 'ठेविले अनंते'च्या चालीवर आयुष्य जगत आहेत. त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन बदलण्याचा प्रयत्न करायला हवा, आजूबाजूला बघायला हवं.

''मी या कामात आले आणि आधीची द्वारका मेली, कालची द्वारका आणि आजची द्वारका या दोन वेगळ्या व्यक्ती आहेत.'' आपण समजासाठी एकट्या पुऱ्या पडणार नाही याची जाणीव मला आहे. आजमितीस मी शंभराहून अधिक महिला आणि युवक संघटना बांधल्या आहेत,

त्यांना व्यवस्थित प्रशिक्षण देऊन त्यांचा लोकाधिकार आंदोलनाला आणि पर्यायाने पारधी समाजाच्या विकासाला कसा उपयोग होईल असा विचार आणि प्रयत्न सुरू आहे.

### ४.१.२ समुहाच्या मुलाखती–

**व्यष्ठी क्र.१**

| | |
|---|---|
| उत्तरदात्याचे नाव– | राधा मच्छिंद्र पवार, वय–२२ वर्षे, शिक्षण–६ वी |
| | सावित्रीबाई धनसिंग पवार, वय–४६ वर्षे |
| | गोदाबाई राजेंद्र काळे, वय–४१ अशिक्षित |
| | कांताबाई अर्जुन काळे, वय–३५ अशिक्षित |
| | अश्विनी अनिल पवार, वय–३१ अशिक्षित |
| | सुनिता अनिल पवार, वय–२५ अशिक्षित |
| ठिकाण | जामखेड |
| मुलाखतीचा दिनांक | १२.०४.२०१७      वेळ– सकाळी ८.३० |

**समाजाचा उगम व पार्श्वभूमी–**

आम्ही आदिवासी पारधी पहिल्यापासून असच भटकत राहिला कुणाला माहित इथ कस आलोत. पण आमची लोक बऱ्याच वर्षापासून इथ राहायला व्हती. कारण ते लांबून आलो हाओत येवढ्य सांगायची पण नेमक कुठून आलो काय आलो याबद्दल काय लय माहित नाय. पण आमची कायी लोक म्हणायची नगर जिल्ह्यातील खुर दैठव या ठिकाणाहून आम्ही आलो हाओत. पण नक्की अस माहित नाही.

**जाती–जमातीचा उगम–**

आम्ही पारधी, आदिवासी पारधी जातीचा उगम नेमका कसा झाला तो सांगता येणार नाही. पण आम्ही आमचे संबंध पवार–काळे, पिंगळे, चव्हाण शिंदे याच्याशी करत असतो. काहीजण त्याच्यासाठी काही गोष्टी सांगतात पण ती गोष्ट सांगता येणार नाही. आम्हाला त्या निट आठवत नाही.

**भौगोलीक स्थान व स्थलांतर–**

लय वर्षापासून हितच आहे. बाकी फारस सांगता येत नाही. पण अहमदनगर जिल्ह्यातील खूर

दैठव या ठिकाणाहून आलो आहे अस सांगतात. कुन्ही भोपाळ मध्यप्रदेश चे आहेत अस सांगतात.

**बोलीभाषा–**

पारधी, मऱ्हाटी, हिंदी समजती, आपापसात पारधीच बोलत असतो.

**कुटुंब व्यवस्थेची निर्माण झालेली गोत्र व वंशावळी–**

माहित नाही

**जीवन प्रणाली–**

पूर्वीच्या काळी आमची अवस्था अत्यंत वाईट होती. आम्ही अत्यंत हाल काढले कष्ट काढले. लय त्रास होता आम्हाला आता मात्र आमच्यात बदल झाले आहेत. आता आम्ही बदल केला आहे. पूर्वी लोकांच्या शेतात राखणी करण्याचे काम घ्यायचो. कधी विट भट्टीवर कामाला जायाची तर कधी इतर कामाला जायचं आणि पूर्वी तर बऱ्याच वेळा मागून आणून खायची वेळ होती. यामुळे बाकी काही नाही. पण आम्हाला चांगल जीवन जगायला वेळच मिळाला नाही.

**चाली रिती, रूढी परंपरा–**

आम्ही पूर्वी अनेक चालीरीती पाळायचो आमच्यावेळी आम्ही आतले कपडे बाहेर ठेवायचो पण आता नाही. आता आमचे सर्व कपडे आतच असतात. आमच्या सुनांची डिलीव्हरी सुद्धा आम्ही करतो पूर्वी तीला कुणी शिवत नव्हतो. आता आम्ही अस करत नाही आम्ही आता सुधरूण वागतो आहे. जुन्या कोणत्याच चालीरिती आम्ही मानत नाही.

**संस्कृती (देव, धर्म) धार्मिक निष्ठा–**

आमची देवी म्हणजे कोरष देवी त्याच्याच बरोबर खोडीयार, पारधन या देव्या आहेत. आमचा देव देव असतो. आम्ही देव देव करतो. देव देव करण्यासाठी बकर हल्या कापले जाते. आम्ही महिलांना ही प्रवेश देतो. दुजाभाव करीत नाही. आताच मी माझी सून बाळांतीन झाली तिच बाळांतपण केल. चरित्र्याचा विषय असला तर देव देव करत असताना तो पण तिटवतो. आम्ही पारधी फार इमानी आहोत. आमचा धर्मच इमान धर्म आहे. यामुळ आमच्या बायांना पूर्वी देव देव करताना इमान दाखवावा लागायचा पण आता नाही.

**समाजातील भिन्न घटकांचे परस्पर संबंध–**

आमचे इतर समाजाशी संबंध आता आता चांगले आहेत. आता त्यांना अस वाटत की पारधी असे नाहीत की हे पारधी बुवा आता नायका म्हंणे आमच्या सारख रहातात वागतात. तरी पण आम्हीच कुणाशी फारसा संबंध ठेवला नाही. पण पूर्वी आम्हाला काडीची किंमत नसायची. हा इतर समाज आम्हाला आर–तोर नावान बोलायचा हे इकडये तिकडे अशा प्रकारे

**सामाजिक जडण–घडण–**

आम्ही आमचे जीवन यामध्ये थोड बदल केलाय बाकी इतर समाजाच्या लोकांकडे पाहून आम्ही हा बदल केला व आम्हाला जाधव साहेब मधून आधून मार्गदर्शन करीत असतात. त्यामुळे आम्ही आमच्या जीवनात बरेच बदल केले.

**कलास्थापत्य–**

काही नाही पण पूर्वी आमच्या महिला आमच्या घरातील पुरुषांना शिकारीसाठी मदत करीत होत्या पण खास म्हणून आमच्या काही कला वगैरे नाहीत.

**विविध घटक–**

पूर्वी कोणतीच साधने उपलब्ध नसत आता कोणी गाडी दुचाकी घ्यायला लागलेत. व्यसन– याचा विचार आमच्याकडे बायका गांज्या, तंबाखू, दारु सर्व व्यसन करीत होत्या. पण आता यात बदल होत चालले आहेत. पण अगदी हातावर मोजण्या इतकीच घरे आहेत.

**स्त्री जीवन–**

पुरुषांच्या गैरहजेरीत आमच्या स्त्रियांच काहीच खर नव्हत. खूप त्रास भोगावा लागलाय. त्यांना आमच्यावर अनेक पोलिस अत्याचार करत असत. त्यांच्या अत्याराला आमच्याकडील अनेक स्त्रिया बळी पडल्या आहेत. नवऱ्याला सोडवण्यासाठी आयंत कष्टप्रद जीवन त्यांना भोगाव लागत. व्याजाने पैसे घेवून त्याची परतफेड करावी लागते. याशिवाय लेकरबाळ संभाळायच, मिळल काम तर ठीक, नाही तर मागून खायच. या पोलिस स्टेशन मध्ये भास्कर पवार नावाचा पोलिस होता तो आमच्या बायकांवर अनेकवेळा अत्याचार करायचा. त्यांच्या इभ्रतीवर हल्ले करायचा. आमी पण त्याला चांगला धडा शिकवलाय. आम्ही आता पोलिस आमच्या दिशेला जरी आले तरी दगडानेच मारतो. यामुळे पोलिस आमच्याकडे येताना आता दहावेळा विचार

करतात. पूर्वी आमीच कधी पोलिस स्टेशनला जाऊन आम्हीच आमचे कपडे फाडायचो आणि आळ घालण्याचा प्रयत्न करून गोंधळ करायची म्हणून आता ते पण आम्हाला घाबरायला लागले आहेत. ते आता फिरकत नाहीत. मला तर दोनदा पोलिसांनी विष पाजण्याचा प्रयत्न केला. पोलिस लोक इभ्रतीवर हल्ला करून प्रकरण दाबण्यासाठी विष पाजायचे. आमच्या महिलांचा लय हाल केले गेले आहेत.

**सोयी सुविधा–**

आम्हाला लाईट पाणी काही नव्हत आता सर्व दिल आहे.

**विवाह–**

आमच्यात हळदीला जास्त महत्व असत. हळद खेळून गाठ मारली की झाल लग्न करून ज्वारीच्या अक्षदा वाटत्यात आणि लग्न करून घेत्यात. आमच्याच जातीचे लोक तिथे उपस्थित असतात. परिस्थितीनुसार देज, हुंडा पद्धत सध्यातरी नाही. घटस्फोटावेळी भरपाई घेतली जाते. लेखी कागदपत्र तयार करतात. आजूनही आमच्या स्त्रियांना हाणमार होती. या समाजानी तर आम्हाला पूर्वी खूप त्रास दिला आहे. अजूनही काही बायका दारु विकतात, मोल मजूरी करतात व विट भट्टीवर कामाला जावच लागत.

**जात पंचायत–**

जात पंचायत निर्णय देते. कधी जातीबाहेर सुद्धा काढून टाकले जाते.

**राजकीय –**

मतदानावेळी लय पैसा वाटला जातो. आम्ही पण पैसा घेतो व मतदान करतो. घरातील मंडळी सांगतात तेथे करतो.

**आरोग्य–**

ढोर गुंजमुळी (कंबर दुखत) असल तर कुमरडीचा पाला औषध म्हणून वापरत होतो.

आमच्यात बचत गट वगैरे नाही.

**समस्या–**

– पशुपालन नाही– सहकार्य करावे.

– घरच्या घरी आमच्या महिलांना रोजगार उत्पन्न करून द्यावा.

– मिरची कांडप केंद्र, पिठाची गिरण, स्टेशनरी माल, दुकाण मिळण्यास सहाय्य करावे.

**व्यष्ठी क्र.२**

| | |
|---|---|
| उत्तरदात्याचे नाव– | हलीपा फुलदास भोसले, वय–५५ वर्षे |
| | वच्छाबाई लयलंग भोसले, वय–६५ वर्षे |
| | शैला लयलंग भोसले, वय–५५ |
| | निर्मला आसाराम काळे, वय–३६ |
| | लयलंग अनंता भोसले, वय–६१ |
| ठिकाण | मडकेवाडी, लोणी व्यंकनाय, अहमदनगर |
| मुलाखतीचा दिनांक | १२.०४.२०१७ वेळ– सकाळी १०.४० |

**समाजाचा उगम व पार्श्वभूमी–**

गरीब परिस्थितीमूळ आम्ही तिकड नगरला वॉचमन की करत होतो शिती पोती मिळणार होती, स्किम हुती ना म्हणून गायरान जमिन मिळणार हुती म्हणून आलू आमी नगरला वॉचमेन कामाला हुती म्हणून सासरा लय वर्ष झाल वाटला सासू हाये. सासरा गाडी खाली आले आणि मरले असच आमी पोट भरायला मुंबई पुण्याला जायचो ते वाचमन होत. व असचं गाडी खाली अल चक्कर लोक तपासाला आलं टिकीटासाठी गडबडीत टिकीत काढलं नाय म्हणून खाली उतराय लागल आणि त्याच गाडी खाली आलं. मरुण गेल. सासु हाय. सासुला खाजगी जमिन हाय.

**जाती जमाती उगम–**

आमी फासे पारधी

**कथा–दंतकथा–**

माहित नाही, शाळा नाही फिरस्ती होती आडाणी आहे. त्यामुळे काय करता येत नव्हत आता माणसात आलो.

**भाषा–**

हामची च भाषा बोलतो. भिल्लासारखी मारवाडी ची आमची भाषा एक आहे. मऱ्हाटी पण येती.

**आरोग्य–**

मला थायरोड हाअे, पिशवीचा आजार बी हाअे. डाक्टर लोक इलाज करत नाय. मला आदी या प्रश्नाच काय करू सांगा. कोंच्याबी दवाखान्यात गेली की माग पाठवतात. आमच्या आरोग्याला लय मोठा प्रश्न हाय बगा मेडम. माझी अवस्था आता जगण का मरण कशी झाली हाये. माझ पिशवीचा आजार हाय माझा जिव लय माणसात गेला की घाबरा होतोय. तीन वर्ष झाली पाळी नाय. त्याच्या गोळ्या चालू हायेत.

**विवाह–**

भोसले, काळे, चव्हाण यांच्याशी लग्न करतो. आमच लग्न हे आपल वडरासारख तिन मांडवाच बिन बेंड च लग्न. आता मात्र मऱ्हाटी लग्न लागल. पूर्वी विचार घ्यायचे वय समजदार झाल्यावर आता चैत्रालीत जातात. माझ्या लग्नात १७ वय होत.

पूर्वी बाल विवाह व्हायची आता होत नाय. मुलींना शिकवल आठवी–नववी. मुलींचा हुंडा घेतला. वीस–वीस पंचवीस हजार. सर्वांना इचारल तर तेच सगळ्या सांगणार हाअेत.

ही माझी मावळण आहे ती नात्यावर हाय देण–घेण नाही आमच्यात, मुलीला हुंडा मिळतो. किती पण दोन हजार, चार हजार. माझ्या वेळी माझ्या आई बापान १०,००० हुंडा घेतला. लग्न देणे घेण नाही. आमच्यात हळद बाशिंग लावतेत. नवरी नवऱ्याला गाठ मारतात. तुम्ही लय बारीक कायदा काढला आता विसर भोळ झाल तुमी विचारता. मेडम आम्ही पूर्वी लय रानात राहायचो. पण ही जवा निघाल ना तवा पसून आम्ही माणसात आलो. लग्नात पुरीभाजी करतो. मेंदी काढतो. आता बी म्हातार झालो तरी मेंदी काढतो.

वच्छाबाई व शैला (सवती सवती) लयलंग भोसले मालक

आम्ही स्व खुशीने दुसरी बायको करून दिली मग तीला मुलं झाली सध्या आम्ही दोघी एकत्र नांदतो. आम्हाला अडचण नाही.

**चालीरीती–**

आता आमच्या मधी बाया माणसाच लगीन झाल तर दुसऱ्याच्या चादरीवर पांघरूणावर आपण बसायच नाही तो बाट असतो. पहिल्या पासूनच ते आमच्यात पाळतो. पुरुष माणस ते अंगावर घेतात म्हणून. जस आपला कपडाच तर बाकीच्या बाया माणसांनी त्यावर बसायच नाही. घरात

समान आहे. पण दुसऱ्यांनी शिवायच नाही. आता कस आपल्याला तुळजापूरची देवी हाअे, नवनाथ ती हाअे. भक्ती हाअे म्हंजी हे सगळ पाळून धराव लागत. वाड–वडीलांपासून चालत आलया. ती सगळ्याची आहे. कपडा घरावर टांगवायचा नाही. आंघुळ केली तर हातपाय धुवून टाकायच निर्मल करायच असय आमच्यामधी. बाळांतपण घरीच व्हायची, मी माझी स्वत:च केली. पूर्वी स्वत:चीच स्वतः करायची आता आई, जावा मदत करतात. पूर्वी तिची तिलाच करावी लागत असायची. तीला मदत करायची तीला शिवायच नाही न तिन तिचीच उठून आप आपल धुनं धुवायच बाकीच्यानी तीला पाणी ही द्यायच नाही. आता शिवत नाहीत पण मदत करत्यात, आई मदत करते. जावा भावा मदत करत्यात. औषध काय नाय. जुण्यापणी शेकनाय, शेकोटी नाय, तेल मधी गुळ चुरायचा व बाजरीची भाकरी चुरुन खायच तीच खायला द्यायच. बाकी खारी–खोबर नाय. आपली आपण बाळालाही आंघूळ घालायची.

**बाट केव्हा होतो–**

घराला लाथ मारायची नाय. बायांनी लाथ मारली की बाट होतो. वस्तूला लाथ नाय मारायची, गडी माणस दुसऱ्याच काय खात नाही. अजून पाळतात.

**देव–देव–**

जत्रा, झाली जागरण झाले गडी माणसांनी करायच आणी त्यांनी दिल तर मग खायच नाहीतर आम्ही बाया माणस तिकड फिरकत बी नाय. बाया माणस त्यात सहभागी बी होत नाय. आमच्या लय दिसापासून हे चालत आलय. तुळजापुरचा, नवनाथाचा इकडे बेलापूर चा देव देव करतो. देव आमच्या अंगात येतच नाही. फक्त गडी माणसांच्या अंगात फक्त येत हे आमच्या वाड वडिलांपासून चालत आल आहे. आम्ही इकडे तुळजापूरला जातो. म्हंजी भोसले–तुळजापूर, काळे हे काळुबाई, राशिनची आई. तिकड वनीची आई हे काळे जातात. पिंपळे आमचे नाय.

**समज इतर संबंध–**

इतर लाक आता चांगले वागतात. आधी वागत नव्हते. त्यांची तरी काय चूक हाये. आम्हाला आदि कस रहायच. काय करायच, माहित नव्हत. जवा ही वावरं भेटली ना मग आम्हाला कळायला लागल. पूर्वी खूप त्रास दिलाय. पूर्वी सासू–सासऱ्यांना लय त्रास दिलाय. चोरी झाली की घे आळ त्यांच्यावर आम्ही सर्व जण इथे बसलोय आमची सर्वांची हकीकत तशीच हाअे.

आम्हाला चोरटी समजायचे आता सर्व जण सहकार्य करतात. मराठी लोक सहकारी करतात. आम्ही सर्व एकत्र रहातो. जरी आपापसात भांडण व्हत्यात पण आमच आमीच मिटवून घेतो. आता आमची स्थिती बदललेली आहे. बाकी लोक आमच्याशी आता चांगली वागतात.

जात पंचायतीची मदत होत नाही. आमच्यातली भांडण आमच आम्हीच मिटवतो. तेवढ भांडणच आम्ही करत नाही पण आम्ही भांडण करतच नाही.

**समाज बदल–**

वाटत ना. सरकार जी स्किम देतचय आपली लोक बदलावा म्हणून त्याचा आम्हाला उपेग होतोय. बदलतय सगळ मुल आमची लय शिकलीत शेती करतात. आमच्या मुलांना नोकरी नाही. शासनाने घरकुल व गायरान जमिन दिली प्रत्येकाला २ एकर जमिन दिली. त्यामुळ आमची परिस्थिती सुधारली. मतदान करतो. मतदान करण्याचे समजते. अजून मेंबर नाय. बायका राजकारणात नाही. तो मोठेपणा येत नाही आपली काम करायची पोट भरायची.

**जीवन प्रणाली–**

दिवसभर काम शेतात.

**जातीचा उगम–**

माहित नाही

**व्यसन–**

आम्ही काहीच व्यसन नाही.

**व्यवसाय–**

मस्त शेती हाअे चांगल भागत खाऊन पिऊन सुखी हाअे पण मला अस वाटत की जणू काय मला आताच मरण येईल. बचत गट नाही. भरपाई असते. पण सध्याला आमची गरीबीच आहे. लय श्रीमंती आहे.

**कुटुंब व्यवस्था–**

घरात मी मालक हाअेत. आम्ही दोघ मिळून खर्च करतो. सर्व कागदपत्र आहे. आधारकार्ड, मतदान कार्ड सर्व आहे.

चांदीचा गोढ जुन्या पद्धतीचा घातलाय. उपवास करतो. गाणी येतात. गाणी जत्रात, देवाच्या

वेळेत म्हणायची. आमची गाणी तुम्हाला कळणार का?

चला बायानो मला देवीला जायाच

तुळजा देईच देवूळ डोळ्याण बघायचं

ही गाणी देवा धर्माची गाणी.

**लग्नाच गाण–**

धोबीचे धोबर गिरणा उजाल लेकर कपेडे

थेरे कपडे परंगाचे छोडो के जियोरे

सायरे बंगला नबंग बंग ले, छे, बागु मोरे एतोनी,

घोडा अण घोडी जेवुत झेडो सायबा (जुन्या पद्धतीचे हे गाणे हाय)

**हळदीचे गाण–**

जिमोरे जिलो, हळदी ने छे तेशारी मंडप शियक

शियल शियक तारा गर्मी वाड तारा मंडीर शिवस

निळोरे निळे हालदीचे चोघों

हळद कालवताना ते हळदीच्या वेळी म्हणतात.

**समस्या–**

– सरकारनं आम्हाला लाईट द्यावी.

– कर्ज द्यावी.

– आरोग्याचा प्रश्न आहे मदत मिळावी.

– आरोग्या विषयी तरतुद करावी.

– शेरड करड मिळाव

– आहे त्या जमिनी नावावर झाल्या पाहिजे.

– गावकरी त्रास देतात, ठराव घेतात, अतिक्रमण नसाव वगैरे, पारधी समाज नको

– कामा पुरते मामा करत्यात आम्हाला.

– मतदानाला मस नेत्यात.

– माहिती कोणतीच देत नाहीत सोयी सुविधा नाही.

**व्यष्ठी क्र.३**

| | |
|---|---|
| उत्तरदात्याचे नाव– | तारीका विशाल भोसले, वय–२५ वर्षे (हिंदू पारधी)<br>लिलाबाई रमेश काळे, धनगर पारधी |
| ठिकाण | लिंपनगाव, अहमदनगर |
| मुलाखतीचा दिनांक | १२.०४.२०१७ वेळ– दुपारी ३.३० |

**जातीचा उगम–**

आम्ही इकडेच जन्मलो. मला बारामतीला दिलं पण तिकड जरा प्राब्लेम असल्यामुळ मी इकड राहिली आहे.

**बोली भाषा–**

कामावर मराठी भाषा बोलतो आणि घरी पारधी आमची भाषा बोलतो.

**कुटुंब व्यवस्था–**

घरी दिर असतो नवरा, पोर असतो. मी नवऱ्याला घेवून माहेरात रहाते. काय जावा भावांच पटत नाय. जात पंचायत नाय केली तसच राहिलो. सासू सासऱ्यांनी त्रास दिला नाही. आम्ही पूर्वी पालात रहायचो आता घर बांधलं आहे. दोघही घर चालवतो, १२ वर्षाच्या पुढ आता लग्न करतो. पण पूर्वी लहाणपणीच लग्न व्हायची बाल विवाह होतात.

**व्यवसाय–**

साखर कारखान्यावर उस तोडणीचे काम आम्ही करतो. इथ कष्टान आम्ही घर बांधलय. सिजन संपल्यावर मजुरी करती १५० रुपये रोज मिळतो.

**देवदेव–**

ऐपतीनुसार आमचा देव भवानी आहे. समाईकात देवदेव केला तर दहा बारा बोकड असतात. आमचे पुरुष माणसच देव देव करतात.

**जातपंचायत–**

छोट्या किरकोळ तक्रारीसाठी किंवा इतर कारणासाठी जात पंचायत बसते. जात पंचायत काही गुन्ह्यांसाठी शिक्षापण देते दंड भरावा लागतो. नाय भरल्यास जातीतून काढले जाते. भरपाई

द्यायची आणि म्हजी अस की समजा एखाद्या पोरीवर बलात्कार झाला असाल किंवा तिची खोड केली असलं तर तिच्या आई बापाला भरपाई दिली जाते. आणि एखादी बाई लग्न झालेली असली तर तिला दंड द्यावा लागतो. नंतर दुसर लग्न (म्होतूर) करून दिले जात.

**समाज संबंध–**

गावात लोक त्रास देतात. त्यांच्याकडे बघूनच सुधारवस वाटत. अंतरजातीय विवाह मान्य नाही. केलच तर जाती बाहेर काढतात. आम्ही काळे, पवार, शिंदे यांच्याशी वैवाहिक संबंध ठेवतो. उसतोडी वेळी मी पोरींच्या शाळा बंद केली. पोरी मोठ्या झाल्या की हाताखाली मदत करत्यात सोय होती. राणात गेल्यावर बाकींना संभाळण्यासाठी ती पोरगी शाळेत जात होती. पण तिला शाळेतल समजतच नाही. मग काय करायच? त्या पेक्षा नाय गेलेल बर. खर्च करून कुनी सांगितलय शिकवायला. तीला वळणच नाय मग जाऊ द्या. म्हटल तीला आल वळण नाय आणि बळ वळण नय दोन मुली हास्टेला हायत. सर्व कागदपत्र आहेत. बचतगट आहे. फायदा होतो. मतदान करतो. समजत, पैसे घेत नाही ते म्हणत्यात आम्ही तुम्हाला घर बांधून देवू तुमची सोय करू आपल त्यांच्या आशेवर बसतो पैसे न घेता मतदान करतो. पण आम्हाला आमच्यासाठी हे काहीही करत नाही आता पैसे पाणी देवून घरकुल मिळाल मंजूर होवून ५ वर्ष झाली जागाच नाय म्हणून अजून देत नाहीत.

**व्यसन–**

तंबाखू खाते, गुटखा खाते, गडी माणस मरणाच दारु पितीत आणि मारतेत काहीही कारणावरून मारतात त्या. सर्व सोयी सुविधा नाहीत.

**सण–समारंभ–**

सर्व सण समारंभ उत्सव साजरे करतो, तुमचे आहेत ते. काळूबाई, पंढरपुर देवाला जातो. पूर्वी डाग नव्हते. आमची लग्न पूर्वी पालात व्हायची. हळद लागून पालाला फेरी मारली की झाल लग्न.

**संघटना–**

आमच्यापर्यंत अद्याप कोणी नाही पण अरुण जाधव हे येतात. पण म्हणतात चला मोर्चाला अंदोलनाला पण अजून काय ते मिळालच नाय. राजकारणात कोणीच नाही. महिला संघटना

माहिती नाही. पोलिस सध्या त्रास देत नाहीत पूर्वी लय दिला.

**शिक्षणाची सोय–**

शिक्षणाची सोय आहे. पण लांब आहे रहदारी आहे. मग मुलांना तरुण पोरींना लांब पाठवत नाही.

**व्यष्ठी क्र.४**

उत्तरदात्याचे नाव– लिलाबाई रमेश काळे, वय–३५ शिक्षण–अशिक्षित

वनिता शांताराम काळे, शिक्षण–अशिक्षित

ठिकाण लिंपनगाव, अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक १२.०४.२०१७ वेळ– सायं ५.००

**समाज व जातीचा उगम–**

आम्ही धनगर पारधी यांच आणि आमचं थोड वेगळ आहे. आमच्या आणि भोसलेंच्या बोली भाषेत फरक आहे. बाकी सर्व सारखचं आहे.

**चालीरिती–**

आमची लग्न रात्रीच लावतो. पैसे टोपी ठेवून वयस्कर माणसांनी टिळा लावायचा, हळद लावायची झाल लग्न, सकाळी हिंदू पद्धतीन लावायच. पारधी समाजात दुसर लग्न करायच झाल्यास पहिल्या नवऱ्याचे मुलं त्यांच्याकडेच ठेवून जायच असत.

**जीवनमान–**

कागपत्र नाहीत. हाणमार होत नाही. माझ्या नवऱ्याचा त्रास सांगितला तर तुम्ही आमच्या नवऱ्याला अटक करताल का? मालक लय येडसर झाल पिऊन गाडी चालवली. ॲक्सीडेंट झाला. लय पैसे गेले निट केल. पण जरा येडसर झालाय.

व्याजाचे पैसे न दिल्यास ते येवून साडी सोडून घर बाटवतात, साडी फेकत्यात. बाटवल कि जाती बाहेर टाकतात. बाईन लघवी केली आणि शिंपडल तर लय मोठाबाट झाला. मग आम्ही घर बाटल्यावर काय त्या घरातलं खाणार पिणार नाय. बाळंतपण घरीच करतो. पण बाहेर लय खर्च होतो. जुने लोक एखाद्या बाईच्या बाळंतपण. नवरा पोटावर पाय देतो व मोकळी करतो. पाळी आल्यावर पाळतो. आमची शेजारीन मीना हिच्या नवऱ्याला देवाच लय वेड होत. त्यान नऊ दिवसाचा निरंकार उपास केला त्या नादातच फाशी घेतली. ४ मुले आहेत तिची सोय करा. तुम्ही

आमच काय तरी बघा.

पोलिस लय बाऱ्या त्रास देतात. कर्ज काढून नवऱ्यांना सोडवल.

**आरोग्य–**

दवाखान्यात आम्ही कितीही आजारी पडलो तरी फक्त गोळ्या देतात. इंजेक्शन देत नाहीत. सलायन लावत नाहीत. आम्हाला शिवत नाहीत फक्त गोळ्या औषध देत्यात. वागणूक चांगली देत नाहीत.

**समस्या–**

घरकुल असाव.

जवळ शाळा असावी.

विधवा परित्याग महिलांची वेगळी सोय करावी. विधवाबाईची स्थिती आमच्यात लय वाईट आहे. त्यांच्यासाठी काही तरी करा.

**व्यक्ती क्र.५**

| | | |
|---|---|---|
| उत्तरदात्याचे नाव– | मंदा राजू काळे, वय–४७ वर्षे | |
| | कविता मालशा भोसले, वय–३२ | |
| ठिकाण | लिपनगाव, अहमदनगर | |
| मुलाखतीचा दिनांक | १२.०४.२०१७ | वेळ– सायं. ७.१० |

**जात/समाज उगम–**

आम्ही फासे पारधी पोलीसांनी ऊसकावले इथ आलो. या आधी श्रीगोंद्यावरून आले सासू–सासरे कोळगावाला आले. कोळगावाला भानगाव वरून आले तिथून आले आता तिथून कुठून आल माहित नाही. काम धंदा नाही शेती नाही घर नाही खडकी, आरणगाव आमची गाव.

**बोलीभाषा–**

घरी पारधी तुमच्याशी मराठी

**उपजिविका–**

कष्ट करायच, जगायचं कशाच आलय जगण्याच साधन आणि काय अस बकऱ्या करड घेतल

ना मॅडम लोक ते चारू पण देत नाहीत. मंजूरी करतो. मग पोट भरतो. आम्ही चोरी बीरी तसल काय बी करत नाय बगा मॅडम पण तरी पण हाय ना आमच्यावरच नाव येत बगा. कुठ जरी चोरी झाली तरी म्हणत्यात  पारध्यांनीच केली. आमच्या यावर काय उपाय बिपाय नाय का? आम्ही सध्या मराठ्यांच्या शेजारी रहातोय. त्यांना आता आमची गॅरंटी हाय की हे चोरी करणार नाय. म्हणून त्यामुळ ते आमच्यावर आळ घेत नायं.

आजपर्यंत आमच्या नवऱ्यांना पोलीसांनी आत टाकल नाय. पण आमच्यात लय बायकांना त्रास होतात. आमच्या बायका जर नवऱ्यांना पोलिसांनी धरल आणि आत टाकल तर त्याला सोडवण्यासाठी अनेक ठिकाणी पैसा पाणी बगतात सोडून आणल्यानंतर नवरा परत धोपटा धोपटी बी करतो. कवा मवा दारू पण पितो. पैसा पाणी कुठुन आला कसा जमवला. संशय सुद्धा घेतो. नंतर भांडणच भांडण. कर्जावाली लोक सुटून आल्यावर घरी येणार आणि मॅडम डोक्यातून डोक्यात दगड जरी घातला तरी आमच्याकडून पैसे मिळत नाय. एकीकड काम नाय धंदा नाय पैसा नाय, कर्जबाजारी पणा वाढतो. त्यातून भांडण मग बायकांना मारहाण हायच मग वाट्या बिट्यानी कुणाच शेत करायच. इतर लोक काही चांगल वागवतात. काही वागवत नाही. शेती करतो. खर्च माझ्याजवळ असतो. कागदपत्र आहेत.

**देव–देवता–**

आमच्या रिवाजाप्रमाणे देव देव प्रमाणे आमची सगळी कपडे बाहेर आहेत. आता आम्ही इथ देव देव करायला आलोय पण समद गडी माणसच करत्यात आम्ही हात बी लावत नाय. यात्रा उत्सव नाही. ही काय असच देव देवाला एकत्र यायच, खायच–प्यायच आणि जायच. टोणगे नाही आता बोकड आहेत.

देव देव करताना देवाला गुढी लावायची. आमच चांगल करा सांगायच आमच बी चांगल होवू द्या म्हणायच आम्हाला बी शेतीवाडी मिळू द्या माणसात येवू द्या अस देवाला सांगतो दुख न भान जाऊ द्या सांगाव.

**जात पंचायत–**

आधार घ्यावाच लागतो मस त्यांच्यावर विश्वास नाय पण कधी कधी इलाज नसतो. जात पंचायत चांगला निर्णय देतात. पण पैसे खाऊनच करतात. आज आपल वकील तरी काय वेगळ

करतात. आपल खर राहू नाही तर खोट, माल भेटला की झाल. त्यांच्यात आणि आमच्या जात पंचायतीत काय फरक हाऐ तेव्हा पारध्यांकडूनच लय माल वडतात. काय झाल की धरल पारध्याला टाकल आत येवढच करत्यात. लय हाल असत्यात समद्या बाजूंनी आमचे.

**राहणीमान–**

आताच्या बायका म्हणजे गॅस, शेगडी पाहिजे. तुमच्याकडून मागून आणून शिकलो तुमच्या सारखं वागायला शिकवतो. इतर समाज आम्हाला चांगल वागत नाही. आता पोरगी म्हणती की पोरांना शिकून दे खर्च कुणा कुणाला करायचा. बचत गट नाही खायच. सुणासुदीला मुंबईला मागायला जातो. भिक मागायला मुंबईला जातो कारण तिकड चांगल मिळत भिक वगैरे मिळते तिकडेच जाणार हाय मी पण. आमच्या मुलींवर बायकांवर बलात्कार होतो. आमची पारधी लोक करतात. जर तिच परत लग्न करायच म्हटल तर लय माल लागतो. तर दुसर व्हत नाही तर हायेच आई बापांकड. तेवढा पैसा आपल्या कड नसल्यामुळं ती पोरगी आपल्याकडच रहाते. विधवा माहेरातच राहते.

**लग्नविधी–**

देज द्याव लागत १६०० रु. देज घेतला. मुलगी आमच्यात खूप आहे. आंतर जातीय विवाह केल्यास आम्ही जातीतून बाहेर काढतो. परत घेत नाही. आम्ही फक्त चव्हाण व काळे यांच्याशी विवाह करतो. लग्न साध्या पद्धतीन करतो. हळद ही लावतो गाठी मारतो झाल लग्न

**शिक्षण–**

माझ्या दोन मुली १२ वी सायन्स हायेत. स्कॉलरशिप मिळत नाही. मुलगी मोठी झाली की काळजी वाटते. सासरी गेल्यावर शिकवत नाय

**आरोग्य–**

घरच नाय तर शौचालय तर कुठून भाड्या तोड्यानी राहातो. आरोग्याचे प्रश्न आहेत आमचे गुडगेच लय दुखतात. आम्ही कामाला गेलो की मालक लोक म्हणणार की ही बाई काहीच काम करत नाही. दवाखान्यात हात लावतात. चांगल बघतात.

**मृत्यु विधी–**

प्रेताची विल्हेवाट करतो. जंगलात वगैरे करतात. दुसरे कोणी जागा देणार? म्हणून रात्रीच

करायच मीठ बीट आणून

**राजकीय–**

मतदान करतो. नाय हाय ते चुकणार नाय रूपया देत नाय एक पै देत नाही. दारुड्याला दारु देतात फक्त तुमच्या सारख आम्हांला मतदान करताना सांगत इथ द्या तिथ द्या मग तिथ देतो. राजकारणात आमची पुरुष पण नाय आणि महिला पण नाय.

**रुढी–परंपरा–**

बाळंतपण स्वतःच करावी. धुण, बाळ आपणच सर्व करायचा

**समस्या–**

गॅस पाहिजे, घर पाहिजे, शेती पाहिजे, टायलेट पाहिजे, जमिनी पाहिजे

**व्यक्ती क्र.६**

उत्तरदात्याचे नाव– वर्षा संतोष चव्हाण, वय–५५ वर्षे शिक्षण नाही

कांताबाई संजय काळे, वय–५१ शिक्षण नाही

ठिकाण लिपनगाव

मुलाखतीचा दिनांक १२.०४.२०१७ वेळ– सायं. ८.०५

**जात/समाज उगम–**

जात पारधी हिंदू (हिंदू पारधी) आम्ही फासे पारधी दंतकथा माहिती नाही. सर्वजन मेले त्यामुळे इथ कुठून आली काय सांगता येत नाही. आरणगाव ३ री पिढी चालू आहे पण आम्ही नगर वरून आले होते.

**बोली भाषा–**

पारधी, मराठी

**व्यवसाय–**

मजूरी, बिगारी काम करतात. शेत मजूरी करतो. पशुपालन करतो पण चारी नाही तर मरतात. बचत गट नाहीत. शहरांमध्ये पोट भरायला जात नाही.

**चालीरिती–**

व्यष्ठी ४ प्रमाणे

**देव–देवता–**

खंडोबा, आता आमी पैसा भेटल तवा करतो. यात्रा उत्सव रानजत्रा असते. अंगात येत नाही.

**जात पंचायत–**

जात पंचायतीचा आधार कधी घ्यावा बी लागतो कधी नाय बी. जात पंचायतीचा आधार घेत नाही मीच मिटवते. बऱ्याच महिलांच्या केसेस येतात पण त्यांची दखल कोण घेतो.

**शिक्षण–**

शाळा जवळ आहे. आम्हाला कुणीच शिकवल नाही. कागदपत्र सगळ आहेत. मुलींच्या शाळा बंद केल्या. एकीच लग्न झाल म्हणून. मोठ्या झाल्या म्हणून.

**व्यसन–**

तंबाखू, मिश्री आहे.

**अन्याय–अत्याचार–**

पोलीसांनी मला पोलिस स्टेशनला नेले तर काही नाही इथ सगळच माहिती लय खोल वर चौकशी बारीक का करीता? मुलींवर अत्याचार होत नाहीत.

**लग्न–**

लग्न मराठ्यांप्रमाणे करतात. काळे भोसले शी आम्ही लग्न करतो पवारांच्या दारात सुद्धा आम्ही जात नाही. आमच लग्न पारधी पद्धतीने चाललय.

**मृत्यु विधी–**

मयताला पुरतात. त्यासाठी तरी शासनाने जागा द्यावी कधी–कधी दहा दहा दिवस मयती आमच्या पडून राहतात. आमाला त्यासाठी तरी जागा द्यावी सरकारने.

**राजकीय–**

मतदान करतो. मतदान कुणाला करायच कळत. पैसे देत नाही. लय आश्वासन देतात.

**संघटना–**

काम करत नाहीत आम्ही मदत देत नाही.

**समस्या–**

घर पाहिजे.

गॅस पाहिजे

मेल तर पुरायला जागा पाहिजे.

**व्यष्ठी क्र.७**

| | |
|---|---|
| उत्तरदात्याचे नाव– | सुरेखा राज भोसले, वय–३० वर्षे शिक्षण नाही |
| | आसराबाई इंद्रभान काळे, वय–४२ शिक्षण नाही |
| ठिकाण | कुळधरण |
| मुलाखतीचा दिनांक | १३.०४.२०१७ वेळ– सकाळी ८.४० |

**समाज उगम–**

तीन पिढी इथच झाली त्यामुळ आम्ही हितलेच आहोत.

आम्ही फासे पारधी आणि आमची परिस्थिती लय वाईट हाय मॅडम आहो माझ्या लेकीला तर इतका वनवास हाय ना तर सितन पण येवढा वनवास भोगला नसल. येवढा वनवास हाअे मला पण आणि माझ्या लेकीला पण आम्ही दोघी पण फासे पारधी

**दंतकथा–**

काळसंग राजाची कथा आहे. म्हजी आमचा पहिल्या पिढीला तो नवसाला नव्हता तो डोंगरावर होता त्याला मुलबाळ नव्हत तो आमच्या काळू बाईच्या देवळात गेला आणि मग काळूबाईन त्याला एक फळ दिल आणि तिन भाकरी दिल्या आणि सांगितल की तु घरी गेल्यावर तुझ्या बायकोला चार त्यामुळे तीला दिवास गेले देवाने त्याला सांगितले तुला मुल झाल की पहिल बाळ पहिल्यांदा देवाच्या बोरी पाशी आणून टाकायच आणि मग बाळांतीन झाल्यावर आमच्या राज्याच्या राणिन ते बाळ बोरी खाली ठेवल. मग तिथ काळूबाई आली आणि तीन बाळ नेहल त्या बाळाला लहाणाच मोठ केल. मोठ झाल्यावर ते बाळ मोठ होवून तरुण झाल. सर्वांच्या खोड्या करू लागल. बायकांच्या घागरी फोडू लागल. नंतर आमच्या काळूबाईला सहा महिन्याची झोप लागली. माझी सेवा तुला करायची त्याच नाव जगदेव ठेवल. काळूबाईची झोप

सहा महिन्याची होती. त्यावेळी त्यान दिवा बत्ती सेवा करण लय गरजीच व्हत पण त्यो पोर आईची सेवा न करता गोट्या खेळायला गेला. पोरींच्या घागरी फोडायला गेला मग काळूबाईला जाग आली आणि तीन त्याला आवाज दिला पण तो तिथ नव्हता म्हणून आईन म्हातारीच रूप घेतल ती कशीतरी दिसायला लागली सगळ्या माशा तिच्या भोवती घोंगायला लागल्या. आणि ती मुला जवळ गेली मुलान तीला वळखली नाय. त्यान तीची पण छेड काढली मग तीन लगीच देवीच रूप घेतल त्याच्या आईच रूप घेतल मग त्यान तीला ओळखल मग तीन त्याला घेवून शिक्षा केली व देवळात घेवून गेली. त्यामुळ तीन पारध्यांना बोकडाच करीन पारधी दुसऱ्याच्या शिव्या खाईन, त्याच हाल होतील अस सांगितले.

अशा प्रकारे आम्ही पारधी राजा आहोत. मोठ आहोत पण सरकानी आम्हाला खाली टाकलय. आमच कूळ लय उच्च होत.

आमची भाषा गुजराती भाषेची संबंध पारधीच बनतो

कुटुंब प्रमुख मालक आहेत. प्रत्येक घरागणीस वेगळ असत.

**व्यवसाय–**

मला तर लय परिस्थिती आहे मी मजूरीच करते ६ महिन्याचा कारखाना करायचा म्हजी सहा महिने इटभट्टी करायची. खुरपायला जायच रोजगार हमी योजनेची कामे करायची. माझ खूप हाल आहेत. मला वावर नाही काहीच नाही. ही लेकर चैताचा महिना संपला की शिंग्यापर्यंत माझ्या मुली तमाशाला जातात. तमाशाला पोर सुना, मुली जातात बाया नाचवतात. पहिला हा धंदा कोल्हाट्याचा होता पण आता पोट भागत नाय म्हणून हा आमचाच धंदा झालाय. माझ्या मुली सुना सगळीच नाचायला जातात.

माझी सुद्धा परिस्थिती खूप वाईट आहे. मला तुमी बोलायला वेगळ द्या.

**उपजिवीकेचे साधन–**

तुकड मागायच, शेती नाही काही नाही मग काय करायच. आम्ही जर मागायला गेल तर आम्हाला शिवी गाळी करत्यात लय वाईट वागणूक देत्यात. आमचा धर्म हे असा आमालाबी देवान पोट दिलय ना मग ते भागवायच कस. आम्ही भिक मागण्याशिवाय काय पर्याय आहे.

आम्ही शहरात पुण्याला भिक मागायला जातो. पुण्यात भिक मागून स्टेशनला जातो. देवळाकड,

दत्ताच्या मंदिराकड, मारुती मंदीराच्या तिथ बसायच आणि मागायच नंतर फूटपाथवर झोपायच पोलीसांनी हाकलून दिल की तेवढ्या पुरत निघल्या सारख करायचं अण परत येवून तिथच झोपायच.

आमचा देव काळूबाई, लक्ष्मीबाई, पारधन देवी ला पाल आहेत. मराठ्याच्या देवीला देऊळ आहे.

आता आमची पोर येवढ शिकल तरी मागायला जाव लागत. आता आमच्या पोरांना शिकून नोकऱ्या मिळना म्हणून आमची पोर नोकऱ्या शोधून दमले आणि आता नोकरी मिळणा म्हणून दारु बी प्यायला लागले.

**चालीरिती–**

आमची कपडे बाहेरच असतात. सर्व इतरांप्रमाणे बाहेरच असत. आम्ही कोरडा शिधा देतो अण जेवतो.

मतदानाला मस घेवून जातात. वाहतुक व्यवस्था काही नाही. पायी चालावी लागते. आम्हाला लाईट, पाणी काहीच नाही.

आमच्या बाया दारु, तंबाखू, गुटखा खातात.

आमच्या नवऱ्याला विनाकारण पोलीसांनी अटक केली. मग त्याला सोडवायच त्याला सोडवण्याच्या गणगणीत लेकर, पोरी मागूण खायला गेले. मग मागायचे अण खायचे. शाळेला मुलींना पाठवले पण बापालाच अटक केली म्हटल्यावर पुढ शिक्षणाची काहीच सोय नाही. बंद केल. नंतर नववीतून पोर बाहेर पडल. सध्या घर पालच आहे. सण समारंभाला मागूण खायच.

**सामाजिक संबंध–**

आमच्या पोरीला इंदापूरात दिली होती तिथ त्यांनी नांदविली नाही. तिथून डिलव्हरीला आली त्यांनी तिथ पोट बीट तीच दाबल पण तीला ते सैनच झाल नाही मग ती माझ्याकड आली मला बाया म्हणाल्या तुम्ही अस करा सिव्हीलला न्या मग मी हॉस्पीटलला नेल पोरीच अंगावून चालल. पोरगीच बाळ आतून पार कोरड पडत चालल. मग डाक्टरांनी शिजर करायला लावल मग त्यांनी विचारल बाळ पाहिजे का बाई पाहिजे मग मी म्हणायचे दोन्ही पाहिजे. मग शिजर करायला लावल मी तस केल म्हणून तिच्या नवऱ्याच्या आईनी दुसरी बायको त्याला करून

दिली. त्या पोरीच आयुष्याच वाटूळ झाल. मीच सगळ परत तीच केल. तीची लय वाईट अवस्था हाये. तीच्या नंतर आणखी काही पारधी आल व तीच्या अंगावर देव घातले. तीचा ठिकाणा व्हावा नाय म्हणून देव घातलेत. मग आम्ही दुसर पण लग्न करून दिल. तिथ पण थोरल्या नवऱ्यांन माझी बायको तू का केली? व ती वाईफट आहे. अस म्हणून फोन केला ती आता दुसऱ्या नवऱ्यापासून गरोदर होती. ती परत माझ्याकड आणून पोहोच केली.

तेव्हा मी सोमेश्वर कारखान्यावर कामावर होते. मी कामावर गेले की, मागण थोरल्या नवऱ्यान याचच हाणमार करायची लोक जमवायची अण तमाशा करायचा मग एक दिवस शेजारच्या बाईनी तीला तीच्या कोपीत लपवून ठेवली. तिथून माझ्या पोरीन मला फोन पाठविला मी तिथून १० कि.मी. आंतरावर चलून उस तोडायला जायच मग मी तिथून कवा यायची व साथ द्यायची. मग मी कारखान्यावाल्यांना फोन केला. मग त्यांना दम द्यायला लावला त्यांनी त्याला सांगितल. मग दोन शिजर झाले पाहिल्याची एक पोरगी दुसऱ्याची एक पोरगी अस दोन पोरी व माझी पोरगी दुसऱ्यानी बी माझ्याजवळ पाठवून दिली. मग अशा आई बापान काय करायचं?

आम्ही काय कारखाना करायचा काम धंदे करायचे की पोट भरायची काय करायच तुम्ही सांगा पाच वर्ष झाली पोरगी माझ्याकड हाये. गावावाल्यांनी जयभीमच्या एका पोरानी मी कामाला गेल्यावर तीची इज्जत घेतली. बलात्कार केला. मग मला सहन झाल नाही. मग मी केस केली. काही लोकांनी केस न घेण्यासाठी प्रयत्न केला आम्ही दोघ नवरा बायको म्हटलो आम्हाला इथच फाशी शी द्या पण आमची केस घ्या ती जयभीमची लोक आम्हाला तिथच डांगडींग करायला लागली. मग नाय होय करत दुपारी २ वाजता केस घेतली पोलीस आम्हाला आत टाकतो म्हटले आमी पण म्हणलो टाका पण ते आम्हाला बाहेर बी निघून देत नव्हते. आणि आत बी टाकत नव्हते. आमच मालक घाबरलच नाय ती शिकलल हायेत. त्येंना वाटायच बाहेर निघू दिल्यावर हे नगरला जातील आणखी कुठ जातील लांब पतूर म्हणून पोलीस आमाला तस वागवत व्हत. आमची केस बी घ्यायना आणि जाऊ बी द्यायना आज ती केस चालू आहे की नाही काहीच माहित नाही. त्या पठाण साहेबांच्या हातात केस दिली. तीला भरपाई नाय. वटीभरण नाय.

आम्ही उपिशन धरल आव आमची लय मोठी स्टोरी हाअे या बलात्कारानंतर १५–१५ दिस आमची चूल बी पेटली नाय. बलात्कार करतात, माझ्या मुलीच नाव सपना आहे. वय २० आहे.

तीच लय हाल हायेत बघा मॅडम काही तरी करा...

आमच्या पोरी फडात नाचायला जातात भाऊतर काय सांगू दुखाच्या वैरीच असतो बघा सासरी असल्यास सुखान दोन दिवस बोलणार पण माहेरी असल्यास सदा कदा तिरस्कार करत्यात. या भावान अण त्या भावान चेंगरायच. माझ्या माग तीच कस व्हणार? सीता वाणी हाल आहेत तीच मी कोणा कोणाला संभाळू रोज खडी फोडायची, मजूरी करायची, रोजगार हमी करायची, वाटला तर तमाशा बी करायचा, कुणाचा गु म्हणल तरी उचलायचा का? तर पोटासाठी आमच्या अशा लय मुलींवर हा अत्याचार होतो. थोरल्या नवऱ्यानच करणी केली. की तीचा ठिकाणा लागावा नाय म्हणून आम्हाला कोणाचा पाठींबा नाही, वाली नाही, म्हणून समद चाललय.

**मृत्यु विधी–**

प्रेत पुरुण ठेवायच चोरुण करायचा कुणाला न सांगता करायचा म्हंजी होतो नाहीतर प्रेत पुरु देत नाहीत.

उपास नवरात्र करतो.

पशुपालन नाही.

कागदपत्रे ओत.

शौचास बाहेरच जातो.

बचत गट नाही

**राजकीय–**

मतदार यादीत नाव आहे समजा पैसे मतदान करण्यासाठी दिले की जो निवडूण येतो त्याच काय नाय पण जो पडतो त्यान लगीच आमच्या बोकांडी बसायला यायच अण द्या पैसे घेतलेले अन हे अस हाय बगा आपल्याला रहाण्याचा ठिकाणाच नाही म्हणून पैसे परत द्यायचे. आमच्या महिला सोडा पण पुरुष बी राजकारणात अजून नाय.

**संघटना–**

कोणतीच संघटना काम करत नाही. मदत होती. पण फक्त पोलीसांनी हाणमार केली तर गाववाल्याच्या विरोधात संघटना फकस्त मदत करते. भैरववाडीच्या लोकांनी आमच्यावर लय अन्याय अत्याचार केलाय. आमच्या झोपड्या जाळल्या कारण तिकड चोरी झाली. चोरी झाली

त्यांची त्यांचीच पण आमची पालं जाळली अन मागून आणलेल्या साड्या सुद्धा जाळल्या. चोरी त्यांच्याकड त्यांनीच केलेली पण आरोप आमच्यावर. त्या नुकसानीचे फोटो सुद्धा आमच्याकड आहेत.

पोरी शाळेत जात नाही. घरची सोय नसती म्हणून

पोलीस स्टेशनला गेलो तर भोगवाशिन शिवाय ते बोलत नाय. आमच्या नवऱ्या देखत आम्हाला शिवीगाळ करतात हे आमच्या नवऱ्याशी सुद्धा नीट बोलू देत नाहीत. ऐ फुकणे पैसे द्या मग गाठ घे म्हणतात.

पोटासाठी आज माझ्या मुली फडात नाचायला जायच्यात त्यावेळी त्यांच्यावर बलात्कार पण व्हत्यात ते तरी कोणत सुखाय हाये. आज समदी जण नाचायला जाणार आहोत. गाववाली पण अत्याचार करतात नाचताना कुठ खडा मारणार, शिट्या मारणार आपण पोटासाठी करतो त्यांना काय त्याच पण आम्हाला तो सहन कर रावाच लागतो.

**समस्या/अडचणी–**

बाळांतपण स्वतःच करायचे

आमाला मदत करा

काम धंदे द्या

पोलीसांना ताकीत द्या

**व्यष्ठी क्र.८**

| | |
|---|---|
| उत्तरदात्याचे नाव– | भाभी अरुण भोसले, वय–५४ वर्षे शिक्षण नाही |
| | प्रणिता विजय भोसले, वय–१९ शिक्षण नाही |
| ठिकाण | राशिन |
| मुलाखतीचा दिनांक | १३.०४.२०१७ वेळ– सकाळी ९.५० |

**समाज उगम–**

आम्ही फासे पारधी आहोत. आम्ही इथच ७१ वर्ष झाल इथच आहोत. इथ आमच्या सासऱ्याच घर होत. पुढ धंद्यासाठी आणि माग राहण्यासाठी केल. मी माझी लेक तोडली काही न करता

माझ्यावर अनेक आरोप केले आहेत यातून सर्वातून मी गेले आहे.

**कुटुंबव्यवस्था–**

दोघांच्या हाती असतात. किरकोळ खर्च आमच्या बायकांच्याच हाती असतात. कधी नवऱ्याच्या हातात बी असतात. किरकोळ असल की बाया माणसच करतात. बऱ्याच वेळा काय होत आमच्या पुरुषांकडे बघितल तर त्यांना हिंडाव फिराव लागत त्यांच्याकड सर्वाच लक्ष असत. मग अशा वेळी आमच्या बायकांच्याच हातात कारभार पडतो.

**व्यवसाय–**

इथ आमाला इंदीरा गांधीच्या काळात खरेदीच्या जमिनी आहेत. आठ एकर शेती आहे. आणि व्यवसायासाठी धंद्यासाठी आम्ही पुढे गाळे काढले आहेत.

**चाली–रिती–**

पाळाव लागत आमचा समाज जो आहे ना त्या समाजाच्या काही चाली रिती रूढी परंपरा आमी जर टाकून दिल्या तर आमचा समाज आम्हाला जातीबाहेर काढल मग आम्ही वेगळ पडू म्हणून आम्हाला ते थोड पाळावच लागत जरी आम्ही त्यांच्याशी संबंध ठेवला नाही. तरी आमच्या मुला–मुलींना स्थळ बघण्याची वेळ आली की ते बघतात ना की यांच्याकड कस हाय ती. आता जातीचा नवरा करण्यासाठी किंवा मुलाला सून आणण्यासाठी जातीत जावच लागत आम्ही जर या चालीरिती नाही पाळल्या तर ते आम्हाला नाव ठेवतात. आम्हाला सुधारायच पण चाली रिती सोडून चालत नाही. समाजाबाहेर काढण्याची भिती असते. आमची लोक समजून घेतात. डिलव्हरी आधी वेगळी होती. आता तुमच्यासारखच आम्ही करायला लागलोय.

**देवदेव–** देवाला सोडून कस चालल ते आमच्या आज्या पंज्यापासून चालत आल आहे. आमची देवी कुलदैवत आहे. आमची भवानी आई आहे. आमची फक्त देव देव करण्याची पद्धत वेगळी असते. आमाला काळूबाई आहे. आमी हिंदू म्हणूनच वावरतो. आम्ही बोकडाची पत्रा करतो. (काळे, चव्हाण) तेच करतो फक्त शिंदे, पवार हे हल्याचे देवदेव करतो. पारधी समाज म्हणला तर सर्वांची पद्धत एकच आहे. आमच्यात देवदेव असल्यावर त्यांचे आई वडील नणंदाबाळा येतात. आम्ही आता सूनेच्या हातच खातोय, आता पण आमचा देव–देव पुरुषच करतात. बायकांना स्थान नाही.

**समाजाचा दृष्टिकोण–**

ते इतर समाजचे लोक आमच्या बरोबर लय चांगल वागतात. त्यांनाही वाटत की बाबा हे सुधारित आहेत. आपल्या सारख कष्ट करतात. घरदार यांची चांगली आहेत ते म्हणतात याच परिवर्तन झालय. कुठ काही झाल की, त्यांचा संशय लगेच आमच्यावर येत नाय. पण आमच्याच लोकांच्यात आमच बघवतच नाही. आमच्यावर आळ यावा म्हणून आमच्याच लोकांनी आजू बाजूला चोरी केली की जेणे करून आमच्यावर आळ यावा पण पोलिस आमच्याकड आले पण नाही.

**विवाह पद्धती–**

बाल विवाह पूर्वी होती. आता नाही होत. मुलगी पळून जावू नये बाहेर तिच लक्ष जाऊ नये बाल विवाह होते. मुलींवर बलात्कार झाल्यावर तीला सोडत नाही तिला संभाळतात. आमच्यात मुलींना हुंडा येतो. यामुळ जर एखाद्या आई वडिल बरीच लग्न करतात. आई वडील तिचा पण विचार करत नाही. ते लगेच पैशासाठी मुलगी सारखी विकत्यात. आम्ही आमच्या मुलींना समजवून सांगतो. आई–वडीलांवर लेकरांच चांगल/विचार केला पाहिजे. आमच्यात पोरीचा गर्भ पाडत नाही. आम्ही मुलींच्या जन्माच स्वागत करतो. तीच्या जन्मामुळ काहींना वाटत की हुंडा झाला बर झाल काहींना वाटत की मुली प्रेम करायला आल्या त्या ठिकाणी मुली झाल्यावर आम्हाला आनंद वाटतो. पण आमच्यात मुलींना खूप हाल होतात मी लय वेदना काढल्या आहेत. हाल काढले आम्ही. आंतरजातीय विवाह होतात. आमच्या बहिनीच्या मुली न केलय. आम्ही काय नाय पण आमची लोक तीला त्रास देतात. आता अंतर जातीय विवाह करणारी मुलगी १७ वी झाली. आम्ही आता मराठ्यांसारख ब्राम्हण आणून लग्न केल.

**मृत्युविधी–**

आम्ही पुरतो. आमच्या रानात आम्ही पुरतो. जमिनी मिळल्यामुळं हा बदल आमच्यात झाला.

**कागदपत्रे–**

सर्व काही आहेत. आमची लोकांना सर्व आईत पाहिजे. कागदपत्राची पूर्तता आमची लोक करत नाहीत म्हणून अडचणी येतात. नाशिक मधून प्रमाणपत्र काढल.

कधी कधी आमच्यावर आळ आला पण तुमच्या लोकांनी चांगुलपणा दिसला त्यांची खोट

आरोप केल पण पोलिस म्हणायचे की तुमच्या लोकांनीच तुमची नाव सांगितली. आमी आणि कुमार सप्तर्षी यांनी मोठा कार्यक्रम घेतला आमच्यात एकी नाही व त्यांना पहावत नाही. म्हणून समाज सुधारणांना यश फारस मिळत नाही.

**संघटना–**

मी पारधी समाजाची संघटना म्हणून समाजाच्या पक्षाची संघटना होती त्यात त्यांच्या राजू काळे यांच्या बरोबर कार्य केले.

तात्या निकाळजेनी त्यांनी बी पैसे खाल्ले तेव्हा मला लाख रुपये घेवून आमाला माझ्या नवऱ्याला मोर्चा मागे घ्या सांगितल पण आम्ही समाजासाठी पैसे घेतले नाही. तसे पैसे तात्या निकाळजे त्यांच्याकडे गेले आम्ही त्यांच्याकडे गेलो तेव्हा त्यांचे चेले आमच्या साठी खर बोलणार, त्यांनी सांगितलं अशी अशी अशी गाडी काल आली आणि तात्यानी पैसे घेतलं. आम्ही तर्क काढला जे आपल्याला ३ लाख रूपये घ्या म्हणत होते ते इकडे आले मग दुसऱ्या दिवशी काही तरी छातूर मातूर केल अण गेले. आहो आम्ही चोर पकडणारे रात्री पी.एस.आय. ची गाडी म्हणजे तीच होती.

आणि कस झाल राशिन मध्ये लय मोठी चोरी झाली तेव्हा सुद्धा आमच्यावर पोलीसांचा आरोप होता पण आम्ही नाही सापडलो.

जाती साठी मी लय आदबते संघटना चळवळी पासून थोड बाजूला आहे आता. आमी पण समाजासाठी खूप केल. पण आम्ही आता बाजूला आलो.

**राजकीय–**

मतदान करतो. समजते आम्ही सुधारलो आहोत. सर्वांचे बचत गट आहेत पुरुषांचे पण स्त्रियांचे पण आहेत.

**समस्या/उपाय–**

मानसिक समुपदेशन कराव

आर्थिक मदत केली पाहिजे

शिकले त्यांना खूप प्रश्न पडलाय काय कराव त्यांना समजत नाय.

नोकरी पाहिजे.

मूल्याधिष्ठीत शिक्षण द्याव.

**व्यष्ठी क्र.९**

उत्तरदात्याचे नाव– शोभा रमेश काळे, वय–३६ वर्षे शिक्षण नाही

स्वाती विनोद भोसले, वय–१८ शिक्षण नाही

ठिकाण राशिन, अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक १३.०४.२०१७ वेळ– सकाळी ११.०५

**समाज उगम–**

तस तर मॅडम आम्ही ७२ वर्षापासूनच इथ राहतो. ही माझी आईच आहे. यामुळ आमची सगळी कहाणी तिनच सांगितली.

माझ लग्न लहाणपणीच झाल कष्टान मी माझे मुल कष्टाने मोठी केली.आमच्यातील महिला दारू पितात, तंबाखू गुटखा खातात मग मुलही तेच शिकतात. स्वच्छता नसल्यास आम्ही सुद्धा कुठ कुणाच जेवत नाही. स्वच्छता महत्त्वाची आता चोरी महिला करतात पण ड्राप पण करायला लागल्या आहेत.

**विवाह–**

माझ्या भावजयांच लग्न कवळ्या पणात झाल आहे पोर इंग्लीश माध्यमामध्ये आहेत.

**संघटना–**

फक्त संघटनेचे काम करताना माझ्या नवऱ्याने पण यात भाग घेतला. अनेक कामे केली पण माझ्या लक्षात आल की आमचीच लोक पाहिजे तेवढी साथ देत नाहीत. मग कुणी सांगितलय हे करायला मी आईला म्हणल. आई आपण आता थांबू कारण आपला समाज तो ही बाहेर येणार नाही व आपल्यालाही बाहेर पडू देणार नाही आपणच आपली सुधारणा करू. एकतर आपण वनवास काढून इथ आलोय. आमच्यात देवी शक्ती आहे तीच आम्हाला सांगती की तुम्हाला पाहिजे ते मी देईन. माझ्या भावान संस्था काढली पण लोक चांगल नाही. आणि अनुदान पण नाही. विचार आमच्यात चांगले असल्याने आम्ही सुधारलो आहोत.

**राजकीय–**

मतदान करतो. पण आजपर्यंत निवडणूका लढवण्याचा राजकारणात जगण्याचा प्रसंगच आला

नाही. अजून नेतृत्व करीत नाही.

**समस्या/उपाय–**

त्यांच्यात जागृती करावी.

आंगणवाडी शिक्षिका म्हणून काम मिळाल पाहिजे.

परितकत्या महिलांना काही तरी कराव.

धंद्यासाठी तरी वेगळी कर्ज द्याव.

मुलींची मानसिकता बदलण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.

चांगले संस्कार वर्ग त्यांच्यासाठी घ्यावे.

सामाजिक संस्थानी विशेष प्रयत्न केले पाहिजे.

**व्यक्ती क्र.१०**

| | |
|---|---|
| उत्तरदात्याचे नाव– | रुपाली राहूल काळे, वय–२१ वर्षे, ४ थी |
| | दिपाली अनिल काळे, वय–१३ वर्षे, ९ वी |
| | सोनाली प्रकाश पिंगळे, वय २१ वर्षे, द्वितीय वर्ष कला |
| ठिकाण | गणेश नगर |
| मुलाखतीचा दिनांक | १३.०४.२०१७ वेळ– दुपारी १.१५ |

**समाज उगम–**

माहित नाही. इथे आमच्या आजी–आजोबांना शेती मिळाली १० एकर फिरत फिरत तेथे आले. पुण्यावरून ते आले. गावोगावी फिरणारे असल्याने ते फिरत फिरत इथे आले. इथल्या जमिनी कशा घेतल्या माहित नाही. पुण्यातील एका कंपनीने आम्हाला मिळालेली जागा घेतली. शिरूरमध्ये सुद्धा आम्हाला जमिनी मिळाल्या पण त्याही लुबडून घेतल्या.

**देव–**

कुलदैवत व आमचे वेगवेगळे देव असतात. डाभी हे आमचे दैवत आहे.

**जाती–**

गाय पारधी, फासे पारधी, धनगर पारधी या आमच्या उपजाती आहेत. गाव पारधी म्हणजे ग्रामीण

भागात रहातात, हरीण पारधी असतात.

**जीवनमान–**

आमच्यावर चोरीचा आळ सातत्याने येत असे. सरपंच लोक आम्हास गावात जागा देत नसत. म्हणून आम्ही फरीस्ते आहोत.

**चालीरिती–**

समाजात अंतर जातीय विवाहास बंदी आहे. केल्यास जाती बाहेर काढून वाळीत टाकले जाते. जात पंचायत या विषयी निवाडा करायचा. काही वेळा घरातील गोष्टी बाहेर आणायच्या नसल्या तरी जात पंचायत आम्ही बसवत नाही. आमच्या समाजामध्ये पुरुषांना काहीच वाईट वागणूक दिली जात नाही. बायकांना मात्र वेळोवेळी आपण व्यभिचारी नाही याचा पुरावा द्यावा लागतो. स्त्री ही घराण्याची अब्रु समजली जाते. आमच्याच जातीत दोन लग्न करतात. ते चालते पण सातत्याने त्यांच्यात भांडणे होतात. गोडीत राहिल्या तर कोणतीही अडचण नसते. तरी सुद्धा नवऱ्याने एका बाई बरोबर भांडणे केली की ती निघून जाते कधी कधी नवरा दोन्ही बायकांना मारु सुद्धा शकतो. कधी दोघी गोडी गुलाबीने रहातात. एखादी स्त्री नांदली नाही की पुरुष दुसर लग्न करतो पण स्त्रियांना तो अधिकार नाही.

**देव–देव–**

मुले करतात. सव्वा महिने नखे, केस काढत नाही. देवाला पाल ठोकायच. तेलाची कढई ठेवायची त्यात उकळत्या तेलात हात घालायचा. स्त्रियांना प्रवेश नसतो. एक पाट व बोकड असते. महिलांनी व्यभिचार केल्यास महिलांचे मोकळी केस ठेवून हातावर नऊ पिंपळाची पाणे ठेवून त्यावर गरम कुऱ्हाड ठेवली जाते ती गरम कुऱ्हाड घेवून तीने सात किंवा अकरा पावले चालायचे व त्यानंतर धुण धुवायच जर ती पवित्र असेल तर तीला कोणतीही इजा होत नाही. जर ती दोषी असेल तर तीला फोड येतो इजा होते.

तुम्हाला या अंधश्रद्धा वाटत नाही. आमची चालीरिती परंपरा आहेत. त्यामुळे आम्हाला त्याच काहीही वाटत नाही. देवाच निघल्यास हे कराव लागत. पुरुषांच्या म्हणण्यानुसार किंवा बाईचे पवित्र सिद्ध करण्यास ती ही परिक्षा देते. आमचे कपडे बाहेर असतात. आम्ही पाळीच्या दिवसात घरी डोक्याला तेल लावत नाही. कोणास स्पर्श करत नाही.

**उदर–निर्वाह साधन–**

महिलांना कामकाज करावे लागते. कुऱ्ही दारू, फूगे, शेती धुण–भांडी करतात. या आधी चोऱ्या करत असत पण आता व्यवसाय करत. कधी शेळी, बोकड ऊचलून आणून खात असत.

**सामाजिक परस्पर संबंध–**

आमच्यातील जुण्या लोकांशी बाकी इतर समाज चांगले संबंध ठेवत नसे पोटासाठी त्यांनी चोरी करावी लागत असल्याने ते त्यांना चोरच समजत असत. आता आम्ही आमच्या हिंमतीवर असे असल्याने आमच्याशी संबंध चांगले ठेवतात. स्वतःच्या पोटासाठी त्यांचे गुण बिघडले होते.

**जात पंचायत–**

आधी खूप बसत पण आता नाही. पण त्यास खूप पैसे द्यावे लागते. पंच लोक पैसे खात असतात. त्यांना दहा हजार रूपये द्यावे लागतात. माझ्या भावाला शनिवार दिवशी बबन घोरपडे आला त्याने माझ्या भावाला व माझ्या बहिनीच्या नवऱ्याला चला तुम्हास काम देतो असे म्हणून येथून घेवून गेला. ऐके ठिकाणी घरात बसवून तेथे आधीच चोरीच्या दोन गाड्या आणून ठेवल्या होत्या त्या घरात बसवून बाहेरून कडी लावली व पोलीसांना बोलवून चोर म्हणून धरून दिले यात त्या दोघांना खूप मारहाण झाली. खोटा आरोप ठेवल्याने माझ्या भावाच शिक्षण ही बंद झाल. आम्ही हे प्रकरण मिटवण्यासाठी जी. जी. चव्हाण यांच्याकडे गेलो पण त्यांनी आमची दखल घेतली नाही. संघटनेला आम्ही मदत मागितली नाही. इतर जातीचे लोक चोरी करतात. पण त्यांना फक्त पारधीच चोर वाटतो. पोलीसांनी जर पुरुषांना चोरीच्या गुन्ह्यासाठी अटक केली तर आमच्या बायकांचे खूप हाल होती ती कधी शेतीच्या कामाला जाते. तर कधी मिळेल ते काम ती आता आमच्या भावाला पोलीस घेवून जायला आले तेव्हा मी व माझ्या आईने हट्ट धरला की आम्ही पण येणार ते म्हणाले चौकशी झाली की सोडतो पण ते रात्र झाल्यावर म्हणाले उद्या चौकशी झाली की सोडतो आम्ही भर थंडीच्या दिवसात तेथेच बसून राहिलो. सकाळ झाल्यावर पोलिस म्हणाले जा आणी त्यांना जमिन घेवून या.

जमिन आणल्यास त्यांना सोडतो. चोरी न करताही त्यांना सोडतो. चोरी न करताही त्यांना त्रास दिला या पोलिसांच्या धाकानी आमचे पुरुष मंडळी फारसे घरात आमच्या स्त्रियांबरोबर फार रहात नाही. झोपायला सुद्धा लांब–लांब असतात. रात्रीच्या वेळी बायकांना पोलीस स्टेशनला घेवून

जातात. अशा वेळी तिच्यावर लैंगिक अत्याचार होतात.

अशा वेळी संघटना मदत करत नाही नातेवाईक मदतीस येतात. स्त्रियांवर होणारे नातेवाईकाकडून बलात्कार, अन्याय होतात त्यावेळी ती घरातल्या घरात मिटवतात. नाही तर लग्न लावून देतात. बाल विवाह होते. हुंडा आता मागत नाही. आमच्यात मुलगी विकत नाहीत. आम्ही धनगर पारधी आहोत (दख्खन) पारधी आहोत.

**सामाजिक प्रेरणा–**

इतर लोकांकडून बघूनच वाटते. समाजातील इतरांचे अनुकरण केले. स्वतःही ठरवले. आमच्या समाजातील एक मुलगी मातंग समाजाच्या मुलाबरोबर पळून गेली. म्हणून माझ्च शिक्षण वडीलांनी बंद केल व मला त्यावरून मारले सुद्धा. तीच मी अणुकरण करू नये म्हणून बंद केले. एकीमुळे सगळ्यावर अन्याय झाला इच्छा असून आम्हास शिकता येत नाही.

**भाषा–**

पारधी बाहेर मराठी सांकेतिक भाषेचा वापर करायची खाणाखूणा करायचो, राहून वशाळा, वाढ्या चार्ली, आला असे सांगितले जाते. पोलीस आहे पळ असा त्याचा अर्थ

**सण–**

फारसे नाही, दिवाळी, होळी नागपंचमी, करतो फक्त गुडी पाडवा व गणपती बसवत नाही.

**गाणी–**

कुलदैवताची असत, त्यांना सूड असे म्हणत. आठवणींसाठी गाणी म्हणतात. लग्नात गाणी म्हणतात.

**मतदान–**

यादीत नाव नव्हत आता आहे मतदान करतो.

**व्यसन–**

रोज आई मिश्री लावते तंबाखू खाते. आरोग्याविषयी समस्या आहेत. औषधोपचार करतात. पण तसेच चालू असतात. पोलीस रात्री निम्यारात्रीत येतात आमचे ही फोटो काढून घेवून गेले आहेत.

**समस्या–**

आमच्या पालकांचे समुपदेशन करावे.

आमचे शिक्षण चालू ठेवावयास लावावे.

शिकलल्या स्त्रियांना रोजगार निर्मिती साधने किंवा नोकरी द्यावी.

वस्त्या गावापासून दूर असल्याने बस सुविधा द्यावी.

सायकल द्यावी.

विधवा महिलांना डोल उपलब्ध करून द्यावा.

**व्यष्ठी क्र.११**

उत्तरदात्याचे नाव– शितल हरीष काळे, वय–२१ वर्षे

प्रिती इसुफ चव्हाण, वय–२१

ठिकाण नांदगाव, राहुरी, अहमदनगर

मुलाखतीचा दिनांक १३.०४.२०१७ वेळ– दुपारी ३.१०

**समाज उगम–**

इथे बऱ्याच वर्षापासून रहाण्यासाठी असतो. जवळ जवळ २५ वर्षे आम्ही इथे रहातो. या आधी शिवने या गावी होतो. आम्ही मूळचे शिंगवेत होते. बाकी इतिहास माहित नाही.

**जात–**

गाय पारधी

**देव–**

खंडोबा शिनदरची आई (नाशिक) च्या पुढे जत्रा देवाचा कार्यक्रम केला जातो. यासाठी खूप खर्च असतो. बोकड कापतो. अंगात देव येतो. यावेळी कढईत तेल टाकून उकळत्या तेलात हात घालावा लागतो. बायका स्पर्श करत नाही. पिठ मळून एक गोटी त्यात टाकायची ती काढायची. बोकडाच रक्त देवावर शिंपडून देवदेव सुरु होतो. बायका माणसे तो पर्यंत बसून रहातात. पुरुष स्वयंपाक बनवतात. तोपर्यंत म्हाताऱ्या बायका गाणी म्हणतात. देवदेवाचे वाढून दिल्यावर करून खायचे.

**भाषा–**

पारधी, पोलीस (डेढ्या)

**आर्थिकस्थिती–**

आम्ही सध्या कामाला जातो.

**लग्न–**

आमचे कुळ चव्हाण आहे. लग्न– काळे, चव्हाण भोसले यांच्याशी विवाह होतात. चव्हाण–चव्हाण लग्न होत नाही. विवाहामध्ये जेव्हा मुलगा मुलीची पसंती होते तेव्हा दोन्ही कडून पेसे घेतले जातात. आमची पारध्यांची लगन रात्री ७ वाजताच असतात. दोन्ही पार्टीकडून पैसे घेवून येणाऱ्या सर्व लोकांच्यात वाटून घेतले की सुपारी फुटली असे समजले जाते. मुला मुलीचे १०००, १००० रुपये साधारण घेतले जातात. त्या पैशात लोकांनी खा प्या काहीही करा असे असते. गडी माणस मटण आणून करून खायचे. लग्न लगेच संध्याकाळी नविन कपडे हिरव्या बांगड्या, शालू किंवा साडी असते. लग्नासाठी बांगड्या भरायला जावे लागते. बाजारात जाऊन सर्व सामाण आणले जाते व गडी माणस लग्न लावतात. घरातील मोठे मंडळी लग्न लावतात. कुंकाची टिकली लावली जाते. नवरदेवाने दिलेले पैसे पोरीच्या वडीलांना देवून मिटल म्हणायचे आणि मुलगी सोडून द्यायची. मुलगी अशा वेळी आई बापाकडे जाते दुसरे वाटले तर लग्न करते.

**मृत्युविधी–**

आमच्यात प्रेत पुरतात. दुसऱ्या दिवशी सावडणे, १३ व्या दिवशी मिठाई, भाजीपाला, घेवून शिजवून जाळ करून त्यामध्ये टाकले जाते. सर्वांचा विधी तसाच केला जातो.

**सामाजिक संबंध/प्रेरणा–**

लोकांचे अनुकरण केले. आम्हीच सुधारून राहिलो.

**आर्थिक स्थिती–**

अंब्याची झाडे घेणे. आंबे पिकवणे व सकाळी विकल्यासाठी घेवून जाणे.

**स्त्री जीवन–**

आता स्थिर आहोत. पोलीसांचा त्रास नाही. त्याच रेकॉर्ड नाही. आम्ही कायम काम धंदा करायचे. पूर्वी लोक सासूला मारायचे. बाल विवाह करतो. कधी सारखीच वय असतात. जरठ कुमारी विवाह नाही. आम्हास त्रास नाही. मुलाकडून ३०,००० रु घेवून लग्न केले आहे. १० रु शेकडा प्रमाणे वर्षाला १००० रु महिना द्याज घेतो. अंतरजातीय विवाह होतात. पण इकडे नाही.

ही जागा आम्हाला गावकऱ्यांनी दिली. हे पाल सपर मालकाने (गड्या) माणसांनी करायची. पावसाळ्यात आम्ही बसू शकत नाही. पाऊस आल्यावर चावडीत जाऊन बसतो. नाहीतर मारूती देवळात जातो.

**पशुपालन–**

शेळ्या आहेत. आमच्याकडे बाईच्याच हातात सर्व आहे. कागदपत्रे नाहीत फक्त आधार कार्ड आहे.

मतदार यादीत नाव नाही, कुपन नाही, नेता नाही.

**जात पंचायत–**

न्याय (पंचाईत) असते. निवाडा करतात पण खूप मारामाऱ्या करतात. (ते पैसे घेतात) नवरा–बायकोचे तंटे घराघरात मिटवतात.

**शिक्षण–**

४ थी, दुसरीचे ७ वी, पैशा अभावी शिक्षण होत नाही. आजार असतात. शिक्षण सुविधा नाही.

**समाज संबंध–**

बाकी लोक चांगले वागत नाही. आमच्याच भांडणेच खूप असतात.

**संघटना–**

नाही काम करत नाही.

**समस्या–**

घरकुल नाही, लाईट नाही (आकडा केल्यास वायरमन त्रास देतो)

पाणी, शौचालय नाही

सकाळी साप निघाला लहाणमूल सुरक्षित नाही. विंचू काट्याची भिती आहे.

मुलींचे दाखले नाहीत. (कागदपत्रे नाहीत) सोय करावी.

**उत्तरदात्यांची माहिती–**

**तक्ता क्र. ४.१**

**उत्तरदात्यांची सारणी**

| क्र. | उत्तरदात्यांची नावे | वय | ठिकाण | शिक्षण | अपत्य संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | ज्योती राज भोसले | ३२ | आरणगाव | ६ वी | १ मुलगी |
| २. | नटी विलास भोसले | ३० | आरणगाव | ६ वी | ३ मुली, २ मुले |
| ३. | सुवर्णा चव्हाण (नटीची मुलगी) | १९ | आरणगाव | प्रतिसाद नाही | प्रतिसाद नाही |
| ४. | नरशा मेशार चव्हाण | ५५ | आरणगाव | प्रतिसाद नाही | २ मुली |
| ५. | चांदणी जाकेरा काळे | २० | खडकी | प्रतिसाद नाही | प्रतिसाद नाही |
| ६. | सविता संजय काळे | १९ | खडकी | प्रथम वर्ष कला | प्रतिसाद नाही |
| ७. | शांताबाई रामा चव्हाण | ८४ | खडकी | प्रतिसाद नाही | ७–८ मुले |
| ८. | जाली लहाशा भोसले | – | खंडेश्वर टाकळी | प्रतिसाद नाही | प्रतिसाद नाही |
| ९. | कांताबाई इश्वनाथ भोसले | ६० | खंडेश्वर टाकळी | प्रतिसाद नाही | प्रतिसाद नाही |
| १०. | अश्विनी रविंद्र काळे | २४ | खंडेश्वर टाकळी | टी.वाय.बी.ए. | ३ मुले |
| ११. | सिंधूताई राजाराम पवार | ४८ | खंडेश्वर टाकळी | प्रतिसाद नाही | प्रतिसाद नाही |
| १२. | गरमबाई जयराम काळे | ६१ | खंडेश्वर टाकळी | प्रतिसाद नाही | ६ मुले |
| १३. | संध्या जयराम काळे | ४५ | खंडेश्वर टाकळी | प्रतिसाद नाही | प्रतिसाद नाही |
| १४. | जयराम आंगठ्या काळे | | खंडेश्वर टाकळी | प्रतिसाद नाही | प्रतिसाद नाही |
| १५. | हिराबाई झुंबर पिंगळे | ६५ | एकरुखे | शिक्षण नाही | २ अपत्य, २ मृत्यु |
| १६. | कमल दत्तु पवा | ५५ | आरणगाव | शिक्षण नाही | १ मुलगा ५ मुली |
| १७. | यमुनाबाई किसन पवार | ३५ | आरणगाव | शिक्षण नाही | २ मुले २ मुली |
| १८. | श्रीमती द्वारका पवार | | जामखेड | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही |
| १९. | राधा मच्छिंद्र पवार | २२ | जामखेड | ६ वी | प्रतिसाद नाही |
| २०. | सावित्रीबाई धनसिंग पवार | ४६ | जामखेड | प्रतिसाद नाही | अशिक्षित |
| २१. | गोदाबाई राजेंद्र काळे | ४१ | जामखेड | प्रतिसाद नाही | अशिक्षित |
| २२. | कांताबाई अर्जुन काळे | ३५ | जामखेड | प्रतिसाद नाही | अशिक्षित |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३. | हलीपा फुलदास भोसले | ५५ | मडकेवाडी | प्रतिसाद नाही | १ मुलगा ३ मुली |
| २४. | वच्छाबाई लयलंग भोसले | ६५ | मडकेवाडी | प्रतिसाद नाही | २ मुले १ मुलगी |
| २५. | शैला लयलंग भोसले | ५५ | मडकेवाडी | प्रतिसाद नाही | २ मुले |
| २६. | निर्मला आसाराम काळे | ३६ | मडकेवाडी | प्रतिसाद नाही | २ मुले २ मुली |
| २७. | लयलंग अनंता भोसले | ६१ | मडकेवाडी | प्रतिसाद नाही | प्रतिसाद नाही |
| २८. | तारीका विशाल भोसले | २५ | लिंपनगाव | प्रतिसाद नाही | प्रतिसाद नाही |
| २९. | लिलाबाई रमेश काळे | ३५ | लिंपनगाव | प्रतिसाद नाही | अशिक्षित |
| ३०. | वनिता शांताराम काळे | २५ | लिंपनगाव | प्रतिसाद नाही | अशिक्षित |
| ३१. | मंदा राजू काळे | ४७ | लिंपनगाव | प्रतिसाद नाही | प्रतिसाद नाही |
| ३२. | कविता मालशा भोसले | ३२ | लिंपनगाव | प्रतिसाद नाही | प्रतिसाद नाही |
| ३३. | वर्षा संतोष चव्हाण | ५५ | आरणगाव | शिक्षण नाही | ४ मुले २ मुली |
| ३४. | कांताबाई संजय काळे | ५१ | आरणगाव | शिक्षण नाही | २ मुले २ मुली |
| ३५. | सुरेखा राज भोसले | ३० | कुळधरण | शिक्षण नाही | ४ मुले |
| ३६. | आसराबाई इंद्रभान काळे | ४२ | कुळधरण | शिक्षण नाही | प्रतिसाद नाही |
| ३७. | भाभी अरुण भोसले | ५४ | राशिन | शिक्षण नाही | प्रतिसाद नाही |
| ३८. | प्रणिता विजय भोसले | १९ | राशिन | शिक्षण नाही | प्रतिसाद नाही |
| ३९. | शोभा रमेश काळे | ३६ | राशिन | शिक्षण नाही | प्रतिसाद नाही |
| ४०. | स्वाती विनोद भोसले | १८ | राशिन | शिक्षण नाही | प्रतिसाद नाही |
| ४१. | रुपाली राहूल काळे | २१ | गणेशनगर | ४ थी | प्रतिसाद नाही |
| ४२. | दिपाली अनिल काळे | १६ | गणेशनगर | ९ वी | लागू नाही |
| ४३. | सोनाली प्रकाश पिंगळे | २१ | गणेशनगर | द्वितीय वर्ष कला | लागू नाही |
| ४४. | शितल हरीष काळे | १९ | नांदगाव | प्रतिसाद नाही | प्रतिसाद नाही |
| ४५. | प्रिती इसुफ चव्हाण | २१ | नांदगाव | प्रतिसाद नाही | १ मुलगा |
| ४६. | शितल संतोष काळे | ४० | गणेशनगर, राहता | प्रतिसाद नाही | ४ मुली |
| ४७. | मनु राजन काळे | २४ | राहता | प्रतिसाद नाही | २ अपत्य |
| ४८. | मिराबाई साजन पिंगळे | – | एकरूखे | प्रतिसाद नाही | ३ मुले ४ मुली |
| ४९. | सुमनबाई शांताराम पिंपळे | ३७ | एकरूखे | प्रतिसाद नाही | ३ मुले १ मुलगी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५०. | हिराबाई राम काळे | ३५ | गणेशनगर | प्रतिसाद नाही | १ अपत्य |
| ५१. | धरती रामदास काळे | ३० | गणेशनगर | प्रतिसाद नाही | २ मुले २ मुली |
| ५२. | कुसुम रतन पिंगळे | ६२ | गणेशनगर | प्रतिसाद नाही | ३ मुले ६ मुली |
| ५३. | गौरी दत्तु चव्हाण | ४१ | निमगाव कोऱ्हाळे | प्रतिसाद नाही | २ मुल |
| ५४. | सुंदराबाई रमेश साळुंखे | ४५ | निमगाव कोऱ्हाळे | प्रतिसाद नाही | ६ मुल |
| ५५. | नाविबाई हिरा पवार | ५० | निमगाव कोऱ्हाळे | प्रतिसाद नाही | ३ मुल |
| ५६. | सुमनबाई शांताराम पिंगळे | ४५ | निमगाव कोऱ्हाळे | प्रतिसाद नाही | ७ मुल |
| ५७. | शांताबाई बलमा काळे | ६२ | निमगाव कोऱ्हाळे | प्रतिसाद नाही | ३ मल |
| ५८. | अरुणाबाई क. चव्हाण | ६५ | राहुरी | प्रतिसाद नाही | ४ मुले २ मुली |
| ५९. | पुष्पा सुभाष भोसले | ५४ | राहुरी | प्रतिसाद नाही | २ मुल ६ मुली |
| ६०. | सुनिता समिर चव्हाण | ३२ | राहुरी | प्रतिसाद नाही | १ मुलगा २ मुली |
| ६१. | वैशाली प्रशांत काळे | ३० | राहुरी | प्रतिसाद नाही | ४ मुले २ मुली |
| ६२. | रंजना जितेंद्र चव्हाण | ३५ | मल्हारवाडी | शिक्षण नाही | ३ मुले |
| ६३. | जानका सुभ्रभान चव्हाण | ६१ | मल्हारवाडी | प्रतिसाद नाही | २ मुले ४ मुली |
| ६४. | लता चिका चव्हाण | ४२ | मुलनमाथा | प्रतिसाद नाही | २ मुले २ मुली |
| ६५. | मंगल रमेश चव्हाण | ४१ | मुलनमाथा | प्रतिसाद नाही | ३ मुले १ मुलगी |
| ६६. | अलीका कोलाज काळे | ४२ | शिंगवेनाथ | शिक्षण नाही | ४ मुले ५ मुली |
| ६७. | मंदाकिणी सुभाष चव्हाण | २५ | शिंगवेनाथ | शिक्षण नाही | ३ मुली |
| ६८. | उषा संजय काळे | २८ | जामखेड | ४ थी | २ मुले |
| ६९. | जनाबाई सुरेश काळे | ४१ | जामखेड | शिक्षण नाही | ३ मुले |
| ७०. | पारुबाई भाऊ काळे | ६५ | खडकत | शिक्षण नाही | ७ मुले ३ मुली |
| ७१. | छायाबाई गहिनीनाथ पवार | ४१ | आरणगाव | शिक्षण नाही | २ मुले ३ मुली |
| ७२. | शालन राजाराम पवार | ५५ | खडकत | शिक्षण नाही | २ मुले १ मुलगी |
| ७३. | पारुबाई नवनाथ पवार | ५५ | खडकत | शिक्षण नाही | ३ मुले १ मुलगी |
| ७४. | सुमन भिमा काळे | ५० | भवरवाडी, पाटोदा | शिक्षण नाही | ४ मुले १ मुलगी |
| ७५. | विमल इश्वर काळे | ५५ | भवरवाडी, पाटोदा | शिक्षण नाही | २ मुले १ मुलगी |
| ७६. | विमल लहू पवार | २९ | भवरवाडी, पाटोदा | शिक्षण नाही | ५ मुली १ मुलगा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७७. | सुजाता देवदास काळे | १९ | भवरवाडी, पाटोदा | ७ वी पास | ३ मुले |
| ७८. | ज्योती अंकुश पवार | ३५ | भवरवाडी, पाटोदा | शिक्षण नाही | २ मुली १ मुलगा |
| ७९. | कलावती किसन काळे | ७१ | वाकी, वसखडी | शिक्षण नाही | ४ मुले ५ मुली |
| ८०. | ज्योती साहेबराव काळे | २२ | वाकी, वसखडी | शिक्षण नाही | २ मुले १ मुलगी |
| ८१. | आशा भिमा काळे | ४२ | वाकी, वसखडी | शिक्षण नाही | २ मुले १ मुलगी |
| ८२. | लक्ष्मी भोसले | ७० | बेलवंडी | प्रतिसाद नाही | प्रतिसाद नाही |
| ८३. | मिनाक्षी बबन भोसले | २५ | बेलवंडी | प्रतिसाद नाही | २ मुले १ मुलगी |
| ८४. | सुनिता बबन भोसले | ५१ | बेलवंडी | प्रतिसाद नाही | ४ मुले १ मुलगी |
| ८५. | मनिषा राहूल भोसले | २२ | बेलवंडी | प्रतिसाद नाही | २ मुले |
| ८६. | सपना अजित भोसले | २२ | बेलवंडी | प्रतिसाद नाही | १ मुलगी |
| ८७. | वैशाली रामा भोसले | २५ | बेलवंडी | प्रतिसाद नाही | २ मुले |
| ८८. | सुगंधा नवनाथ भोसले | २८ | बेलवंडी | प्रतिसाद नाही | २ मुले |
| ८९. | छाया सुरेश काळे | ३८ | बेलवंडी | प्रतिसाद नाही | ७ मुली २ मुले |
| ९०. | करिष्मा दिवान भोसले | ३६ | बेलवंडी | प्रतिसाद नाही | प्रतिसाद नाही |
| ९१. | मनिषा शकील भोसले | १७ | बेलवंडी | प्रतिसाद नाही | लागू नाही |
| ९२. | रिता अनिल भोसले | २९ | बेलवंडी | शिक्षण नाही | ३ मुली १ मुलगा |
| ९३. | रेशमा उत्तम भोसले | १९ | बेलवंडी | शिक्षण नाही | मुल नाही |
| ९४. | राधा मच्छिंद्र पवार | २२ | जामखेड | ६ वी | २ मुले १ मुलगी |
| ९५. | सावित्रीबाई धनसिंग पवार | ४६ | जामखेड | शिक्षण नाही | ३ मुल |
| ९६. | गोदाबाई राजेंद्र काळे | ४१ | जामखेड | शिक्षण नाही | ५ मुल |
| ९७. | कांताबाई अर्जुन काळे | ३५ | जामखेड | शिक्षण नाही | ४ मुले |
| ९८. | अश्विनी अनिल पवार | ३१ | जामखेड | शिक्षण नाही | ४ मुले |
| ९९. | सुनिता अनिल पवार | २५ | जामखेड | शिक्षण नाही | २ मुले |
| १००. | मंदा राजू काळे | ३२ | आरणगाव | शिक्षण नाही | ३ मुले |

प्राथमिक तथ्य संकलनाकरीता निवडलेल्या एकूण १०० उत्तरदात्यांचे सरासरी वयोमान ३९ वर्षे आहे. एकूण उत्तरदात्यांपैकी ६८ व्यक्तींना मुले असल्याचे सांगण्यात आलेले असून त्यामध्ये जास्तीत जास्त अपत्यांमध्ये एका व्यक्तीला १० मुले देखील झालेली आहेत. अपत्य

असलेल्या ६८ उत्तरदात्यांपैकी प्रत्येकी सरासरी ४ ते ५ मुले असल्याचे आढळून आले आहे. एकूण उत्तरदात्यांपैकी ११ व्यक्तींनी फक्त शिक्षण घेतलेले असल्याचे आढळून आले. शिक्षण घेतलेल्या पैकी इयत्ता ४ थी पर्यंत शिक्षण झालेले २, इयत्ता ६ वी पर्यंत शिक्षण झालेले ४, इयत्ता ७ वी पर्यंत शिक्षण झालेले १, प्रथम वर्ष पदवीचे शिक्षण घेणारे १, द्वितीय वर्ष पदवीचे शिक्षण घेणारे १ आणि तृतीय वर्ष शिक्षण घेणारे १ उत्तरदाते आढळून आलेले आहेत. तर ५५ उत्तरदात्यांमार्फत शिक्षणाबाबत प्रतिसाद दिला नाही. तर ३४ उत्तरदात्यांनी शिक्षणच घेतलेले नसल्याचे दिसून येते.

## ४.२ तथ्य विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

### ४.२.१. सामाजिक इतिहास :-

**१. समाजाचा उगम व पार्श्वभूमी-**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी समाजाचा उगम कसा झाला याची माहिती कुणालाही सांगता आली नाही.

**२. जाती-जमातींचा उगम-**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी जाती-जमातींचा उगम फारसा कुणाला सांगता आला नाही. यावरून असे सांगता येईल की, सध्याच्या पिढीला पारधी समाजाच्या उगमाबद्दलची माहिती माहित नाही.

**३. भौगोलिक स्थान व स्थानांतरण -**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, निश्चित भौगोलिक स्थानाबाबत गुजरात, राजस्थान, भोपाल इ. ठिकाणांहून स्थलांतर केले असल्याचे सांगण्यात आले. चितौड राजस्थान, राजस्थान पासून ४००-५०० कि.मी.

**४. बोली भाषा-**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी समाज आप-आपसात पारधी भाषा बोलतात त्याचबरोबर भिल्ल भाषा देखील बोलतात. मात्र

ते मराठी, हिंदी, गुजराती, राजस्थानी, मारवाडी भाषा समजतात. घिसाड्यांसारखी, गुजराती–राजस्थान सारखी खडी (कडक), राजस्थानी– बंजारा, गुजराती सारखी भासते. धेडी भाषा देखील वापरली जाते.

### ५. कुटुंबव्यवस्था–

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पुरुष प्रधान संस्कृती आहे. पुरुष कुटुंबप्रमुख असतो तथापि, पुरुषाच्या अनुपस्थितीमध्ये स्त्री ही पुरुषानंतर कुटुंबाच्या पालन–पोषण व संरक्षणाची जबाबदारी पार पाडते. पारधी समाज हा एकत्रित कुटुंब पद्धती जगणारा समाज आहे. परंतु लग्न झाल्यानंतर नविन विवाहित जोडप्यांना लगेचच वेगळा संसार निर्माण करून दिला जातो. धनगर पारधी समाजात मुळ पुरुष धनगर होते. शेती नसल्याने कायम पशुपालन असायचे त्यामुळे सातत्याने शेळ्या–मेंढ्या पाळल्या जायच्या. विवाहित जोडपी एकत्र राहतात. त्यांची मुले विवाहित जोडप्याकडे असतात. वयस्कर माणसांचे थोडे हालच असतात. एकत्र कुटुंब असले तरी जेवण वेगवेगळे बनविले जाते. यामध्ये महिलांचे स्थान दुय्यम होते.

### ६. कुटुंबव्यवस्थेतून निर्माण झालेले गोत्र व वंशावळी–

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, उत्तरदात्यांना गोत्र व वंशावळी माहित नाहीत. कुळांची नावे डाभी (कुळ)– अडनाव काळे, पिंपलाज पात्रवाले (कुळ)– अडनाव पिंपळे, चांवडदेवी (कुळ)– अडनाव चव्हाण, कोरबिया (कुळ)– आडनाव पवार, रघुवंशिय (कुळ)– ह्या कुळातील लोक राम राम करतात पण ते शापित आहेत. त्यांनी अश्वमेध यज्ञ केला.

### ७. जीवनप्रणाली–

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, ऐतिहासिक नोंदी प्रमाणे पारधी समाज हा स्वतःच्या घरी अन्न शिजवून खात नाही. पूर्वी राना–वनात राहत असल्यामुळे घरातील काम संपवून भीक मागून आणण्याचे काम करतात. ते त्यांच्या परंपरेत नसल्यामुळे भिक मागून खातात त्याचबरोबर मोलमजूरी करत. महिला मुला–

बाळांचे संगोपन करणे. हातमजूरी करणे, दगड फोडणे, भंगार वेचणे, फुगे विकणे इ. काम करून उपजिवी करतात.

पारध्यांच्या लग्नामध्ये मुलींकडून देज घेतले जाते. मुलींच्या माहेरील स्त्रियांना माहित असते की, सासरी मुलींची स्थिती आमच्या सारखी होणार असते. करीता सहन करत राहण्याशिवाय पर्याय नसतो. पारधी कुटुंबात स्त्रियांना दारू पिऊन नवऱ्याकडून मारहाण केली जाते. कौटुंबिक हिंसाचार केला जातो. शारिरीक माणसिक त्रास दिला जातो. नवरे दारू पिऊन घरात पडलेले असतात तर स्त्रिया मोलमजूरी करून घर संभाळतात. मुले असल्यामुळे संसार सोडून जाता येत नाही.

पारधी समाजावर चोरी करणारे हा शिक्का लागल्यामुळे इतर समाज त्यांना जवळ करत नाही. एका ठिकाणी स्थित राहू देत नाही त्यामुळे या समाजातील स्त्रियांना पुरुषांसोबतच लपून–छपून राहावे लागते. लपून छपून भिक मागून ते कुटुंबाला जगवतात. चोरी झाल्यास पुरुषांसोबत स्त्रियांना देखील मारहाण केली जाते. संसार उघड्यावर फेकून दिले जातात. गावातून बाहेर काढले जाते. इतर समाजाकडून बलात्कार सारखे प्रकार पारधी स्त्रियावर होतात.

पारधी समाजात सकाळी भिक मागण्यासाठी जाऊन दुपार होईपर्यंत भिक मागायची, मागून आणलेले काही असेल ते मुलांना खाऊ घालायचे व शिल्लक राहिल्यास स्वतः खायचे, कधी गरज वाटली तर स्वयंपाक करायचा नाही तर नाही. संध्याकाळच्या वेळेस भूक भागविण्यासाठी गावातील घरांची वाटणी करून त्या त्या घरात जाऊन मागायचे व रात्रीचे पोट भरायचे.

पुरुषांच्या गैरहजेरीत पारधी स्त्रियांवर अतिप्रसंग करायचे देखील प्रयत्न होतात. परिवाराची ससेहोलपट होते, आरोग्याची दुर्दशा होते. आजारी जरी असले तरी दवाखान्यात जाता येत नाही, काळजी कोणी घेत नाही. आरोग्याची सेवा घेण्याकरीता गेल्यास शासकीय व खाजगी सेवांकडून अपमानास्पद वागणूक मिळत असल्याचे दिसले.

## ८. चालीरिती, रूढी–परंपरा –

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, कुळ बदलले अथवा जात बदली तर चालीरिती, रुढी–परंपरा देखील बदलतात. पारध्यांच्या पोट जातीमध्ये एकमेकांच्या चालीरिती, रुढी–परंपरा दुसऱ्या पोट जाती पाळत नाहीत. पारध्यांच्या पाच सहा जाती आहेत देव–देव होतात. महिलांना देव–देव करून दिली जात नाही. महिलांचे कपडे घराबाहेर ठेवण्याची प्रथा आहे. जात पंचायतीमध्ये स्त्रीया किंवा पुरुषांच्या व्याभिचाराचा न्यायनिवाडा केला जातो त्याकरीता विविध चालीरिती, नियम पाळले जातात. जसे की, कुऱ्हाड गरम करून पिंपळाच्या पानावर ठेवून अकरा पावले चालणे, जर पाने जळून तीचा किंवा त्याचा हात जळाला तर तो किंवा तीला दोषी ठरविले जाते नाहीतर दोषमुक्त केले जाते. उकळत्या तेलातून पैसे काढणे, विहिरीत बुडवायचे, भाजल्यास गुन्हा सिद्ध होतो. मासिक पाळी चालू असल्यास आठ दिवस घराबाहेर जायचे. बाळंतपण स्वतःचे स्वतः करून घराबाहेर राहावे लागते. बाळंतपणात तिखट, मीठ या वस्तूंना हात लावायचा नाही जर चुकून हात लागला तर समाजाबाहेर काढले जाते. बाळंतपणात बाळंतीणीला शेकोटी दिली जात नाही. औषध–पाणी, खारीक खोबरे मिळत नाही. तेल व गुळामध्ये बाजरीची भाकरी चुरून खावी लागत होती. बाळंपणात दुसऱ्या स्त्रिया बाळंतीणीला हात लावत नाहीत. बाळंतपण करताना नवरा पुरुष हा गर्भवती स्त्रीच्या पोटावर पायाने जोर देवून बाळंतपणास मदत करतो. स्वतःच्या बाळाला देखील बाळंतपणाच्या वेळी स्वतःच आंघोळ घालावी लागते. बाळंतीण झाल्यावर सव्वा महिना विटाळ पाळला जातो. स्त्रियांच्या हातचे खाल्ले जात नाही. महिलांच्या हातचे कुणीही खात नाहीत बाट समजला जातो. मुलींचे लहान वयात लग्न करून दिले जाते. भांड्याला पाय लागला तर ते भांडे वर्ज्य केले जाते. कुमारीने जेवण बनविल्यास तेच जेवण घरातील सर्व पुरुष खातात. स्त्री आणि पुरुषांच्या आंघोळीची जागा वेगवेगळ्या असतात. एखाद्या बाईला राग आला आणि तीने साडी फेकून मारली तर त्या माणसाचा बाट होतो. कधी परकर किंवा आर्थिक व्यवहारासंबंधी तंटा असल्यास पायाने लाथ मारली की बाट होतो. कधी–कधी एखाद्या स्त्रीने तीची

लघवी एखाद्यावर शिंपडली तर तो फार मोठा बाट समजण्यात येतो. अशा प्रकारे स्त्रिया स्वतःच्या चीडी चा बदला घेतात. लग्न झाल्यावर गोंदणे असते, लग्नाआधी गोंदले जाते पण फारसे लग्न झाल्यावर गोंदण्याची प्रथा आहे. देव घरात असतात त्यामुळे स्त्रियाचे कपडे घराबाहेर ठेवण्याची प्रथा आहे. विवाहाचा विधी हा ब्राह्मण आणू केला जातो. पुरुषाने गुन्हा केल्यास खर–खोट करण्यासाठी कढईत गरम तेलातून नाणे बाहेर काढावे लागते, जर ते नाणे काढले आणि फोड आला नाही तर निर्दोष माणतात. जर फोड आला तर फोकाने मारण्याची शिक्षा असते. व्याभिचार केल्यास उकळत्या तेलातून नाणे काढायचे आणि दोन दिवसांपर्यंत जर हाताला फोड येतो किंवा नाही निरिक्षण करायचे, फोड आल्यास खोटे व आला नसल्यास खरे माणले जाते. व्याभिचाराबाबत विहिरीत बुडविले जाते. गोफणीतून दगड फेकला जातो. तिथून येईपर्यंत तो निघाला तर खोट. एक जण खाली विहिरीत असतो. जिवंत सापडला तर खर नाहीतर खोट. मासिक पाळी चालू असतांना बाईच्या हातचे खाणे टाळले जाते.  बाट झालेली व्यक्ती देवाला स्पर्श करत नाही आणि ठरवून दिलेल्या भूभागाच्या बाहेर जात नाही. गेल्यास बाट होतो.

सध्या सुनांची डिलीव्हरी करतात. जावा देखील बाळंतपणात मदत करतात. विटाळ माणला जात नाही.

**९. संस्कृती–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारध्यांची संस्कृती पुरुष प्रधान आहे पण जास्त प्रमाणात महिलांना स्थान आहे. बऱ्याच वेळा घरचा कारभार पाहण्याची आणि घर चालविण्याची जबाबदारी एखाद्या कर्त्या पुरुषासारखीच महिलेवर असते.

**१०. धार्मिक निष्ठा–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी फार इमानी आहेत. धर्म पण इमानी आहे. पारध्याच्या बायकांना देव–देव करताना इमान दाखवावा लागायचा. देव–देव करण्यासाठी बकरे, हत्या कापले जातात. पारध्यांमध्ये दुजाभाव

करत नाहीत.

## ११. जात पंचायती–

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, घरांमध्ये होणाऱ्या अत्याचाराची जात पंचायतीद्वारे न्याय निवाडा करतात. पारधी समाजाची स्वतःची वेगळी न्यायव्यवस्था अस्तित्वात आहे. त्यामध्ये जो पक्ष जास्त पैसा मोजतो त्याच्या बाजूने निर्णय दिला जातो. नवरा बायकोचे तंटे मिटवतात, नवरदेवाने दिलेले पैसे पोरीच्या बापाला देऊन मिटल म्हणायचे आणि मुलगी सोडून द्यायची. मुलगी अशावेळी आई–बापांकडे जाते दुसरे लग्न वाटले तर करतात. जातपंचायतीमध्ये घटस्फोटाचे निर्णय घेतले जातात. पंच बसविले जातात. जर पंचानी सांगितले तर नवरा–बायकोचे संबंध संपतात नाहीतर नाही. तो निर्णय लगेच अंमलात आणतात. पंचांचे निर्णय लोक ऐकतात पण काही अडचण झाली कि पोलिस स्टेशनला जातात म्हणून पंचायती कमी झाल्या आहेत. पूर्वी जात पंचायतीचे निर्णय बदलले जात नसत. एकदा निर्णय दिला कि दिला. त्यामध्ये वयस्कर मंडळी पंच म्हणून असतात. जात पंचायतीमध्ये घरची भांडणे चव्हाट्यावर आणणे, महिलांचे बलात्कार, खोडी केलेले, नवरा न नांदवलेले, मुल न होणे, व्यभिचारी असल्याचे महिला संबंधी खटले जात पंचायतीत येत असायचे. जात पंचायतीचे निर्णय ऐकणे बंधनकारक असते अन्यथा जाती बाहेर काढले जाते. प्रत्येक वेळी योग्य निर्णय होईलच असे सांगता येत नाही. मात्र आता पोलिस स्टेशनचा आधार घेतला जातो. छोटे–मोठे तंटे तिथेच मिटवले जातात. परस्पर मतभेदावरून भांडणे होतात ती जात पंचायतीमध्ये सोडवण्याकरीता येतात. शिक्षांचे स्वरूप आवास्तव नसते. एखादी बाई खोट बोलणारी आढळली तर पायाचे जोडवे तापवून त्याचे चटके दिले जातात. ते किती द्यायचे ते ठरलेले असते. असे चटके कपाळावर कुंकु लावण्याच्या ठिकाणी दिले जातात. जात पंचायतीचे निर्णय मानन्याशिवाय पर्याय नसतो. पंचायतीमध्ये तिसरी व्यक्ती मान्य नाही. जातपंचायतीमध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षांचे स्वरूप–

– उकळत्या तेलातून नाणे बाहेर काढणे, फोड आले तर गुन्हेगार.

- पायातल्या जोडवे तापवून चटके देणे, फोड आले तर गुन्हेगार
- विहिरीत बुडवायचे, पाण्यातून एखादा दगड लांब टाकायचा तोच दगड त्याने परत घेवून यायचं, त्यावरून खरे–खोटे ठरविले जाते.
- नवरा बायकोला घटस्फोट देणे
- दोन लग्न झाल्यास दोघींना नांदवावे असा निर्णय देणे
- मुल होत नसेल तर अशी स्त्री नवऱ्याला दुसऱ्या लग्नाला परवानगी देते.

सध्या जात पंचायती बसतात. महिलांचे प्रश्न सोडविले जातात. जात पंचायतीचे निर्णय आम्ही आता मानत नाहीत. कारण जातपंचायतीसाठी पैसा लागतो त्यापेक्षा किरकोळ भांडणे आपापसात मिटवण्याकडेच आमचा ओढा असतो.

**१२. स्त्रीजीवन–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, सततच्या बाळंतपणामुळे गुडघे दुखणे, पोटात दुखणे चालूच असते. पारध्यांमध्ये कंटाळा जास्त असल्याने स्वच्छता पाळली जात नाही.

**४.२.२. सामाजिक सद्यस्थिती :–**

**१. गटांची निर्मिती, सामाजिक अभिसरण, सामाजिक एकत्रिकरण–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी महिलांचे संघटित गट नाहीत. दैनंदिन जीवनप्रणाली आणि उपजिवीकेच्या कामांमुळे पारधी महिला आपल्या न्याय हक्कासाठी एकत्र येत नाहीत.

**२. सामाजिक प्रेरणा–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, गावातील लोक आता पारधी समाजाला जवळ करतात. इतर समाजाच्या चांगल्या चाली–रितीचे अवलोकन केले जाते. चांगले वागण्याचा प्रयत्न करतात.

**३. सामाजिक शोषण–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी महिलांवर पुरुषांच्या गैरहजेरीत अत्यंत त्रास सहन करावा लागतो. वकिलांपासून ते पोलिसांपर्यंत तीचा लैंगिक छळ होत असतो. तिच्या मजबूरीमुळे कधी–कधी न जाण्याच्या मार्गावर देखील तीला जावे लागते. हे सर्व तिला आपल्या नवऱ्याची सुटका तुरुंगातून करण्यासाठी करावे लागते. महिलांचे छळ आज ही चालू आहेत. आजही पारधी समाजाच्या महिलांवर बलात्कार होतात. शन्नो काळे प्रकरण काय आहे ते संक्षिप्त पाहू– शन्नो काळे नावाची पारधी समाजातील मुलीची शिर्डी येथील ही घटना आहे. ही घटना २००४ मध्ये घडली. पालावर ही स्त्री रहात होती. तीचे भाऊ चोऱ्या माऱ्या करून पोट भरायचे त्या पालावर तीच्या भावांना पकडण्यासाठी शिर्डी पोलिस स्टेशन मधील पोलिस पालावर पोहचले. त्यांनी शन्नोच्या भावांची चौकशी केली. पण शन्नोने भावाबद्दल काहीही माहिती दिली नाही. तिला चौकशीच्या नावाखाली पोलिस स्टेशनमध्ये न घेवून जाता लॉजवर चौकशीसाठी नेले. तिथे ३ ते ४ पोलिसांनी तिच्यावर पाशवी बलात्कार केला. तिला जीवे मारुण टाकले. तीचे तोंड जाळून तिला टाकून दिले. टाकून दिल्यावर लोकांनी तीला पाहिले. अशा अवस्थेतील मुलगी कोण आहे? त्याची ओळख कपड्यांवर तीच्या रहाणीमानावरून झाली. तिथून पोलिसांनीच परत तीला आणली व पारधी लोकांना सांगितले की तुमची मुलगी फाशी घेवून मेली. नाशिक येथे कार्यरत असणारे श्री नांगरे पाटील सर्व हे पोलिसा सह आले. पोलिसांनी प्रेत त्यांच्या माणसांच्या ताब्यात दिले नाही तर तिथेच तिला दफण केले. पण पारधी लोकांना संशय आला. पारधी समाजाचे पंच डीआयजी पातळीवरील अधिकाऱ्याकडे गेले. पोलिस यंत्रणेने मुलीचा दफनविधी कसा केला असा प्रश्न केला. पोलिसांनी पारधी लोकांना सांगितले की, तुमच्या मुलीने गळफास घेतला होता. मुलींचा मृतदेह समाजाकडे न देता पोलिसानी परस्पर विल्हेवाट लावली याबाबतचा जाब विचारण्यात आला. पारध्यांच्या स्त्रियांनी जवाब दिले. पोलिस म्हणाले की तिची काय भरपाई असेल ती आम्ही देण्यास तयार आहोत. पारधी म्हणाले आम्हाला भरपाई नको न्याय पाहिजे. त्यानंतर शन्नोचे प्रेत पुन्हा

बाहेर काढले असता तिच्या गुप्त अवयव तसेच स्तन कापले होते. तिला पूर्ण पणे विद्रूप करून टाकले होते. आम्ही स्वतः ही घटना पाहिली. उत्तरदाता त्यातील एक पंच म्हणून कार्य केले होते. शन्नोच्या गळ्यात काळूबाईचा ताईत असल्याची खूण सांगितली तर हा ताईत मासांमध्ये खुपसला होता. भंगी लोकांना बोलवून तो ताईत बाहेर काढला. त्या वरून सिद्ध झाले की ती मुलगी पारधी समाजाचीच होती. शन्नो ला स्त्री म्हणून कोणतेही अवयव ठेवले नव्हते. पुण्यातील ससून रुग्णालयातील डॉक्टरांना तपासणीसाठी (शवविच्छेदन) पाठविण्यात आले होते. पारध्याचा संशय खरा ठरला. या प्रकरणी काही पोलिस निलंबित केले. काही पोलिसांना अटक झाली यामध्ये एक महिला पोलिस देखील होती. अद्याप ही केस न्यायालयात चालू आहे. शन्नोची नुकसान भरपाई म्हणून तिच्या भावांना सरकारी भरपाई देण्यात आली. शन्नोच्या भावांनी भरपाई घेवून तीला अग्नीडाव दिला. अग्नीसंस्काराच्या वेळी कोणीही नातेवाईक आले नाहीत. २४.०३.२००४ ची ही घटना आहे. पोलिस पारधी स्त्रियांना ऐकरी नावाने हाक मारतात. ए छिनाल या नावाने देखील हाक मारतात. आजही याच भाषेत आम्हाला हाक मारली जाते. पारधी समाज हे मान्य करतो की, ते चोरी करून खातात. दारुचा व्यवसाय करतात पण याला पोलिस विभाग कारणीभूत आहे. पोलिस पारध्यांचा जास्त छळ करतात. याशिवाय पारधी स्त्रियांना चौकशीसाठी बोलावून नको त्या अवयवाला हात लावतात. घाणेरडे स्पर्श करतात. केस ओढणे असे कृत्य करतात.

आर्थिक कर्जाची परतफेड करण्यासाठी तरूण मुलींचे लिलाव केले जातात. मुलींना रात्री उचलून घेऊन जातील म्हणून रात्री झोप येत नाही. सतत तणावाचे जीवन जगावे लागते. नवरा घरात नसताना घरातील इतर पुरुषांकडून लैंगिक शोषण, अत्याचार किंवा पोलिसांकडून, वकिलांकडून अत्याचार केला जातो. गावातील लोक शेतावर बोलावून तेथे अत्याचार केले जातात.

**४. सामाजिक जडण–जडण –**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी समाज इतर समाजाकडे बघून सुधारण्याचा प्रयत्न करतात. बदलण्याचा प्रयत्न करतात. इतर समाज

आमिष दाखवून पारध्यांकडून कामे करून घेतात. समाजातील लोक खबऱ्या म्हणून काम करतात. आता बदल करत आहेत. इतर समाजासारखे राहावे असे वाटते. नशिबाला दोष देत बसतात. समाजालाच वाटते की बदलाव करावा.

### ४.२.३. सांस्कृतिक इतिहास :-

**१. बोलीभाषा, सांकेतिक भाषा, देहबोली-**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी समाज आप-आपसात पारधी भाषा बोलतात मराठी, हिंदी, गुजराती, राजस्थानी, मारवाडी भाषा त्यांना समजतात. सांकेतिक भाषा, देहबोली अस्तित्वात नाहीत.

**२. धार्मिक रूढी-परंपरा-**

यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पुऱ्या करणे, बोकड कापणे दोन दिवस यात्रा चालते.

**३. अंत्यसंस्कार-**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी समाजात अत्यंसंस्कार करताना अग्नी दिला जातो तर काही ठिकाणी दफन केले जाते. पारध्यांना जमीन नसल्याकारणाने कधी-कधी मृतदेह १० दिवसांपर्यंत संभाळावा लागतो. सवर्णाकडून दफन विधीसाठी जागा उपलब्ध करून दिली जात नाही त्यामुळे अंत्यसंस्कार गुपचूप रात्रीच्या वेळी करतात. अंत्यविधीनंतर दुसऱ्या दिवशी सावडणे, तेराव्या दिवशी मिठाई, भाजीपाला घेवून शिजवून जाळ करून त्यामध्ये टाकला जातो. उपऱ्याचे जीवन असल्यामुळे अत्यंसंस्कार करणे अवघड होते.

**४. आहार-**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारध्यांचा आहार- मटण, हरण, मोर, पक्षी (तितर, पारवा, बगळे), बोकड खातात. फक्त गई (गाई) चे मटण खात नाहीत.

## ५. विवाहाच्या चालीरिती–

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी समाजात महिलेला दुसर लग्न करायच झाल्यास पहिल्या नवऱ्याची मुलं त्यांच्याकडैच ठेवून जायच असत. विवाहात घुंगऱ्या, ओटीत टाकून म्हाताऱ्या माणसांनी टीका लावून हळद खेळतात. लग्न झालेली महिला दुसऱ्याच्या चादरीवर (पांघरूणावर) बसत नाही, बसल्यास बाट मानला जातो. पारधी समाजात लग्न रात्रीच लावले जातात. पैसे, टोपी ठेवून वयस्कर माणसांनी टिळा लावयचा, हळद लावायची झाले लग्न. विवाहामध्ये मुला–मुलींची पसंती झाल्यानंतर दोघांकडून पैसे घेतले जातात. मुला–मुलींकडून जमा केलेले पैसे सर्व लोकांच्यात वाटले की, सुपारी फुटली असे माणले जाते. लग्नाकरीता नविन कपडे, हिरव्या बांगड्या, शालू किंवा साडी असते. विवाहाची सामुग्री आणण्याचे काम पुरुष माणसे करतात. घरातील मोठी मंडळी लग्न लावतात. कुंकवाची टिकली लावली जाते.

विवाहामध्ये हळदीला खूप महत्व दिले जाते. पारध्यांची हळद म्हणजे लग्नच असते. पूर्वी लग्न मंडळ हा आंब्यांच्या डाहळ्यांपासून तयार केला जायचा आणि त्यामध्ये लग्न लावले जायचे.  गायपारध्यांमध्ये मुलीकडून हुंडा घेतला जातो.

पारधी समाजात दोन पद्धतीने लग्न लावले जाते. रात्री पारधी पद्धत व सकाळी हिंदू पद्धत. पारधी पद्धतीमध्ये पंच लोक एकत्र येतात, सात गाठी मारून कोणताही मंत्र–तंत्र न बोलता लग्न लावत असतात (पिंपळे, काळे, चव्हाण) पंच म्हणून काम पाहतात. नवरीचा पदर व नवऱ्याच्या पंचाला गाठ मारली जाते. अक्षता टाकल्या जातात. जुन्या काळी रु.२१० देज (दहेज) हुंडा दिला जायचा, ४ पायल्या (२० किलो) गहू, चार खांब लावून चादरी बांधून लग्न करून दिले जात होते. पुरुषाना दुसरे लग्न करण्याचा अधिकार आहे. (बहुपत्नीत्व) परंतु स्त्रीला नाही. विवाहासाठी पुऱ्या व गुळवण्याचे जेवण असते. शिरा देखील केला जातो. मुलीच्या लग्नामध्ये फक्त मुलाचा व मुलींचा बापच जेवण करतो बाकी कुणी जेवण करत नाही.

पारधी समाजात फारगती (घटस्फोट) घेण्याचा अधिकार पुरुषांनाच असतो. पुरुषांमार्फत फारगती घेण्याची कारणे– १. त्याला त्याची बायको आवडत नसते. २. तिचे आणि त्याचे पटत नसते. ३. बायको व्यभिचारी असल्याचा संशय आल्यास, ४. त्याच्या गैरहजेरीत ती पवित्र आहे का, ५. तिला मुल होत नसेल तेव्हा.

आता पारधी समाज स्थिर झाल्यामुळे हिंदू धर्माप्रमाणे लग्न करतात. आंतर जातीय विवाह करत नाहीत, केले तर जाती बाहेर काढले जाते, दंडीत केले जातात.

## ६. देव–देवता–

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, धनगर पारध्यांमध्ये देव–देव करत असतांना महिलांचा सहभाग असतो. देवाची भक्ती देखील करतात. काळूबाईचा देव देव करतात, काळूबाईला फरकत देवी म्हटले जाते. नाग व साप हे त्यांच्यासाठी देव आहेत, त्यांनाच इतर भाषेत काळभैरव म्हटले जाते. तुळजापूरच्या देवीला पारधन देवी म्हणतात. त्यांचे दैवत तुळजापूर आहे. घरातील देव वेगळे आहेत. देवांमध्ये महादेव, चतुश्रृंगी, दुर्गादेवी, कालीका देवी, पिंपळास देवी, थाडीदेवी, खुडीयार देवी, सावंडादेवी, डाबी देवी, खंडोबा, खानदेशाची यमाई, राशिनची देवी, शिनदरची आई, सापार्वती, महुटाई देवी, इश्वतदेवी, शीळ हे देवीचे अवतार आहेत. त्यांचा सगळ्यांचा रंग एकच आहे.

हरकत देवी, खोडीयार देवी, गहल देवी, शीवेदेवी, धनीभाऊ, महादेव यांना देव माणले जाते. देव–देव करतांना दोन हाले (रेडे), एक बोकड, एक शेळी व एक पाट अशांचा बळी देतात. सर्वांनी एकत्र येऊन तांदूळ–पिठ एकत्र करून तांदळाची पिंड तयार केली जाते. त्यास सूर्यनारायण पिंड म्हणतात. त्यांची सूर्यनारायणाच्या नावाने पूजा केली जाते. देव–देव करायच्या वेळी तेल व तुपाची कढई देवापुढे ठेवावी लागते. अशावेळेला कोणाची भांडणे असतील तर तेथे खरे–खोटे केले जाते. स्त्रिया ऐकमेकांना स्पर्श करत नाहीत तो बाट माणला जातो. देव–देव करतांना देवाला गुढी लावली जाते. आमच चांगल कर, शेतीबाडी मिळू दे असे गाऱ्हाणे देवाकडे मांडायचे. देवाच्या यात्रेत पहिल्या

दिवशी गोड जेवण व दुसऱ्या दिवशी बोकड कापले जातात. महाशिवरात्री व नवरात्री साजरी केली जाते. महिलांना देव–देवतांच्या कार्यामध्ये स्थान नाही. अनेक दंतकथा सांगून प्रतिबंध केला व पारधी महिलांची मानसिकता देव–देव यामध्ये सहभागी होण्याची नाही.

पारधन देवी– त्याला व्याघ्री म्हणतात, वऱ्या आघरी– वाघाची शिकार करणारे तिचा अपभ्रंश वाघरी आहे. वाघाई देवी ला खैरीला म्हणतात. पिवळाई देवी, खोडीयार देवी (खुडीयार)– देव चांदीचे असतात. वनदेवी– नारळ देवी, कुलदेव, धनीराजा, शिळमाता (सात देवी) पारधन देवी– मूळ कर्नाटक, गदग.

पारध्यात देव कार्य करत असतांना खुडीयार देवीस स्वतःचे रक्त द्यावे लागते. सुरीला दंडाचे (भुज) रक्त द्यावे लागते. देवीच्या ओटीत गेल्यास तो देवाचा भगत बनतो. तीन दिवस यात्रा असल्यास असा पुरुष कोणत्याही बाईच्या संपर्कात येत नाही. देवाच्या भगताने तीन दिवस आई किंवा बायकोशी संपर्क ठेवायचा नाही.

साईबाबा, खंडोबाची यात्रा करतात. पारधी समाजाची यात्रा कर्नाटक गदग (दुर्गाअम्मा) येथे स्पेशल यात्रा असते. एप्रिल शेवटच्या किंवा मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात असते. सर्व पारधी या यात्रेस जातात. त्या यात्रेची तारीख गुरु ठरवितात. संपूर्ण भारतातील पारधी या यात्रेस हजर असतात.

टोणगे नाही आता बोकड कापले जातात.

**७. राहणीमान–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी समाजाची घरे सपराची (पालाची) असतात. सध्या पक्की घरे शौचालयासह आहेत.

**८. सण–उत्सव–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, दिवाळी, होळी, नागपंचमी केली जाते. गुडीपाडवा, गणपती हे उत्सव करत नाहीत. महाशिवरात्री व नवरात्री साजरी केली जाते. पित्र नसतात. आंब्याचा रस व भात मेलेल्या माणसांना

दाखवतात. मृत बाईचा १२ वा दिवस करतात. लवकरात लवकर सुतक तोडतात. मृत पुरुषाचा १३ वा करतात. कोणताही सण किंवा उत्सव नाही. फक्त देव–देव करतात, इतर समाज सण साजरा करतात.

**९. समाजातील घटकांचे परस्परसंबंध–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी समाजात पोटजातीमध्ये रोटी–बेटीचे व्यवहार होत नाहीत. पोलिस केस इत्यादी मध्ये एकमेकांना मदत केली जात नाही. चोरी इ. मध्ये कुणाला वाटा द्यावा लागत नाही. हा समाज इतर समाजाचे अनुकरण करून आता चांगले जीवन जगू लागला आहे. इतर समाजाशी संबंध आता चांगले आहेत. इतर समाजाला आता असे वाटते की, पारधी समाज आमच्या सारखाच वागतो. पारधी समाज सहसा कुणाशी संबंध ठेवत नाही. पूर्वी पारध्यांना काडीची ही किंमत नव्हती. पारधी समाजात अंतर्गत देवाण–घेवाण चालते. पैसे व्याजाने दिले जातात. व्याजाचे दर वेगवेगळे असतात. देवाण–घेवाणीतून झालेल्या व्यवहाराच्या पूर्ततेसाठी अथवा वसुलीसाठी आप–आपसात बरीच भांडणे सातत्याने होत असतात.

**१०. समाजातील भिन्न घटकांचे परस्परसंबंध–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी समाजाला इतर समाजाकडून काही ठिकाणी वागणूक चांगली मिळते. काही ठिकाणी अंतरजातीय विवाह झालेले आहेत. इतर लोक चांगले वागवतात. चांगले वागवले जाते. इतर समाजाची पारधी समाजाप्रती असलेली मानसिकता बदल केली पाहिजे, इतर समाजाशी संवाद सुसंवाद नाहीत. तेथे उच्च–निच असी तेढ कायम आहे. चोरीचा शिक्का लागल्यामुळे चोरटे या नजरेने पाहतात. व्यसनाधिनतेमुळे इतर समाज चांगल्यादृष्टीने बघत नाहीत. इतर समाज पारध्यांबरोबर चांगले वागत नाही. मारहाण करतात मरे पर्यंत स्त्रियांचे हाल होतात. इतर समाज चोर म्हणून चांगल वागवत नाही. अलिप्त राहतात, पण त्यांचे अनुकरण करावे असे वाटते. स्त्रियांना हीन वागणूक मिळते. बलात्कारासारख्या गोष्टींना तोंड द्यावे लागते. कोणीही मदतीला येत नाही. काही

ठिकाणी २०–२५ वर्षांपूर्वीपासून सरपंचानी गावाच्या हद्दीत राहण्यास परवानगी दिली आहे. काही ठिकाणी त्रास देत नाही, पोलिसांच्या कारवाईपासून वाचवतात. इतर समाज पारधी समाजाचा वापर करून घेतात. ऐकेरीने बोलवतात. इतर समाज वाटेल ती कामे पारध्यांकडून करून घेतात, त्या मोबदल्यात रोजगार देतात, प्रसंगी महिलांवर कामाच्या ठिकाणी बलात्कार देखील होतात. भिक मागण्यासाठी गेले असता दरिद्री, अपशकुनी पुढे जा अशा अनेक गोष्टी बोलल्या जातात. वेगवेगळे हावभाव केले जातात. पारध्यांची मुल इतर समाजाच्या मुलांमध्ये खेळण्यासाठी गेल्यास त्यांना सहभागी करून घेतले जात नाही. खेळामध्ये इतर समाजाच्या मुलांना जखम झाली तर पारध्यांच्या मुलांनाच मरेपर्यंत मारतात.

गावात कुणाकडे कार्यक्रम असल्यास दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था होते. समारंभ संपल्यानंतर जेवण उरलेच तर पारधी समाजाचा विचार केला जातो. गावात खरेदीसाठी गेल्यास संशयाने पाहिले जाते. सर्वच समाज पारध्यांकडून शेतीची कामे करून घेतात, पण विटाळ, अस्पृश्यता पाळतात. इतर समाज त्यांच्याशी चांगले बोलले तरी त्यांना वाटते की हे आपल्याशी खूप चांगला संबंध ठेवतात. बाकी कसलाही विचार इतर समाज करत नाही.

### **४.२.४. आर्थिक पार्श्वभूमी व सद्यस्थिती :–**

**१. उदरनिर्वाहाची साधने व व्यवसाय–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, सद्यस्थितीमध्ये उपजिवीके निमित्त शहरात कामानिमित्त स्थलांतरीत झाल्यामुळे उपलब्ध असलेले उत्पन्नाचे साधन ते वापरतात जसे की, पुरुष रखवालदार, मोलमजूरी, बिगारीकाम, वाहनचालक तर स्त्रिया ह्या मोलमजूरी, धुनीभांडी अशी उपजिवीकेच्या साधनांचा उपयोग करून त्यांची जीवनप्रणाली चालवितात. शेतीकाम, लाकडाचे काम करतात. कासव पकडणे, ससे पकडणे, पारवे पकडून त्यांची विक्री करणे. शिकारी करणे, मासेमारी करणे, शेळीपालन, कुक्कुटपालन दारुचा व्यवसाय देखील करतात. सध्या

अंगावर कामे ठरवून घेतली जातात व ती त्यांच्या सवडीनुसार करतात. लग्नकार्यात जेवण करून येणे आणि कुटुंबकरीता बांधून आणणे.

कामे कमी असलेल्या वेळी कमी मजूरीत पारध्यांकडून शेतीची व इतर कामे करून घेतली जातात परंतु पर्याय नसल्यामुळे अशी कामे स्विकारण्याशिवाय पर्याय नसतो. रेशनिंग धान्य कधी मिळते–कधी मिळत नाही यासाठी काहीही कारणे देतात. पुरुषांना २५० रु तर स्त्रियांना १८० रु. मजूरी दिली जाते.

चिंच, आंबा झाडे व बागा यांची राखण करायची किंवा चिंच व आंब्यांची झाडे विकत घेऊन चिंच व आंबे पिकवून ते विकण्याचा व्यवसाय करतात. शेतीचे राखण करण्याचे काम करतो.

**२. उत्पन्न निर्मिती–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पूर्वी फक्त भिक मागणे, उरलेले शिळे अन्न खाणे, कार्यक्रमात उरलेले खाणे, दारु व्यवसाय इ. होते. सध्या पारधी समाज मोलमजूरी करून उत्पन्न निर्मिती करतो. त्याचबरोबर ठरवून कामे घेतली जातात. जनवरांची देखभाल करणे, मोलमजूरीसाठी जाणे, डोंगरातून गवत काढून आणणे व ते बाजारात विकायचे. गायरान जमिनी खंडाने करणे. शहरात फुटपाथवर व्यवसाय केला जातो. पोलिसांनी हटकले कि तेवढ्या काळासाठी बाजूला निघून जायचे व पुन्हा त्याच जागेवर पुन्हा यायचे. उसतोडणीसाठी जाणे, तमाशात नाचणे.

**३. पशुपालन–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी समाजात शेळी–मेंढी पालनाचा व्यवसाय केला जातो. गाई पाळल्या जातात पण हक्काची कुरणे नाहीत.

**४. आतापर्यंत सरकारी योजनांचा झालेला लाभ–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, आजपर्यंत कोठेही चोरी झाली कि तो ठपका पारध्यांवर येतो. कृष्ण प्रकाश, पोलिस अधीक्षक, नगर

जिल्हा, आर. आर. पाटील यांनी पुनर्वसनाच्या योजना राबवितांना जमिनी वाटप केल्या. शासकीय यंत्रणेच्या भितीने काही पारधी जमाती राना–वनात फिरत आहेत. मुलांचे शिक्षण, सोई–सुविधा अभावी पूर्ण होत नाही. पोलिस यंत्रणेची मानसिकता बदलावी. मुलाच्या शिक्षणाची वाताहत होत आहे. पोलिस मोठ्या मुलांना विनाकारण कोणत्याही प्रकरणात गुंतवतात. त्यामुळे त्यांचे शिक्षण अर्ध्यावर सोडावे लागते. आयुष्याचे वाटोळे होते. सरकारी योजनांचा लाभ घेताना जुणे पुरावे मागतात ते मिळत नाहीत, कागदपत्रे मिळण्यास अडचणी तयार होतात. यामुळे योजना त्यांच्या पर्यंत पोहोचत नाहीत. त्यांना योजनांची माहिती होत नाही. सद्यस्थितीत पारधी समाजातील मुली–मुले शिक्षण घेत आहेत. त्यामुळे शिष्यवृत्ती, वसतीगृहे सारख्या योजनाचा लाभ त्यांना मिळतो.

**४.२.५. राजनैतिक सद्यस्थिती :–**

**१. राजनैतिक ओळख, चिन्ह, झेंडा–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी समाजांतील लोकांची नावे मतदार यादीत आहेत तर काही ठिकाणी नाहीत. राजकीय पुढारी येतात. निवडणूक काळात आश्वासने देतात. राजकीय नेते सहकार्य करत नाहीत.

**२. राजकीय स्थित्यांतर–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पूर्वी पारधी समाजाची नावे मतदार यादीत नव्हती. आता यादीमध्ये नावे आहेत, निवडणूकीच्या वेळेस पैसा–पाणी दिला जातो. पुरुषांना दारु पाजतात. पूर्वी पंजाला मतदान करत असे. पारध्यांमध्ये नेतृत्वाचा अभाव आहे. पारधी महिलांचा राजकारणात सहभाग नाही. पुरुष सांगतात त्या ठिकाणी मतदान महिला करतात. इतर राजकीय पक्ष समाजातील वस्त्यांवर धाड टाकण्याचे काम करतात. घरातील पुरुष, जमिनदार, राजकीय पुढारी सांगतिल तेथे मतदान करायच, झेंडा, पक्ष, गट, पुढारी, नेतृत्व माहित नाही. इतर कागदपत्रे भले ही नाहीत पण मतदार यादीत मात्र नावे टाकली आहेत.

**३. संघटना–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, शिर्डी, नेवासा, राहता, नगर या ठिकाणी संघटना आहेत. कोणत्याही स्त्रीवादी चळवळीने पारध्यांसाठी काहीही केलेले नाही. पारधी समाजाच्या संघटना नेते मंडळी पारध्यांसाठी काम करतात परंतू ती पारध्यांपर्यंत पोहचलेली नाही.  पारध्याच्या काही संघटना काम करतात, पण अद्यापपर्यंत कोणाचीही मदत झाली नाही. स्त्रियांच्या कोणत्याही संघटना अद्यापपर्यंत कार्यरत नाहीत अथवा असल्यास पारध्यांपर्यंत पोहचल्या नाहीत. लोकाधिकार आंदोलन अरुण जाधव व राजेंद्र काळे यांनी काही प्रमाणात काम केले आहेत पण त्यांना खूप अडचणी आहेत. द्वारका पवार, पिंपळे यासारख्या महिला संघटक पुढे आले पण त्यांना ही खूप मर्यादा आहेत.

**४. सामाजिक प्रेरणा–**

पारधी समाज कृष्णा प्रकाश– पोलिस आयुक्त, आर. आर. पाटील, समाजाचे पृथ्वीराज राठोड यांना प्रेरणास्थान समजतात.

**४.२.६. शैक्षणिक सद्यस्थिती :–**

**१. समाजाची परपंरागत शैक्षणिक पार्श्वभूमी–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी समाज शिक्षणापासून बहुतांशी वंचित आहे. शाळा वस्त्यांपासून खूप लांब आहेत. मुलींना शिक्षण दिले जात नाही. लहान मुलांचे संगोपन व सांभाळ करण्यासाठी मुलीवर जबाबदारी सोपविली जाते. घरातील कर्ते पुरुष व महिला रोजगार/उपजिवी निमित्त घराबाहेर जात असल्यामुळे शाळे जाऊ इच्छिणारे मुले आपल्या भांवडांचा सांभाळ करण्यासाठी घरी ठेवल्यामुळे शाळेत कौटुंबिक स्थिती जाऊ शकत नाहीत. मुलींची पावले वाकडी पडू नयेत म्हणून मुलींना शाळेत पाठविले जात नाही. मुलींचे लग्न लहान वयातच लावून दिले जाते. सासरी गेल्यावर मुलींना शाळा शिकविली जात नाही. शाळा शिकली तरी नोकरी नाही. सुविधा नाही. मुलींना खर्चाचा ताण वाटत असल्याने

मानसिकता शिक्षणाची होत नाही.

२. **महिलांचा शैक्षणिक दर्जा व स्थान–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, पारधी महिलांमध्ये साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प आहे. महिलांचे शिक्षणाचे प्रमाण इतर समाजाच्या तुलनेत कमी आहे. नवी पिढी शिक्षणाकडे उदासिनतेने पाहते. नोकरी लागत नाही, मग शिक्षणाचा काय उपयोग असा समज आहे. आरोग्य, स्वास्थ्याकडे दुर्लक्ष केले जाते.

३. **महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण–**

व्यष्ठी अध्ययनातून संकलित केलेल्या तथ्यातून असे दिसून येते की, सध्या शाळेची सोय झाली आहे. पण मुली आता खूप पळून जातात. नको ते उद्योग करतात म्हणून शाळेपेक्षा मुली घरी ठेवलेल्या बऱ्या असे मानले जाते. पैशा अभावी शिक्षण होत नाही. लहान मुलांना संभाळण्याकरीता मुलींना आपले शिक्षण थांबवावे लागते. मजूरीचे पैसे मिळतात म्हणून शिक्षण थांबते. फिरतीमुळे मुलांचे शिक्षण एका ठिकाणी होत नाही. काही ठिकाणी मुली महाविद्यालयीन शिक्षण घेत असल्याचे आढळून आले.

**४.३ व्यष्ठी अध्ययन करतांना उत्तरदात्यांनी सुचविलेल्या सूचना/समस्या–**

१. सरकारी अनुदान सरळ लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी.

२. समाजाला चालीरिती, रूढी परंपरा बाजूला करण्याच्यादृष्टीने संघटनानी काम करावी.

३. रुढी–परंपरा रहाव्यात नाहीतर समाजातील स्त्रिया हाताबाहेर जातील, घरे उद्धवस्त होतील.

४. पारधी समाजाच्या मुलांना शिक्षण, नोकरीमध्ये संधी मिळावी.

५. आरोग्य संवर्धनासाठी विशेष योजना असावी.

६. उदरनिर्वाहाचे साधन नाही, भिक मागून खावे लागते, काहीच व्यवसाय उपलब्ध नसल्यास चोरी करावी लागते.

७. सरकारी योजनेतून बेघरांना घरकुल मिळत नाही.

८. सरकारी कागदपत्रांची पुर्तता– रेशनिंग कार्ड, दारिद्र्यरेषेखालील यादीत नाव नाही, मतदान

ओळख पत्र नाही, संघटना आहेत पण समाजासाठी काही काम करत नाही. राजकीय पक्ष निवडणूकांसाठी वापर करून घेतात.

९. पोलिस यंत्रणेची मानसिकता बदलावी.

१०. पोलिस प्रशिक्षणातील पारधी पकडण्याचा भाग रद्द करावा. (पारधी समाजाला असे वाटते की, पोलिस जेव्हा चोऱ्या, माऱ्यांच्या प्रकरणात चौकशीसाठी येतात तेव्हा ज्या प्रकारे चौकशी करतात ते पाहता त्यांना असे वाटते की पोलिसांना त्यांच्या प्रशिक्षणात पारधी या जमातीसोबत कशा प्रकारे चौकशी करावी याचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे नविन पोलिसांना त्यांच्या प्रशिक्षणातून विषय वगळाव्यात.)

११. ऑनलाईन सुविधा मिळाव्यात.

१२. दारिद्र्य रेषेखालील अट रद्द करावी त्यांना लागू करू नये

१३. बेघरांना सर्व सुविधा द्याव्यात.

१४. छोटे–लघु उद्योगांचे प्रशिक्षण द्यावे.

१५. पारधी समाजातील तरुणांना पोलिस भरतीसाठी शिक्षणाची अट शिथिल करावी.

१६. पारधी समाजातील तरुणांना खेळासाठी प्रोत्साहन देण्यात यावे, जेणे करून देशाला नैसर्गिक खेळाडू मिळतील.

१७. पुरुषाच्या मृत्युनंतर स्त्री व असणाऱ्या मुलांना कोणीही पाहत नाही.

१८. पालकांचे समुपदेशन करावे.

१९. मुलांचे शिक्षण चालू राहण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

२०. शेती नाही, कायम स्वरूपी राहण्यासाठी जागा नाही, लाईट–पाण्याची सुविधा नाही, पावसाळ्यात ताडपत्री खाली जीवन जगावे लागते. घरकुल नाही, शौचालय ही नाही.

२१. मुलांचे दाखले (कागदपत्रे) नाहीत.

२२. मुलांना शिक्षण देण्याची हिंमत नाही, कोणी शिकत नाही.

२३. शाळेतील फी माफ करावी.

२४. अंतर्गत कर्ज परतफेड न झाल्यास मारहाण केली जाते.

२५. पारधी समाजातील महिलांना शिक्षणात, राजकरणात आरक्षण नाही ते द्यावे.

२६. पारधी समाजाला राजकिय नेतृत्व नाही, नेता नाही चळवळी नाहीत

२७. शिक्षण घेतलेल्या मुलींना नोकरी द्यावी. शिक्षणाची सोय जवळ उपलब्ध करून द्यावी.

२८. गावातील लोक त्रास देतात.

२९. समाजाच्या सुधारणेसाठी काही चांगले सांगितले तर समाज ते ऐकत नाही.

३०. प्राथमिक सुविधांचा अभाव आहे.

३१. दारुबंदी करावी.

३२. रोजगार निर्मितीसाठी महिलांना घरबसल्या काम करता येईल अशी साधने द्यावीत.

३३. जंगली श्वापदे, विंचु, साप यांची भिती नेहमीच असते.

३४. मंगल कार्यालय द्यावे म्हणजे बालविवाह होणार नाहीत. लग्नांच्या नोंदी होतील.

३५. समाज मंदीर प्रत्येक गावात द्यावे.

***

# प्रकरण पाचवे
# संशोधनाचा सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

## ५.१ संशोधनाचा सारांश

प्रस्तुत प्रकरणात पारधी महिलांचा अभ्यास करत असतांना आदिवासी समाजाची ओळख, भारतीय आदिवासी जमाती, पारधी समाजाचा ओळख, पारध्यांची वस्तीस्थाने, लोकसंख्या, वैशिष्ट्ये, प्रथा, परंपरा सामाजिक जडण–घडण याचा आढावा घेण्यात आला आहे. पारधी समाजातील महिलांची ऐतिहासिक पार्श्वभूमी नोंदवत असतांना या समाजाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. महिला या ह्या समाजाचा अविभाज्य घटक आहेत. त्यामध्ये विशेष नोंद घेताना हे नमूद करणे महत्त्वाचे वाटते की, स्त्रिया या ऐतिहासिक काळापासून पुरुषाच्या बरोबरीने किंबहुना पुरुषाच्या एक पाऊल पुढे जावून कुटुंबाचे पालनपोषण व सरंक्षण या जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडत होत्या. पारधी समाजाची सांस्कृतिक जडण–घडण पाहत असतांना समाजातील परंपरागत चालीरिती, रुढी परंपरांचा पगडा होता. त्याचबरोबर सामाजिक सद्यस्थिती नोंदवत असतांना इतर समाजात होत असलेल्या बदलांचा प्रभाव पारधी समाजावर झाल्याचा दिसून येतो. तसेच पुढारलेल्या समाजाप्रमाणे हा समाज जीवनमान जगण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु त्यांना त्यांच्या कपाळी नोंदविलेल्या गुन्हेगारी जमातीचा शिक्का त्यांची पाठ सोडत नसल्याचे दिसून येते. पूर्वी समाजातील रूढींचा परिणाम म्हणून मुलींना शिक्षण दिले जात नव्हते. विविध शासकीय योजनांचा लाभ या समाजातील तरूण तरुणींना घेता येत नाही. शिक्षणाचे प्रमाण तसे पाहिल्यास कमीच आहे. लहान मुलांचे संगोपन व सांभाळ करण्यासाठी मुलींवर जबाबदारी सोपविली जात होती. सध्यस्थितीत स्त्रियांच्या शिक्षणांचे प्रमाण काही प्रमाणात सुधारणा दिसून येत आहे. समाजातील मुली या महाविद्यालयीन शिक्षणाकडे वळल्याचे दिसून येते. त्यामुळे या समाजात सुधारणांचे वारे वाहत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

पारधी महिलांच्या स्त्रीवादी चळवळी व संघटनांच्या योगदानाबाबत अभ्यास करत असतांना असे दिसून येते की, पारधी महिला या संघटित नसल्याने त्यांच्या सामाजिक संघटना अस्तित्वा नाहीत. किंबहुना सवर्ण समाजातील महिला संघटनांनी देखील पारधी समाजातील

महिलांकरीता विशेष कार्य केल्याचे दिसून आले नाही. अहमदनगर जिल्ह्यातील पारधी महिला, स्त्रीवादी चळवळी ह्या फक्त सवर्ण समाजातील महिलांच्या अभ्यासाचा विषय आहे. त्यांनी केलेल्या चळवळी व अभ्यास यांचा पारधी समाजातील महिलांच्या विकासाकरीता योगदान पाहतांना या चळवळींनी महिलांचा भ्रमनिरास केला आहे.

पारधी समाजावर सवर्ण समाजामार्फत व शासकीय यंत्रणांमार्फत पिढ्यांन–पिढ्या अन्याय झालेला आहे, त्यातही स्त्रियांचे सामाजिक, आर्थिक, शारिरीक व मानसिक शोषण झालेले आहे. पुरुषाविना पारधी स्त्रिया ह्या बेवारस समजल्या जातात. पुरुषांना चोरीच्या गुन्ह्यांमध्ये अथवा खोट्या तक्रारींवरून वर्षानुवर्ष तुरंगात डाबले जाते. पुरुषांच्या गैरहजेरीत स्त्रियांना खूप त्रास भोगावा लागतो. समाजातील जातपंचायतीबरोबरच पोलिस यंत्रणेच्या अत्याचाराला बळी पडावे लागते. नवऱ्याला तुरुंगातून सोडविण्यासाठी काही स्त्रियांचा जन्म वाया गेला आहे. व्याजाने पैसे घेवून त्यांची परतफेड करण्याच्या प्रक्रियेमध्ये त्यांचे शोषण होते. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणामुळे जसे बलुतेदारी पद्धतीची वाताहत झाली. त्याच प्रमाणे पारधी समाजाची देखील उपजीविकेची साधने नष्ट झाली आहेत. त्यामुळे पारधी समाजाला स्वतःची जागा जमिन व वस्तीस्थाने कायमस्वरूपाची उपलब्ध नसल्यामुळे त्यांना उपजिवीकेसाठी भटकंती करावी लागते. खाजगीकरणामुळे व जागतिकीकरणामुळे छोटे–मोठे व्यवसायाकरीता लागणारा कामगार वर्गाच्या पूर्ततेपोटी पारधी समाजाला काही प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला आहे.  नमूद प्रकरणामध्ये पारधी समाजाची आर्थिक पार्श्वभूमी, पारंपारिक व्यवसाय, उदरनिर्वाहाची साधने व व्यवसाय, आर्थिक विकासात कुटुंबाचे स्थान, आर्थिक व्यवहार, आर्थिक विकासात महिलांचे स्थान व महत्त्व, घटनात्मक तरतूदी, विविध आयोगाच्या शिफारशी, शासकीय आर्थिक विकासाच्या योजना व त्यांची फलश्रृती, शासनाची भूमिका आणि खाजगीकरण, जागतिकीकरण व उदारीकरण या बाबींचा उहापोह केला आहे.

पारधी समाजाच्या अनुषंगाने साहित्याचे सिंहावलोकन करण्यात आलेले आहे. यामध्ये मागासघटक, आदिवासी तसेच पारधी समाजाच्या अनुषंगाने ग्रंथ, पीएच.डी., एम.फिल. संशोधन, नियतकालिके, लेख, मासिके व शासकीय अहवाल यांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात 'अहमदनगर जिल्ह्यातील पारधी समाजातील महिलांचा सर्वांगीण अभ्यास' (इ.स. १९४७ ते इ.स. २०१०) या विषयाचा अभ्यास करण्यासाठी अवलंबिण्यात आलेल्या संशोधन पद्धती विशद करण्यात आली आहे. ऐतिहासिक संशोधन पद्धतीची संकल्पना स्पष्ट करताना इतिहास लेखन शास्त्र, इतिहासाची व्याप्ती याबाबींचा नमूद करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर संशोधनाची व्याप्ती/गरज, संशोधन प्रश्न, अभ्यासाची उद्दिष्ट्ये, नमुना निवड, प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनाची साधने, संशोधन अभ्यासाच्या मर्यादा व नैतिकता स्पष्ट करण्यात आली आहे.

**व्यष्ठी अध्ययन करतांना पारधी महिलांना सध्यस्थितीत भेडसावणाऱ्या समस्या–**

व्यष्ठी अध्ययन करत असतांना उत्तरदात्यांनी त्यांच्या समस्या निवारण करण्यासाठी सुचविलेल्या सूचना.

**सामाजिक समस्या**

१. रुढी–परंपरा रहाव्यात नाहीतर समाजातील स्त्रिया हाताबाहेर जातील, घरे उद्धवस्त होतील.

२. दारिद्रय रेषेखालील अट रद्द करावी त्यांना लागू करू नये

३. पुरुषाच्या मृत्युनंतर स्त्री व असणाऱ्या मुलांना कोणीही पाहत नाही.

४. पालकांचे समुपदेशन करावे.

५. गावातील लोक त्रास देतात.

६. समाजाच्या सुधारणेसाठी काही चांगले सांगितले तर समाज ते ऐकत नाही.

७. दारुबंदी करावी

८. समालाला चालीरिती, रूढी परंपरा बाजूला करण्याच्यादृष्टीने संघटनानी काम करावी.

९. अंतर्गत कर्ज परतफेड न झाल्यास मारहाण केली जाते.

१०. प्राथमिक सुविधांचा अभाव आहे.

**आरोग्याच्या समस्या**

११. आरोग्य संवर्धनासाठी विशेष योजना असावी.

१२. बाळंतपण करताना आस्कन ही मुळी असते, ती मुळी चहा सोबत बाळंत झाल्या झाल्या

दिली जाते. त्यामुळे दुखने होत नाही.

१३. लाईट–पाण्याची सुविधा नाही, पावसाळ्यात ताडपत्री खाली जीवन जगावे लागते. घरकुल नाही, शौचालय ही नाही.

१४. मुला–बाळांना जंगली श्वापदे, विंचु, साप चावा घेतील यांची भिती नेहमीच असते.

**उदरनिर्वाहाची समस्या**

१५. उदरनिर्वाहाचे साधन नाही, भिक मागून खावे लागते, काहीच व्यवसाय उपलब्ध नसल्यास चोरी करावी लागते.

१६. बेघरांना सर्व सुविधा द्याव्यात.

१७. छोटे–लघु उद्योगांचे प्रशिक्षण द्यावे.

१८. रोजगार निर्मितीसाठी महिलांना घरबसल्या काम करता येईल अशी साधने द्यावीत.

१९. पारधी समाजाच्या मुलांना शिक्षण, नोकरीमध्ये संधी मिळावी.

२०. शेती नाही, कायम स्वरूपी राहण्यासाठी जागा नाही.

**शासन योजनांचा लाभ घेण्यातील अडथळे**

२१. सरकारी अनुदान सरळ लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी.

२२. सरकारी योजनेतून बेघरांना घरकुल मिळत नाही.

२३. सरकारी कागदपत्रांची पुर्तता– रेशनिंग कार्ड, दारिद्र्यरेषेखालील यादीत नाव नाही, मतदान ओळख पत्र नाही, संघटना आहेत पण समाजासाठी काही काम करत नाही. राजकीय पक्ष निवडणूकांसाठी वापर करून घेतात.

२४. पोलिस यंत्रणेची मानसिकता बदलावी.

२५. पोलिस प्रशिक्षणातील पारधी पकडण्याचा भाग रद्द करावा. (पारधी समाजाला असे वाटते की, पोलिस जेव्हा चोऱ्या, माऱ्यांच्या प्रकरणात चौकशीसाठी येतात तेव्हा ज्या प्रकारे चौकशी करतात ते पाहता त्यांना असे वाटते की पोलिसांना त्यांच्या प्रशिक्षणात पारधी या जमातीसोबत कशा प्रकारे चौकशी करावी याचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे नविन पोलिसांना त्यांच्या प्रशिक्षणातून विषय वगळाव्यात.)

२६. पारधी समाजातील तरुण मुलींना पोलिस भरतीसाठी शिक्षणाची अट शिथिल करावी.

२७. ऑनलाईन सुविधा मिळाव्यात.

२८. पारधी समाजातील तरुणांना खेळासाठी प्रोत्साहन देण्यात यावे, जेणे करून देशाला नैसर्गिक खेळाडू मिळतील.

**शैक्षणिक समस्या**

१. मुलींचे शिक्षण चालू राहण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

२. मुलां–मुलींचे दाखले (कागदपत्रे) नाहीत.

३. मुलींना शिक्षण देण्याची हिंमत नाही, कोणी शिकवत नाही.

४. मुलींना शाळेतील आणि महाविद्यालयातील शुल्क माफ करावे.

५. शिक्षण घेतलेल्या मुलींना नोकरी द्यावी. शिक्षणाची सोय जवळ उपलब्ध करून द्यावी.

६. पारधी समाजातील महिलांना शिक्षणात, राजकरणात आरक्षण नाही ते द्यावे.

७. पारधी समाजाला राजकिय नेतृत्व नाही, नेता नाही चळवळी नाहीत.

## ५.२ निष्कर्ष :–

नमूद संशोधन अहवालाकरीता करण्यात आलेल्या प्राथमिक तथ्य संकलनाचे विश्लेषण केले असता अभ्यास उद्दिष्टांनुसार निष्कर्षांची मांडणी पुढील प्रमाणे केली.

### १. ऐतिहासिक

पारधी समाजामधील उपघटक आणि जाती जमातींचा उगम कसा झाला याबाबत पारधी समाज अनभिज्ञ आहे. पारध्यांना त्यांच्या अगोदरच्या पिढीकडून समाजाच्या उगमाबाबत माहिती मिळालेली नाही. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे माहितीची देवाण–घेवाण झाली नसल्याचे दिसून येते. इतिहास नोंदीनुसार व नैसर्गिक जीवनशैलीनुसार भटकंती करणे, निसर्गात राहाणे, सततचे स्थलांतर, जातीच्या उतरंडीचा पगडा, समाजाचा व शासकीय यंत्रणेचा विषम दृष्टिकोन यामुळे त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची मुक्तहस्ते मदत देवाण–घेवाण होत असल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे पारधी समाजाच्या मुख्य प्रवाहापासून आजही दूर असल्याचे सिद्ध होते.

**२. धार्मिक–**

पारधी समाजामध्ये देव धर्माची प्रथा, परंपरा खूपच घट्ट आहेत. विविध जमातीच्या विविध देव–देवता, यात्रा, जत्रा व त्यांच्या प्रथाची ते इमानाने जोपासना करतात. देव कार्यात कोणत्याही प्रकारची कसूर–कचराई करत नसून देवाचा कोप होईल अशी अंधश्रद्धा असल्याचे दिसून आले. देवी–देवतांचा पगडा पारधी समाजावर खूप मोठ्या प्रमाणात असून नवचंडी व शिवरात्री असे सण साजरे करतातच असे दिसून आले. अनेक दंतकथांचा आधार घेवून महिलांना स्थान नाही. पारधी समाजात देव कार्य करतांना विवाहित महिलेला स्थान नसून त्यांचा स्पर्श अथवा सहभाग विटाळ, बाट आणि वर्ज्य मानला जातो. मात्र अविवाहित मुलींना देवकार्यात सहभागी करून घेतले जाते आणि त्यांच्या हातचे भोजन खाल्ले जात असल्याचे दिसून आले.

**३. शैक्षणिक–**

शिक्षणाची सुविधा उपलब्ध नसणे, लहान भावंडांचा सांभाळ करणे, कुटुंबाला हातभार लावण्यासाठी मजूरी करणे, मुलींचा पाय वाकडा पडेल या भितीने मुलींना शिक्षणापासून वंचित राहावे लागत असल्याचे दिसून येते. मात्र काही ठिकाणी पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटल्यामुळे मुलांना शिक्षण देण्याकडे कल दिसून येतो, यामध्ये मुलींना शिकवण्याचे प्रमाण जास्त दिसते. सद्यस्थितीत काही ठिकाणी मुली महाविद्यालयीन शिक्षण घेत असल्याचे आढळून आले आहे.

**४. सामाजिक–**

पारधी समाजात जातपंचायत ही जमातीला लागलेली किड समजण्यात येते, जात पंचायतीचे पंच न्यायाधिशाची भूमिका बजावतात, हे पंच जे निर्णय घेतात ते बहुतांशी अन्यायकारक असल्याचे दिसून येतात. जातपंचायतीमार्फत देण्यात आलेले निर्णय मुख्यतः स्त्रियांना त्यांच्यावर झालेल्या अन्यायवरती न्याय मिळण्याऐवजी क्रूरपणाचा न्याय मिळत असल्याचे दिसून येते. जातपंचायतीच्या न्यायनिवाडा करण्याच्या पद्धती देखील क्रूर असून त्या सर्व स्त्रियांच्या मानसिक, शारिरीक क्षमतेवर घाला घालून त्यांना कमकूवत करणे किंबहुना त्यांच्यावर अधिकार व वचक बसविणे हेच सत्य समोर येत असल्याचे दिसून आले. पारधी समाजाच्या महिलांवर होणाऱ्या अन्यायाचे मूळ हे पुरुषप्रधान संस्कृतीनुसार स्त्रियांना दुय्यम

दर्जाचे स्थान देवून इतिहासकालीन मनुस्मृतीच्या नियमांवलीची अंमलबजावणी असल्याचे दिसून येते. पारधी जमातींच्या उप जमाती एकमेकांमध्ये परस्पर संबंध ठेवत नाहीत, त्यांच्यामध्ये रोटी–बेटीचे व्यवहार होत नसल्याचे दिसून आले. पारधी जमातीच्या उप जमातीमध्ये उच्च–नीच, वर–चढ, कमजोर जमात असे भेद पाळले जावून जातीच्या उतरंडीची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत असल्याचे दिसून येते. सरकारी अनास्था व पारध्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोनामुळे आरोग्य सेवेकडून त्यांना मिळणारी वागणूक दुय्यम दर्जा व अस्पृश्यतेचे असल्याचे दिसून येते. शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे पारधी जमातींना उपलब्ध होत नसल्यामुळे योजनांपासून त्यांना वंचित राहावे लागते. शासन दरबारी पारध्यांची गुन्हेगार जमात अशी नोंद असल्यामुळे शासकीय यंत्रणेकडून सरकारी कल्याणकारी योजना त्यांच्यापर्यंत पोहचत नाहीत. पारधी समाजात महिलांच्या समस्या पाहता जाती–जातीची तेढ, सरकारी योजनांची उदासिनता, मुलींच्या शिक्षणाची समस्या अश्या समस्या समोर आलेल्या असून ज्यामध्ये ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक पार्श्वभूमीचा खूप मोठा वाटा असल्याचे दिसून येते.

**५. आर्थिक–**

पारधी समाज अजून काही ठिकाणी भिक मागून खात असल्याचे दिसून आले. पारधी समाजावर चोरीचा शिक्का लागल्यामुळे आणि उदरनिर्वाहासाठी शाश्वत साधने उपलब्ध नसल्यामुळे मजूरी व पडेल ती कामे करावी लागतात, यामध्ये त्यांचे शोषण होत असल्याचे दिसून येते. पारधी पुरुषांना स्थलांतर व भटकंतीमुळे उपजिवीकेसाठी शहरात वॉचमन, वाहनचालक, बिगारी अशी अपारंपारिक कामे करून उदरनिर्वाह करावा लागत असल्याचे दिसून येते.

**६. राजकीय–**

पारधी समाजामध्ये राजकीय नेतृत्वाचा अभाव दिसून येत असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांचे प्रतिनिधीत्व नसल्याचे दिसून येते.

**७. पारधी महिलांना भेडसावणाऱ्या सर्वांगिण समस्या–**

पारधी समाजात महिलांना स्वतःचे बाळंतपण स्वतःच करावे लागत असून या रुढी–परंपरेमुळे आरोग्याचे प्रश्न उदा. गुडघेदुखी, पाठदुखी, पिशवीचे आजार अशा समस्या पारधी महिलांचे खूप मोठ्या प्रमाणात दिसून येतात. पारधी समाज आजही पालावर त्यांचे जीवन जगत आहे. स्त्रियांचे मुख्यत्वे कष्टदायी, भितीयुक्त जीवन जगावे लागत असून उपजिवीकेसाठी स्थलांतर करावे लागते. ज्या गावात जातील तेथे परवानगी असेल तेवढाच कालावधी वास्तव्य करता येते, अन्यथा रानावनात हिडत–फिरत राहावे लागते. पारधी समाज स्थलांतरीत जीवन जगत असताना उघड्यावर प्रातःविधी, नैसर्गिक विधी उरकतात, त्याबद्दलचे शास्त्रीय अज्ञान व भौतिक गोष्टींची कमतरता/अभाव असल्याचे दिसून येते. पारधी समाजाच्या महिला तंबाखूची मिश्री, दारु, गांजाचे सेवन करत असल्याने व्यसनाधिनतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर दिसून येते. पारधी महिलांचे कुटुंबाकडून, पोलिस यंत्रणेकडून, इतर समाजाकडून मानसिक व लैगिंक शोषण मोठ्याप्रमाणात होत असल्याचे दिसून येते. मुलींवर इतर समाजाकडून अत्याचार होऊ नये, शिक्षण घेऊन नोकरी मिळत नाही म्हणून मुलींचे शिक्षण बंद केले जाते. कागदपत्रांचा अभाव व पुरावा उपलब्ध नसल्यामुळे शिक्षणाची उदासिनता असल्याचे दिसून येते. मुलींचे लहान वयात लग्न करून दिले जाते. पुढे जावून याबाबींचा मुलींच्या शारिरीक, मानसिक, बौद्धिक बाबींवर परिणाम होवून बालमाता मृत्युच्या प्रमाणात वाढ होवू शकते, परंतु याबाबी उघडपणे नमूद केलेल्या नाहीत. शास्त्रीयदृष्ट्या लहान वयात लग्न केल्याने कुपोषण आणि मातामृत्यु सारख्या समस्या सिद्ध झालेल्या आहेत. व्यसनाधिनता तसेच बहुपत्नीत्व यामुळे विवाहात म्होतूर, बालविवाह हे मान्यताप्राप्त नियम आहेत तेच पारधी महिलांकरीता वैवाहिक समस्या म्हणून समोर आले असल्याचे दिसून येते. पारधी समाजात कुटुंबव्यवस्थेची कमतरता दिसून येत असून वरिष्ठ नागरिकांना कुटुंबात सामावून घेतले जात नाही, त्यामुळे त्यांचे मृत्युपर्यंचे जीवन जगणे हे देखील एक समस्याच म्हणून समोर येत आहे. राजकीय पक्षांकडून, पुढाऱ्याकडून कायमस्वरूपी घर देण्याच्या आश्वासनावरती नसबंदी करून घेणे व नंतर झोपड्या बांधून द्यायच्या व नंतर जमीनदोस्त करायच्या हे सर्व खेळ निरंतर चालूच असल्याचे दिसून येते. स्त्रियांचा सन्मान हा कुटुंबातून सुरु होतो पण पारधी समाजात स्त्रियांच्या सन्मानाबद्दल विचारच केला जात नाही.

त्यामुळे बाहेरील समाजाकडून त्यांचा सन्मान होणे, सरंक्षण या गोष्टी दूरच आहेत. त्यामुळे पारधी समाज म्हणजे सवर्णांच्या हाताचे खेळणे व त्यातील स्त्रिया म्हणजे सवर्णांसाठी मनोरंजनाचे व खेळण्याच्या वस्तू समजल्या जात असल्याने त्यांच्यावर बलात्कार होतात, त्यांचावर शारिरीक, मानसिक आघात होत असल्याचे दिसून आले आहे.

**८. पारधी महिलांच्या चळवळी व संघटना –**

पारधी महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी समाजाच्या तसेच महिलांच्या संघटना ह्या नगन्य आहेत. पारधी समाजातील काही तुरळ समाज बांधवासाठी संघटना चालविल्या जातात त्यामध्ये पारधी महिलांच्या सहभागाला सुरुवात झाली आहे. उदा. द्वारका पवार, आशा काळे, विशाल पवार, अरुण जाधव यांचा संघटनांमध्ये सहभाग असून पारध्यांच्या समस्या सोडविण्यासाठी हिरीरीने सहभाग घेतात. पारधी समाजातील पुरुष किंवा स्त्रियांनी स्वतः सहभाग घेऊन त्यांच्या समाजातील स्त्रियांसाठी चालविलेल्या संघटना ह्यांचे योगदान पाहता एकंदरीत स्त्री चळवळीसाठी काम करणाऱ्या इतर सर्व संस्था व संघटना ह्यांचे योगदान पारधी समाजातील स्त्रियांच्या सर्वांगिण समस्या घेऊन काम करत असल्याचे दिसून येत नाही.

**९. पारधी महिलांच्या जीवनावर खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचा झालेला परिणाम–**

पारध्यांवर पिढीजात व लादलेले पारंपारिक व्यवसाय (उदा. चोरी करणे, भीक मागणे, दरोडे टाकणे, फसवणूक करणे, शेतीचे राखण करणे) हे जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणामुळे मोठ्या प्रमाणात कमी झालेले आहेत. सध्या ते नागरीवस्तीमध्ये हौसिंग सोसायट्यांचे वॉचमन, हॉटेलमध्ये वेटरची कामे, आचारीच्या हाताखाली स्वयंपाकी, हमाली, वेश्या व्यवसाय त्याचबरोबर शहरांमधील सिग्नलवर विविध वस्तु व फुलांची विक्री करून उपजिवीका करतात. परंतु ग्रामीण भागात ते त्यांच्या परंपरागत व्यवसायावरच उदरनिर्वाह चालवितात. शहरात आलेल्या व्यक्तींच्या राहणीमानात व आर्थिक उत्पन्नामध्ये काही प्रमाणात सुधारणा झालेल्या आहेत.

वरील निष्कर्षावरून असे दिसून येते की, पारधी समाजाच्या महिलांच्या विविध समस्यांमध्ये प्रामुख्याने उपजिवीकेची समस्या, देव–धर्माचा पगडा, आरोग्याच्या समस्या, व्यसनाधिनतेची समस्या, शिक्षणाची समस्या, बाल विवाह, राजकीय पुढारी व पक्षांकडून होणारी अवहेलना, सवर्ण समाजाकडून मिळणारी अस्पृश्यतेची वागणूक या प्रामुख्याने दिसून येतात. पारधी महिलांच्या सर्वांगिण विकासाकरीता शासकीय स्तरावरून आणि सामाजिक स्तरावर प्रयत्न झाल्यास पारधी महिलांना खऱ्या अर्थाने न्याय देता येईल. पारधी महिलांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी संशोधक संशोधनाअंती पुढील शिफारशी करत आहे.

## ५.३ शिफारशी–

नमूद अभ्यासामध्ये तथ्य संकलनाच्या विश्लेषणावरून काढलेल्या निष्कर्षावर आधारीत शिफारशी तथा उपाययोजना खालील प्रमाणे करण्यात येत आहेत–

### १. धार्मिक

पारधी समाजामध्ये विवाहित स्त्रीला देवकार्य व इतर धार्मिक कार्यामध्ये दुय्यम स्थान देण्यात आलेले असल्याने या समस्येवर मात करण्यासाठी मुलींच्या शिक्षणात वाढ करून सामाजिक उदबोधन होणे आवश्यक आहे. शिक्षणाचे प्रमाण वाढले तर रुढी, परंपरा, बाट, विटाळ इ. बाबींवर असलेली अंधश्रद्धा समूळ नष्ट करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी त्यांचे शासकीय स्तरावरून करावे.

### २. शैक्षणिक

पारधी समाजाच्या शिक्षणासाठी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन आणि तांत्रिक शिक्षण या स्तरावर शासनामार्फत कार्य करण्याची आवश्यकता आहे. पारधी समाजात मुलींच्या शिक्षणात वाढ करण्यासाठी समाजाचे प्रबोधन करणे गरजचे आहे. पारधी समाजाचा उगम व जातीव्यवस्थांच्या अस्तित्वाबाबत इतिहासावर आधारित संशोधन होणे आवश्यक असून त्यांची साहित्य आणि शासकीय दप्तरामध्ये नोंद होऊन त्याचा शैक्षणिक पाठ्यक्रमामध्ये समावेश होणे आवश्यक आहे.

### ३. आरोग्य

पारधी समाजातील स्त्रियांना आवश्यक आरोग्याच्या सुविधा, आरोग्य विभागाकडून जननी सुरक्षा योजना, माता–बाल संगोपन योजना, एकात्मिक बाल विकास सेवा योजनांतर्गत लाभ देण्यात यावा. ज्यामुळे गरोदर माता, स्तनदा माता, बालमृत्यु, बाल माता मृत्यु इ. समस्या कमी करण्यास मदत होतील. महिला व बाल विकास विभाग, महिला आयोग, महिला संघटनामार्फत पारधी महिलांच्या उत्थानाकरीता विशेष प्रयत्न करण्यात यावेत. पारधी समाजातील महिलांमधील व्यसनाधिनता नष्ट करण्यासाठी त्यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे.

### ४. आर्थिक

पारधी समाजाला शाश्वत विकासाची साधने उपलब्ध करून देणे आणि शासकीय योजनांची काटेकोर अंमलबजावणी करणे यातून पारध्यांच्या उत्पन्नात वाढ होईल, रोजगार निर्माण होतील आणि कुटुंबांच्या गरजा भागविण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण झाल्यास भिक मागणे व चोरी करणे या समस्या दूर होतील. त्याचबरोबर पशुसंवर्धन, कृषी विकास, औषधी वनोउपजे इत्यादी शासकीय लाभाच्या योजनांमधून प्रोत्साहन देवून मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. सरकारी अनुदान सरळ लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावे. या समाजाला घरकुल, विद्युत पुरवठा आणि प्राथमिक सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

### ५. सामाजिक

पारध्यांबद्दल व त्यांच्या जीवनप्रणालीबद्दल शासकीय यंत्रणा आणि सवर्ण समाजाचे उद्‌बोधन होऊन पारध्यांबाबत सहानुभूतीची भावना निर्माण करण्यासाठी माध्यमांद्वारे प्रयत्न व्हावेत. पारधी समाजातील महिलांना समानतेची वागणूक देऊन त्यांच्यावर अन्याय करणाऱ्या घटकांवर नि:पक्षपाती कार्यवाही करण्याकरीता अनुसूचित जाती–जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हे दाखल व्हावेत आणि अशा गुन्ह्यांची जलद गती न्यायालयाद्वारे निपटारा करावा, यामुळे पारधी महिलांच्या शोषणाचे प्रमाण कमी होईल. पारधी समाज व त्यांच्या महिलांबाबत पोलिस यंत्रणेने सकारात्मक भूमिका घेण्याकरीता

शासकीय स्तरावरून विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. पारधी समाज व त्यांच्या महिलांवर सवर्ण समाजाकडून होणाऱ्या अत्याचारांची नोंद महिला आयोगाने घेऊन तत्संबंधी गुन्ह्यांची उकल जलदगती न्यायालयाद्वारे करण्याकरीता विशेष प्रयत्न करावेत.

पारधी समाजातील अन्यायकारक जातपंचायतींचे समूळ उच्चाटन करण्यासाठी कडक निर्बंध असावेत, यासाठी पारधी समाजाचा सहभाग वाढविण्यात यावा. पारधी समाजात मुलींचे होणाऱ्या बाल विवाहांवर निर्बंध आणणे आवश्यक आहे, बालविवाह थांबविण्यासाठी मंगल कार्यालये असावीत व विवाह नोंदणी बंधनकारक असावी. पारधी समाजामध्ये प्रचलित रूढी नुसार बहुपत्नीत्व ह्या परंपरेला आधुनिक काळानुसार बदल करणे आवश्यक आहे, त्याकरीता उपवर मुलींच्या आई–वडिलांचे व मुला–मुलींचे प्रबोधन होणे आवश्यक आहे. यामुळे स्त्रियांच्या आरोग्याच्या समस्या कमी होण्यास मदत होईल. पारधी समाजातील उपघटकांमध्ये रोटी–बेटी व्यवहार सुरु करण्यासाठी सामाजिक गट, महिला संघटना, युवक मंडळे, युवती मंडळे स्थापन करणे व त्यांचे प्रबोधन करून भावी पिढीत असे रोटी–बेटी व्यवहार आणि उच्च–नीचतेची दरी कमी करण्यासाठी समाजामधूनच प्रयत्न होणे आवश्यक आहे, त्याकरीता युवक–युवतींनी विशेष पुढाकार घेणे गरजेचे आहे.

शासकीय नोकऱ्यांमध्ये अनुसूचित जमातीचा अनुशेष भरून काढण्यासाठी कालबद्ध उपाययोजना शासनामार्फत राबविण्यात यावी. आदिवासी विकास विभागाच्या योजनांची काटेकोर अंमलबजावणी करून पारधी समाजाला शिक्षण, रोजगार, उपजिवीका, व्यावसायीक, सामुदायिक विकास, योजनांचा लाभ देण्यासाठी कागदपत्रांच्या जाचक अटी शिथिल करून लाभ देण्यात यावा. पारधी कुटुंबात वरिष्ठ नागरीकांची होणारी हेळसांड थांबविण्यासाठी शासकीय स्तरावरून वृद्धाश्रम, आसरा केंद्रे निर्माण करण्यात यावीत. पारधी जमातीवर गुन्हेगारी जमात म्हणून आजही असलेला अदृश्य शिक्का शासकीय यंत्रणेकडून नष्ट करण्याचे कार्य होणे आवश्यक आहे, याकामी सामाजिक संस्था, माध्यमे यांनी देखील त्यांचे योगदान योग्य प्रमाणात देणे आवश्यक आहे.

### ६. राजकीय

पारधी समाजाला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विशेषतः ग्रामपंचायती व पंचायत समित्यांमध्ये विशेष आरक्षण देण्यात यावे, तसेच पारधी बहुल ग्रामपंचायतीवर सरपंच पद राखीव ठेवण्यात यावे. पुनर्वसित गावठाणांच्या धर्तीवर पारधी समाजाच्या कायम स्वरूपीच्या वस्त्या निर्माण करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात याव्यात. पारधी समाजाच्या ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय जीवनप्रणालीबाबत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत सर्वांगिण संशोधन करण्यात यावे.

- **भविष्यकालीन अभ्यासाच्या दिशा :–**

भविष्यकालीन संशोधनात महाराष्ट्रातील पारधी समुदायाचा सामाजिक–आर्थिक अभ्यास होणे गरजेचे आहे. पारधी समाजातील पोटजातींमध्ये वेगवेगळ्या रुढी–परंपरा आहेत या प्रत्येक उपघटकांवर सखोल संशोधन होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर पारधी समुदायातील महिलांच्या समस्यांवर देखील विशेष संशोधन झाल्यास महिलांचे शोषण, शिक्षण, मागासलेपणा इ. बाबींवर प्रकाश टाकून शासनाला धोरणात्मक निर्णय घेता येतील. नमूद अभ्यासात फक्त अहमदनगर जिल्ह्यातील पारधी समाजाचा अभ्यास करण्यात आला आहे. महाराष्ट्रात पारधी समाजाच्या लोकसंख्येबाबत अहमदनगर जिल्हा १० व्या स्थानावर आहे. अमरावती, अकोला, जळगाव, बुलढाणा ह्या जिल्ह्यामध्ये पारध्यांची लोकसंख्या जास्त आहे, त्यामुळे अहमदनगर जिल्ह्यापेक्षा नमूद जिल्ह्यांमध्ये पारधी समाजाचे प्रश्न विभन्न असू शकतात. त्यामुळे राज्यव्यापी संशोधनातून पारध्यांच्या प्रश्नांची संशोधनाच्या माध्यमातून उकल होईल. नमूद अभ्यासामध्ये व्यष्ठ अध्ययनाचा वापर केलेला आहे, त्यामुळे संख्यात्मक व गुणात्मक तथ्यांवर आधारीत संशोधन भविष्यात व्हावे.

***

# संदर्भ ग्रंथ सूची

## अव्वल साधने

### अ. मराठी


१. आदिवासी संशोधन पत्रिका, (बेंच मार्क सर्व्हे) टी.आर.टी.आय.आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन.

२. आदिवासी महिलांची स्थिती मूल्यमापन अहवाल (२००६) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

३. इदाते भि. रा. (१९९९), विमुक्त जाती व भटक्या जमाती अभ्यास व संशोधन समिती, अहवाल–खंड १, महाराष्ट्र शासन, समाजकल्याण विभाग.

४. गव्हाळे संदिपान (२०१२), भटक्या जमातीचा सामाजिक व आर्थिक अभ्यास : महाराष्ट्रातील पारधी जमातीच्या विशेष संदर्भात, अप्रकाशित, औरंगाबाद विद्यापीठ, औरंगाबाद.

५. चव्हाण सीमा रविंद्र (२०११), शासकीय उपयोजनाचा अनुसूचित जमातीवर (पारधी समाज) झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामांचा अभ्यास, पीएच.डी. संशोधन, औरंगाबाद विद्यापीठ, अप्रकाशित.

६. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहमदनगर जिल्हा २०१३, जिल्हा सांखिकी कार्यालय अहमदनगर, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, अहमदनगर.

७. थाडे समितीचा अहवाल (१९६०), महाराष्ट्र शासन.

८. दांगट उमाकांत, भाप्रसे, जिल्हाधिकारी अहमदनगर, पारधी गणना व विकास प्रारूप आराखडा, अहमदनगर.

९. बगाडे उमेश (२०१३), दलित जाणिवेतील द्वंद्व : प्रभूत्व आणि प्रतिकार, सुगावा प्रकाशन, पुणे.

१०. बनसोडे टी. के. (१९९४), अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अधिनियम १९८९.

११. भारताचे संविधान (१९९२), प्रकाशन महाराष्ट्र राज्य भाषा संचालनाद्वारे अनुदानीत चौथी आवृत्ती.

१२. महाराष्ट्र शासन समाजकल्याण (१९८६), सांस्कृतिक क्रिडा व पर्यटन विभाग परिपत्रक क्र.सी.बी.सी. १८६४ जी.पी. ५९२–१९९९ बी. सी. डब्लु. ५, मंत्रालय, मुंबई.

१३. महाराष्ट्र मानव विकास अहवाल (२०१२), यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे, महाराष्ट्र शासन.

१४. महाराष्ट्र शासन (२०१३), वाटचाल सामाजिक न्यायाच्या दिशेने (प्रकाशन समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

१५. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४–१५, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

१६. मेळघाट मधील आदिवासींचे कुपोषण, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे.

१७. लक्ष्मण माने, (१९९७) विमुक्तायन, महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : एक चिकित्सक अभ्यास, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.

१८. संयुक्त राष्ट्रसंघ (२०००) सहस्त्रकातील विकासाची लक्ष्ये.

१९. संशोधन पत्रिका, आदिवासी जमातींच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक संशोधनाचे प्रमुख कार्य आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

२०. स्टार्ट कमिटी (१९२२) वसाहतींच्या व्यवस्थानातील सुधारणा.

२१. हरसूल (नाशिक जिल्हा) विकास गटातील आदिवासी गावांची कर्जबाजारीपणासंबंधी पाहणी १९६४–६५, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

**ब. इंग्रजी**

१. Census of India 2011.

२. Danda A. K. (1981), Statutory Provision Safeguarding Interests of Scheduled Tribes and Scheduled Castes in L. P. Vidhyarthi (ed.) Tribal Development and its Administration Concept, Pub. Delhi.

३. Dattatraya Bhandalkar (2014), Excluding the Ex-Criminal Tribes: Undertanding Domination and Interplay of Caste in India, Afro Asian Journal of Social Sciences, Volume V, No.4. Quarter IV 2014 : ISSN.

४. Dhebar, U. N. (1961), Report of the Scheduled Areas and Scheduled Tribes Commission, Publication Div. Govt. of India.

५. Government of Maharashtra (2010-11), Various Schemes Implemented for the Welfare of Backward Classes for the years 2010-11 (Publication-Social Justice and Special Assistance Department (Social Justice)

Government of Maharashtra.

६. Joseph V. V. (2004), Tribal Development in Kerala A Critique A Case Sutdy of the Malai Aryans in Kottayam District, Mahatma Gandhi University, Kottayam, unpublish Ph.D. Thesis

७. Kamble B. N. (1995), Effectiveness of Development Programmes for Scheduled Cates & Scheduled Tribes in Maharshtra, Pune University, unpublished, Ph.D. thesis.

८. Pardhi Rehabilitation Study (2006), Tata Institute of Social Sciences, Tuljapur, Dist. Osmanabad

९. People of India (Maharashtra) Vol.XXX-Part 3, General Editor, Singh, K. S. 2004 (Editors) Bhanu, B. V., Bhatnagar, B.R., Bose, D. K., Kulkarni, V. S., Sreenath, J., Anthropological Survey of India, Popular Prakashan Pvt. L. Mumbai.

१०. Tribal Profile At a Glance, 2014

**दुय्यम साधने**

**अ. मराठी**

**१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड–३.**

**२. आंबेडकर बी. आर. (१९४३), शुद्र पूर्वी कोण होते?, सुगावा प्रकाशन, (मराठी अनुवाद– चरित्रकार चांगदेव भगवानराव खैरमोडे)**

**३. आंबेडकर बी. आर. (२०१३), 'रिडल्स इन हिंदूइझम', अशोक प्रकाशन, नागपूर.**

**४. कदम नागनाथ (२०१३), 'महाराष्ट्रातील भटका समाज : संस्कृती व साहित्य', पुनर्मुद्रण, पुणे.**

**५. कसबे रावसाहेब (२०१३), 'जातिअंत आणि जातीच्या मानसशास्त्राची शक्यता' (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेषांक २०१३), अन्वीक्षण, पुणे.**

**६. कसबे रावसाहेब (१९९६), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जात व वर्गविषय विचार, स्मृती व्याख्यानमाला, भाषण**

७. कविमंडन विजय (१९९८), विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन, श्री महेश प्रकाशन.

८. काशिकर राजश्री एस. (२०१२),'महाराष्ट्रातील रोजगार धोरण', महाराष्ट्र : ५० वर्षातील आर्थिक धांडोळा, सेंटर फॉर इकॉनॉमिक्स अँड सोशल स्टडीज, अमरावती.

९. कांबळे उत्तम (२०१५), ‘आंदकोळ आयचं आंदकोळ’, सकाळ, सप्तरंग, फिरस्ती, २९ नोव्हेंबर, २०१५.

१०. कांबळे उत्तम (२००२), जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न, सुगावा प्रकाशन, पुणे.

११. कांबळे गौतमीपुत्र (२०१३), जातीचे मानसशास्त्र आणि जाति निर्मूलनाचा प्रश्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेषांक–अन्वीक्षण, पुणे.

१२. कांबळे बी. एन., ‘महाराष्ट्रातील विकास कार्यक्रमांची अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींवरील (आदिवासी) परिणामकारकता’ अप्रकाशित, पुणे विद्यापीठ.

१३. कुलकर्णी सर्वोत्तम (१९९७), ‘भारताच्या आर्थिक नियोजाची व्यूव्हरचना : एक सिंहावलोकन’, योजना, अंक–५, डिसेंबर, मुंबई.

१४. कुलकर्णी शरद (१९८९), आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतरण : नवा कायदा, ग्रामायन प्रकाशन, प्रथम आवृत्ती.

१५. खरात गोपीनाथ (२०१०), एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमाचे टीकात्मक मूल्यमापन नाशिक जिल्हा (महाराष्ट्र), अप्रकाशित.

१६. खतीब के. ए. (२०१५), ‘‘महाराष्ट्राचा भूगोल’’ के सागर पब्लिकेशन, पुणे.

१७. गायकवाड प्रदीप (२०००), भारताचे संविधान, (अनुवादित) समता प्रकाशन, लष्करी बाग, नागपूर.

१८. गायकवाड प्रदीप (२०१३), मागासवर्गीयांचे आरक्षण, मागासवर्गीयांच्या नोकरीविषयक आरक्षणाची संपूर्ण माहिती प्रकाशन, दीक्षाभूमी संदेश, समता प्रकाशन, नागपूर

१९. गायकवाड प्रदीप (संपादक) (२०१४), मागासर्वीयांच्या विकास योजना, दीक्षाभूमी संदेश, समता प्रकाशन, नागपूर–४४००१७ (ISBN : 13-978-81-86462-59-1).

२०. गारे गोविंद (१९७५), आदिवासी समस्यांचा विकास व विश्लेषण, आदिम प्रकाशन, पुणे, प्र.आ.

२१. गारे गोविंद (१९९६), महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्र आणि आदिवासी जमाती, कॉन्टीनेटल प्रकाशन, पुणे.

२२. गारे गोविंद (१९९७), आदिवासींचे शिक्षण, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती.

२३. गारे गोविंद (१९९९), आदिवासी विकास योजना, आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे, प्रथम आवृत्ती.

२४. घाटगे एल. एन. (१९९७), लेख महाराष्ट्राचा ग्रामीण विकास संकल्पना व वास्तव स्थिती, शिवाजी इकॉनॉमिक्स असोशिएशन, कोल्हापूर.

२५. चव्हाण पृथ्वीराज (२०१३), 'दुर्बल घटकांच्या हितरक्षणाची घटनात्मक' लोकराज्य, महाराष्ट्र शासन.

२६. चव्हाण रामनाथ (२००२), 'भटक्या–विमुक्तांची जातपंचायत–खंड १', प्र.आ., पुणे.

२७. चव्हाण रामनाथ (२००४), भटक्या–विमुक्तांची जातपंचायत, खंड–२, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा.लि., पुणे, पहिली आवृत्ती.

२८. चव्हाण रामनाथ (२००६), भटक्या–विमुक्तांची जातपंचायत, खंड–३, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा.लि., पुणे, पहिली आवृत्ती.

२९. चव्हाण रामनाथ (२००८), भटक्या–विमुक्तांची जातपंचायत, खंड–४, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा.लि., पुणे, पहिली आवृत्ती.

३०. चव्हाण प्रवीण (२०११), प्रारंभीचे स्त्रीवाद : संदर्भ साहित्याचा वेध, क्रातिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, आवृत्ती.

३१. चव्हाण प्रवीण (२०११), प्रारंभीचे स्त्रीवाद : संदर्भ साहित्याचा वेध, क्रातिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, आवृत्ती.

३२. चव्हाण एस. आर., पारधी समाजाच्या महिलांवर शिक्षणामुळे झालेला परिणाम, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

३३. चौगुले डी. जी. (१९९७), महाराष्ट्रातील ग्रामीण विकासाच्या समस्या, शिवाजी विद्यापीठ, आठवे वार्षिक अधिवेशन १३, १४ नोव्हें. १९९७ ए शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३४. तेगपुरे मारोती (२००८), किनवट तालुक्यातील आदिवासी उपयोजनाचे मूल्यमापन, अप्रकाशित, औरंगाबाद विद्यापीठ, औरंगाबाद.

३५. तेलतुंबडे आनंद (एप्रिल–जून २०१३) (अन्वीक्षण) जातीच्या सातत्यामागचे मानसशास्त्रीय घटक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेषांक अन्वीक्षण संपादीत

३६. तेलंग प्रियदर्शी, संपादक (२०१३), जातीय अत्याचाराविरुद्ध एल्गर– दलित आदिवासी अधिकार आंदोलन, विजयस्तभ भिमाकोरे प्रकाशक.

३७. तांबे सिद्धार्थ (२००७), 'जात नाही जात', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर ISBN १३९७८–८१–९०५८५७–४–३.

३८. दत्त आणि सुंदरम (२०००), भारतीय अर्थव्यवस्था, एस चाँद आणि कंपनी, नवी दिल्ली.

३९. दास्ताने संतोष (२०१२), दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे–३०.

४०. दांडेकर आणि रथ (१९९८), भारतातील दारिद्रय, साठे प्रकाशन, पुणे.

४१. देवगांवकर एस.जी. (२००१), आदिवासी विकास प्रशासन', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती.

४२. देहाडराय स्वाती, तांबे अनघा (२००९) स्त्रियांच्या चळवळी आणि संघटना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

४३. नगरकर राजेश (२००२) : महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जनजातीच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (TRTI Tribal Research & Training Institute) योगदान एक विश्लेषणात्मक अधययन १९८९–९०–१९९९–२००० अप्रकाशित.

४४. नाडगोंडे गुरुनाथ (१९७९), भारतीय आदिवासी, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

४५. पवार संतोष (२०१०), पारधी पुढे पोलीस मागे...!, भीमराज प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती.

४६. पवार संतोष (२०१४), पारध्यांची जातपंचायत, आयडीया पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती.

४७. पवार किरण सर्जेराव, (२०१४) घिसाडी जमात : एक ऐतिहासिक अवलोकन, अप्रकाशित, पुणे विद्यापीठ.

४८. प्रभुणे गिरीश (२००३), पालावरचं जिणं, साप्ताहिक विवेक प्रकाशन, द्वितीयावृत्ती.

४९. पाटील अविनाश (२०१६), जात पंचायतीला हवा लगाम, सकाळ, सप्तरंग, फिरस्ती, १३ मार्च, २०१६.

५०. पाटील शरद (२००८), 'दास–शुद्रांची गुलामगिरी' खंड–१, प्राज्ञ प्रकाशन, वाई जि. सातारा.

५१. पानसरे गोविंद (२०१५), 'धर्म जात वर्ग आणि परिवर्तनाच्या दिशा' श्रमिक प्रतिष्ठान लोकवाङ्मय गृह, ISBN ८१–९९२८–७३–४.

५२. प्रसाद सुरजकुमार सुभाषचंद्र, महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमाती आणि आदिवासी विकास उपाय योजनांचा एक अभ्यास.

५३. परुळेकर गोदावरी (१९९२), जेव्हा माणूस जागा होतो, मौज प्रकाशन, मुंबई, चतुर्थ आवृत्ती.

५४. पोळ अमृत वासुदेव (१९८५) 'आदिवासींमधील आर्थिक बदल' अप्रकाशित, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

५५. फडके सुधीर (१९६३), महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, जोशी–लोखंडे प्रकाशन, पुणे.

५६. देसाई भालेराव (१९९८), भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे.

५७. भागडे पोपट मच्छिंद्र, ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन, पीएच.डी. संशोधन, औरंगाबाद विद्यापीठ, औरंगाबाद.

५८. भोसले नारायण (२००८), 'भटक्यांची पितृसत्ताक जात पंचायत परंपरा आणि संघर्ष', द ताईची प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती.

५९. भागवत विद्युत (२००९), स्त्री प्रश्नाची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने, प्रतिमा प्रकाशन, पुणे द्वितीय आवृत्ती.

६०. भागडे पोपट मच्छिंद्र, ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन, अप्रकाशित, औरंगाबाद विद्यापीठ, औरंगाबाद.

६१. भगवान भोईर (१९८८), उध्वस्त पाखरे, स्वप्निल प्रकाशन, ठाणे, प्रथम आवृत्ती.

६२. मांडे प्रभाकर (१९८३), गावगाड्याबाहेर, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती.

६३. माने लक्ष्मण (१९९७), विमुक्तायन, महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : एक चिकित्सक अभ्यास, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, प्रथम आवृत्ती.

६४. मोरे गिरिश (२०१३), भटक्या विमुक्तांची चळवळ, 'सम्यक विद्रोही मासिक', भटके विमुक्त, कोल्हापूर

६५. रणसुभे विलास (२००७), 'जात–वर्ग व परिवर्तनाचा लढा', श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर.

६६. रणसुभे विलास (२००७) (संपा.), अविनाश पानसे स्मृति व्याख्यानमालेतील व्याख्यांचे संकलन, प्रकाशन लोकवाङ्मय गृह ऑगस्ट २००८, जाने २०१४ ISBN ९७८–८१–९०६६९६–४१–१)

६७. राजदेरकर सुहास, इतिहास लेखन शास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.

६८. रावत हरीकृष्ण (२००८), मानवशास्त्र विश्वकोष, रावत पब्लिकेशन, जयपुर.

६९. लिंबाळे शरणकुमार (संपा.) (२००७), 'साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह', प्र. आ., पुणे.

७०. वाघ विलास (संपादन) (२०१२) जातीसंस्थेचे बदलते आधार, सुगावा प्रकाशन, पुणे.

७१. वाघमारे वसंत (२०१४), 'जातिव्यवस्था निर्मिती आणि स्वरूप', सुगावा प्रकाशन, पुणे.

७२. वर्मा रूपचंद (१९९७), भारतीय जनजाती या अतीतके झरोखे से, नई दिल्ली, प्रकाशन विभाग, सुचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.

७३. सम्यक विद्रोही (२०१३), भटके विमुक्त : साहित्य, संस्कृती आणि समकालीन समाजवास्तव, मासिक.

७४. सोनवणी संजय (२०१६), जाती संस्थेचा इतिहास आणि काही जातींचा इतिहास, प्राजक्त प्रकाशन, बाजीराव रोड, पुणे.

७५. सोनांकर वंदना व जाधव राजू (२०१३), 'भारतीय अर्थव्यवस्था', पिअर्सन पब्लिकेशन, दिल्ली.

७६. शहा निरंजन (१९७०), आसाममधील स्थलांतरित शेतीचे अर्थशास्त्र, अप्रकाशित.

## ब. इंग्रजी

१. Abraham, Susan (1999), 'Steal or I'll Call You a Thief: Criminal Tribes of India', Economic and Political Weekly, Vol. 34, No. 27.

२. Agrwal A. K. (1995), Employment in Rural India, Indian Economic Issue, P. Jagdish Gandhi (Ed.), Pointer Publisher, Jaipur.

३. Ahemed Aijazuddin, Education of the Scheduled Tribes, Some Aspects of Inequality, National Institute Educational Planning and Administration, New Delhi

४. Ayyar, Vinayak (2011), A Study on Criminalization process of Pardhi Tribe. M.Phil. Dissertation (unpublished). Mumbai: T.I.S.S.

५. Bairathishashi (1999), State of Education Tribal Culture, Economy and Health, Rawat Publication, Jaipur.

६. Barai ,Swapnil, (2007), pre-Primary Education Centres for De-notified Tribes: A Loka Parishad Initiative, Study report, (Unpublished) Pune, Loka Parishad.

७. Bokil, Milind. 2002, “De-Notified and Nomadic Tribes: A Perspective”, Economic and Political Weekly, Jan., Vol. 37, No. 02.

८. Bose Nirmal Kumar (2002), Tribal Life in India, National Book Trust India, Delhi.

९. Bhargava, B.S. (1949), The Criminal Tribes of India. New Delhi: Jain Publications.

१०. Chalam K. S. (2000), Impact of Liberalization on Tribal Development in India, Rawat Publication, Jaipur

११. Cullen, Francis, T and Ball Richard A. (2011), *Criminological Theory: Context and Consequences*. New Delhi. Sage Publication.

१२. D’Souza Dilip, Declared Criminal at Birth : India's Denotified Tribes, Manushi.

१३. Dongre M. K. (1974), Economic Thoughts of Dr. B. R. Ambedkar, Nagpur.

१४. Enthoven, R.E. (1975) (reprint). Tribes and Castes of Bombay, Vol.III. New Delhi: Cosmo Publications.

१५. Guru Gopal (2014), Understanding Violence against Dalits in Marathwada (Source: Economic and Political Weekly, Vol. 29, No.9 (Feb. 9, 2014)

१६. Government of India Annual Plan 2001-02 to 2014-15 Planning Commission, New Delhi.

१७. Government of India, Planning Commission (2011), 'India Human Development Report-2011', Planning Commission, New Delhi.

१८. Govt. of India, Report of the commissioner for SC/ST, Part-I, 27th Report, 1978-81, Delhi.

१९. Kamat A. R. (1981), Education and Social Change amongst the Scheduled Castes and Scheduled Tribes, (Source: Economic and Political Weekly, (August 1, 1981)

२०. Lalitha, V. and Gandhi, M. (2001), 'The Status of Denotified Communities after Indian Independence', Journal of Rural Development, 20 (1)

२१. Madane, Uttam (2013), Social Exclusion of De-Notified Tribes: A Case of Ramoshi Community, M.A. Dissertation (unpublished). Mumbai: T.I.S.S.

२२. Moyer, Imogene, L. (2001), Criminological Theories: Traditional and Nontraditional Voice and Themes. New Delhi. Sage Publication.

२३. Negi R. S. (I.A.S), Gaikwad John (Edited) - Socio Cultural Dynamics of Tribal Development, Tribal research and Training Institute.

२४. Parth Sarathy G. (), 'Rerientation of rural Development programmers', E.P.W., Vol. XX, Non. 1985.

२५. Radhakrishna, Meena (2007), 'Urban Denotified Tribes: Competing Identities, Contested Citizenship', Economic and Political Weekly, 42(51)

२६. Reddy P. G. (1987), Politics of Tribal Exploitation: A Study of Tribal Unrest in Orissa, Mittal Publications, Delhi.

२७. Ross, M. G. (1955), *Community Organization-Theory and Principles.* New York: Harper & Bros.

२८. Samal Jagabandhu, Some Aspects of Tribal Economy, A Case Study of Koraput District, Ph.D. Thesis, University of Pune.

२९. Sangave, Vilas (1967), Phanse Paradhis of Kolhapur: A Tribe in Transition", Sociological Bulletin, 16 (1)

३०. Simhadri, Y.C. (1979), The Ex-Criminal Tribes of India, New Delhi: National Press.

३१. Simhadri, Y.C. (1991), Denotified Tribes: A Sociological Analysis, New Delhi, Classical Publishing Company.

३२. Sen A. K. (1975), Poverty Inequality and Unemployment, Economic and Political Weekly, Mumbai.

३३. Sen Amartya - Development as Freedom, Oxford University press, New Delhi.

३४. Srinivas M. N. (1955), Caste Can They Exit in India of Tomorrow, (Source: The Economic Weekly, (Oct. 15, 1955)

३५. Swapanil M. Kamble (2014), Marginalization of Youths and Women in Phase Paradhi Scheduled Tribes in Kolhapur Distric, Maharashtra, Research Paper, Paripex-Indian Journal of Research, Volume : 3, Issue 1, Jan 2014.

३६. Thorat Sukhadeo, New Man S Katherine (2007), Caste and Economic Discrimination: (Causes, Consequences and Remedies, published by : Economic and Political Weekly (October 13, 2007)

३७. Thorat Sukhadeo (2005), Reservation and Efficiency Myth and Reality : (published by Economic and Political Weekly (Feb. 26, 2005)

३८. Thorat Amit (2010), Ethnicity, Caste and Religion Implications for Poverty Outcomes, (Source: Economic and Political Weekly, Vol. XLV, No.51 (Dec. 18, 2010).

३९. Bhandalkar Dattatraya (2014), Excluding the Ex-Criminal Tribes: Undertanding Domination and Interplay of Caste in India, Afro Asian Journal of Social Sciences, Volume V, No.4. Quarter IV : ISSN : 229-5313

४०. Kamble Swapnil (2014), Marginalization of Youths and Women in Phase Paradhi Scheduled Tribes in Kolhapur Distric, Maharashtra, Research Paper, Paripex-Indian Journal of Research, Volume : 3, Issue 1, pp 206-209

४१. D'suza Dilip (NF), Declared Criminal at Birth : India's Denotified Tribes, Manushi, pp.2622

### क. वर्तमानपत्रे

१. **अविनाश पाटील (२०१६), जात पंचायतीला हवा लगाम, सकाळ, सप्तरंग, फिरस्ती १३ मार्च, २०१६**

२. **कांबळे उत्तम (२०१५), आंदकोळ आयचं आंदकोळ, सकाळ, सप्तरंग, फिरस्ती २९ नोव्हेंबर, २०१५**

### ड. वेबसाईटस्–

१. http://planningcommission.gov.in/reports/sereport/ser/stdy.

२. www.issin.org

३. www.jnu.ac.in/juun news archives/jnon news/scholars.htm

४. http://indigenouspeolesissues.com/index.php

५. http://mahades.maharashtra.gov.in

६. http://mahatribal.gov.in

# परिशिष्ट-१

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ
## इतिहास विषयातील पीएच.डी. पदवीकरीता मुलाखत मार्गदर्शिका

# ''अहमदनगर जिल्ह्यातील पारधी समाजातील महिलांचा सर्वांगीण अभ्यास''
# (इ.स. १९४७ ते इ.स. २०१०)

**संशोधक**

**प्रा. पवार सुप्रिया संग्राम**

**Interview Guide**

**(मुलाखत मार्गदर्शिका)**

**१. सामाजिक इतिहास :-**

१. **समाजाचा उगम व पार्श्वभूमी** (पुराणातील, धर्मग्रंथातील ऐतिहासिक कथा, मुळ पुरुष-स्त्री, देवदेवता)

२. **जाती-जमातींचा उगम** (राज घराणे जातीची वैशिष्ट्ये, मुळ जात, कोणत्या विभागले का)

३. **भौगोलिक स्थान व स्थानांतरण** (जातीचे स्थान कुठले देश, राज्य किंवा ठिकाण)

४. **बोली भाषा** (बोली भाषेचा इतिहास नाव कोणत्या भाषेतून उगम झाला, भाषा कशी तयार झाली.)

५. **कुटुंबव्यवस्थेची निर्मिती** (मूळ स्त्री/पुरुष कोणत्या जातीचे वंशाचे किंवा गोत्राचे होते.)

६. **कुटुंबव्यवस्थेतून निर्माण झालेले गोत्र व वंशावळी**

७. **जीवनप्रणाली** (ऐतिहासिक दिनचर्या जीवन मान कसे होते. व्यवसाय उधर निर्वाचे साधान)

८. **चालीरिती** (जुन्या चालीरीति काय आहे.)

९. **रूढी-परंपरा** (जुन्या रूढी परंपरा)

१०. **संस्कृती** (देव किंवा धार्मिक संस्कृती)

११. **धार्मिक निष्ठा** (ऐतिहासिक देव कोणते, हिंदू धर्मातील कोणत्या देवापासून तुमचे सद्याचे देव निर्माण झाले आहेत.)

१२. **समाजातील भिन्न घटकांचे परस्परसंबंध** (ऐतिहासिक काळातील इतर समाजाचे संबंध)

१३. **सामाजिक घडण-जडण** (सामाजिक वाढ कशी होते)

१४. **जात पंचायती** (ऐतिहासिक पार्श्वभूमी व महिलांचे स्थान महिलांच्या बद्दलची भूमिका)

१५. **सामाजिक अभिसरण**

१६. **समाज सुधारणा चळवळींचा इतिहास** (पारधी समाजात कोणी क्रांतीकारक, नेता पुढे येऊन यांच्यासाठी काही काम केले आहे का?)

१७. **कला स्थापत्य** (ऐतिहासिक कला आहेत का?)

१८. **विविध घटक** (वाहतूक व्यवस्था, व्यसन, लैगिंक शोषण)

१९. **स्त्रीजीवन** (ऐतिहासिक काळाती स्त्री जीवन, पुरुषांच्या गैरहजेरीत तिचे स्थान)

## २. सामाजिक सद्यस्थिती :–

१. **सामाजिक घडण–जडण** (सामाजिक जडणघडण कशी झाली कोणत्या कारणामुळे झाली)

२. **गटांची निर्मिती– सामाजिक अभिसरण, सामाजिक एकत्रिकरण** (कशा प्रकारे झाली)

३. **विविध घटक– जाती, पोटजाती, प्रकार, व्यवसायानुरूप ओळख** (ओळखीची चिन्हे)

४. **महिलांचे स्थान– बालविवाह, विवाहपद्धती, हुंडापद्धती, वैवाहिक जीवन, महिलांची कौटुंबिक जबाबदारी, शिक्षण (साक्षरता)** (सद्यस्थिती)

५. **उपजिवीका– व्यवसाय, उद्योग** (सद्यचीस्थिती)

६. **सामाजिक वागणूक** (इतर समाजाकडून सद्यस्थितील वागणूक)

७. **सामाजिक प्रेरणा** (कथेतून किंवा कोणाकडून प्रेरणा घेतल्या)

८. **सामाजिक समज** (सद्यस्थितीत काही समज आहेत का)

९. **पारधी समाजाची इतर समाजाबरोबर परस्परसंबंध– पूर्वपार पारंपारिक व्यवसायानिमित्त, मजूर व शेती उद्योगांच्या अनुषंगाने, गुन्हेगारीसंबंधी (इतर उच्चवर्णिय समाजाकडून त्यांचा वापर), पोलिसांकडून वापर, बंदिवास, उच्चाटण**

१०. **अंतरजातीय विवाह होतात का**

## ३. सांस्कृतिक इतिहास :–

१. **लोकवस्ती**

२. **लोकवस्ती** (घरे कोणत्या प्रकारचे आहेत, शौचालय आहेत का?)

३. **बोलीभाषा, सांकेतिक भाषा, देहबोली,**

४. नातेसंबंध व रोटी–बेटी व्यवहार (कोणाशी, कसा, निकष कोणते लावले जातात.)

५. सामाजिक उतरंडी व त्यांचे स्थान

६. महिलांचे स्थान

७. सामाजिक जीवन– घर, वसाहती, तांडे, वस्त्या

८. चालीरिती– सन, उत्सव, समारंभ, विवाह, मृत्यु विधी (घटस्फोट, कुटुंब नियोजन आणि रजस्व काल)

९. मनोरंजन– वाद्यप्रकार, संगीत, कला, नाट्य, नृत्य, लेखन, संवाद कला, क्रीडा व खेळांचे प्रकार, लोककथा, दंतकथा, पौराणिक कथा, लोकगिते

१०. धार्मिक रूढी–परंपरा– देव–देवता, आश्रयस्थाने, यात्रा, जत्रा, अंगात येणे, विविध विधी, उपवास व आराधना, प्रेरणास्थान, मंदिरे, वाडे, धार्मिकशास्त्रे, नीतिशास्त्रे, न्यायव्यवस्था, जात पंचायती, धर्मभावना व जवळीकता, गोत्र, रोटी–बेटी व्यवहार नीति, महिलांचे स्थान

११. सांस्कृतीक जडण–जडण – राहणीमान, ओळख वैशिष्ट्ये, पेहराव (पोशाख), अलंकार बोलीभाषा, चिन्हे, शिलालेख, कलास्थापत्य, शस्त्रे, अस्त्रे, चलन, साधने, चित्रकला, हस्तकला, आहार, सांस्कृतिक–धार्मिक स्थित्यंतरे, महिलांचे स्थान, इतिहास नोंदी

१२. समाजातील घटकांचे परस्परसंबंध– लग्न, उत्सव, आर्थिक देवाण–घेवाण

१३. सद्यस्थितीत संस्कृतीची जपणूक व विकासाच्या अनुषंगाने बदल

१४. इतर धर्मांबद्दलची मानसिकता

१५. इतर धर्मांमधील चाली–रितीचे पालन व अनुकरण

## ४. आर्थिक पार्श्वभूमी व सद्यस्थिती :–

१. सामाजाची आर्थिक पार्श्वभूमी (१९४७ कालखंडापासून असलेले आर्थिक जीवन)

२. पारंपारिक व्यवसाय

३. उदरनिर्वाहाची साधने व व्यवसाय

४. उत्पन्न निर्मिती

५. पशूपालन

६. आर्थिक विकासात कुटुंबाचे स्थान

७. आर्थिक व्यवहार (अंतर्गत व बाह्य) (व्यववहार कसे केले जातात)

८. आर्थिक विकासात महिलांचे स्थान व महत्त्व (महिलांचा सहभाग किती आहे)

९. महिलांची आर्थिक उदरनिर्वाहाची साधने

१०. सद्यस्थिति किंवा २०१० पर्यंत त्यांच्या जीवनमानावर झालेले जागतिकीकरणाचे परिणाम

११. आतापर्यंत सरकारीयोजनांचा झालेला लाभ

१२. रेशनीकार्ड, आधारकार्ड, दारिद्र्यरेषेखालील कार्ड आवश्यक सरकारी कागदपत्रे आहेत का?

१३. शहरीभागात उदरनिर्वाहासाठी केलेले स्थलांतर (जीवनप्रणाली, उदरनिर्वाहाचे साधन)

१४. महिलांचे बचत गट याबाबत माहिती

**५. राजनैतिक इतिहास :–**

१. राजनैतिक ओळख, चिन्ह, झेंडा (आधी माहिती होता का तेव्हा काय व्हायचे, मत कसे करुन घ्याचे)

२. घराणे व पूर्वज (राजकारणात होते काय)

३. नेतृत्व

४. राजकिय

५. सामाजिक गट व समूह

६. ऐतिहासिक घटनांमध्ये राजकीय योगदान

७. महिलांचे राजनैतिक स्थान व दर्जा (१९४७ नंतर)

८. राजकीय स्थित्यांतर (कसे बदलत गेले)

**६. राजनैतिक सद्यस्थिती :–**

१. राजकीय पुढारी

२. पक्ष

३. गट

४. संघटना

५. महिलांचे समूह, स्थान व दर्जा

६. महिलांमधील राजकीय नेतृत्व

७. सामाजिक संस्थांची निर्मिती व विकास

८. सहकार चळवळी

**७. शैक्षणिक इतिहास :–**

१. समाजाची परपंरागत शैक्षणिक पार्श्वभूमी (शिक्षणबद्दल पुर्वीचा विचार)

२. महिलांचा शैक्षणिक दर्जा व स्थान

३. पौराणिक ग्रंथांचा पगडा

४. पारंपारिक शैक्षणिक पद्धती

५. शिक्षण व मूल्य शिक्षण

६. इतर समाज घटकाकडून शिक्षणव्यवस्थेत मिळालेली वागणूक

७. शैक्षणिक सोयी सुविधा सवलती

**८. शैक्षणिक सद्यस्थिती :–**

१. साक्षरतेचे प्रमाण (सद्यस्थितीत कौटुंबीक माहिती)

२. महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण (इतर समाजाच्या तुलनेत)

३. पालकांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन

४. नव पिढीमध्ये शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन

५. उच्च शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन

६. शिक्षणामुळे झालेल्या सुधारणा

७. शैक्षणिक कल

८. आरोग्य व स्वास्थ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन

९. सामाजिक मूल्यांची जोपासना

१०. इतर समाज घटकाकडून शिक्षणव्यवस्थेत मिळालेली वागणूक

११. शैक्षणिक सोयी सुविधा सवलती

## ९. स्त्रीवादी चळवळींचे व पारधी जमातींच्या संघटनाचे महिलांच्या विकासातील योगदान व पार्श्वभूमी

१. भारतातील स्त्रीवादी चळवळी

२. महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळी व संघटनात्मक बांधणी, पारधी संघटना

३. पारधी समाजातील महिलांमधील जनजागृती व स्त्रीवादी चळवळी तसेच पारधी संघटनांचे योगदान

४. पारधी समाजातील महिलांचे समूह संघटन

५. पारधी समाजातील महिलांचे सामाजिक अभिसरण

६. पारधी महिलांचा स्त्रीवादी चळवळीमध्ये व पारधी संघटनेतील सहभाग

७. स्त्री चळवळींचा पारधी संघटनेचा महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन

८. आव्हाने, समस्या व निराकरण

***

# परिशिष्ट-२

## छायाचित्रे



पारध्यांची वस्ती



पारध्यांचा पाल



**पारध्याचा पाल**



**पारधी महिलांचे न्हाणीघर**


पारध्यांचे देवकार्य


पारध्यांचे देवी–देवता व देव्हारा